तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत
अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर करावयाचा शोधप्रबंध

# ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास''

# (Socio-Economic Study of Katkari Tribe in Pune District)

संशोधक

**प्रा. महादेव दत्तू डोंगरे**

(M.A., M. Phil.)
अमृतेश्वर कला महाविद्यालय, विंझर,
ता. वेल्हे, जि. पुणे - ४१२२१३

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. टी. जी. गिते**

(M.A., M. Phil., Ph.D.)
प्रपाठक व विभाग प्रमुख, व्यावसायीक अर्थशास्त्र,
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर, जि. पुणे -४१०५०५

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
गुलटेकडी, पुणे ४११०३७

मे २०१०

# प्रतिज्ञापत्र

मी, **प्रा. महादेव दत्तू डोंगरे**, प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, "**पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास**" हा शोधप्रबंध मी स्वत: माझे मार्गदर्शक **प्रा. डॉ. टी. जी. गिते** यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मी निवडलेल्या विषयावर आधारलेल्या मूळ संदर्भग्रंथातून संकलित केली असून, त्याचा योग्य तो उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे. सदर माहितीचा उपयोग या प्रबंधाव्यतिरिक्त इतर कोठेही केलेला नाही. तसेच हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात किंवा संशोधन संस्थांमध्ये सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : पुणे

संशोधक

दिनांक : **प्रा. महादेव दत्तू डोंगरे**

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते की, **प्रा. महादेव दत्तू डोंगरे** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरिता "**पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास**" या विषयावर सादर केलेला शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. हा शोधप्रबंध तयार करण्यासाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथांचा योग्य तो निर्देश या अहवालात करण्यात आलेला आहे. हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठामध्ये सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : पुणे

मार्गदर्शक

दिनांक :

**प्रा. डॉ. टी. जी. गिते**

# ऋणनिर्देश

"**पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास**" या संशोधन विषयावरील प्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. प्रबंध रचनेच्या कामी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे नैतीक कर्तव्य आहे.

माझे मार्गदर्शक व आदरणीय गुरूवर्य **डॉ. टी. जी. गिते** यांच्या क्रियाशिल मार्गदर्शनामुळे आणि विशेष सहकार्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, उपयुक्त सल्ला, विषयाच्या मुळाशी जाऊन तांत्रिक व शास्त्रशुध्द मार्गदर्शन केले. त्यांचा शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील गाढा अनुभव व वास्तवतेशी जवळीक असणारे मार्गदर्शन या प्रबंधाच्या जडणघडणीत उपयुक्त ठरले आहे. परखड व स्पष्ट मार्गदर्शनामुळे हा प्रबंध पूर्णरूपाला आला. सरांनी मला शिष्य म्हणून स्विकारले, पाठीवर प्रेमळ हात ठेवून आत्मविश्वास वाढविला त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती, कुलगुरू, अधिष्ठाता, विभाग प्रमुख यांनी विद्यावाचस्पती पदवीसाठी या संशोधन विषयाचा अभ्यास करण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

मला ज्यांनी हे जग दाखविले, स्वत: निरक्षर असूनही मला शिक्षणाचा मार्ग दाखविला, आठराविश्व दारिद्रयात गुराढोराप्रमाणे काबाडकष्ट करून निरक्षरतेच्या निवडूंगात शिक्षणाचा दिवा लावा, त्या माझ्या आई-बाबांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

या अभ्यासाच्या संपूर्ण कालखंडात माझी पत्नी सौ. वर्षाराणी महादेव डोंगरे व सुकन्य कु. श्रावणी महादेव डोंगरे यांनी स्वत:चा अभ्यास सांभाळून सतत मला आधार व प्रोत्साहन दिले. संकटसमयी भक्कमपणे पाठिशी उभ्या राहिल्या. त्यांचे या प्रबंध कामी मोठे योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांचाही मी ऋणी आहे.

पुणे जिल्ह्यातील आदिवासी चळवळीचे प्रणेते आणि धडाडीचे कार्यकर्ते मा. सिताराम जोशी, उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ यांनी मला कातकरी समाजाच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा मिळाली. तसेच त्यांच्या बरोबर आदिवासी चळवळीत आयुष्य वाहून घेणारे सर्व कार्यकर्ते यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

अमृनेश्वर कला महाविद्यालय, विंझर, या माझ्या महाविद्यालयातील मा. प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे, सध्याचे प्राचार्य डॉ. संजीव लाटे, प्रा. बाळासाहेब केंदळे, प्रा. रामचंद्र मोकाशी, प्रा. अंकूश नामदास, प्रा. सुरेश मुळुक, प्रा. किरण जाधव, प्रा. हनुमंत वाघमारे, प्रा. शेंडकर, श्री. ढणाल सर, श्री. विजय लिम्हण, श्री. गायकवाड, श्री. पवार, सदाशिव, मोहन, समीर या सर्वांचा मी आभारी आहे.

विशेषत: माझे सहकारी प्रा. डॉ. प्रशांत मगर यांनी आतापर्यंतच्या संशोधन कामात सतत प्रोत्साहन दिले. मार्गदर्शन केले. यातील त्यांचे योगदान मोठे आहे. तसेच प्रा. सौ. अर्चना पंडित आणि त्यांच्या आई आशा कुलकर्णी यांनी सर्वेक्षण काळात डोंगरी व दुर्गम भागातील कातकरी वस्तीला भेटी देण्यासाठी प्रत्यक्ष सतत सोबत राहिल्या आणि त्याही कातकरीमय झाल्या. त्यांच्यामुळे सर्वेक्षणाचे काम मला सहजासहजी पूर्ण करता आले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

ज्यांच्या सामाजिक-आर्थिक जीवनावर हा संशोधन प्रबंध तयार झाला त्या सबंध उपेक्षित कातकरी बंधू-भगिनींनी मला सतत मदत केली, सहकार्य केले. त्यांचे मोलाचे योगदान नाकारता येणार नाही. त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. हे संशोधन कातकरी बांधवांसाठी भविष्यकाळात उपयुक्त ठरावे व त्यांच्या आयुष्यामध्ये समृध्दी यावी अशी अभिलाषा मी बाळगतो. तसेच यापुढेही या बंधूभगिनींसाठी माझ्या आयुष्यातील जेवढा काही वेळ मला देता येईल तसा मी देण्याचा प्रयत्न करीन.

या प्रबंधाच्या टंकलेखनाचे अचुक व सुबक काम श्री. समीर राजोपाध्ये यांनी केले. तसेच श्री. शिवराम राजोपाध्या यांनीही मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच माझे मित्र प्रा. अभिनव मुरकुटे यांनी अतिशय सुबक असे नकाशे तयार करून दिले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

ज्यांनी या प्रबंध रचनेच्या कामी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य केले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

ठिकाण : पुणे

दि. :

**प्रा. महादेव दत्तू डोंगरे**

अशिक्षित आई-बाबांच्या बौध्दिक प्रगल्भतेस
आणि
आठराविश्व दारिद्र्याच्या निवडूंगात त्यांच्या वाट्याला
आलेल्या असहाय्य वेदनेस ...

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | तपशिल | | पान नंबर |
|---|---|---|---|
| १ | **प्रस्तावना** | | **१ – ९६** |
| | १.१ | प्रास्ताविक | ४ |
| | १.२ | आदिवासीचा अर्थ व व्याख्या | ५ |
| | १.३ | आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये | ८ |
| | १.४ | आदिवासींच्या आर्थिक क्रिया | ११ |
| | १.५ | आदिवासींच्या सामाजिक संस्थांतील आर्थिक व्यवहार | २० |
| | १.६ | आदिवासी स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक दर्जा | २५ |
| | १.७ | जगातील आदिवासी | २८ |
| | १.८ | भारतातील आदिवासी | ३६ |
| | १.९ | महाराष्ट्रातील आदिवासी | ६५ |
| | १.१० | कातकरी आदिवासी : एक दृष्टिक्षेप | ८९ |
| | १.११ | सारांश | ९३ |
| २ | **संशोधन आराखडा व पध्दती** | | **९७ – १२०** |
| | २.१ | प्रस्तावना | ९८ |
| | २.२ | संशोधन आराखडा | ९९ |
| | २.३ | संशोधन विषयाची निवड | १०० |
| | २.४ | संशोधन विषयाचे कथन | १०० |
| | २.५ | संशोधन संदर्भ कालखंड | १०१ |
| | २.६ | संशोधन विषयाचे महत्त्व | १०१ |
| | २.७ | संशोधनाची उद्दिष्टे | १०२ |
| | २.८ | संशोधनाची गृहितके | १०३ |
| | २.९ | संशोधन विषयाच्या मर्यादा | १०३ |
| | २.१० | संशोधन पध्दती | १०४ |
| | | २.१०.१ नमुना निवड | १०५ |
| | | २.१०.२ तथ्य संकलनाच्या पध्दती व साधने | १०७ |
| | | २.१०.३ तथ्याचे विश्लेषण, निर्वचन व अहवाल लेखन | १०९ |
| | २.११ | संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार | ११० |
| | २.१२ | प्रकरण मांडणी | ११६ |
| | २.१३ | सारांश | ११९ |
| ३ | **संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन** | | **१२१ – १८५** |
| | १. | संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन | १२२ |
| | २. | सारांश | १७८ |

| प्रकरण क्रमांक | | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|---|
| **४** | | **पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्र : एक दृष्टिक्षेप** | **१८६ – २३१** |
| | ४.१ | प्रस्तावना | १८८ |
| | ४.२ | पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १८८ |
| | ४.३ | पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान | १९३ |
| | ४.४ | पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ | १९४ |
| | ४.५ | पुणे जिल्ह्याची प्राकृतिक रचना | १९५ |
| | ४.६ | नद्या व धरणे | १९६ |
| | ४.७ | जिल्ह्याचे हवामान व पर्जन्यमान | १९८ |
| | ४.८ | वनक्षेत्र व वन उत्पादने | २०० |
| | ४.९ | भूजल मत्स्य व्यवसाय | २०१ |
| | ४.१० | लोकसंख्या | २०३ |
| | ४.११ | लोकसंख्येची घनता | २०४ |
| | ४.१२ | अनुसुचित जाती जमातीची लोकसंख्या | २०५ |
| | ४.१३ | कर्ती लोकसंख्या | २०६ |
| | ४.१४ | स्त्री पुरूष प्रमाण | २०७ |
| | ४.१५ | लोकसंख्येचे वयोगट | २०९ |
| | ४.१६ | साक्षरता | २१० |
| | ४.१७ | प्रशासकीय विभाग | २११ |
| | ४.१८ | वाहतूक व दळणवळण सुविधा | २१२ |
| | ४.१९ | बँका | २१२ |
| | ४.२० | कृषि बाजारपेठा | २१३ |
| | ४.२१ | पशुसंवर्धन | २१४ |
| | ४.२२ | दुग्ध व्यवसाय | २१४ |
| | ४.२३ | वीज | २१५ |
| | ४.२४ | शिक्षण | २१५ |
| | ४.२५ | पाणी पुरवठा | २१५ |
| | ४.२६ | निवासी घरे व कुटूंबे | २१६ |
| | ४.२७ | जमीनीच्या धारण क्षेत्राची रचना | २१६ |
| | ४.२८ | पिकाचे स्वरूप | २१७ |
| | ४.२९ | उद्योग व व्यापार | २१८ |
| | ४.३० | पुणे जिल्ह्यातील आदिवासी | २१९ |
| | ४.३१ | सारांश | २२७ |
| **५** | | **अभ्यास माहितीचे विश्लेषण** | **२३२ – ३३३** |
| | ५.१ | अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबाची वास्तव स्थिती | २३४ |
| | | ५.१.१ कातकरी कुटूंबांचे मूळ स्थान | २३४ |

| प्रकरण क्रमांक | | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|---|
| | ५.१.२ | अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबांच्या वास्तव्याचा कालावधी | २३६ |
| | ५.१.३ | ग्रामपंचायतीतील नोंदी | २३७ |
| | ५.१.४ | मतदार यादीतील नावांच्या नोंदी | २३७ |
| | ५.१.५ | शिधापत्रिकेतील नोंदी | २३८ |
| | ५.१.६ | जातीचे दाखले | २४० |
| ५.२ | कुटूंब व्यवस्था | | २४१ |
| | ५.२.१ | वयोगटानुसार कुटूंबातील सदस्य संख्या | २४१ |
| | ५.२.२ | कुटूंबाचा आकार | २४२ |
| | ५.२.३ | स्त्री–पुरूष प्रमाण | २४३ |
| | ५.२.४ | कुटूंबाचा प्रकार | २४५ |
| | ५.२.५ | कुटूंब प्रमुख | २४६ |
| ५.३ | विवाह स्थिती | | २४७ |
| | ५.३.१ | विवाह पध्दती | २४७ |
| | ५.३.२ | विवाहाचे वय | २४८ |
| | ५.३.३ | वधूमुल्य | २४९ |
| | ५.३.४ | विवाह समारंभ खर्च | २५१ |
| | ५.३.५ | घटस्फोट | २५२ |
| | ५.३.६ | विधवा विवाह | २५२ |
| | ५.३.७ | कातकरी जमातीतील पोटभेद | २५३ |
| | ५.३.८ | कातकरी जमातीतील कुल नामे | २५३ |
| | ५.३.९ | आहार | २५४ |
| | ५.३.१० | वेशभूषा व अलंकार | २५४ |
| | ५.३.११ | घरे व वस्ती | २५५ |
| | ५.३.१२ | अंत्यसंस्कार | २५५ |
| | ५.३.१३ | देवदेवता | २५६ |
| | ५.३.१४ | सण व उत्सव | २५६ |
| | ५.३.१५ | अंधश्रध्दा | २५६ |
| | ५.३.१६ | कातकरी लोकांचे नृत्य | २५७ |
| | ५.३.१७ | जन्म सोहळा | २५७ |
| ५.४ | शैक्षणिक स्थिती | | २५८ |
| | ५.४.१ | शैक्षणिक पातळी | २५८ |
| | ५.४.२ | कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती | २६० |
| ५.५ | आरोग्य स्थिती | | २६२ |
| | ५.५.१ | रोगाचे प्रमाण | २६२ |
| | ५.५.२ | उपचार पध्दती | २६४ |

| प्रकरण क्रमांक | | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|---|


| | | | |
|---|---|---|---|
| | ५.५.३ | मृत्युचे प्रमाण | २६५ |
| | ५.५.४ | स्त्री बाळंतपण | २६६ |
| | ५.५.५ | संतती नियमन शस्त्रक्रिया | २६७ |
| | ५.५.६ | लसीकरण | २६८ |
| | ५.५.७ | व्यसनाधिनता | २६९ |
| | ५.५.८ | स्वच्छता व आरोग्य | २७० |
| | ५.५.९ | वैद्यकिय सुविधा | २७१ |
| ५.६ | सामाजिक, प्रशासकीय दूरावा व कातकरी | | २७२ |
| ५.७ | आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत | | २७३ |
| ५.८ | वार्षिक उत्पन्न पातळी | | २७५ |
| ५.९ | आर्थिक व्यवहार | | २७६ |
| ५.१० | स्थावर मालमत्ता | | २८१ |
| ५.११ | व्यावसायिक स्थिती | | २८२ |
| ५.१२ | मत्स्य उत्पादनाची बाजारपेठ | | २८९ |
| ५.१३ | मासेमारीची अनुकुलता आणि कातकरी वस्तीचे केंद्रीकरण | | २९० |
| ५.१४ | शासकीय योजनांचे लाभ | | २९२ |
| ५.१५ | आदिवासी सहकारी संस्था | | ३०० |
| ५.१६ | श्रमाचा मोबदला | | ३०१ |
| ५.१७ | रोजगार उपलब्धतेचा कालखंड | | ३०६ |
| ५.१८ | कामासाठी स्थलांतर | | ३०७ |
| ५.१९ | राहणीमान पातळी | | ३१० |
| ५.२० | मुलभूत सेवा सुविधांची उपलब्धता | | ३११ |
| ५.२१ | व्यसनाधिनतेचा आर्थिक स्थितीवरील परिणाम | | ३१७ |
| ५.२२ | गांव कारभारातील कातकरी लोकांचा सहभाग | | ३१९ |
| ५.२३ | पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या समस्या | | ३२१ |
| ५.२४ | सारांश | | ३२७ |
| **६** | **निष्कर्ष व शिफारशी** | | **३३४ – ३७१** |
| ६.१ | निष्कर्ष | | ३३५ |
| ६.२ | गृहितकाची पडताळणी | | ३५० |
| ६.३ | शिफारशी | | ३५४ |
| ६.४ | सारांश | | ३६८ |
| | **सामान्य संदर्भ सूची** | | **३७२ – ३७९** |

# तक्ता सूची


| तक्ता क्रमांक | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| १.१ | जगातील विविध देशातील आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी | २९ |
| १.२ | राज्यानुसार अतिमागास आदिवासी समुह | ४३ |
| १.३ | भारतातील राज्यानुसार एकूण व आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी | ४४ |
| १.४ | पंचवार्षिक योजनांमधील आदिम कल्याण कार्यक्रमावरील खर्च | ६३ |
| १.५ | महाराष्ट्रातील जिल्हानिहाय प्रमुख आदिवासी जमाती | ६७ |
| १.६ | महाराष्ट्रातील मागील चार दशकातील एकूण व आदिवासी लोकसंख्या | ६८ |
| १.७ | आदिवासी स्त्री पुरूष निहाय वर्गीकरण | ६९ |
| १.८ | जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्येचे वितरण | ६९ |
| १.९ | महाराष्ट्रातील अतिमागास आदिम जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या | ७२ |
| १.१० | महाराष्ट्रातील सामान्य, आदिवासी व अतिमागास आदिवासी जमातीचा साक्षरता दर | ७२ |
| १.११ | आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसुचित जमातीची कुटूंबे व दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे | ७९ |
| १.१२ | आदिवासी उपयोजनेसाठी केलेल्या तरतुदीची आकडेवारी | ८० |
| २.१ | नमुना निवड | १०६ |
| २.२ | तालुकानिहाय नमुना गावे | १०७ |
| ४.१ | पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ (सन २००१) | १९४ |
| ४.२ | पुणे जिल्ह्यातील निवडक पर्जन्य केंद्रातील सरासरी पर्जन्य (सन २००५) | १९९ |
| ४.३ | पुणे जिल्ह्यातील भूजल मत्स्य व्यवसाय (सन २००६ अखेरपर्यंत) | २०२ |
| ४.४ | पुणे जिल्ह्याची लोकसंख्या | २०३ |
| ४.५ | पुणे जिल्ह्यातील अनुसुचित जाती व जमातीची तालुकानिहाय लोकसंख्या व टक्केवारी | २०५ |
| ४.६ | पुणे जिल्ह्यातील मुख्य व सीमांतीक काम करणाऱ्यांचे उद्योग गट निहाय वर्गीकरण | २०७ |
| ४.७ | पुणे जिल्ह्यातील स्त्री पुरूष प्रमाण | २०८ |
| ४.८ | वयोगटानुसार लोकसंख्येची टक्केवारी | २०९ |
| ४.९ | पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी साक्षर लोकसंख्येचे प्रमाण | २१० |
| ४.१० | पुणे जिल्ह्यातील वर्गीकृत बँका (सन २००५-०६) | २१३ |
| ४.११ | पुणे जिल्ह्यातील जमीनीचे धारण क्षेत्र (सन २००२-०३) | २१६ |
| ४.१२ | पुणे जिल्ह्यातील साखर कारखाने (सन २००४-०५) | २१९ |
| ४.१३ | पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या | २२१ |
| ४.१४ | पुणे जिल्ह्यातील एकूण व आदिवासी वस्ती असलेली गावे व शहरे (जनगणना २००१) | २२२ |
| ४.१५ | पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या | २२३ |

| तक्ता क्रमांक | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| ४.१६ | पुणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्री पुरूष साक्षरता (२००१ नुसार) | २२३ |
| ४.१७ | पुणे जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळा व वसतीगृहांची संख्या | २२४ |
| ४.१८ | पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आरोग्य संस्था | २२५ |
| ४.१९ | आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रस्त्याची लांबी | २२५ |
| ५.१ | कातकरी कुटूंबांचे मूळ स्थान | २३४ |
| ५.२ | कातकरी कुटूंबांच्या वास्तव्याचा कालावधी | २३६ |
| ५.३ | ग्रामपंचायतीतील रहिवासी म्हणून नोंदीचा कालावधी | २३७ |
| ५.४ | मतदार यादीतील नोंदी | २३८ |
| ५.५ | शिधापत्रिकेच्या यादीतील नोंदीचा कालावधी | २३९ |
| ५.६ | जातीचे दाखले | २४० |
| ५.७ | वयोगटानुसार कुटूंबातील सदस्य संख्या | २४१ |
| ५.८ | कुटूंबाचा आकार | २४३ |
| ५.९ | स्त्री–पुरूष प्रमाण | २४४ |
| ५.१० | कुटूंबाचा प्रकार | २४५ |
| ५.११ | कुटूंब प्रमुख | २४६ |
| ५.१२ | विवाहाचे वय | २४८ |
| ५.१३ | वधूमुल्य | २४९ |
| ५.१४ | विवाहाचा खर्च | २५१ |
| ५.१५ | घटस्फोट | २५२ |
| ५.१६ | कुटूंबाची शैक्षणिक पातळी | २५८ |
| ५.१७ | साक्षरता व निरक्षरता | २५९ |
| ५.१८ | कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती | २६० |
| ५.१९ | कातकरी कुटूंबातील रोगाची स्थिती | २६३ |
| ५.२० | उपचार पध्दती | २६४ |
| ५.२१ | मृत्युचे प्रमाण | २६५ |
| ५.२२ | स्त्रीयांचे बाळंतपण | २६६ |
| ५.२३ | संतती नियमन शस्त्रक्रिया | २६७ |
| ५.२४ | रोगप्रतिबंधक लसीकरण | २६८ |
| ५.२५ | व्यसनाधिनता | २६९ |
| ५.२६ | स्वच्छता | २७० |
| ५.२७ | वैद्यकिय सुविधा | २७१ |
| ५.२८ | कातकरी वस्ती व वैद्यकिय सुविधांचे अंतर | २७१ |
| ५.२९ | वार्षिक उत्पन्न पातळी | २७५ |
| ५.३० | हिशोब पध्दती | २७७ |
| ५.३१ | खर्चाचे नियोजन | २७८ |
| ५.३२ | बचत पातळी | २७९ |
| ५.३३ | कर्ज उभारणी | २७९ |

| तक्ता क्रमांक | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| ५.३४ | बँक व्यवहार | २८१ |
| ५.३५ | स्थावर मालमत्ता | २८२ |
| ५.३६ | मुख्य व्यवसाय | २८२ |
| ५.३७ | दुय्यम व्यवसाय | २८५ |
| ५.३८ | कातकरी वस्तीचे केंद्रीकरण | २९० |
| ५.३९ | शासकीय योजनांचे लाभ | २९२ |
| ५.४० | शासकीय योजनांच्या लाभार्थी कातकरी कुटूंबाची तालुकानिहाय टक्केवारी | २९७ |
| ५.४१ | श्रमाच्या मोबदल्याचे स्वरूप | ३०२ |
| ५.४२ | मोबदला निश्चिती | ३०३ |
| ५.४३ | शेतमजूरीचे दर | ३०४ |
| ५.४४ | विटा बनविण्याचे दर (दर हजारी) | ३०५ |
| ५.४५ | वर्षभरातील रोजगार उपलब्धतेचा कालावधी | ३०६ |
| ५.४६ | रोजगारासाठी स्थलांतर | ३०७ |
| ५.४७ | स्थलांतराचे ठिकाण | ३०८ |
| ५.४८ | कुटूंबाच्या स्थलांतराचा कालखंड | ३०८ |
| ५.४९ | घरातील वस्तू | ३१० |
| ५.५० | निवास व्यवस्था | ३११ |
| ५.५१ | पिण्याच्या पाण्याची सुविधा | ३१३ |
| ५.५२ | पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य | ३१३ |
| ५.५३ | वीज सुविधा | ३१४ |
| ५.५४ | मुख्य रस्त्यापासून कातकरी वस्तीचे अंतर (कि.मी. मध्ये) | ३१५ |
| ५.५५ | गावापासून कातकरी वस्तीचे अंतर (कि.मी. मध्ये) | ३१५ |
| ५.५६ | स्वच्छता गृहाची सुविधा | ३१६ |
| ५.५७ | प्रतिदिन व्यसनावरील खर्च | ३१७ |
| ५.५८ | गांव कारभारातील लोकांचा सहभाग | ३२० |

# आलेख सूची


| आलेख क्रमांक | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| ४.१ | पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ (सन २००१) | १९५ |
| ४.२ | पुणे जिल्ह्यातील निवडक पर्जन्य केंद्रातील सरासरी पर्जन्य (सन २००५) | २०० |
| ४.३ | पुणे जिल्ह्याची लोकसंख्या | २०४ |
| ४.४ | पुणे जिल्ह्यातील अनुसुचित जाती व जमातीची तालुकानिहाय लोकसंख्या व टक्केवारी | २०६ |
| ४.५ | पुणे जिल्ह्यातील स्त्री पुरूष प्रमाण | २०८ |
| ४.६ | पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी साक्षर लोकसंख्येचे प्रमाण | २११ |
| ५.१ | कातकरी कुटूंबांच्या वास्तव्याचा कालावधी | २३६ |
| ५.२ | मतदार यादीतील नोंदी | २३८ |
| ५.३ | शिधापत्रिकेच्या यादीतील नोंदीचा कालावधी | २३९ |
| ५.४ | वयोगटानुसार कुटूंबातील सदस्य संख्या | २४२ |
| ५.५ | स्त्री–पुरूष प्रमाण | २४४ |
| ५.६ | कुटूंबाचा प्रकार | २४५ |
| ५.७ | कुटूंब प्रमुख | २४६ |
| ५.८ | विवाहाचे वय | २४८ |
| ५.९ | वधूमुल्य | २४९ |
| ५.१० | विवाहाचा खर्च | २५१ |
| ५.११ | कुटूंबाची शैक्षणिक पातळी | २५८ |
| ५.१२ | साक्षरता व निरक्षरता | २५९ |
| ५.१३ | कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती | २६१ |
| ५.१४ | कातकरी कुटूंबातील रोगाची स्थिती | २६३ |
| ५.१५ | उपचार पध्दती | २६४ |
| ५.१६ | मृत्युचे प्रमाण | २६५ |
| ५.१७ | स्त्रीयांचे बाळंतपण | २६६ |
| ५.१८ | रोगप्रतिबंधक लसीकरण | २६८ |
| ५.१९ | व्यसनाधिनता | २६९ |
| ५.२० | वैद्यकिय सुविधा | २७१ |
| ५.२१ | वार्षिक उत्पन्न पातळी | २७५ |
| ५.२२ | हिशोब पध्दती | २७७ |
| ५.२३ | कर्ज उभारणी | २८० |
| ५.२४ | कातकरी वस्तीचे केंद्रीकरण | २९१ |
| ५.२५ | शासकीय योजनांच्या लाभार्थी कातकरी कुटूंबाची तालुकानिहाय टक्केवारी | २९८ |
| ५.२६ | मोबदला निश्चिती | ३०३ |

| आलेख क्रमांक | तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| ५.२७ | कुटूंबाच्या स्थलांतराचा कालखंड | ३०९ |
| ५.२८ | घरातील वस्तू | ३१० |
| ५.२९ | पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य | ३१३ |
| ५.३० | प्रतिदिन व्यसनावरील खर्च | ३१८ |
| ५.३१ | गांव कारभारातील लोकांचा सहभाग | ३२० |

# सांक्षेपांचा खुलासा / विस्तार

| | |
|---|---|
| आंतर्विवाही | एकाच कुलातील स्त्री पुरूष सदस्यांचा विवाह |
| अतिमागास आदिवासी समूह | शेतीपूर्व अवस्थेतील उत्पादन तंत्र, कमी साक्षरता, स्थिर/घटती लोक संख्या इ. निकषांच्या आधारावर केंद्र सरकारने घोषित केलेल्या आदिवासी जमाती |
| आदिवासी उपयोजना क्षेत्र | आदिवासी विकासासाठीचे एकात्मीक क्षेत्र विकास पध्दती |
| कुल | एकपक्षीय आप्तसंबंधीयांचा वांशिक गट |
| काथोडी / काथोडिया | गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेशात कातकरी जमातीला काथोडी / काथोडिया या नावाने संबोधले जाते |
| कातवडी | कातकरी वस्ती |
| कृतिपट्टीन | कातडे पांघरणारा |
| खावटी कर्ज | दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुपोषित मुलांच्या पालकांसाठी राबविलेल्या योजनेचे नांव |
| गिरीजन | डोंगर, दरी, कपारीत राहणारा |
| ढोर कातकरी | कातकरी जमातीची पोटजात |
| दिक्कू | आदिवासी क्षेत्रात स्थायिक झालेले ब्रिटीश अधिकारी समर्थक, कर्मचारी, व्यापारी, इतर विदेशी व बिगर आदिवासी इत्यादींना आदिवासी लोक दिक्कू असे संबोधतात |
| देज | हुंडा |
| प्रमाण लघुता | कमी लोकसंख्येचा समुदाय |
| बहुपतित्त्व | एका कुटूंबातील अनेक भावाशी विवाह करून एकत्रित राहणे |
| बहिर्विवाही | दोन कुलातील स्त्री पुरूषांचा विवाह |
| युवागृह | आदिवासी तरूण तरूणींसाठी एकत्रित येण्यासाठीचे ठिकाण |
| वनवासी | वनक्षेत्रात वास्तव्य करणारे |
| वधूमुल्य | आदिवासी समाजात वरपक्षाकडून वधू पक्षाला दिला जाणारा हुंडा म्हणजेच वधूमुल्य होय |
| विशेष बहुउद्देशीय आदिम विकास संवर्ग | अनुसुचित जमातीच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेला खंड |
| सांस्कृतिकरणाची प्रक्रिया | एका सांस्कृतिक गटाचा जीवन प्रवाह हा दुसऱ्या सांस्कृतिक गटाच्या जीवन प्रवाहावर प्रभाव पाडतो. त्यामुळे तो गट परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करतो. त्याला सांस्कृतीकरणाची प्रक्रिया असे म्हणतात |
| सोन कातकरी | कातकरी जमातीची पोटजात |
| P. T. G. | Primitive Tribal Group |
| T. S. P. | Tribal Sub Plan |
| ITDP | Integrated Tribal Development Project |
| ATSP | Area Tribal Sub Plan |

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

१.१ प्रास्ताविक

१.२ आदिवासीचा अर्थ व व्याख्या

१.३ आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये

१.४ आदिवासींच्या आर्थिक क्रिया

अ) आदिवासी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये
ब) आदिवासींच्या आर्थिक क्रियेचे प्रकार

१.५ आदिवासी समाजाच्या सामाजिक संस्थांमधील आर्थिक व्यवहार

१.६ आदिवासी स्त्रियांचा सामाजिक–आर्थिक दर्जा

१.७ जगातील आदिवासी

अ) जगातील आदिवासींचे वितरण व प्रदेश
ब) जगातील प्रमुख आदिवासी जमाती

१.८ भारतातील आदिवासी

अ) भारतातील आदिवासीचे भौगोलिक वर्गीकरण
ब) भारतातील प्रमुख आदिवासी जमाती
क) भारतातील अतिमागास आदिम समुह
ड) भारतातील आदिवासी लोकसंख्या
इ) भारतातील आदिवासींचा सामाजिक व मानसशास्त्रीय अभ्यास
ई) भारतातील आदिवासी विरोधी ब्रिटीश धोरणे
प) भारतातील आदिवासींचे बंड
फ) आदिवासी विकासाची वाटचाल

१) आदिवासी विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमि
१.१) स्वातंत्र्यपूर्व काळ
१.२) स्वातंत्र्योत्तर कालीन आदिवासी विकासाची वाटचाल

२) भारतातील आदिवासी विकास योजना
२.१) आदिवासी विकासासाठी घटनात्मक दुरूस्ती
२.२) योजना काळातील आदिवासी कल्याण

२.३) शिक्षण विषयक योजना
२.४) आर्थिक विकास
२.५) वैद्यकीय मदत व आरोग्य संरक्षण
२.६) आदिवासी उपयोजना

१.९ महाराष्ट्रातील आदिवासी

१) महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिक वितरण
२) जिल्हानिहाय प्रमुख आदिवासींचे वितरण
३) जिल्हानिहाय प्रमुख आदिवासी जमाती
४) महाराष्ट्रातील मागील चार दशकातील एकूण व आदिवासी लोकसंख्या
५) आदिवासींचे स्त्री–पुरूष निहाय वर्गीकरण
६) जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्येचे वर्गीकरण
७) अतिमागास आदिवासी
८) महाराष्ट्रातील इतर अतिमागास आदिवासी जमाती – कोलाम व माडिया गोंड
९) महाराष्ट्रातील आदिवासी विकास योजना

अ) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजना

१. आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६
२. आदिवासी विकासाचा बहुउद्देशिय कार्यक्रम

२.१) कृषि व संलग्न सेवा
२.२) ग्रामिण विकास
२.३) पाटबंधारे व पुरनियंत्रण
२.४) विद्यूत विकास
२.५) वाहतूक व दळणवळण
२.६) उद्योग व खनिजे

ब) आदिवासी विकास विभागाच्या योजना

१. शासकीय आश्रम शाळा
२. आर्थिक उन्नतीचे व गृहनिर्माण कार्यक्रम

२.१) मागासवर्गीय गृहनिर्माण योजना
२.२) आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप व डिझेल पंपाचा पुरवठा
२.३) व्यवसायासाठी कर्ज व अर्थसहाय्य
२.४) औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

२.५) जंगल कामगार सहकारी सोसायटी
२.६) नोकऱ्यांमध्ये सवलती

क) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना

१. एकाधिकार धान्य खरेदी योजना
२. गौण वनोत्पादनाची खरेदी
३. एकाधिकार गवत खरेदी योजना
४. खावटी कर्ज योजना

१.१० कातकरी आदिवासी : एक दृष्टिक्षेप

१.११ सारांश

संदर्भ सूची

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

### १.१ प्रास्ताविक :

मानवाच्या जैविक आणि सांस्कृतिक उत्क्रांतीच्या विविध टप्प्यावरून असे दिसून येते की, पृथ्वीवरील प्राण्यामध्ये मानव हा वेगाने विकसीत होत गेलेला प्राणी आहे. मानवाने बुध्दीच्या जोरावर निसर्गावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आद्य पाषाण युगापासून ते धातू युगापर्यंतचा मानवाचा प्रवास विकासाच्या विविध अवस्थांमधून होत गेला आहे. मानवी समाजाच्या विकासात सांस्कृतीकरणाची प्रक्रिया महत्त्वाची ठरली आहे. एका सांस्कृतिक गटाचा जीवन प्रवाह हा दुसऱ्या सांस्कृतिक गटाच्या जीवन प्रवाहावर प्रभाव पाडतो. त्यामुळे दुसऱ्या गटाचे जीवन प्रभावित होऊन तो गट परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करतो. यालाच सांस्कृतीकरणाची प्रक्रिया असे म्हणतात. सांस्कृतीकरणाची प्रक्रिया मानवशास्त्र व समाजशास्त्राचा गाभा आहे. ही प्रक्रिया सर्वच मानव गटाच्या बाबतीत समान असत नाही. प्रत्येक गटाला मिळालेल्या संधी, त्यांनी केलेले प्रयत्न, दुसऱ्या संधीचा प्रभाव आणि त्यांनी त्याला दिलेला प्रतिसाद यावर सांस्कृतीकरणाची प्रक्रिया आणि त्या मानवी समाजाचा विकास अवलंबून असतो.

सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेपासून मानव जातीचे जे समूह दूर राहिले तेच आदिवासी म्हणून आज ओळखले जात आहेत. कातकरी हे आदिम सांस्कृतीकरणाच्या अवस्थेपासून आजही दूर आहेत. कातकरीसारख्या अनेक आदिवासी प्राथमिक अवस्थेत जीवन जगत आहेत. त्यांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीचा अभ्यास करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. म्हणून कातकरी सारख्या आदिमाच्या स्थितीचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे संयुक्तिक ठरते.

## १.२ आदिवासीचा अर्थ व व्याख्या :

### अ) आदिवासी शब्दाचा अर्थ व विकास:

''आदिवासी किंवा आदिम समाज'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विचारवंत, अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी विविध नावे दिली आहेत. रिसले, लॅस्सी, एल्विन, ग्रिगसन, शुबर्न, टॅलेंट, सेडविक, मार्टिन, ए.व्ही. ठक्कर यांनी आदिवासींना अगदी प्राचीन (Aboriginal) किंवा ''मुळचे रहिवाशी'' (Aborigines) म्हटले आहे. आदिम अगर आदिवासी (Primitive Tribes) असे नामाभिधान हटनने केले आहे. डॉ. घुर्ये यांनी त्यांना ''तथाकथित'' मुळचे रहिवासी'' (So-called Aborigines) व ''मागासलेले हिंदू'' (Backward Hindu) असे म्हटले आहे. पण भारतीय राज्यघटनेने त्यांना ''अनुसुचित जमाती'' (Scheduled Tribes) असे म्हटले आहे. हा उल्लेख घुर्ये यांना मान्य आहे.

आखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली या देशपातळीवरील संघटनेच्या तेराव्या राष्ट्रीय महाअधिवेशनात नागपूर, दि. ६ व ७ आक्टोबर २००१ पारित करण्यात आलेल्या ठरावात (ठराव क्र. १. ''संविधानात अनुसुचित जमाती'' ऐवजी आदिवासी शब्दप्रयोगाला घटनात्मक मान्यता देण्यात यावी व त्याप्रमाणे घटनेमध्ये दुरुस्ती करावी असे ठरले.

सन १९५० मध्ये संविधान मंजूर करण्यापूर्वी समितीने अनुसुचित जमातीकरिता गणल्या गेलेल्या जातीच्या (अ) प्राचीन परंपरा (ब) विशिष्ट संस्कृति, (क) भौगोलिक विभक्तता, (ड) लाजरा स्वभाव या चार निकषाखाली मोडणाऱ्या जमातीचा अनुसुचित जमातीमध्ये समावेश करण्याचे ठरविले व त्या प्रमाणे जमातीची राज्यनिहाय यादी १९५० मध्ये राष्ट्रपती आदेशाद्वारे घोषित करण्यात आली.

१३ व्या राष्ट्रीय अधिवेशनातील ठराव क्र. ३ मध्ये ''हरिजन'' या उपाधिला प्रतिबंध घालण्यात आला. त्याप्रमाणेच ''गिरीजन'' किंवा ''वनवासी'' या उपाधिला प्रतिबंध

घालण्यात यावा व प्रचलित उपाधिने संबोधण्यात यावे असे ठरले. ''हरिजन'' या उपाधिवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर ''गिरीजन'' या उपाधिवर आदिवासी प्रतिनिधी जयपालसिंग यांनी आक्षेप घेतले होते. गिरीजन ही उपाधी काढून वनवासी, जंगलवासी वन्यजाती, रानटी टोळ्या व तत्सम शब्द हीनता व कमीपणा दर्शविणारे वाटतात म्हणून आदिवासी हा शब्द अनुसूचित किंवा वर्गीकृत जमाती असा शब्द वापरला जावा असा आग्रह धरला होता. ''वनवासी'' शब्दाला प्रतिबंध करण्यात यावा व प्रचलित ''आदिवासी'' शब्दानेच अनुसुचित जमातींना संबोधण्यात यावे अशी मागणी देशातील वर्गीकृत जमातीत गेल्या ५० वर्षात वाढत आहे[१].

**ब) आदिवासीची व्याख्या :**

विविध मानवशास्त्रज्ञांनी आदिवासींच्या पुढील व्याख्या केल्या आहेत.

- **डब्ल्यू. जे. पेरीः** ''समान बोली भाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समुहाला आदिम समाज किंवा आदिवासी असे म्हणतात.''
- **गिलीनः** ''एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात''.
- **डॉ. रिव्हर्सः** ''ज्या समुहातील सदस्य एक समान बोली भाषा बोलतात, युध्द वगैरे सारख्या उद्दिष्ट पुर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात''.
- **इंपिरिअल गॅझेटः** ''समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरुवातीला आंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या, पण सर्वसाधारणपणे

अंतर्विवाही नसलेल्या व समान नावे धारण करणाऱ्या कुटूंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.''

- **आदिवासी समिती परिषद (शिलाँग १९६२)ः** ''एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशातील वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टिने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाज प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात.''
- **मदन व मजुमदारः** ''समान भाषा व समान संस्कृति असणाऱ्या व आर्थिक दृष्टिने परस्परांसंबंधीत असणाऱ्या ग्रामिण समुच्चयाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून केला जातो.''
- **बोगार्डसः** सुरक्षिततेची जरुरी रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला आहे.''
- **डी. एन. मुजुमदारः** ''समान मानव असणारा एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा एकच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटूंबाचे किंवा कुटूंब समुहाचे एकीकरण म्हणजे आदिवासी समाज होय''.
- **ईव्हान्स प्रिचर्डः** समान लघूता सिमित तंत्रविद्या, साधी अर्थव्यवस्था, या लक्षणांना विशेष महत्व आहे.[२]''

## १.३ आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये :

आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टिने वेगळा असल्याचे प्रचितीला येते.भारतीय मानववंश शास्त्रज्ञांनी आदिम जमातीची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगितलेली आहेत.

- **विशिष्ट भूप्रदेश :** कोणताही हा एक प्रादेशिक समुह असतो. प्रत्येक समाजाचे हे प्रभेदक लक्षण आहे. त्याविना कोणताही समाज अस्तित्वात येत नाही. आदिवासी समाज ही संपर्कापासून अलिप्त व दुर्गम असलेल्या डोंगराळ भागात राहतो.
- **प्रमाण लघुता :** आदिवासी हा थोड्या लोकांचा समुदाय असतो. ज्या विशिष्ट भूप्रदेशावर आदिवासी रहात तो भूप्रदेश मर्यादित असतो. समाजाची व्याख्या मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्र हे तितकेच लहान असते. विशिष्ट भूप्रदेश, मर्यादित लोकसंख्या, त्यामुळे त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.
- **एकाच रक्तसंबंधावर आधारित :** आदिवासी समाजातील परस्परांना रक्त संबंधित मानतात. लोकांची उत्पत्ती एकाच पुर्वजापासून झाली असा त्यांचा दृढविश्वास असतो. आपला पुर्वज एक आहे. ही भावना प्रबळ असते. या दृढविश्वासामुळेच त्यांच्यात विलक्षण बांधिलकी, प्रेम, आपुलकी व साहचर्य निर्माण झालेले असते.
- **स्वतःची बोलीभाषा व लेखनकलेचा अभाव :** आदिवासी समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र जोडणारा अत्यंत महत्वाचा दुवा म्हणजे स्वतःची बोलीभाषा होय. कोणत्याही समाजाची भाषा म्हणजे त्या समाजाच्या जीवनाचे प्रतिबिंब असते. आदिवासींच्या भाषेतील शब्दामधूनच त्यांचे सामाजिक संबंध श्रध्दा, नात्यागोत्याचे संबंध व्यक्त होतात. पण त्यांची भाषा ही बोली भाषाच असते.

* **स्वतःची वेगळी जीवन शैली** : आदिवासी समाजाची जीवन पध्दती इतर समाजाहून अगदी वेगळी आहे. त्यांचे सामाजिक संबंध रक्त व दर्जा यावर आधारलेले असतात. म्हणूनच व्यक्ती व्यक्तीचे परस्पर संबंध करारात्मक नसतात. आप्त संबंधानाच त्यांच्या जीवनात महत्वपूर्ण स्थान असते. त्यांची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था कार्यक्षम व मजबूत असते. त्यांचे रितीरिवाज, रुढी, परंपरा धर्म श्रध्दा इत्यादींनीच त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित झालेले असते. समान सांस्कृतिक जीवन असल्याने त्याचे खाणेपिणे, आचार विचार वेशभुषा व एकूणच जीवनविषयक दृष्टिकोन यामध्ये समानता आढळून येते. यामुळेच इतर कोणत्याही समाजात दिसून न येणारा सामाजिक ऐक्यभाव त्यांच्यात दिसून येते.
* **साधी अर्थव्यवस्था** : आदिवासी समाजाची साधी अर्थव्यवस्था हे एक महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. त्यांच्या निर्वाह प्रधान अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट केवळ दैनंदिन गरजांची पुर्ती हेच असते. वस्तूंचा संचय व वस्तूचा विनिमय नसल्याने पैसा व बाजारपेठ यांचा अभाव त्यांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्षण बनले आहे. त्याऐवजी एकमेकांना मदत करणे व सर्वांना सहभागी करुन घेण्याची प्रवृत्ती विशेषत्वाने आढळते. स्त्री–पुरुषांमध्ये श्रमविभाजन आढळते. पण विशेषीकरणाचा अभाव आहे. आर्थिक क्रिया पार पाडताना निसर्गशक्तीचाच अधिक वापर करुन घेण्यासाठी स्वतःच्या परिश्रमावरच हे लोक विसंबलेले असतात.
* **सीमीत तंत्रविद्या** : आदिवासीची तंत्रविद्या अत्यंत मापक असते. शेती करीता जीवनाची मशागत करण्याचे व इतर क्रियामधील पध्दती जुजबी व मागासलेल्या असतात. मासे पकडण्याची जाळी झोपडी, जनावराचे व शेळ्या कोंबड्यांचे संरक्षण करण्यासाठी बंदिस्त जागा घरे, अवजारे, हत्यारे व इतर

वापरातील वस्तूंचे उत्पादन ते स्वतःच करिता असतात. आदिवासींची आयुधे हत्यारे व त्यांच्या आर्थिक क्रियाचे स्वरुप लक्षात घेता हे स्पष्ट होते की, त्यांचे तंत्रविद्यात्मक ज्ञान अगदीच मर्यादित व तोकडे आहे.

- **समान धर्म :** आदिवासी समाजातील धर्म व धर्माचरण यांना अनन्यसाधारण महत्व आहे. निसर्ग शक्तींना ते अनन्यभावे शरण जातात. अतिमानवी शक्तींना संतुष्ट करण्यासाठी आदिवासी लोक पुर्वजपुजा, देवपुजा व निसर्गपुजा करतात. या अतिमानवी शक्तींना आपलेसे करुन घेण्याचे काम भगत, भुमका, जादूटोणा, मंत्रतंत्र इत्यादींच्या सहाय्याने करु शकतात अशी त्यांची श्रध्दा दिसून येते. आदिवासी समाजाच्या या धर्मश्रध्देने त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन निश्चित दिलेला असतो. त्यामुळेच आदिवासींचा समान धर्म हे त्यांचे वैशिष्टय बनले आहे.
- **सामाजिक एकजिनसीपणा :** आदिवासी समाजाचे हे प्रमुख लक्षण आहे. समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियमने यामुळे आदिवासींच्या संपुर्ण आचारविचारात एकजीनसीपणा दिसून येतो. त्यांचे रितीरिवाज, धर्मश्रध्दा व परंपरा यांचा प्रभाव जनमानसावर इतका पराकोटीचा असतो की, त्यांचे पालन ते अत्यंत काटेकोरपणे करीत असतात. याचमुळे जीवनात घडणाऱ्या कोणत्याही घटनेविषयी आदिवासींची प्रतिक्रिया एकच असते. याच लोकमनाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडलेला असल्याने त्यांच्या आचरणात भिन्नता आढळत नाही.

यावरुन असे स्पष्ट होते की, आदिवासी समाज व इतर समाजाहून वेगळा आहे. दुर्गम व डोंगरी भागात वास्तव्य, रक्तसंबंधांना विशेष महत्व, निसर्गात मुक्त विहार, रितीरिवाज त्यांच्या जीवनात समतोल आढळत नाही[३].

## १.४ आदिवासींच्या आर्थिक क्रिया :

जीवन निर्वाहासाठी मानवाला मुलभूत गरजा भागविण्यासाठी आर्थिक क्रिया कराव्या लागतात. मुलभूत पुर्ती करताना उपलब्ध साधनाचे सहाय्य मानवाला घ्यावे लागते. यालाच आर्थिक क्रिया म्हणतात. मानवी जीवनातील आर्थिक क्रियांचे स्थान महत्वपूर्ण असते. आर्थिक क्रियांचे स्वरुप कालानुरूप बदलत असते. म्हणून आदिम समाजात भिन्नता दिसते. आर्थिक क्रिया वरुन समाजाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप बदलते. ह्या अर्थव्यवस्थेचा परिणाम आदिम समाजाच्या समाजजीवनावर, मनोभूमिकेवर व एकूण जीवन तत्वज्ञानावर अखंडपणे पडत असतो. म्हणून आदिवासींची अर्थव्यवस्था आणि आधुनिक अर्थव्यवस्था यामध्ये फरक दिसून येतो. आदिवासींच्या आर्थिक जीवनाची ओळख याच पार्श्वभूमीवर करुन घेतली पाहिजे.

आदिम समाजात जीवनावश्यक वस्तूंचे संकलन करणे त्यांची निर्मिती करणे त्यांची देवाण-घेवाण होणे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, इत्यादी क्रिया दिसून येतात. मर्यादित साधनांचा समाजातील लोकांच्या अमर्यादित गरजांशी सुसंघटित रीतीने मेळ बसवून समाजातील लोकांना जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्याचे उद्दिष्ट आदिम समाजाच्या अर्थव्यवस्थेला नेहमी समोर ठेवावे लागते.

आदिम समाजात कंदमुळे, फळे गोळा करणे शिकार मच्छिमारी शेती व गुरांची पैदास इत्यादी अर्थव्यवस्थेचे प्रकार थर्नपॉल्ड यांनी सांगितले आहेत.

अ. आदिवासी अर्थव्यवस्थेची वैशिष्टये

ब. आर्थिक क्रियेचे प्रकार

### अ) आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्टये :

मानवतेच्या सुरुवातीच्या काळापासून मानवाची आपले अस्तित्व टिकविण्यासाठी चाललेली धडपड अविरतपणे चालू आहे. जीवननिर्वाहासाठी आपल्या मुलभूत गरजा

भागविणे अगत्याचे असल्याने मानवाला आर्थिक क्रिया कराव्या लागतात. कोणत्याही काळात या क्रियेचे मानवी जीवनात महत्वाचे स्थान असते. अश्मयुगापासून ते आजच्या औद्योगिक युगापर्यंत मानव कोणती ना कोणती आर्थिक क्रिया करीत आला आहे.

जीवनातील मूलभूत गरजा कमीत कमी श्रमात पूर्ण करावयाच्या हेतूने मानवी संबंध व मानवी प्रयत्न संघटीत व नियमित करणे म्हणजेच अर्थव्यवस्था होय. हे आदिमांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्षण आहे. या अर्थव्यवस्थेचा परिणाम आदिमाच्या समाज जीवनावर, मनोभूमिकेवर व एकूण जीवनतत्वज्ञानावर अभावितपणे पडत गेल्याचे दिसते.

आदिमाच्या अर्थव्यवस्थेचा आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या अर्थव्यवस्थेसंबंधी विचार समजावून घेणे महत्वाचे ठरते. एका जर्मन अर्थशास्त्रज्ञाने ''आदिवासी समाजात अर्थव्यवस्थाच नव्हती. अर्थव्यवस्थाहीन समाज होता'' पण विचारवंतांच्या मते अर्थव्यवस्था नाही म्हणणे योग्य नाही. टोब्रियांड बेटावर राहणारे आदिम अधिक पैसे देणारे पाणबुड्याचे काम नाकारतात व मच्छिमारी करणे पसंत करतात. न्यूगिनी मधील जमाती परिश्रमाने मिळविलेला पैसा नातलगांना भेटी द्यावयाच्या वस्तूवर एकदम खर्च करुन टाकतात. महाराष्ट्रातील यवतमाळ भागातील कोलाम पैशाच्या स्वरुपातील मजुरी स्विकारीत नाहीत. तेव्हा आदिवासीची अर्थव्यवस्था नाही म्हणणे योग्य नाही.

आदिवासी जमातीची साधी अर्थव्यवस्था हे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. दैनंदिन गरजांची पूर्तता हेच मुख्य उद्दिष्ट त्यांच्या अर्थव्यवस्थेचे असते. केवळ उपभोगा एवढेच उत्पादन विचारात घेतले जाते. उपभोग्य वस्तूचे एवढे कमी उत्पादन असते की, त्यांच्या जीवनावश्यक गरजा देखील पूर्ण होत नाहीत. वस्तूंचा संचय व वस्तूंचा विनिमय नसल्याने पैसा व बाजारपेठेचा अभाव त्यांच्या अर्थव्यवस्थेत आढळतो. नफाविरहीत अर्थव्यवस्था असते. स्त्री–पुरुषात श्रमविभाजन आढळते. पण विशेषीकरणाचा अभाव आढळतो.

आर्थिक क्रियेमध्ये निसर्ग शक्तीला अधिक महत्व दिले जाते. स्वतःच्या परिश्रमावर हे लोक विसंबलेले असतात. जीवनातील किमान गरजा पुर्ण करणे हे मुख्य उद्दिष्ट असते. ती निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था असते. मर्यादित गरजा असतानाही पुरेशी

साधने उपलब्ध नाहीत. आदिवासी अर्थव्यवस्थेतील उत्पादन तंत्र अतिशय मागासलेले असते. उत्पादन तंत्रात नैसर्गिक शक्तीचा वापर केला जातो. वापरली जाणारी हत्यारे व अवजारे अत्यंत अविकसित व माफक असतात. शेती कसण्याचे तंत्र मागासलेले असते. तांत्रिक ज्ञान मर्यादित व तोकडे असते.

आधुनिक अर्थव्यवस्थेपेक्षा आदिवासींची अर्थव्यवस्थाच वेगळी असते. त्यांच्या गरजा मर्यादित असल्यामुळे उत्पादीत वस्तूची देवाण-घेवाण अगदीच नगण्य असते. व्यवहारात वस्तूविनिमय पध्दती असते. म्हणजे पैसा विरहीत अर्थव्यवस्था असते.

आदिमांचे आर्थिक व्यवहार सामुहिक स्वरुपाचे असतात. सर्वजण एकत्र येतात व त्यांच्या गरजा एकमेकांच्या सहाय्याने पूर्ण करतात. म्हणजे त्यांची सामुदायिक अर्थव्यवस्था असते[४].

आदिमांच्या आर्थिक जीवनात स्थिरता व समानता आढळते. कारण आदिम समाज इतर समाजापासून दूर व दुर्गम भागात रहात असतो. त्यामुळे प्रगत समाजाच्या आर्थिक जीवनात उठणाऱ्या आंदोलनाचा व वादळी बदलांचा स्पर्शही आदिम जीवनाला होत नाही असे डॉ. मुजुमदार व मदन यांनी स्पष्ट केले आहे[५].

अशा प्रकारे आदिवासींची अर्थव्यवस्था समजून घेताना त्याचे हेतू, विभिन्न संघटन, एकरुपता व स्थिरता, सामाजिक जाणीवा जीवंत ठेवण्यासाठी मिळत असलेल्या प्रेरणा इत्यादी बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. तरच आदिम अर्थव्यवस्थेचे वेगळेपण बुध्दीला व विचाराला चालना देणारे ठरेल.

**ब) आदिवासींच्या आर्थिक क्रियेचे प्रकार :**

निसर्गातील परिस्थिती व अवगत तांत्रिक ज्ञान या गोष्टीवर आर्थिक क्रियेचे प्रकार अवलंबून असतात. या गोष्टी सारख्या बदलत असल्याने आर्थिक क्रियांच्या प्रकारची संख्या सारखी वाढत असते. कोणत्याही एकाच प्रकारावर कोणताही समाज संपूर्ण व कायम अवलंबून असत नाही.

अश्मपाषाण युगात खाद्यसंकलन, शिकार व मासेमारी हे आर्थिक क्रियेचे प्रकार होते. नवपाषाण युगात पशुपालन व वनस्पतीची लागवड याला सुरुवात झाली आणि नंतरच्या विविध धातूच्या युगामध्ये त्यात अनेक उद्योगधंद्याची भर पडली. अशा प्रकारे पाषाण युगातील लोकांच्या अर्थव्यवस्थेसारखी अर्थव्यवस्था असल्याने त्या युगातील आर्थिक क्रियांचे प्रकार हल्लीच्या आदिवासी लोकांमध्ये प्रचलीत असलेले दिसून येतात.

विकासवादी विचारवंतांनी विकासवादाच्या दृष्टिकोनातून समाजाच्या आर्थिक क्रियांचा विचार केला. आदिम समाज चार अवस्थांमधून जातो. विकासवादी विचारवंतांच्या मतानुसार समाजातील सर्व लोक एकाच आर्थिक अवस्थेत असतात. त्याच्या आर्थिक अवस्था क्रमाने बदलतात. खाद्यसंकलन, शिकार, पशुपालन, शेती अशा क्रमाने अवस्था बदलतात. पण ही क्रमवारी मान्य होत नाही. कारण कोणत्याही समाजातील लोक एकावेळी एकाच अवस्थेत नसतात. तर वेगवेगळ्या अवस्थांमध्ये असतात. कोणत्याही अवस्थेतून कोणत्याही अवस्थेमध्ये जाऊ शकतात. आदिवासींनी खाद्यसंकलन अवस्थेतून शेती अवस्थेत प्रवेश केल्याचे दिसते.

आदिवासीच्या आर्थिक क्रियांच्या प्रकारचा विचार विकासवादी दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे. आदिवासींच्या जीवन निर्वाहाच्या परिश्रमाची प्रत्यक्ष वस्तूस्थिती पाहिल्यास अन्न संपादन अन्न उत्पादन या दोन प्रकारानी आदिवासी जीवनावश्यक खाद्य पदार्थाची तरतुद करतात असे दिसते. पहिल्या अवस्थेत पर्यावरणातील उपलब्ध साधन संपत्तीचा वापर खाद्यसंकलनासाठी करतात. त्यात वाढ करता येत नाही. खाद्य संकलन, शिकार, मासेमारी पहिल्या प्रकारात मोडतात. याउलट उत्पादनाच्या प्रकारामध्ये जीवनावश्यक वस्तूच्या साठ्यामध्ये कितीही वाढ करता येते. याबरोबर आदिवासी हस्तव्यवसाय करुन मजुरी करुन जीवन निर्वाह करतात.

भारतात आदिवासी जितक्या साधेपणाने तितक्या खडतरपणे जीवन जगतात. आर्थिक विकासाच्या विविध पातळीवर हे आदिम आहेत. मिळेल त्या मार्गाने अन्नावस्था ही गरज पूर्ण करतात. शिकार, वनवस्तू संकलनही करतात. त्यांची अर्थव्यवस्था संमिश्र

स्वरूपाची असते. भारतातील ईशान्य विभागातील आदिवासी बदलती कुऱ्हाड शेती करतात, तर दक्षिणेकडील आदिवासी निसर्गातील अन्नसंकलन करतात. त्या बरोबर शिकार, मासेमारी, टोपल्या तयार करणे शेतमजूरी, कारखान्यात मजूरी इत्यादी व्यवसाय भारतातील आदिवासी करतात.

आर्थिक क्रियेकडे वास्तवदृष्टिने पाहिल्यास अन्नसंपादन व अन्न उत्पादन या मार्गानी आदिवासी गुजराण करीत असल्याचे दिसते. आर्थिक क्रियाचे प्रकार प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ फोर्ड व हस्कॉबिटझ यांनी पुढील प्रमाणे सांगितले आहेत.

- **अन्न संकलन :**

अन्न संकलन ही मानवजातीतील आढळून येणारी प्राथमिक स्वरूपाची आर्थिक क्रिया आहे. निसर्गातील खाद्य वस्तूंचा संग्रह करुन त्यावर उपजिविका करणे यास खाद्य संकलन असे म्हणतात. मुंग्या, कृमी, किटक, प्राणी, याचा यात समावेश होतो. खाद्यसंकलन ही मानवाची सर्वात जुनी पध्दत आहे. कोणतीही अवजारे नव्हती तेव्हाची ही पध्दत आहे. आलिकडील काळातही खाद्यसंकलनाची पध्दत अस्तित्वात आहे. या पध्दतीतून मानवाने हळूहळू प्रगती करुन पशुपालन व शेती या अन्नउत्पादन मार्गाचा विकास केला म्हणून मानवाच्या इतिहासामध्ये खाद्य संकलनावर जीवन निर्वाह करणाऱ्या प्रकारला विशेष महत्व आहे.

खाद्य संकलनावर गुजराण करणाऱ्या आदिवासी लोकांची संख्या अगदी अल्प आहे. हे आदिवासी लोक जगभर विखुरले आहेत. ताम्रवर्णीय इंडियन मिसीसिपी नदीच्या काठाने होड्या नेतात व किनाऱ्यावर उगवलेले अन्न गोळा करतात. एस्किमो लोक बर्फाळ प्रदेशात बोरासारखी फळे रुचीने खातात. टोळ, नाकतोडे व गोगलगाय खाणारे आदिवासीही दिसून येतात. ऑस्ट्रेलियातील अरुंटा जमातीतील लोक टोकदार काठीने जमीन उकरुन कंदमुळे संकलीत करतात तर टास्मानिया बेटावरील आदिवासी खाद्य संकलनाचे खरेखुरे प्रतिनिधी आहेत. मलायातील हॉटेंटॉट पिग्मी अंदमान बेटावरील

आदिवासी, दक्षिण आफ्रिकेतील ब्रुशमन, आणि श्रीलंकेतील वेद्द हे आदिवासी खाद्य संकलन सदरात मोडतात.

भारतातील कांही आदिवासी जमाती अन्न संकलनाच्या शोधात भटकत असतात. उदा. भारतातील कादर, मलपंतरम्, पलियन, पतियन, येणाडी व कुरूंब, आंध्र प्रदेशातील चेंचू, मध्यप्रदेशातील बैगा, गोंड, बिहारमधील बिरहोर, महाराष्ट्रातील ठाकूर, भिल्ल इत्यादी जमाती रानातील करवंदे, कैऱ्या, झाडपाला, मध गोळा करतात. कारण कोणत्याही समाजातील लोक एकावेळी एकाच अवस्थेत नसतात. आदिवासींनी खाद्यसंकलन अवस्थेतून शेती अवस्थेत प्रवेश केल्याचे दिसते.

- **शिकार :**

अन्न संपादनाच्या प्रकारात खाद्यसंकलनाबरोबर शिकार व मासेमारी या प्रगत आर्थिक क्रिया समाविष्ट होतात. खाद्यसंकलनावर उपजिवीका करणारा मानव मुख्यतः शाकाहारी असतो तर शिकार व मासेमारी करणारा मानव हा मुख्यतः मांसाहारी असतो.

शिकारीमध्ये अनेक प्रकारच्या पशु-पक्षांना मारण्याचे प्रयत्न केले जातात. उदा. ससा, हरिण, सांबर, गवा, रानडुक्कर, हत्ती, कांगारू, ग्वनॅको, कबूतर, चिमणी, मोर, ससाणा, गिधाड, गरूड, इत्यादी पशुपक्षाची शिकार केली जाते.

शिकारीत भाला, बरची, बाण, कुत्री, धनुष्यबाण, जाडजूड सोटा, गोफण, गदा, कुऱ्हाड, कोयता, बुमरँग इत्यादी हत्यारे आदिवासी लोक वापरतात.

म्हैसूरमधील कूर्ग आदिवासी जंगलात हत्तीची शिकार करतात. एस्किमो लोक देवमासा, भिल्ल लोक वाघ, यवतमाळ मधील कोलाम रान डुक्कर शिकार करण्यात पटाईत आहेत.

दक्षिण आफ्रिकेतील बुशमेन लोक शहामृगाचे कातडे पांघरूण त्यांची शिकार करतात. ही क्लुप्ती कॅलिफोर्नियातील आदिवासी हरिणाची करण्यासाठी वापरतात. दक्षिण आफ्रिका व दक्षिण भारतातील अनेक जमाती शिकारीत पटाईत आहेत.

शिकार करणाऱ्या जमाती भटक्या असतात. दक्षिण अमेरिकेतील ओना आदिवासी ग्वनॅको जनावरांचा पाठलाग करीत कितीतरी लांब भटकत असतात. शिकारी प्रदेशातील लोकसंख्येची घनता नेहमी कमी असते.

- **मासेमारी :**

शिकारीप्रमाणे मासे पकडणे ही आदिवासींची आवडती आर्थिक क्रिया आहे. आदिवासींना मासेमारीचे तंत्र अवगत असले तरी फार थोडे आदिवासी मासेमारीवर उपजिवीका करताना आढळतात. म्हणून बहुतांश मासेमारी हा आदिवासीची अन्न संपादनाची पूरक प्रचलित अर्थिक क्रिया आहे.

समुद्र, नद्या, ओढे, नाले, डबके इत्सादी ठिकाणी मासे पकडण्याचे प्रयत्न आदिवासी करतात. त्यासाठी नावा, बोटी, तराफे, लाकडाचे ओंडके, जाळी, गळ, भाले, मोठ्या बरच्या व धनुष्यबाण इत्यादी साधनांचा वापर मासेमारीसाठी केला जातो.

दक्षिण आफ्रिकेतील आदिवासी बाणाने मासेमारी करतात. एस्किमो व दक्षिण द्वीपामधील आदिवासी बहिर्वक्र सुरीचे भाले वापरुन व्हेल माशाची मासेमारी करतात. ऑस्ट्रेलियातील जमाती गळ लावून मासेमारी करतात. भारतातील जमाती गळ, भाले, धनुष्यबाण, जाळी, विळा, पातळ कापड इत्यादी साधनांचा वापर करतात.

- **पशुपालन :**

खाद्य संकलन करता करता खाद्यउत्पादनही करता येते, याचा शोध मानवाला लागला. या आर्थिक क्रियेने मानवाच्या मूलभूत गरजा तर सहजपणे भागत गेल्या आणि आदिमांच्या जीवनाला स्थैर्य लाभले. जगाच्या सर्व संस्कृत्या नद्यांच्या काठावर बहरल्या. याचे कारण हेच आहे. आजच्या औद्योगिक युगाचा पाया पशुपालन व शेती या आर्थिक क्रियांनी घातला.

पशुपालनातून दूध, मांस, कातडे, हाडे केस हे पदार्थ मानवाला मिळू लागले. वाहतुकीसाठी जनावराचा उपयोग होऊ लागला.

कुत्रा, म्हैस, गाय, बैल, शेळी, मेंढी, हरिण, मेंढ्या, डुकरे, कोंबड्या, बदके, मोर कबूतरे हे पक्षी यांचे पालन यात समाविष्ट असते.

आसाममधील कूकी लोक लाकडाच्या वाहतुकीसाठी हत्तीचा उपयोग करतात. उंटाचा वाळवंटात उपयोग केला जातो. परंतु उत्तर अमेरिकेतील ताम्रवर्णीय आदिमांना व ऑस्ट्रेलियातील आदिमांना शेतीकामासाठी जुंपले होते.

ब्रह्मदेशात कोंबड्या, आफ्रिकेतील बंजारा लोक, कबुतरे, ब्राझिलमधील बकैटी लोक पोपट, बगळा व पाल इत्यादींची जोपासना करतात.

पशुपालन हा बहुअंशी आदिम जमातीत एक पूरक व्यवसाय आहे. निव्वळ पशुपालनावर उपजिविका करणाऱ्या आदिमांची संख्या मात्र अगदीच थोडी आहे. भारतातील निलगिरी पर्वतात राहणारे तोडा आदिवासी पशुपालक आहेत. हिमालयातील गुज्जर जमात पूर्वी पशुपालनावर उदरनिर्वाह करीत. पश्चिम आशियातील किरगीझ, कझाक, तार्मर, अल्लाई हे लोक शेळ्या व मेंढ्या पाळतात. दक्षिण आशियातील चुकची व कोर्याक या जमाती रेनडियर पाळतात. थोडक्यात पशुपालनाने आदिम जीवनाला कलाटणी मिळाली आहे.

- **शेती :**

अन्न उत्पादनाच्या क्रियेतील ही आर्थिक क्रिया सर्वार्थाने महत्वपूर्ण आहे. मानवी जीवनात मूलभूत स्वरूपाचे स्थित्यंतर शेतीमुळेच घडले. मानवी जीवनाची सुरूवात शेतीमुळेच झाली. शेती या आर्थिक क्रियेची सुरूवात निश्चित केव्हा झाली याचा पुरावा उपलब्ध नाही. परंतू कित्येक हजार वर्षापासून शेती केली जात आहे.

आजच्या १९ दशलक्ष आदिम जमातीपैकी, १७ दशलक्ष आदिमशेती करतात. आदिम स्त्रिया व पुरुष दोघेही शेतीच्या विविध कामांत गुंतलेले असतात. भारतातीतल आदिमापैकी उरॉव, मुंडा, भिल्ल, संथाल, मजहर, खारवार, बैगा, कोरवा, गोंड, हो व आसाममधील बऱ्याच जमाती शेती करतात. आदिम जमाती जरी शेती करीत असल्या तरी त्यांच्या जीवन निर्वाहाचा प्रश्न पूर्णपणे सुटला असे म्हणता येत नाही.

जगातील सर्वच पठारी प्रदेशातील आदिवासींच्या शेतीचे स्वरुप स्थलांतरीत आहे. एकाच जमीनीची मशागत सातत्याने न करता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन तेथे शेती केली जाते. यालाच स्थलांरीत शेती केली जाते. यालाच स्थानांतरीत शेती असे म्हणतात.

भारतात विविध आदिम शेतीला विविध नांवानी संबोधतात, कुऱ्हाड शेती, नाग लोकांनी झुम शेती, बैगा जमातची बेवार शेती, माडिया लोकांची पेंडा शेती, खोंड जमातीची पोडू शेती, भुईया जमातीची दही शेती, इत्यादी नावानी शेतीला ओळखले जाते. आधुनिक व प्रगती शेतीची सुरुवात आदिम शेतीनी केली असे म्हटले जाते. भारतातील सर्वच आदिवासी स्थलांतरित शेती करतात असे नाही तर डोंगर उतारावर शेती करणारे रेंगामा व नागा, राजस्थानचे भिल्ल, मध्यप्रदेशातील गोंड, बिहारमधील संथाल, महाराष्ट्रातील ठाकूर, आसाममधील खासी व इतर जमाती मुंडा, उराँव, थारू हे लोक जमीन नांगरून शेती करतात.

- **हस्त व्यवसाय :**

म्हणून बहुसंख्य आदिवासी जमाती पूरक व्यवसाय करतात. यालाच दुय्यम व्यवसाय म्हणतात. टोपल्या तयार करणे, मडकी तयार करणे, चटया तयार करणे, यासारखे असंख्य व्यवसाय करतात.

मध्य भारतातील माडिया गोंड जंगली पदार्थापासून मद्य तयार करतात. साओरा, कोंड व गोंड या जमाती गायी पाळतात. तसेच घरकाम, बांबूचे काम करतात, मातीची भांडी तयार करतात. कोलाम लोक सुतारकाम करतात. ओरिसातील बोंदोलोक कापड विणतात. दक्षिण भारतातील इरुला लोक चटया तयार करतात. उत्तर भारतातील परधान जमाती संगीत वाद्य तयार करतात. कोल्हापूर जिल्ह्यातील गोपाळ लोक गुळ तयार करण्याचे काम करतात[६].

## १.५ आदिवासींच्या सामाजिक संस्थांतील आर्थिक व्यवहार :

- **वधुमूल्य :**

आदिवासी समाजात वधु तिच्या कुटुंबियांकडून विनामूल्य स्विकारली जात नाही. वधुपित्याला प्रचलित रितीरिवाजानुसार कांही तरी मोबदला देऊन वरपित्याने आपल्या मुलासाठी वधु आणावी असा आदिम समाजात सामान्य दंडक असतो. आदिम समाजात मूल्य देऊन वधू मिळविणे आवश्यक समजले जाते. कारण या समाजात स्त्री ही उपयुक्त व्यक्ती असते. कुटुंबात दैनंदिन कामात आणि अर्थोत्पादनाच्या कार्यात स्त्री हातभार लावते. तिच्या श्रमशक्तीचा कुटुंबाला मोठा आधार वाटतो. स्त्रीजवळ जनन क्षमता असते. मुलांबाळांमुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते असे त्यांना वाटते. स्त्रीची श्रमशक्ती आणि जननक्षमता या दोन कारणांमुळे ती कुटुंबाची परिसंपत्ती मानली जाते. अशी परिसंपत्ती असलेली वधू वरपक्षाच्या घरी देताना वधुपित्याला नुकसान सोसावे लागते. वधूपित्याचे असे नुकसान टाळण्यासाठी भरपाई म्हणून वर पक्षाने वधूपक्षाला कोणत्या तरी स्वरुपात काही ना काही मूल्य द्यावे अशी प्रथा आदिम समाजात पडली आहे.

स्त्रीजवळ जननशक्ती व क्रयशक्ती असते. तिच्यापासून वरपक्षाचा फायदा होतो. तिच्या पासून निर्माण होणाऱ्या संतती आणि संपत्ती यावर हक्क प्राप्त करण्यासाठी पित्याला कांही किंमत मोजावी लागते. कांही आदिम जमातीत केवळ या हेतूने वधू मूल्य दिले जाते. तो हेतू साध्य झाला नाही तर वधू मूल्य परत घेतले जाते.

उत्तर भारतातील खस जमातीत वधू मूल्याचा अर्धा भाग लग्नापूर्वी व उरलेला पत्नीला मुलगा झाल्यावर देतात. दक्षिण आफ्रिकेत थोंगा जमातीत मुल होण्याआधी जर बायको मरण पावली तर सासऱ्याकडून वधू मूल्य वसूल केले जाते. दक्षिण आफ्रिकेतील बांटू जमातीत वधू पक्षाला जनावराच्या स्वरुपात मोबदला दिला जातो. जर वरपक्षाने वधुमूल्य पूर्णांशाने दिले नाही तर झालेल्या संततीवर वधू पक्षाचा अधिकार राहील असा नियम आहे. ''जनावरे द्याल तर मुले मिळतील'' अशी बांटू जमातीत म्हण आहे.

वधूमूल्य देण्याच्या अनेक रिती आदिम समाजात प्रचारात आहेत. वधूमूल्य पैशाच्या किंवा वस्तूच्या स्वरुपात देता येते. भारतातील अनेक आदिम जमातीत वधूमूल्याला 'देज' असे म्हणतात. रोख रक्कम, धान्य, जनावरे, दागदागिने, कपडेलत्ते, भांडीकुंडी, हत्यारे, मौल्यवान, शोभेच्या व समारंभाप्रसंगी वापरावयाच्या वस्तू आदी स्वरुपात देज देता येतो. वारल्यामध्ये रक्कम, धान्य, जनावरे, दागिने, भांडी कपडे इत्यादी वस्तू दिल्या जातात.

वधूमूल्याचे परिमाण नक्की ठरलेले असत नाही. तर परिस्थितीनुसार बदलते. वधूपक्ष व वरपक्ष यांचा समाजातील दर्जा सांपत्तिक स्थिती, वधूचे सौंदर्य, प्रकृतिमान, कलाकौशल्य याच्यावर वधुमूल्य अवलंबून असते. विधवा किंवा घटस्फोटीत वधूला वधुमूल्य कमी दिले जाते.

- **कुटुंब संस्था व स्त्री पुरुष श्रमविभाजन :**

कुटुंब हा एक आर्थिक घटक आहे. कुटुंबातील सदस्य विविध आर्थिक क्रियांमध्ये कशा रीतीने व कितपत सहभागी होतात. त्यावर कुटुंबाच्या विकासाचे स्वरुप अवलंबून असते. सर्व आदिम जमातीत पुरुष व स्त्रीया आपल्या कुटुंबाच्या आर्थिक क्रियामध्ये आपापल्या परिने सहभागी होतात. त्यांच्यात श्रमविभाजन केले जाते. कांही वेळा स्त्रीपुरुषांची शारीरिक वैशिष्टये लक्षात न घेता केवळ रुढी परंपरा विचारात घेऊन श्रमविभाजन केले जाते. त्यामुळे आदिम जमातीत श्रमविभाजनात फरक दिसून येतो. उदा. दक्षिण आफ्रिकेतील बंटू जमातीत गाईला स्पर्श करण्याची परवानगी स्त्रीला नसते. नैऋत्य आफ्रिकेतील राहणाऱ्या हॉटेनटॉट जमातीत स्त्रियाच नेहमी गाईची धार काढतात. किंबहुना आदिम समाजात स्त्री पुरुष दोघेही आपल्या कुटुंबाच्या आर्थिक क्रियांना हातभार लावतात असे सामान्यपणे दिसून येते.

सोप्या आर्थिक क्रिया स्त्रीया करतात तर अवघड क्रिया पुरुष करतात. जननक्रिया व अनुषंगिक कार्ये सांभाळून स्त्रीयांना आर्थिक कार्य करावी लागतात. घराची देखरेख

करणे, स्वयंपाक करणे, बागकाम पाहणे, शिवणकाम करणे, भरतकाम करणे, यासंबंधी साधी कामे स्त्रिया करतात. याउलट पुरुषाचे शरीर सामर्थ्यवान असते. मोकळेपणाने कष्टाचे कोणतेही काम पुरुष करु शकतो. लढाई करणे, शिकार करणे, मासे पकडणे, जनावरे पाळणे, यासारखी कामे पुरुषांना करावी लागतात.

जेव्हा स्त्रीया व पुरुष यांना एखाद्या व्यवसायात एकत्र काम करावे लागते तेव्हा त्यांचा वेगवेगळ्या कामाची स्पष्टपणे आखणी झालेली असते. उदा. मादागास्कर देशातील भात पिकविणाऱ्या आदिम जमातीत स्त्री–पुरुष मिळून काम करतात. पण शेतीच्या विविध कामाची त्यांच्यामध्ये निश्चित वाटणी झालेली असते. पुरुष जमीनीची मशागत करतात. तर स्त्रिया रोपे लावण्याचे काम करतात. तोडणी झालेला भात स्त्रिया खळ्यावर नेतात तर पुरुष मळणी करतात. भात सडून शिजविण्याचे काम स्त्रिया करतात.

भारताच्या ओरिसा प्रदेशातील खरिया या डोंगरी जमातीच्या प्रत्येक कुटुंबात स्त्री पुरुषात श्रमविभाजन झाल्याचे स्पष्ट दिसून येते. शिकार करणे किंवा मासे पकडणे हे नवऱ्याचे काम असते तर झाडपाला पाचोळा गोळा करणे हे स्त्रीचे काम असते. पुरुष घरे बांधतात तर स्त्रिया घराची देखरेख ठेवतात. आसाममधील खासी जमातीत पुरुष शेतीची कामे करतात तर स्त्रिया कापड विणण्याचे काम करतात[७].

- **बहुपतित्व विवाह संस्थेचे अर्थकारण :**

बहुपतित्व विवाह पध्दतीत स्त्रीच्या आर्थिक सुरक्षिततेचा विचार महत्वपूर्ण मानला जातो. आदिवासी स्त्री बहुपतित्व विवाह पसंत करते व तिला सुरक्षितता वाटते. वधू पितासुध्दा आपल्या मुलीचे लग्न करताना तिच्या आजन्म रक्षणाची व पालनपोषणाची जेथे खात्री वाटते तेथे लग्न करतात. ज्या कुटुंबात अधिक भाऊ असतात ते कुटुंब पसंत केले जाते. या पध्दतीत सर्वच भाऊ एकत्रित राहतात. त्यामुळे जमीनीचे, संपत्तीचे विभाजन होत नाही म्हणून आदिम स्त्रिया व वधू पक्ष या विवाह पध्दतीला महत्व देतात.

- **आदिमामधील कुलाची आर्थिक कार्ये :**

प्रत्येक कुलाला आर्थिक आणि विशेषतः मालमत्ता संबंधित कार्ये करावी लागतात. विविध प्रकारच्या मालमत्तेची मालकी कुलाकडे असते. शेतजमीन, बगीचे, देवळे, सभागृहे, पवित्र वस्तू, यासारखी मुर्त मालमत्ता कुलाच्या मालकीची असू शकते. मालमत्तेचे वितरण करणे, मालमत्ता विषयक संबंध नियंत्रित करणे, अर्थोत्पादनास मदत करणे इत्यादी आर्थिक कार्ये कुलाला करावी लागतात. उदा. सर्व शेत जमीन कुलाच्या मालकीची असते आणि ती जमीन कुलातील कुटुंब प्रमुखांमध्ये वाटण्याचे व हिशेब ठेवण्याचे काम कुलप्रमुखाला करावे लागते. प्रत्येक कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी अशी जमीन मिळण्याचा अधिक असतो. मिळालेली जमीन स्वतः कसणे, अगर दुसऱ्यास कसण्यास देणे हे कुटुंब प्रमुखावर अवलंबून असते. पण कोणत्याही परिस्थितीत आपल्या कुलाबाहेरील व्यक्तीस जमीन कसण्यास देता येत नाही. अशा रीतीने प्रत्येक कुटुंबाला जमीनीच्या उपभोग घेण्याचा अधिकार असतो. पण तिचा मालकी हक्क असत नाही. कारण सर्व मालकी हक्क कुलाच्या स्वाधिन असतात. अशा तऱ्हेची पध्दत अमेरिकेतील अझटेक जमात व इंडोनेशियातील जमातीमध्ये अजून प्रचलित आहे आणि आफ्रिकेतील जमातीतून देखील ती आढळून येते.

- **युवागृहाची आर्थिक कार्ये :**

जमातीच्या आर्थिक क्रियांमध्ये मदत करणे हे युवागृहाचे महत्वपूर्ण कर्तव्य मानले जाते. पेरणी कापणी मळणी, लग्नकार्य, घर बांधणे, झाडाची तोड, मोठी शिकार करणे, अंत्ययात्रा काढणे इत्यादी आर्थिक क्रिया पार पाडण्यात युवा गृहातील तरुण तरुणींचे सहाय्य घेतले जाते. जमातीच्या सामूहिक व वैयक्तिक स्वरुपाच्या आर्थिक कार्यात युवागृहांचा हातभार महत्वाचा असतो.

- **सामुदायिक आर्थिक संस्थेची कार्ये :**

आदिवासींचे आर्थिक व्यवहार फार थोडे असतात. त्या व्यवहारात नफा कमावण्याचा हेतू दिसत नाही. किंबहुना अशा व्यवहारामध्ये स्वतःला जास्तीचा फायदा मिळविण्याऐवजी एकमेकांना मदत करण्याची व त्यात सहभागी करून घेण्याची वृत्ती विशेष प्रकर्षाने आढळून येते. समुदायातील लोकांमध्ये असलेली एकतेची भावना जोपासण्यावर जास्त भर देण्यात येतो. अशा प्रकारे सहयोग किंवा सहकार आणि सामुहिक प्रयत्न या बाबींना आदिवासींच्या आर्थिक व्यवहारांमध्ये विशेष प्राधान्य दिले जाते. सामुदायिक जीवन हे आदिवासींच्या आर्थिक व्यवहारांचे महत्वाचे लक्षण समजले जाते.

- **कुटुंब संस्थेची आर्थिक कार्ये :**

कुटुंबातील सर्व व्यक्तींचे पालनपोषण करणे अगत्याचे असते. सर्व समाजात कुटुंबे हे एक उपभोगाचा घटक म्हणून राहिलेले आहे. पण आदिम समाजात व इतर कृषिप्रधान समाजात अर्थोत्पादनाचा घटक म्हणून कुटुंबा संस्थेचा उल्लेख केला पाहिजे. मुलांचे संगोपन व संवर्धन करण्याच्या हेतूने कुटुंबातील स्त्री–पुरुषांना वाटयास आलेले अथोत्पादनाचे कार्य करावे लागते. घरातील सर्व सदस्यच आपापल्या कामाचा वाटा उचलत असतात. त्याच्याबरोबर कुटुंबाची मालमत्ता, जमीनजुमला, हत्यारे, अवजारे इत्यादी विविध प्रकारच्या मालमत्तेची काळजी वाहण्याचे काम कुटुंबालाच करावे लागते. मालमत्तेचा वारस हक्क ठरविणे व उत्पादनाची साधने सामाजिकरणाच्या प्रक्रियेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करणे हे काम कुटुंबालाच करावे लागते.

कोचीन मधील कादर जमातीत कंदमुळे गोळा करण्याच्या आर्थिक क्रियेत कुटुंबातील सर्व सदस्यांचा सहभाग असतो. त्यामुळे अर्थोत्पादनाचे व उपभोगाचे काम सर्व सदस्य सामुहिक रीतीने करीत असल्याचे निदर्शनास येते.

युगांडामधील बंटू जमातीतील स्त्री ही पुरुषाला केळी लागवड करण्यास मदत करते. तिलाही पर्वतातील तोडा समाजात बालसंगोपन संवर्धन, स्वयंपाक करणे, घरकाम व भाजीपाला गोळा करणे इत्यादी कामे तोडा स्त्रिया करतात. पुरुष शिकार करणे, मासेमारी, शेती इत्यादी क्रिया करतात. ओरिसातील बोंढो स्त्रीया पुरुषाच्या शेती क्रियेत मदत करतात. यवतमाळ मधील स्त्रिया सर्वप्रकारची कामे पुरुषाबरोबर करतात[८].

अशा प्रकारे कुटुंब संस्थेतील आर्थिक कार्ये स्पष्ट होतात.

## १.६ आदिवासी स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक दर्जा :

### अ) स्त्रीयांचा आर्थिक दर्जा :

सामान्यपणे समाजात आर्थिक जीवन सुकर करण्यात स्त्रिया कितपत मदत करतात त्यावर स्त्रियांचा दर्जा पुष्कळसा अवलंबून असतो. आर्थिक क्रियामध्ये स्त्रियांनी आपल्या पध्दतीने भरपूर सहयोग दिला पाहिजे. तेंव्हाच पुरुषांना त्यांचे महत्व वाटू लागते. ज्या स्त्रिया आर्थिक सहयोग देत नाहीत त्यांचा दर्जा कमी असणे या गोष्टी सर्वसाधारण समाजातही आढळून येतात. अर्थोत्पादनाच्या प्रकारावरून अन्नसंचय करणारे, शिकार करणारे, पशुपालन करणारे व शेती करणारे असे चार प्रमुख प्रकार आदिवासी समाजाचे पडतात.

अन्नसंचयावर मुख्यतः गुजराण करणाऱ्या आदिवासी समाजात पुरुषांबरोबरीने स्त्रिया कामे करु शकतात. कारण निसर्गात सहजासहजी उपलब्ध असणारा झाडपाला, फळे, फुले, कंदमुळे, लहान प्राणी इत्यादी गोळा करण्यासाठी खास कौशल्याची गरज भासत नाही. त्यामुळे अशा समाजात स्त्री पुरुष दर्जा समान दिलेला दिसतो. उदा. दक्षिण भारतातील कादर, मलपंतरम्, पलियन, पनियन, इरुला व चेंचू आणि अंदमान बेटावरील पिग्मी हे आदिवासी आजही अन्नसंचयाच्या आर्थिक अवस्थेत आहेत. म्हणून स्त्री पुरुष समानता दिसते.

शिकार किंवा मासेमारी हे उपजिवीकेचे साधन असणाऱ्या आदिवासी समाजात मात्र स्त्री पुरुष समानता दिसत नाही. त्यांच्या मते शिकार व मासेमारी या अतिशय श्रमाच्या व धाडसाच्या क्रिया असल्याने त्यात स्त्रिया आपल्या शरीर दुर्बलतेमुळे सहभागी होत नाहीत असा दृष्टिकोन असल्यामुळे त्या जमातीत स्त्रीयांना कनिष्ठ स्थान दिले जाते. कारण शिकारीच्या आर्थिक क्रियेत त्या उपयोगी पडत नाहीत.

पशुपालनाच्या आर्थिक स्रोतावर अवलंबून असणाऱ्या जमातीत स्त्री–पुरुष दर्जा समान दिसतो. जनावरे आणणे, योग्य सांभाळ करणे, त्यांच्याकडून कामे करुन घेणे, दुध मांस कातडे याचा उपयोग करणे यासारख्या अनेक कामाचा पशुपालनात समावेश होतो. त्यात स्त्रियांचे योगदान अधिक प्रमाणात दिसते. म्हणून त्या जमातीत त्यांना दिले जाणारे स्थान चांगले आहे. उदा. मध्य आशियातील कंझक जमातीत स्त्रीला उच्च स्थान दिले जाते.

परंतू दक्षिण भारतात तोडा जमातीत स्त्रीयांना कनिष्ठ दर्जा दिला जातो. कारण तोडा जमातीत स्त्रीया पुरुषांबरोबर आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत. कारण सामाजिक बंधनाच्या बाबीतून दुग्धव्यवसायात स्त्रीयांना मज्जाव केला जातो. दुसरीकडे स्त्रीया पुरुषांना आर्थिक क्रियेत मदत करीत नाहीत असे मानले जाते.

शेती उदरनिर्वाहाचे साधन असणाऱ्या आदिवासी जमातीत शेतीच्या कामाचे विभाजन प्रचलित असते. कांही ठराविक कामे पुरुष करतात व कांही हलक्या स्वरूपाची कामे स्त्रीया करतात. म्हणून त्यांना पुरुषांच्या तुलनेने कमी दर्जा दिला जातो.

उदा. मादागास्कर देशातील भात पिकविणाऱ्या मागासलेल्या जमातीतील स्त्रिया व पुरुष शेतीव्यवसायात दोघे मिळून कामे करतात. परंतू शेतीच्या कामात कामाची वाटणी झालेली असते. म्हणजेच आर्थिक जीवनात हातभार लावणाऱ्या स्त्रियांना त्या त्या समाजात चांगली वागणूक दिली जाते.

यावरुन असे निष्कर्ष निघतात की, समाजाच्या सांस्कृतिक प्रगतीवर स्त्रियांचा दर्जा अवलंबून नसतो. प्रगत समाजात स्त्री दर्जा श्रेष्ठ व अप्रगत समाजात स्त्री दर्जा

कनिष्ठ मानणे हे देखील चुकीचे आहे. अतिशय अप्रगत अवस्थेत असलेले अंदमान बेटावरील रहिवासी सिलोनमधील वेद्दा, केरळमधील कादर, व आंध्रामधील चेंचू इत्यादी आदिवासीमध्ये सर्वदृष्टींनी स्त्रियांना पुरुषांबरोबर स्थान दिले जाते व समान वागणूक दिली जाते. याउलट मध्य आशिया व चीनमधील बऱ्याच प्रगत अवस्थेतील जमातीत स्त्रीयांना गौण स्थान दिले जाते.

शारीरिक दुर्बलता व मासिक धर्मामुळे पुरुषाच्या मानाने स्त्रीयांना कमी प्रतीचे लेखले जाते. एकूणच ज्या जमातीत स्त्रीचा पुरुषांबरोबर अर्थार्जन कार्याला मोठा सहयोग होतो त्या जमातीत स्त्रीला पुरुषांबरोबर स्थान दिले जाते.

स्त्रियांमधील जननशक्ती, बालसंगोपन व बालसंवर्धन ही कार्ये महत्वाची मानली जातात म्हणून त्यांना तेवढ्यापुरते त्याच्या त्या कार्याला महत्व दिले जाते पण स्त्रीला शारीरिक दुर्बल म्हणून कमी प्रतीचे लेखले जाते ही दुसरी बाजू दिसते.

**ब) स्त्रियांचा सामाजिक दर्जा :**

सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा ठरविताना स्त्री पुरुषांना मिळालेले अधिकार, कर्तव्य, यासारख्या बाबी विचारात घेतल्या आहेत. अमेरिकेतील प्रसिध्द सामाजिक मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट लोवी यांनी आदिम समाजातील स्त्रियांचा दर्जा ठरविताना त्यांना प्रत्यक्ष मिळणारी वागणूक, कायदेशीर दर्जा, सार्वजनिक कामाची संधी, कामाचे स्वरुप व व्याप्ती या बाबींवर भर दिला आहे.

मध्ययुगीन काळात युरोपमधील स्त्रीला अतिशय चांगली वागणूक मिळत असे. पण तिला कायदेशीर दर्जा मात्र नव्हता. तसेच निलगिरी पर्वतातील तोडा आदिवासी जमातीत स्त्रीला चांगल्या रीतीने वागविले जात असले तरी त्यांना गौण समजले जाते. त्यांना महत्वाच्या सार्वजनिक कामात उदा. दुग्धव्यवसायात मज्जाव केला जातो. अंदमान बेटावरील आदिवासीमध्ये स्त्रीयांना पुरुषांबरोबर सार्वजनिक कामात भाग घेण्याची मोकळीक असते. परंतू त्यांना चांगली वागणूक दिली जात नाही.

आदिम समाजातील स्त्रियांच्या दर्जाची कल्पना येण्यासाठी समाजातील तत्वप्रणाली व व्यवहार याचा विचार करावा लागतो. कारण तत्व व व्यवहार यात विशेष फरक असतो. तत्वे वेगळी असतात आणि व्यवहार वेगळा असतो. म्हणून दोन्हीचा विचार करावा लागतो.

अमेरिकन मानवशास्त्रज्ञांच्या मते तोडा जमातीत स्त्रीला कांही समारंभात चांगली वागणूक दिली जाते. नंतर मात्र गौण स्थान दिले जाते.

जी. पी. मरडॉक यांनी पॉलिनेशिया बेटावरील समोऊन, मध्य आशियातील कझक, अमेरिकेतील इराक्वोइस, आफ्रिकेतील हॉटेनटॉट आदी जमातीत स्त्रियांना चांगला दर्जा देण्यात आला आहे. भारतातील संथाल जमातीत स्त्रियांना मानाचे स्थान दिले जाते.

मातृसत्ताक पध्दतीत स्त्रीला उच्चस्थान असते तसेच मालमत्तेचा व पदाचा उत्तराधिकारी या बाबी वंशपरंपरेने मिळतात. उदा. आसाममधील डोंगराळ भागात राहणाऱ्या खासी जमातीत मातृसत्ताक पध्दत दिसून येते.

अमेरिकेतील इरोक्वोईस जमातीत मातृसत्ताक पध्दती प्रगल्भ स्थितीत दिसते. स्त्रीयांना महत्वाचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. तर ट्युबलो जमातीत मातृसत्ताक पध्दती असूनही स्त्रीपेक्षा पुरुषांना अधिक महत्व दिले जाते[६].

## १.७ जगातील आदिवासी :

जगातील सर्वच देशात आदिवासी अस्तित्त्वात आहेत. विशेषत: आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या खंडातील देशात आजही मोठ्या प्रमाणात आदिवासी आढळतात. जगात २६० दशलक्षापेक्षा जास्त आदिवासी आढळतात. १९९१ च्या जनगणनेनुसार जगातील ७० देशातील मिळून जागतिक लोकसंख्येच्या ४% एवढी आदिवासींची लोकसंख्या होती. यापैकी बऱ्याच देशात आदिवासी अल्पसंख्यांक बनले

आहेत. जगातील राष्ट्रीय सीमांमुळे आदिवासी विविध भागात विभागले गेले आहेत. उदा. इनुईट (एस्किमो) जमात कॅनडा, ग्रीनलंड, संयुक्त संस्थाने (आलास्का) आणि रशिया या देशात विखुरलेली आहे. आफ्रिकेतील फुलाणी आदिवासी आठ देशात विखुरलेले आहेत. इंडोनेशियातील पापुआ आदिवासी न्युगानी देशात, मिझो व लुशाई जमाती भारतात व म्यानमार देशात वास्तव्य करताना आढळतात[१०].

**तक्ता १.१ : जगातील विविध देशातील आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी**

| देश | देशातील एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|
| ब्राझिल | ०.१% |
| स्वीडन | ०.१% |
| भारत | ७.५% |
| ग्रीनलंड | ९०% |
| पेरू | ४०% |
| बोलव्हिया | ६६% |
| चीन | ८.८% |

आधार : मानवी भूगोल, डॉ. माजिद हुसेन, मार्च २००२

**अ) जगातील आदिवासींचे वितरण व प्रदेश :**

जगातील आदिवासींचे वितरण खालील आठ भागात विभागले आहे.

- **आर्क्टिक आणि उत्तर अमेरिका :**

  १. एस्किमो किंवा इन्युट किंवा एस्किमो ही आदिवासी आत्ताच्या कॅनडा, ग्रीनलंड व रशिया या देशात आढळतात.

  २. सामी हे आदिवासी नॉर्वे, स्वीडन, फिनलंड व रशिया या देशात वास्तव्य करताना दिसतात.

- **कॅनडा आणि उत्तर अमेरिका :**

  १. पॅसिफिक किनाऱ्यावर हैडा, टिंगिट, बेल्ला, कुला इत्यादी आदिवासी आढळतात.

२. मध्य कॅनडामध्ये की, मेटी, ब्लॅकफूट, डेणे इत्यादी आदिवासी आढळतात.

३. पूर्व कॅनडात इन्नू, क्रि

४. कॅनडा व युएसए मध्ये सीमा, मिकमॅक

५. वायव्य युएसए मध्ये नेझ व पर्सी.

६. नैऋत्य युएसए मध्ये नावाओ, उटी, प्याब्लो, होपी, केरेझ, डाईन.

- **मध्य अमेरिका :**

  मेक्सिकोमध्ये लॅकाँडॉन युकॅटिक या आदिवासी जमाती तर ग्वाटेमालामध्ये माया, चोल, चून जमाती तर पनामामध्ये कुना व ग्वायमी या जमाती वास्तव्य करताना आढळतात.

- **दक्षिण अमेरिका :**

पेरूचे पठारावर केचुआ व ऐमारा जमाती, अर्जेंटिना व चिली या देशात मापूचे आदिवासी. ब्राझीलमधील अमेझॉन खोऱ्यात टुकानो, क्रीन, माकूक्सी, अमोरी, पानरी, सनेमा, अक्रोरे, कथापी, सिकोया, आचे, टोबा, मस्कोय, आरावाक, लकोनो इत्यादी आदिवासी या प्रदेशात वास्तव्य करताना आढळतात.

- **आफ्रिका :**

सहारामध्ये तुरेग व फुलानी आदिवासी, सुदानमध्ये डिंका, नुएर, शिलुक आदिवासी, अंगोला, बोस्वाना, नामिबिया या देशात सॅन किंवा बुशमेन आदिवासी, केनया, टांझानियामध्ये मसाई आदिवासी, एथियोपियामध्ये ओरोमो, सोमाली, टिग्रायन, एरिट्रीयन आदिवासी. कॅमेरून व कांगोमध्ये मबुटी, एकिलेसे आदिवासी.

- **दक्षिण आशिया :**

  भारतात–भिल्ल, संथाल, कोळ, लोहित, मिझो हे आदिवासी.

  अफगाणिस्तान, पाकिस्तानमध्ये पठाण, पख्तून आदिवासी.

श्रीलंकेमध्ये वेद्दा तर बांगला देशात चकमा व मर्मा अशा विविध आदिवासी आढळतात.

- **आग्नेय आशिया :**

म्यानमारमध्ये केरेन, कपीन, शाह, चीन आदिवासी.

थायलंडमध्ये केरेन, हमोंग, लिसू आदिवासी.

मलेशियामध्ये पेनन, कयान, इर्बान आदिवासी.

फिलिपाईन्समध्ये कलिंगा, फुगाओ, हनुनु आदिवासी.

इंडोनेशियामध्ये कालीमंतन, दयाक, केडांग, अस्मत, दानी इ. पापुआ न्यूगिनीमध्ये दानी व त्सेंबाग आदिवासी, चीन मध्ये तिबेटी व हिगुर आदिवासी, मंगोलियामध्ये मंगोलियन, जपानमध्ये ऐनु, रशियात चुकची व याकूत आदिवासी वास्तव्य करताना आढळतात.

- **महासागरी :**

ऑस्ट्रेलयामध्ये अबोरिजीनस, न्यूझीलंडमध्ये माओरिस, पॅसिफिक बेटे येथे कनाक, ताहितीन, चंबोरो आदिवासी वास्तव्य करतात[११].

**ब) जगातील प्रमुख आदिवासी :**

- **पिग्मी (Pigmi) :**

पिग्मी हे सर्वात प्राचीन मुळ लोक आहेत. आधुनिक उत्क्रांतीवादी अभ्यासकांच्या मते प्राण्यांना सर्वात जवळ असणाऱ्या मानवात त्यांची गणना होते. मध्य आफ्रिकेतील पूर्वेला युगांडापासून ते आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत पिग्मीची वस्ती आढळते. पिग्मी लोकांतील एक सर्वात प्रमुख गट बेल्जियम कांगोच्या पूर्व भागातील अत्यंत घनदाट अरण्यात रहात असतो. या भागात इतूरी ही महत्वाची नदी असून तिच्या आजूबाजूस त्यांची वस्ती असल्याने त्यांना इतूरी पिग्मी असे म्हणतात.

हे लोक विदेशी लोकांच्या विशेषतः युरोपियन लोकांच्या संपर्कात येऊन देखील अजूनपर्यंत प्राचीन अवस्थेत आढळतात.

उष्णकटिबंधीय आफ्रिकेत राहणारे पिग्मीचे गट, पूर्व भागातील, मध्य भागातील व पश्चिम भागातील अशा विविध गटात विभागलेले आहेत. पूर्वेकडील पिग्मी ''माबुती'', मध्यभागातील व पश्चिमेकडील पिग्मी कांगो इत्यादी नावांनी पिग्मी ओळखले जातात आणि कांगो खोऱ्यातील 'त्वा' किंवा बाटवा हा एक प्रसिध्द गट आहे.

पिग्मी जातीच्या लोकांचे प्रमुख आधारभूत व्यवसाय शिकार, जंगलातील खाद्य वस्तू शोधणे, मासेमारी हे असल्याने त्यांना सतत भटकावे लागते. त्यामुळे ते कोणत्याही एका ठिकाणी स्थायी स्वरुपात वस्ती करीत नाहीत. भटक्या जीवनामुळे त्यांची कोणतीही मालमत्ता असत नाही. जंगली श्वापदापासून आपली सुरक्षितता व दैनिक अन्नपदार्थ प्राप्त करणे ह्या गोष्टी त्यांच्या शक्तीवरच अवलंबून असतात.

प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करण्याची संधी प्राप्त झाली नाही.

पिग्मी लोकांना शेती करणे व पशुपालन माहित नाही. शिकार करणे हाच त्यांचा सर्वात प्रमुख व्यवसाय आहे. समृध्द प्राणी जीवनामुळे शिकार करण्यात ते अत्यंत कुशल असतात.

पिग्मी मासेमारी करण्यातही तरबेज असतात. कांही लोक युरोपीयन लोकांच्या संपर्कात आल्यामुळे बागायती शेतीत कामे करतात. कांही शेतकरी आहेत.

सांस्कृतिकदृष्ट्या पिग्मी हे मागासलेले अवस्थेत मोडतात. जनन दर जास्त असूनही विविध साथीमुळे त्यांच्यातील मृत्यु दरही अधिक आहे. प्रत्यक्षात पिग्मी हे निसर्गाचे दास आहेत[१२].

- **बुशमेन (Bushmen) :**

दक्षिण आफ्रिकेतील कलहारी वाळवंटात बुशमेन ही शिकार करणारी आदिवासी जमात आहे. ती आजही प्राथमिक जीवन जगताना दिसते. कांही शतकापूर्वी बसुटोलँड,

नेटल, दक्षिण ऱ्होडेशिया पूर्व टांगानिका व पूर्व आफ्रिकेतील उंच पठारावर हे लोक पसरलेले होते. शेती करणाऱ्या निग्रो लोकांनी यांच्या प्रदेशावर अतिक्रमण केले व हे शिकारी लोक स्थलांतर करीत आज फक्त कलहारी वाळवंटात आढळतात. युरोपीयन गोऱ्या लोकांच्या वसाहतीमुळे देखील यांची संख्या कमी झाली आहे.

बुशमेन शिकारी जमाती असल्यामुळे पशुपक्षाचे मांस हेच त्यांचे मुख्य अन्न होय. हे लोक शहामृगाची अंडी बेडूक, कासव, सरडे, पाल, वाळवी, मुंग्या, अंडी, मध इत्यादी पदार्थ खातात.

कलहारी वाळवंटातील नैसर्गिक पर्यावरण मानवी जीवनास प्रतिकूल आहे. कमी पर्जन्य व रेतीयुक्त भूपृष्ठ यामुळे शेती होऊ शकत नाही. म्हणून येथील लोक या प्रदेशात आढळणाऱ्या पशुपक्षांची शिकार करुन आपला उदरनिर्वाह करतात. शिकार हाच येथील मुख्य व्यवसाय आहे. वाळवंटात प्राणी विरळ असतात म्हणून शिकारसुध्दा अतिकष्टाची असते. वस्तूविनिमय पध्दती अस्तित्वात आहे. एकंदरीत हे लोक प्राथमिक अर्थव्यवस्थेत जीवन कंठीत असल्याचे दिसते.

बुशमेन जमातीची समाजव्यवस्था अत्यंत साधारण व प्राचीनकालीन आहे. त्यांच्या एका टोळीत २० ते १०० लोक असतात. किंवा ५-१० कुटुंबे असतात. प्रत्येक कुटुंबाचा तळ वेगळा असतो. त्यांचेकडे गटप्रमुख नसतो. त्यांचा भूत-पिशाच्चावर विश्वास असतो. शिकार मिळावी म्हणून जादू टोण्याचा देखील प्रयोग करतात[१३].

- **सेमांग (Semang) :**

सेमांग ही जगातील आदिम असून जंगलातील कंदमुळे, फळे इत्यादी खाद्यान्य गोळा करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

विषुववृत्तीय प्रदेशातील दक्षिण सयाम किंवा थायलंड आणि मलेशियातील पर्वतीय भागात सेमांग लोक राहतात. सेमांग लोकांचे नेग्रिटोवंशीय लोकांशी साम्य असते.

जंगलातील खाद्यपदार्थ गोळा करण्यासाठी व शिकारीसाठी सतत सेमांग जमातीला भटकंती करावी लागते. म्हणून सेमांग लोकांची वस्ती अस्थायी असते.

सेमांग मुख्यतः मांसाहारी असतात. त्यांचे प्रमुख खाद्य कंदमुळे, फळे व खाण्यायोग्य अशी वनस्पती होय. जेंव्हा वरील खाद्य संपते तेंव्हा मासेमारी करतात व मासे खातात. सेमांग लोक लहान प्राण्याची शिकार करतात.

सेमांग घनदाट जंगलामुळे शेती करीत नाहीत. वनवस्तू संकलन हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यासाठी त्यांना जंगलात सतत भटकावे लागते. नद्या व तलावात अन्नासाठी मासेमारी करतात. सेमांग जमातीची अर्थव्यवस्था प्राचीन असून ती संपूर्णपणे निसर्गाधीन आहे. त्यांचा उदरनिर्वाह कंदमुळे, फळे गोळा करणे व मासेमारी यावर अवलंबून आहे.

सेमांग जमाती भटकंती करतात. समुहात २५–३० व्यक्ती असतात. त्यांचे सलोख्याचे संबंध असतात. गोळा केलेले अन्न सर्वांना वाटून दिले जाते.

प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीवर विजय मिळविण्याचा प्रयत्न ही जमात करीत असली तरी ही जमात मागासलेले जीवन आजही जगत असल्याचे दिसते[१४].

- **सकाई/सोनाई (Sakai / Sonai) :**

विषुववृत्तीय प्रदेशात शिकार आणि कंदमुळे, फळे गोळा करणारी एक आदिम जमात आहे.

सकाई लोक मलायात रहात असून त्यांचे निवासक्षेत्र सेमांग लोकवस्तीच्या दक्षिणेला आहे. या भागात घनदाट जंगल व दऱ्या व मैदानी भाग आहे तेथे त्यांची वस्ती आढळते.

सकई लोक नेग्रिटो वंशीय लोकांपेक्षा वेगळे दिसतात. सकाई झोपड्यातच रहातात. झोपड्या झाडावर बांधतात. सकाई लोकांचे मुख्य खाद्य अन्न म्हणजे मासे, मांस व आजूबाजूला राहणाऱ्या शेतकऱ्यांपासून मिळणारे खाद्य होय. हे लोक मांस भाजून खातात.

सकाई मलायातील घनदाट अरण्यात रहात असल्याने शिकार हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. जंगलात फळे, कंदमुळे गोळा करण्याचाही व्यवसाय आहे. पुरुष शिकार

करतात व स्त्रीया वनवस्तू गोळा करतात. लाकडे व वन्य वस्तू शेतकऱ्यांना विकतात व त्या बदल्यात कपडे व अन्न मिळवितात.

काही सकाई लोक नदीखोऱ्यात व मैदानी सुपीक मातीत शेती करतात. ती प्राथमिक स्वरूपाची असते. प्राथमिक अर्थव्यवस्था असते म्हणून ते आर्थिकदृष्टया कमकुवत असल्याचे दिसते.

सकाई लोकांची एक ते दोन कुटुंबेच एका ठिकाणी रहातात. या लोकांचे समूह एकमेकांपासून दूर असतात. परंतू संबंध सलोख्याचे असतात.
कुटुंबात वृध्द मनुष्य हा प्रमुख असतो. विवाह आपआपसातील कुटुंबात करण्याची प्रथा आहे. लग्न समारंभ मोठ्या उत्साहाने साजरा करतात. ही जमात आजही निसर्गाधीन असून तेथील उपलब्ध मर्यादित साधनसामग्रीवर आपली उपजिविका करीत असते[१५].

- **मध्य आशियातील किरगीझ :**

जुन्या जगातील मध्य आशिया हा पारंपारिक भटक्या पशुपालकांचा प्रदेश आहे. मध्य आशियातील पशुपालन हे त्यांच्या मेंढ्या, गुरे व घोड्याचे कळप घेऊन ऋतूनुसार कुरणे व पाणी यांच्या शोधात स्थलांतर करणारे रूक्ष व कोरड्या प्रदेशात राहणारे लोक आहेत. पाण्याचा पुरवठा इतका अनिश्चित असतो की ज्यामुळे मानवी जीवन अस्थिर स्वरूपाचे बनते.

किरगीझ हे तिएनशान व पामीर पठाराचे रहिवासी आहेत. रशियातील कझाक आणि किरगीझ याची जीवन पध्दती सारखीच आहे. तिएनशान भागातील रशियन लोक किरगीझांना ''कारा किरगिझ'' असे म्हणतात. पामीर पठाराचा उंच भाग हा किरगिझाचा पारंपारिक प्रदेश आहे.

किरगिझीया प्रजासत्ताकामध्ये जवळपास एक दशलक्ष किरगिझ लोक रहातात. ते मंगोलवंशीया सारखे दिसतात. मंगोल व तुर्की जमातीचे मिश्रण आहे.

किरगिझामध्ये पितृसत्ताक कुटुंब पध्दती आढळते. कुटुंबाच्या स्थलांतराचा निर्णय पिता घेतो. हुंडा पध्दती आढळते. जमातीतील प्रमुखाच्या पुढारलेल्या कुटुंबाकडे सत्ता व

संपत्तीचा बराच मोठा भाग असतो. पशुपालन हा त्याचा व्यवसाय असला तरी ते काही लोक शेती करतात. शेती ही स्थलांतरीत असते.

किरगिझ तंबूचा घर म्हणून वापर करतात. किरगिझ हे इस्लामधर्मिय आहेत. त्यांच्यावर विचार व आचारांवर धर्माचा प्रचंड पगडा दिसतो. रितीरिवाज कडकपणे पाळतात.

किरगिझ वस्तू विनिमयाद्वारे घोडे व मेंढ्या देऊन धान्य व कपडे भांडी मिळवितात. उपलब्ध साधनसंपत्ती अतिशय काळजीपूर्वक वापरतात. प्रतिकूल परिस्थितीत शांत व समाधानी जीवन जगता यावे यासाठी तशा प्रकारची आर्थिक व सामाजिक जीवन पध्दती निर्माण केलेली असते[१६].

## १.८ भारतातील आदिवासी :

आशिया खंडात सर्वाधिक आदिवासी जमातींची लोकसंख्या भारतात दिसून येते. जगातील एकूण लोकसंख्येच्या १/४ आदिवासी जमातींची लोकसंख्या भारतात आहे. म्हणून भारताला आदिवासींची भूमी मानली जाते. भारतात एकूण ४१४ आदिवासी जमाती वास्तव्य करतात. जवळ जवळ सर्वच राज्यात कमी अधिक प्रमाणात आदिवासी राहतात.

डोंगराळ व वनाच्छादित क्षेत्रामुळे आदिवासी भारतात मोठ्या प्रमाणात केंद्रीत झाल्या आहेत. गोंड, संथाळ, नागा व भिल्ल या प्रमुख आदिवासी जमाती आढळतात. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यात गोंड ही आदिवासी जमात संख्याधिक्क्याने आढळते तर संथाळ ही जमात ओरिसा, बिहार व बंगालमध्ये अधिक प्रमाणात वास्तव्य करताना दिसून येते.

देशातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८२% लोकसंख्या मध्य, पूर्व व पश्चिम भागातील राज्यात केंद्रीत झालेली दिसते. म्हणून त्या भागातील राज्यांना आदिवासी म्हणून संबोधले जाते. परंतू एकूण सामान्य लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण

अधिक असणाऱ्या राज्यात लक्षद्वीप, मिझोराम, नागालँड, मेघालय, दादरा नगर हवेली व अरूणाचल प्रदेश इत्यादींचा समावेश होतो.

ज्या राज्यात डोंगर, दऱ्या, दुर्गमता व वनक्षेत्र अधिक आहे त्या राज्यात जास्त प्रमाणात आदिवासी लोकसंख्या केंद्रीत झाली आहे[१७].

**अ) भारतातील आदिवासी जमातीचे भौगोलिक वर्गीकरण :**

मानववंश शास्त्रज्ञांनी भारतातील आदिवासी जमातीचे भौगोलिक वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे–

- **ईशान्य विभागः** यामध्ये आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड व त्रिपुरा या राज्याचा समावेश होतो. या विभागात गारो, कुकी,मिझो, खासी, मुंडा, सेमा, नागा, रियांग, मीरी, अपातानी इत्यादी जमाती रहातात.
- **हिमालय लगतचा विभागः** यामध्ये उत्तर वायव्य भारत (North West)हिमाचल प्रदेश इत्यादी प्रदेश येतात. यामध्ये गुर्जर, गड्डी, थेरू, जिन्सारी इत्यादी जमाती येतात.
- **मध्य व पूर्व भारतः** यामध्ये पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश व उत्तर प्रदेश हे विभाग येतात. यात बैगा, बोडो, जुआंग, कोल, खोंड, संथाल, उराँव, हो, मुंडा, लेपचा, भिल्ल आणि पहाडिया इत्यादींचा समावेश होतो.
- **पश्चिम भारतः** राजस्थान, गुजरात व महाराष्ट्र हे विभाग येतात. भिल्ल, सहरिया, गोंड, कोलाम, परधान, कोळी, ठाकर, कातकरी, पावरा, वारली, कोल, खौड, दुबळा, कोकणा इ.
- **द्वीपकल्पीय विभागः** यामध्ये अंदमान, निकोबार, दादरा नगर हवेली, लक्षद्वीप, दीव, दमण इत्यादी बेटांचा समावेश होतो व तेथे अंदमानसे, जारवा, निकोबारसे, ओंगसे, शोमपेनस् इ. आदिवासी जमाती राहतात[१८].

## ब) भारतातील प्रमुख आदिवासी जमाती :

- **भिल्ल (Bhills) :**

भारतातील मोठ्या संख्येने असलेल्या आदिवासी जमातीपैकी भिल्ल ही आदिवासी जमात होय. ही जमात गुजरातमधील साबरकांठा वडोदरा, पंचमहाल इत्यादी भागात भिल्ल आढळतात. महाराष्ट्रातील नंदूरबार, जळगांव, औरंगाबाद, नाशिक व अहमदनगर जिल्हयात आढळते. मध्यप्रदेश व छत्तीसगडमध्ये रतनमाळ, रतकाम, झाबुआ, धार व खारगोन जिल्हयात भिल्लांचे वास्तव्य दिसते. राजस्थानमध्ये उदयपूर, भिलवाडा, चित्तोडगड, डुंगरपूर, कोटा, बांसवाडा जिल्हयातही भिल्ल आढळतात. भिल्लाचे वास्तव्य डोंगराळ व पर्वतमय भागात आहे. मध्य भारतातील विंध्य पर्वत, सातपुडा पर्वत, तसेच आरवली पर्वत भागात ते राहतात.

भिल्लांची अर्थव्यवस्था शेती, शिकार, पशुपालन, आणि वनवस्तू संकलन या व्यवसायावर आधारलेली आहे. शेती करणारी आदिवासी जमात म्हणून भिल्ल समाज बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेकडे वळू लागला आहे. शेतीत व्यापारी पिके घेऊ लागला आहे. परंतु सरासरी जलसिंचन कमी असल्यामुळे जमिनीतून उत्पन्न कमी निघते. त्यामुळे या जमिनीत आर्थिक दृष्टिकोनातून मागासलेपण आढळते. परंतू स्थायी शेतकरी जमात म्हणून ही जमात ओळखली जात आहे.

भिल्ल जमातीत सामाजिक सांस्कृतिक बाबींना अनन्यसाधारण महत्व आहे. रुढी, परंपरा अंधश्रध्दा, चालीरीती यांना या जमातीत मोठे स्थान दिसते. बहुपत्नीत्वाची व प्रौढ विवाहाची पध्दत यांच्यात रुढ आहे. विधवाविवाह व घटस्फोट मान्य आहे. सण उत्सवाप्रसंगी नृत्यगायन मद्यपान यांना अधिक महत्व आहे. या जमातीत भगतमंत्र, तंत्र, जडीबुटी, जादूटोणा यांचेही अस्तित्व आढळते[११].

- **गोंड (Gond) :**

हीं भारतातील अतिशय प्राचीन जमात आहे. भारतातील आदिवासी गटातील सर्वात मोठी संख्या गोंड या आदिम जमातीची आहे. ती द्रविडीयन व इंडोआर्यन लोकांच्या दरम्यान असणाऱ्या गुंतागुंतीच्या वंशिक गटातील आहेत. भारतातील गोंडवण प्रदेशावर गोंडाचे राज्य होते. गोंडांनी स्वतंत्र राज्य निर्माण केल्यामुळे या जमातीचा इतिहास महत्वपूर्ण आहे. गोंडवण प्रदेशावर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत गोंडांनी राज्य केले.

गोंड ही आदिवासी जमात भारतातील इतर आदिवासी जमातीपैकी एक सुसंस्कृत, सभ्य व पुढारलेली जमात म्हणून गणली जाते. गेल्या कांही शतकात भारताच्या राजकीय जीवनात गोंडांना महत्वाचे स्थान होते.

नर्मदा नदीचे खोरे हे गोंडाचे मूळ स्थान आहे. गोंड मुळचे मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यातील छिंदवाडा, मंडला, बस्तर, चांदा, दुर्ग या जिल्ह्यातील रहिवासी होते. गोंडवण राज्य निर्मितीनंतर ते विस्तृत प्रदेशात पसरले आहे. महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात ओरिसातील दक्षिण, पश्चिम भागात,आंध्रप्रदेशातील गंजम व विशाखापट्टणम् जिल्ह्यात गोंड जमातीचे वास्तव्य आढळते.

गोंड जमात शेतीवर उपजिविका करणारी जमात आहे. शेतीशिवाय मासेमारी, कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे इत्यादी दुय्यम व्यवसायही करते पुशपालन वनवस्तू संकलन व्यवसाय अल्प प्रमाणात करते. ही स्थायी स्वरूपाची शेती करणारी जमात आहे.

गोंडमध्ये पितृसत्ताक कुटुंब पध्दती आढळते. गोंड जमातीत विनिमय विवाह, सहपलायन विवाह व सेवा विवाह पध्दती आहेत. नृत्य गायन यांना गोंडातही महत्व आहे. गोंडाच्या जीवनात सामाजिक सांस्कृतिक बाबींना महत्वाचे स्थान आहे. अलीकडील काळात गोंडाच्या सामाजिक आर्थिक जीवनात सुधारणा होऊ लागली आहे[२०].

- **नागा (Naga) :**

ईशान्य भारताच्या निरनिराळ्या भागात वास्तव्य करुन राहणारी ही एक प्रमुख जमात आहे. नागजमात ईशान्य भारतातील नागालँड, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, आसाम व म्यानमारच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात राहतात. १९६१ साली आसाम व अरुणाचल प्रदेशातील नागाची वस्ती असलेले प्रदेश एकत्रित करुन स्वतंत्र नाग भूमीची घोषणा करून १९६३ साली नागालँड राज्य अस्तित्वात आले. १९९१ च्या जनगणणेनुसार नागांची लोकसंख्या १२ लक्ष होती.

भारतातील आदिवासी जमातीत ''नागा'' ही जमात युध्दखोर म्हणून प्रसिध्द आहे. नागांच्यावर इंग्रजी शासन व्यवस्था व पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडल्यामुळे त्याच्यात खूपच बदल झाला आहे.

नागाच्या २४ पेक्षा जास्त उपजाती आहेत. नागा मुळचे मंगोलाईड वंशाचे असून हजारो वर्षापासून भारतात त्यांचे वास्तव्य आहे.

नागा हे मुळात शेतकरी आहेत. पर्वतीय भागात पायऱ्यापायऱ्याची शेती करतात. ही अस्थायी स्वरुपाची शेती असते. त्यालाच झुमशेती असे म्हणतात. ९०% नागा शेती करतात. नागांच्या इतर व्यवसायात शिकार, मासेमारी, पशुपालन, विणकाम, बांबूच्या विविध वस्तू बनविणे इत्यादी व्यवसायाचा समावेश होतो.

नागाची कुटुंब पध्दती पितृसत्ताक असून विभक्त कुटुंब पध्दती आहे. लग्न होताच कुटुंब विभक्त होते. नागा समाजात स्त्रियांना मान दिला जातो. स्त्री व बालहत्त्या प्रचलित असल्यामुळे स्त्रीयांची संख्या कमी दिसते. वधूमूल्य प्रथा, पूनर्विवाह, घटस्फोट इत्यादी चालीरिती आढळतात.

अनेक नागानी ख्रिश्चन धर्म स्विकारल्यामळे शिक्षण प्रसार चांगला झाल्याचे दिसते. नागा भाषेला पाठ्यपुस्तक निर्मिती केल्यामुळे नागाची शैक्षणिक पातळी सुधारली आहे. त्यामुळे अनेक लोक नोकरी करीत आहेत. परंतू ग्रामीण भागातील नागा कुटुंबाची आर्थिक सामाजिक स्थिती मागासलेली दिसते[२१].

- **संथाल (Santhal) :**

भारतातील उदरनिर्वाहाची शेती करणाऱ्या आदिवासी जमातीपैकी संथाल ही एक सर्वात मोठी जमात आहे. लोकसंख्येच्या बाबतीत संथाल ही जमात भारतात दुसऱ्या क्रमांकाची जमात म्हणून ओळखली जाते. ही जमात पश्चिम बंगाल व इतर जवळच्या क्षेत्रामध्ये आढळते. हे लोक संथाली भाषा बोलतात. हे लोक कष्टाळू व सहनशील असतात. हे लोक भटक्या वृत्तीचे आहेत. शेती हा संथाल लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. शेती बहुधा पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. पुरुषाबरोबर स्त्रियाही शेतीत काम करतात. शेतीबरोबर कंदमुळे व फळे गोळा करतात. तसेच शिकार ही करतात. तसेच मासेमारी, मोलमजूरी करतात. संथालाची प्राचीन अर्थव्यवस्था पूर्णपणे नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून होती.

संथाल जमातीत एकत्र कुटुंब पध्दती प्रचलित आहे. पितृसत्ताक कुटुंब पध्दती असते. बहिर्विवाह पध्दत आहे. विवाहपूर्व संबंधावर विशेष निर्बंध नसतात. पूनर्विवाहासाठी पहिल्या पत्नीची परवानगी आवश्यक आहे. देवपूजा, धर्म, सण, उत्सव यांना संथाली जीवनात महत्वाचे स्थान आहे. काळाच्या ओघात संथाल लोकांच्या जीवनात फारसे बदल झालेले नाहीत[२२].

**क) भारतातील अतिमागास (आदिम) आदिवासी समूह**

(Prmitive Tribal Group (P.T.G.) in India) :

चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये आदिवासी लोकसंख्या केंद्रीत झालेली क्षेत्रे निश्चित करण्यात आली. तर पाचव्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी विकासासाठी ''आदिवासी उपयोजना'' (T.S.P. - Tribal Sub Plan) सुरु करण्यात आली. त्यामध्ये आदिवासी विकासासाठी ''क्षेत्रीय दृष्टिकोन'' स्विकारण्यात आला. भारतातील सर्व आदिवासी जमातीचे खालील तीन भागात विभाजन करण्यात आले.

१. पारंपारिक आदिवासी क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जमाती.

२. विखुरलेली लोकसंख्या असलेले आदिवासी.

३. अतिमागास आदिवासी समूह

केंद्रीय गृह मंत्रालयाने अतिमागास आदिवासी समूह ओळखण्याची पुढील निकष लावले आहेत. १. शेतीपूर्व अवस्थेतील तंत्रज्ञान, २. साक्षरतेची कमी पातळी, ३. स्थिर किंवा घटती लोकसंख्या. ज्या जमाती सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ स्तराला आहेत. म्हणजे ज्या जमाती आधुनिक समाजाच्या प्रवाहापासून दूर राहिल्या त्यांच्या मूळ स्थितीत काहीही फरक पडला नाही. त्यांना अतिमागास जमाती म्हणून ओळखले जाते. त्यांनाच आदिम जमाती असे म्हणतात. सर्वसाधारणपणे आदिम हा शब्द प्रयोग अत्यंत मागास व गरीब आदिवासी जमाती करिता वापरला जातो. आदिवासी जमातीचे लोक सुधारलेल्या मुख्य प्रवाहापासून दूर आणि दुर्गम भागात राहतात. या जमाती लोकसंख्येने लहान स्वरूपाच्या असतात.

शिकार व मासेमारी करणे, वनवस्तू गोळा करणे, फिरती शेती करणे, शेतमजूर म्हणून काम करणे, दऱ्याखोऱ्यात रानटी अवस्थेत राहणे, शिक्षण, आरोग्याचा निकृष्ट दर्जा, रूढी परंपरा, भाषा, श्रध्दा, जादूटोणा, देवदेवता, धार्मिक विधी, सामाजिक निषेध, लोकसाहित्य, एकांतवास, बाह्य जगाशी मर्यादित संपर्क इत्यादींना जीवनात अतिमहत्व देणाऱ्या आदिवासी जमाती आदिम जमाती म्हणून ओळखल्या जातात. वरील निकषाच्या आधारावर संपूर्ण भारतात एकूण ७४ आदिम जमाती निवडल्या आहेत. भारतातील अतिमागास आदिवासी जमातीचा राज्यानुसार आढावा घेतल्यास असे दिसते की, भारतात सर्वाधिक (P.T.G.) अतिमागास आदिवासी जमाती आंध्रप्रदेश (१२), ओरिसा (१२) मध्ये आहेत. यानंतरच्या खालोखाल मध्यप्रदेश, गुजरात, केरळ, तामिळनाडू, अंदमान, निकोबार या राज्यांचा क्रमांक अतिमागास आदिवासी जमातीच्या बाबतीत लागतो. महाराष्ट्रातील (P.T.G.) अतिमागास आदिवासी जमातीत कातकरी (काथोडी), कोलाम आणि माडिया गोंड या तीन जमातीचा समावेश होतो[२३].

### तक्ता १.२ : राज्यानुसार अतिमागास आदिवासी समूह

| अ. क्र. | राज्य/केंद्रशासीत प्रदेश | अतिमागास आदिवासी जमाती (P.T.G.) |
|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | १.बोडो.गडाबा २.बोंडो, पोरोजा, ३.चेंचू, ४.दोंगरीया, खोंड, ५.गुतोदगडाबा, ६.खोंड, पोरोजा, ७.कोलाम, ८.कोंडा रेड्डी, ९.कोंडा सावरस, १०.परेंगी पोरेजा, ११.कुंतीयखंड, १२.थोटी |
| २. | बिहार | १.असूर, २.बिरहोर, ३.बिरजीय, ४.हिलखरीया, ५.कोरवास, ६.मालपहारिया, ७.परहैयास, ८.सौरिया पहारिया, ९.सावर |
| ३. | गुजरात | १.काथोडी, २.कोटवालीया, ३.पधर, ४.सिद्दी, ५.कोलघा |
| ४. | कर्नाटक | १.जानूकुरबा, २.कोरागा |
| ५. | केरळ | १.चोलनायकयान,२.केडार,३.कट्टूनायकन,४.कुरुंबस,५.कोराग |
| ६. | मध्यप्रदेश | १. अबूझ मारियस, २. बैगास, ३. भारीयस, ४. हिल इकोर बस, ५. कमर्स, शहारा |
| **७.** | **महाराष्ट्र** | **१. कातकरी(काथोडी) २. कोलाम, ३. माडिया गोंड** |
| ८. | मणिपूर | १. मारम नागास |
| ९. | ओरिसा | १.बिरहोर २.बोंडो, ३. दिदायी, ४.डोंगारिया गोंड, ५.जोंगस, ६.खरियस, ७.कुतीया कोंढ, ८.लाजीया सौराब, ९.लोढास, १०.मंकिदीयस, ११.पौडी भावस, १२.सौरा |
| १०. | राजस्थान | १. सेहारियस |
| ११. | तामिळनाडू | १.कट्टनयकेन,२.कोटा,३.कुरुबंमा,४.इरुला,५.पानीया, ६.तोडस तोडा |
| १२. | त्रिपुरा | रिअंगस |
| १३. | उत्तर प्रदेश | १.बुक्सा, २. राजी |
| १४. | पश्चिम बंगाल | १.बिरहोर, २.लोंढा, ३.टोटो |
| १५. | अंदमान निकोबार द्वीपकल्प | १.ग्रीट अंदमानसे २.जारवास ३.ओंगेस, ४.सेन्टेन्लेस, ५.शॉपेन |

**आधारः** वार्षिक उपयोजना २००४–२००५ महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग

### ड) भारतातील आदिवासी लोकसंख्या :

भारताच्या जवळ जवळ सर्वच राज्यामध्ये आदिवासी जमाती आढळून येत असल्या तरी १९९१ च्या जनगणनेनुसार मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, बिहार, ओरिसा, या राज्यामध्ये सर्वाधिक आदिवासी जमातीची लोकसंख्या दिसून येते. आदिवासीची भूमी म्हणून वरील राज्यांना ओळखले जाते. परंतु एकूण लोकसंख्येशी टक्केवारी पाहिली तर लक्षद्वीप, मिझोराम, नागालँड, मेघालय, दादरा नगर हवेली, अरुणाचल प्रदेश इ. राज्यात

आदिवासी जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक आहे. पुढीलप्रमाणे राज्यानुसार एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी दिलेली आहे[२४].

**तक्ता १.३ : भारतातील राज्यानुसार एकूण व आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी**

| अ. क्र. | राज्य, केंद्रशासीत प्रदेश | लोकसंख्या | | | | एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोक % | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | | आदिवासी | | | |
| | | १९८१ | १९९१ | १९८१ | १९९१ | १९८१ | १९९१ |
| | भारत | ६८५१.८५ | ८४६३ | ५३८.१५ | ६७७.५८ | ७.८५ | ८.0१ |
| १. | आंध्रप्रदेश | ५३५.५0 | ६६५.0८ | ३१.७६ | ४१.९९ | ५.९३ | ६.३१ |
| २. | अरुणाचल प्रदेश | ६.३२ | ८.६४ | ४.४१ | ५.५0 | ६९.५२ | ६३.६६ |
| ३. | आसाम | १९८.९७ | २२४.१४ | २९.८६ | २८.७५ | ११.00 | १२.८३ |
| ४. | बिहार | ६९९.१५ | ८६३.७४ | ५८.११ | ६६.१७ | ८.११ | ७.६६ |
| ५. | गोवा | १0.८७ | ११.७0 | 0.११ | -- | 0.९९ | -- |
| ६. | गुजरात | ३४0.८५ | ४१३.0९ | ४८.४९ | ६१.२२ | १४.२२ | १४.९२ |
| ७. | हरियाना | १२९.२३ | १६४.६४ | -- | -- | -- | -- |
| ८. | हिमालय प्रदेश | ४२.८१ | ५१.७१ | १.९७ | २.१८ | ४.६१ | ४.२२ |
| ९. | जम्मू व कश्मिर | ५९.८७ | ७७.१९ | -- | उ.ना. | -- | उ.ना. |
| १0. | कर्नाटक | ३७१.३५ | ४४९.७७ | १८.२५ | १९.१६ | ४.९१ | ४.२६ |
| ११. | केरळ | २५४.५४ | २९0.९८ | २.६१ | ३.२१ | १.0३ | १.१0 |
| १२. | मध्यप्रदेश | ५२१.७९ | ६६१.८१ | ११९.८७ | १५३.९९ | २२.९७ | २३.२७ |
| **१३.** | **महाराष्ट्र** | **६२९.८४** | **७८९.३७** | **५७.७२** | **७३.१८** | **९.१९** | **९.२७** |
| १४. | मणिपूर | १४.२१ | १८.३७ | ३.८८ | ६.३२ | २७.३0 | ३४.४0 |
| १५. | मेघालय | १३.३६ | १७.७५ | १0.८५ | १५.१८ | ८0.५८ | ८५.५२ |
| १६. | मिझोराम | 0४.९४ | ६.९0 | ४.६२ | ६.५४ | ९३.५५ | ९४.७८ |
| १७. | नागालँड | ७.७५ | १२.१0 | ६.५१ | १0.६१ | ८३.९९ | ८७.६९ |

**आधार :** भारताची जनगणना, १९९१

## ३) भारतातील आदिवासींचा सामाजिक व मानवशास्त्रीय अभ्यास :

भारताच्या सर्व भागातील जंगलमय व डोंगराळ प्रदेशातून आदिवासी जमाती फार प्राचीन काळापासून विखुरलेल्या आढळतात. प्राचीन संस्कृती व प्राकृत ग्रंथातून अशा वन्य जमातीची अनेक वर्णने आढळून येतात.

रामायणातील ''शबरी'' भिल्लीण आणि महाभारतातील ''हिडिम्बा'' या स्त्रिया आदिम जमातीतील होत्या. तसेच मॅगेस्थेनीस (Megasthenes), अेरिएन (Arrian) स्ट्रॅबो

(Strabo), हिरोडोटस (Herodots), अशी ग्रीक व रोमन ग्रंथकारांना प्राचीन कालात देखील भारतातील आदिम लोकांविषयी थोडीफार कल्पना होती असे त्यांच्या लिखाणावरुन आढळून येते.

अरबस्थानातील मुस्लीम प्रवाशांनीसुध्दा भारतीय आदिम लोकांविषयी लिहून ठेवले आहे. १८ व्या शतकात व त्यानंतर भारतात आलेल्या अकोस्टा (Acosta), हॅमिल्टन (Hamilton), ट्रॅव्हर्निअर (Travernier), बुचनान (Buchanan), फोर्बस (Forbes), हार्कनेस (Harkness) या पाश्चात्य देशातील पर्यटकांनी भारताची माहिती देताना भारतातील आदिम जमातींची सविस्तर वर्णने दिलेली आहेत.

ब्रिटीश अधिकाऱ्यांनी आदिम लोकांविषयी मिळेल ती माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आणि अत्यंत परिश्रमपूर्वक संकलीत केलेली माहिती प्रकाशित केली. अशा रीतीने भारताच्या विविध भागातील आदिम जमातीच्या जीवनाविषयीची विस्तृत माहिती असलेले ग्रंथ भारतात प्रथम १८७० सालापासून उपलब्ध झाले. या ग्रंथाचे प्रकाशन २० व्या शतकातील पहिल्या दोन दशकात मोठ्या प्रमाणावर झाले.

दक्षिण भारताप्रमाणेच पश्चिम भारतातील आदिम जमातीचा विशेष अभ्यास ब्रिटीश अधिकाऱ्यांनी केलेला दिसत नाही. मुंबई प्रांताच्या खानेसुमारीचे अधिकारी आर.ई. एन्थोव्हन यांनी उल्लेखनीय कार्य केले. ''मुंबई प्रांतातील मनुष्यजाती वर्णनात्मक अभ्यास'' या विषयावर त्यांनी १९०९ साली लेख लिहीले आणि ''मुंबईमधील आदिम जमाती व जाती'' चा त्यांचा अभ्यास पूर्ण ग्रंथाचे तीन खंड १९२० ते १९२२ या दरम्यान प्रसिध्द केले. १९२४ साली ''मुंबईमधील लोककथा'' व गुजरातमधील लोककथा'' ही त्यांची दोन पुस्तके प्रसिध्द झाली.

मध्य भारतामध्ये आदिम जमातीच्या लोकांची संख्या मोठी असल्याने त्यांचा अभ्यास करण्याकडे ब्रिटीश अधिकाऱ्यांचा कल आधीपासून दिसून येतो. १८७० च्या सुमारास हिस्लॉप (Hislop) यांचे ''गोंड'' जमातीवरील पुस्तक प्रसिध्द झाले. १९०९ साली सी.ई. लुमाई यांचा ''माळण्यामधील वन्य जमाती'' हा ग्रंथ प्रसिध्द झाला. मध्य

भारतातील जमातीची काळजीपूर्वक नोंद रसेल आर.व्ही. व हिरालाल यांनी ''भारताच्या मध्य प्रांतातील आदिम जमाती व जाती'' या ग्रंथाचे चार खंड १९१६ साली प्रसिध्द झाले. १९२७ साली बी.सी. मुझुमदार यांचे ''मध्य भारताच्या डोंगराळ भागातील आदिवासी लोक'' हे पुस्तक प्रसिध्द झाले.

आपल्या वैशिष्टयपूर्ण लेखन शैलीसाठी प्रसिध्द असलेले उब्ल्यू. व्ही. ग्रिगसन यांचा ''मध्य प्रांत व वऱ्हाड भागातील आदिवासींच्या समस्या'' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ १९४४ साली प्रसिध्द झाला.

भारताच्या सर्व भागात विखूरलेल्या आदिम जमातीची नोंद करून त्यांच्या विषयी मिळेल ती माहिती संकलित करण्यात आली. हा आदिम माहिती संग्रह सरकारी प्रेरणेने व पैशाने प्रसिध्द झाले. परंतु शास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने हे माहिती संग्रह अजिबात उपयुक्त नव्हते. त्यातील माहिती संग्रह अजिबात उपयुक्त नव्हते. त्यातील माहिती तुटपुंजी होती. निव्वळ प्रशासकीय दृष्टीकोन समोर ठेवून अल्पशिक्षित कर्मचाऱ्यापासून अशास्त्रीय पध्दतीने माहिती गोळा करण्यात आली होती. त्यात शैक्षणिक व वैज्ञानिक दृष्टी नव्हती.

संकलीत माहिती तितकी उपयुक्त नाही याची जाणीव राज्यकर्त्यांना आली. तसेच आदिमाचा समस्यांची सोडवणूक करावयाची होती म्हणून प्रत्येक जमातीची सर्वांगिण व वैज्ञानिक पध्दतीने माहिती मिळविण्यास सुरुवात झाली.

१९२० नंतर माहिती संकलनाला सुरुवात झाली. १९२० साली मुंबई विद्यापिठाने समाजशास्त्र व कलकत्ता विद्यापिठाने मानवशास्त्र हे नवीन स्वतंत्र विभाग सुरु केले. या विषयांनी संशोधकाचे व अभ्यासकाचे आदिम जमाती विषयी शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्याकडे लक्ष वेधले गेले. आणि त्यातून भारतातील आदिम जीवनाच्या विविध अंगाची सर्वांगिण अध्यायन व त्यातून स्वतंत्र ग्रंथ लिखाण सुरु झाले. अनेक जमातीची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रशासकीय व भाषिक इत्यादी स्वरुपाची विश्वासार्ह व अधिकृत माहिती उपलब्ध झाली अनेक मानवशास्त्रीय ग्रंथ प्रकाशित झाले.

त्यात परकिय अधिकारी, भारतीय संशोधक, अभ्यासक व अधिकारी लोक यांनी मोलाची कामगिरी केली.

दक्षिण भारतातील अनेक आदिम जमातीवर असे प्रबंध लिहीले गेले. इंग्लंडमधील प्रथितयश सामाजिक मानसशास्त्रज्ञ रॅडक्लिफ ब्राऊन यांनी १९२२ साली ''अंदमान बेटावरील रहिवासी'' हा ग्रंथ सामाजिक मानवशास्त्रीय साहित्यात अभिजात मानला जातो.

भारतातील जेष्ठ मानवशास्त्रज्ञ ए. ऐयप्पन यांचा ''मलबार मधील नयडी लोकांचे सामाजिक व शारीरिक मानवशास्त्र'' हा ग्रंथ १९३७ साली प्रसिध्द झाला. आणि त्यांचाच तामिळनाडू मधील अन्नसंचय व शिकार करणाऱ्या ''इरुला'' जमानीवरील ''इरुला आणि सांस्कृतिक परिवर्तन'' हा १९४२ साली प्रसिध्द झालेला प्रबंध विशेष उल्लेखनीय आहे.

लंडन विद्यापीठातील मानवशास्त्रज्ञ फ्यूरर हेमनडार्फ यांनी मानवशास्त्रीय अभ्यासासाठी अनेक वर्षे हैद्रबाद संस्थानात घातले. आंध्र प्रदेशात पूर्व घाटात राहणारी अन्नसंचयासाठी भटकणारी ''चेंचू'' जमात विसन टेकड्यात राहणारी आणि गोंड लोकांचे मानाचे स्थान असलेली व आदिलाबाद जिल्हयात राहणारी ''राजगोंड'' जमात या तीन जमातीवर लिहीलेले प्रबंध प्रसिध्द आहेत.

कोचीन भागातील घनदाट जंगलात राहणाऱ्या व अन्न संकलन करणाऱ्या ''कादर'' जमातीवर ओआर एर्नफिल्स यांनी १९५२ साली प्रबंध लिहीला आणि ही राघवय्या यांचा अन्न संकलन करणाऱ्या व दक्षिण भारतात सुपरिचित असलेल्या ''येनाडी'' जमातीवर १९६२ साली प्रसिध्द झालेला प्रबंध असे दोन प्रबंध अतिशय उपयुक्त ठरले आहेत. दिल्ली विद्यापीठातील प्रसिध्द सामाजिक मानवशास्त्रज्ञ एम.एन. श्रीनिवास यांचा ''दक्षिण भारतातील कुर्ग लोकांमधील धर्म व समाज'' हा प्रबंध उत्कृष्ट समजला जातो.

पश्चिम भारतातील महाराष्ट्र व गुजरात भागातील आदिमांच्या अभ्यासात मुंबई विद्यापीठाचा मोठा वाटा आहे. मुंबई विद्यापीठातील डॉ. जी. एस. घुर्ये यांनी नाशिक मधील ''महादेव कोळी''वर प्रबंध लिहीला, ए. एन. वेलींग यांचा घाटातील ''कातकरी''

जमातीवरील प्रबंध, के.जे. सावे यांचा ठाणे व आसपासच्या भागातील ''वारली'' जमातीवरील प्रबंध, डी.एन. काळे यांचा ''अगरी'' वरील प्रबंध, श्रीमती विजया पुणेकर यांचा मुंबई जवळील ''सोनकोळी'' जमातीवरील प्रबंध, आणि एल.एन. चापेकर यांचा सह्याद्रीतील ''ठाकूर'' जमातीवरील प्रबंध विशेष उल्लेखनीय आहेत.

पश्चिम भारतातील ''भिल्ल'' ही जमात लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकावर असल्याने तिचा विस्तृत अभ्यास संशोधकांनी केला आहे. लखनौ विद्यापीठातील टी.बी. नाईक गुजरातमधील भिल्ल जमातीवर, पुणे विद्यापीठाच्या इरावती कर्वे यांनी पश्चिम खानदेशातील भिल्ल लोकांवर आणि बडोदा विद्यापीठाच्या वाय. व्ही. नाथ यांनी रतनमाळच्या भिल्ल लोकांवर लिहीलेले प्रबंध प्रसिध्द आहेत.

गुजरात रिसर्च सोसायटीचे श्री. पी. डी. शहा यांचे गुजरातमधील 'दुबळा' आणि 'नाईक–नाईकडा' या जमातीवर प्रकाशित झाला.

प्रशासकीय अधिकारी पी. सी. देव यांचा सौराष्ट्र व राजस्थान मधील 'गराशिया' जमातीवरील प्रबंध प्रसिध्द झाला.

पुणे विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख व मराठीतील प्रख्यात लेखिका इरावती कर्वे यांनी मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून लिहीलेला ''मराठी लोकांची संस्कृती'' हा या विषयावरील एक उत्कृष्ठ ग्रंथ मानण्यात येतो. विदर्भातील यवतमाळ जिल्हयातील ''कोलाम'' या वैशिष्टयपूर्ण जमातीवरील अमरावतीच्या भाऊ मांडवकर यांचा संबंध १९६६ साली प्रसिध्द झाला आहे. तसेच महाराष्ट्रातील आदिम जमातीच्या समस्यांचा अभ्यास करण्यास सुरुवात झाली. त्या दृष्टीने सुधीर फडके यांचे ''महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न'' उल्लेखनीय आहे.

आदिम जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी भारतातील जेष्ठ समाजशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ आणि प्रख्यात विचारवंत डॉ. जी. एस. घुर्ये यांनी अतिशय मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी ''अनुसूचित जमाती'' या आपल्या विद्यमान ग्रंथात भारतीय समाजातील आदिम जमातीच्या स्थानाचे स्वरुप विशद केले आणि आदिमांनी हिंदूंनी

आपल्यात सामावून घ्यावे असे सुचविले. त्यांच्या अगोदर डॉ. व्हेरिअर एल्विन यांनी आपल्या ''आदिवासी लोक'' या पुस्तकातून आणि इतर लिखाणातून आदिम जमातींना इतर पुढारलेल्या जातीपासून अगदी वेगळे ठेवण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला होता. डॉ. डी.एम. मुजुमदार यांनी आपल्या ''आदिम जमातीचे भवितव्य'' या ग्रंथात आपले या संबंधीचे विचार आग्रहाने प्रतिपादन केले आहेत.

आदिम जमातीच्या सामाजिक जीवनातील कांही अंगांचा साकल्याने अभ्यास करुन त्या अंगाविषयी अतिशय माहितीपूर्ण ग्रंथ अभ्यासकांनी लिहीले आहेत. अशा ग्रंथापैकी ओ. आर. एनफेल्स यांचा ''भारतातील मातृमुलकता'', इरावती कर्वे यांचा ''भारतातील आप्तसंबंध संघटन'' आणि जे.व्ही. फरेरा यांचा ''भारतीय देवक प्रथा'' हे ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत[२५].

**ई) भारतातील आदिवासी विरोधी ब्रिटीश साम्राज्यवादी धोरणे :**

इ. स. १७६५ मध्ये मुघल सम्राट शाह आलम कडून ईस्ट इंडिया कंपनीला बंगालचा सुभा मिळाला. त्यामुळे बंगाल, बिहार व ओरिसा मधील आदिवासी क्षेत्र कंपनीच्या ताब्यात गेले. प्रारंभी ब्रिटीश प्रशासकांनी साम्राज्यवादाकडे लक्ष केंद्रीत केले होते. त्यामुळे त्या प्रदेशातील आदिवासीच्या समस्यांकडे  दुर्लक्ष झाले. गांभिर्याने त्यांचा विचार केला नाही आदिवासी संबंधी पूर्वग्रहदूषित राहून पाश्चात्य दृष्टिकोनातून त्यांच्या समस्यांकडे पाहिले. ब्रिटीश प्रशासन काळात प्रारंभीच्या वर्षी ब्रिटीश धोरणे ही आदिवासींच्या आर्थिक हिताला मारक होती.

आदिवासी क्षेत्रात असंतोष दडपण्यासाठी लष्कराला पाचरण केले जात होते. मिदनापूरच्या पश्चिमेला असलेल्या आदिवासी क्षेत्रात लष्करी मोहिम हाती घेतली आणि आदिवासी बंडावर दडपण आणले. पण त्याचा परिणाम आदिवासीचा असंतोष भडकण्यावर झाला. त्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्यापेक्षा त्यांचा असंतोष दडपण्याकडे त्यांनी लक्ष केंद्रीत केले होते.

१९७३ साली कॉर्न बंगालच्या सुभ्यात अधिकांश भागात कायमस्वरुपी लष्करी बंदोबस्त ठेवला होता.

१८७२ सालच्या इंग्लंडमधील लोकसभेच्या निवड समितीतच्या पाचव्या रिपोर्ट नुसार आदिवासींना त्यांच्या वैशिष्टयानुसार पर्याय उपलब्ध करुन देण्याऐवजी अंतर्गत प्रशासन व्यवस्थेत समाविष्ट करुन घेतले आणि स्थानिक जामिनदारांच्या अत्याचाराला बळी पडावे लागले.

कंपनीचा व्यापार वाढविण्यासाठी आणि आदिवासीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटीशांनी प्रथम आदिवासी क्षेत्रात जंगलतोड केली व रस्ते बनविले. आदिवासींच्या विरोधाला शह देण्यासाठी सशस्त्र सेना पाचारण केली. त्यातून आदिवासी उजाड झाले.

१८४८ साली आदिवास क्षेत्रातील विरोध दडपण्यासाठी तेथे लष्करी छावण्या व पोलिस चौक्या स्थापन केल्या. प्राचीन काळात हिंदू राजांनी ब्राम्हणांना भूमि दान दिल्या इतर व्यक्तीना प्रोत्साहित करुन आदिवासी क्षेत्रात शेती करण्यासाठी बसविले.

ब्रिटीशानी इंजिनियर, सरकारी कर्मचारी, व्यापारी व इतर विदेशी लोकांना आदिवासी क्षेत्रात स्थायिक झालेल्या लोकांना आदिवासी लोक घृणेने दिक्कू म्हणत असे.

ब्रिटीश काळात ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी आदिवासींच्या भावना दुखविल्या. कंपनीच्या प्रारंभीच्या काळात धर्म प्रसारावर कोणतीही बंदी नव्हती. त्यामुळे उत्तर पूर्व प्रदेशात राहाणाऱ्या आदिवासींना धर्मप्रसारकांनी ख्रिश्चन बनविले.

इ.स. १९०० मध्ये सुमारे ७१२७० आदिवासी ख्रिश्चन धर्माला मानत होते. १८१८ ते १९५० या काळात मध्य भारतात ख्रिश्चन धर्माचे अनुयायी यांची संख्या इतकी वाढली होती की, ते एक समाज बनून राहात होते.

आदिवासींची अर्थव्यवस्था ही वनावर अंवलंबून होती. वनातील विविध वस्तू ते उपजिवीकेसाठी वापरत असत. परंतु ब्रिटीशानी १८७५ साली वनकायदा लागू केला वन उत्पादन वापरावर बंदी आली आणि आदिवासी जीवन व अर्थव्यवस्था धोक्यात आली.

आदिवासींचे भटकणे हे त्यांचे मुख्य वैशिष्ट्ये ठरते. त्यामुळे त्यांची शेती करण्याची पध्दती देखील बदलती होती. ज्या भागात ते जात ते तेथे शेती करत असे. परंतु ब्रिटीशानी शेतसारा वसूल करणे सोपे व्हावे म्हणून त्यांच्या स्थलांतरीत शेती करण्यावर बंदी घातली[२६].

नवनवीन कर सामान्य लोकांडून जे वसूल केले जात होत ते सर्व कर ब्रिटीशानी आदिवासींवर देखील लादले. अशा प्रकारे ब्रिटीशांनी आदिवासीचा बिमोड करणारे साम्रज्यवादी धोरण स्विकारले. त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या दीर्घकालीन विकासावर झाला.

**प) भारतातील आदिवासींचे बंड :**

कंपनी सरकारने हिंदुस्थानातील एक एक प्रांत हस्तगत केला. त्या त्या प्रांतातील आदिवासीनी भिन्न भिन्न कारणासाठी ब्रिटीशांविरोधात लढे आणि चळवळी उभारल्या. आधुनिक भारताच्या इतिहासात ब्रिटीयशांविरोधी पहिल्यांदा आदिवासीना बंड पुकारावे लागले पण याची इतिहासाने नोंद घेतली नाही. ही आदिवासींच्या इतिहासातील दुदैवी बाब म्हणावी लागते. ब्रिटीश नीतीच्या विरोधात विविध प्रदेशात आदिवासीचे अनेक बंडे उभी राहिली पण लष्करी बळाने ती बंडे दडपली गेली. हे सर्व लढे जमीनदार, धनिक व त्यांना साथ देणाऱ्या इंग्रजाविरुध्द होते.

१७८९,१७९७, १८०८, १८२०, व १८३२ इत्यादी साली छोटा नागपूर मधील आदिवासींनी बंड उभारले होते. विशेषत: १७८६ ते १७९५ या कालावधीत छोटा नागपूर विभागात 'तमाड' जमातीने बंड पुकारले. १७९५ ते १८०० या काळात बिहार मध्ये चेरो जमातीने, १८०३ मध्ये पूर्व गोदावरी जिल्ह्यातील 'कोया जमातीने' तर १८१९ मध्ये ओरिसातील कोल्हान प्रदेशातील आदिवासीनी १८१२ ते १८२८ मध्ये राजस्थान व गुजरात मधील भिल्ल जमातीने चळवळी उभारल्या आणि लढे पुकारले. १८३१ साली छोटा नागपूर येथील कोल जमातीच्या सशस्त्र बंडाचा सामना ब्रिटीशांना करावा लागला. दिक्कूंच्या

शोषण विरोधात हे आंदोलन होते. १८३२-३३ साली गंगा नारायण सिंह यांच्या नेतृत्वाखाली छोटा नागपूरच्या भूमिपुत्रानी केलेले बंड ही ब्रिटीशांनी हाणून पाडले.

१८२० ते १८७४ या काळात ईशान्यपूर्व भारतातील आदिवासी जमातीकडे इंग्रजानी आधिक लक्ष दिले नाही. अनेक जमातीनी इंग्रजाच्या हस्तक्षेपा विरुध्द चळचळी उभारल्या आणि लढे दिले. इंग्रजानी आदिवासी प्रदेशात हस्तक्षेप करु नये व आदिवासी जमातीची स्वायत्ता व स्वतंत्र जीवन कायम ठेवावे यासाठी हे लढे होते. १८३० ते १८३५ या काळात बिहार मध्ये कोल, मुंडा, संथाळ, खैरवार या जमातीनी इंग्रज राजवटी विरुध्द व जमीनदार (दिक्कू) विरुध्द लढे पुकारले. १८३८ ते १८४६ मुंबई राज्यात खानदेशातील भिल्लांचे लढे, १८०० ते १८७४ मध्ये सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर महादेव कोळी जमातीचे लढे, १८५५-५६ सालचे संथाळाचे बंड भारतातील सर्वात मोठे व भयानक बंड होते. त्यात जवळ जवळ १० हजार संथाळ मारले गेले. १८९५.१९०० सालामध्ये बिरसामुंडाने देखील बंड केले. १८८० ते १९०० बिहार मधील ‘हुँ मुंडाचे‘ लढे, १९१० ते १९१४ गोंडवनातील गोंडाचे व ताना भगताच्या नेतृत्वाखालील उराँव लढे. इत्यादी मध्यप्रदेशात व आंध्रप्रदेशात गोंड जमातीने वेळोवळी ब्रिटीश विरोधात असंतोष व्यक्त केला. २० व्या शतकापर्यंत आदिवासी जमातीत ब्रिटीशाप्रति असंतोष निर्माण होत गेला[२७].

हे सर्व लढे आदिवासींच्या आस्तित्वाचे आणि त्यांच्या प्रदेशाच्या स्वायत्ततेचे लढे म्हणून ओळखले गेले.

**फ) आदिवासी विकासाची वाटचाल :**

भारतात त्यातून जाती जमातीच्या कल्याणाच्या दृष्टीने अनेक योजना कार्यान्वीत झाल्या. या विकास कार्यक्रमाचा फायदा घेऊन अनुसूचित जातीतील बऱ्याच जातींनी विकासाचा टप्पा गाठला. यासाठी आदिवासी विकास कार्यक्रमाच्या वाटचालींचा आढावा घेणे संयुक्तिक ठरणार आहे.

## १. आदिवासी विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

### १.१ स्वातंत्र्यपूर्व काळ :

आदिम जीवनावरील आक्रमण काही नवीन नाही. ब्रिटीश आक्रमकांनी आदिवासींना खऱ्या अर्थाने अनाथ करुन टाकले. आपल्या जंगलातील विश्वात मुक्तपणे संचार करणाऱ्या आदिवासींचे जग पादाक्रांत केले. पराभूत आदिवासीची पिछेहाट कमालीच्या सीमारेषेपर्यंत झाली. त्यातून निर्दयी शोषण आदिमाच्या वाट्याला आले. यातूनच आदिमाच्या मनात तेढ व विलक्षण चीड निर्माण होऊन त्यांनी शोषणाविरुध्द बंडे पुकारली. बंगालमधील पहाडिया लोकांनी हिंदू जमीनदाराविरुध्द बंड पुकारले. इ.स. १८३१ मध्ये सिंगभूम जिल्ह्यातील 'हो' लोकांनी प्रतिकार केला त्याबरोबर खोंड, संथाळ, नागा, लुशाई लोकांनी बंडाचे निशाण उभे केले. अर्थातिच भारतात एकछत्री अंमल प्रस्थापित करण्याच्या मनःस्थितीत असलेल्या ब्रिटीश बळाचा वापर करुन ही बंडे मोडून काढली. ह्या भागात अशांतता होती. ज्या भागात शासन अधिकारी नियुक्त करुन त्यांना खास दिवाणी व फौजदारी अधिकार देण्यात आले.

ब्रिटीश राज्यकर्त्यांना आदिवासी विकासात विशेष रुची नव्हती. कारण त्यांच्या प्रशासनावर आदिवासींचा साधक–बाधक प्रभाव नव्हता. कांही उत्साही व हौशी ब्रिटीश संशोधक तसेच मिशनरी लोकांनी आदिवासी जनतेत जाऊन अभ्यास व लेखन केले. हे कौतुकास्पद असले तरी ब्रिटीश शासनाचे आदिवासी विषयी नकारात्मक स्वरुपाचे धोरण होते. जोपर्यंत आदिवासी ब्रिटीश प्रशासनात अडसर ठरत नाहीत तोपर्यंत आदिवासींमध्ये ढवळाढवळ करावयाची नाही हे ब्रिटीशांचे धोरण इ.स. १९३५ पर्यंत चालविले. आदिमांच्या प्रश्नाची गुंतागुंत हळूहळू जेव्हा ब्रिटीशांच्या लक्षात येऊ लागली तेव्हा त्या प्रश्नाचे स्वरुप पूर्ण समजण्यासाठी १९३५ साली एक कायदा करुन आदिवासी जमातीसाठी चौकशी समित्या नेमण्यात आल्या. तरी देखील आदिवासींचे प्रश्न सोडविण्याकडे ब्रिटीशांचा कल नव्हता.

संपूर्ण देश स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरला होता. म्हणून कोणत्याही आदिवासी प्रश्नाकडे लक्ष देता आले नाही. पण त्यातही महात्मा गांधींकडून प्रेरणा घेऊन अनेक समाज सुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यास हातभार लावला. उदा- इ.स. १९२२ मध्ये ठक्कर बाप्पा यांनी गुजरातमध्ये 'भिल्ल सेवा' ही संस्था स्थापन केली. खानदेशामध्ये इ.स. १९१८ मध्ये काकासाहेब बर्वे व शंकरराव ठक्कर यांनी खानदेश भिल्लसेवा मंडळ ही संस्था स्थापन केली. त्याचबरोबर श्रीमती गोदूताई परुळेकर, कै. भाऊसाहेब हिरे, कै. बाळासाहेब खेर यांचेही कार्य उल्लेखनीय आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी कल्याणासाठी उल्लेखनीय परदेशी समाज सेवकांचाही उल्लेख केला पाहिजे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार व आसाम राज्यात आदिवासींसाठी मिशनऱ्यांचे कार्य मोठे आहे. धर्मांतराच्या संकुचित हेतूसाठी त्यांनी हे कार्य केले खरे पण आदिमांना त्यांनी फार मोठा दिलासा दिलेला आहे हे अमान्य करता येत नाही. महाराष्ट्र राज्यात कल्याण या गांवच्या बाजारात चर्च ऑफ दि ब्रेदरेन मिशन या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडॅम एबी यांनी इ.स. १९०३ साली वारली लोकांसाठी एक छोटासा दवाखाना उघडला होता. इ.स. १९२३ साली मिशनने पालघरला ग्रामिण वस्तीशाळा सुरु केली होती. अशी अनेक उदाहरणे आहेत. जी मिशनऱ्यांनी आदिवासींच्या दुर्गम भागात जाऊन मानवी दृष्टिकोनातून अनेक कार्य केले आहेत. हे कदापी नाकारता येणार नाहीत.

मिशनऱ्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेक भारतातील ही आदिवासी कल्याण कार्य हाती घेतल्याचे दिसते. नामदार गोखले यांनी प्रस्थापित केलेला 'भारत सेवक समाज' ही एक महत्वपूर्ण संस्था आहे. स्व. ठक्कर बाप्पा यांनी संस्थेमार्फत आदिवासींसाठी भरीव कार्य सुरु केले. त्यांनी १९२३ साली गुजरातच्या पंचमहल जिल्ह्यातील भिल्ल लोकांसाठी कार्यक्रम हाती घेतले. त्यांच्याच प्रेरणेने सर्व भारतभर भिल्ल सेवा मंडळ, वनवासी सेवा मंडळ, आदिम जाती सेवा संघ इ. संस्था अस्तित्वात आल्या[२८].

अशा प्रकारे अशासकीय पातळीवर स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी विकासाची वाटचाल दिसते.

## १.२ स्वातंत्र्योत्तर कालीन आदिवासी विकासाची वाटचाल :

स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा सामुदायिक विकास योजना ग्रामीण भारतात राबविण्यात येऊ लागल्या तेंव्हा आदिवासी भागाच्या विकासाचाही प्रश्न उपस्थित झाला. स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्ययुध्दात मग्न झालेल्या भारतीयात आदिवासींकडे पुरेसे लक्ष देता आले नव्हते परंतु स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारतावर आदिम प्रश्नाची फार मोठी जबाबदारी येऊन पडली. दीर्घकाळापर्यंत उपेक्षित राहिलेल्या जमातीचे प्रश्न म्हणजे स्वतंत्र भारतासमोरील एक मोठे आवाहन होते. इरावती कर्वे यांनी आदिवासींना शक्य तितक्या जलद गतीने बाह्य जगाच्या संस्कृती प्रवाहात आणून सोडावे अशी भूमिका घेतली. डॉ. व्हेरिअर एल्विन हे जरी आदिवासींच्या संस्कृतीचे जतन करणाऱ्याचा पुरस्कार करणाऱ्यापैकी होते. तरी नंतर त्यांनीही विकासात्मक भूमिका घेतली व हा विकास कलाकलाने घडवून आणावा व त्यात आदिमस्पर्श असावा हा त्यांचा आग्रह होता. पंडित नेहरूंनी दोन्ही टोकाच्या भूमिकामधील मार्ग सूचविला. त्यानुसार आदिवासींच्या जीवनातील हानिकारक गोष्टी दूर करव्यात व त्यांना अशा हानिकारक गोष्टींच्या परिवर्तनाची गरज व त्यातील लाभ लक्षात आणून व पटवून देऊन त्यांच्यात परिवर्तन घडवून आणावे आणि कलाकलाने बाह्य संस्कृती व जीवनाच्या प्रवाहात आणून सामावून घ्यावे हे धोरण समोर ठेवण्यात आले. परंतु हे करताना त्यांच्या संस्कृती व जीवनातील चांगल्या गोष्टी, संस्था व वैशिष्टये यांना टिकवून ठेवणे त्यांच्या लोकसाहित्य संस्कृतीचे जतन करणे हा दृष्टीकोन स्विकारण्यात आला. यालाच पंडित नेहरूंचा दृष्टिकोन असे म्हणतात. एकदा हे धोरण राष्ट्रीय नियोजित विकासाच्या भूमिकेत स्विकारण्यात आल्यावर त्या दृष्टीने कार्यक्रम आणि संरचना आखण्यात आल्या[२१].

## २) भारतातील आदिवासी विकास योजना :

### २.१ आदिवासी विकासासाठी घटनात्मक तरतुदी :

स्वतंत्र भारताने २६ जानेवारी १९५० रोजी नवी राज्यघटना कार्यान्वित केली. भारतातील सर्व नागरिकांना यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. पण आदिवसींचे जीवन दुर्बल व असहाय्य असल्याने त्यांच्यासाठी काही विशेष तरतुदी करणे आवश्यक होते. म्हणून समानतेचे तत्व धाब्यावर न बसविता आदिवासींसाठी कांही विशेष तरतुदी केल्या आहेत. घटनेतील अनेक कलमे मागासलेल्या जाती व अनुसुचित जमाती यांना लागू करण्यात आली आहेत.

- घटनेच्या १५ व्या कलमाप्रमाणे धर्म, वंश, जात, लिंगभेद, जन्मठिकाण यावरुन कोणताही भेदभाव केला जाणार नाही ब्रिटीशांच्या आमदानीत हा भेद केला जात होता. तेव्हा या समानतेच्या तत्वाचा फायदा आदिवासींना विशेषत्वाने झाला.
- घटनेच्या १६ व्या कलमाप्रमाणे शासकीय नोकऱ्या बाबतीतही भेदभाव केला जाणार नाही. सर्वांना समान संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.
- घटनेच्या १७ व्या कलमानुसार अस्पृश्यता नष्ट करणे शक्य मानण्यात आले.
- घटनेच्या १९ व्या कलमान्वये आचार, विचार, उच्चार, कोणताही व्यवसाय करणे, देशभर मोकळेपणाचा संचार, संपत्तीची विल्हेवाट इत्यादी बाबतीत त्यांना स्वातंत्र्य देण्यात आले आहे.
- घटनेच्या २३ व्या कलमानुसार सक्तीने काम करुन घेणे, वेठबिगारी पध्दत, व्यक्तिचा अनैतिक वापर इत्यादी बाबी बेकायदेशीर ठरविण्यात आलेल्या आहेत.
- घटनेच्या २५ व २९ व्या कलमाप्रमाणे व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्य व शैक्षणिक, सांस्कृतिक हक्कांची जपणूक करता येते. आदिम हे संख्येने अगदीच अल्प असल्याने त्यांना या कलमाने बरेच संरक्षण मिळाले.

- घटनेच्या ४ थ्या भागातील १६४ व्या कलमान्वये आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या बिहार ओरिसा, मध्यप्रदेश या राज्यातील आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासासाठी एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे. तसेच आदिवासी कल्याणासाठी मध्यवर्ती व राज्य सरकार यांनी खास निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.
- घटनेच्या १६ व्या भागातील कलम ३३० ते ३३२ अन्वये लोकसभेत व राज्यात विधान सभेत आदिवासींच्या प्रतिनिधी करिता लोकसंख्या आधारावर काही जागा राखून ठेवल्या आहेत.
- इ.स. १९७४ च्या अहवालान्वये भारतीय लोकसभेत ४० जागा आदिवासींसाठी राखीव आहेत. त्याबरोबर विविध राज्यातील विधानसभेत एकूण ३७७१ जागापैकी आदिवासीसाठी ३२१ जागा सुरक्षित आहेत. महाराष्ट्र विधान सभेत आदिवासी प्रतिनिधी १६ आहेत. ही तरतुदी १९८० सालापर्यंत लागू आहे.
- घटनेच्या ३३८ व्या कलमान्वये अनुसूचित जाती जमातीच्या संरक्षणासाठी राष्ट्राध्यक्ष विशेष अधिकारी नेमू शकतात. हा अधिकारी आदिवासी कल्याण विषयक सल्ला राष्ट्रपतींना देईल.
- घटनेच्या ६ व्या भागातील कलम २०४(२) व २७५ (१) या कलमानुसार संयुक्त खासी जैनतिया हा डोंगरी गारी भिजी डोंगरी भागात एक प्रादेशिक परिषद व पाच जिल्हा परिषदा प्रस्थापित केल्या आहेत[30].

## २.२ पंचवार्षिक आदिवासी कल्याण योजना :

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामुहिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम सुरू झाले आणि ग्रामिण विभागाच्या विकासासाठी लोकांचे आंदोलन म्हणून ते राबविण्यात आले. त्यासाठी जी नवी संरचना निर्माण झाली. तिच्यात विकास खंड/संवर्ग

(Development Block) हा विकासाचा घटक होता व त्या खंड विकास अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विस्तार अधिकारी आणि प्रत्यक्ष लोकांच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन विस्तार सेवा पुरविणारा ग्रामसेवक अशी चमू निर्माण करण्यात आली. ग्रामिण विकासासोबतच आदिवासी विभागातही ही योजना कार्यान्वित करण्यता आली. मात्र त्या क्षेत्रातील विभिन्न परिस्थिती लक्षात घेऊन तिच्यासाठी थोडी वेगळी संरचना केली गेली.

अनुसुचित जमातीच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या विकास खंडांना ''विशेष बहुउद्देशिय आदिम विकास खंड'' निर्माण करण्यात आले. सर्वसाधारण विकास खंडासाठी असलेल्या रु. १२ लक्षाच्या अनुदाना व्यतिरिक्त गृह मंत्रालय, भारत सरकार (त्या काळात आदिवासी विकास हा विषय गृह मंत्रालयात एका संयुक्त सचिवाकडे होता.) तर्फे रु. १५ लक्षाचे अतिरिक्त अनुदानही प्राप्त होत असे. एकूण रु. २७ लक्ष या विशेष बहुउद्‍देशिय आदिवासी विकास खंडासाठी देण्यात आले. तसेच आदिवासींच्या गरजा लक्षात घेऊन भरघोस कार्यक्रम राबविण्यासाठी ही तरतुद होती. संपूर्ण देशात असे एकूण ४३ विशेष बहुउद्देशीय आदिम विकास खंड सुरू करण्यात आले. त्यातील चार महाराष्ट्रात होते. (तेव्हा विदर्भात फक्त आहेरी विशेष बहुउद्देशीय आदिम विकासखंड होता.) सन १९५० पर्यंत हे विकास खंड प्रस्थापित झाले होते.

मे १९५९ मध्ये गृह मंत्रालयाने डॉ. व्हेरिअर एल्विन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिने वरील संरचनांच्या कार्याचा आढावा घेऊन आदिवासी विकास खंड स्थापन करण्याची शिफारस केली. त्यांच्या मुळाशी ''आदिवासी स्पर्श'' किंवा आदिवसींचा पुर्वग्रह असावा अशी कल्पना होती. याचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. एल्विन म्हणाले आपण आदिवासींच्या कार्यपध्दतीला समजावून घेतो व मान्य करतो व मान देतो. कारण त्यांना त्यांची संस्कृती व धर्म टिकविण्याचा इतरांप्रमाणे अधिकार आहे. त्यांच्या जीवनात बदल घडवून आणताना त्यांच्या गतकाळाशी एकदम मोडणूक न करता हळू व कालांतराने परिवर्तन घडविले पाहिजे. कालांतराने ते भारतीय जीवन व संस्कृतीच्या मुळ प्रवाहाशी संमिलीत होतील असे संथ परिवर्तन झाले पाहिजे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात भारतात एकूण २३८ आदिवासी विकास खंड करण्यात आले. त्यातील १८ महाराष्ट्रात होते. सामुहिक विकास योजनेअंतर्गत असलेल्या विकास खंडातील आदिम बहुल अशा विभागाच्या ऐकत्रिकरणातून निर्माण करण्यात आलेल्या या आदिवासी विकास खंडात साधारणपणे २०० चौ. मैलांचा प्रदेश व सुमारे २५००० लोकसंख्या अंतर्भूत करण्यात आली. जेथे आदिवासींची जनसंख्या असेल अशा ठिकाणी १५० चौ.मी. मैलाचाच विभाग घेण्यात आला. मात्र त्यात आदिवासींची किमान जनसंख्या १०००० तरी असावी अशी अपेक्षा होती सर्वसामान्य सामुहिक विकास योजनेत, विकास खंडाला पहिल्या दोन अवस्थांमध्ये प्राप्त होणाऱ्या सामान्य अनुदानाव्यतिरिक्त पहिल्या अवस्थेत रु. १० लक्ष व दुसऱ्या अवस्थेत रु. ०५ लक्ष रुपये असे अतिरिक्त अनुदान केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्राप्त होणार होते. या अतिरिक्त अनुदानासाठी काटेकोर स्वरुपाचे अंदाजपत्रक ठेवण्यात आले नव्हते. तरी कृषि सिंचन, जमिनी उपयोगात आणणे, मृदा संधारण, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, इत्यादींना अग्रक्रम द्यावा अशी अपेक्षा होती व एकूण अंदाजपत्रकापैकी प्रकल्प मुख्यालयाशी २० टक्के, आर्थिक विकासाला ४८ टक्के, सामाजिक सेवांसाठी १२ टक्के खर्च करावा असा योजनेचा आकृतीबंध होता. संवर्ग/खंड विकास अधिकाऱ्याचा चमूत इतर सहाय्यक वर्गाशिवाय दोन विस्तार अधिकारी (कृषि) ग्रामिण अभियांत्रिकी, एक जेष्ठ सहाय्यक दोन कनिष्ठ सहाय्यक व एक ड्रायव्हर असा जास्तीचा कर्मचारी वर्ग देण्यात आला होता.

वरील आदिवासी दिवस खंडाचा कारभार बराच समाधानकारक रीतीने चालला व आदिवासी विकास प्रक्रियेला चालना मिळाली. एकूण कार्यात व आकृतीबंधात दृढता व चोकोरी निर्माण होऊ लागली याच काळात केंद्र आणि राज्य सरकारांनी कृषि विकास, शिक्षण, आरोग्य, यासाठी नवीन कार्यक्रम सुरु केले होते.

चौथ्या योजनेच्या सुरुवातीस लहान शेतकऱ्यांसाठी विकास योजना व काठावरील शेतकरी, शेतमजूर विकास योजना इत्यादी कार्यक्रम सुरु करण्यात आले. त्याचप्रमाणे आदिवासी विकासासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत सुरु करण्यात येऊन काही

प्रयोगात्मक प्रकल्प राबविण्यात आले. परंतु आदिवासी विकासाचा मुख्य घटक आदिवासी विकास खंडच राहिला.

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीचा आदिवासी विकासाचा दृष्टिकोन आणि आकृतीबंधाचा सर्वकश आढावा घेण्यात आला. चौथ्या पंचवार्षिक योजना काळात नेमण्यात आलेल्या 'शिलू आओ' समितीने आदिवासी विकास खंडाचा अपुरेपणा नजरेजला आणून दिला होता. म्हणून एकूणच कार्याची पुनर्रचना करण्याच्या दृष्टिने तसेच एका भागात केंद्रीत व अलग अलग विभागामध्ये वितरीत अशा दोन्ही प्रकारच्या आदिवासीच्या विकासाचे दृष्टीने आदिवासी विभागास ''आदिवासी समुहाच्या'' विकासावर लक्ष केंद्रीत करुन '' विभागीय विकासाची'' ही संकल्पना स्विकारण्यात आली. यालाच ''एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम'' संबोधण्यात आले. यात विभागांतर्गत संरचनात्मक विकासाला प्राधान्य येऊन विशिष्ट समुहाच्याही आखण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये लवचिकता ठेवण्याची गरज मान्य करण्यात आली[३१].

## २.३ शिक्षण विषयक योजना :

आदिवासींच्या जीवनात भर टाकणारा घटक म्हणजे त्यांचे विलक्षणीय अज्ञान होय. त्यांच्या अज्ञानाचा फायदा अनेक हितसंबंधी लोकांनी घेतला आहे. म्हणूनच त्यांच्या कल्याण कार्यक्रमात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व व अग्रक्रम देण्यात आले आहे.

- **आश्रम शाळा :**

आदिवासींच्या नवीन पिढीला शिक्षण मिळावे त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून आदिवासी विभागात आश्रम शाळा काढण्यात आल्या आहेत. या शाळेमध्ये प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले जातात पण याचबरोबर शेती, सुत काढणे, विणकाम व इतर व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. विद्यार्थ्याचे जेवणखाण व कपडालत्ता इत्यादीचा खर्च शाळाच करतात. ओरिसा, बिहार, राजस्थान व तामिळनाडू या राज्यात

आश्रम शाळांची संख्या ही ३३८ पर्यंत आहे. महाराष्ट्र राज्यात या शाळा खासगी संस्थांमार्फत चालविल्या जातात. त्यांची संख्या १२४ आहे. सरकार त्यांना अनुदान देते.

- **शैक्षणिक सवलती :**

प्राथमिक शिक्षण हे देशभरात मोफत दिले जाते. आदिवासींना त्याचाही फायदा मिळतो. शालांत परिक्षेपर्यंत त्यांना पुस्तके, पोषाख, दुपारचे जेवण इत्यादीचा खर्च भागविता यावा म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या जातात. ही योजना सर्व राज्यात चालू आहे.

इ.स. १९४४ साली आदिवासींना उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून त्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना प्रथम लागू करण्यात आली. इ.स. १९५२–५३ सालापासून गुणाच्या टक्केवारीचा विचार न करता सर्व आदिवासी मुलांना ही शिष्यवृत्ती मिळण्याची तरतूद करण्यात आली. प्रथम या शिष्यवृत्तीचे संचालन केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत होत होते. पण आता त्यासंबंधीचे अधिकार राज्य सरकारला दिलेले आहेत. सन १९७१ पर्यंत १२०३९३ आदिवासी तरुणांनी उच्च शिक्षण घेतले आहे व त्यांच्यासाठी ५.९२ कोटी रुपये खर्च सरकारने केलेले आहेत.

- **आर्थिक विकास :**

आदिवासींची आर्थिक उन्नती होण्यासाठी कल्याण कार्यक्रमात शेती, कुटीर उद्योग व सहकारी संस्था इत्यादींचा समावेश होतो.

- **शेती :**

आदिवासींच्या कल्याण कार्यक्रमात शेतीला अग्रस्थान दिलेले आहे. हे अगदी योग्यच आहे. कारण बहुसंख्य आदिवासींचा व्यवसाय शेती व शेती संबंधी आहे. आदिमांच्या ३ कोटी ८० लाख संख्येपैकी १ कोटी ७८ लक्ष आदिम शेती करतात. पण या लोकांना स्थानांतरीत शेती पध्दती विना दुसरी शेती पध्दती ज्ञात नाही.

त्यांना स्थिर शेतीचा लाभ व्हावा म्हणून जमीन उपलब्ध करुन दिली जाते. पडित जमीन नांगराखाली आणली जाते जमीनदारांकडून अतिरिक्त जमीन काढून आदिमांना

देण्याचे प्रयत्न चालू आहेत. शेतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकार मार्फत अनेक प्रायोगिक योजना अंमलात आणल्या जात आहेत. याच योजनेचा परिणाम म्हणजे मध्यप्रदेशात ३६६ कुटुंबे, त्रिपुरात ३३९ कुटुंबे, बिहारमध्ये ४६० कुटुंबे व ओरिसात २४९६ कुटुंबे स्थिर शेती करू लागले आहेत. बी बियाणे व खते देखील सरकारकडून पुरविण्यात आली आहेत.

- **कुटीर उद्योग :**

स्थिर शेतीला पुरक असा हा उद्योग आहे. पंचवार्षिक योजनेत आदिवासींच्या कुटीरउद्योगावर विशेष भर दिलेला आहे. ग्रामोद्योग व लघुउद्योग हस्तव्यवसाय इत्यादींना प्रोत्साहन देण्यासाठी जवळ जवळ ३ कोटी रुपये आदिमासाठी राखून ठेवलेले आहेत.

कुटीरउद्योगाचे सुधारीत तंत्र आदिमांना माहीती व्हावे उत्पादित मालाला बाजारपेठा उपलबध व्हाव्यात व व्यापारवाढीच्या दृष्टिने आर्थिक मदत मिळावी म्हणून तरतुदी केलेल्या आहेत. आदिवासी भागात कुटीरउद्योगाचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही उभ्या केलेल्या आहेत. यामध्ये विणकाम, टोपल्या तयार करणे, दोर वळणे इत्यादी शिक्षण दिले जाते. शिक्षण घेणे आदिमांना शक्य व्हावे म्हणून शिक्षण घेत असताना अनेक रुपयापर्यंत विद्यावेतन दिले जाते.

इतकेच नव्हे तर शिक्षण पुरे झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्र व्यवसाय करावा म्हणून त्यांना कर्जेही देता येतात. राज्य वित्तीय महामंडळ व बँका यांच्या मार्फत कुटीर उद्योगासाठी आदिमांना कर्जे मिळण्याची सोय केलेली आहे. पंचवार्षिक योजनेमध्ये आदिमाच्या कुटीर उद्योगासाठी तरतुद केलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत तर कुटीरउद्योगासाठी केलेल्या ५.७४ कोटी रुपयांपैकी २.५६ कोटी रूपये आदिमांच्या कुटीरउद्योगासाठी राखून ठेवले होते.

इतर लघुउद्योगासाठी आदिमाना आर्थिक सहाय्य करण्यासाठी सहकारी पतपेढ्या उभ्या केलेल्या आहेत. आज प्रत्येक राज्यामध्ये आदिमांनी आजपर्यंत घेतलेल्या कर्जामध्ये सुट दिलेली आहे.

**तक्ता १.४ : पंचवार्षिक योजनांमधील आदिम कल्याण कार्यक्रमावरील खर्च**

| अनु. क्र. | पंचवार्षिक योजना | आदिवासी कल्याणावरील खर्च (कोटी) |
|---|---|---|
| १. | पहिली | १७० |
| २. | दुसरी | ४१ |
| ३. | तिसरी | ५३ |
| ४. | चौथी | १४२.५३ |

आधार : महाराष्ट्र शासन आदिवासी उपयोजना अहवाल २००१-०२.

- **सहकारी संस्थांची स्थापना :**

आदिमांचे विविध प्रकारे होणारे शोषण, कायद्यातील तरतुदचे अज्ञान व जंगल कायद्याने घातलेले निर्बंध यामुळे जंगल विभागात आदिमाच्या सहकारी संस्थांची गरज तीव्रपणे वाटू लागली. महाराष्ट्र राज्यात प्रथमच सहकारी संस्थांची पायाभरणी आदिम क्षेत्रात झाली. आज महाराष्ट्र, गुजरात, बिहार, मद्रास, त्रावणकोर, कोचीन व राजस्थान या राज्यात सहकारी संस्थांची निर्मिती झालेली आहे. यासाठी सरकारने १४ कोटी रुपयांची तरतुद केली असून सर्व देशात आदिमासाठी १००० च्यावर सहकारी संस्था कार्यरत आहेत.

## २.५ वैद्यकीय मदत व आरोग्य संरक्षण :

आदिवासींचा आरोग्यविषयक प्रश्न अत्यंत गंभीर आहे. आंबी, पेज, फळे यावर आदिवासी वर्षातील बरेच दिवस काढीत असतात. पण याचा परिणाम आदिमांच्या शरीरावर होत असतो. महारोग, गुप्तरोग याचीही त्यांना किड लागलेली आहे.

त्यातच उपचाराविषयी त्यांच्यामध्ये असणारी अनास्था चिंतनीय आहे. त्यांची राहणी कमालीची अस्वच्छ असते. त्यामुळे खरूज व नायटा इत्यादी त्वचा रोगाचाही प्रादूर्भाव आदिम समाजात आढळतो. तेव्हा त्यांच्या स्वास्थ्य रक्षणासाठी कल्याण कार्यक्रमात तरतुद केलेली आहे. आदिमांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे ही एक

महत्वपूर्ण गरज आहे. हे ओळखून पहिल्या पंचवार्षिक योजनेतच त्याला अग्रक्रम देण्यात आला. त्याच्यासाठी २.४३ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली होती. आदिवासी विभागात विहीरी खणण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

आदिमांची उपचाराविषयी अनास्था लक्षात घेऊनच त्यांच्याच विभागात दवाखान्याची सोय उपलब्ध केलेली आहे. दुसऱ्या योजनेत तर ४५६ दवाखाने व १०६ वैद्यकीय मदत केंद्रे उघडण्यात आली आहेत. एवढेच नव्हे तर फिरत्या दवाखान्याची सोय व मोफत औषधे देण्याच्या योजनाही कार्यान्वित केलेल्या आहेत. त्याचबरोबर कुष्ठरोग निवारण केंद्रे, आरोग्य केंद्रे, प्रसुतीगृहे व बालसंगोपन गृहे आदिवासी विभागात उघडलेली आहेत[३२].

## २.६ आदिवासी उपयोजना (Tribal Sub Plan) :

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला प्रथम ५० टक्के किंवा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या विभागासाठी आदिवासी उपयोजना तयार करण्यात आली. आदिवासी विकास खंड हा यात अंतर्भूत करण्यासाठी लघुत्तम घटक मानण्यात आला. तसेच अशा खंडाचा समूह सामान्यतः तहसिलमध्ये अंतर्भूत करण्यात येऊन नव्या आदिवासी विकास कार्यक्रमाच्या नियोजन व विकास प्रक्रियेचा घटक बनविण्यात आला व त्यास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प असे नाव देण्यात आले. सन १९७६ च्या अखेरपर्यंत असे प्रकल्प निश्चित करण्यात आले व १९७८ च्या सुरुवातीस असे एकूण १८० प्रकल्प भारतभरात कार्य करु लागले. महाराष्ट्रात एकूण १५ प्रकल्प सुरु झाले[३३].

अशा प्रकारे केंद्र सरकारच्या पातळीवर आदिवासी विकासाचे प्रयत्न दिसून येतात.

## १.९ महाराष्ट्रातील आदिवासी :

महाराष्ट्र भारतातील एक आग्रगण्य राज्य आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीचे एक केंद्र राहिले आहे. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३०,७,६९० चौ. कि.मी. आहे. क्षेत्रफळाचा विचार करता भारतात मध्यप्रदेश, राजस्थान नंतर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ९.२६ टक्के क्षेत्रफळ महाराष्ट्राचे आहे. ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. वायव्येस गुजरात राज्य, दादरा नगर हवेली, हा केंद्रशासित प्रदेश आहे. तर उत्तरेस व पुर्वेस मध्यप्रदेश, आग्नेयस आंध्रप्रदेश व दक्षिणेस गोवा व कर्नाटक राज्य आहेत. राज्यात सह्याद्री सातपुडा पर्वताच्या डोंगर रांगा विखुरलेल्या आहेत. तसेच पश्चिम व पूर्व भागात वनाच्छित क्षेत्र विस्तारलेले आहे. सध्या राज्यात ३५ जिल्हे व ३११ तालुके आणि ४०४१२ खेडी आहेत. २००१ नुसार महाराष्ट्रात ९ कोटी ६८ लाख एकूण आदिवासी लोकसंख्या आहे[३४].

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात एकूण आदिवासी जमातीची लोकसंख्या ६७७.५८ लाख एवढी आहे. यापैकी सर्वात जास्त म्हणजे १५३.९९ लाख आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेशात आहे. तर महाराष्ट्रात ७३.१८ लाख एवढी आदिवासी लोकसंख्या राहात आहे. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ९.२७ टक्के आदिवासी लोकसंख्या आढळते. राज्यातील बहुतांश आदिवासी ठाणे, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, रायगड, या जिल्ह्यात केंद्रीत झालेली आहे.

महाराष्ट्रात प्रमुख एकूण ४७ आदिवासी जमाती आढळतात. त्यात भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकण, कातकरी, ठाकर, गावीत, कोलाम, कोरकू, अंध, मल्हार कोळी, धोडिया, दुबळा, माडिया गोंड, परधान, पारधी, अशा प्रमुख जमातीचा समावेश

होतो. या जमाती राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात कमी आधिक प्रमाणात विखूरलेल्या आहेत.

महाराष्ट्रातील एकूण ४७ आदिवासी जमातीपैकी १९ जमाती संख्याधिक्याने एक लाखापेक्षा आधिक आहेत. यामध्ये भिल्ल, महादेवकोळी, गोंड, वारली, कोकण, कातकरी, ठाकर, गावीत, मल्हारकोळी, कोलाम, कोरकू, यांचा समावेश होतो. या जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८० टक्के आहे. बाकी जमाती संख्येने अल्प आहेत, तर काही जमाती गेल्या दोन तीन जनगणनेत आढळून आलेल्या नाहीत. राज्यातील भौगोलिक व प्राकृतिक रचना आदिम जीवनाला अनुकूल असल्यामुळे आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते[३५].

### १. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे भौगोलिक वितरण :

महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोकसंख्या ज्या भागात वास्तव्य करते त्या भागाचे सर्वसाधारण भौगोलिकदृष्ट्या तीन विभाग पडतात.

- **सह्याद्री विभाग :** सह्याद्री विभागात रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मुंबई, पुणे, या विभागाचा समावेश होतो. या विभागात महादेवकोळी, वारली, कोकण, ठाकर, कातकरी, मल्हारकोळी, इ, जमातीची वस्ती प्रामुख्याने आढळते. या विभागात महाराष्ट्रातील एकूण आदिवासीच्या ४८ टक्के आदिवासी राहातात.
- **सातपुडा विभाग :** या विभागात धुळे, जळगांव, औरंगाबाद, अमरावती, या जिल्हयाचा समावेश होतो. सातपुडा पर्वताच्या रांगामध्ये भिल्ल, कोकण, गावीत, ढुबळा, कोरकू धनका, कडवी, पावरा, या जमाती राहतात. या विभागात महाराष्ट्रातील एकूण आदिवासीच्या ३३ टक्के आदिवासी राहातात.
- **गोंडवन विभाग :** या विभागात चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर या जिल्ह्याचा समावेश होतो. विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात गोंड,

माडिया गोंड, कोरकू, कोलाम, परधान, अंध, या जमाती राहतात. या विभागात एकूण आदिवासींच्या १९% लोकसंख्या राहते.

सर्वसाधारण महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक, ठाणे, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर, अमरावती, गोंदिया, या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते.

## २. जिल्हा निहाय प्रमुख आदिवासींचे वितरण :

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात प्रमुख आदिवासी जमाती राहताना दिसतात. ठाणे जिल्ह्यात कातकरी, ठाकूर, कोकणा, व मल्हार कोळी, या जमातीची वस्ती प्रामुख्याने आढळते. धुळे जिल्ह्यात भिल्ल, कोकणा, मावची, पावरा, धनका व गावित या जमाती राहातात. तर अहमदनगर व पुणे जिल्ह्यात महादेव कोळी, ठाकर व कातकरी या जमाती वास्तव्य करताना आढळतात.

रायगड जिल्ह्यात ठाकर, कातकरी, नाशिक जिल्ह्यात महादेवकोळी, कोकणा, ठाकर, भिल्ल या जमाती आढळतात. अमरावती जिल्ह्यात कोरकू, यवतमाळ जिल्ह्यात कोलाम, गोंड व अंध जमाती आढळतात. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात गोंड, माडियागोंड, परधान व हलबा या प्रमुख जमाती राहतात. प्रत्येक जिल्ह्यातील सामाजिक आर्थिक भौगोलिक स्थिती यानुसार आदिवासी जमातीचे केंद्रीकरण झाल्याचे दिसते[३६].

## ३. जिल्हानिहाय प्रमुख आदिवासी:

**तक्ता १.५ : महाराष्ट्रातील जिल्हानिहाय प्रमुख आदिवासी जमाती[३७]**

| अ.क्र. | जिल्हा | प्रमुख आदिवासी जमाती |
|---|---|---|
| १ | ठाणे | काथोडी, (कातकरी)कोकणा, कोळी महादेव, कोळीमल्हार, वारली, ठाकर, दुबळा, कोळीढोर, टोकरेकोळी, |
| २ | रायगड | काथोडी, (कातकरी), कोळी महादेव, |
| ३ | रत्नागिरी | काथोडी, (कातकरी), कोळी महादेव, डोंगरकोळी |
| ४ | सिंधुदुर्ग | काथोडी, (कातकरी), कोळी महादेव |

| | | |
|---|---|---|
| ५ | नाशिक | काथोडी, (कातकरी), कोळी महादेव वारली, ठाकर,कोकणा, भिल्ल. |
| ६ | धुळे | भिल्ल, गामीत, कोकणा, कोळीढोर, धानका, टोकरेकोळी, नायकडा, पारधी, बिटोलिया, |
| ७ | जळगांव | भिल्ल, कोळीढोर, धानका, टोकरेकोळी पारधी, |
| ८ | अहमदनगर | भिल्ल, कोळी महादेव, कोळीढोर, धानका, टोकरेकोळी पारधी, ठाकर, |
| **९** | **पुणे** | **कोळी महादेव, कोळीढोर, टोकरेकोळी, ठाकर, कातकरी.** |
| १० | सातारा | कोळी महादेव, कातकरी, काथोडी. |
| ११ | सांगली | कोळी महादेव |
| १२ | सोलापूर | कोळी महादेव, पारधी |
| १३ | कोल्हापूर | कोळी महादेव |
| १४ | औरंगाबाद | कोळी महादेव, भिल्ल, कोळीमल्हार. |
| १५ | जालना | कोळी महादेव, भिल्ल, कोळीमल्हार. |
| १६ | परभणी | कोळी महादेव, अंध |
| १७ | बीड | कोळी महादेव, भिल्ल, |
| १८ | नांदेड | कोळी महादेव, अंध, गोंड, कोलाम, ओराव, परधान, धनगड, |
| १९ | उस्मानाबाद | कोळी महादेव, धनगड, ओरऑन. |
| २० | लातूर | कोळी महादेव, धनगड, ओरऑन. |
| २१ | बुलढाणा | कोळी महादेव, धनवर, अंध, पारधी. |
| २२ | अकोला | कोळी महादेव,धनवर, अंध, पारधी. |
| २३ | अमरावती | धनवर, पारधी गोंड, निहाल, कोरकू पारधी |
| २४ | यवतमाळ | धनवर, अंध, पारधी गोंड, कोलाम हलवा, हलबी, खरिया, परधान. |
| २५ | वर्धा | परधान, गोंड. |
| २६ | नागपूर | गोंड, परधान. |
| २७ | भंडारा | गोंड, हलबा. |
| २८ | चंद्रपूर | गोंड, हलबा |
| २९ | गडचिरोली | गोंड, हलबा, परधान, हलबी, कवर, कोलाम, |
| ३० | मुंबई | वारली, ठाकर, गोंड, दुबळा,धाडिया |

**आधार :** *वार्षिक उपयोजना २००४-२००५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.*
*भारताची जनगणना, २००१, महाराष्ट्र राज्य, मालिका क्र. १२, भाग २-ब.*

## ४. तक्ता १.६: महाराष्ट्रातील मागील चार दशकातील एकूण व आदिवासी लोकसंख्या[३८]

(लोकसंख्या हजारात)

| **तपशिल** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वसामान्य लोकसंख्या** | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ |
| **एकूण आदिवासी लोकसंख्या** | २,३०७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ |
| **एकूण आदिवासी लोकसंख्येशी %** | ५.८३% | ७.६२% | ९.१९% | ९.२७% | ८.८५% |

**आधार :** *वार्षिक आदिवासी उपयोजना, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग*

१९६१ ते १९८१ या तीन दशकात आदिवासी लोकसंख्या वाढत गेली होती. १९९१ च्या दशकात लोकसंख्या स्थिर झाली होती. १९९१ ते २००१ या दशकात आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी घटल्याचे दिसते. सर्व सामान्य लोकसंख्या वाढीच्या तुलनेने आदिवासी लोकसंख्या वाढीतील प्रवृत्ती कमी राहिली आहे.

**५. तक्ता १.७ : आदिवासी स्त्री पुरुष निहाय वर्गीकरण[३९]**

(संख्या हजारात)

| जनगणना वर्षे | एकूण/आदिवासी | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९८१ | एकूण | ३२,४१५ | ३०,३६९ | ६२,७८४ |
| | आदिवासी | २,९२४ | २,८४८ | ५,७७२ |
| १९९१ | एकूण | ४०,८२५ | ३८,११२ | ७८,९३७ |
| | आदिवासी | ३,७१८ | ३,६०० | ७,३१८ |
| २००१ | एकूण | ५०,४०१ | ४६,४७८ | ९६,८७९ |
| | आदिवासी | ४,३४८ | ४,२२९ | ८,५७७ |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना, २००५-०६, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग

सर्वसाधारणपणे आदिवासी स्त्री पुरूष तुलना केली असता पुरूषांच्या तुलनेने स्त्रीयांची संख्या तीन्ही जनगणनेत कमी असल्याचे दिसते. याचा अर्थ दर हजारी पुरूषांमागे स्त्रीयांची संख्या कमी आहे. यात स्त्री पुरूष भेद आदिवासींच्यातही काही प्रमाणात आहे. प्रामुख्याने स्त्रीयांच्या आहार व आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे देखील स्त्रीयांची संख्या कमी आहे.

**६. तक्ता १.८ : जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्येचे वितरण[४०]**

(लोकसंख्या हजारात)

| अ.क्र. | राज्य/विभाग/जिल्हा | लोकसंख्या एकूण आदिवासी | | एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची % |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | आदिवासी | |
| | **महाराष्ट्र राज्य** | **९६८७९** | **८५७७** | **८.८५** |
| १. | मुंबई उपनगरे | ८६४० | ७१ | ०.८२ |
| २ | मुंबई शहर | ३३३८ | २१ | ०.६२ |
| ३ | ठाणे | ८१३२ | ११९९ | १४.७४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | रायगड | २२०८ | २६९ | १२.१८ |
| ५ | रत्नागिरी | १६९७ | २० | १.१८ |
| ६ | सिंधुदुर्ग | ८६९ | ०५ | ०.५८ |
| | **एकूण कोकण विभाग** | **२४८८४** | **१५८५** | **६.३७** |
| ७ | नाशिक | ४९९४ | ११९४ | २३.९१ |
| ८ | धुळे | १७०८ | ४४४ | २६.०० |
| ९ | नंदुरबार | १३१२ | ८६० | ६५.५३ |
| १० | जळगांव | ३६८३ | ४३६ | ११.८४ |
| ११ | अहमदनगर | ४०४१ | ३०३ | ७.५० |
| | **एकूण नाशिक विभाग** | **१५७३८** | **३२३७** | **२०.५०** |
| **१२** | **पुणे** | **७२३२** | **२३२** | **३.६२** |
| १३ | सातारा | २८०९ | २२ | ०.७८ |
| १४ | सांगली | २५८४ | १८ | ०.६९ |
| १५ | सोलापूर | ३८५० | ६९ | १.७९ |
| १६ | कोल्हापूर | ३५२३ | २१ | ०.६० |
| | **एकूण पुणे विभाग** | **१९९९८** | **३९२** | **१.९६** |
| १७ | औरंगाबाद | २८५७ | १०० | ३.४५ |
| १८ | जालना | १६१३ | ३२ | १.९८ |
| १९ | परभणी | १५२८ | ३५ | २.२९ |
| २० | हिंगोली | ५८७ | ८७ | ८.८१ |
| २१ | बीड | २१६१ | २४ | १.११ |
| २२ | नांदेड | २८७६ | २५४ | ८.८३ |
| २३ | उस्मानाबाद | १४८७ | २८ | १.८८ |
| २४ | लातूर | २०८० | ४८ | २.३१ |
| | **एकूण औरंगाबाद विभाग** | **१५६२९** | **६०८** | **३.८९** |
| २५ | बुलढाणा | २२३२ | ११५ | ५.१५ |
| २६ | अकोला | १६३० | १०० | ६.१४ |
| २७ | वाशिम | १०२० | ७१ | ६.९६ |
| २८ | अमरावती | २६०७ | ३५७ | १३.६९ |
| २९ | यवतमाळ | २४५८ | ४७३ | १९.२४ |
| | **एकूण अमरावती विभाग** | **९९४७** | **१११६** | **११.२२** |
| ३० | वर्धा | १२३७ | १५४ | १२.४५ |
| ३१ | नागपूर | ४०६८ | ४४४ | १०.९१ |
| ३२ | भंडारा | ११३६ | ९८ | ८.६० |
| ३३ | गोंदिया | १२०१ | १९६ | १६.३२ |
| ३४ | चंद्रपूर | २०७१ | ३७५ | १८.११ |
| ३५ | गडचिरोली | ९७० | ३७२ | ३८.३५ |
| | **एकूण नागपूर विभाग** | **१०६८३** | **१६३९** | **१५.३४** |

**आधार :** वार्षिक उपयोजना २००४ – २००५ महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र राज्यातील ३५ जिल्ह्यात आदिवास लोकसंख्या कमी आधिक प्रमाणात विखूरलेली दिसते. भौगोलिक रचनेनुसार आदिवासी विभागाने एकूण सहा विभाग पाडले आहेत. यामध्ये सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या नाशिक विभागात म्हणजे ३२,३७000 एवढी असल्याचे दिसते. तर एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी देखील नाशिक विभागात सर्वाधिक म्हणजे २०.५७ टक्के आहे. त्यानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्रात दुसरा क्रमांक नागपूर विभागाचा लागतो. या विभागात १६,३९000 एवढी आदिवासी लोकसंख्या दिसते. राज्यात आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत ठाणे जिल्हाचा पहिला क्रमांक (११,९९000), तर नाशिक जिल्ह्याचा दुसरा क्रमांक (११,९४000) लागतो. यावरुन एक बाब स्पष्ट होते की, ज्या भागात डोंगर दऱ्या व वन क्षेत्र आधिक आहे त्या भागात आदिवासी लोकसंख्या आधिक प्रमाणात केंद्रीत झाल्याची दिसते. नाशिक विभागात व नागपूर विभागात तसेच ठाणे व नाशिक जिल्ह्यात आधिक आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झाले आहे.

## ७. महाराष्ट्रातील अतिमागास आदिम जमाती (Primitive Tribes) :

भारतात केंद्र सरकारने काही आदिवासी जमाती अतिमगास आदिवासी समूह म्हणून घोषित केल्या आहेत. त्यांची संख्या ७४ एवढी आहे. त्यापैकी महाराष्ट्रात कातकरी, कोलाम व माडियागोंड या तीन जमाती अतिमागास आदिम समुहात सामाविष्ट केल्या आहेत. कातकरी ही अतिमागास आदिम जमात आहे. त्यांचे प्रमुख वास्तव्य ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे व नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळते. रायगड ही कातकरी जमातीची मुळभूमि मानली जाते. तर कोलाम आदिम जमात यवतमाळ, नांदेड, चंद्रपूर या जिल्ह्यात वास्तव्य करीत असल्याचे दिसते. कोलामांची यवतमाळ ही मुळभूमि मानली जाते. माडियागोंड जमातीची गडचिरोली जिल्ह्यात आढळते. गडचिरोलीतील भामरागड ही त्यांची मुळभूमि मानली जाते. या तीन्ही आदिवासी जमाती आपल्या मुळभूमितून राज्याच्या वेगवेगळ्या भागात रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरीत झाल्या

आहेत. त्यामुळे त्यांचे इतर जिल्ह्यातही वास्तव्य आढळते. या तिन्ही जमाती इतर आदिवासी जमातीच्या तुलनेने अतिशय मागासलेल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या अतिमागास आदिम जमात समुहात त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**तक्ता १.९ : महाराष्ट्रातील अतिमागास आदिम जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या**[४१]

| अ.क्र. | आतिमागास जमात | जिल्हा | लोकसंख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
| १ | कातकरी (काथोडी) | ठाणे | ५६३३० | ५७४५६ | ७३७०० | ९१४२९ |
| | | रायगड | ६७५६३ | ७५६८० | ९३४८४ | १०३२४४ |
| | | रत्नागिरी | ९४५३ | २१२६५ | ३४५२ | ६०३४ |
| | | **पुणे** | **७१०१** | **८८८५** | **१२०५४** | **११९३५** |
| | | नाशिक | ३८०४ | ४४४४ | ५४३७ | ७१९४ |
| | | इतर जिल्हे | २५३४ | ६८७२ | १४०७६ | १५१८६ |
| | एकूण | | १४६७८५ | १७४६०२ | २०२२०३ | २३५०२२ |
| २ | कोलाम | यवतमाळ | ४९७७५ | ६५७०७ | ७६८०२ | ९३९२९ |
| | | नांदेड | ३६२६ | ३५९५३ | ४९५५६ | ५१६५५ |
| | | चंद्रपूर | २६५६ | ४९०३ | ३९६२ | ६३७६ |
| | | इतर जिल्हे | ४ | ११५१० | १७५२३ | २१६८६ |
| | एकूण | | ५६०६१ | ११८०७३ | १४७८४३ | १७३६४६ |
| ३ | माडिया गोंड | गडचिरोली | ५३४०० | ६६७५० | ८३४३७ | १०५८९४ |
| | महाराष्ट्र राज्य | | २४२८४६ | ३६५८३३ | ४३३४८३ | ५१४५५२ |

**आधार :** युनिव्हर्सल बेंचमार्क सर्व्हे, १९९६-९७, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**तक्ता १.१० : महाराष्ट्रातील सामान्य, आदिवासी, व अतिमागास (PTG) आदिवासी जमातीचा साक्षरता दर**[४२]

| अ.क्र. | लिंग | सामान्य साक्षरता दर १९९१ | एकूण आदिवासी साक्षरता दर १९९१ | अतिमागास (PTG) आदिवासी साक्षरता दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कातकरी | कोलाम | माडिया | एकूण (PTG) |
| १ | पुरुष | ७६.५६ | ४९.०८ | २१.७० | ४५.६६ | ३०.१९ | ३१.९७ |
| २ | स्त्रिया | ५२.३० | २४.०३ | १०.७९ | २७.८३ | १६.०९ | १७.८६ |
| | एकूण | ६४.८७ | ३६.७७ | १६.३८ | ३६.८८ | २३.१९ | २५.०२ |

**आधार :** १. भारताची जनगणना, १९९१

महाराष्ट्रातील सामान्य साक्षरता दर व आदिवासी साक्षरता दर यांची तुलना केली असता, असे दिसते की, आदिवासी साक्षरता दर सामान्य साक्षरता दराच्या तुलनेने कमी आहे. सामान्य दराच्या ५० टक्के आदिवासीचा साक्षरता दर दिसतो. तर त्यात कातकरी जमातीचा साक्षरता दर सामान्य दराच्या २५ टक्के दिसतो. कारण कातकरी जमात आजही रानटी अवस्थेत जीवन जगत आहे.

तर अतिमागास जमातीच्या साक्षरता दराचा आढावा घेतल्यास असे दिसते की, कोलाम व माडिया गोंड या दोन अतिमागास जमातीच्या साक्षरता दरापेक्षा देखील कातकरी जमातीचा साक्षरता दर कमी असल्याचा दिसतो.

**८. महाराष्ट्रातील इतर अतिमागास आदिम जमाती – कोलाम व माडिया गोंड :**

महाराष्ट्रात कातकरी, कोलाम व माडिया गोंड तीन अतिमागास आदिम जमातीची त्यांची सामाजिक, आर्थिक, भौगोलिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

**१. कोलाम (Kolam) :**

कोलाम ही महाराष्ट्रातील अतिमागास आदिम जमात म्हणून घोषित करण्यात आलेल्या जमातीपैकी एक जमात आहे. विदर्भातील यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात, मराठवाड्यातील नांदेड आणि अमरावती व वर्धा जिल्हयात कोलाम जमात वास्तव्य करताना आढळते. अंध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्ह्यात कोलाम आदिवासी आढळतात. ही जमात द्रविडीयन असून ती गोंडवण भागात आढळून येते. काही मानवशास्त्रज्ञाच्या मते कोलाम जमातीचे मुळ वस्तीस्थान मद्रासमधील निलगिरी पर्वत हे आहे. तर काहीच्या मते कोलाम जमातीचे मुळस्थान यवतमाळ जिल्ह्यातील लसीना हे असावे.

कोलाम स्वत:ला कोलामी भाषेत ''कोलावर'' म्हणवतात. तर गोंडी भाषेत ''पुजारी किंवा भूमका'' आणि तेलगूमध्ये मन्नेवरलू, म्हणतात. तर मराठीत त्यांना कोलाम असे म्हणतात.

कोलाम आपली स्वत:ची उत्पत्ती महाभारतातील पांडवापासून झाली असे मानतात. चिंचेच्या खोडापासून आपली उत्पत्ती झाली असेही म्हणतात. कोलाम जमात ही तोडा जमातीशी संबंधीत असावी. कारण ते कोलामलाई किंवा कोलांबी पर्वत हे आपले मुळ ठिकाण मानतात.

कोलाम जमातीत पोटजात आढळत नाही. कोलाम बहिर्विवाह करणारी वेगवेगळी कुळे आहेत. हे लोक काळ्या वर्णाचे, ठेंगण्या बांध्याचे असतात. त्यांच्या बहुतेक चालीरिती आदिम आहेत. हे लोक इतर आदिवासी प्रमाणे निसर्गपुजक आहेत. मृतपूर्वजांची पण ते पुजा करतात. आईदेवी, करामी, मराई, भोवानी, रेणूका, माहुरतादेवी, चंडाका, भिमायाक, मारुती, व म्हसोबा यांची पुजा करतात स्त्रियांमध्ये गोंदवूण घेण्याची प्रथा आहे.

गांव बांधणी हा कोलमांचा अंत्यत महत्वाचा सण आहे रोगाचे निवरिण करण्यासाठी आणि वर्षभर संरक्षण करण्यासाठी गांवाच्या स्तरावर तीज (मे महिन्याच्या शेवटी) झाल्यावर हा सण साजरा करतात. दसरा, नागपंचमी, पोळा, दिवाळी, होळी, गणेश व दुर्गा उत्सव इत्यादी सण साजरे करतात.

कोलामामध्ये बालविवाह आढळून येत नाही. पौष महिन्यातही विवाह करीत नाहीत. एकाच गोत्रात विवाह होत नाही. कोलामात घटस्फोट व पुर्नविवाहाची प्रथा आहे. या जमातीत पुर्नजन्मावर विश्वास आहे.

दगड फोडणे, शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे, डिंक गोळा करणे इत्यादी पारंपारिक व्यवसाय आहेत. ते शेतमजूरीही करतात. जंगलातील अतिक्रमण केलेली शेती करणारी काही कुटुंबे आढळतात. कोलाम जमातीत शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण फार कमी आहे[४३].

**२. माडिया गोंड (Madia Gond) :**

भारतात आदिम जमातीत संख्येने फार मोठी व मध्ये भारतात विस्तृत प्रमाणात पसरलेली अत्यंत पुरातन गोंड ही जमात आहे. माडिया गोंड ही गोंड जमातीची एक पोट जात आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात माडिय गोंड ही आदिवासी जमात आढळते. या जिल्ह्यातील सुरजागड व भामरागड हा प्रादेशिक भाग माडिया गोंडानी व्यापलेला आहे. तसेच चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यातही माडिया गोंड जमातीची काही कुटुंबे आढळतात.

माडिया गोंडाचे वस्ती स्थानावरुन बडा माडिया लाहोरी पर्वताच्या रांगामध्ये (भामरागड तहसिल) राहातात. आणि ते आधिकच मागासलेले आहेत. हे लोक उंच पहाडावर राहातात. म्हणून त्यांना ''बडा माडिया'' असे म्हणतात.

छोटा माडिया भामरागड आणि इट्टपल्लीच्या सपाट भागात राहातात. हे लोक पहाडाच्या पायथ्याला राहतात म्हणून त्यांना छोटा माडिया असे म्हणतात. डोंगर किंवा पहाडात राहाणाऱ्या माडिया गोंडांना हिल माडिया किंवा डोंगरी माडिया असेही म्हणतात.

माडिया या शब्दाची निर्मिती माडाच्या प्रदेशात राहाणारे लोक या अर्थाने झालेली आहे. माड हा वृक्ष या लोकांचा आवडता वृक्ष आहे. माडाच्या बनात राहाणाऱ्या या लोकांना माडियागोंड असे म्हणतात. जंगलात राहणारा माणूस असाही माडियाचा अर्थ लावला जातो.

माडिया गोंड जी भाषा बोलतात तिला माडिया असे म्हणतात. तशी ती गोंडी बोली भाषा आहे. तिला लिपी नाही. माडियागोंड लोक हे मासांहारी असून मासे, अंडे, पक्षी, डुक्कर आणि म्हशीचे मांस खातात. क्वचित प्रसंगी गायीचेही मांस खातात. तशी ही जमात मद्यपीही आहे. तांदूळ मोह, व गुळ यापासून बनविलेली दारु पितात. माडियागोंड लोकात बालविवाह होत नाहीत. एकाच गोत्रात विवाह होत नाहीत. या जमातीत वधुमुल्याची पध्दत आहे. स्त्रीला घटास्फोट मागण्याचा आधिकार आहे.

जमातीच्या पंचासमोर स्त्रीला न्याय मागण्याचा आधिकार आहे. मुलाच्या जन्मानंतर नाळ पडल्यावर नामकरण विधी साजरा करतात. मृत व्यक्तीला पुरण्याची प्रथा आहे.

माडियागोंड जमातीतील लोकांना वनऔषधीचे चांगले ज्ञान असते. जादू, टोना, भूतदया यावर या लोकांचा विश्वास आहे. परंपरागत सणाच्या बरोबरीने दसरा दिवाळी, संक्रांत हेही सण साजरे केले जातात. नृत्यगायन याला सण समारंभात महत्व आहे.

शिकार व शेती यावरच माडियागोंड निर्वाह चालत असतो. पूर्वी बडा माडियामध्ये फिरती शेती रुढ होती. सध्या शेती स्थिर झाली आहे. परंतु निसर्गावरील अवलंबीत्व असलेली शेती आणि शिकारीवरील निर्बंध यामुळे शेती व शिकार धोक्यात आली आहेत.

बांबूपासून नित्य उपयोगाच्या वस्तू तयार करण्याचे काम माडिया स्त्रिया करतात. आजही काही भागात वस्तू विनियम पध्दती आढळते. त्यात त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते.

त्यांचे उदरनिर्वाहाचे आणखी एक प्रमुख साधन मासेमारी ही आहे. शेती देखील उदरनिर्वाहाचे साधन आहे. परंतु निघणारे उत्पन्न कमी असते. त्यामुळे माडियांचे देखील इतर आदिवासी जमातीप्रमाणे मागासपण आधिक दिसते[४४].

## ९. महाराष्ट्रातील आदिवासी विकास योजना :

महाराष्ट्रात भिल्ल, महादेव कोळी, वारली, गोंड, कोकण, कातकरी, ठाकूर, गावीत, कोलाम, कोरकू, अंध, मल्हार, कोळी, धाडिया, दुबळा, माडिया गोंड, परधान, पारधी इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती राहतात. एकूण ४७ जमाती आदिवासी म्हणून ओळखल्या जातात. भारतातील आदिवासी इतकेच महाराष्ट्रातील आदिवासी मागासलेले आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींची आर्थिकदृष्टया असमाधानकारक स्थिती दिसते. ९०% आदिवासी शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यातील ५०% शेती करतात. तर ४०% आदिवासी

शेतमजूरी करतात. त्याशिवाय झाडे तोडणे, लाकूड कापणे, कोळसा तयार करणे, वनवस्तू गोळा करणे, चटया तयार करणे इत्यादी व्यवसायही करतात.

महाराष्ट्रात आदिवासी उपयोजना, महाराष्ट्र राज्य सहकार आदिवासी विकास महामंडळ व आदिवासी विकास विभाग यांच्याकडून आदिवासी विकासासाठी खालील विविध योजना राबविल्या जातात.

**अ) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजना :**

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ ३०७,७९३ चौ.कि. मी. एवढे असून त्यापैकी ५०७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते याचे प्रमाण १६.५ एवढे आहे. समाज कल्याण विभागांतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग १९७२ सालापर्यंत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना झाली. आदिवासी विभाग स्वतंत्र करण्यात आला. काही काळ समाज कल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालीच या विभागाचे काम चालू होते. १९७५-७६ साली राज्याला आदिवासी उपयोजना लागू झाली. विकास कार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न राहता ती विकास योजना अशी करण्यात आली.

आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्मिक क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करुन १९७५-७६ साली ''आदिवासी उपयोजना'' तयार करण्याचे निर्देश भारत सरकारने राज्य सरकारला केले. त्यानुसार १४ जिल्हयातील ७३ तालुक्यातील ६७६७ गांवाचा उपयोजनेत (माडा पॉकेटसह) समावेश करण्यात आला. यामध्ये ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा या जिल्हयाचा समावेश होता. याशिवाय मिनीमाडा व अतरिक्त उपयोजना क्षेत्रातील १६४५ गावांनाही उपयोजनेचा लाभ मिळाला आहे.

ज्या गांवातील आदिवासी संख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के हुन अधिक असेल त्या गावाचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (ITDP) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशा प्रकारे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावातील आदिवासीची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा किंचीतशी कमी होती त्या गावाचाही समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला. अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (ATSP) प्रकल्प म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत. आदिवासी क्षेत्रातील कामकाज पाहण्यासाठी असलेल्या प्रकल्प अधिकाऱ्यांची संख्या एकूण २३ एवढी होती. सध्या ती २४ झाली आहे. दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रा लगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासीची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले. म्हणून सुमारे १0000 लोकवस्तीच्या गावामध्ये आदिवासीची संख्या ५० टक्के हुन आधिक असेल तर अशा गावाचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण ५000 लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गांवामध्ये ५० टक्केहून आधिक आदिवासीची संख्या असेल तर त्या गावाचा समावेश मिनीमाडा क्षेत्रात करण्यात यावा अशा सुचना होत्या. महाराष्ट्रात एकूण ४३ माडा क्षेत्रे आणि २४ मिनी माडा क्षेत्रे आहेत. तरीही आणि माडा व मिनीमाडा यामधील क्षेत्रांची फार मोठया प्रमाणात सरमिसळ झालेल्या आहेत[४५]. १९९१ च्या जणगणनेनुसार राज्यातील आदिवासी पैकी एकुण सुमारे ४९ टक्के आदिवासी आय.ए.डी.पी., माडा आणि मिनीमाडा क्षेत्रात राहतात. उर्वरीत ५१ टक्के आदिवासी या क्षेत्राबाहेर राहातात.

**तक्ता १.११ : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकुण अनुसुचित जमातीची कुटूंबे व दारिद्रय रेषेखालील कुटूंबे[४६]**

| अ.क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | आदिवासी जमातीती कुटूंबे | आदिवासी दारिद्रय रेषेखालील कुटूंबे | दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे डहाणू | ६६४४७ | ५९५९५ | ८९.६९ |
| २ | ठाणे जव्हार | ४६५५६ | ४०९३९ | ८७.९३ |
| ३ | ठाणे शहापूर | २२२६० | १९७४३ | ८८.६९ |
| ४ | रायगड पेण | ९९२९ | ९३९६ | ९४.६३ |
| ५ | नाशिक त्रिबंक | ४०४४६ | ३६७१७ | ९०.९६ |
| ६ | नाशिक कळवण | ५८०१९ | ५२७७६ | ९०.९६ |
| ७ | धुळे तळोदा | ६९६२२ | ६६३०६ | ९५.२४ |
| ८ | धुळे नंदूरबार | ९१५८८ | ८३४९६ | ९१.१६ |
| ९ | जळगांव यावला | ५९३५ | ५४७९ | ९२.३२ |
| १० | अहमदनगर राजूर | १३२०८ | ११४८६ | ८६.९६ |
| **११** | **पुणे घोडेगांव** | **१४३४०** | **१२०४२** | **८३.९७** |
| १२ | नांदेड किनवट | २०२८८ | १७८३७ | ८७.९२ |
| १३ | अमरावती अकोला | ९३७८ | ८६९२ | ९२.६९ |
| १४ | अमरावती धारणी | २७३२६ | २३९७७ | ८७.७४ |
| १५ | नागपूर रामटेक | १५११० | १३७१८ | ९०.७९ |
| १६ | गोंदिया देवरी | २००९० | १८३९६ | ९१.५७ |
| १७ | यवतमाळ पांढरकवडा | ३६५६१ | ३३५६२ | ९१.७९ |
| १८ | चंद्रपूर राजूर | २८६८२ | २६२८७ | ९१.६५ |
| १९ | चंद्रपूर चिमूर | ११०९१ | १०१६५ | ९१.६५ |
| २० | गडचिरोली झटटापल्ली | १२४४५ | ११७७२ | ९४.५९ |
| २१ | गडचिरोली अहेरी | ५३१३ | ४९२१ | ९०.९१ |
| २२ | भामरागड | ११८४६ | १०८३५ | ९१.४७ |
| | **राज्य एकुण आदिवासी उपयोजना** | **६३४५८०** | **५७८१३६** | **९१.११** |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना २००५–०६, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग

**१) आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६ :**

आदिवासी जमातीतील लोकांचे जीवनमान सुधारुन आदिवासी व बाहेरील क्षेत्रातील प्रगती अंतर कमी करणे हे आदिवासी उपयोजनेचे उदिष्ट आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या प्रगतीची गती वाढविणेसाठी मोठे पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग

म्हणून सावकारी व सौदेबाजीतील पिळवणूक दूर करण्यासाठी शासनाने ''महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६'' लागू केला. या कायद्याने आदिवासींना पूर्वीच्या कर्जातून मुक्त केले. उपयोजना क्षेत्रातील सावकार व व्यापारी यांचे उच्चाटन केले व खाजगी बहुउद्देशीय सेवा सहकारी सोसायट्या चालू केल्या. आतापर्यंत अशा २७४ सोसायट्या स्थापन झाल्या आहेत व त्यांनी आदिवासी विकास महामंडळाचे सदस्यत्वही स्विकारले आहे.

१९७७–७८ मध्ये व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी ७ तालुक्यात अन्नधान्य व वनउत्पादने एकाधिकार खरेदी योजना सुरु केली. नंतर ती ६0 तालुक्यात लागू करण्यात आली. आदिवासी विकास महामंडळ या योजनेत शासनाचा एजंट म्हणून काम करीत आहे[४७].

**२) आदिवासी विकासाचा बहुउद्देशीय कार्यक्रम[४८] :**

आदिवासी उपयोजना कार्यक्रमांतर्गत आदिवासी क्षेत्र विकासाला व आदिवासी कुटुंब कल्याणाला केंद्र मानून विकासाचे कार्यक्रम आखण्यात येतात. १९९३ ते १९९८ या पाच वर्षातील आदिवासी उपयोजनेसाठी केलेल्या तरतुदीची आकडेवारी पुढील प्रमाणे–

**तक्ता १.१२ : आदिवासी उपयोजनेसाठी केलेल्या तरतुदीची आकडेवारी**

| अ.क्र. | वर्ष | आदिवासी उपयोजनेसाठी केलेली तरतुद (कोटी) | राज्याच्या एकूण नियोजनाशी % |
|---|---|---|---|
| १. | १९९३–९४ | २६५.00 | ७ |
| २. | १९९४–९५ | ३३0.00 | ७.५ |
| ३. | १९९५–९६ | ४१२.५0 | ७.५ |
| ४. | १९९६–९७ | ५८८.५0 | ७.४८ |
| ५. | १९९७–९८ | ५९४.00 | ९ |

**आधार :** आदिवासी उपयोजना अहवाल, २00१–0२, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग

जिल्हा पातळीवर कार्यान्वित अधिकाऱ्याच्या सहकार्याने प्रकल्प समिती जिल्हा नियोजनाचा आराखडा तयार करते. आराखडा जिल्हा नियोजन व विकास महामंडळापुढे मान्यतेसाठी ठेवला जातो. मान्यतेच्या शिफारशीनंतर शासनास (आदिवासी विकास

विभागास) सादर करुन अंतिम मान्यता घेण्यात येते. आदिवासी विकासाचा कार्यक्रम शासकीय चौकटीच्या नऊ विभागात आखला जातो. ते पुढील प्रमाणे-

## २.१ कृषि व संलग्न सेवा :

या विकास संवर्गात पीकसंवर्धन, फलोत्पादन, मृदा व जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मस्त्य व्यवसाय विकास, वन, सहकार व भांडारे, वखारी या विभागाच्या विविध योजनांचा समावेश होतो. आदिवासी लोकसंख्येच्या ८८ टक्के लोक शेतीवर आपली उपजिपिका करतात. ही शेती  डोंगराळ भागत असल्याने त्यांना शेती विकासासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करते. आदिवासी शेतकऱ्यांना अन्नधान्य व कडधान्य उत्पादनासाठी उत्तम प्रकारचे बी-बियाणे खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. हा कार्यक्रम केंद्र पुरस्कृत असल्याने ७५ टक्के, २५ टक्के प्रमाणात भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून निधी उपलब्ध होतो. तसेच शेतीला लाभपात्र करण्यासाठी तुषार व ठिबक सिंचन योजना वापरली जाते. विहीरी खोदण्यासाठी १00 टक्के अनुदानावर २८५00 रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. आदिवासी शेतकरी कुटुंबाला दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी भुसुधार कामे, निविष्टा संच, सुधारित कृषि अवजारे, पीक संरक्षक साहित्य, जुन्या विहीरी दुरुस्ती, नवीन विहीर खोदाई, बैलजोडी, बैलगाडीचे वाटप याकरिता ३0000 रु. पर्यंत एकपात्री योजनेअंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते. सन २00४-0५ साठी कृषि व संलग्न सेवांसाठी १५२८.२९ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती.

- **फलोत्पादन :**

फलोत्पादन कार्यक्रमात रोपवाटिका, तळे तयार करण्याचे काम हाती घेण्यात येते. आदिवासी शेतकऱ्यांना फलोद्यानाचा सुधारीत कार्यक्रम समजावून सांगण्यासाठी एक आठवड्याचे प्रशिक्षण दिले जाते. गावठी बोर, आंबा, काजू झाडाचे सुधारीत प्रजातीच्या

झाडांमध्ये रुपांतर केले जाते. भाजीपाला विकासासाठी निविष्ठा संच व खॅ, बियाणे, किटकनाशके, इतयादी पुरवठा करण्याकरिता आर्थिक सहाय्य दिले जाते. या शिवाय रोजगार हमी द्वारेही फलोत्पादनाचा कार्यक्रम आदिवासी विभागामध्ये घेतला जातो.

फलोत्पादन विकासासाठी २००३-२००४ यामध्ये आदिवासी उपयोजनेसाठी एकूण रु. ३४.७७ लाख एवढा नियत व्यय मंजूर करण्यात आला होता.

- **मृदा व जलसंधारण :**

आदिवासी भागात सखोल पानलोटक्षेत्र विकास कार्यक्रमावर भर देण्यात येतो. यामध्ये बांधबंधीस्ती, भूविकास, नालाबंधीस्ती, कंटुर व्हेजीटेटीव्ह की लाईन्स, अव्हर्सन बंधारे, कोल्हापूर बंधारे वगैरे कामे केली जातात.

शेतीला जोडधंदा म्हणून पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय सेवा पशुआरोग्य राखण्यासाठी पशु प्रथमोपचार केंद्र, पशुवैद्यकीय केंद्रे व फिरते पशुवैद्यकीय दवाखाने यावर भर देण्यात आला आहे. आदिवासींच्या पशूची आरोग्य देखभाल पायाच्या व तोंडाच्या रोगाचे नियंत्रण करण्यासाठी लसीकरण, कृत्रिम रेतन केंद्राद्वारे पशुधन विकास केला जातो. लहान सीमान्त शेतकऱ्यांना बदकाचे वाटप देखील केले जाते. २००३-२००४ या वर्षी रु. ६२९.५९ लाख एवढ्या व्ययाची तरतुद करण्यात आली होती.

- **दुग्ध विकास :**

आदिवासींना दुग्ध व्यवसाय विकास व सुधारीत पशुपालन पध्दतीची माहिती देण्याकरिता एक आठवड्यामध्ये प्रशिक्षण दिले जाते. एक वर्ष वयाच्या उच्च पैदास क्षमतेच्या पारड्याचे व भाकड गाभण म्हशीचे वाटप केले जाते. दारिद्रय रेषेच्या खाली असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना ८०% अनुदानावर परंतु रु. ३००० किंमतीपर्यंतची दुभती जनावरे पुरविली जातात. आदिवासी सहकारी दुध संस्थांना भांडवली अनुदान दिले जाते. २००४-०५ वर्षासाठी २.९७ लाख रूपये तरतूद करण्यात आली होती.

* **वने :**

उद्यानविकासाच्या कार्यक्रमात रोपवाटिकेची स्थापना, औद्योगिक व व्यापारी प्रयोजनासाठी प्रजातीय वनलागवडी व निकृष्ट वनात वैरण साधन संपत्तीचा विकास, किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास यांचा समावेश असतो. वनकामगार व सेवकवर्ग यांच्यासाठी सुखसोई वन दळण वळण इत्यादीही योजना राबविल्या जातात. २००४-०५ साली वन कार्यक्रमासाठी रु. ८२.७५ लाख रुपये व्ययाची तरतुद करण्यात आली होती.

## २.२ ग्रामीण विकास :

ग्रामिण विकास कार्यक्रमांतर्गत दारिद्र्य निर्मुलन करण्याच्या कामावर भर देण्यात आला आहे. ग्रामिण भागातील आदिवास टिकाऊ मालमत्ता निर्माण करणाऱ्या कामावर रोजगार उपलब्ध करुन देणे, ग्रामिण जीवनाचा दर्जा उंचावणे यासारखी कामे घेतली जातात. या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यरेषेखालील आदिवासींना लाभ दिला जातो. ग्रामिण विकास कार्यक्रमांतर्गत मुख्यतः खालील विकास कार्यक्रम घेतले जातात. एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम २ अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम, ३. जवाहर रोजगार योजना, ४. जमीन सुधारणा कार्यक्रम, ५. सामुहीक विकास व पंचायत इ. एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रमाखाली दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबातील अल्पभूधारक, सिमांत शेतकरी, शेतमजूर, बिगर शेतमजूर, कामगार, ग्रामिण कारागीर यांचे गट तयार केले जातात व या गटांना आर्थिक विकासासाठी उत्पादक कार्यक्रम घेऊन त्यांना कर्जे व अनुदान स्वरुपात अर्थसहाय्य दिले जाते. २००४-०५ साली ग्रामीण विकासासाठी ६३६३.२८ कोटी रूपये आर्थिक तरतूद करण्यात आली होती.

## २.३ पाटबंधारे व पुरनियंत्रण :

पाटबंधारे प्रकल्पाचा फायदा जास्तीत जास्त आदिवासी लोकांना होईल अशा प्रकल्पांना आदिवासी उपयोजनेतून आदिवासी लाभधारकांच्या प्रमाणानुसार सहाय्य

देण्यात येते. आदिवासी भागातील असल्यामुळे बिगर आदिवासींच्या योजनावरील खर्चातून भागविण्यात येतो. १५० हेक्टर्सपर्यंत लहान पाटबंधाऱ्याची कामे स्थानिक क्षेत्रातून म्हणजे जिल्हा परिषदेकडून केली जातात. यामध्ये मुख्यत्वे करून लहान पाटबंधारे, तलाव, कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे, भूमिगत बंधारे, अपवाहन बंधारे, पाझर तलाव, उपसा सिंचन योजना व मालगुजारी तलाव इत्यादी कामे केली जातात. तर २५० हेक्टरवरील प्रकल्पाची कामे सिंचन विभागामार्फत केली जातात. सिंचन क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टिने आदिवासी क्षेत्रात भूविकास करण्याचे काम ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत केले जाते. २००४–०५ वर्षासाठी ३१४८ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती.

## २.४ विद्युत विकास :

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांना, पाड्यांना, वस्त्यांना विद्युत पुरवठा करणे व कृषि पंपांना वीजपुरवठा करणे शक्य नाही असे शासनाने जाहिर केले आहे. वाड्याचे विद्युतीकरण करण्याचाही कार्यक्रम घेण्यात आला आहे. आदिवासी क्षेत्रात ९०७५ वाड्या आहेत. त्यापैकी ६३४३ वाड्यांचे विद्युतीकरणाचे काम झालेले आहे. बाकीच्या वाड्यांचे विद्युतीकरण व्हायचे आहे. तसेच ४००० कृषि पंपांना व १०००० घरांना वापराकरिता वीजपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. विद्युतपुरवठा अखंडपणे व योग्य व्होल्टेजने व्हावा म्हणून ३३ केव्हीची उपक्रेंदे उभारणे आणि ३५ एम.व्ही.ए. क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर्स कार्यान्वित करणे हे कार्यक्रम घेण्यात येतात. २००४–०५ वर्षासाठी १७.६० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## २.५ वाहतूक व दळणवळण :

दळणवळणासाठी रस्ते बांधण्याकरिता १९८१ ते २००१ वर्षीय कालावधीत उद्देशनिष्ठ मार्ग विकास योजना हाती घेतली आहे. एकूण २१० लाख कि.मी. लांबीचे रस्ते

बांधण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये बारमाही रस्ता उपलब्ध करणे व ५०० ते १००० लोकवस्ती असलेली गांवे मुख्य रस्त्याला जोडणे अशी कामे केली जातात. विशेषतः दुर्गम भागातील रस्ते तयार करुन ते मुख्य रस्त्याला जोडले जातात. राज्य शासनाने १४७२ दुर्गम भागातील रस्ते तयार करुन ते मुख्य रस्त्याला जोडले जातात. राज्य शासनाने १४७२ दुर्गम गावांसाठी रस्त्याच्या बांधकामाचा मास्टर प्लॅन तयार केला आहे. सन २००४-०५ साठक्ष २९५५.४५ लाख रूपयांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे.

**ब) आदिवासी विकास विभागाच्या योजना[४९] :**

भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांचे शैक्षणिक आर्थिक जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आणि त्यांचे  सामाजिक पिळवणूकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकली आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाकडून आदिवासी कल्याणासाठी खालील योजना राबविल्या जातात.

- **शासकीय आश्रम शाळा :**

शिक्षणाच्या माध्यमातून क्षेत्र विकास या प्रक्रियेत आश्रमशाळा ही एक महत्वाची योजना आहे. या शाळातून आदिवासी मुलामुलींची १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. सातवीनंतर आवश्यक ठिकाणी पोस्ट बेसिक शाळांचे माध्यमिक शाळेत रुपांतर करण्याचे शासनाचे धोरण आहे. आदिवासींच्या सामाजिक व शैक्षणिक विकासात आश्रम शाळेचे स्थान महत्वाचे आहे. १९७८-७९ सालासाठी २५ शासकीय आश्रम शाळांना मंजुरी देण्यात आली आहे. २००४-०५ साठी २७८२.५६ लाख रू. तरतूद केली होती.

आदिवासी विद्यार्थ्यांना वसतीगृहाची ही सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. विनामूल्य भोजन व निवास, पाठ्यपुस्तके लेखन  सामुग्री, गणवेश, बिस्तारा, विनामूल्य

वैद्यकीय मदत, वाहन व खास शिक्षण विषयक सुविधांची तरतूद केली आहे. महाराष्ट्रात अशी एकूण ६९ शासकीय वसतीगृहे शासनामार्फत चालविली जातात. तसेच खासगी वसतीगृहानाही प्रतिव्यक्ती अनुदाने दिली जातात. महाराष्ट्रात अशी १२२७ सहाय्यक मागासवर्गीय वसतीगृहे चालविली जातात. त्या संस्थांमधून एकूण ५५२२३ विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यापैकी ११२१३ विद्यार्थी आदिवासी आहेत. २००४–०५ साठी रू. ७७३.०३ लाख एवढी तरतूद केली होती.

- **आर्थिक उन्नतीचे व गृह निर्माण कार्यक्रम :**

**२.१ मागासवर्गीय गृहनिर्माण योजना :**

आदिवासी गृहनिर्माण योजना १९८९ पासून चालू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळामार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. गृहनिर्माण मंडळ व प्राधिकरण गृहनिर्माण मंडळ यांच्या योजने अंतर्गत बांधलेल्या गाळ्यामध्ये ६ टक्के गाळे आदिवासी करिता राखीव ठेवण्यात येतात.

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला भूसंपादन व भूविकासा करिता तसेच विविध उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी कर्ज देते. प्राधिकरणाला गृहनिर्माणासाठी वितरीत केलेल्या कर्जातून विविध उत्पन्न गटासाठी गाळे बांधले जातात. त्यातील ६ टक्के गाळे आदिवासी जमातीसाठी राखीव असतात. २००४–०५ वर्षासाठी रू. ६२.९० लाख इतकी तरतूद केली होती.

**२.२ आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप, तेलपंपाचा पुरवठा :**

शेती हा आदिवासींचा मुख्य व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील ८० टक्के आदिवासी शेतीवर अवलंबून आहेत. अधिकांश आदिवासी फक्त पावसाळ्यात निकृष्ट प्रतीचे धान्यचे उत्पन्न काढतात. त्यांची आर्थिक स्थिती गरीबीची असते. त्यांना वर्षातून दोन तीन पिके काढणे सोयीचे व्हावे व त्यासाठी जलसिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विहीरींवर किंवा नदीवर मोफत वीजपंप बसवून देण्याची योजना चालविली जाते.

महाराष्ट्र राज्य वीज महामंडळामार्फत आदिवासी क्षेत्रात वीज नेण्याचे काम हाती घेतले आहे. हे विद्युतीकरण करण्यास ३ ते ५ वर्ष लागतील. तेव्हा २.५ एकर ते १६ एकरापर्यंतजमिनी असणाऱ्या अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांना तेल इंजिने पुरविली जातात.

१९७६-७७ मध्ये योजनेला मंजूरी दिली व पंप संचासहित १४० पुरविण्याकरिता रु. ५.६० लाख इतकी रक्कम पुरविली होती तर २००४-०५ मध्ये ११६२.९४ लाख रूपयांची तरतूद केली होती.

**२.३ व्यवसायासाठी कर्ज व अर्थसहाय्य :**

१९७६-७७ पासून मागासवर्गीय उद्योजकांना लहान व्यवसाय व लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य देण्यासाठी प्रकल्पांच्या १०,००० पर्यंतच्या एकूण खर्चासाठी पुढील प्रमाणे वित्तव्यवस्था करण्यात येते. ७५ टक्के कर्ज राष्ट्रीय बँकाकडून १५ टक्के कर्ज प्रादेशिक विकास महामंडळाकडून, ५ टक्के अर्थसहाय्य योजनेखाली, ५ टक्के उद्योजकाचे वैयक्तिक अंशदान करण्यात आले.

**२.४ जंगल कामगार सहकारी सोसायटी :**

जंगल तोडीच्या कामातून कंत्राटदार वगिर आदविसींचे उच्चाटन करण्यासाठी जंगल कामगार सहकारी सोसायट्या प्रस्थापत केलेल्या आहेत. संस्थेच्या पहिल्या वर्षात ३००० रूपये भाग भांडवलाची गुंतवणूक, १२०० रूपये पहिल्या दोन वर्षाच्या व्यवस्थापनासाठी व कल्याण कार्याकरिता पहिली तीन वर्षे दरसाल रूपये १५०० ची मदत दिली जाते.

**२.५ नोकऱ्यामध्ये सवलती :**

शासकीय नोकऱ्यांमध्ये आदिवासी उमेदवारासाठी जागा राखून ठेवलेल्या आहेत. ७ टक्के जागा असुनसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या वयाची मर्यादा पाच वर्षांनी शिथील करण्यात आलेली आहे. या सर्व सवलती शासकीय सेवेपुरत्याच मर्यादित नसून महानगरपालिका, नगरपालिका शासन पुरस्कृत महामंडळे,

सहकारी संस्था, सहकारी बँका, सहकारी कारखाने, शिक्षण संस्था, इत्यादी संस्थांमध्ये या सवलती दिल्या जातात.

**क) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना[५०] :**

महाराष्ट्र शासनाने ''महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित'' ही संस्था १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९९६० अन्वये स्थापन केलेली आहे. महामंडळाचे कार्यक्षेत्र पुणे, अहमदनगर, नासिक, ठाणे, रायगड, धुळे, जळगाव, नागपूर, अमरावती, यवतमाळ, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर व नांदेड या जिल्हयातील ६२ तालुक्यात पसरलेले आहे. आदिवासी सहकारी विकास महामंडळाला सहाय्य करण्यासाठी आदिवासी सहकारी संस्थाचे सहकार्य घेतले जाते. मंडळाच्या कार्यक्षेत्रात २७५ आदिवासी सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. ६२ तालुक्यात महामंडळाच्या योजना कार्यान्वित आहेत.

- **एकाधिकार धान्य खरेदी योजना :**

आदिवासी लोकांच्या शेतीमालाला योग्य बाजारभाव दिला जात नसे तसेच व्यापारी लोक किंमत देताना व वजन करताना आदिवासींची फसवणूक करीत असे. कर्जाच्या अत्याल्प किंमतीला शेतमाल व्यापारी लोक खरेदी करीत असे. आदिवासींची प्रचंड पिळवणूक होत असे. ही पिळवणूक थांबविणे व शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे या उद्देशाने '' एकाधिकार धान्य खरेदी योजना'' राबविण्यात आली. महामंडळाच्या वतीने आदिवासींचा शेतमाल खरेदी केंद्रावर सहकारी संस्था खरेदी करतात.

- **गौण वनोत्पादनाची खरेदी :**

हिरडा, चारोळी, डिंक, महुफुले, टोळंबी, इत्यादी वनउत्पादने, आदिवासी सहकारी संस्था महामंडळाने निश्चित केलेल्या खरेदी केंद्रावर महामंडळाच्या वतीने खरेदी करतात.

- **एकाधिकार गवत खरेदी योजना :**

ठाणे जिल्ह्यातील एकाधिकार गवत खरेदी योजना महत्वाची ठरली आहे. कवडीमोलाने विकल्या जाणाऱ्या गवताला चांगली किंमत येऊ लागली आहे. गवत खरेदीमुळे शेतमजूर कुटुंबाला अर्थार्जन होऊ लागलेले आहे. पालघर, डहाणू, जव्हार, तलसरी, मोखाडा, वाडा, शहापूर इ. तालुक्यातील आदिवासींचा त्यामुळे आर्थिक फायदा झालेला आहे.

- **गरीब आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज योजना :**

आदिवासी लोक पावसाळी दिवसात लहानशा कर्जासाठी उभेक पिक तारण म्हणून ठेवत असत. तसेच कर्जावर जाचक व्याजदर आकारला जात असे. व्यापारी व सावकाराकडून फार मोठी फसवणूक केली जात असे. म्हणून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७५ तालुक्यातील अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर व ग्रामिण कारागीर यांना खावटी कर्ज वाटप करण्याची जबाबदारी महामंडळाकडे सोपविली आहे. ८० टक्के कर्ज भूमिहीनांना दिले जाते.

अशा प्रकारे आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्रपूर्ण काळापासून ते आजपर्यंत पातळीवर योजना राबविल्या जातात.

## १.१० कातकरी आदिवासी : एक दृष्टिक्षेप

भारतातील ४१४ आदिवासींपैकी व ७४ अतिमागास आदिमांपैकी कातकरी ही एक आदिवासी जमात आहे. भौगोलिक वर्गीकरणानुसार पश्चिम भारत व मध्यपूर्व भारत या विभागात म्हणजे महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये तर दादरा नगर हवेली या केंद्रशासीत प्रदेशात कातकरी आदिवासी वास्तव्य करीत असल्याचे दिसते. कातकरी, काथोडि, काथोडिया अशा विविध नावांनी ही जमात ओळखली जाते. कातकरी ही मुळची महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील आहे. कामाच्या निमित्ताने ही जमात

देशातील इतर राज्यात व महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांत स्थलांतरीत झाली आहे. रायगड जिल्ह्यात या जमातीची लोकसंख्या सर्वाधिक केंद्रीत झाली आहे. म्हणून रायगड ही कातकरी भूमी मानली जाते.

काही विचारवंतांच्या मते कातकरी जमात मुळची गुजरात मधील मानली जाते. १८ व्या शतकात ही जमात गुजरात मधून महाराष्ट्रात स्थलांतरीत होऊन आली. १९ व्या शतकात काथ बनविण्याच्या व्यवसायासाठी कातकरी लोक महाराष्ट्रातून राजस्थानच्या पश्चिमेकडील उदयपूरच्या जंगलात स्थलांतरीत झाले. परंतु ब्रिटीशांच्या जंगल कायद्यामुळे व खैराची झाडे नामशेष झाल्यामुळे कातकरी परत रायगडमध्ये आले. २० व्या शतकात ठिसूळ कोळसा पाडण्यासाठी रायगड जिल्ह्यातून रत्नागिरी जिल्ह्यात स्थलांतरीत झाली. परंतु जंगलाचा ऱ्हास आणि वन उत्पादने वापरावरील निर्बंधामुळे कोळसा पाडण्याचा व्यवसायही बंद झाला. त्यानंतर ही जमात विटा बनविणे व शेतमजूर म्हणून काम करण्यासाठी इतर जिल्ह्यात स्थलांतरीत झाली असे मानले जाते.

आजही प्राथमिक अवस्थेत जीवन जगणाऱ्या आदिवासी जमातीचा केंद्र सरकारने समावेश आदिम जमात समुहात भारतातील ७४ आदिवासी जमाती समुह (Primitive Tribal Group) म्हणून घोषित केल्या आहेत. त्यात महाराष्ट्रातील कातकरी, कोलाम व माडिया गोंड या तीन आदिम जामातींचा समावेश होतो. या आदिवासींतही कातकरी जमातीचे जीवन खालच्या दर्जाचे आहे. महाराष्ट्रातील अतिमागास जमात समुहातील इतर जमातीतही कातकरी जमातीची लोकसंख्या अधिक प्रमाणात आहे.

२००१ साली महाराष्ट्रात २,३५,०२२ एवढी कातकरी लोकसंख्या होती. १९७१, १९८१ व १९९१ साली अनुक्रमे १,४६,७८५; १,७४,६०२ व २,०२,२०३ एवढी होती. रायगड ही कातकरी जमातीची भूमी असल्यामुळे २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण कातकरी लोकसंख्येपैकी १,०३,२४४ लोकसंख्या रायगडमध्ये रहात होती. ठाणे ९१,४२९, पुणे ११९३५, नाशिक ७,१९४, इतर जिल्ह्यांमध्ये १५,१८६ असे महाराष्ट्रात कातकरी जमातीचे वितरण आहे. कातकरी जमातीची साक्षरता १९६१, १९७१, १९८१ या

जनगणनेमध्ये अनुक्रमे २.३८%, २.८१% व ४.५७% होती. १९९१ साली साक्षरतेचा दर १६.३८% पर्यंत वाढत गेला. त्यात २१.७०% पुरूष व १०.७९% स्त्रिया यांची साक्षरता होती.

१९९१ च्या जनगणनेनुसार मुंबई ईलाख्यात ७२% कातकरी शेतमजूर म्हणून कार्यरत होते. हे प्रमाण आदिवासी जमातीत सर्वाधिक होते. फक्त ६.३% कातकरी लोकसंख्या स्वत: शेती करीत होते. यावरून स्वातंत्र्यपूर्व काळापासून अठरा विळवे दारिद्र्यात कातकरी जमात जगत आली आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीपैकी कातकरी जमात आजही अतिशय मागासलेली जमात मानली जाते[५१].

कातकरी ही आदिवासी जमात मागासलेली मानली जात असली तरी या जमातीच्या समाज व्यवस्थेला व अर्थव्यवस्थेला आंतरिक मुल्याची व नैतिकतेची बैठक आहे. गरीबी, दारिद्र्य, निकृष्ट राहणीमान पातळी असली तरी आदर्श समाजव्यवस्था असलेली ही जमात आहे.

त्यांचे आचार, विचार, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, धार्मिक जीवन, विवाह पध्दती हे सामाजिक घटक प्रभावी दिसतात. व्यक्तीचे समाज जीवन नियंत्रित करणारे शिष्टाचार, लिपी नसलेली पण शिकण्यास अवघड असलेली बोली भाषा, लोकगीते, लोककथा, आधिभौतिक विश्वासंबंधीचे आश्चर्यचकीत करून टाकणारे त्यांचे ज्ञान अगाध आहे. प्राणी, जमीन, वातावरण यांसंबंधीचे अनुभवावर आधारलेले त्यांचे अंदाज, शिकारीतील अचूक नेमबाजी या वैशिष्ट्यपूर्ण बाबींवर प्रकाश टाकला असता कातकरी जमातीचे जीवन परिपूर्ण वाटते. त्यामुळे त्यांच्या जीवनाला आंतरिक मुल्ये आहेत हे स्पष्ट होते.

कातकरी जमातीत आहार पध्दतीच्या आधारावर ढोर कातकरी व सोन कातकरी असे दोन पोटभेद पडतात. सोन कातकरी स्वत:ला उच्च समजतात तर ढोर कातकऱ्यांना कनिष्ठ मानतात. सोन कातकरी रायगड जिल्ह्यात आढळतात तर ढोर कातकरी ठाणे व नाशिक जिल्ह्यात आढळतात.

कातकरी हे नाव खैराच्या झाडाच्या चिकापासून काथ बनविण्याच्या त्यांच्या व्यवसायापासून पडले असावे. काथोडी या संज्ञेचा मागोवा घेतल्यास 'काथ' आणि 'वडी' या शब्दापासून काथवडीचे निर्माते काथोडी असाही अर्थ निघतो. इतिहासकार वि. का. राजवाडे यांच्या मते 'कृतिपट्टीन' (म्हणजे कातडे वापरणारा) या शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवडी नांव पडले असावे असे मानले जाते.

कातकरी जीवनाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन असतो. विशेष म्हणजे त्याबद्दलची त्यांना जाणीव आहे पण खंत किंवा न्यूनगंड नाही. या लोकांना कशाचीही चिंता नाही, भिती नाही. मरण स्विकारायचे ते एकदाच क्षणाक्षणाला नाही. पण हे सर्व वैयक्तिक पातळीवर. सामुहित पातळीवर मरणाची कातकरी लोकांना फार भिती वाटते. रोगाची साथ आली की कातकरी फार घाबरून जातात. त्यांची भितीने बोबडी वळते. मरण कसं नैसर्गिक आले पाहिजे हीच इच्छा प्रत्येक कातकरी व्यक्तीची असते, पण प्रत्यक्ष शेकडो कातकरी रोगराईने मरतात.

संकोची स्वभाव, अज्ञान, अन्नासाठी दशदिशा भटकणं, अपुरे वस्त्र, दारिद्र्य इ. कारणांनी कातकरी मागासलेला आहे. कमीत कमी बोलणं ही कातकरी लोकांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये आहेत.

कातकरी जमात आर्थिकदृष्ट्या मागासलेली मानली जाते. काथ बनविणे, कोळसा पाडणे हे या जमातीचे मुळ व्यवसाय होते. काथ बनविणे, कोळसा पाडणे हे व्यवसाय संपुष्टात आल्यानंतर विटा बनविणे, शेतमजूरी, हमाली, लाकूडतोड, बेंजो पार्टी, इ. व्यवसाय या जमातीने स्विकारले आहेत. या जमातीचा कोणताही कायमचा उत्पन्नाचा मार्ग नाही. काळाच्या ओघात ही जमात एका व्यवसायातून दुसरा व्यवसाय व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाली. त्यामुळे सतत गरीबी, दारिद्र्यात ही जमात जीवन जगत आली आहे.

कातकऱ्यांची स्वतंत्र जशी जीवनशैली आहे तशीच त्यांची अर्थव्यवस्थेतील विचारशैलीदेखील वेगळी आहे. त्यांच्या मते 'माणसाने संचय करू नये, आवश्यक

असेल तेवढेच कमवावे. मालमत्ता म्हणजे चोरी', 'सर्व बळकावतो व खातो तो चोर', 'एक वेळ उंट सुईच्या टोकातून जाईल पण श्रीमंताला स्वर्ग मिळणार नाही. शेवटी पैसा, संपत्ती वगैरे काहीही बरोबर नेता येत नाही.'

'आजचे आज, उद्याचे उद्या' हा सरळ सोपा व्यवहार कातकरी लोकांना समजतो. त्यामुळे त्यांची कधी कधी पंचाईत होते. स्वत: आणि पोरंबाळं उपाशी राहतात. पण त्याची त्यांना खंत नसते, चिंताही नसते. ते कधीही भिक मागायला बाहेर पडत नाहीत. फारच झालं तर कोणाच्यातरी शेतात जाऊन तो दिवस भागण्यापुरते काही तरी घेऊन येतील. तेही त्या दिवसापुरतेच, संग्रह करून ठेवण्यासाठी नव्हे. संग्रहाचे माप त्यांना ठाऊक नसते. 'हातापायाची बोटे वीस' एवढेच त्यांना ठाऊक असते. 'थारोनेच नाही का सांगितले वीस ही गणना व्यवहारात माणसाला पुरेशी आहे.' कातकऱ्याची मापेच 'एक वीसा दोन वीसा'. कातकऱ्याचे जीवन निकृष्ठ दर्जाचे आहे. राहणं, खाणां, पिणं, मौजमजा अशा सर्व बाबतीत तो ग्रामीण जिवनाच्या शेवटच्या पायरीवर उभा आहे[५२].

अशा प्रकारे कातकरी ही एक वैशिष्ट्यपूर्ण जमात आहे.

## १.११ सारांश :

प्रस्तुत प्रकरणात मानवी विकासातील सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेपासून ते आदिवासी कल्याण योजनांपर्यंतच्या विविध बाबींचा आढावा घेण्यात आला आहे. सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेपासून ज्या जमाती दूर राहिल्या त्या आज आदिवासी म्हणून ओळखल्या जात आहेत. येथील मुळ रहिवासी असा आदिवासीचा अर्थ लावला जातो. आदिवासी समाज इतर समाजांपेक्षा वेगळा आहे. त्याचा स्वभाव, समाजातील वेगळे आचरण, अनोख्या चालीरिती, आर्थिक व्यवहार या बाबतीत आदिवासी समाज वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासींची अर्थव्यवस्था देखील वेगळी असते. अन्न संकलनापासून ते पशुपालनापर्यंत आदिवासी आर्थिक क्रिया बदलत गेला आहे याचे विवेचन केले आहे.

आदिवासींच्या सामाजिक संस्थांमधील वधुमूल्य, श्रमविभाजन, कुलाची कार्ये, बहुपतित्त्व विवाह संस्थेची कार्ये, कुटूंब संस्थेची कार्ये इत्यादीचा उहापोह केला आहे. आदिवासी समाजात स्त्रीयांचा चांगला आहे. आदिवासी समाजातील कला, संस्कृती, नृत्य वैशिष्टपूर्ण मानली जातात. विविध रोगांचे सततचे साम्राज्य आणि त्यातून मृत्यू यावरून त्यांचे आरोग्य निकृष्ट असल्याचे दिसून आले आहे.

जगातील आदिवासींचे प्रदेश, आदिवासी लोकसंख्या व वितरण आणि जगातील प्रमुख आदिवासी जमाती यावरही प्रकाश टाकला आहे. भारतातील आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण, आदिवासींचा मानसशास्त्रीय अभ्यास, प्रमुख आदिवासी जमाती, आदिवासींच्या विकासाची वाटचाल आणि भारतातील अतिमागास आदिवासी समूह इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे.

ब्रिटीशकालीन आदिवासी विरोधी धोरणांचा त्यांच्या विकासावर दूरगामी परिणाम झाला आहे. त्या त्या काळी आदिवासींनी बंड पुकारली होती यावर प्रकाश टाकला आहे. तसेच महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे वितरण, प्रमुख आदिवासीचे जिल्हानिहाय वितरण, लोकसंख्या, स्त्री–पुरूष प्रमाण, अतिमागास जमाती यांचा आढावा घेतला आहे. महाराष्ट्रात कातकरी, कोलाम व माडिया गोंड या अतिमागास जमाती असल्याचा निष्कर्ष पुढे आला आहे. अंतिमत: आदिवासींच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला असता आदिवासींच्या कल्याणात वाढ झाल्याचे दिसते. सारांश रूपाने कातकरी जमातीच्या परिपूर्ण अभ्यासासाठी आदिवासी समाजाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे.

---

**संदर्भ सूची**

[१] गारे गोविंद, ''सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी'', सहाध्याय प्रकाशन, मुंबई, १९७४, पान १–३.
[२] नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतीय आदिवासी'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पान ३.
[३] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान २–४.
[४] नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतीय आदिवासी'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पुणे २५६–२५८.
[५] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो, ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन नागपूर, जुलै २००१, पान २९–३३.

[6] संगवे विलास, ''आदिवासींचे सामाजिक जीवन'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पान १४२-१४८.
[7] नाउ डी. एस., ''द ट्रायबल इकॉनॉमी'', दिल्ली पब्लिकेशन, १९५८, पान ४३-४७.
[8] संगवे विलास, ''आदिवासींचे सामाजिक जीवन'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पान १६२.
[9] संगवे विलास, ''आदिवासींचे सामाजिक जीवन'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पान १७१-१९४.
[10] हुसेन माजिद मराठी अनुवाद भागवत ए. व्ही., डॉ. सप्तर्षि प्रविण, नलावडे संजीव, सौ. नलावडे इरावती, नातू मुकुंद, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, मार्च २००२, पान ४३७.
[11] हुसेन माजिद मराठी अनुवाद भागवत ए. व्ही., डॉ. सप्तर्षि प्रविण, नलावडे संजीव, सौ. नलावडे इरावती, नातू मुकुंद, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, मार्च २००२, पान ४३८.
[12] हुसेन माजिद मराठी अनुवाद भागवत ए. व्ही., डॉ. सप्तर्षि प्रविण, नलावडे संजीव, सौ. नलावडे इरावती, नातू मुकुंद, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, मार्च २००२, पान ४३९-४४४.
[13] घारपुरे विठ्ठल, ''मानवी भूगोल'', पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००, पुणे १०७-११५.
[14] घारपुरे विठ्ठल, ''मानवी भूगोल'', पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००, पुणे ११६-११९.
[15] घारपुरे विठ्ठल, ''मानवी भूगोल'', पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००, पुणे ११९-१२१.
[16] हुसेन माजिद मराठी अनुवाद भागवत ए. व्ही., डॉ. सप्तर्षि प्रविण, नलावडे संजीव, सौ. नलावडे इरावती, नातू मुकुंद, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, मार्च २००२, पान ४७१-४७५.
[17] हुसेन माजिद मराठी अनुवाद भागवत ए. व्ही., डॉ. सप्तर्षि प्रविण, नलावडे संजीव, सौ. नलावडे इरावती, नातू मुकुंद, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, मार्च २००२, पान ४३८.
[18] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन नागपूर, जुलै २००१, पान ५.
[19] सवदी एस. बी. व कोळेकर पी. एस., ''मानवी लोकसंख्या भूगोल'', निराली प्रकाशन पुणे, सप्टेंबर २००६, पान ५.५ -५.१६.
[20] घारपुरे विठ्ठल, ''मानवी भुगोल'', पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००, पुणे १३३-१३६.
[21] सवदी एस. बी. व कोळेकर पी. एस., ''मानवी लोकसंख्या भूगोल'', निराली प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २००६, पान ५.२२-५.३०.
[22] घारपुरे विठ्ठल, ''मानवी भुगोल'', पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००, पुणे १४२-१४५.
[23] तिकोने पी. आर., ''महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातीची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पहाणी'', आदिवासी संशोधन पत्रिका, व्हॉल्युम २४, नं. १, मार्च २००१, पान ४७-६६.
[24] वार्षिक उपयोजना अहवाल, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४३६.
[25] संगवे विलास, ''सामाजिक मानसशास्त्र - एक सैद्धांतिक अभ्यास'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १५ ऑगस्ट १९६९, पान ९३-१०९.
[26] माथूर लक्ष्मण प्रसाद, ''जनजातियों के प्रति ब्रिटीश साम्राज्यवाद की नीतीयाँ'', ट्राईब त्रैमासिक पत्रिका, जनजाती इतिहास विशेषांक, खंड २९, अंक १-४, १९९७, माणिकलाल वर्मा आदिम शोध एवं प्रशिक्षण संस्थान, उदयपूर, पान १-७.
[27] भार्गव बी. एस., ''द क्रिमिनल ट्राईब्ज'', लखनौ पब्लिकेशन्स, लखनौ, १९४९, पान ११०-१११.
[28] नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतीय आदिवासी'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पान ३७५-३७७.
[29] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन नागपूर, जुलै २००१, पान १९४-१९५.
[30] नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतीय आदिवासी'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पान ३७८-३७९.
[31] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन नागपूर, जुलै २००१, पान १९४-१९५.
[32] नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतीय आदिवासी'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पान ३८०-३८३.
[33] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन नागपूर, जुलै २००१, पान १९७.
[34] वार्षिक उपयोजना अहवाल, २००५-०६, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ६७.
[35] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान १२.
[36] तत्रैव.
[37] भारताची जनगणना १९९१, महाराष्ट्र राज्य सिरीज - १२, भाग २ब, पान १३९.

[३८] वार्षिक उपयोजना अहवाल, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४३७.

[३९] वार्षिक उपयोजना अहवाल, २००५-०६, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४३९.

[४०] वार्षिक उपयोजना अहवाल, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४३८.

[४१] युनिव्हर्सल बेंचमार्क सर्व्हे, १९९६-९७, आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे, पान ९.

[४२] भारताची जनगणना १९९१, महाराष्ट्र राज्य सिरीज -१२, महाराष्ट्र स्पेशल टेबल फॉर ट्राईब (एज वाइज), पी. ए. टेबल, पान ४-७.

[४३] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो, ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन, नागपूर, जुलै २००१, पान २९-३३.

[४४] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान ७४-९५.

[४५] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान १९.

[४६] वार्षिक उपयोजना अहवाल, २००५-०६, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४७७.

[४७] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान २१-२४.

[४८] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान २७-३१.

[४९] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान ३३-३५.

[५०] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान ३६-३८.

[५१] भारताची जनगणना, १९९१, १९६१, १९७१, १९८१.

[५२] गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान १०-१२.

**प्रकरण दुसरे**

# संशोधन आराखडा व पध्दती

२.१. प्रस्तावना.
२.२. संशोधन आराखडा.
२.३. संशोधन विषयाची निवड.
२.४. संशोधन विषयाचे विश्लेषण.
२.५. संशोधन संदर्भ कालखंड.
२.६. संशोधन विषयाचे महत्त्व.
२.७. संशोधनाची उद्धिष्टये.
२.८. संशोधनाची गृहिते.
२.९. संशोधनाच्या मर्यादा.
२.१०. संशोधन पध्दती.
(१) नमुना निवड
अ) नमुना तालुक्याची निवड
ब) नमुना गांवाची निवड.
क) कुटुंबाची नमुना निवड.
(२) तथ्य संकलनाच्या पध्दती व साधने.
अ) प्राथमिक स्रोत
१) निरिक्षणे.
२) अनुसूची मुलाखती
३) संबंधितांशी चर्चा.
ब) द्धितीय स्रोत.
(३) तथ्याचे विलेषण व निर्वचन.
२.११. संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैद्धांतिक आधार.
२.१२. प्रकरणाची मांडणी
२.१३. सारांश.
संदर्भ सूची.

प्रकरण दुसरे

# संशोधन आराखडा व पध्दती

## २.१ प्रस्तावना :

सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. जगातील आदिवासी जमातीच्या सामाजिक संक्रमणाचा हा कालखंड आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत होणारे बदल शास्त्रीय दृष्टिने अभ्यासणे महत्वाचे आहे. संशोधनाला शास्त्रीय आधार असेल तर त्यातील निष्कर्ष अचूक ठरतात. ते संशोधन समाज उपयोगी व गुणात्मक मानले जाते. त्यामुळे संशोधनाचे महत्व वाढते. तसेच त्याचे समाजाला फायदे मिळतात. म्हणून संशोधन हे वैज्ञानिक असो की सामाजिक असो त्याला शास्त्रीय आधार देण्यासाठी संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. वैज्ञानिक संशोधनामध्ये प्रयोग महत्वाचा मानला जातो. सामाजिक संशोधनात समाज व्यवस्था हीच प्रयोग शाळा व सामाजिक समस्या हा सामाजिक संशोधनाचा विषय मानला जातो. त्यामुळे हे संशोधन तितकेच अवघड व जोखमीचे असते.

सामाजिक संशोधनामध्ये आदिवासी समाजाचे संशोधन हे अवघड व गुंतागुंतीचे आहे. कारण समाजातील प्रवाह आणि आदिवासी समाज यांच्यात मोठी दरी आहे. आदिवासी समाज प्राथमिक अवस्थेत जीवन जगत असतो. त्यांच्या समस्या शोधणे, त्यांना बोलते करणे, त्यांच्या सहवासात राहणे, त्यांची वेशभूषा, केशभूषा, घराची रचना, रुढी, परंपरा, सण, उत्सव, आचरण, विचार इत्यादींचे निरिक्षण करणे हे अवघड काम आहे.

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास करणे हे इतर आदिवासी जमातीच्या संशोधनापेक्षा कठीण काम आहे कारण ही जमात मुळची

पुणे जिल्ह्यातील नाही तर ती इतर जिल्ह्यातून स्थलांतरीत होऊन आलेली आहे असे मानले जाते. अशा वैशिष्ट्यपूर्ण जमातीच्या अभ्यासासाठी पुढील प्रमाणे आराखडा व संशोधन पध्दती अवलंबिण्यात आली आहे.

## २.२ संशोधन आराखडा :

''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास'' या संशोधन विषयाच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर या जमातीवर फारशी संशोधने झाली नाहीत असे दिसून आले. तसेच आदिमानवाप्रमाणे ही जमात आजही जीवन जगत आहे. या बाबीचा उलगडा करण्यासाठी हा संशोधन विषय निवडण्यात आला.

आदिवासी आणि निसर्ग निवास हा समन्वय निसर्गाने घालून दिला आहे. पुणे जिल्ह्यातील भौगोलिक व प्राकृतिक रचना विचारात घेता पुणे जिल्ह्यात कातकरी जमात कोणत्या अवस्थेत जीवन जगत आहे? हे आजमावण्यासाठी अभ्यास क्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्याची निवड करण्यात आली.

कातकरी जमातीच्या आर्थिक सामाजिक मागासलेपणाची कारणे शोधणे व काळाच्या ओघातील बदलाचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. या संशोधन विषयाचा संदर्भ कालावधी म्हणून १९९१ ते २००१ हा निवडण्यात आला आहे.

हा संशोधन विषय ''दारिद्र्याचे दुष्टचक्र'' या सैध्दांतिक संकल्पनेवर आधारलेला आहे. ज्याप्रमाणे अल्पविकसित देशाचा आर्थिक विकास दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेला असतो. त्याप्रमाणे कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक विकास दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकला आहे. हा सैध्दांतिक आधार घेऊन हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन विषयाची तथ्ये संकलीत करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्रोताचा अवलंब करण्यात आला. निरिक्षण, अनुसुचिद्वारे मुलाखती, विविध शासकीय अधिकारी व तज्ञाशी चर्चा इत्यादी प्राथमिक साधने तथ्य संकलनासाठी अवलंबिण्यात आली. कातकरी वस्ती असलेले ८ तालुके व ६२ गावे आणि ३८४ कातकरी कुटुंबे नमुना म्हणून निवडण्यात आली.

तथ्याचे विश्लेषण व निर्वचन करण्यासाठी वर्गीकरण, सारणीकरण व सांकेतिकरण पध्दतीचा वापर करून संशोधन अहवाल तयार करण्यात आला.

## २.३ संशोधन विषयाची निवड :

'पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास' हा संशोधन विषय निवडण्यामागे अनेक कारणे कारणीभूत ठरतात. संशोधकाने वेल्हे तालुक्यात कातकरी जीवन जवळून पाहिले आहे. महाराष्ट्र शासन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांची संशोधकाला वेल्हे तालुक्यातील कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास करण्यासाठी दोन वर्षाची संशोधन अधिछात्रवृत्ती मंजूर झाली होती. त्याचा संशोधकाने दोन वर्ष अभ्यास केला आहे तसेच 'भोर तालुक्यातील कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास' या विषयावर एम. फिल. विषयासाठी लघुशोध प्रबंधिका पुणे विद्यापीठास सादर केली आहे. तसेच कातकरी जमाती संबंधी संदर्भ साहित्याचा अभ्यास केला असता कातकरी जमातीवर आणखी संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून या विषयाची निवड करण्यात आली.

## २.४ संशोधन विषयाचे कथन :

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास' हा संशोधनाचा विषय आहे. सामाजिक व आर्थिक स्थिती प्रत्येक समाजाच्या विकासाचे

निर्देशक मानली जाते. आदिवासी जमातीतील कातकरी जमातीची जीवन जगण्याची पध्दत, त्यांची आर्थिक स्थिती, या जमातीची शैक्षणिक व आरोग्य स्थिती, या जमातीचा समाजाच्या मुख्य प्रवाहातील सहभाग, या जमातीचे मुळ ठिकाण, काळाच्या ओघातील त्यांच्यातील परिवर्तन या सारख्या संशोधन बाबींचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करणे हा संशोधन विषयाचा गाभा आहे.

## २.५ संशोधन संदर्भ कालखंड :

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी १९९९ ते २००९ हा दहा वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत कातकरी जमातीच्या आर्थिक, सामाजिक स्थितीत जे बदल झाले त्याचा अभ्यास करण्यात आला.

## २.६ संशोधन विषयाचे महत्व :

आदिवासी जमातीतील कातकरी या आदिम जमातीच्या वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक, आर्थिक बाबींचा अभ्यास या जमातीच्या सामाजिक आर्थिक प्रश्नाची उकल करण्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. वेगवेगळ्या आदिवासी जमातीवर आतापर्यंत मोठ्या प्रमाणात अनेक अंगांनी संशोधने झाली, त्यांच्या प्रश्नाची उकल व सोडवणूक झाली. मात्र कातकरी जमातीवर फार कमी अंगाने संशोधने झाली आहेत. म्हणून या संशोधनाची त्यात भर पडणार आहे.

सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेपासून ही जमात दुर राहिली हे समाजाच्या निदर्शनास आणून देणे महत्वाचे आहे. ही जमात सर्वच बाबतीत दुर्लक्षित राहीली आहे हे शासनाच्या लक्षात आणून देणे, कातकरी सारख्या स्थलांतरित होणाऱ्या अनेक

जमाती शासकीय योजनांच्या लाभापासून दूर राहतात ही बाब शासनाच्या दृष्टिक्षेपात आणून देणे या दृष्टिने हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

कातकरी जमातीची सामाजिक आर्थिक स्थिती गतिमान जगातील परिवर्तनवादी समाजाच्या निदर्शनास आणून देणे महत्वाचे आहे. कातकरी जमातीच्या आर्थिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी या संशोधनातील शिफारशी महत्वाच्या ठरणार आहेत. कातकरी सारख्या अतिमागास आदिवासी जमातीच्या उन्नतीसाठी विकास योजना व धोरणे राबविण्यासाठी या संशोधनाचा उपयोग होणार आहे. या संशोधनातील निष्कर्ष व शिफारशी आदिवासी जीवन पध्दतीत बदल घडवून आणण्यासाठी देखील महत्वाच्या ठरणार आहेत. स्थलांतरीत झालेल्या अनेक आदिवासी जमाती शासनाच्या दुर्लक्षामुळे काळाच्या ओघात कालबाह्य ठरल्या आहेत. याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे कातकरी सारख्या आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीतील बदल जाणून घेणे आवश्यक आहे.

२१ व्या शतकातील सामाजिक संक्रमणाच्या अवस्थेत कातकरी जमातीच्या रुढी परंपरा, अंधश्रद्धा, सांस्कृतिक बाबी यावर होणारा परिणाम याची माहिती घेण्याच्या दृष्टिने हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

## २.७ संशोधनाची उद्दिष्टे :

'पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक, आर्थिक अभ्यास' या संशोधन विषयाची पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. अभ्यास क्षेत्रातील नमुना कातकरी कुटूंबाच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थिती आजमावणे.

३. पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. कातकरी समाजाची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शिफारशी करणे.

## २.८ संशोधनाची गृहितके :

संशोधनाला योग्य दिशा देण्याचे दृष्टिने खालील कांही गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१. पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची सामाजिक-आर्थिक विकास प्रक्रिया दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात अडकली आहे.

३. पुणे जिल्ह्यातील कातकरी जमात शैक्षणिक व आरोग्यदृष्ट्या मागासलेली आहे.

## २.९ संशोधन विषयाच्या मर्यादा :

कोणत्याही सामाजिक विषयावर संशोधन करताना त्यावर अनेक मर्यादा पडतात. पुणे जिल्ह्यातील सह्याद्रीच्या डोंगर रांगामध्ये, दऱ्याखोऱ्यामध्ये व दुर्गम भागात कातकरी सारख्या आदिम जमातीवर संशोधन करताना अनेक मर्यादा पडल्या व अडचणी आल्या, त्या पुढीलप्रमाणे.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात कातकरी कुटुंबे राहतात. त्या सर्वांचा अभ्यास करणे अशक्य आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वच कातकरी जमातीचा अभ्यास करणे खर्चाच्या दृष्टिने अडचणीचे आहे. म्हणून फक्त यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने (Random Samplig Method)[१] निवडण्यात आलेल्या कातकरी कुटुंबाचाच अभ्यास करण्यात आला. कातकरी जमातीच्या अनेक समस्या आहेत. मात्र त्या सर्वच

समस्यांचा अभ्यास करण्यावर मर्यादा पडल्या आहेत. फक्त त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यातील आठ तालुक्यात व असंख्य गांवात कातकरी लोक रहात असले तरी त्या सर्वांचा अभ्यास करणे शक्य झाले नाही. तसेच कांही कातकरी कुटुंबे कामाच्या निर्मितीने स्थलांतरीत होतात म्हणून त्यांचा अभ्यास करण्यावर मर्यादा पडल्या आहेत. श्रम, वेळ, पैसा यांच्या मर्यादा असल्यामुळे इतर जिल्ह्यातील कातकरी समाज जीवनाचे पैलू प्रत्यक्ष अभ्यासता आली नाहीत. कातकरी जमात अशिक्षित असल्यामुळे त्यांच्याकडून काही सामाजिक संकल्पनाचे अर्थ लावताना अनेक अडचणी निर्माण झाल्या. कातकरी लोक सकाळी लवकर घरातून बाहेर पडतात व रात्री उशीरा घरी येतात. त्यातही दारू पिऊन आलेले असतात. त्यामुळे त्यांना भेटण्याच्या वेळेवर व त्यांच्याशी चर्चा करण्यात अनेक अडचणी आल्या. कातकरी जमात भित्री, अबोल व भिडस्थ आहे. त्यामुळे बऱ्याचवेळा त्यांना बोलते करणे कठिण गेले. अनेक ठिकाणी बिगर आदिवासी लोकांकडून गावात कातकरी लोक नाहीत अशी जाणीवपूर्वक दिशाभूल केली गेली. शासकीय पातळीवर कातकरी जमातीची सविस्तर माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती माहिती गोळा करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

अशा प्रकारे पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास करताना अनेक अडचणी व मर्यादांना सामोरे जावे लागले.

## २.१० संशोधन पध्दती :

'पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक अभ्यास' या विषयाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी खालील संशोधन पद्धती अवलंबिण्यात आली आहे.

### २.१०.१ नमुना निवड :

#### अ) तालुक्याची नमुना निवड :

पुणे जिल्हयात एकूण १४ तालुके आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील कातकरी कुटुंबाच्या वास्तव्याचा निकष लावून साध्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने (Simple Random Sampling) १४ तालुक्यांपैकी ८ तालुके संशोधन अभ्यासासाठी नमुना म्हणून निवडण्यात आली. जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, वेल्हे, हवेली, भोर इत्यादी तालुक्यांचा नमुना अभ्यास क्षेत्रात समावेश आहे. हे नमुना अभ्यास क्षेत्र पुणे जिल्हयाच्या पश्चिम भागात केंद्रीत झाले आहे. या क्षेत्रात कातकरी जमातीची कुटुंबे वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले.

#### ब) नमुना गावांची निवड :

पुणे जिल्हयात सन २००१ च्या जनगणनेनुसार एकूण १७३८ गांवे व २३ शहरे आहेत. त्यापैकी ११८४ गावात व २३ शहरात आदिवासी लोकसंख्येचे अस्तित्त्व दिसून आले. आदिवासी वस्ती असलेल्या गांवाचे एकूण गांवाशी ६९ टक्के प्रमाण आहे. एकूण आदिवासी वस्ती असलेल्या गावांपैकी १९२ गावांत कातकरी आदिवासी जमातीचे वास्तव्य आढळून आले. एकूण आदिवासी वस्ती असलेल्या गावांच्या १६ टक्के गांवात कातकरी जमाती रहात असल्याचे आढळून आले. तर कोणत्याही शहरात कातकरी कुटूंबाचे अस्तित्त्व आढळून आले नाही.

नमुना गावांची निवड करण्यासाठी **स्तरीत यादृच्छिक नमुना (Stratified Random Sampling)** निवड पध्दती अवलंबिण्यात आली. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातून कातकरी वस्ती असलेल्या गावांपैकी प्रत्येक ३ रे गांव नमुना म्हणून निवडण्यात आले. एकूण कातकरी वस्ती असलेल्या गावाच्या ३३% म्हणजेच ६४ गावे नमुना अभ्यासक्षेत्र म्हणून निवडण्यात आली.

**क) कुटुंबाची नमुना निवड :**

२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यात एकूण आदिवासी लोकसंख्या २,६१,७२२ एवढी आहे. तर एकूण ५२,३४४ आदिवासी कुटुंबे आहेत. कातकरी जमातीची एकूण लोकसंख्या ११,९३५ एवढी आहे तर एकूण कातकरी कुटुंबे २,३८७ एवढी आहेत. एकूण आदिवासी कुटुंबाशी कातकरी कुटुंबांची टक्केवारी ५ टक्के आहे.

नमुना कुटुंबाची निवड करण्यासाठी **स्तरीत यादृच्छिक नमुना निवड (Stratified Random Sampling)** पध्दती अवलंबिण्यात आली. या पध्दतीनुसार प्रत्येक नमुना गावातून ६ वे कुटुंब या प्रमाणे १६ टक्के कुटुंबे म्हणजेच ३८४ कुटुंबे नमुना म्हणून निवडण्यात आली.

**तक्ता २.१ : नमुना निवड**

| तालुका | गाव संख्या | कुटूंब संख्या |
|---|---|---|
| १. जुन्नर | ०६ | ३६ |
| २. आंबेगांव | ०८ | ४८ |
| ३. खेड | ०९ | ५४ |
| ४. मावळ | ११ | ६६ |
| ५. मुळशी | ०५ | ३० |
| ६. वेल्हे | १२ | ७२ |
| ७. भोर | ११ | ६६ |
| ८. हवेली | ०२ | १२ |
| **एकूण** | **६४** | **३८४** |

**आधार :** जनगणना, २००१

**तक्ता २.२ : तालुकानिहाय नमुना गावे**

| तालुका | नमुना गावे |
|---|---|
| १. जुन्नर | गोळेगांव, पाडळी, ओतूर, मढ, गोद्रे, डिंगारे |
| २. आंबेगांव | पिंपरी, काळेवाडी, पिंपळगांव घोडे, डिंबे, शिनोली, धानमाळ |
| ३. खेड | कुड बु., वाडा, कमान, दरकवाडी, वेताळे, देशमुखवाडी, पटारवाडी, बिबि-बुरसेवाडी, चांडोली |
| ४. मावळ | बेबडहोळ, अडले, शिळीम, कडधे, काळे कॉलनी, कोथुर्णे, मळवली, तुकानापेठ, पुसाणे, करूंज, चढोली |
| ५. मुळशी | उरवडे, आंदगांव, लवारडे, कोळवण, पौड, अंबरबेट |
| ६. वेल्हे | अंबवणे, वडगांव, कातवडी, साखर, मालवली, शिरकोली, निगडे, मोसे, साई व बु., कुरण खु, वाजेघर, ओसाडे, दापोडे |
| ७. भोर | भोर, पसुरे, गोरड म्हसवली, नाटंबी, नाझरे, जांभळी, दिवळे, नेरे, वागजवाडी, नसरापूर, तांभाड |
| ८. हवेली | कोंढणपूर, गोऱ्हे बु. |

**आधार :** जनगणना, २००१

**२.१०.२ तथ्य संकलनाच्या पध्दती व साधने :**

संशोधन हे तथ्य संकलनावर प्रामुख्याने पूर्णपणे अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक संशोधनामध्ये तथ्य संकलनासाठी विविध पध्दतीचा अवलंब केला जातो. या संशोधन विषयासाठी खालील दोन स्रोताद्वारे तथ्य संकलीत करण्यात येतील.

**अ) प्राथमिक स्रोतः**

संशोधन विषयाची तथ्य प्रामुख्याने या स्त्रोतावर अवलंबून आहेत. खालील साधनांद्वारे तथ्य संकलीत करण्यात आली आहेत.

**१) निरिक्षण :** निरिक्षण ही संशोधनासंबंधी अद्ययावत माहिती मिळविण्याच्या दृष्टिने महत्वाचे साधन मानले जाते. कातकरी वस्तीचे प्रत्यक्ष निरिक्षण करून, त्यांच्या सहवासात राहून संशोधनाची तथ्य गोळा करण्यात आली. उदा. त्यांची वेशभूषा, केशभूषा, घराची रचना, राहणीमान, घरातील व परिसरातील स्वच्छता, पाणी, लाईट, शिक्षण व आरोग्य सुविधा, गावापासून कातकरी वस्तीचे अंतर, भातशेतीतील त्यांची शेतमजूरी, मासेमारीच्या पध्दती, विवाह पध्दती, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, इत्यादींचे निरिक्षण करण्यासाठी वेळोवेळी कातकरी वस्तीला भेट देण्यात

आल्या. निरिक्षणात्मक नोंदीची गावनिहाय अनुसूचि बनविण्यात आली. निरिक्षणातून महत्वपूर्ण माहिती मिळविण्यात आली.

**२. अनुसूचीद्वारे मुलाखतीः** सामाजिक संशोधनामध्ये अनुसूची मुलाखत पध्दती अत्यंत महत्वाची मानली जाते. कातकरी जमातीची माहिती जमा करण्यासाठी कातकरी कुटुंब व कुटुंबातील प्रमुख हा घटक आधार घेण्यात आला. अनुसूचीतील प्रश्नाच्या आधारावर कुटुंब प्रमुखाच्या मुलाखती घेण्यात आल्या ती माहिती अनुसुचित नोंदविण्यात आली. अनुसूचीत एकूण ८० ते ८५ प्रश्न समाविष्ट करण्यात आले होते. त्यामध्ये कातकरी लोकांची पोटजात, त्यांचे गांव, त्यांच्या वास्तव्याचा कालावधी, कुटुंबातील सदस्य संख्या, कुटुंबाची शैक्षणिक पातळी, कुटुंबाचा प्रकार, ग्रामपंचायतीतील नोंदी, रेशनकार्ड, मतदार यादीतील नाव, कुलनाम, कुलदैवत, ग्रामदैवत, देवघरातील देव, यात्रा, पारंपारिक नृत्य, सण, व्यसन, दारुला दिले जाणारे महत्व, विवाह पध्दती, रितीरिवाज, बळीप्रथा, दागिने, स्त्रियांचे गोंदण, उत्पन्नाचे मार्ग, मासेमारी, शिकार, व्यवसाय, कर्ज, कामाचा कालावधी, वार्षिक उत्पन्न, शासकीय योजना, स्थलांतरण, यासारखे महत्वाचे प्रश्न अनुसूचीत समाविष्ट करण्यात आले आहेत. त्याद्वारे तथ्य संकलित करण्यात आली.

**३. शासकीय अधिकारी, बिगर शासकीय संस्था, इतर आदिवासी, बिगर आदिवासी लोकांशी चर्चा :** पंचायत समिती, तहसिल कार्यालयातील विविध अधिकारी यांच्याशी चर्चा करुन कातकरी लोकांसाठी राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांची माहिती, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र इत्यादी माहिती मिळविण्यात आली. अंगणवाडी शिक्षक, प्राथमिक माध्यमिक शिक्षक यांच्याशी चर्चा करुन कातकरी मुलांच्या शैक्षणिक स्थिती विषयी माहिती घेण्यात आली. आरोग्य विभागातील डॉक्टर्स, इतर कर्मचारी यांच्याशी चर्चा करुन कातकरी लोकांच्या आरोग्या विषयी माहिती घेण्यात आली. अभ्यास क्षेत्रात महादेव कोळी, मल्हारकोळी, ठाकर, गावित इत्यादी आदिवासी जमाती राहातात. त्यांच्याशी चर्चा करुन कातकरी लोकांविषयीची

मते आजमावण्याचा प्रयत्न केला. जिल्हयातील बिगर आदिवासी लोकांशी चर्चा करुन कातकरी लोकांचे वर्तन, त्यांच्याविषयीची सामाजिक मानसिकता, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, इत्यादी माहिती घेण्यात आली.

**ब) द्वितीय स्रोतः**

संशोधन विषयाच्या माहितीचा मुख्य स्रोत हा सर्वेक्षणावर अवलंबून आहे. परंतु त्या संशोधनाला परिपूर्णता आणण्यासाठी विविध संदर्भ साहित्याचा आधार घ्यावा लागतो यालाच द्वितीय स्रोत असे म्हणतात.

कातकरी जमातीची माहिती घेण्यासाठी वेगवेगळ्या स्रोताचा आधार घेण्यात आला. उदा. विद्यावाचस्पतीचे प्रबंध, लघुशोध प्रबंधिका, शोध निबंध, विविध संशोधन पत्रिका, संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, शासकीय कार्यालयातील माहिती, वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके, स्टेट गॅझेटियर, जनगणना अहवाल, संशोधन संस्थांनी केलेले संशोधन, विविध शासकीय संस्थांनी जमा केलेली माहिती इत्यादी संदर्भ साहित्य द्वितीय स्रोत म्हणून वापरण्यात आले आणि त्यातून आवश्यक माहिती घेण्यात आली.

**२.१०.३ तथ्याचे विश्लेषण, निर्वचन व अहवाल लेखन :**

''पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक, आर्थिक अभ्यास'' या संशोधन विषयाची विविध साधनाच्या सहाय्याने तथ्य संकलीत करण्यात आली. त्यात निरिक्षण, मुलाखती, अनुसूचीद्वारे मुलाखती, विविध शासकीय अधिकारी व तज्ञाशी चर्चा इत्यादी प्राथमिक स्रोताचा समावेश आहे. तसेच द्वितीय स्रोताद्वारे संदर्भीय माहिती मिळविण्यात आली.

त्या तथ्याचे आर्थिक व सामाजिक या दोन भागात विभाजन करुन, गुणात्मक व संख्यात्मक पध्दतीने त्याचे वर्गीकरण करण्यात आले.[२] अनुसूची व निरिक्षणे यांचे

संख्यात्मक सांकेतिकरण करण्यात आले. तसेच तथ्य एक गुणी द्विगुणी सारणीत मांडण्यात आली.[३] वर्णनात्मक पध्दतीने विश्लेषण व निर्वचन करुन निष्कर्ष काढण्यात आले आणि संशोधनाचा अंतिम अहवाल तयार करण्यात आला.

## २.११ संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैद्धांतिक आधार :

### १. दारिद्र्याचे दुष्टचक्र :

दारिद्र्याचे दुष्टचक्र अल्पविकसित देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करणारी अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. आर्थिक विकासातील विभिन्न समस्यांपैकी दारिद्र्य ही एक समस्या आहे. दारिद्र्य हा मानवी जीवनाला लागलेला कलंक आहे. असह्य आर्थिक वेदना मनुष्याला दारिद्र्यामुळे सहन कराव्या लागतात.

अप्रगत देशात काही घटकांचा असा काही संयोग घडून येतो. त्यामुळे विकासाचा वेग मंद होण्याची प्रक्रिया वेगाने वाढते. अशा ठिकाणी संबंधीत घटकांचा चक्रीय संबंध असतो. या विविध घटकांपैकी कोणता घटक मुळ कारण आहे व कोणता परिणाम आहे ते स्पष्टपणे दाखविता येत नाही. पहिल्या घटकांचा परिणाम म्हणजे दुसरा घटक असतो. तर दुसऱ्या घटकांचा परिणाम पुढील घटक असतो म्हणजे पहिल्या घटकाचा परिणाम असणारा दुसरा घटक त्याच्या पुढच्या घटकाचे कारण असतो. शेवटी अखेरच्या घटकाचा पुन्हा पहिल्या घटकावर परिणाम होऊन ही क्रिया अधिक तीव्र होत जाते. या संबंधास दारिद्र्याचे दुष्टचक्र असे म्हणतात. त्याला विषारी चक्र असेही म्हणतात.

## २. दारिद्र्याच्या दुष्टचक्राचे विविध अर्थतज्ञांचे विश्लेषण[४] :

### अ) प्रा. रॅग्नर नर्क्स यांचे विश्लेषण :

रॅग्नर नर्क्स या सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञानी "Problems of capital formation in underdevelopment countries" या ग्रंथात दारिद्र्याच्या दुष्टचक्राच्या संकल्पनेचे विवेचन केले आहे. आर्थिक विकासाच्या समस्येवर विचारमंथन करताना दारिद्र्याच्या दुष्टचक्र या संकल्पनेचा विचार अपरिहार्यपणे करावाच लागतो. कारण दारिद्र्याच्या दुष्टचक्राचा आर्थिकदृष्टया अप्रगत देशांच्या आर्थिक विकासावर अधिक तिव्रतेने परिणाम होतो.

**व्याख्या :**

''दारिद्र्याच्या दुष्टचक्राचा संबंध चक्रीय संबंध असणाऱ्या अशा आर्थिक घटकांशी येतो की जे घटक गरीब देधाला दारिद्र्यातच ठेवतात.''

"It is implies a circular constellation of forces tending to act and react upon one another in such a way ask to keep a poor country in a State of poverty."

नर्क्स यांच्या मते ''चक्रीय संबंध म्हणजे, पहिल्या घटकाचा परिणाम दुसरा घटक असतो तर दुसऱ्या घटकाचा परिणाम पुढील घटकावर होतो. शेवटी अखेरच्या घटकाचा पुन्हा पहिल्या घटकावर परिणाम होऊन चक्र पूर्ण होते.

प्रक्रिया चक्रीस आणि संचयी असते. त्यामुळे दारिद्र्यात दिवसेंदिवस आणखी वाढ होऊन गरीब देश आणखी दरिद्री बनतो. त्यामुळेच नर्क्स म्हणतात, ''देश गरीब असतो कारण तो गरीब असतो.''

"A country is poor because it is poor."

त्यांच्यामते गरीब व्यक्तीला खाण्यासाठी पुरेसे अन्न मिळत नाही. त्यामुळे त्यांचा आहार अपूर्ण राहतो. त्याचा परिणाम प्रकृतीवर व कार्यक्षमतेवर होतो. कार्यक्षमता कमी झाल्यामुळे उत्पन्न कमी मिळते. त्यामुळे पुन्हा उपभोग कमी होऊन

आहार घटतो. अशा प्रकारे दारिद्र्य ही संचयी किंवा वाढत जाणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती बिघडत जाऊन देश दारिद्र्याच्या सापळ्यात सापडतो.

**३. मागणी व पुरवठ्याच्या बाजूने मांडले जाणारे दारिद्र्याच्या दुष्टचक्राचे विश्लेषण :**

**अ) मागणी बाजूने मांडले जाणारे दारिद्र्याचे दुष्टचक्र :**

अल्पउत्पादकतेमुळे अविकसित देशात दारिद्र्याचे दुष्टचक्र सुरू होते. अविकसित देशात शेती व उद्योग मागासलेले असल्यामुळे या क्षेत्रातील उत्पादकता अत्यल्प होते. सेवा क्षेत्राचाही फारसा विकास झालेला नसतो. शेती उद्योग इत्यादी सारखी क्षेत्रे बहुतांश लोकांना रोजगार व उत्पन्न मिळवून देतात. परंतु ही क्षेत्रे मागासलेली असल्यामुळे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न अल्प राहते. त्यामुळे दरडोई उत्पन्नही कमी राहून बाजारपेठेतील उत्पादित वस्तू व सेवेला मागणी कमी राहते. पुरेशा मागणी अभावी उत्पादक उत्पादन कमी करतो. त्यामुळे गुंतवणुकीची प्ररेणा कमी होऊन गुंतवणूक घटते. याचा परिणाम उत्पादकता अल्प राहते आणि देश दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकतो.

**ब) पुरवठ्याच्या बाजूने मांडले जाणारे दारिद्र्याचे दुष्टचक्र :**

अल्प विकसित देशात अल्प उत्पादकतेमुळे शेती उद्योग इत्यादी क्षेत्रातून खूपच कमी उत्पादन निघते. त्यामुळे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न कमी होत. दरडोई उत्पन्नही कमी राहते. त्याचा परिणाम बचत करण्याच्या इच्छेवर होतो आणि बचत घटते. त्याचा भांडवल संचय घटण्यावर परिणाम होतो. त्यामुळे गुंतवणूक कमी, उत्पादन कमी म्हणून अल्प पुरवठा म्हणून अल्प उत्पादकता असे दारिद्र्याचे दुष्टचक्र निर्माण होते.

नर्क्स यांच्या मते, ''अल्प विकसित देशात अल्प उत्पादकतेतून दुष्टचक्रे निर्माण होतात''.

''दारिद्र्यातून दारिद्र्याकडे जाणारे दुष्टचक्र तयार होत.''

अल्प उत्पादकता आणि त्याचा परिणाम म्हणून वास्तव उत्पादनाची पातळी कमी हे दोन घटक दोन्ही प्रकारच्या चक्रामध्ये दिसून येतात.

**क) जॉन कॅनेथ गॅलब्रथ:**

गॅलब्रथ यांनी दारिद्र्याचे दुष्टचक्र कोणत्या कारणामुळे निर्माण होते याचे सखोल विवेचन व कारणमिमांसा देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांच्या मते दारिद्र्य असणाऱ्या देशामध्ये काही नैसर्गिक घटक तर काही मानव निर्मित घटक यामुळे दारिद्र्याचे सातत्य टिकून राहते. लोकांचे अज्ञान, लोकसंख्येचे मोठे प्रमाण भांडवल टंचाई, शिक्षणाचा अभाव, लोकांचा विकास प्रक्रियेला प्रतिसाद न मिळणे, आर्थिक शोषण, योग्य शासकीय धोरणाचा अभाव, दरिद्री समाजाला त्याच अवस्थेत राहाणेस आवडणे, इत्यादी कारणे दारिद्र्याचे दुष्टचक्र निर्माण होण्यास कारणीभूत ठरतात असे गॅलब्रथ यांनी विवेचन केले आहे.

**ड) मायर आणि बाल्डविन :**

मायर आणि बाल्डविन यांनी दारिद्र्याचे दुष्टचक्राचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये साधन सामग्रीचा अभाव व ती अल्पविकसित स्वरुपात असणे हे दारिद्र्याचे मुख्य कारण आहे. त्यांच्या मते ''अल्पविकसित स्वरुपाची साधने ही दारिद्र्याचे कारण व परिणाम हे दोन्हीही असतात. प्रा. नर्क्स यांच्यापेक्षा दारिद्र्याचा वेगळा अर्थ सांगण्याचा प्रयत्न मायर व बाल्डविन यांनी केला आहे.

त्यांच्या मते ''अल्पविकसित नैसर्गिक साधने, अल्प उत्पादकता, अल्प उत्पन्न, अल्प मागणी, अल्प बचत, अल्प भांडवल निर्मिती, अल्प उत्पादन आणि त्याचा परिणाम अल्प नैसर्गिक साधने असे दुष्टचक्र निर्माण होते.''

## ४. दारिद्र्याचे दुष्टचक्राची वैशिष्टये[५] :

- दारिद्र्याचे कारण व परिणाम स्वतः दारिद्र्य आहे.
- दारिद्र्य आपल्या मुळ बिंदूपासून अंतिम बिंदूपर्यंत वर्तुळाकार पध्दतीने क्रिया प्रतिक्रिया करीत वाढत जाते.
- दारिद्र्य हे अव्याहत चालणारी प्रक्रिया असून ती त्याच्या संबंधीत घटकांना खाली ढकलते.
- दारिद्र्याच्या दुष्टचक्राचा प्रभाव संचयी स्वरुपाचा असतो.
- दारिद्र्याच्या दुष्टचक्राची सुरुवात एका नकारात्मक घटकामुळे होते आणि हा घटक पुढील नकारात्मक घटकाचे कारण व परिणाम असतो.
- दारिद्र्य हे दारिद्र्यातून बाहेर पडण्याची प्रेरणा नष्ट करते.

## ५. दारिद्र्याचे दुष्ट चक्र आणि कातकरी समाज:

''पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक, आर्थिक अभ्यास'' या संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार म्हणून दारिद्र्याचे दुष्टचक्र ही संकल्पना संयुक्तिक ठरते.

अल्पविकसित देशाचा आर्थिक विकास जसा दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकतो तशी कातकरी जमात दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकली आहे. म्हणजेच या जमातीच्या आर्थिक, सामाजिक विकासाला त्यांचे दारिद्र्यच कारणीभूत ठरलेले आहे. त्यांचे दारिद्र्य त्यांना दारिद्र्यात ठेवण्यात कारण व परिणाम ठरते. सामाजिक आर्थिक घटक त्यांना दारिद्र्यात ठेवण्यास कारण व परिणाम ठरतात. प्रत्येक घटक एक दुष्टचक्र तयार करतो. त्याच्या संबंधामुळे दारिद्र्याचे दुष्टचक्र तयार होते. आणि या जमातीचा आर्थिक, सामाजिक विकास खुंटतो. ही वास्तवता या संकल्पनेच्या

माध्यमाने पुढें आली आहे. कातकरी जमातीच्या सामाजिक – आर्थिक विकासात अनेक दुष्टचक्रे अडथळे ठरली आहेत. ती चक्रे पुढीलप्रमाणे आहेत.

- **व्यसनाधिनता :** कातकरी जमातीत जन्मापासून मृत्युपर्यंत आणि स्त्री–पुरुषांपासून ते मुलांपर्यंत दारुचे व्यसन प्रचंड प्रमाणात असल्याचे अभ्यास क्षेत्रात आढळून आले आहे. व्यसनाधिनतेमुळे अनेक दारिद्रयाची दुष्टचक्रे निर्माण होतात.

**अ)** व्यसनाधिनतेमुळे प्रचंड प्रमाणात उत्पन्नाचा भाग व्यसनावर खर्च होतो. त्यामुळे उपभोगासाठी उत्पन्न कमी पडून उपभोग घटतो. याचा परिणाम कार्यक्षमता घटण्यावर होतो. त्यामुळे उत्पन्न कमी मिळते. म्हणून कुटुंबात आर्थिक ताणतणाव निर्माण होतो. तो ताणतणाव कमी करण्यासाठी पुन्हा व्यसनात वाढ होते आणि कातकरी कुटुंबाचा आर्थिक विकास दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकतो.

**ब)** जेव्हा कातरी कुटुंबात स्त्री–पुरुषांपासून मुलांपर्यंत व्यसनाधिनता वाढते तेव्हा विषारी दारुमुळे कुटुंबाचे आरोग्य धोक्यात येते. शारीरिक तक्रारी वाढतात. त्यापासून दूर जाण्याकरिता पुन्हा दारुचा आधार घेतला जातो. त्यातून व्यसनाधिनता वाढते आणिआर्थिक विकास खुंटला जातो.

- **निर्धनता :** कातकरी कुटुंबातील निर्धनतेमुळे कर्जबाजारीपणा वाढतो. त्याची परतफेड करावी लागत असल्यामुळे निम्न स्तराचे जीवन जगावे लागते. त्यामुळे कार्यक्षमता कमी होते. त्याचा परिणाम कुशलता कमी, उत्पादकता कमी, मोबदला कमी म्हणून निर्धनता असे दारिद्रयाचे दुष्टचक्र पुर्ण होते.

- **कुटुंबाचा आकार :** अभ्यास क्षेत्रातील कातकरी जमातीतील कुटुंबाचा आकार मोठा असल्याचे दिसून आले. कुटुंबातील सर्व सदस्य काम करतात. परंतु काही सदस्यांची सिमांत उत्पादकता शुन्य असते. त्यामुळे त्यांचा भार कुटुंबावर पडतो. मिळणारे उत्पन्न उपभोगासाठी कमी पडते. त्यामुळे उपभोग कमी होऊन उपासमार

वाढते. त्याचा परिणाम लोकसंख्या वाढण्यावर होतो आणि पुन्हा कुटुंबाचा आकार वाढत जातो आणि कुटुंब दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकते.

- **शिक्षणाचे प्रमाण कमी :** पुणे जिल्ह्यातील नमुना कातकरी कुटुंबात शिक्षणाची पातळी अतिशय कमी असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. त्यामुळे निरक्षरता अधिक म्हणून सर्वच बाबतीत अज्ञान असते. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी कातकरी कुटुंबाचे शोषण होते. त्याचा परिणाम उत्पन्नरुपी मोबदला कमी मिळतो. त्यामुळे कुटुंबात आर्थिक प्रश्न निर्माण होतो. म्हणून शिक्षणापेक्षा आर्थिक प्रश्न सोडविण्याकडे लक्ष केंद्रीत केले जाते. त्यामुळे पुन्हा शिक्षणाची पातळी घटल्यावर त्याचा परिणाम म्हणून दारिद्र्याचे दुष्टचक्र निर्माण होते.

अशाप्रकारे दारिद्र्याचे दुष्टचक्र आणि कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक यांचा संबंध जवळचा आहे म्हणून ही संकल्पना संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैद्धांतिक आधार मानला आहे.

## २.१२ प्रकरण मांडणी :

**प्रकरण पहिले :** ''प्रस्तावना'' या प्रकरणात संशोधन विषयाची पार्श्वभूमी संबंधीच्या विविध बाबींचे विवेचन समाविष्ट करण्यात आले आहे. आदिवासीचा अर्थ व व्याख्या, आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये, आदिवासींच्या आर्थिक क्रिया, आदिवासी संस्थांमधील आर्थिक व्यवहार, आदिवासी स्त्रियांचा आर्थिक–सामाजिक दर्जा, आदिवासींची हस्तकला आणि कलात्मकता, आदिवासींची आरोग्यविषयक स्थिती, जगातील आदिवासींचे प्रदेश, वितरण व प्रमुख आदिवासी जमाती, भारतातील आदिवासींचे भौगोलिक वितरण, प्रमुख आदिवासी जमाती, अतिमागास जमाती समुह, भारतातील आदिवासी लोकसंख्या, भारतातील आदिवासी विरोधी ब्रिटीश

साम्राज्यवादी धोरण, भारतातील आदिवासी विकासाची वाटचाल इत्यादींवर प्रकाश टाकला आहे.

तसेच महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे भौगोलिक वितरण, जिल्हानिहाय आदिवासींचे वितरण, जिल्हानिहाय प्रमुख आदिवासी जमाती, चार दशकातील आदिवासी लोकसंख्या, आदिवासी स्त्री–पुरूष निहाय लोकसंख्येचे वर्गीकरण, आदिवासी लोकसंख्येचे जिल्हानिहाय वितरण, अतिमागास आदिम जमाती व त्यांचा साक्षरता दर, महाराष्ट्रातील इतर अतिमागास जमाती, महाराष्ट्रातील आदिवासी विकास याजेना, कातकरी आदिवासी : एक दृष्टीक्षेप, सारांश, संदर्भ सूची इत्यादी बाबींचा समावेश या प्रकरणात करण्यात आलेला आहे. संशोधन विषयाची सत्यता आणि सामाजिक उपयोगीता या प्रकरणावरून ठरण्यास मदत झाली आहे.

**प्रकरण दुसरे :** ''संशोधन आराखडा आणि पद्धती'' या प्रकरणात विषयाच्या संशोधन पद्धती व आराखडा यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. संशोधन विषयाचा आराखडा, विषयाची निवड, कथन, संदर्भ, कालखंड, विषयाचे महत्त्व, उद्दिष्टये, गृहिते, मर्यादा, संशोधन पद्धतीत नमुना निवड, तथ्य संकलन पद्धती व साधने, तथ्याचे विश्लेषण व विवेचन आणि संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैद्धांतिक आधार, प्रकरण मांडणी, सारांश व संदर्भ सूची याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण तिसरे :** ''संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन'' या प्रकरणात संशोधन विषयाची संबंधीत संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आले. इतर संदर्भ साहित्यावरून संशोधन विषयाचे महत्त्व आजमावण्याच्या दृष्टीने हे प्रकरण महत्त्वाचे आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, विद्यावाचस्पती व विद्यानिष्णात पदवीसाठी सादर केलेले प्रबंध, शासकीय व खासगी संशोधन अहवाल, विविध संशोधन पत्रिकातील

शोधनिबंध, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख इत्यादिंचा परामर्श घेण्यात आला आहे. शेवटी सारांश आणि संदर्भ सूची देण्यात आली आहे.

**प्रकरण चौथे :** ''पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्र : एक दृष्टीक्षेप''. प्रस्तुत प्रकरणात अभ्यास क्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्याची पार्श्वभूमी यावर प्रकाश टाकला आहे. पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, प्राकृतिक रचना, नद्या व धरणे, हवामान, पर्जन्यमान, वनक्षेत्र व वन उत्पादने, मत्स्य व्यवसाय इ. भौगोलिक स्थितीचा परामर्श घेतला आहे.

तसेच पुणे जिल्ह्यातील लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, अनुसचीत जाती जमातीची लोकसंख्या, कर्ती लोकसंख्या, स्त्री पुरूष प्रमाण, साक्षरता, इ. लोकसंख्या घटकांचा आढावा घेतला आहे. प्रशासकीय विभाग, वाहतूक, दळणवळण सुविधा, बँका, कृषि बाजारपेठ, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, वीज, शिक्षण, पाणी पुरवठा, निवासी घरे व कुटुंबे, जमीनीच्या धारण क्षेत्राची रचना, पिकाचे स्वरूप, उद्योग व्यापार, आणि पुणे जिल्ह्यातील आदिवासी आणि कातकरी इ. बाबींचा आढावा घेण्यात आला आहे. शेवटी सारांश व संदर्भ सूचि देण्यात आली आहे.

**प्रकरण पाचवे :** ''अभ्यास माहितीचे विश्लेषण'' या प्रकरणात संशोधन विषयाच्या मुख्य माहितीचे शास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. या माहितीचे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे. कातकरी जमातीच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाची वास्तविक स्थिती, कुटुंब व्यवस्था, विवाह स्थिती, शैक्षणिक स्थिती, आरोग्य स्थिती, सामाजिक व प्रशासकीय दुरावा आणि कातकरी इ. सामाजिक घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

दुसऱ्या भागात कातकरी जमातीच्या स्थितीचा आढावा घेतला आहे. आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत, वार्षिक उत्पन्न पातळी, आर्थिक व्यवहार, स्थावर मालमत्ता, व्यावसायिक स्थिती, मत्स्य उत्पादनाची बाजारपेठ, शासकीय योजनांचे लाभ, आदिवासी सहकारी संस्था, श्रमाचा मोबदला, रोजगार उपलब्धतेचा कालावधी, कामासाठी स्थलांतर, राहणीमान पातळी, मुलभूत सेवा सुविधांची उपलब्धता, व्यसनाधिनतेचा आर्थिक स्थितीवरील परिणाम, गाव कारभारातील कातकरी लोकांचा सहभाग आणि पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या समस्या इ. आर्थिक घटाकांचे विवेचन करण्यात आले आहे. शेवटी सारांश देण्यात आला आहे.

**प्रकरण सहावे :** ''निष्कर्ष व शिफारशी'' या प्रकरणात संशोधन विषयाचा अन्वयार्थ लावून अंतिम निष्कर्षाचा आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक व आर्थिक निष्कर्ष अशा दोन भागात परामर्श घेतला आहे. शेवटी निष्कर्षाच्या आधारावर शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याचेही सामाजिक शिफारशी व आर्थिक शिफारशी अशा दोन भागात विवेचन केले आहे आणि अंतिमत: सारांश मांडण्यात आला आहे.

सर्व प्रकरणाच्या शेवटी परिशिष्ट आणि संदर्भ यादी जोडण्यात आली आहे.

## २.१३ सारांश :

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठीचा संशोधन आराखडा आणि पद्धती याचा आढावा घेण्यात आला आहे. संशोधनाचा आराखडा, विषयाची निवड, कथन, संदर्भ कालखंड, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, गृहिते, मर्यादा इत्यादिचा परामर्श घेण्यात आला आहे. तसेच संशोधन पद्धतीत तालुका, गाव, कुटूंब यांच्या आधारावर नमुना निवड करण्यात आली आहे. तथ्य

संकलनाच्या साधनांमध्ये प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा समावेश केला आहे. तथ्याचे विश्लेषण व निर्वचनाचे विवेचन करून संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैद्धांतिक आधार म्हणून दारिद्र्याच्या दुष्टचक्र संकल्पनेचा संबंध कातकरी जमातीच्या सामाजिक–आर्थिक स्थितीशी जोडण्यात आला आहे. शेवटी प्रकरण मांडणी, सारांश व संदर्भ सूची देण्यात आली आहे. हे प्रकरण शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

---

**संदर्भ सूची**

[1] Kothari C. R., "Research Methodology Methods and Techniques", New Age International Publishers, New Delhi, 2004 (Second Revised Edition) pp. 61-62.

[२] *आगलावे प्रदीप, ''संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र'', विद्या प्रकाशन, नागपूर, २०००, पान १८१–१८६, ३७२–३७९, ३८२–३८३*

[३] *घाटोळे रा. ना., ''समाजशास्त्रीय संशोधन – तत्त्वे व पद्धती'', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, २००० (सातवी आवृत्ती), पान ५९–६०.*

[4] Jhingan M. L., "The Economics of Development and Planning", Vrinda Publications (P.) Ltd., New Delhi, 38th Edition 2005, pp. 31-32.

[५] *कदम डी. एस., दातीर आर. के., सानप के. आर., चिंतामणी आर. एम., ''विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र'', निराली प्रकाशन, पुणे, २००४, पान २२–२४.*

### प्रकरण तिसरे

# संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन


३.१ संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन

३.२ सारांश

संदर्भ सूची

### प्रकरण तिसरे

# संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन

## ३.१ संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन :

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक–आर्थिक स्थितीचा संशोधनात्मक अभ्यास करीत असताना कातकरी आदिवासी जमातीशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधीत असणाऱ्या संदर्भ साहित्याचा आढावा घेणे गरजेचे आहे. मुळात आदिवासी जीवनाशी संबंधीत साहित्य दुर्मिळ आहे. कातकरी सारख्या आदिम जमातीच्या सामाजिक–आर्थिक स्थितीचा आढावा घेणे, आदिवासी जीवनाच्या विविध अंगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

संदर्भ साहित्याचे अवलोकन संशोधन विषयाच्या परिपूर्णतिच्या व सामाजिक उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टिने अत्यावश्यक आहे. म्हणून आदिवासी आणि कातकरी जमात यांच्यावरील संदर्भ साहित्य, विविध ग्रंथ, प्रबंध, मासिके, नियतकालीके, संशोधन अहवाल, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे, इत्यादींचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे. त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

- **वॅट जॉर्ज (१८९४)** यांनी, *''द डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक प्रॉडक्टस ऑफ इंडिया''* या संपादित केलेल्या आठ खंडात भारतातील व्यापारी उपयोगाच्या पदार्थाची माहिती दिली आहे. या माहिती कोषात ब्रिटीश काळात तयार होणाऱ्या वस्तू व पदार्थांची सविस्तर माहिती विश्लेषित केली आहे.

पहिल्या खंडात खैर झाडाविषयी आणि ब्रिटीश काळातील काताच्या व्यापाराबद्दल माहिती तपशीलवार दिली आहे. जंगलात कातकरी, खैराचे झाड तोडताना पुजा करीत, काताचे प्रकार व काताची रासायनिक प्रक्रिया, भारतातून

१८८३-८४ साली विभिन्न भागातून कात निर्माण होत होता या संबंधीची माहिती तपशिलवार दिली आहे''.[१]

कात बनविण्यापासून ते निर्यात व्यापारापर्यंत निरिक्षणे नोंदविली आहेत. कातकरी जमातीच्या पारंपारिक व्यवसाया संबंधीचा हा ग्रंथ पुरावा आहे. वॅट यांनी कातकरी कात बनविण्यापासून ते काताच्या निर्यात व्यापारापर्यंतची माहिती दिली आहे. यावरुन कात हा ब्रिटीश काळात निर्यात उद्योग होता व निर्यात वस्तूचे उत्पादन करणारी ही कातकरी जमात होती याकडे लक्ष वेधले आहे.

खैराच्या झाडापासून कात बनविला जात असे. परंतू काळाच्या ओघात कातकऱ्याचा हा व्यवसाय बंद पडला आणि उदरनिर्वाहाचे साधन म्हणून कातकरी जमात व्यावसायिक स्थलांतर करीत गेली. आजही भारतात कात बनतो. परंतू कात आणि कातकरी यांचा संबंध राहिला नाही असे दिसते.

ब्रिटीश काळात वॅट सारख्या विदेशी माणसाने कातकरी आणि त्यांच्या कात बनविण्याच्या पारंपारिक व्यवसाया संबंधीची निरिक्षणे नोंदविणे हे महत्वाचे आहे.

- **पगडी सेतू माधवराव (१९४९)** यांनी, *''अमंग द गोंड्स ऑफ आदिलाबाद''* या ग्रंथात परधान, कोलाम आणि गोंड या आदिवासी जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक स्थितीचा आढावा घेतला आहे.

''आदिवासींच्या समाज व्यवस्थेत सामाजिक व सांस्कृतिक बाबींना अनन्य साधारण महत्व असते. त्यांची वेगळी संस्कृती हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट आहे. शेकडो वर्षापासून ही संस्कृती त्यांनी जतन केली आहे''[२] असे नमूद केले आहे. परंतू सांस्कृतिक व सामाजिक बाबीच्या संवर्धनाबरोबर त्यांचा विकासही झाला पाहिजे याकडे मात्र लेखकाने दुर्लक्ष केले आहे.

• **नारगोलकर कुसुम व नारगोलकर वसंत (१९५५)** यांनी, *''जंगलचे राजे''* या ग्रंथात ''वारल्याला एखादी ताडीची बाटली पाजल्यानंतर त्याच्याकडून उपाशीपोटी दिवसभर काम करुन घेता येते. कामासाठी बक्षीस म्हणून ताडी किंवा माडी व थोडे पैसे देणे याला पेणी देणे असे म्हणतात''.[३]

वारल्या सारख्या अनेक आदिवासी जमाती व्यवसनाधिनतेच्या आहारी गेलेल्या आहेत. केवळ ते व्यसनासाठी जगतात. व्यसनासाठी या जमाती लाचारी स्विकारतात. गुलामगिरीचे जीवन जगताना दिसतात. याचे विश्लेषण नारगोलकरांनी केले आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ताडी, माडी बक्षीस म्हणून देण्यामागे त्या आदिवासीचे शोषण दडलेले असते. जेव्हा तो दारु किंवा ताडी पितो तेव्हा नशेत तो गुराढोराप्रमाणे काम करतो. तेथे त्याचे शारीरिक शोषण होते. दुसरीकडे कमी मोबदल्यात जास्त काम करुन घेतले जाते. म्हणजे त्याचे आर्थिक शोषण होते आणि निकृष्ट प्रतीच्या नशीली पदार्थामुळे त्याचे आरोग्य धोक्यात येते.

दारु व ताडी देऊन मालक मजूरीचा हिशोब सोयीस्करपणे टाळीत असतो. म्हणजेच त्यांची फसवणूक करतो हे वास्तव मांडण्याचा योग्य प्रयत्न केला आहे.

• **नेस्तूर्ख एम. (१९५९)** यांनी, *''द ओरिजीन ऑफ मॅन''* या ग्रंथात मानवाच्या उत्पत्ती संबंधीचे विश्लेषण दिले आहे. डार्वीन पूर्वीचे मानवशास्त्र, डार्वीनची प्राण्याच्या राज्यावरील उत्क्रांती, मानव अनुवंशीकता या संबंधातील टिकात्मक सिध्दांत, मानवी शरीरातील विविधता, मानवी मेंदू, मानवशास्त्र आणि आदिमानव व आधुनिक मानव यांची मानववंश व जीवशास्त्रीय दृष्टीकोनातून मांडणी या ग्रंथात केली आहे.[४] आज मानवी उत्क्रांती पासून दुर्लक्षित राहिलेला टप्पा म्हणजे आदिवासी होत.

- **कुलकर्णी सु. बा. (१९६६)** यांनी, पुणे विद्यापीठ पत्रिकेत *''कातकरी लोक व त्यांच्या भाषेतील पशुपक्षीवाचक शब्द''* या शिर्षकाखाली संशोधन लेख प्रसिध्द केला होता. त्यात कातकरी भाषा ही मराठीची बोलीभाषा नसून ती भिल्लवर्गीय बोली भाषा आहे आणि कातकरी हे भिल्लवर्गीय असावेत व एकेकाळी भिल्लांच्या सहवासात राहणाऱ्या परंतू नंतर स्थलांतरीत झालेल्या टोळ्यांपैकी एक असावेत असा निष्कर्ष काढला आहे.[५]

कातकरी ही बोलीभाषा आहे. त्यातील अनेक शब्द भिल्लभाषेशी जुळतात व ते शब्द संस्कृत शब्दाशी जुळतात आणि भिल्लभाषा ही संस्कृत प्रवर्गात मोडणारी आहे. त्यामुळे कातकरी व भिल्ल यांचा जवळचा संबंध आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

- **मांडवकर भाऊ (१९६६)** यांनी, *''कोलाम''* या संशोधनपर ग्रंथात कोलाम जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

''कोलाम दगड फोडणे, डिंक, कंदमुळे गोळा करणे, मोलमजुरी, शिकार करणे इत्यादी व्यवसाय करणारी आदिम जमात आहे. महाराष्ट्रातील आदिम जमात समूहांपैकी एक जमात आहे. ही जमात गोंडवण प्रदेशात आढळून येते. आर्थिक, सामाजिकदृष्टया मागासलेली आहे''.[६]

कोलाम ही जमात आदिम असल्यामुळे ती प्राथमिक अवस्थेतील जीवन जगताना दिसते. अशा अनेक आदिवासी जमाती आजही खालच्या पातळीचे जीवन जगत आहेत. त्यांच्या प्रश्नांची उकल होऊन विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

- **मांडवकर भाऊ (१९६६)** यांनी, *''आदिम''* या ग्रंथात कोरकू या आदिवासी जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

कोरकू ही भारतातील द्रविडीयन जमातीत समाविष्ट होते. कोरकू जमातीत एकाच कुळात लग्ने होत नाहीत. बहुपत्नी विवाह प्रचलित आहे. पण ते प्रमाण फार कमी आहे. घटस्फोट घेता येतो. त्यासाठी जात पंचायत बोलवावी लागते.

मुठवा या देवतेची ते पुजा करतात. चंद्र व सुर्याला देखील कोरकू देव मानतात. वैशाख अमावस्येला कोरकू लोक भवई हा सण साजरा करतात. दसऱ्याचा सणही मोठा साजरा केला जातो. नृत्य, गायन, कला संस्कृती या बाबींना कोरकूंच्या जीवनात महत्वाचे स्थान असते.[७]

सर्वच आदिवासी जमातीत सामाजिक, सांस्कृतिक बाबींना महत्त्व असल्याचे दिसते. मेळ घाटातील कोरकू या जमातीच्या सामाजिक बाबींवर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

• **साठे एम. डी. (१९६७)** यांनी, *''इकॉनॉमिक स्टडी ऑफ अ रिजन वीथ स्पेशल टू द कंझम्प्शन पॅटर्न अ ट्रायबल रिजन इन अहमदनगर डिस्ट्रीक्ट महाराष्ट्र स्टेट''* या विषयावर प्रबंध सादर केला. प्रस्तूत प्रबंधात प्रादेशिकता आणि उपभोग पध्दती या अनुषंगाने अहमदनगर जिल्हयातील आदिवासींच्या आर्थिक घटकांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.[८]

प्रदेशानुसार उपभोग पध्दती बदलते, उपलब्ध साधने आणि तेथील अनुकूल स्थिती यानुसार उपभोग पध्दती निश्चित होते त्याला अंतिम परिणाम आदिवासीच्या आर्थिक घटकावर होत असतो ही वास्तवता मांडण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

• **मेहेंदळे य. श्री. (१९६९)** यांनी, *''मानवशास्त्र : सामाजिक व सांस्कृतिक''* या ग्रंथात मानवशास्त्राचे स्वरुप, मानवी उत्क्रांती, सामाजिक संघटना, कुटुंब विवाह, आप्तसंबंध व्यवस्था, कूल व कुलवाद श्रेणी आणि शिष्टाचार, मंडळे आणि शयनागार,

जमात व जात, आर्थिक संघटना, पशुपालन वाहतूक, हस्तव्यवसाय, कायदा आणि न्याय, ज्ञान व विज्ञान इत्यादीवर सविस्तर प्रकाश टाकला आहे.[९]

भारतातील आदिवासी समाज, संस्कृती ही जुनी आहे मुख्य समाजापेक्षा वेगळी आहे. मानवाचा सामाजिक बदल व त्यांच्या सांस्कृतिक घटकांमधील परिवर्तन कसे होत गेले याचे विवेचन समर्पकपणे मेहंदळे यांनी केले आहे.

- **संगवे विलास (१९६९)** यांनी, *''सामाजिक मानवशास्त्र एक सैध्दांतिक अभ्यास''* या ग्रंथात सामाजिक मानवशास्त्राचे स्वरुप, महत्व, उद्देश, सामाजिक मानवशास्त्राच्या विचारांचा इतिहास, कार्य, उपयुक्तता, इत्यादीवर सविस्तर प्रकाश टाकला आहे. तसेच भारतातील सामाजिक मानव शास्त्राच्या अभ्यासाचा इतिहास सविस्तरपणे स्पष्ट केला आहे. [१०]

सामाजिक मानवशास्त्र काळाच्या ओघात बदलत गेले आहे. आज आदिवासी मानव समाजावर प्रचंड संशोधने होत आले आहेत. त्यामुळे सामाजिक मानवशास्त्राचे स्वरुप बदलत गेले आहे. याकडे संगवे यांनी लक्ष वेधले आहे. हा ग्रंथ अभ्यासपूर्ण आहे. उच्च दर्जाच्या संदर्भ साहित्याच्या आधारावर लिहीला गेला आहे. त्यामुळे याची उपयुक्तता अधिक आहे.

- **कुलकर्णी एस. बी. (१९६९)** यांनी, ''डिस्क्रीप्टीव्ह ॲनॅलिसीस ऑफ कातकरी डायलेक्ट'' या विषयावर विद्यावाचस्पती पदवीसाठी प्रबंध सादर केला त्यात कातकरी भाषेचा उगम, भाषा कुटूंबाशी संबंध, कातकरी बोली भाषेतील विविध शब्दाच्या उत्पत्ती, उखाणे, औषधउपचार इत्यादी बाबींचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

कातकरी भाषा ही मराठीची बोली नसून एक भिल्लवर्गीय बोली आहे. ते एकतर भिल्लवंशीय असावेत किंवा एकेकाळी भिल्लाच्या सहवासात राहाणाऱ्या व नंतर

स्थलांतरीत झालेल्या टोळयापैकी एक असावेत[११] असे नमूद केले आहे. शब्दाच्या उत्पत्ती वरून कातकरी बोलीभाषेचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

- **गुरव व्ही. एन. (१९७१)** यांनी, *''द सोशिओ इकॉनॉमिक अपलिफ्टमेंट ऑफ द शेड्युल्ड ट्राईब इन महाराष्ट्रा वीथ रेफरन्स टू कातकरी, वारली अँड कोकणा''* या विषयांवर विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेल्या संशोधनामध्ये कातकरी वारली आणि कोकणा आदिवासी जमातींच्या विकासासंदर्भात अभ्यास केला आहे. वारली आणि कोकणा जमातीच्या तुलनेत कातकरी ही सामाजिक, आर्थिकदृष्टया मागासलेली राहिली असल्याचा निष्कर्ष काढला व त्याची कारणमिमांसा करुन त्यावर उपाय योजना सुचविल्या आहेत.[१२]

हा अभ्यास कातकरी जमातीच्या बाबतीत परीपूर्ण होऊ शकत नाही. अभ्यासात वारली व कोकणा जमातीवर जास्त लक्ष केंद्रीत केले आहे. परंतू कातकरी वारली व कोकणा जमातीसारख्या जमातीवरील हा अभ्यास महत्वाचा ठरतो. १९७० च्या दशकातील कातकरी जमातीची स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **हेवीट जे. एफ. (१९७२)** यांनी, *''रुलींग रेसेस ऑफ प्री-हिस्टॉरिक टाईम्स इन इंडिया''* या ग्रंथात भारतात इतिहास पूर्वकाळात आदिवासींचे राज्यकारभार करणारे वंश होऊन गेले. त्यात प्रामुख्याने गोंड या जमातीच्या राज्य व्यवस्थेच्या बाबीवर सविस्तर प्रकाश टाकला आहे.

*''गोंड ही जमात भारतातील राज्यकारभार राज्यकर्ती होऊन गेली. भिमबलाळ सिंग गोंड नावाचा राजा भारतातील राज्य करीत होता. त्या काळात संपूर्ण भारतावर आदिवासी वंशाच्या राजाचे वर्चस्व होते''.*[१३]

आर्य भारतात येण्यापूर्वी भारतात आदिवासी जमातीचे अनेक वंश विविध प्रदेशात राज्यकारभार करीत होती. या राज्यकर्त्यांचा काळ हा आदिवासी जीवनाचा सुवर्णकाळ होता. ही वास्तवता हेवीट यांनी या ग्रंथात संयुक्तिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

- **गारे गोविंद (१९७२)** यांनी, *''ट्रायबल इन अ अरबन सेटींग अ सोशिओ–इकॉनॉमिक स्टडी ऑफ महादेव कोळी''* या विषयावर सादर केलेल्या प्रबंधात महादेव कोळी आदिवासीच्या सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. काळाच्या ओघात महादेव कोळी जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनात प्रचंड बदल झाल्याचा निष्कर्ष काढला आहे.[१४]

महादेव कोळी ही आदिवासी जमात समाजाच्या मुख्य प्रवाहात सामिल झाली आहे. त्यामुळे रूढी परंपरा अंधश्रध्दा जादूटोना दैवीवृत्ती यातून ही जमात बाहेर पडली आहे. उदर निर्वाहाची आधुनिक साधने स्विकारली आणि आदिवासी जमातीतील सुधारलेली जमात म्हणून ओळखली जात आहे.

- **संगवे विलास (१९७२)** यांनी, *''आदिवसींचे सामाजिक जीवन''* या ग्रंथात उपलब्ध साधन सामुग्रीचा उपयोग करुन जीवनावश्यक गरजा जास्तीत जास्त प्रमाणात भागविण्यासाठी अंगिकाराव्या लागणाऱ्या आदिवासींच्या आर्थिक क्रियाचे समर्पक विश्लेषण केले आहे. आद्य पाषाण युगात खाद्य संकलन, शिकार व मासेमारी या तीन आदिवासींच्या आर्थिक क्रिया होत्या असे म्हटले आहे. तसेच या तीन आर्थिक क्रियेत सहभागी होणाऱ्या आदिमांची वैशिष्टये सांगीतली आहेत.

खाद्यवस्तूंचे संकलन गरजेपुरतेच असते. त्याचे संग्रहण केले जात नाही. आदिम लोकसंख्या एकत्रीत न राहता लहान लहान स्थानिक समूहातून विखुरलेली

असते. खाद्य संकलनासाठी आदिम ऋतूप्रमाणे स्थलांतर करतात. या क्रियेतील आदिवासींची लोकसंख्या कमी असते. भटकी प्रवृत्ती दिसून येते. विभक्त कुटूंब व्यवस्था असते. मंद गतीने परिवर्तन होते.[१५]

आद्यपाषाण युगातील आदिवासींच्या आर्थिक क्रिया आणि त्यात आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होणाऱ्या आदिमांची वैशिष्टये कातकरी आदिमांना लागू होतात. कातकरी लोक कधीही वस्तूंचा संग्रह करीत नाहीत. ते आजचे आज आणि उद्याचे उद्या एवढाच विचार करतात. ही कुटुंबे सतत कामासाठी स्थलांतरीत होतात. त्यांची लोकसंख्या कमी आहे. ती मंद गतीने वाढताना दिसते. कधी स्थिर दिसते, त्यांच्यात भटकी प्रवृत्ती दिसून येते आणि महत्वाचे वैशिष्टय कातकरी जातीतील सामाजिक-आर्थिक परिवर्तन अतिशय मंद गतीने होताना दिसते.

याचा अर्थ असा निघतो की, आद्यपाषाण युगात आदिवासींची जी अवस्था होती त्याच अवस्थेत कातकरी आदिम जीवन जगत आहेत, २१ व्या शतकातही आद्यपाषाण युगातील आदिवासींची वैशिष्टये आढळतात. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे आणि ती कातकरी सारख्या प्राथमिक अवस्थेत जीवन जगणाऱ्या जमातीत दिसतात. त्यामुळे या संदर्भाला अधिक महत्व प्राप्त होते.

- **गारे गोविंद (१९७४)** यांनी, *''सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी''* या ग्रंथात ''महादेव कोळी समाजाची जीवन पध्दती, शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, तसेच आदिवासींच्या संदर्भात शिक्षणाच्या वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करणे आवश्यक आहे'' असे नमूद केले आहे.[१६]

महोदव कोळी समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होताना दिसत आहेत. तसेच विकासाच्या दिशेने वाटचाल करणारी जमात आहे. त्यांची जीवन पध्दती काळाच्या

ओघात बदलत चालली आहे. त्याचे राहणीमान, रुढी, परंपरा दिवसेंदिवस बदलत आहेत.

शेतकरी आणि शेतमजूर असणाऱ्या या आदिवासी जमातीच्या उत्पन्नाचे मार्गही हळूहळू बदलत आहेत. शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या जमातीत महादेव कोळीचा वरचा क्रमांक लागतो.

- **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (१९७७),** कातकरी जमातीच्या आरोग्यासंबंधीचा अहवाल प्रसिध्द केला. त्यात पुढील स्थिती दिसून आली.

कातकऱ्यांमध्ये रक्तपेशींचा अभाव, ॲनिमिया, अनेक प्रकारचे कूपोषण, बालमृत्युचे तीव्र प्रमाण, कुपोषणाने जन्मजात शारिरीक झीज हे प्रमुख विकार आढळून आले. या विकाराचा परिणाम कातकरी लोकसंख्या घटत जाऊन शेवटी ही जमात नामशेष होईल असे या अहवालात म्हटले होते. [१७]

कातकरी जमातीचे आरोग्य निकृष्ट आहे. अनेक विकार वाढत आहेत. निकृष्ट आहार, प्रचंड व्यसनाधिनता, आरोग्य जाणीव जागृतीचा अभाव आणि अल्पवयीन विवाह ही प्रमुख कारणे होत. आरोग्या संबंधीची ही अवस्था जर कायम राहिली किंवा वाढत गेली तर निश्चित मृत्यूदर वाढून या जमातीची लोकसंख्या घटेल आणि ही जमात नामशेष होईल.

- **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे** यांनी **(१९७७),** प्रसिध्द केलेल्या 'द ट्रूथ अबाऊट मालन्यूट्रीशन चाईल्ड डेथ' या अहवालात ठाणे जिल्ह्यात कातकरी पाड्यावरील मुलांच्या कुपोषणाचा अभ्यास करण्यात आला. त्यात ९३% मुले, ६२% पुरुष, आणि १००% स्त्रीया कुपोषित होत्या. [१८]

उदरनिर्वाहाच्या साधनांचा ऱ्हास, अल्प उत्पन्न पातळी, जंगलावरील आधारीत जीवनाचा ऱ्हास, प्रचंड व्यसनाधिनता, किमान जीवनावश्यक गरजा पूर्ण होऊ न शकणे, निकृष्ट आहार, या सर्व बाबी कुपोषणाला कारणीभूत ठरतात. ठाणे जिल्ह्याचा विचार करता तो भाग ना शहरी ना ग्रामीण असा झाला आहे. वन कायद्यामुळे जंगलावरील अर्थव्यवस्था संपली आणि शहरी भागात कातकरी सारख्या आदिम लोकांना रोजगार कोण देणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे कूपोषणाची स्थिती अधिक दिसून आली.

- **संपादक (१९७८), ''मौज''**, या दिवाळी विशेषांकात आदिवासी जमातीतील व्यसनाधिनता यावर प्रकाश टाकला आहे. ''आदिवासी लोकांमध्ये अतिकष्टामुळे ताणतणाव निर्माण होतो. शारिरीक तक्रारी जेंव्हा सुरु होतात तेंव्हा ताजेतवाणे होण्यासाठी दारु पिण्याची गरज निर्माण होते. त्या गरजेचे रुपांतर व्यसनात होते. दारुशिवाय लग्न होत नाही, जातपंचायत दारुशिवाय बसत नाही. अंत्यविधी दारुशिवाय पूर्ण होत नाही व्यसनाधिनता आदिवासींमध्ये वाढल्याचे दिसते''.[१९]

आदिवासीतील व्यसनाधिनता त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोक्याची आहे, ती दिवसेंदिवस वाढत आहे. याकडे या लेखात लक्ष वेधले आहे.

- **घुर्ये जी. एस. (१९७९)** यांनी, ''कास्ट अँड रेस इन इंडिया'' या ग्रंथात कातकरी जमातीचा इतिहास लिखीत नसल्यामुळे त्यांची मौखिक परंपरा महत्वाची आहे. ही परंपरा दिवसेंदिवस संपुष्टात येत चालली आहे. तसेच मौखीक परंपरेवरुन कातकरी आणि भिल्ल यांचा जवळचा संबंध दिसतो असेही म्हटले आहे.[२०]

कातकरी जमातीच्या परंपरेचा इतिहास लिहीला गेला नाही. हे मत समर्पक आहे. कारण आदिवासी देखील शूरवीर जमाती होत्या. परंतु त्यांच्या पराक्रमाचा

इतिहास इतिहासकारांनी लिहीला नाही. येथील सामान्यांचा इतिहास लिहीला गेला नाही ही वास्तवता पुढे आली आहे.

दुसरी गोष्ट मौखीक परंपरे संबंधीचे मत अतिशय वास्तववादी आहे. कारण मौखीक परंपरेत मोठा ठेवा दडलेला आहे. आणि तो संपुष्टात येतोय याचे जतन करण्याचा प्रश्न उभा राहिला आहे.

कातकरी भाषेला लिपी नाही. त्यामुळे त्यांच्या महत्वाच्या सांस्कृतिक बाबी मौखीक परंपरेत दडलेल्या आहेत. त्यांचे शिकारीचे ज्ञान, वन औषधींची माहिती, त्यांचे मासे पकडण्याचे तंत्र, त्यांचे गायन, म्हणी, जगण्यापासून ते मरेपर्यंत मानवी जीवनासंबंधीचे तत्वज्ञान, आधुनिक समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचे समाजशास्त्र, त्यांचे आर्थिक विचार या सर्व बाबी मौखीक परंपरेत समाविष्ट आहेत.

- **गारे गोविंद (१९७९)** यांनी, आदिवासी संशोधन पत्रीकेत आदिवासी विकासात शिक्षणाची नवी दिशा, नवी आव्हाने'' या विषयावर लेख प्रकाशित केला. त्यात ''आदिवासींच्या समस्या सोडवायच्या असतील तर प्रथम त्यांना विश्वासात घेतले पाहिजे. ''आदिवासी विकास जलदगतीने घडवून आणला पाहिजे तो विकासाचा वेग झेपेल का नाही हे आदिवासी पाहून घेतील. आदिवासी ही संग्रहालयातील वस्तू नाही केवळ मानववंशशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आदिवासींना आहे त्या परिस्थितीत ठेवणे हे आदिवासींवर घोर अन्याय करण्यासारखे आहे''[२१] असे नमूद केले आहे.

शिक्षण हा आदिवासींच्या विकासाचा नवा मंत्र आहे. तो त्यांना मिळाला पाहिजे परंतु प्रस्थापित व्यवस्थेला आदिवासी लोकाना शिक्षण देण्यात रस नाही याचे विवेचन या लेखात केले आहे. शिक्षणामुळे आदिवासी समाज दूर राहिल्यामुळे ते मागसलेले आहेत ही वास्तवता आहे हे या लेखात निर्देशित केले आहे.

- **व्यास एन. एन. (१९८०)** यांनी, *''द काथोडिजः ए ट्राईब इन ट्रॅझिशन''* या ग्रंथात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बोहरा कंत्राटदारांनी सुमारे तीनशे कातकरी कुटुंबे राजस्थान मधील उदयपूर जिल्ह्याच्या पश्चिम भागात कात बनविण्यासाठी नेली होती. सुरुवातीला हे लोक हंगाम संपल्यानंतर परत आपल्या गावी जात असत. परंतू नंतर ते राजस्थानात स्थायीक झाले असा उल्लेख केला आहे.[२२]

सध्या राजस्थानात कातकरी काथोडि/कथोडीया या नावाने ओळखले जातात. ते पूर्वीचे महाराष्ट्रातील आहेत. त्यांना बोहरा ठेकेदाराने नेले होते ते तेथेच स्थायीक झाले.

परंतु जंगलाचा ऱ्हास झाला आणि जंगल कायदा आला. त्यामुळे कातकऱ्याचा कात उत्पादनाचा व्यवसाय धोक्यात आला. त्या काळीही कातकरी मजूर म्हणूनच ठेकेदाराकडे काम करीत होते. स्वतः त्यांनी कात उत्पादन करुन निर्यात केल्याचे उल्लेख मात्र आढळत नाहीत. उत्पादनाचे कौशल्य मात्र कातकऱ्याकडे होते ते इतर कोणत्याही आदिवासी जमातींकडे नव्हते हे सिध्द होते.

- **हेमनडार्फ सी. (१९८१)** यांनी, *''द गोंड्स ऑफ आंध्रप्रदेश''* या ग्रंथात गोंड या आदिवासी जमाती विषयीचे सामाजिक आर्थिक विश्लेषण केले आहे.

''गोंड जमात ही द्रविडीयन परिवारातील मुख्य जमात समजली जाते. ही शेतकरी जमात आहे. त्यापैकी बरेच शेतमजूरी करतात. तसेच वनवस्तू संकलनही करतात. तसेच शिकार करण्यात ही जमात तरबेज मानली जाते.''

''मुले-मुली वयात आल्यानंतरच विवाह केले जातात. या जमातीत वधूमूल्याची पध्दत दिसून येते. मुलांच्या जन्मानंतर नामकरण विधी केला जातो. गोंडाचे नृत्य प्रसिध्द आहे. सामाजिक व सांस्कृतिक बाबींना गोंडामध्ये अतिशय महत्व असते''.[२३]

परंतू एकेकाळी राज्यकर्ता असणारी ही जमात आज आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेली बनली आहे. रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यात ही जमात अडकलेली दिसते.

- **लिमये अनुसया (१९८१)** यांनी, आदिवासी पत्रिकेतील *''आदिवासींची संस्कृती आणि शिक्षण''* या संशोधन लेखात आदिवासींची शिक्षणाबाबतची मानसिकता त्यांच्याच बोलीत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते ''अज्ञान आणि दारिद्र्य हे आदिवासींच्या विकासातील मोठे अडथळे आहेत. शिक्षणाने आपण काय साध्य करणार आहोत याचे उत्तर त्यांना न मिळाल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत''.[२४] आदिवासींची शिक्षणाची वास्तव स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणापेक्षा उदरनिर्वाहाचा, जगण्याचा प्रश्न व गरज महत्वाची आहे ही वास्तवता स्पष्ट होते.

- **संपादक** यांनी, २४ मार्च १९८१ रोजीच्या सकाळमध्ये ''खोट्या आदिवासी'' संबंधीच्या बातमीत–

शासकीय निमशासकीय नोकऱ्या प्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रात देखील बनावट प्रमाणपत्रधारकांनी प्रचंड प्रमाणात घुसखोरी केल्याने खरा आदिवासी सवलतीपासून वंचित राहिला आहे.[२५]

या बातमीवरुन बनावट आदिवासींचे प्रमाण खूप मोठे आहे व त्याचे प्रमाण वाढत आहे. आदिवसींच्या केवळ सवलती मिळविण्यासाठी बनावट प्रमाणपत्र काढले जाते. ही वास्तवता दाखवून दिली आहे.

- **गारे गोविंद (१९८०)** यांनी, ''हाकारा'' या संशोधनपत्रीकेतील ''संस्कृतीचे दर्शन घडविणारी आदिवासींची गाणी'' या संशोधनपर लेखात ''आदिवासींच्या जीवनात

नृत्याप्रमाणेच लोकगीताचेही स्थान मोठे आहे. लिखीत वाङ्मयाचा संपूर्ण अभाव असल्यामुळे त्यांची संस्कृतीही त्यांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या त्यांच्या गीतांच्या आणि कल्पनांच्याद्वारेच टिकून राहिलेली आहे. त्यामुळेच त्यांच्या लोकगीतांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्या संस्कृतीचे दर्शन होणे कठीण आहे''[२६] असे स्पष्ट केले आहे.

आदिवासींची संस्कृती महत्वाची आहे, ती त्यांच्या मौखीक परंपरेत दिसून येते. त्यांची गीते आणि कल्पना यात त्यांची संस्कृती दडलेली आहे याचे विश्लेषण संयुक्तिक पध्दतीने केले आहे.

- **उपाध्याय अशोक (१९८२)** यांनी, *''प्रिझेंटीसेशन ऑफ आदिवासीज इन ठाणे डिस्ट्रीक्ट- १८१८ ते १९४७''* या विषयावर संशोधनपर प्रबंध सादर केला. त्यात ठाणे जिल्हयातील वारली, कातकरी, महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या आर्थिक-सामाजिक मागासलेपणाचा संशोधनात्मक अभ्यास केला. उत्पनाची साधने, जंगल कायदे, प्रत्यक्ष त्यांची स्थिती आणि सामाजिक जीवन याचा परामर्श घेतला आहे.[२७]

वास्तविक पाहाता वारली आणि महादेव कोळी यांची उत्पन्नाची साधने स्थिर आहेत. परंतु कातकरी जमातीची उत्पन्नाची साधने मात्र स्थिर नाहीत. त्यामुळे त्या दोन्ही जमातीच्या तुलनेने कातकरी जमातीची सामाजिक आर्थिक स्थिती भिन्न आढळून येते. वारली आणि महादेव कोळी यांनी काळाचा ओघात सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडवून आणले आहे. परंतु कातकरी ही आजही शेवटच्या पायरीवर जीवन जगणारी जमात आहे असे दिसते याकडे दुर्लक्ष झाले आहे.

• **देवगांवकर एस. जी. (१९८२)** यांनी, *"द माडिया ऑफ भामरागड"* या ग्रंथात मागास व दुर्गम प्रदेशातील माडिया गोंड जमातीच्या नैसर्गिक जीवनावर, उध्वस्त प्रपंचावर आणि सामाजिक, सांस्कृतिक बाबींवर प्रकाश टाकला आहे.[२८]

माडिया गोंड ही आदिम जमात समूहापैकी एक जमात आहे. आर्थिकदृष्टया या जमातीची स्थिती बिकट आहे. तसेच सामाजिक मागासलेपण देखील अधिक आहे. आजही प्राथमिक अवस्थेत जीवन जगत आहे.

• **बाबर सरोजिनी (१९८३)** यांनी, *"आदिवासी सण उत्सव"* या ग्रंथात धर्म, सण, उत्सव, नृत्य, गायन, कला इत्यादी घटक आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वाचा भाग आहेत. आदिवासींच्या संस्कृतीतील एक विशेष गोष्ट म्हणजे त्यांची नृत्य व गायनाची आवड जन्मापासून मरेपर्यंत दिसते. नृत्य व गायन या कला आदिवासींनी हजारो वर्षापासून जतन केल्या आहेत. ऋतूनुसार आणि सण उत्सवानुसार नृत्य व गायन केले जाते[२९] यावर प्रकाश टाकला आहे.

आज आदिमांच्या पारंपारकि जीवनामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या असल्या तरी सांस्कृतिक परंपरा ही आदिम जीवनाला दिलासा देणारी आहे आणि त्यांची ती आजही गरज आहे याकडे लक्ष वेधले आहे.

मानवी जीवन सुख आणि दुःख दोन्हींनी भरलेले आहे. थकल्या भागल्या मनाला रमवणारे क्षणभर दिलासा देणारे मनोरंजन करणारे आणि दुःखाचा विसर पाडणारे सांस्कृतिक परंपरेशिवाय आदिम जीवनात नाही दुसरे साधन नाही.

मानवी श्रध्दा जोपासणारे सण उत्सव कला हे घटक आदिम जीवन सफल करतात. मानवी मनाचे मानसशास्त्र सुस्थितीत ठेवण्याचे कार्य सांस्कृतिक परंपरा करते. त्यामुळे सांस्कृतिक परंपरेशिवाय आदिमांचे सामाजिक आर्थिक जीवन सफल होत नाही. ही बाब या ग्रंथातून पुढे येते.

आज ही सांस्कृतिक परंपरा आदिम जीवनातून कमी कमी होत जात आहे. त्याची जागा नवीन मनोरंजनाची साधने घेत आहेत. त्यामुळे आदिमाच्या सांस्कृतिक ठेव्याचे जतन करण्याचा प्रश्न उभा आहे. मात्र आजही डोंगरी दुर्गम भागात कातकरी सारख्या अतिमागास जमातीत सण उत्सवाला अनन्यसाधारण महत्व दिले जाते. गायन व नृत्य यातून मन रमवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सांस्कृतिक जीवनाचा ठेवा जतन करण्याची जबाबदारी आदिवासी व सामाजिक संस्थांनी घेण्याची आवश्यकता आहे.

- **कॅम्पबेल बर्नार्ड (१९८३)** यांनी, *''ह्युमन इकॉलॉजी''* या ग्रंथात ''अन्न संग्राहक आणि शिकार करुन जगणाऱ्या जमातीची वैशिष्टये दिलेली आहेत. ते लहान गटाने राहतात. ही कुटुंबे रक्ताच्या नात्याने जोडलेली असतात. ते सहा कि.मी.च्या परिसरात आपले अन्न गोळा करतात.''

कॅम्पबेल यांनी आदिवासींच्या आर्थिक क्रियामधील अन्न संग्राहक व शिकार या दोन क्रिया दिल्या आहेत. जी जमात ज्या आर्थिक क्रियेत सहभागी होते, त्यानुसार तिची वैशिष्टये ठरतात. अन्न संग्रहण करणाऱ्या व शिकार करणाऱ्या आदिवासी जमाती प्राथमिक जीवन जगतात. गटागटाने या विखुरलेल्या असतात. यामुळे त्यांचे संघटन होत नाही. उदरनिर्वाह हेच त्यांचे अंतिम ध्येय असते.[३०]

या ग्रंथातील वैशिष्टये आज सर्वच जमातीला लागू होत नाहीत. परंतू कातकरी सारख्या अतिमागास जमातींनाच लागू होतात.

कातकरी लोक आजही केवळ उदरनिर्वाहासाठीच जगताना दिसतात. त्यांना संपत्ती संग्रहणाचे, भविष्याचे कांहीही देणे-घेणे दिसत नाही आणि ते गटागटाने वस्त्या करुन रहातात. त्यांची लोकसंख्या देखील मर्यादित आहे. त्यामुळे कॅम्पबेल यांनी सांगितलेली वैशिष्टये कातकरी जमातीच्या वैशिष्टयाशी जुळतात.

• **कारवार जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये (१९८३)** अशी नोंद आहे की, जंगलाची कंत्राटे मुसलमान व लिंगायत व्यापारी घेत असत. कोकणातून कातकरी लोक काम करण्यसासाठी येत. ते यल्लापूर परिसरात रहात होते.[३१]

या अहवालावरुन कातकरी कात बनविण्याचे काम करीत होते. त्या कामासाठी त्याकाळी देखील ते स्थलांतरीत होत होते. तसेच ते कोकणातून कामासाठी येत असत असा उल्लेख दिसतो. त्यावरुन ते कोकणातील म्हणजे रायगडमधील आहेत असा निष्कर्ष निघतो.

• **विनायक तुकाराम (१९८४)** यांनी, *''आदिवासी साहित्यः स्वरुप आणि समिक्षा''* या संशोधनपर ग्रंथात गोंड, माडिया, कोलाम, सातपुड्यातील भिल्ल, कोरकू, वारली यांच्या भाषा साहित्याचे शास्त्रीय विश्लेषण केले आहे.

''मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्यात आजपर्यंत आदिवासी लोकसाहित्यात नगण्य स्थान होते. परंतु काळाच्या ओघात आदिवासी लोक-साहित्य हळूहळू मुळ धरु लागले आहे. आदिवासीचे मौखीक लोकसाहित्य आता लिखित साहित्यात रुपांतरीत होत आहे''.[३२]

उपेक्षित आदिवासींचे मौखिक साहित्य जेव्हा लिखीत साहित्यात रूपांतरीत होते तेव्हा आदिवासींच्या सामाजिक परिवर्तनाची वाटचाल सुरू झाल्याचे स्पष्ट होते. याकडे लेखकाने लक्ष वेधले आहे.

• **पोळ अमृत वासूदेव (१९८५)** यांनी, *''इकॉनॉमिक चेंजेस अमंग ट्रायबल्स''* या विषयावरील संशोधनपर प्रबंधात ठाणे जिल्हयातील डहाणू तालुक्यातील वारली आदिवासी यांच्या आर्थिक उत्पन्नाची साधने वनक्षेत्र आणि वारली, शेतीचे धारण क्षेत्र इत्यादी आर्थिक घटकांचा परामर्श घेतला आहे. वारली जमातीत शेती हे उत्पन्नाचे

मुख्य साधन आहे. काही कुटूंबे वनक्षेत्रात वनकामगार म्हणून काम करतात. धारणक्षेत्र कमी आहे. तसेच नापीक व कमी सुपीक जमीनी वारली आदिवासींकडे असल्यामुळे मिळणारे उत्पन्न कमी असल्याचे दिसून आले. आदिवासी जमात म्हणून वारली जमातीने अनेक नवनवीन बदल स्विकारले आणि त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीत बदल घडून आला असा निष्कर्ष काढला आहे.[३३]

वारली शेती व्यवसाय करणारी जमात असल्यामुळे शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन राहिले आहे. इतर वेळी वारली कुटूंबे वनकामगार म्हणून मजूरी करतात तोही एक उत्पन्नाचा स्त्रोत उभा राहिला. याचा परिणाम वारली जमातीच्या आर्थिक स्थितीत बदल घडून आल्याचे दिसते.

• **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (१९८५)** यांनी, ''आदिवासी लोकगिते'' हे पुस्तक प्रकाशित केले. त्यांत त्यांनी आदिवासींच्या बोली भाषेतील लोकसाहित्याचा आढावा घेतला. त्यात कातकरी लोकगीताचा समावेश आहे. त्या लोकगीतातून त्यांच्या जीवनावरील प्रभाव स्पष्ट होतो.

''निम पाटलाच्या घरी खेळ कशाचा आला
खेळ कशाचा आला दारी नंदू नाचविला
जेई का नुंदूनी बाळ मातीस मल्ली
नेई का मातीचा बाळा गुलाब नोविला.
नेई का गुलाब नेला कुंबार वळीला
कुंबार र दादा याचा कौल बनवून देवा
नेई का कौल माझ्या पाटलाचे माडीवरी
पाटला तुझी माडी, माडी दिस सरकार खाशी

*असा पाटील हौशी खिशात चवल्या घावशी*

*असा पाटील बोला खिशात सोळा बाटल्या''*[३४]

या कातकरी लोक गीतात गावातील पाटलावर आहे. त्याचा अर्थ असा की पाटलाच्या दारात माकडाचा खेळ खेळला. त्यामुळे दारातील माती मळली गेली. त्यात गुलाबपण लावले. कुंभारा या मळलेल्या मातीची कौल बनवून दे कारण ती पाटलाच्या माडीला लावायची आहेत. त्यामुळे पाटलाची माडी सरकारी इमारतीसारखी दिसते. पाटील फार हौशी आहे. त्यांच्या खिशात पैसे खुळखुळतात तसेच दारुच्या बाटल्याही असतात.

पाटलाची माडी सजवण्यात कातकऱ्यांना खुषी वाटते. पाटील हा प्रस्थापित समाजाचा प्रतिनिधी आहे. जो कातकरी लोकांचे शोषण करतो. तो त्यांना काम देतो म्हणजे त्याचे उपकार त्यांच्यावर असतात. म्हणून त्यांच्या विषयीचा आदर व्यक्त केला जातो. सरंजामदार आणि गुलाम, शोषणकर्ता व शोषक यांच्यातील नाते येथे स्पष्ट केले आहे.

- **केदार अभिमन्यू (१९८६)** यांनी, *''अकोले तालुक्यातील महादेव कोळी समाजाचा विकास''* या विषयावर शोध प्रबंध सादर केला. त्यात ''अकोले तालुक्यातील महादेव कोळी जमातीच्या उत्पन्नात, राहणीमान पातळीत, साक्षरतेत वाढ झाल्याचा निष्कर्ष काढला. उत्पन्नाची साधने वाढली आहेत. तसेच आर्थिक स्थिती सुधारली गेल्यामुळे सामाजिक विकास प्रक्रिया सुरु झाल्याचेही दिसून आले. विशेषतः राजकीय बदल मोठ्या प्रमाणात घडून आले आहेत.[३५]

महादेव कोळी जमातीतील सामाजिक आर्थिक परिवर्तन हे काळाच्या ओघातील आदिवासी जमाती कशा बदलत गेल्या याचे उत्तम उदाहरण आहे. आज ही जमात

समाजाच्या मुख्य प्रवाहात सामिल होऊन विकासाच्या दिशेने मार्गक्रमाण करीत आहे. ही वास्तवता या संशोधनात आढळून येत आहे.

• **मसावी, मस्ताली आणि पंड्या गौरीश (१९८७)** यांनी, *''द काथोडीज ऑफ गुजरात ए सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ डेव्हलपमेंट प्लॅन''* या ग्रंथात गुजरात मधील कातकरी जमातीच्या आर्थिक सामाजिक विकास नियोजनासंबंधीचा अभ्यास केलेला आहे.तसेच कातकतरी जमातीची सामाजिक आर्थिक स्थिती चांगली असल्याचा निष्कर्ष काढला आहे''.[३६]

यावरुन इतर कोणत्या राज्यात कातकरी वास्तव्य करतात यांची माहिती मिळते. तसेच त्या त्या राज्यात कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक विकासासंबंधी कोणते प्रयत्न करण्यात आले व त्यात किती सफलता मिळाली याचीही माहिती मिळते.

तसे पाहिले तर कातकरी जमात गुजरातमध्येही काथोडी म्हणून ओळखली जाते. ती गुजरात मधील अतिमागास आदिम समूहात गणली गेली आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात त्यांच्या विकासाचा प्रयत्न झाला आहें. गुजरातमध्ये कातकरी जमातीची लोकसंख्या अधिक आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, दादरानगर हवेंली या राज्यातील देखील कातकरी जमातीच्या आर्थिक विकास नियोजनांची गरज निर्माण झाली आहे.

• **पिंगळे भिमराव (१९९०)** यांनी, *''वनवासी व उपेक्षित जग''* या ग्रंथात ''गावगाडा व गावगाड्याबाहेरील अनेक जाती जमाती समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्या आहेत. त्यामुळे त्यांचा विकास झालेला नाही'' असे म्हटले आहे.[३७]

आदिमांची विवाह पध्दती, धार्मिक विधी, देवदेवता, पुजा–अर्चा, त्यांच्या नीतीकल्पना, पुराणकथा, उपजिविकेची साधने, जातपंचायत इत्यादींचे संवर्धन करण्यावर भर दिला गेला परंतू उपेक्षित लोकांच्या जीवनाचे पुनर्वसन कसे करावे याकडे मात्र दुर्लक्ष केले गेले.

• **कांबळे बी. एन. (१९९०)** यांनी, *''इम्प्लीमेंटेशन ऑफ द सोशिओ इकॉनॉमिक प्रोग्राम्स फॉर द अपलिफ्टमेंट ऑफ द शेड्युल कास्टस् अँड शेड्युल ट्राईब्ज इन इंडिया'' : अ सिलेक्टेड रिव्हीव्ह ऑफ द लिटरेचर''* या विषयावर शोध प्रबंध सादर केला आहे.

प्रस्तुत प्रबंधात भारतातील अनुसुचित जाती व जमातीच्या विकासासाठी सामाजिक आर्थिक कार्यक्रमाची अंमलबजावणी त्यांचा जाती जमातीच्या विकासासाठी फायदा झाला आहे[३८] असा निष्कर्ष काढला आहे.

वास्तविक विकास योजनांच्या लाभाच्या बाबतीत अनुसुचित जातीने अधिक लाभ घेतले आहेत. त्यामुळे त्यांचा विकास वेगाने होताना दिसतो आहे. परंतु अनुसुचित जमातीला विकास योजनांचे लाभ आता मिळू लागले आहेत. याचा अर्थ विकास योजनांच्या जाती जमातीवर सकारात्मक बदल होण्यावर परिणाम झाला आहे. परंतु त्यातील कांही जाती जमातीनी विकास योजनांचे लाभ अधिक प्रमाणात घेतले आहेत याकडे या संशोधनात दुर्लक्ष झाले आहे.

• **आत्रे त्रिं. ना. (१९९०)** यांनी, *''गुन्हेगार जमाती''* या ग्रंथात मुंबई प्रांताचे जनरल इन्स्पेक्टर श्री. एम. केनेडी १९०८ साली कातकरी जमातीच्या गुन्हेगारी बाबतीत टिपणे प्रकाशित केली. कातकऱ्यांना गुन्हेगार जमात म्हणून त्यांच्या चोऱ्यामाऱ्या संबंधी माहिती दिली आहे.[३९]

कातकरी जमातीचा संपत्ती संग्रहणाचा किंवा वस्तू संग्रहणाचा कधीही उद्देश नाही. ही जमात केवळ आजचा आज आणि उद्याचा उद्या एवढा विचार करते. असे असताना या जमातीला गुन्हेगार म्हणून घोषित करणे अयोग्य होते. ज्या जमातीच्या अर्थव्यवस्था जंगलावर आधारित होत्या त्यांचे जंगलावरील वर्चस्व कमी करावयाचे होते आणि ब्रिटीश काळात कात हा निर्यात उद्योग होता. तो ताब्यात घेण्याच्या दृष्टिने कातकरी जमातीला बदनाम करण्याचा ब्रिटीशांनी प्रयत्न केला. अशा अनेक जमातीचा संघर्ष मोडून काढला आणि त्या जमाती संपविण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर देखील येथील समाज व्यवस्थेने कातकरी जमातीवर गुन्हेगारीचा ठसा गडद केला त्यामुळे शेकडो वर्षापासून ही जमात गुन्हेगारी गणली गेली आहे. जी जमात आजही प्राथमिक अवस्थेत जीवन जगताना दिसते. सर्वसामान्य माणसालाही बोलायला घाबरणाऱ्या जमातीला गुन्हेगार म्हणून संबोधणे अयोग्य ठरते.

• **राजवाडे वि. का. (१९९१)** यांनी, *''महिकावतीची बखर''* या ग्रंथात कातकरी शब्दाची उत्पत्ती दिली आहे. ''कृतिपट्टीन'' या संस्कृत शब्दापासून कातकरी शब्द तयार झाल्याचे म्हटले आहे. 'कृति' म्हणजे कातडे आणि पट्टीन म्हणजे कपडे असा त्या शब्दाचा विग्रह केला आहे. म्हणजेच कातड्याचे कपडे पांघरणारा होय. ही जमात मुळची रानटी असावी असेही त्यात म्हटले आहे''.[४०]

वि.का. राजवाडे यांनी कातकरी शब्दाची जी उत्पत्ती दिली आहे. अर्थात ''कृतिपट्टीन'' या शब्दाचा आणि कातकरी शब्दाचा काहीही संबंध नाही. कातडे पांघरणारा हा अर्थ कातकरी जमातीला कोणत्याही बाजूने जुळत नाही. ब्रिटीश काळात कात बनविणारी ही जमात म्हणून कातकरी असे नांव पडले आहे व सर्वज्ञात असताना कातडे पांघरणारे असा अर्थ लावणे असंयुक्तिक आहे.

• **परूळेकर श्रीमती गोदावरी (१९९२)** यांनी, *''जेव्हा माणूस जागा होतो''* या ग्रंथात आदिवासी विकासासाठी डाव्या पक्षाची कामगिरी यावर प्रकाश टाकला आहे.

''आदिवासींच्या आर्थिक समस्या, शोषणाच्या विरोधातील तत्वज्ञान, निरक्षरतेमुळे सरकारी अधिकारी, सावकार, जमीनदार, जंगल कंत्राटदार यांनी आदिवासींचे मोठे शोषण केले आहे. त्यांच्या विरोधात संघर्ष करणे हे डाव्या पक्षाचे ध्येय होते'' या विचारातून आदिवासी समाजाला गतीहीन पारंपारिक जीवनातून मुक्त करण्याचे काम महाराष्ट्रात श्रीमती परुळेकर यांनी केले आहे''.[४१]

आदिवासींच्या असहाय्यतेचा फायदा येथील व्यवस्था घेते आणि त्यांचे शोषण केले जाते. वेठबिगारी पध्दती विरोधात डाव्या पक्षांनी संघर्ष उभा केला. ही डाव्या पक्षाची भूमिका आदिवासी जीवनातील नवा प्रकाश निर्माण करणारी होती. आदिवासींची सामाजिक जागृती घडवून आणणे यात डाव्या पक्षाचे योगदान मोठे आहे.

आदिवासींना नवी दिशा देण्याचे महाराष्ट्रात डाव्या पक्षाने काम केले. आज आदिवासी समाजाच्या संघटनात्मक कार्यात वाढ झाली. अधिकार व हक्काची जाणीव निर्माण झाली, माणूस म्हणून जगण्याची उभारी दिली, आणि पारंपारिक जीवनातून मुक्त करुन नवीन जीवन जगण्याची दिशा दिली हे कार्य श्रीमती परुळेकर आणि इतर डावे नेते यांनी केले ते त्यांचे ध्येय होते.

• **जगबंधू समल (१९९२)** यांनी, पुणे विद्यापीठास *''सम अस्पेक्टस ऑफ ट्रायबल इकॉनॉमी अ केस स्टडी ऑफ कोरापुत डिस्ट्रीक्ट''* या विषयावर सादर केलेल्या प्रबंधात आदिवासी जीवनाची आर्थिक वैशिष्ट्ये, लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये आदिवासी जमातीची प्रादेशिक विस्तार यावर संशोधनात्मक प्रकाश टाकला आहे.[४२]

भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील आदिवासी जमातीच्या आर्थिक क्रिया विचारात घेतल्यावर अन्न संकलन क्रियेपासून शेती करण्याच्या क्रियेपर्यंत सारख्याच क्रिया आढळून येतात. प्रादेशिक विस्तारात वनक्षेत्र असलेल्या प्रदेशात आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झाल्याचे दिसते. ही वास्तवता संशोधकांनी मांडली आहे.

- **जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (१९९३)** यांनी, मराठी विश्वकोषात आदिवासींच्या प्रश्नांचे मुळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते, ''आदिवासींच्या सर्व प्रश्नांचे मुळ आर्थिक प्रश्नाशी आहे. पारंपारिक शेती व्यवसाय, पशुपक्षी पालन, मासेमारी, शिकार, फळे-कंदमुळे खाणे, अन्नसाठी सर्वस्वी निसर्गावर अवलंबून राहणे, इत्यादी त्यांच्या आर्थिक क्रिया होत. आदिवासींच्या उपजिविकेचे मुख्य साधन म्हणजे शेती व जंगल होत. परंतु काळाच्या ओघात उत्पन्नाची साधने संपुष्टात आली आहेत''.[४३]

आदिवासींच्या सर्वच प्रश्नांचे मुळ आर्थिक प्रश्नाशी आहे हे संयुक्तिक आहे. त्यांच्या आर्थिक मागासलेपणामुळे आरोग्य, शिक्षण, शारीरिक, मानसिक, घटकाशी संबंधित प्रश्न निर्माण होतात. त्या सर्व प्रश्नांच्या जाळ्यात आदिवासींचा विकास थांबतो. ही वास्तवता या ग्रंथात समर्पकपणे मांडली आहे. परंतु त्यांच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक कशी करावी यावरील उपाय मात्र सांगितला नाही.

तसेच आदिवासींच्या आर्थिक प्रश्नाचे मुळ त्यांच्या इतर प्रश्नांशी आहे याकडे मात्र दुर्लक्ष केले आहे. कारण आदिवासींच्या सामाजिक बाबीत रुढी परंपरा अंधश्रध्दा याला अधिक महत्व असते. त्यावरील अवास्तव खर्चामुळे त्याचे आर्थिक प्रश्न वाढतात.

- **सुबोध कुमार (१९९३)** यांनी, लोकराज्यातील *''आश्रमशाळा : आदिवासी जीवनाच्या यशोमंदिराची वाटचाल''* या लेखात १९४७ साली मुंबई सरकारने ठाणे

जिल्ह्यातील आदिवासींचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी वांद्रेकर समिती नेमली होती. त्यानुसार शाळा सुरु झाल्या आणि त्यातून आदिवासींमध्ये शिक्षणाचा स्तर उंचावला त्यामुळे आश्रमशाळा आदिवासींच्या दृष्टीने महत्वाच्या ठरल्याचे विवचेन केले आहे.[४४]

आश्रमशाळा आदिवासी मुलांना राहण्या-जेवणापासून सर्व सुविधा पुरवितात. त्यामुळे शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळते आणि त्याचा परिणाम शैक्षणिक पातळी उंचावण्यास मदत होते. ही सत्यता मांडण्याचा प्रयत्न या लेखात झाला आहे परंतू त्याचा फायदा किती लोक घेतात याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे.

- **राजवाडे वि. का. (१९९३)** यांनी, *''भारत इतिहास संशोधन मंडळ ग्रंथलेखमाला''* यामध्ये कातकरी शब्दाची उत्पत्ती'' ''कारस्कार'' या संस्कृत शब्दापासून झाली असे म्हटले आहे. कारस्कार याचा अर्थ विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडून आलेले असे त्यांना म्हणावयाचे होते.[४५]

परंतु कातकरी जमातीचा इतिहास जर पाहिला तर, कातकरी ही मुळची रायगड मधील जमात आहे. ती राजस्थानमध्ये बोहरा ठेकेदाराबरोबर कात बनविण्यासाठी गेली होती. तेथील जंगलाचा ऱ्हास झाल्यानंतर ती पुन्हा रायगडमध्ये आली असे दिसते. ती विंध्य पर्वतीच्या दक्षिणेकडून आली म्हणून 'कारस्कार' आणि कारस्कार म्हणून कातकरी ही उत्पत्ती देखील समर्पक वाटत नाही.

- **रूडॉल्फ सी हेरिडीया व श्रीवास्तवा राहुल (१९९४)** यांनी, *''ट्रायबल आयडेंटीटी अँड मायनॉरिटी स्टेटसः द कातकरी नॉमॅड्स इन ट्रान्सीशन''* या ग्रंथात ''आदिवासींचे मुलभूत प्रश्न, ऐतिहासिक मूल्यमापन, कातकरी ओळख, सामाजिक प्रतिष्ठा व दृष्टीकोन इत्यादी बाबींचे संशोधनात्मक विश्लेषण केले आहे. कातकरी ही

भटकी जमात आहे. कातकऱ्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन पूर्वग्रह दूषित आहे. त्यांना गरीब, दरिद्री, सामाजिक मूल्यहीन, मागासलेला असे ओळखले जाते''.[४६]

कातकरी ही एक भटकी, स्थलांतरीत होणारी जमात म्हणून ओळखली जाते. परंतु त्यापेक्षा भटकंतीच्या कारणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचे मूळ शोधल्यास त्यांची भटकंती थांबू शकते तसे होताना दिसत नाही. स्थानिक पातळीवर बिगर आदिवासी त्यांना जवळ घेत नाहीत. त्यांचा कोणत्याच बाबतीत विचार केला जात नाही. त्यांच्याकडे उत्पन्नाचा कोणताच कायमचा मार्ग नाही. स्थानिक पातळीवर त्यांची कोणतीही मालमत्ता नाही. त्यामुळे त्यांना त्या गावाविषयी आपलेपणा रहात नाही. त्यातून स्थलांतरवृत्ती वाढत गेल्याचे दिसते. म्हणून भटकी जमात ही ओळख चुकीची आहे.

- **कांबळे बी. एन. (१९९५)** यांनी, *''इफेक्टीव्हनेस ऑफ डेव्हलपमेंटल प्रोग्राम फॉर शेड्युल्ड कास्टस ॲंड शेड्युल्ड ट्राईब्ज इन महाराष्ट्रा''* या विषयावर विद्यावाचस्पती पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे.

''अनुसूचित जाती जमाती भारतीय घटनेने मागासलेल्या घोषित केल्या आहेत. त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाकडून विविध विकास योजना राबविल्या जातात. प्रत्यक्षात या योजनाची जाती जमाती वरील परिणामकारकता तपासणे आवश्यक आहे. विकास योजनाचा त्यांच्या आर्थिक सामाजिक स्थितीवर परिणामाचा आढावा घेणे देखील महत्वाचे ठरते. या प्रबंधात ही परिणामकारकता तपासण्याचा प्रयत्न केला आहे''.[४७]

परंतु यामध्ये जातीतील विविध जातीवरील विकास योजनाचा परिणाम तपासणे आवश्यक आहे. तसेच आदिवासीतील मागासलेल्या जमातीपर्यंत या योजनाचा

लाभांचा आढावा घेणे आवश्यक होते. याचवेळी ठराविक जाती जमातीच या योजनाचे लाभ ओढतात. बाकीचे या लाभापासून वंचित राहातात. ही विकास योजनाच्या लाभातील विषम परिणामकारकता म्हणता येईल याकडे दुर्लक्ष झाले आहे.

- **मोकाशी जी. व्ही. (१९९५)** यांनी, प्रसिध्द केलेल्या, ''इम्पैक्ट ऑफ जेनेटिक डिसॉर्डर्स ऑन हेल्थ प्रॉब्लेम्स अमंग्स्ट ट्रायबल पॉप्युलेशन ग्रुप ऑफ महाराष्ट्र'' या अहवालात आदिवासींचे आरोग्यासंबंधीची माहिती विश्लेषित केली आहे. अहवालात महाराष्ट्रातील आदिमांमध्ये धुळे आणि गडचिरोली जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमियाचे प्रमाण सर्वात जास्त आढळते. गडचिरोलीत ओतकार समूहात ३५%, नांदेड यवतमाळमधील परधानमध्ये ३३.७०%, धुळ्यातील पावरा जमातीत २०.१७%, माडिया गोंडमध्ये १८.४७%, भिल्लांमध्ये १८.०८%, वारली समूहात ८.०४%, तर कातकऱ्यांमध्ये ५.९०% इतके प्रमाण होते. महादेव कोळीमध्ये ०.८१% आणि ठाकरांमध्ये हे प्रमाण दिसत नाही.[४८]

  यावरून आदिवासी जमातीत विविध रोगाचे अस्तित्त्व दिसते. भविष्यकाळात याकडे दुर्लक्ष झाल्यास आदिवासी जमाती नामशेष होतील असे वाटते.

- **जैन नविनचंद्र जैन, त्रिभूवन रॉबिन्स (१९९५)** यांनी, *''ॲन ओव्हरव्हिव ऑफ ट्रायबल रिसर्च स्टडीज''* या संपादित ग्रंथात ''आदिवासी कलेतून तयार होणाऱ्या उत्पादनाला देशात आणि विदेशात मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. हस्तकलेच्या वस्तूंना चांगली बाजारपेठ मिळून चांगले उत्पन्न मिळावे यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न करण्यात आले आहेत. विदेशात व देशात प्रदर्शन, हस्तकला मेळे, भरवून आदिवासी कलेतून तयार झालेली उत्पादने प्रसिध्द केली. त्यामुळे आज आदिम

हस्तकलांच्या वस्तूंना प्रचंड प्रमाणात मागणी आली आहे''[४९] असे विश्लेषण केले आहे.

आदिवासी कला व हस्तकला यांचे संवर्धन होणे, त्या कलेतून आदिम समाजात एक कलाकार म्हणून प्रतिष्ठा मिळवून देणे, त्यांच्यातील सुप्त कला गुणांना वाव देणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांना उत्पन्नाचा स्रोत उभा करून देणे. म्हणून आदिम कला व हस्तकलांना वाव देणे आवश्यक आहे.

आदिम कलांचे व्यापारीकरण करताना त्याचा फायदा मध्यस्थ व्यापारी घेतो. म्हणजे मिळणारी चांगली किंमत आदिमापर्यंत पोहचत नाही ही वास्तवता दिसते.

- **संपादक (१९९५),''हाकारा''**, या संशोधनपत्रिकेत आदिवासी आणि दारु या विषयावर संशोधनात्मक लेख प्रकाशित केला आहे.

''आदिवासी जीवनात दारू ही मौल्यवान मानली जाते. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनात दारुला अतिशय महत्व आहे. जन्माला आलेल्या बाळाच्या तोंडात दारुचा थेंब, मृत व्यक्तीला दारुशिवाय मुक्ती नाही म्हणून मृताच्या तोंडात दारुचे थेंब, पाहुण्याचा पाहुणचार दारुशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. एकमेकांची दुःखे वाटण्यासाठी दारु घेतली जाते. अशा विविध कार्यक्रमात दारु ही महत्वाची मानली जाते''.[५०]

पारंपारिक जीवनाच्या नांवावर व्यसनाधिनता प्रचंड प्रमाणात बळावते आहे. त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्या गुंतागुंती, त्यातून ताणतणाव घालविण्यासाठी दारु हा सरळ उपाय बनला आहे.

- **पटनाईक रेणुका (१९९६)** यांनी, *''पॅटर्न ऑफ ऑक्युपेशनल अँड रिसोर्स युटीलायझेशन इन कॉन्ट्रास्टींग इकॉलॉजीकल सेटींग : अ कंपॅरिटिव्ह स्टडी ऑफ*

*कातकरी, कोलाम अँड माडिया गोंड ऑफ महाराष्ट्र''* या प्रबंधात कातकरी कोलाम, माडिया गोंड या अतिमागास आदिम जमातीचा पर्यावरणीय दृष्टीकोनातून तुलनात्मक अभ्यास केला आहे. हा प्रबंध पुणे विद्यापीठास विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केला होता.

प्रस्तुत प्रबंधात कातकरी ही जमात कोलाम आणि माडिया गोंड यांच्या तुलनेत व्यावसायिक दृष्टीकोनातून मागे आहे. कातकरी जमात सतत व्यवसाय बदलत गेली आहे. माडिया व कोलाम यांची व्यावसायिक स्थिती कायम व स्थिर असल्याचा निष्कर्ष काढला आहे.[५१]

वास्तविक पाहता या तिनही जमाती केंद्र सरकारने अतिमागास आदिम जमात समूहात समाविष्ट केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील या एकमेव तीन जमाती आहेत.

या जमाती अभ्यासासाठी निवडणे  हे खूप महत्वाचे आहे. कारण या जमाती काळाच्या ओघात नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्याची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासली तर त्या दुर्लक्षित व वंचित जमाती आहेत. त्यांची पर्यावरणीय दृष्टीने व्यावसायिक स्थिती अभ्यासल्यामुळे अतिमागास जमातीत कातकरी, कोला व माडिया  या अतिमागास जमाती आहेत असा निष्कर्ष पुढे आला. या दृष्टीने हे संशोधन महत्वाचे ठरले आहे.

- **आगरवाल नंदिनी (१९९७)** यांनी, *''वनस्वर''* ही संशोधन पत्रिका राणी दुर्गावती विशेषांक म्हणून प्रसिध्द केली.

''त्यात गढामंड साम्राज्याची सम्राज्ञी ही गोंड आदिवासी होती. राणी दुर्गावती मडावी या बहादूर वीरागणीने अकबर बादशाह याला लढाईत तीन वेळा हरविले होते''.[५२]

आदिवासी यापूर्वी त्या त्या विभागाचा राज्यकारभार करीत होती. आदिवासींचे साम्राज्य होते व अनेक आदिवासींचे राजे होऊन गेले. त्यात अनेक लढवय्ये स्त्रिया देखील होऊन गेल्या. त्यात विरांगणा राणी दुर्गावती होती. तत्कालीन परिस्थितीतीत अकबरासारख्या यवन राजाचा पराभव राणी दुर्गावतीने केला होता. त्याकाळी आदिवासींचे राज्य असल्यामुळे त्यांची सामाजिक व सामुहिक शक्ती प्रचंड होती हे निर्देशत करण्याचा प्रयत्न या संशोधन पत्रीकेत केला आहे.

- **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (१९९७)** यांनी, बेंच मार्क सर्व्हे अहवालात ''इन्ट्रोडक्शन ऑफ द प्रिमिटिव्ह ट्रायबल ग्रुप ऑफ महाराष्ट्रा'' या शिर्षकाखाली आदिम जमातीची माहिती गोळा केली आहे.[५३]

या अहवालात अतिमागास जमीतींचे भौगोलिक स्थान, सामाजिक सांस्कृतिक वैशिष्टये, आर्थिक स्थिती, मूलभूत सुविधा इत्यादी संबंधीची सांख्यिकिय माहिती नमूद करण्यात आली आहे. कोलाम, माडिया गोंड व कातकरी या तीन आदिम जमाती आर्थिक–सामाजिकदृष्टया मागासलेल्या आहेत असा निष्कर्ष निघतो. तसेच या तिन्ही जमातीत कातकरी अतिमागास राहिली असल्याचे स्पष्ट होते.

- **नेगी आर. एस. आणि गायकवाड जॉन (१९९७)** यांनी, *''सोसिओ कल्चरल डायनॅमिक्स ऑफ डेव्हलपमेंट''* ह्या संपादित ग्रंथात डॉ. गोविंद गारे यांनी माडिया, गोंड या अतिमागास आदिम जमातीतील आरोग्य व पौष्टीक आहाराची समस्या यावर प्रकाश टाकला आहे. हाच प्रश्न विजया पांडे आणि रोहिणी देवी यांनी किनवट तालुक्यातील गृहिणींचा पौष्टीक आहाराचा प्रश्न हाताळला आहे.[५४]

''आदिवासी समाजात पौष्टीक आहारासंबंधी जागृती दिसत नाही. त्यामुळे त्यांचे आरोग्य नेहमी धोक्यात आलेले असते. पौष्टीकतेच्या अभावामुळे अनेक आरोग्यविषयक प्रश्न निर्माण होताना दिसतात.''

परंतु प्रत्यक्षात आदिवासींना पौष्टिकतेचे ज्ञान असते. जंगलात विविध वस्तू गोळा करताना कोणते उपयोगी व कोणते उपयोगी नाही या सर्व बाबी माहित असतात. परंतु पौष्टीकता नसलेले अन्न देखील त्यांच्या दृष्टीने महत्वाचे असते. त्यांची अन्नाची गरजच पूर्ण होत नसेल तर पौष्टीक व अपौष्टीक हा फरक करणे शक्य नाही ही वास्तवता आढळते. कातकरी सारख्या आदिम जमाती केवळ अन्नासाठी झगडताना दिसतात याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे.

- **भावे ह. अ. (१९९७)** यांनी, *''शिकार ते शेतकरी''* या ग्रंथात मानव शिकारी अवस्थेपासून ते शेती अवस्थेपर्यंत तो कसा उत्क्रांत होत गेला याचे सविस्तर विवेचन केले आहे.

''सध्याच्या मानवाच्या औद्योगिक समाज हा २०० ते ३०० वर्षातील आहे. यापूर्वी १० हजार वर्षे तो शेती करीत होता. त्याआधी ३५ लाख वर्षे मानव फलशोधक अवस्थेत होता. इतर प्राण्याप्रमाणे अन्नासाठी पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होता. त्याच्या ४००० पिढ्या शिकारी अवस्थेत गेल्या. परंतू गेल्या शतकापर्यंत अनेक ठिकाणी मानव शिकारी व फलशोधक अवस्थेत आढळून आला. उदा. टास्मानिया बेटातील आदिवासी १९ व्या शतकातही ३ लाख वर्षापूर्वी मानव जी हत्यारे वापरत होता तशीच दगडाची हत्यारे वापरताना दिसला''.[५५] आजही जगातील कांही भागात मानव शिकारी रानटी अवस्थेत जीवन जगताना दिसतो. तसेच औद्योगीक समाजातही कांही आदिवासी जमाती अतिशय प्राथमिक अवस्थेतील जीवन जगत आहेत. केवळ

उदर निर्वाहासाठी जगणे त्यांची ती अवस्था देखील शिकारी अवस्थेसारखीच आहे याकडे या ग्रंथात लक्ष दिलेले नाही.

- **वार्ताहर यांनी ''टाईम्स ऑफ इंडिया''** मुंबई या वृत्तपत्रातील २८ मार्च १९९७ रोजीच्या बातमीत मार्च महिन्यात एकूण सहा आदिवासी मृत्यु पडले. न्यूमोको नियोसिस हा फुप्फुसाचा रोग त्यांना झाला होता. सर्वजण कोळशाच्या भट्ट्या लावत असत. आरोग्य अधिकाऱ्यांच्या मते हा रोग कोळशाच्या खाणीत वर्षानुवर्षे काम करण्याने होतो[५६] असे नमूद केले आहे.

आदिवासी उन, वारा, पाऊस, थंडी यात काम करीत असताना त्यांची शारीरीक झीज होऊन अनेकांचे बळी जातात पण त्याचे कारण शोधण्याकडे दुर्लक्ष होते. कंत्राटदारही त्याच्याकडे लक्ष देत नाही. वीटभट्टीवर काम करताना ओझे उचलून अनेक शारीरिक विकार होऊन मृत्यु होत असतील, गुडघाभर चिखलात भातशेतीत काम करताना अनेक आदिवासी मृत्यु पावली असतील पण त्याची दखल कोणी घेतली नाही. एखाद्या पशुप्रमाणे आदिवासी माणसे मरतात. टाईम्स ऑफ इंडियाची ही बातमी समाजाचे याकडे लक्ष वेधणारी आहे.

- **वार्ताहर यांनी टाईम्स ऑफ इंडिया** मध्ये दि. २४ नोव्हेंबर १९९७ राजी खोपोली येथे खोपडी पिऊन २५ लोक मृत्युमुखी व तेवढेच गंभीर अवस्थेत होते. यातील बहुतेक कातकरी होते. हातभट्टीत मालकाने विषारी द्रव्याचा वापर केल्याने ही घटना घडली. २५ लोक मेल्याने खळबळ उडाली होती. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नातेवाईकांना रू. ५० हजार जाहिर केले होते. तेव्हा या मदतीविरुध्द वर्तमानपत्रात काहूर उठले होते. मुख्यमंत्री ज्या पक्षाचे होते त्याच्या प्रमुखांनी ''हा करदात्याच्या पैशाचा गैरवापर आहे'' अशी टिका केली होती. तसेच टिका करण्यात माजी पोलीस प्रमुख, जेष्ठ सनदी

अधिकारी, राजकीय नेते व कामगार पुढारी यांचा समावेश होता[५७] असे नमूद केले आहे.

मृत्यूमुखी पडलेल्या कातकऱ्याची व्यथा, त्यांची दयनीय अवस्था, त्यांची जीवन पध्दती, त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती विचारात न घेता त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करुन घडलेल्या घटनेची दखल घेतली असता त्याच्यावर टीका केल्या जातात. ही बाब कातकरी समाजाच्या दृष्टीने अन्यायकारक आहे.

- **वार्ताहर यांनी सकाळ** दि. २४ नोव्हेंबर १९९७ रोजी सरकारच्या निर्णयाविरुध्द वाचकांच्या पत्रव्यवहारात एका वाचकाने प्रतिक्रिया नोंदविली होती आणि ती सकाळने प्राधान्याने छापली आहे.

त्यात असे म्हटले होते की, ''दारु पिणारे लोक धारातिर्थी पडले आहेत की नैसर्गिक आपत्तीने पिडले आहेत? त्यांना शिक्षा देण्याऐवजी मदत दिली जाते.[५८] समाजाच्या मुख्य प्रवाहातील आदिवासी संबंधीची ही एक सामाजिक मानसिकता आहे.

वाचकांनी अपूऱ्या माहिती अभावी पाठविलेल्या प्रतिक्रिया छापणे ही प्रसारमाध्यमांची चूक आहे. त्याचा सर्व बाजूने अभ्यास करणे गरजेचे आहे.

- **गारे गोविंद (१९९८)** यांनी, *''आदिवासी विकास योजना''* या ग्रंथात ''आदिवासी विकासाच्या विविध योजना, ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण योजना, आदिवासी विभागाच्या विविध योजना, आदिवासी विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात असे म्हटले आहे''.[५९]

परंतु प्रत्यक्षात या योजना आदिवासी जीवन बदलण्यात अपयशी ठरल्या आहेत. कारण या योजनांवर केलेली आर्थिक तरतूद कमी, अकार्यक्षम पध्दतीने त्यांची

अंमजबजावणी, लाचलुचपत भ्रष्टाचार, आदिवासींचा अज्ञानपणा इत्यादी दोषांमुळे आदिवासी विकासापासून वंचित राहिला आहे.

सर्वसाधारणपणे विकास योजनांची आखणी करताना उत्पादक दृष्टीकोन समोर ठेवला जातो. परंतू अंमलबजावणी अनुत्पादक दृष्टीकोनातून केली जाते. आदिवासींच्या जीवनातील प्रगतीकडे दुर्लक्ष केले जाते. आदिवासी विकास योजनासाठीच्या तरतूदी आणि खर्च याच्या आकडेवारीपेक्षा त्या योजनांमधून आदिवासींच्या जीवनात किती बदल झाला याचे मापन होणे आवश्यक आहे.

- **गारे गोविंद (१९९८)** यांनी, *''अ रिव्हीव्ह ऑफ ट्रायबल, रिसर्च, स्टडीज''* या संपादित ग्रंथात ''१९७८-७९ साली ६५% आदिवासींना आदिवासी सहकारी सोसायट्यांचा फायदा झाला. ५०% कुटुंबे सदस्य होते. सोसायट्यांमुळे आदिमांना विविध व्यवसायातून उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध झाला. बँकाकडून आदिवासींना कर्ज मिळवून देण्यात या सोसायट्यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. आदिवासी सहकारी सोसायट्या आदिवासी विकासाच्या संधी निर्माण करून देणाऱ्या संस्था आहेत''[६०] असे निर्देशित केले आहे.

परंतु प्रत्यक्षात सर्वच आदिवासींना या संस्थाचा लाभ मिळत नाहीत. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेर राहणाऱ्या आदिवासींना याचा लाभ मिळत नाही. शासनाकडून या संस्थांना अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे त्यांचे कार्य भक्कमपणे दिसत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या सोसायट्या बिगर आदिवासी लोक चालवितात, आदिवासी फक्त नावाला असतात. म्हणून या संस्थांचा आदिवासी विकासाला किती फायदा होतो याची कल्पना येते. याकडे मात्र या ग्रंथात दुर्लक्ष झाले आहे.

- **शर्मा एस. पी. (१९९८)** यांनी, *''कल्चर ऑफ इंडियन ट्राईब्जः कॉन्सेप्ट अँड आयडेंटीटी''* व्हॉल्यूम-१ या संपादित ग्रंथात ''भारतीय आदिम संस्कृती ही भारतीय संस्कृतीचा मौल्यवान ठेवा आहे. त्याचे संवर्धन केले पाहिजे. काळाच्या ओघात आदिम संस्कृती लोप पावत आहे. वसाहत वादाच्या काळापासून आदिम संस्कृतीवर विदेशी संस्कृती आक्रमण करीत आहे''[६१] असे विवेचन केले आहे.

आदिम जीवनाला संस्कृती शिवाय परिपूर्णता येत नाही. सांस्कृतिक सण, उत्सव व अनेक घटक त्यांच्या जीवनाला दिलासा देणारे आहेत. परंतु याची दुसरी बाजू अशी आहे की, केवळ संस्कृती टिकवून ठेवावयाची म्हणून आदिमांचा विकास थांबविणे हे संस्कृतीच्या नावाखाली आदिम समाजातील परिवर्तन नाकारण्यासारखे आहे. रंजक, श्रृंगारीक, कुतुहल म्हणून आदिम संस्कृतीचा अभ्यास व त्याचे संवर्धन करण्यासंबंधीची मते घातक आहेत. याकडे मात्र शर्मा यांनी दुर्लक्ष केले आहे.

- **सामल प्रसन्न के. (१९९८)** यांनी, *''ट्रायबल डेव्हलपमेंट ऑप्शन''* या संपादित ग्रंथात ''पूर्वीय राज्यातील वनक्षेत्रात राहाणाऱ्या आदिवासी जमातीची आर्थिक, सामाजिक स्थिती मागासलेली आहे. आदिवासीचे वनक्षेत्रावरील अवलंबित्वामुळे कायम उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध आहेत. आदिवासींमुळे वनक्षेत्राचा आर्थिक दृष्टीकोनातून विकास झाला आहे[६२] असे स्पष्ट केले आहे. पूर्वीय व मध्य भागात राहाणाऱ्या आदिवासींचे आजही पारंपारीक उत्पन्नाची साधने अस्तित्वात आहेत. परंतु पश्चिम, इतर भागात व वनक्षेत्राबाहेर राहाणाऱ्या कातकरी सारख्या आदिवासींची अवस्था वाईट असल्याचे दिसते.

- **पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (१९९९)** साली महाराष्ट्रातील आदिम जमातीचा एक व्यापक अभ्यास प्रसिध्द केला. त्या अभ्यासात

कातकरी जमातीच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यात आला होता. त्या अभ्यास अहवालानुसार कातकरी जमातीतील साक्षरता ठाणे १६%, रायगड १७% अशी होती. ठाणे जिल्ह्यात१000कातकरी कुटुंबाचा अभ्यास केला असता ८0३ दहावी, ८३ बारावी व इंजिनिअरींग, ५ पदविका, २ आयटीआय असे शिकलेले होते. रायगयडमध्ये २७00 कुटुंबे अभ्यासले असता ९४ दहावी व बारावी असे प्रमाण दिसून आले.[६३]

यावरुन ठाणे जिल्ह्यात ८४% निरक्षरता होती. ठाणे जिल्ह्यात शिकलेल्यांमध्ये १0 वी व १२ वी याचे प्रमाण जास्त होते. म्हणजे शिकणारी पिढी १0 वी, १२ वी च्या पुढे जात नाही हे स्पष्ट होते. रायगड जिल्ह्यात ८३% निरक्षरता आढळून आली. केवळ ९४ लोक १0 वी पर्यंत शिकलेले दिसून आले. ठाणे व रायगड जिल्ह्यात कातकरी लोक देखील शैक्षणिकदृष्टया मागासलेले आहेत. अज्ञान, निरक्षरता याच्या जोखडात ही जमात अडकली आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातील कातकरी जमातीची स्थिती जवळ जवळ सारखीच दिसते. ही वास्तवता या संशोधन अहवालावरून स्पष्ट होते.

- **जोशी अरुणा (२000)** यांनी, ''ढोल'' या संशोधन पत्रिकेत इ.स. १८७८ ते १८८९ या कालखंडात मध्यप्रदेशात तंट्या भिल्ल नांवाचा शूर आदिवासी होऊन गेला. त्याने जमिनदारांनी चालविलेल्या शोषणाविरुध्द मोठा लढा दिला होता आणि शोषणाविरुध्दचा तो कालखंड गाजविला होता[६४] अशी माहिती प्रकाशित केली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आदिवासींचे शोषण होत आले आहे. त्या त्या कालखंडात प्रस्थापित व्यवस्था आदिवासींच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन शोषण करीत आली आहे. परंतु त्या त्या वेळी आदिवासींनी त्या शोषणा विरोधात बंड पुकारले होते. कारण त्यांच्यामध्ये संघटन होते, सामूहिक शक्ती होती. परंतु आज शोषणाविरोधात कोणीही आवाज उठवित नाही याचे कारण म्हणजे आजच्या

आदिवासीत संघटन नाही. त्यांची संघर्षाची शक्ती क्षीण झाली आहे. त्यामुळे आज त्यांचे शोषण होत आहे ही वास्तवता यातून पुढे आली आहे.

- **गारे गोविंद** यांनी दि. २७ डिसेंबर २००० रोजी महाराष्ट्र टाईम्समध्ये ''आदिवासी उपयोजनेचे मूल्यमापन होणे गरजेचे'' लेख प्रसिध्द केला.

त्यात असे म्हटले होती की, एखादी योजना राबविताना ती खरोखर उपयोगी आहे का नाही हे पहावे, ती मंजूर झाल्यानंतर तिचा पाठपुरावा करावा, लाभार्थींच्या अडचणी असतील तर त्या सोडवाव्यात आणि त्या योजनांचा लाभ आदिवासी समाजाला मिळवून द्यावा अशी पध्दत दिसत नाही. योजनांचा नुसता बुजबुजा, ती खाती राबविणारांमध्ये कोणाचा कोणाला मेळ नाही कोणी कोणाला जबाबदार नाही म्हणून आदिवासी उपयोजनेचे मूल्यमापन केले जावे असे मत मांडले आहे.[६५]

आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ आदिवासी पर्यंत पोहचत नाही हे यावरुन सिध्द होते.

- **पटनाईक रेणुका (२०००)** यांनी, *''ट्राईब इकॉलॉजी अँड डेव्हलपमेंट''* या ग्रंथात कातकरी, माडिया गोंड व कोलाम या तीन अतिमागास आदिम जमातीचा तौलानिक अभ्यास केला आहे. त्यात माडिया व कोलाम या दोन्ही जमातीच्या तुलनेत कातकरी जमात शिक्षण, आर्थिक, सामाजिक आरोग्य या बाबतीत मागासलेली आहे असे आढळून आले आहे.[६६]

कातकरी ही आदिवासी जमात शेवटच्या पायरीवर उभी आहे. आदिवासीमधील अतिमागास जमात म्हणून सर्वच बाबतीत मागासलेली आहे. कायमचा उत्पन्नाचा स्रोत नाही, निकृष्ट आहार, निकृष्ठ राहणीमान यामुळे निकृष्ट आरोग्य दिसून आले आहे. रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यात ही जमात आजही अडकली

आहे. व्यसनाधिनता आणि निरक्षरता, अज्ञान याचा फायदा घेऊन या लोकांचे शोषण बिगर आदिवासी लोक करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या मागासलेपणाची स्थिती दिसते.

- **पसायत चित्रसेन (२000)** यांनी, *''ट्राईब, कास्ट अँड फोक कल्चर''* या ग्रंथात ओरिसातील मौखीक परंपरा आणि लोकसंस्कृती यांच्या विविध महत्वाच्या पैलूवर प्रकाश टाकला आहे. ''ग्रामीण संस्कृती बदलण्यात औद्योगिक संस्कृती महत्वाची भूमिका बजावते''.[६७] मौखीक परंपरा आणि लोकसंस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. दोन्हीचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तसेच लोकसंस्कृती, ग्रामीण संस्कृती यावर औद्योगिक संस्कृतीचा पगडा निर्माण होऊन त्यात बदल झाल्याचे चित्र स्पष्ट दिसते आहे.

- **भागवत जगमोहन (२000)** यांनी, ''बिरसा मुंडा'' या संशोधन पत्रिकेतून आदिवासींच्या जंगल पाणी, जमीन या संबंधीच्या चिपको आंदोलनाची माहिती उजेडात आणली आहे. ब्रिटीशांनी जेव्हा प्रचंड जंगलतोड सुरु केली तेंव्हा झाडाला कवटाळून आम्हाला कापले तरी चालेल पण झाडे तोडू देणार नाही असा आवाज चिपको आंदोलनात आदिवासींनी उठविला. १८८0 साली जलजमीन कायदा लागू केला तेंव्हा आदिवासींनी ब्रिटीशांना विरोध केला होता.[६८]

आदिवासींमध्ये वनसंरक्षणासंबंधीचा दृष्टीकोन त्या काळी होता. कारण त्यांचे वनाशी सर्व आर्थिक सामाजिक हितसंबंध जोडले गेले होते. म्हणजेच जेंव्हा जेंव्हा वनव्यवस्था धोक्यात आली तेंव्हा तेंव्हा ती वाचविण्यासाठी आदिवासी स्त्री-पुरुष खांद्याला खांदा लावून लढली आहेत. पुढे ब्रिटीशांनी जंगल संरक्षणाच्या नांवाखाली

आदिवासींची  वनावरील अर्थव्यवस्था धोक्यात आणली ही वास्तवता या संशोधन पत्रिकेतून स्पष्ट होते.

- **देवगांवकर सौ. शैलजा व देवगांवकर रा. गो. (२००१)** यांनी, *''आदिवासी विश्व''* गुजरात मधील काथोडी जमातीच्या आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकला आहे.

तेथील काथोडी जंगल मजूरी करतात. शेती फारच कमी लोक करतात. जंगलातून फळे, कंदमुळे काढून आणून विकणे हा व्यवसाय आहे. तसेच मद्य व मिश्री तयार करण्याचाही व्यवसाय आढळून आला. मासेमारी फारच कमी होते. अल्प प्रमाणात पशुपालन कुक्कुटपालन व्यवसायही केला जात असल्याचे दिसून आले.[६९]

गुजरात मध्ये काथोडी नांवाने कातकरी जमात ओळखली जाते. महाराष्ट्रातील कातकरीपेक्षा गुजरातमधील कातकरी जमातीची अर्थव्यवस्था जंगलावर अवलंबून असल्याचे दिसते. तसेच ते विविध व्यवसायात गुंतलेले दिसतात. याला गुजरातमधील व्यावसायिक कौशल्य व वृत्तीचा प्रभाव कारणीभूत दिसतो.

- **संपादक (जून २००१), ''हाकारा''**, या संशोधन पत्रिकेत रोहतासगड आंदोलनासंबंधी माहिती प्रकाशित केली आहे. १४ व्या व १५ व्या शतकात अफगानाबरोबर घनघोर युध्द झाले. त्यात शिंगदायी गोंड नांवाच्या योध्दा स्त्रीने संथाल, उराँव, मुंडा या बिहारी आदिवासींना संघटीत करुन शिंगदायी लढली होती.[७०]

आदिवासींचे अस्तित्व जेंव्हा धोक्यात आले तेंव्हा तेंव्हा त्यांनी बाह्यशक्तीबरोबर बंड पुकारल्याचे दिसते. ब्रिटीशांबरोबर आदिवासींना नेहमी संघर्ष करावा लागला होता. त्याप्रमाणे अफगाणांबरोबरही युध्द करावे लागल्याची माहिती या संशोधन पत्रीकेतून पुढे आली आहे. त्यात स्त्रीया देखील कमी नव्हत्या. शिंगदायी सारखी बहादूर स्त्री आदिवासींना संघटीत करुन बाह्य शक्तीविरोधात लढली होती.

त्यांच्यामध्ये संघटन होते. साम्राज्य व आपले वर्चस्व टिकविण्याची उर्मी त्यांच्यात होती हे यावरून स्पष्ट होते.

- **कुलकर्णी शौनक श्रीनिवास (२००२)** यांनी, *''आदिम''* या ग्रंथात मानवी उत्क्रांती आणि शारीरिक विविधता शारीरिक मानवशास्त्राच्या शाखांची माहिती या ग्रंथात दिली आहे. मानव हा एक सजीव प्राणी असून सजीव सृष्टीतील त्याचे स्थान महत्त्वाचे आहे.

''मानवशास्त्र आणि त्याचे जीवशास्त्रीय स्वरुप, मानवी उत्क्रांती आणि सृष्टीतील मानवाचे स्थान, जैव सांस्कृतिक विकास, उत्क्रांतीतून संस्कृतीकडे, मानव अनुवंशशास्त्र, वंश कल्पना, सत्यता, रक्तगट, मानवनिती, शरीर विविधता, दात वार्धक्य, मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण, दृक मानवशास्त्र, इत्यादी बाबी मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाच्या आहेत''.[७१]

मानवशास्त्रात आदिम अभ्यास विचारात घेतला जातो. मानवाची उत्क्रांती आदिम अवस्थेतून झाली म्हणून मानवशास्त्राच्या दृष्टीने आदिवासी जमाती महत्वाच्या आहेत. मानवाच्या उत्क्रांती अवस्थेतील आदिम ही एक अवस्था आहे. यावर लेखकाने भर दिला आहे.

- **गारे गोविंद (२००२)** यांनी, *''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती''* या ग्रंथात कातकऱ्याचा सामाजिक, आर्थिक दृष्टिकोन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

''माणसाने संचय करु नये, आवश्यक तेवढेच कमवावे, मालमत्ता म्हणजे चोरी सर्व बळकावतो आणि खातो तो चोर. एक वेळ उंट सुईच्या वेढ्यातून जाईल, पण श्रीमंताला स्वर्ग मिळणार नाही शेवटी संपत्ती वगैरे काहीही बरोबर येत नाही.

'आजचे आज, उद्याचे उद्या हा सरळ व्यवहार कातकऱ्याला समजतो. हातापायाची बोट वीस, तेवढेच त्याचे मोजमाप. ''वीस ही गणना व्यवहारात माणसाला पुरेशी आहे''.[७२]

कातकऱ्याला भविष्याची चिंता नाही, संपत्ती संचयनाचा दृष्टीकोन नाही, समाधानी वृत्ती दिसते, भविष्याची चिंता न करता आजचा दिवस एवढाच विचार हे लोक करतात. हातापायाच्या बोटावर मोजण्या इतकेच व्यवहार मर्यादित आहेत. यामुळे आज ही जमात मागासलेली राहिली आहे हे सिध्द होते.

- **देशमुख भाऊसाहेब यशवंतराव (२००२)** यांनी, *''आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासी शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणामः एक चिकित्सक अभ्यास''* या विषयावर सादर केलेल्या शोध प्रबंधात आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विकास योजनांमुळे आदिवासीच्या उत्पन्नात वाढ झाली, राहणीमान पातळीत वाढ झाली, शेती उत्पादकतेत वाढ घडून आली, आदिवासी गावात मूलभूत सेवा सुविधांचा विकास झाला. साक्षरतेत वाढ, तांत्रिक शिक्षणात वाढ असे सकारात्मक परिवर्तन घडून आल्याचा निष्कर्ष निघाला आहे.[७३]

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विकास योजना व विकासाबाबतची वास्तवता मांडली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या विकास योजनांचा लाभ सर्वच आदिवासी जमातीच्या कुटुंबांना समान प्रमाणात मिळत नाही. कांही जमाती या लाभापासून वंचित राहतात आणि कांही जमाती त्याचा जास्त लाभ होतात याकडे दुर्लक्ष झाले आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी जमातीच्या विकासाबाबत विश्लेषण नाही. कारण पिढ्यानपिढ्या कातकरी सारख्या दुर्लक्षित आदिम जमाती

आजही आदिवासी विकास योजनांपासून वंचित आहेत. त्यामुळे त्याचे सामाजिक आर्थिक मागासलेपण कायम आहे. उपाययोजना क्षेत्राबाहेरील आदिवासीच्या विकासाचा आढावा घेणारे संशोधन होणे तितकेच महत्वाचे आहे.

- **भामरे राजेंद्र पोपटराव (२००२)** यांनी, *''नासिक जिल्ह्यातील आदिवासी जीवन व विकास (१९०० ते १९८०)''* या विषयावर सादर केलेल्या प्रबंधात आदिवासींचे राष्ट्रीय व सामाजिक चळवळीतील कामगिरी, सामाजिक जीवन व इतिहास, आदिवासी विकासाचे शिल्पकार, समाजसुधारक इत्यादींचा उहापोहा केला आहे. त्याचबरोबर आदिवासी जीवनाचा इतिहास व त्यांची कामगिरी इतिहासकारांनी दडपली आहे असा निष्कर्ष काढला आहे.[७४]

इतिहासकारांनी राजेरजवाड्यांचा इतिहास प्रकाशात आणला पण दऱ्याखोऱ्यात डोंगर कपारीत लढणाऱ्या प्राणाची बाजी लावणाऱ्या थोर कामगिरी करणाऱ्या आदिवासींना मात्र अंधारात ठेवले आहे.

आदिवासींवरील अन्याय, अत्याचार, त्यांनी उभारलेला संघर्ष व त्यातील कामगिरी याचा इतिहास मात्र लिहीला गेला नाही. सामान्य माणसाचा इतिहास लिहीला गेला नाही.

- **नाडगोंडे गुरुनाथ (२००२)** यांनी, *''भारतीय आदिवासी''* या ग्रंथात आदिवासींच्या समस्या त्यांच्या पारंपारिक जीवन पध्दतीतून आणि इतर संस्कृतीच्या संपर्कामुळे निर्माण झाल्या आहेत''[७५] असे म्हटले आहे.

पारंपारिक जीवनाला अवास्तव महत्व दिल्यामुळे अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा. स्थानांतरीत शेती, वनावर आधारित व्यवसाय, शोषणाचा प्रश्न, व्यावसायिक स्थलांतराचा प्रश्न, निरक्षरता, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा

इत्यादी समस्या त्यांच्या पारंपारिक जीवनातून निर्माण झाल्या आहेत. तर प्रचंड व्यसनाधिनता, निकृष्ट आरोग्य, निकृष्ट आहार पध्दती, भाषेचा प्रश्न, मानसिकतेचा प्रश्न, या समस्या संपर्कामुळे निर्माण झाल्या आहेत.

कातकरी सारख्या आदिम जमाती आजही पारंपारिक जीवनाला अनन्य साधारण महत्व देतात. परंतू त्यांचा परिणाम अनेक सामाजिक आर्थिक समस्या उद्भवण्यावर होतो याकडे मात्र दुर्लक्ष होते. पारंपारिक जीवन पध्दती टाकून नवीन जीवन पध्दती जर स्विकारली तर विकासाचा मार्ग मोकळा होतो. याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

- **भामरे प्रशांत भिमसेन (२००३)** यांनी, *''ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांमध्ये लोकसंख्या शिक्षणाची जाणीव जागृती झाली आहे की नाही याचा चिकित्सक अभ्यास करणे''* या विषयावरील विद्यावाचस्पती शिक्षणशास्त्र पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे.

त्यात आदिवासीमधील लोकसंख्या शिक्षणाची पुरेशी माहिती, कुटुंब नियोजन, कायद्याचे विवाहाचे वय आणि प्रत्यक्षातील विवाहाचे वय, आरोग्याच्या जाणीवा, बालसंगोपन, जन्म-मृत्युची नोंद, व्यसनाधिनता इत्यादींची माहिती आजमावून त्याचे शासकीय दृष्टीने विश्लेषण केले आहे. तसेच त्यांचे आर्थिक व्यवहार, धार्मिक व सांस्कृतिक कल्पना, आरोग्य आणि पर्यावरण इत्यादी बाबी संशोधनात्मक पध्दतीने विश्लेषित केल्या आहेत.[७६]

लोकसंख्या शिक्षणासंबंधीसारख्या आधुनिक दृष्टीकोनातील संशोधन अतिशय मौल्यवान आहे. कारण आदिवासींमध्ये त्यासंबंधी समस्या आढळतात. अशा समस्यांचे मुळ यासारख्या संशोधनात मिळाले तर ते प्रश्न सोडविण्यासाठी अशा संशोधनाचा उपयोग होऊ शकतो हे संशोधन समाज उपयोगी आहे.

- **लाड विठ्ठल (२००३)** यांनी, ''जाग'' या संस्थेच्या वतीने रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड, दापोली, खेड तालुक्यातील कातकरी वाड्यांचा सर्व्हे करुन त्याचा अहवाल प्रसिध्द केला.

७७ वाड्यावर ८०० कुटुंबात ३५०० लोकसंख्या दिसून आली. ६०.६५% कुटुंबे गोड्या पाण्यात मासेमारी करुन उदरनिर्वाह करीत होती. ३०% कुटुंबे खंडाने शेती करत होती. शासकीय योजनांचे लाभ त्यांच्यापर्यंत पोहचले नव्हते अशी स्थिती दिसून आली.[७७]

कातकरी जमातीचा मासेमारी आणि शेतमजूरी करण्याचा व्यवसाय आहे. कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचला नाही. याचा अर्थ कोणत्याही जिल्ह्यातील कातकरी जमातीची स्थिती सारखी दिसते. ही सत्यता या संशोधनातून दिसून आली.

- **वैद्य नरेशकुमार (२००३)** यांनी, *''जनजातीय विकास मिथक एवं यथार्थ''* या ग्रंथात अनुसूचित जमातीच्या विकासाकडील दुर्लक्ष व शासकीय दृष्टीकोनातून जमातीचे सदोष विश्लेषण केले आहे. आदिवासीचा विकास म्हणजे क्रूर थट्टा व त्यांच्या समस्यांचे मुळ शोधून त्यावर उपाय शोधणे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे''.[७८]

आदिवासी विकासाची शासनाने आणि समाजाने क्रूर थट्टा केली आहे. जाणीवपूर्वक त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यांच्या समस्यांची कारणमिमांसा केली आहे. परंतू त्यावर उपाययोजना करण्याकडे डोळेझाक केली ही वास्तवता आहे.

- **रोंगटे तुकाराम बारकू (२००४)** यांनी, *''महाराष्ट्रातील आदिवासी मराठी नियतकालीकांचा चिकित्सक अभ्यास''* या विषयावरील प्रबंधात आदिवासी मराठीतील नियतकालीकांमधील साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आदिवासी समाजातील अल्पशिक्षित, उच्चशिक्षित तरुण वर्ग नव्या जाणीवेने साहित्य निर्माण करु पहात आहेत. ही निर्मिती नियतकालीके अथवा ग्रंथाच्या रुपाने साकार होत आहेत. आदिवासींच्या जीवनावरील विविध अंगाचे साहित्यातून दर्शन होते. हा प्रबंधाचा गाभा आहे. आदिवासींचे साहित्य मौखीक होते ते नियतकालीकांच्या माध्यमाने लिखीत बनत आहे असा निष्कर्ष काढला आहे.[७९]

आदिवासींच्या मौखीक परंपरेचे लिखीत परंपरेत रुपांतर करणाऱ्या आदिवासी मराठी नियतकालीकांचा अभ्यास हा आदिवासी लिखाणाला प्रेरणा देणारा ठरणारा आहे.

- **सावळे दत्ता (२००४)** यांनी, *''जाणिवेने आम्हा ऐसे चेतविले''* या ग्रंथात वंचितामध्ये आपल्या अनुभवातून शिकण्याची क्षमता आहे. या जाणिवेच्या बळावर तो आपले दुःख दूर करु शकतो. जग बदलू शकतो तसेच साक्षरतेचा उपयोग संघर्षासाठी करतो''[८०] असे म्हटले आहे.

वंचितामधील क्षमताचा आढावा घेतला असता क्षमतेच्या आधारावर कोणतेही परिवर्तन करणे शक्य असते. साक्षरता ही मोठी क्षमता आहे. साक्षर असलेला वंचित शोषणाविरोधात, विचारा विरोधात संघर्ष करुन उभा राहू शकतो. यावरुन शिक्षण हे खूप महत्वाचे आहे. वंचितांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. कातकरी सारखी जमात आजही शिक्षणापासून दूर आहे. त्यांच्या परिवर्तनासाठी साक्षरता गरजेची आहे.

- **कांबळे सदाशिव (ऑक्टोबर २००४)** यांनी, ''मिळून साऱ्याजणी'' या मासिकात *''जेंव्हा कातकरी जागा होतो''* या अनुभव कथनपर लेखात नारी समता मंचाचा सामाजिक कार्यकर्ता म्हणून कातकरी समाजाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. रेशनकार्ड मिळवून देणे, दारिद्रय रेषेखाली नाव नोंदविणे, सामाजिक जागृती व संघटन करणे, कातकरी मधील चोऱ्या करणाऱ्याला सुधारणे, अन्यायाला वाचा फोडणे इ. कामे कांबळे यांनी केली याचे विश्लेषण अतिशय मार्मिक व पोटतिडकीने केले आहे.[८१]

सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते कातकरी जमातीचा मोठा आधार आहेत. त्यांच्या विकासातील महत्वाचा दुवा आहेत हे सिध्द होते.

- **पाटील वैशाली (मार्च २००५)** यांनी, ''मिळून साऱ्याजणी'' या मासिकात *''घरठाण हक्क चळवळ''* या लेखात ''कसेल त्याची जमीन आणि राहिल त्याचे घर'' या तत्वावर कुळकायद्यानुसार कसणाऱ्या जमिनीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने २९ मे २००० रोजी चार ओळीचा जाहिरनामा काढला आणि घरे असलेली सर्व कुळे, शेतमजूर, कारागीर व शेतीचा जोडधंदा करणाऱ्यांना आपल्या झोपडीखालील जागेचे गृहीत खरेदीदार म्हणजेच मालक बनविले आहे. परंतू त्यानंतर दबाव दडपशाहीचा संघर्ष निर्माण झाला त्याला कसे तोंड दिले याचे विश्लेषण केले आहे.[८२]

घर आणि घराच्या जागेचा प्रश्न कातकरी लोकांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. जर राहत्या घरातून या कुटुंबाना बाहेर काढले तर त्याची भटकंती वाढेल आणि त्याचे जीवन आणखी अस्थिर बनेल ही वास्तवता या आंदोलनामागे दडली आहे.

• **सदाशिव कांबळे यांनी, दै. सम्राट दि. १ सप्टेंबर २००५** रोजी ''कातकरी समाजाची दयनिय अवस्था आणि परिवर्तनाची गरज'' या मथळ्याखाली एक लेख मालिका सुरू केली होती. त्यात त्यांनी शासनाकडे घरकूल योजना आहे पण कातकरी लोकांकडे घरकूल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नाही[८३] असे म्हटले आहे.

शासनाने भूमिहिनांना जमीन देण्यासाठी ''स्वाभिमान योजना'' आखली होती. परंतू एकाही कातकरी कुटूंबाला जमीन देण्यात आली नाही असे म्हटले आहे.

या बातमीवरून काही मुद्दे पुढे येतात. ते म्हणजे पुणे जिल्ह्यात कातकरी कुटूंबासाठी घरकूले मंजूर आहेत. परंतू कातकरी कुटूंबाकडे स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकूल बांधता येत नाहीत. ते अनेक पिढ्यांपासून येथे राहात आहेत. परंतू त्या जागा त्यांच्या नावावर नाहीत. त्या जागेचा मुळ मालक त्यांना हाकलून देण्याचा प्रयत्न करीत आहे. पुणे जिल्ह्यात ही समस्या गंभीर बनत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे स्वाभिमान योजनेअंतर्गत एकाही कातकरी कुटूंबाला जमीन दिली गेली नाही ही बाब देखील या बातमीतून लक्ष वेधून घेते.

• **पाटकर मेधा** दै. लोकमत वृत्तपत्रात दि. **०५ जानेवारी २००५** रोजी *''अधिकारासाठी आदिवासींनी रस्त्यावर यावे''* या बाबतीत आंबेगाव येथे नारी समता मंच या स्वयंसेवी संस्थेने कातकरी लोकांचे जातीचे दाखले वाटपाचा कार्यक्रम मेधा पाटकर यांच्या हस्ते आयोजित केला होता. त्या प्रसंगी बोलताना म्हणाल्या ''कातकरी आदिवासींच्या एका एका पाड्याला आणि वाडीला शासनाने गांव म्हणून घोषित करावे म्हणजे त्यांचे खरे अधिकार त्यांना मिळतील''.[८४]

कातकरी कुटुंबाच्या जातीच्या दाखल्याचा प्रश्न गंभीर आहे. कोणतीही कातकरी व्यक्ती ५० वर्षापूर्वीचा पुरावा देऊ शकणार नाहीत. त्यामुळे कातकरी

लोकांना विना अट शासनाने जातीचे दाखले द्यावेत, त्यांच्या वाड्यांना गांव म्हणून घोषित करावे ही मेधा पाटकरांची मागणी अतिशय समर्पक आहे.

• **सदाशिव कांबळे यांनी दै. सम्राट** दि. **२ सप्टेंबर २००५** रोजी ''कातकरी समाजाची दयनीय अवस्था'' या मथळ्याखालील लेख मालेत स्वाभिमान योजनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे विचारणा केली होती. तो वाचल्यावर १५–२० अधिकाऱ्यांच्या टेबलावर ते पत्र कसे फिरले पुन्हा कसे परत आले याचे विवेचन दिले आहे.[८५]

यावरुन कातकरी समाजाची कशी शासकीय पातळीवर दखल घेतली जात नाही याकडे कांबळे यांनी समाजाचे लक्ष वेधले आहे.

• **सदाशिव कांबळे यांनी दै. सम्राट** दि. १ स्पटेंबर २००५ रोजी ''कातकरी समाजाची दयनिय अवस्था आणि परिवर्तनाची गरज'' या मथळ्याखालील लेख मालेत ''शासनाकडे घरकूल योजना आहे पण कातकरी लोकांकडे घरकूल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नाही'' असे म्हटले आहे.

शासनाने भूमिहिनांना जमीन देण्यासाठी ''स्वाभिमान योजना'' आखली होती. परंतू एकाही कातकरी कुटूंबाला जमीन देण्यात आली नाही असे म्हटले आहे.

या बातमीवरून काही मुद्दे पुढे येतात. ते म्हणजे पुणे जिल्ह्यात कातकरी कुटूंबासाठी घरकूले मंजूर आहेत. परंतू कातकरी कुटूंबाकडे स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकूल बांधता येत नाहीत. ते अनेक पिढ्यांपासून येथे राहात आहेत. परंतू त्या जागा त्यांच्या नावावर नाहीत. त्या जागेचा मुळ मालक त्यांना हाकलून देण्याचा प्रयत्न करीत आहे. पुणे जिल्ह्यात ही समस्या गंभीर बनत आहे.[८६]

दुसरी गोष्ट म्हणजे स्वाभिमान योजनेअंतर्गत एकाही कातकरी कुटूंबाला जमीन दिली गेली नाही ही बाब देखील या बातमीतून लक्ष वेधून घेते.

- **जाधव सौ. छाया (२००५)** यांनी, *''एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ कालखंडातील अभ्यास व मुल्यमापन विशेष संदर्भ आंबेगांव तालुका जि. पुणे''* या विषयावर प्रबंध सादर केला. ''विविध शासकीय योजनांचे लाभ महादेव कोळी जमातीने जास्त प्रमाणात घेतले दुसऱ्या क्रमांकावर ठाकर जमात तर तिसऱ्या क्रमांकावर कातकरी जमात दिसून आली. म्हणजेच विकास योजनाचा लाभ समान प्रमाणात सर्व जमातींना मिळाला नाही''.[८७]

शासकीय योजनां आदिवासी विकासासाठी राबविल्या जातात परंतु प्रत्यक्षात आर्थिक तरतूद कमी, अमंलबाजावणीतील दोष, कागदपत्राची पुर्ततेचा अभाव, अज्ञान, निरक्षरता, बाजारातील पत इत्यादी कारणांमुळे त्याचे लाभ सर्व जमातीपर्यंत पोचत नाही असे वास्तव चित्र दिसते.

- **रिपोर्टर, इंडियन एक्सप्रेस**मध्ये **१८ डिसेंबर २००५** रोजी ''डे आफ्टर सम रिलीफ फॉर हुक व्हिक्टीम्स'' या शिर्षकाखालील बातमीत मावळ तालुक्यातील विषारी दारुच्या नशेत सहा कातकरी शेतमजूरांचा बळी गेला या निमित्ताने जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजित पवार यांनी पिडीत कातकरी वस्तीला भेट दिली. मृत्यु पावलेल्या निराधार कुटुंबियांना १ लाखाची मदत दिली आणि जिल्हा प्रशासनाने अन्नधान्य पुरविण्याचे आश्वासन दिले[८८] असे प्रसिद्ध केले आहे.

यावरुन असे वाटते की मदती देऊन त्यांचा जीव भरुन मिळणार नाही ही प्रथा कशी बंद होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

• **संपादक (मार्च २००५), ''मिळून साऱ्याजणी''** या मासिकात *''नारी समता मंच व कातकरी श्रमीक संस्था आयोजित कातकरी मेळावा''* या लेखात पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथे ४ जानेवारी २००५ रोजी नारी समता मंच व कातकरी श्रमीक संस्थेने कातकरी मेळावा आयोजित केला होता, त्याचा वृत्तांत प्रस्तुत लेखात छापला आहे.[८९]

या मेळाव्याला ११०० कातकरी लोक उपस्थित होते. ३७ कातकरी लोकांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले. जातीच्या दाखल्याचा प्रश्न या सामाजिक संस्थांनी मिळून मार्गी कसा लावला या बाबींवर या मेळाव्यात उहापोहा केला आहे.

स्थलांतरीत झालेल्या व आदिवासी क्षेत्राबाहेरील कातकरी लोकांच्या जातीच्या दाखल्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. पुराव्याचा प्रश्न, मुळ स्थानाचा प्रश्न पुढे करुन प्रशासन दाखले देण्यास नकार देत होते. परंतु सामाजिक संस्थांनी त्यासंबंधी आवाज उठविला आणि तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे याची हकिकत या लेखात मेळाव्याच्या निमित्ताने मांडली आहे.

• **वार्ताहर यांनी दै.'सकाळ'** दि. **१८ डिसेंबर २००५** रोजीच्या ''फ्रेंच पॉलिश मिसळलेल्या दारुने सहा मजूरांचा बळी'' या बातमीत मावळ तालुक्यातील कशाळ गांवात शेतीच्या कामाचा मोबदला म्हणून शेतमालकाने फ्रेंच पॉलिश मिसळून तयार केलेली विषारी दारु प्यायल्याने सहा मजूरांचा मृत्यू झाला. त्यात तीन महिलांचा समावेश होता.[९०]

दारूच्या नशेत त्याने अधिक काम करावे म्हणून शेतमजूराला दारू दिली जाते. त्यातून त्याची आर्थिक पिळवणूक होते. वेळप्रसंगी मृत्यू कसा ओढावतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

• **वार्ताहर यांनी दै. लोकसत्ता** दि. **१८ डिसेंबर २००५** रोजी ''खोपडी पिऊन मावळ तालुक्यातील सहा मृत्युमुखी'' या मथळयाखाली लेख लिहीला होता. त्यात नशेसाठी खोपडी सारखे द्रावण कालविल्याने सहा शेतमजूर मृत्युमुखी पडलयाचे म्हटले होते. त्यात त्यांची नावे होती.[११]

यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते ती निकृष्ट दर्जाच्या दारुमुळे शेतमजूरांचा बळी गेला परंतू त्यात शेतमजूर हे कातकरी होते याचा उल्लेख मात्र टाळला होता.

• **वार्ताहर यांनी दै. सकाळ दि. १८ डिसेंबर २००५** रोजी ''दारुसाठी आम्ही कुठेही मजूरी करतो'' या मथळ्याखाली बातमी दिली होती.

विशिष्ट समाजातील लोकांना मजूरी कमी मात्र पिण्यासाठी मुबलक दारु दिल्यानंतर त्यांना भरपूर राबवून घेता येते. अशा मानसिकतेतून भोयरे कशाळ गावात ६ शेतमजूरांचा बळी गेल्याचे उघड झाले आहे.[१२]

फ्रेंच पॉलीश मिसळलेली विषारी दारु पिऊन सहा कातकऱ्यांचा बळी गेल्यानंतर त्यापैकी बचावलेल्या व दवाखान्यात भरती केलेल्या कातकरी स्त्रीची व्यथा या बातमीत दिली आहे.

यावरुन कातकरी हा शेतमजूर प्रचंड व्यसनाधिनतेत बुडाला आहे, जगणे हे केवळ दारुसाठी असेच सूत्र तयार झाले आहे.

• **वार्ताहर यांनी दै. सम्राट दि. १० जानेवारी २००६** रोजी ''दुर्लक्षित कातकरी समाज'' या शिर्षकाखाली सदाशिव कांबळे यांनी कातकरी समाजाच्या दारुबंदीवर प्रकाश टाकला आहे. कातकऱ्यांच्या व्यसनाधिनतेबाबत येथील प्रशासनाने, स्थानिक पुढाऱ्याने, समाजाने कधीही लक्ष दिले नाही. दारुबंदीच्या अनेक मोहिमा देशभर

राबविल्या जातात. एखादी तरी मोहिम कातकऱ्यांकडे यायला हवी होती ते मात्र झाले नाही ही वास्तवता या लेखातून दिसते.[१३]

- **वार्ताहर यांनी दै. महाराष्ट्र टाईम्स दि. ०४ सप्टेंबर २००६** रोजीच्या ''कातकरी मुले सुधारगृहात'' या बातमीत लोणावळा स्टेशनजवळ काही कातकरी कुटुंबे खडी मशीनच्या कामासाठी आली होती. स्टेशनपाशी कातकऱ्यांची चार मुले भिक मागत होती. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन पुण्याच्या बालसुधार गृहात टाकले. पंधरा दिवसानंतर आईवडीलांना त्याचा पत्ता लागला. परंतू ती मुले सोडवून घेण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही पुरावा नव्हता. त्यासाठी आणखी कांही दिवस त्या कातकरी आई वडिलांना पुरावे शोधत फिरावे लागले होते.[१४]

या बातमीवरुन कातकरी समाजाची दयनीय अवस्था स्पष्ट झाली आहे.

- **बोकील मिलिंद (२००६)**, यांनी ''कातकरी विकास की व्यवस्थापन?'' या ग्रंथात रायगड जिल्ह्यातील कातकरी आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक ऐतिहासिक बाबीवरील संशोधनात्मक विश्लेषण मुद्रीत केले आहे. शंभर पेक्षाही जास्त कातकरी वस्त्यावर फिरून कातकरी जीवनाचे वास्तव चित्र मांडण्याचा उत्कृष्ट प्रयत्न या ग्रंथात झाल्याचे दिसते.

''कातकरी समाजाचा दीडशे वर्षाचा प्रवास हा एका स्वतंत्र, उत्पादक, स्वच्छंदी अशा रानवासी जमातीकडून परतंत्र, नि:सत्व, नगण्य अशा मजूर वर्गाकडे होतो आहे. ''कातकरी ते कष्टकरी'' असा प्रवास आहे. हे परिवर्तन चांगले नाही, कल्याणकारी नाही. त्यात विकासापेक्षा विस्थापनाचाच अंश जास्त आहे.''[१५]

स्वातंत्र्यपूर्व काळापासून कातकरी समाजाचा विकास अधोगतीकडे गेला आहे. एकेकाळच्या काताच्या उत्पादकाचा प्रवास मजूराकडे होत आहे हा या समाजाचा

विकास नसून विस्थापन आहे याकडे या ग्रंथाल लक्ष वेधले आहे. कातकरी जमातीच्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, मानसशास्त्रीय स्थितीचे शास्त्रीय विश्लेषण करणारा हा एकमेव ग्रंथ आहे.

- **गुजराथी कल्याणकुमार** यांनी दै. सकाळमध्ये **दि. ११ एप्रिल २००९** रोजी ''आदिवासी विकासासाठी पुरेशी तरतूद हवी'' या शिर्षकाखाली लेख लिहीला.

''सरकारने अर्थसंकल्पात आदिवासींचा विकासासाठी आजतागायत विशेष आर्थिक तरतूद केलेली नाही. त्यामुळे अनेक विकास योजना रखडलेल्या असतात. विशेष आर्थिक तरतूद केली तर डोंगरी व दुर्गम भागात ज्यांना पायाभूत सुविधा पुरविता येतील तसेच त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतील''.[१६]

आर्थिक तरतूदी अभावी विकास-योजना रखडतात आणि विकासाची गंगा आदिवासी पर्यंत पोहचत नाही हे वास्तव गुजराथी यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

- **जोशी सीताराम** यांनी **दि. ११ एप्रिल २००९** रोजीच्या दै. सकाळमध्ये ''आदिवासींसाठी स्वतंत्र शेतीविषयक धोरण हवे'' या शिर्षकाखाली लेख लिहीला. आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात अल्पभूधारक व शेतमजूर आहेत. जमीनीचे अत्यल्प प्रमाण, शेतीचे पारंपारिकत्व यामुळे आदिवासी जमाती आर्थिकदृष्टया संकटात आहेत. त्यांच्या शेतीच्या आधुनिकीकरणासाठी स्वतंत्र शेतीविषयक धोरण हवे असे मत जोशी यांनी व्यक्त केले आहे.[१७]

आदिवासी हा मूळचा येथील शेतकरी होता. आजही काही आदिवासी शेतकरी आहेत. परंतू आजपर्यंत आदिवासींच्या शेतीसंबंधी आजही स्वतंत्र धोरण राबविले गेले नाही. त्यामुळे मुळचा शेतकरी विवंचनेत जीवन जगत आहेत. दुसऱ्याच्या शेतीत राबणारा भूमिहीन आदिवासी शेतमजूर आजही उपाशीपोटी जीवन जगत आहे. परंतू

त्यांच्या आणि त्यांच्या शेतीच्याविकासाकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. याकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. त्यांचा हा लेख अतिशय संयुक्तिक वाटतो.

- **ढमाले किशोर** यांनी दै. सकाळ वर्तमानपत्रात **दि. ११ एप्रिल २००९** रोजी ''आदिवासींच्या पारंपारिक व्यवसायाला मदत मिळावी'' या मथळ्याखाली लिहीलेल्या लेखात ''आदिवासींच्या सामाजिक जीवनाला गती मिळाली पाहिजे त्यासाठी शासकीय योजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजेत, आदिवासीचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक हाताळले जावेत आणि आदिवासींचे पारंपारिक व्यवसाय नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्यांना जीवनदान देण्यासाठी योग्य मदत मिळावी असे विवेचन केले.[९८]

दिवसेंदिवस आदिवासीची उदरनिर्वाहाची साधने कमी होत चालली आहे. त्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यांच्या पारंपारिक व्यवसायाला जीवदान मिळाले तर त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटू शकतो त्यासाठी शासनाची किंवा सामाजिक संस्थांची मदत मिळणे आवश्यक आहे.

- **तुपे संतोष** यांनी **दि. ११ एप्रिल २००९** रोजीच्या दै. सकाळमध्ये ''आदिवासी वस्त्यावर पूर्णवेळ डॉक्टरांची गरज'' या शिर्षकाखाली मत मांडले होते.

आदिवासीच्या सामाजिक समस्यांमध्ये सर्वात गंभीर आरोग्याची समस्या आहे. कूपोषण आणि भूकबळी, अनेक रोगाचे साम्राज्य यावर मात करण्यात आरोग्य विभागाला अपयश आले आहे. त्यामुळे आदिवासींना आपला जीव गमवावा लागतो. आदिवासी वाड्या वस्तीवर आरोग्य सक्षम करण्यासाठी पूर्णवेळ डॉक्टर नेमावा आणि नियमित औषधाचा पुरवठा करावा अशी उपाययोजना त्यांनी सुचविली होती.[९९]

आदिवासी आरोग्याकडे शासकय पातळीवर दुर्लक्ष केले जाते. आजही कोणत्याही आदिवासी वाडी वस्तीवर दवाखाना असल्याचे दिसत नाही. निकृष्ट आहार, अस्वच्छ राहणी, दूषित पाणी, आणि आरोग्याकडे दुर्लक्ष यामुळे अनेक रोगाच्या साथी येतात तेथे वैद्यकीय सेवा पोहचत नाही आणि त्यांच्या मरणाची कोणी दखल घेत नाही. त्यामुळे आदिवासी वस्तीवर पूर्ण वेळ डॉक्टराची नेमणूक करावी हे लेखकाचे मत समर्पक वाटते.

- **बुरसे एकनाथ** यांनी **दि. ११ एप्रिल २००९** च्या दै. सकाळमध्ये ''शिक्षणासंबंधीच्या योजना नव्याने सुरु कराव्यात या शिर्षकाखाली लेख लिहीला आहे. त्यात आदिवासी समाज शैक्षणिकदृष्टया मागासलेला आहे. रुढी परंपरेखाली दबलेल्या समाजाला शिक्षणाची नितांत गरज आहे. आदिवासी मुलामुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासकीय शैक्षणिक योजनांमध्ये सातत्य ठेवावे. अनेक योजना बंद पडून आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीचा दूरगामीविचार करुन त्या योजना राबवाव्यात असे मत व्यक्त केले आहे.[१००]

परंतु बऱ्याचवेळा शैक्षणिक योजना राबविल्या जातात. तेथे आदिवासी विद्यार्थी नसतात याकडे बुरसे यांनी दुर्लक्ष केले आहे. या योजनांवरील आर्थिक तरतूद पडून रहाते. तसेच बिगर आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी जमातीच्या शिक्षणाबाबत मत मांडलेले नाही.

- **सावंत विनय (सप्टेंबर २००९)** यांनी, ''एकजुट'' या दिवाळी विशेषांकात आदिवासी मधील अंधश्रध्दा व दैवीवृत्ती यावर प्रकाश टाकला आहे.

आदिवासी जीवनात भगताला महत्वाचे स्थान असते. भगत जणू आदिवासी जमातीचा डॉक्टरच असतो. त्याला चांगले औषधी ज्ञान असते. कांही अलौकीक शक्ती समाजात वावरतात. त्यांना काबूत ठेवण्याचे तंत्र भगताला माहित असल्याचा ठाम विश्वास आदिवासींना असतो. भगताचे कार्य पाहता त्याचे आदिवासी समाजातील स्थान अनन्य साधारण असते.[१०१]

आदिवासी जमातीत भगताला महत्वाचे स्थान असले तरी भगतावरील अवास्तव विश्वासामुळे आदिवासींचे आरोग्य धोक्यात आले आहे हे नाकारणे अयोग्य होईल याकडे या लेखात दुर्लक्ष केले आहे.

## ३.२ सारांश :

प्रस्तुत प्रकरणात 'पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास' या संशोधन विषयाची सामाजिक उपयुक्तता व महत्त्व शोधण्याच्या दृष्टिने विविध संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आले. त्यात विशेषत: इतिहास, समाजशास्त्र, मानवशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी, पर्यावरणशास्त्र इत्यादी विषयावरील ग्रंथाचे अवलोकन करण्यात आले. तसेच विविध विषयावरील प्रबंध व शोध निबंध, शासकीय व खासगी अहवाल नियतकालीके व वर्तमानपत्रे यातील लेख याचाही आढावा घेण्यात आला.

जगात व भारतात आदिवासी जीवनावर अनेक प्रकारचे ग्रंथ, प्रबंध, संशोधन अहवाल लेख व इतर साहित्य लिहिले गेले व प्रकाशितही झाले. परंतु आदिवासी विषयीची सहानुभुती, अनोखी संस्कृती व रूढी परंपरा म्हणून कुतुहलातून प्रवास वर्णने, रानटी समाज म्हणून उपहास या अर्थाने ते साहित्य निर्माण होत गेले. भारतात ब्रिटीशांनी पहिल्यांदा मानव जमात समुह म्हणून मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून आदिवासी संशोधनपर खंड प्रकाशित केले. त्यानंतर आदिवासींवर अनेक प्रकारचे

साहित्य निर्माण होत गेले आहे. संदर्भ साहित्याच्या सिंहावलोकनाचा परामर्श घेतला असता त्याचा सारांश पुढील प्रमाणे दिला आहे.

वॅट जॉर्ज यांनी लिहिलेल्या ग्रंथात कातकऱ्यांच्या कात बनविण्याच्या प्रक्रियेपासून ते निर्यात करण्यासंबंधीची निरिक्षणे नोंदविली गेली यातून कातकरी जमातीच्या कात बनविण्याचा पुरावा मिळाला. पगडी यांनी आदिलाबाद मधील गोंडांच्या सामाजिक आर्थिक बाबीचा अभ्यास केला. नारगोलकरांनी आदिवासींच्या होणाऱ्या शोषणावर प्रकाश टाकला आहे. तेस्तुर्ख यांनी मानवी उत्पत्तीचे सिद्धांत स्पष्ट केले आहेत. सु. बा. कुलकर्णी यांनी कातकरी बोलीभाषा व त्याची उत्पत्ती यावर प्रबंध तयार केला. तसेच कातकरी भाषेतील विविध पक्षीवाचक शब्द यावर प्रकाश टाकला आहे. मांडवकरांनी कोलाम जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे वर्णन केले आहे. संगवे विलास यांनी आदिवासींच्या सामाजिक मानवशास्त्राचे विवेचन केले आहे. गुरव व्ही. एन. यांनी कोकणा, कातकरी व वारली जमातीच्या विकासाचा अभ्यास केला. हेवीट यांनी गोंड जमातीच्या राज्यकारभाराचा अभ्यास केला.

डॉ. गारे गोविंद यांनी महादेव कोळी, कोकणा, कोलाम, ठकार, वारली, माडिया, इत्यादी जमातीवर लिखाण केले. पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने कातकरी जमातीच्या आरोग्यावरील संशोधन अहवाल तयार केला. घुर्ये जी. एस. यांनी कातकरी जमातीच्या मौखिक परंपरेचा अभ्यास केला. व्यास यांनी कातकरी जमातीच्या कात व्यवसायाच्या इतिहासावर लिखाण केले. उपाध्याय यांनी ठाणे जिल्ह्यातील कातकरी आणि वारली जमातीच्या वास्तव्याचा अभ्यास केला. देवगांवकरांनी माडिया व कोलाम या अतिमागास जमातीवर प्रकाश टाकला आहे. १९८३ च्या कारवार जिल्ह्याच्या गॅझेटमध्ये लिंगायत कंत्राटदाराकडे कात बनविण्यासाठी कातकरी कोकणातून येत असत असा उल्लेख आढळतो. आदिवासी

संशोधन संस्थेने 'आदिवासी लोकगीते' या ग्रंतात कातकरी गीताचे विश्लेषण केले आहे.

मसावी व गौरीश पंड्या यांनी गुजरातमधील काथोडींच्या सामाजिक–आर्थिक विकासाच्या नियोजनावर संशोधन केले आहे. कांबळे बी. एन. यांनी अनुसुचित जाती जमातींच्या विकासाचा संशोधनपर आढावा घेतला आहे. आंत्रे चि. ना. यांनी भारतातील गुन्हेगारी जमातीवर लिखाण केले आहे. राजवाडे वि. का. यांनी कातकरी शब्दाची उत्पत्ती करण्याचा प्रयत्न केला आहे. रूडॉल्फ हेरिडिया यांनी कातकरी जमातीच्या भटकंतीचे विवेचन केले आहे. रेणूका पटनाईक यांनी कातकरी, कोलाम व माडिया गोंड या अतिमागास जमातीच्या पर्यावरणीय साधन संपत्तीच्या वापराची रचना यावर प्रकाश टाकला आहे. नेगी व गायकवाड यांच्या संपादित ग्रंथात अतिमागास जमातीच्या आरोग्यासंबंधी समस्येवर तयार केलेला संशोधन अहवाल प्रसिद्ध केला आहे. टाईम्स ऑफ इंडिया, सकाळ यांनी दिलेल्या बातमीत खोपडी पिऊन मृत्यू पावलेल्या कातकरी लोकांच्या शोषणाला तोंड फोडले आहे. आदिवासी संशोधन संस्थेने महाराष्ट्रातील कातकरी जमातीच्या शैक्षणिक स्थितीचे सर्व्हेक्षण करून त्याचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. देवगांवकर यांनी गुजरातमधील कथोडिंच्या व्यावसायकि कौशल्यावर प्रकाश टाकला आहे.

कांबळे सदाशिव यांनी कातकरी समाजाच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी दै. सम्राट वर्तमानपत्रातून अनुभव कथनपर लेख लिहिले आहेत. पाटील वैशाली यांनी कातकरी जमातीच्या घराच्या जागेचा प्रश्न सोडविण्यासाठीची घरठाण चळवळ विश्लेषित केली आहे. मेधा पाटकर यांनी कातकरी मेळाव्यात कातकरी वस्तीला गावाचा दर्जा द्यावा असे म्हटले आहे. त्याचा वृत्तांत लोकमतने प्रसिद्ध केला आहे. जाधव छाया यांनी आंबेगांव तालुक्यातील आदिवासी योजनांचे मुल्यमापन यावर प्रबंध सादर केला. डिसेंबर २००५ मध्ये

लोकसत्ता व सकाळ यांनी मावळ तालुक्यातील कातकरी मजूरांचा मालकाने दिलेल्या विषारी दारूमुळे मृत्यू झाला याची बातमी प्रकाशित केली होती. बोकिल मिलींद यांनी रायगड मधील कातकरी समाजाच्या प्रश्नाचा अभ्यास करून एक उत्कृष्ट ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्यात कातकरी समाजाचा दिडशे वर्षापासूनचा इतिहास व समस्यांचा उहापोह केला आहे.

संदर्भ साहित्याचा परामर्श घेतला असता कातकरी जमातीवरील साहित्य तुलनेने कमी आहे असे दिसून आले. कातकरी जमातीच्या विविध बाबींवर काही साहित्यात विवेचन झाले असले तरी पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणारे संशोधन मात्र यामध्ये आढळून आले नाही. रायगड मधून स्थलांतरीत झालेल्या कातकरी लोकांच्या प्रश्नाचा अभ्यास झालेला नाही. काळाच्या ओघात बदलणाऱ्या सामाजिक चालीरिती, बदलत्या रोजगार साधनांचा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे हा अभ्यास महत्त्वाचा ठरणार असा अंतिम निष्कर्ष निघाला आहे.

---

**संदर्भ सूची**

[१] वॅट जॉर्ज, *''द डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक प्रॉडक्टस् ऑफ इंडिया''*, व्हॉल्यूम – १, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, बॉम्बे, १८९४, पान २७–४४.

[२] पगडी सेतू माधवराव, *''अमंग द गोंड्स ऑफ आदिलाबाद''*, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९४९, पान ४४.

[३] नारगोलकर कुसुम व नारगोलकर वसंत, *''जंगलचे राजे''*, श्री. मौनी विद्यापीठ (प्रकाशन) गारगोटी १९५५, पान १८०–१८१.

[४] नेस्तुर्ख एम., *''द ओरिजीन ऑफ मॅन''*, प्रोग्रेस पब्लिशर्स, मास्को १९५९, पान ५१–७३.

[५] कुलकर्णी सु. बा., *''पुणे विद्यापीठ पत्रिका''*, ज्ञानखंड, विभाग –२३, १९६६, पान ९१–१२१.

[६] मांडवकर भाऊ, *''आदिम''*, सेवा प्रकाश समिती, अमरावती, १९६६, पान ६२–६४.

[७] मांडवकर भाऊ, *''कोलाम''*, सेवा प्रकाश समिती, अमरावती, १९६६, पान ८७–९१.

[८] साठे एम. डी., *''इकॉनॉमिक स्टडी ऑफ रिजन वीथ स्पेशल रेफरन्स टू कंझमशन पॅटर्न, अ ट्रायबल रिजन इन अहमदनगर डिस्ट्रीक्ट, महाराष्ट्र स्टेट''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६७.

[९] मेहेंदळे य. श्री., *''मानसशास्त्र (सामाजिक व सांस्कृतिक)''*, मेहेंदळे प्रकाशन, पुणे, जून १९६९, पान ३०.

[१०] संगवे विलास, *''सामाजिक मानवशास्त्र – एक सैध्दांतिक अभ्यास''*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६९, पान २७–४४.

[११] कुलकर्णी एस. बी., *''डिस्क्रिप्टीव्ह ॲनेलिसिस ऑफ कातकरी डायलेट''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६९.

[१२] गुरव व्ही. एन., *''द सोशिओ इकॉनॉमिक अपलिफ्टमेंट ऑफ द शेड्युल्ड ट्राईब इन महाराष्ट्रा वीथ रेफरन्स टू कातकरी, वारली अँड कोकणा''*, विद्यावाचस्पती प्रबंध, मुंबई युनिव्हर्सिटी, मुंबई, १९७१.

[१३] हेवीट जे. एफ., *''रूलिंग रेसेस ऑफ प्रिहिस्टॉरिक टाईम्स इन इंडिया''*, ओरिएंटल पब्लिशर्स, दिल्ली, १९७२.

[१४] गारे गोविंद, *''ट्रायबल इन ॲन अर्बन सेटिंग : अ सोशिओ इकॉनॉमिक स्टडी ऑफ महादेव कोळी''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७२.

[१५] संगवे विलास, *''आदिवासींचे सामाजिक जीवन''*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पान १७३–१८१.

[१६] गारे गोविंद, *''सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी''*, सहाध्याय प्रकाशन, मुंबई, १९७४.

[१७] गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, *''हेल्थ अँड न्यूट्रीशन प्रॉब्लेम्स ऑफ प्रिमिटीव्ह ट्राईब्ज इन महाराष्ट्र''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९७७.

[१८] गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, *''द ट्रूथ अबाऊट मालन्यूट्रीशन चाईल्ड डेथ''*, १९७७.

[१९] संपादक, *''आदिवासीतील व्यसनाधिनता''*, मौज दिवाळी विशेषांक, २४ ऑक्टोबर १९७८, पान ४२–४३.

[२०] घुर्ये जी. एस., *''कास्ट अँड रेस इन इंडिया''*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पान १३०.

[२१] गारे गोविंद, *''आदिवासी विकासात शिक्षणाची नवीन दिशा नवी आव्हाने''*, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे १९७९, पान २७.

[२२] व्यास एन. एस., मान आर. एम. (संपादित), *''द काथोडिज : ए ट्राईब इन ट्रान्झिट इन इंडियन ट्राईब्ज इन ट्रान्झिशन''*, रावत पब्लिकेशन्स, जयपूर व नवी दिल्ली, १९८०, पान १४.

[२३] हेमनडार्फ सी., *''द गोंड्स ऑफ आंध्रप्रदेश''*, विकास पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., नवी दिल्ली, १९८१.

[२४] लिमये अनुसया, *''आदिवासींची संस्कृती आणि शिक्षण''*, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, भाग –३, क्र. २, सप्टेंबर १९८१, पान ३२–३३.

[२५] संपादक, *''खोटे आदिवासी''*, दैनिक सकाळ, दि. २४ मार्च १९८१.

[२६] गारे गोविंद, *''संस्कृतीचे दर्शन घडविणारी आदिवासींची गाणी''*, 'हाकारा' वर्ष – ३, अंक –३ व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे ४, जुलै–डिसेंबर १९८२.

[२७] उपाध्याय अशोक, *''पिझंटिसेशन ऑफ अ आदिवासी इन ठाणे डिस्ट्रिक्ट १८१८–१९४७''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८२.

[२८] देवगांवकर एस. जी., *''द माडिया ऑफ भामरागड''*, स्टर्लिंग पब्लिकेशन, नवी दिल्ली, १९८२.

[२९] बाबर सरोजिनी, *''आदिवासी सण उत्सव''*, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, मे १९८३.

[३०] कॅम्पबेल बर्नार्ड, *''ह्युमन इकॉलॉजी''*, हाईनमन एज्युकेशन बुक्स, लंडन, १९८३.

[३१] गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, *''कॅनरा डिस्ट्रीक्ट गॅझेटियर''*, व्हॉल्युम १५, पार्ट १ गव्हर्मेंट प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९८३, पान २७–३०.

[३२] विनायक तुकाराम, *''आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समिक्षा''*, विजय प्रकाशन, नागपूर, १९८४.

[३३] पोळ ए. पी., *''इकॉलॉजिकल चेंजेस अमंग ट्रायबल्स ठाणे डिस्ट्रिक्ट''*, विद्यावाचस्पती प्रबंध, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, मुंबई, १९८५.

[३४] गारे गोविंद व जोशी सुधीर (संपादक), *''आदिवासी लोकगीते''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, जानेवारी १९८५, पान १–१५.

[३५] केदार अभिमन्यू, *''अकोले तालुक्यातील महादेव कोळी समाजाचा विकास''*, विद्यानिष्णात प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८६.

[३६] मसावी, मस्तानी आणि पंड्या गौरीश, *''द काथोडिज ऑफ गुजरात : द सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ डेव्हलपमेंट प्लान''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, अहमदाबाद, १९८७.

[३७] पिंगळे भिमराव, *''वनवासी व उपेक्षित जग''*, अभिनव जीवन प्रकाशन, बीड, १९९०.

[३८] कांबळे बी. एन., *''इंप्लिमेंटेशन ऑफ द सोशिओ इकॉनॉमिक प्रोग्राम्स फॉर द अपलिफ्ट ऑफ द शेड्युल्ड कास्ट अँड शेड्युल्ड ट्राईब इन इंडिया : अ सिलेक्टेड रिव्हीव्ह ऑफ द लिटरेचर''*, विद्यानिष्णात प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९०.

[३९] आत्रे त्रिं. ना., *''गुन्हेगारी जमाती''*, वरदा बुक्स, पुणे, १९९०.

[४०] राजवाडे वि. का., *''महिकावतीची बखर (पुर्नमुद्रीत)''*, वरदा प्रकाशन, पुणे, १९९१.

[४१] परूळेकर गोदावरी, *''माणूस जेंव्हा जागा होतो''*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९९२, पान ९२.

[४२] सामल जगबंधू, *''सम आस्पेक्ट्स ऑफ ट्रायबल इकॉनॉमी : अ केस स्टडी ऑफ कोरापुत डिस्ट्रीक्ट''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९२.

[४३] जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, *''मराठी विश्वकोश''*, खंड – २, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, १९९३, पान ४६०.

[४४] कुमार सुबोध, *''आश्रमशाळा : आदिवासी जीवनाच्या यशोमंदिराची वाटचाल''*, लोकराज्य, डिसेंबर १९९३, पान १२.

[४५] राजवाडे वि. का., *''कारस्कार''*, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथमाला (शके १८३४) खंड ४, १९९३, पान १२८–१२९.

[४६] रूडॉल्फ सी हेरिडिया व श्रीवास्तव राहुल, *''ट्रायबल आयडेन्टीटी अँड मायनॉरिटी स्टेटस : द कातकरी नॉमॅड्स इन ट्रान्झीशन''*, कॉन्सेप्ट पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, १९९४.

[४७] कांबळे बी. एन., *''इफेक्टिव्हनेस ऑफ डेव्हलपमेंटल प्रोग्राम्स फॉर द शेड्युल्ड कास्ट अँड शेड्युल्ड ट्राईब्ज इन महाराष्ट्रा''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९५.

[४८] मोकाशी जी. व्ही., बनकर एम. पी. व काटे, एं. सी., *''इम्पॅक्ट ऑफ जेनेटिक डिसऑर्डर्स ऑन हेल्थ प्रॉब्लेम्स अमंग पॉप्युलेशन, ग्रुप ऑफ महाराष्ट्रा''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९९५, पान ९९–१०८.

[४९] जैन नवीनचंद, त्रिभूवन (संपादित), *''ॲन ओव्हरव्ह्यू ऑफ ट्रायबल रिसर्च स्टडीज्''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, जानेवारी १९९५.

[५०] संपादक, *''हाकारा''*, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, ऑक्टोबर – डिसेंबर, १९९५, पान २७.

[५१] पटनाईक रेणूका, *''पॅटर्न ऑफ ऑक्युपेशनल अँड रिसोर्स युटिलायझेशन इन कॉन्ट्रस्टींग इकॉलॉजिकल सेटिंग : अ कम्पॅरेटिव्ह स्टडी ऑफ कातकरी, कोलाम अँड माडिया गोंड ऑफ महाराष्ट्रा''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९६.

[५२] अगरवाल नंदीनी, *''वनस्वर''*, (राणी दुर्गावती विशेषांक), वन साहित्य अकादमी, जबलपूर, जून १९९७, पान १५.

[५३] आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, *''इन्ट्रॉडक्शन ऑफ द प्रिमिटीव्ह ट्रायबल ग्रुप ऑफ महाराष्ट्रा''*, बेंच मार्क सर्व्हे (बी.एम.एस.) १९९७.

[५४] नेगी आर. एस. व गायकवाड जॉन, *''सोशिओ कल्चरल डायनॅमिक ऑफ डेव्हलपमेंट''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, जानेवारी १९९७.

[५५] भावे ह. अ., *''शिकार ते शेतकरी''*, वरदा बुक्स, पुणे, ऑक्टोबर १९९७.

[५६] वार्ताहर, *''मार्च महिन्यात ६ आदिवासींचा मृत्यू''*, टाईम्स ऑफ इंडिया, २८ मार्च १९९७.

[५७] वार्ताहर, *''हा करदात्याच्या पैशाचा गैरवापर''*, टाईम्स ऑफ इंडिया, २४ नोव्हेंबर १९९७.

[५८] वाचकांचा पत्रव्यवहार, *''दारू पिणारे धारातिर्थी पडले की आपत्तीने पडले''*, दैनिक सकाळ, २४ नोव्हेंबर १९९७.

[५९] गारे गोविंद, *''आदिवासी विकास योजना''*, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, १९९८.

[६०] गारे गोविंद (संपादित), *''अ रिव्ह्यू ऑफ ट्रायबल रिसर्च स्टडीज्''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, जानेवारी १९९८.

[६१] शर्मा एस. पी. व शर्मा जे. बी., *''कल्चर ऑफ इंडियन ट्राईब्ज : कॉन्सेप्ट अँड आयडेन्टिटी''*, व्हॉल्युम १, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली, १९९८.

[६२] सामल प्रसन्न के. (संपादित), *''ट्रायबल डेव्हलपमेंट ऑप्शन''*, ज्ञानोदय प्रकाशन, नैनीताल, १९९८.

[६३] गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्रा, *''अ ब्रिफ नोट ऑन द प्रिमिटीव्ह ट्रायबल ग्रुप इन महाराष्ट्रा''*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९९९.

[६४] जोशी अरूणा, *''तंट्या भिल्ल''*, ढोल, (आहिराणी विशेषांक), भाषा संशोधन केंद्र, बडोदा, २०००, पान २०.

[६५] गारे गोविंद, *''आदिवासी उपयोजनेचे मुल्यमापन होणे गरजेचे''*, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. २७ डिसेंबर २०००.

[६६] पटनाईक रेणूका, *''ट्राईब इकॉलॉजी अँड डेव्हलपमेंट''*, रजत पब्लिकेशन, जयपूर व नवी दिल्ली, २०००, पान १६४–१८६.

[६७] पसायत चित्रसेन, *''ट्राईब कास्ट अँड फोक कल्चर''*, रावत पब्लिकेशन, जयपूर व नवी दिल्ली, २०००.

[६८] भागवत मोहन, *''बिरसा मुंडा''*, भारत भारती, नागपूर, जुलै २000, पान ३८.

[६९] देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., *''आदिवासी विश्व''*, आनंद प्रकाशन, नागपूर, जुलै २००१, पान ६७–८९.

[७०] संपादक, *''हाकारा''*, दिशा २००१ (समालोचन विशेषांक), महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जून २००१, पान ६१.

[७१] कुलकर्णी शौनक श्रीनिवास, *''आदिम''*, सन पब्लिकेशन, पुणे, मे २००२.

[७२] गारे गोविंद, *''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती''*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००२, पान १०९–११०.

[७३] देशमुख भाऊसाहेब यशवंतराव, *''आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासी शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायांवर झालेला परिणाम : एक चिकित्सक अभ्यास''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, डिसेंबर २००२.

[७४] भामरे राजेंद्र पोपटराव, *''नासिक जिल्ह्यातील आदिवासी जीवन व विकास (१९00 ते १९८0)''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, सप्टेंबर २००२.

[७५] नाडगोंडे गुरूनाथ, *''भारतातील आदिवासी''*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००२, पान ३५३.

[७६] भामरे प्रशांत भिमसेन, *''ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांमध्ये लोकसंख्या, शिक्षणाची जाणीव, जागृती झालेली आहे की नाही याचा चिकित्सक अभ्यास करणे''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, नोव्हेंबर २००३.

[७७] लाड विठ्ठल, *''सह्याद्रीच्या कुशीतील घुसमटलेल्या कातकऱ्यांची कथा आणि व्यथा''*, संशोधन अहवाल, जाग संस्था, मालाड, मुंबई, २००३.

[७८] वैद्य नरेश कुमार, *''जनजातीय विकास मिथक एवं यथार्थ''*, रावत पब्लिकेशन्स, जयपूर व नवी दिल्ली, २००३.

[७९] रोंगटे तुकाराम बारकु, *''महाराष्ट्रातील आदिवासी मराठी नियतकालीकांचा चिकित्सक अभ्यास (१९५0 ते २००२)''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, मे २००४.

[८०] साळवे दत्ता, *'' जाणिवेने आम्हा ऐसे चेतविले''*, साधना प्रकाशन, पुणे २००४, पान ९.

[८१] कांबळे सदाशिव, *''जेव्हा कातकरी जागा होतो''*, मिळून साऱ्याजणी, ऑक्टोबर २००४, पान २८–३०.

[८२] पाटील वैशाली, *''घरठाण हक्क चळवळ''*, मिळून साऱ्याजणी (महिला विशेषांक), मार्च २००५, पान ४९–५०.

[८३] कांबळे सदाशिव, *''कातकरी समाजाची दयनिय अवस्था व परिवर्तनाची गरज''*, दैनिक सम्राट, दि. ०२ सप्टेंबर २००५.

[८४] पाटकर मेधा, *''अधिकारासाठी आदिवासींनी रस्त्यावर यावे''*, दैनिक लोकमत, दि. ५ जानेवारी २००५.

[८५] कांबळे सदाशिव, *''दुर्लक्षित कातकरी समाज''*, दैनिक सम्राट, दि. १० जानेवारी २००५.

[८६] कांबळे सदाशिव, *''कातकरी समाजाची दयनिय अवस्था व परिवर्तनाची गरज''*, दैनिक सम्राट, दि. ०१ सप्टेंबर २००५.

[८७] जाधव छाया, *''एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ कालखंडातील अभ्यास व मुल्यमापन (विशेष संदर्भ : आंबेगांव तालुका, जि. पुणे)''*, विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, २००५.

[८८] रिपोर्टर, *''डे आफ्टर सम रिलीफ फॉर बुक विक्टीस''*, इंडियन एक्सप्रेस, दि. १८ डिसेंबर २००५.

[८९] संपादक, *''नारी समता मंच व कातकरी श्रमिक संस्था आयोजित कातकरी मेळावा''*, मिळून साऱ्याजणी (महिला विशेषांक), मार्च २००५, पान ४५.

[९०] वार्ताहर, *''फ्रेंच पॉलिश मिसळलेल्या दारूने सहा मजूरांचा बळी''*, दैनिक सकाळ, दि. १८ डिसेंबर २००५.

[९१] वार्ताहर, *''खोपडी पिऊन मावळ तालुक्यात सहा मृत्यूमुखी''*, दि. १८ डिसेंबर २००५.

[९२] वार्ताहर, *''दारूसाठी आम्ही कोठेही मजूरी करतो''*, दैनिक सकाळ, दि. १८ डिसेंबर २००५.

[९३] कांबळे सदाशिव, ''दुर्लक्षित कातकरी समाज'', दै. सम्राट, दि. १० जानेवारी २००६.

[९४] वार्ताहर, *''कातकरी मुले सुधारगृहात''*, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. ४ सप्टेंबर २००६.

[९५] बोकील मिलिंद, ''कातकरी विकास की विस्थापन?'', मौज प्रकाशन गृह, पुणे, २००६, पान १३.

[९६] गुजराथी कल्याण कुमार, *''आदिवासी विकासासाठी पुरेशी तरतुद हवी''*, दैनिक सकाळ, दि. ११ एप्रिल २००९.

[९७] जोशी सिताराम, *''आदिवासींसाठी स्वतंत्र शेतीविषयक धोरण हवे''*, दैनिक सकाळ दि. ११ एप्रिल २००९.

[९८] ढमाले किशोर, *''आदिवासींच्या पारंपारिक व्यवसायाला मदत मिळाव''*, दैनिक सकाळ, दि. ११ एप्रिल २००९.
[९९] तुपे संतोष, *''आदिवासी वस्त्यांवर पुर्ण वेळ डॉक्टरांची गरज''*, दैनिक सकाळ, दि. ११ एप्रिल २००९.
[१००] बुरसे एकनाथ, *''शिक्षणासंबंधीच्या योजना नव्याने सुरू कराव्यात''*, दैनिक सकाळ, दि. ११ एप्रिल २००९.
[१०१] सावंत विनय, *''एकजूट दिवाळी विशेषांक''*, अकोले २००९, पान ३९.

### प्रकरण चौथे

# पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्र : एक दृष्टिक्षेप

४.१ प्रस्तावना

४.२ पुणे जिल्ह्याची संक्षिप्त ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.३ पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

४.४ पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ

४.५ पुणे जिल्ह्याची प्राकृतिक रचना

४.६ नद्या व धरणे

४.७ जिल्ह्याचे हवामान व पर्जन्यमान

४.८ वनक्षेत्र व वन उत्पादने

४.९ मत्स्य व्यवसाय

४.१० लोकसंख्या

४.११ लोकसंख्येची घनता

४.१२ अनुसूचीत जाती जमातीची लोकसंख्या

४.१३ कातकरी लोकसंख्या

४.१४ स्त्री पुरूष प्रमाण

४.१५ लोकसंख्येचे वयोगट

४.१६ साक्षरता

४.१७ प्रशासकीय विभाग

४.१८ वाहतूक व दळण वळण सुविधा

४.१९ बँका

४.२० कृषी बाजारपेठा

४.२१ पशुसंवर्धन पशुधन

४.२२ दुग्ध व्यवसाय

४.२३ वीज

४.२४ शिक्षण

४.२५ पाणी पुरवठा

४.२६ निवासी घरे व कुटूंबे

४.२७ जमीनीच्या धारण क्षेत्राची रचना

४.२८ पिकाचे स्वरूप

४.२९ उद्योग व व्यापार

४.३० पुणे जिल्ह्यातील आदिवासी

४.३१ सारांश

संदर्भ सूची

प्रकरण चौथे

# पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्र : एक दृष्टिक्षेप

## ४.१ प्रस्तावना :

पुणे हा औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या एक अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्र्वभूमी लाभलेली आहे. प्राचीन काळापासून पुणे अग्रस्थानी राहिले आहे. आजही पुणे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक, आर्थिक चळवळीचे केंद्र मानले जाते. महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याकडे पाहिले जाते. पुणे जिल्ह्यात कातकरी सारखी अतिमागास आदिवासी जमात अनेक वर्षापासून व अनेक पिढ्यांपासून वास्तव्य करून आहे. या जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक पार्श्र्वभूमीचा परिणाम झाला आहे. पुणे जिल्हा आणि आदिवासी मधील सर्वात खालच्या स्तरातील जीवन जगणारी कातकरी आदिवासी जमात यांची सांगड घालताना एक अभ्यास क्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्यातील सर्वांगीण परिस्थितीचा आढावा घेणे संयुक्तिक ठरते. अभ्यास क्षेत्रातील परिस्थितीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम त्या क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या विकासावर होत असतो. म्हणून कातकरी जमातीच्या सामाजिक–आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यापूर्वी अभ्यासक्षेत्राची पार्श्र्वभूमी जाणून घेणे संयुक्तिक ठरते.

## ४.२ पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी :

२००० वर्षापासून पुणे आणि आसपासचा भाग भरभराटीस आला आहे. या भागावर वेगवेगळ्या काळात राज्य केले गेले. पहिल्या शतकात आंध्रभृत्य किंवा शटकर्णी वंशाच्या बेदिश्री राजाच्या अधिपत्याखाली हा मुलुख होता. दुसऱ्या शतकात बौद्ध धर्माचा प्रभाव अधिक असल्याचे लेण्यातील शिलालेखांवरून आढळते. आंध्रभृत्य वंशाचे राज्य

येथे चौथ्या शतकापर्यंत असल्याचे आढळून येते. त्यानंतरच्या ९०० वर्षांच्या काळात पुणे विभागात कोणतेही प्रभावी सरकार अस्तित्त्वात असल्याचे आढळून येत नाही.

पुण्याचे प्राचिनत्व दाखविणारा लिखित पुरावा म्हणजे राजा कृष्णदेवराय यांच्या दानपत्रात पुण्याला पुण्यविषय (इ. स. ७५८) असे नोंदले आहे. नंतर पुनक विषय (इ. स. ७६८), नंतर पुणक विषय (इ. स. ९९३), नंतर पुनवडी तसेच कसबे पुणे तर अलिकडे पुणे शहर असे नांव प्राप्त होत आले आहे असे मानले जाते[१].

'पुणे' हे नाव 'पुण्य', पुण्यपूरी किंवा पुण्यपटण या शब्दापासून आले असावे. तसेच पुणे शहराच्या मध्य भागापासून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांच्या संगमावरूनही कदाचित पुणे हे नाव पडले असावे असे जाणकारांचे मत आहे.

१० व्या शतकातील राष्ट्रकूट साम्राज्यकालीन शिलालेखांत पुण्यक असा पुणे शहराचा उल्लेख आढळतो. 'पुण्यक' या शब्दाचा अपभ्रंश होऊन पुणे हे नाव अस्तित्त्वात आले असावे. त्यानंतर ब्रिटीश काळात पुणे चे ''पूना'' असे नामकरण झाले. मागील १० ते १५ वर्षात पूना चे पुन्हा पुणे अशी सरकारी दफ्तरात नोंद झाली आहे[२].

इ. स. ५५७ ते इ. स. ९३७ पर्यंत येथे चालुक्य आणि राष्ट्रकुट घराण्यांनी राज्य केले असावे. राष्ट्रकुटच्या राजवटीतच पुनक अथवा पुण्यक नगरास (हल्लीच्या पुण्यास) जिल्ह्याचे प्रमुख ठाणे करण्यात आले. इ. स. १२९४ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीच्या यादवाचा पराभव केल्यानंतर आणि इ. न. १२३८ मध्ये महंमद तुघलकाने दौलताबाद (देवगिरी) राजधानीवरून तेथे आपले ठाण मांडल्यामुळे या भागात मुसलमानी राजवट आली.

बहामनी राजाच्या कालावधीत पुणे भागात शांतता आणि सुव्यवस्था मिळाल्याने (१३४७ ते १४९०) हा काळ भरभराटीचा गेला. इ. स. १३९६ ते १४०७ या अकरा वर्षात मात्र दुर्गादेवीच्या भयंकर दुष्काळाने लोकांना पछाडले, परंतु मलिक उल तुजर याने कसण्यास तयार असणाऱ्या लोकांना जमिनी वाटल्या आणि गावाची पुर्नरचना करण्याचा कसोशिने प्रयत्न केला. त्याने आपली राजधानी चाकण येथे आणली होती. महंमद गावान

या बहामनी राजाच्या मंत्र्यानेही राज्यव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर निजाम उल्मुकाकडे राज्यव्यवस्था गेली. त्याचा मुलगा मलिक अहमद ज्याने पुढे निजामशाहीची स्थापना केली. त्याने आपली राजधानी चाकणहून जुन्नरला आणली. चाकणचा सुभेदार शैनुद्दिन याने १४८६ मध्ये शहाविरूद्ध बंड पुकारले. याचवेळी अनेक मराठा किल्लेदारांनी निजामशाही झुगारून देण्याचा प्रयत्न केला. शिवनेरी येथील हिंदू किल्लेदाराचा बिमोड करून मलिक अहमदने इ. स. १४८६ मध्ये बहामनी राज्याचे नियंत्रण झुगारून स्वतंत्र निजामशाही स्थापन केली. म्हणून महंमद शहा बहामनी (तिसरा) याने विजापूरच्या युसुफ आदिलखान आणि चाकणचा शैनुद्दिन यास त्याचा बिमोड करण्यास सांगितले. विजापूरच्या युसुफ आदिलखानने यावेळी अली अहमदचा कित्ता गिरवून बहामनी सत्ता झुगारली म्हणून मलिक अहमदला चाकण घेणे शक्य झाले.

मलिक अहमद नंतर बुऱ्हाण निजाम निजामशाहीच्या गादीवर आला. त्याने जुन्नरला राजधानी केली. भावर सेन नावाच्या हिंदूस आपला मंत्री (पेशवा) म्हणून नेमले. १५६२ मध्ये हुसेन निजामशहा या निजामशाहीच्या तिसऱ्या वारसाने विजयनगराच्या रामराज्यापासून आणि अली आदिलशहापासून संरक्षण मिळावे म्हणून जुन्नर भागातील दऱ्याखोऱ्यांत आश्रय घेतला. त्याला इ. स. १५९५ मध्ये मोगलांच्या हल्ल्यास तोंड द्यावे लागले.

शहाजी राजे यांनी इ. स. १६३० मध्ये निजामशाहीचा संबंध तोडून पुण्यास बस्तान बसविले व आपल्या पुण्याकडील जहागिरी कायम केल्या. विजापूरच्या भागातील आपल्या जहागिरी घेण्यास ते कर्नाटकला गेले त्यावेळी शिवनेरीवर शिवाजी महाराजांचा जन्म झाला.

पुढे शहाजहान बादशहाच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांनी पुण्याच्या उत्तरेकडील आणि वायव्येकडील भाग आलप्या अधिपत्याखाली आणला. इ. स. १६५७ मध्ये महाराजांनी जुन्नरवर स्वारी करून तो भाग परत मिळविला होता. शहाजी राजांच्या

मृत्युनंतर शिवाजी महाराज व औरंगजेब यांच्या उघडपणे वैर निर्माण होऊन पुणे विभागात सतत युद्धाचे वातावरण राहिले.

पुढे इ. स. १७१४ मध्ये बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली आणि इ. स. १७४९ पासून पुणे हे मराठी राज्याचे महत्त्वाचे केंद्र बनले. १७५१ मध्ये निजाम मराठी राज्यावर स्वारी करून पुण्यापर्यंत आला होता. परंतू मराठी सैन्याने त्याला परत पाठविले. इ. स. १७६० च्या उदगिरच्या लढाईत निजामाचा पराभव झाल्यानंतर शिवनेरी किल्ला मराठ्यांकडे आला. इ. स. १७६९ मध्ये जानोजी भोसले यांनी पुणे लुटण्याचा प्रयत्न केला, परंतू त्याचा बिमोड करण्यात आला.

इ. स. १८०३ ते १८०४ साली पडलेल्या दुष्काळात पुणे उजाड झाले. नोव्हेंबर १८१७ मध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या पराभवानंतर पुण्यात इंग्रजी अंमल सुरू झाला. इंग्रजांनी एकामागून एक सिंहगड, पुरंदर वगैरे किल्ले घेतले आणि बाजीरावांच्या स्वाधिन केले.

सैनिक सुरक्षिततेसाठी ब्रिटीशांनी जुन्नर व शिरूर येथे सैन्यदळ ठेवले. माऊंट स्टूअर्ट एल्फिस्टंट यास कंपनी सरकारने पुणे विभागाचे कमिशनर नेमले. त्याने कॅ. एच. डी. रॉबर्टसन यांची पुण्याचे कलेक्टर आणि न्यायाधिश म्हणून नेमणूक केली.

इ. स. १८२६ ते १८३० या काळात उमाजी नाईक यांनी रामोशांना संघटीत करून ब्रिटीश सत्तेविरूद्ध बंड केले. परंतु उमाजी नाईकास पकडल्यानंतर ते बंड शमले. त्यानंतर कोळी लोकांनी १८३० मध्ये आणि त्यांचे भाऊ खरे चिमणाजी जाधव, नाना दरबारे यांनी इ. स. १८३९ ते १८४६ या काळात बंड केले. परंतु तेही अयशस्वी झाले. इ. स. १८७९ मध्ये वासूदेव बळवंत फडके यांनी केलेल्या रामोशांच्या उठावानंतर ही बंडे कायमची शमली.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पुणे हे सामाजिक सुधारणेचे महत्त्वाचे केंद्र बनले. न्यायमुर्ती रानडे, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर इत्यादिंनी अस्पृश्य निवारण, स्त्री स्वातंत्र्य इ. साठी पुण्यातील पुराण मतवाद्यांविरूद्ध जोराची चळवळ केली.

पुणे मागील २०० ते २५० वर्षांपासून बदलत आले आहे. महाराष्ट्रात मुंबई नंतर पुण्याचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक क्षेत्रातील

विकासात दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या इतिहासात पुण्याचे महत्त्वाचे योगदान आहे. इतिहासातील अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिवर्तने पुण्याने अनुभवली आहेत. त्यामुळे पुणे चळवळीचे माहेर घर म्हणून ओळखले जाते.

नाणे घाट आणि भोर घाटाच्या मुखाशी आणि घाटमाथा प्रदेशाच्या पूर्वेकडील पुणे जिल्ह्याचा हा प्रदेश वसाहतीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला गेला आहे. २000 वर्षांपासून ते आजतागायत पुणे शहर हे कोकण आणि घाटावरील व्यापारासाठी महामार्गावरील महत्त्वाचे केंद्र आहे.

चालुक्य, आंध्र, राष्ट्रकुट आणि यादव कालीन साम्राज्यात पुण्यास व्यापार आणि वाणिज्यामुळे अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. मध्ययुगीन काळातील 'बहामनी', निजामशाही, आदिलशाही या इस्लामी राजवटीत व मराठा व ब्रिटीश राजवटीत पुण्यास तेवढेच महत्त्व होते जेवढे भारताच्या स्वातंत्र्यानंतरही टिकून आहे. पुण्याच्या इतिहासात पेशवाईला अनन्य साधारण महत्त्व होते[३].

१८२० साली पुणे जिल्ह्यात १२१३ एवढी खेडी होती. १८९१ च्या जनगणनेनुसार खेड्यांची ही संख्या १८२६ पर्यंत वाढत गेली. ही सर्व खेडी एकूण ९ विभागात विभागली होती. त्या विभागातूनच तालुक्याची निर्मिती झाली. ते उपविभाग पुढीलप्रमाणे आहेत. (१) पुणे शहर (२) हवेली (३) भिमथडी (४) इंदापूर (५) खेड (६) पुरंदर (७) मावळ (८) शिवनेर किंवा जुन्नर (९) पाबळ इ.

१८६६–६७ साली पाबळ उपविभाग बरखास्त करून अहमदनगर जिल्ह्यातील कांही भाग व इतर खेडी मिळून शिरूर तालुका निर्माण केला. मावळ उपविभागातून मुळशी पेठ विभाग वेगळा करून तो हवेली तालुक्यात समाविष्ट करण्यात आला. १८७८ साली भिमथडी उपविभागाचे मुख्यालय सुपे, बारामती येथे हलविण्यात आले आणि १८९२ साली पेठ सुपे (शिरूर) दौंड तालुक्यात समाविष्ट करण्यात आले. १९१७ ते १९२१ दरम्यान पुणे शहर हा वेगळा तालुका म्हणून निर्माण केला गेला. १९४९ मध्ये भिमथडी

तालुक्याचे बारामती तालुका असे नामकरण केले. १९४७ ते १९४९ साली आंबेगांव, दौंड, शिरूर, मुळशी या पेठांना स्वतंत्र तालुक्याचा दर्जा देण्यात आला.

भोर संस्थानातील काही भाग उत्तर सातारा जिल्ह्यास जोडून भोर तालुका निर्माण केला. १९४९ साली पुन्हा भोर तालुक्यातून वेल्हे तालुका वेगळा करण्यात आला आणि संपूर्ण पुणे जिल्हा १९५६ साली मुंबई इलाख्यास जोडण्यात आला.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या काळात पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके अस्तित्त्वात आले ते पुढीलप्रमाणे – (१) खेड (२) आंबेगांव (३) जुन्नर (४) मावळ (५) मुळशी (६) वेल्हे (७) भोर (८) हवेली (९) पुरंदर (१०) बारामती (११) इंदापूर (१२) पुणे शहर (१३) शिरूर (१४) दौंड इ.

१९६१ व १९७१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यात एकूण २२ शहरे होती तर १९८१ ते १९९१ च्या दशकात शहरांची संख्या २६ वर पोचली होती. उदा. हडपसर, कळस, सांगवी, हवेली, शिवथरघळ, वडगांव आणि कुरण बु. ही गावे वर्गीकृत गावे म्हणून समाविष्ट करण्यात आली[४].

## ४.३ पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :

पश्चिम घाटाचा घाटमाथा प्रदेशापासून पूर्वेकडे १५० कि.मी. पर्यंत तसेच उत्तरेस भिमा नदी आणि पश्चिमेस निरा नदीच्या दरम्यानचा संपूर्ण प्रदेश पुणे जिल्हा म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७ अंश ५५ मिनिटे ते १९ अंश २४ मिनिटे उत्तर अक्षांश आणि रेखावृत्तीय विस्तार ७३ अंश १९ मिनिटे ते ७५ अंश १० मिनिटे पूर्व रेखांश असा आहे.

पुणे जिल्ह्याचा पश्चिम भाग विस्तिर्ण असून पूर्वेकडे तो निमुळता होत जातो. उत्तरेस अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, पारनेर, श्रीगोंदा तालुके तर दक्षिणेस सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा, फलटण तालुके सिमेवर आहेत. जिल्ह्याच्या पूर्वेस सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुका तर पश्चिम सिमेवर रायगड जिल्ह्यातील रोडा,

पेण, पनवेल, माणगांव व महाड हे तालुके तर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुके पुणे जिल्ह्याच्या सिमेवर वसलेले आहेत[५].

## ४.४ पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ :

२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ७२.२४ लाख एवढी होती. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १५६४२ चौ. कि. मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५ टक्के आहे. क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्रात पुणे जिल्ह्याचा चौथा तर लोकसंख्येच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो.

जिल्ह्याची पश्चिम सीमा १३० कि. मी. लांबीची असून दक्षिण सीमा २१० कि. मी. लांबीची आहे. घाटमाथा प्रदेशाची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची २००० फूट असून पूर्वेकडे ही उंची कमी क्षेत्रफळ कमी होत जाते.


खालील तक्त्यावरून पुणे जिल्ह्यात सर्वाधिक क्षेत्रफळ असणारा तालुका शिरूर आहे. जिल्ह्याच्या क्षेत्रफळात शिरूर तालुक्याचा हिस्सा १० टक्के आहे. पुणे शहर तालुक्याचे सर्वात कमी म्हणजे १ टक्का आहे. आंबेगांव, मुळशी, मावळ, पुरंदर या तालुक्यांचे प्रत्येकी ७ टक्के क्षेत्रफळ आहे. दौंडचे ८ टक्के क्षेत्रफळ आहे. इंदापूर, बारामती, हवेली, खेड, जुन्नर यांचे प्रत्येकी ९ टक्के क्षेत्रफळ आहे. भोर व वेल्हे तालुक्याचे अनुक्रमे ६ टक्के व ३ टक्के क्षेत्रफळ आहे[६].

**तक्ता क्र. ४.१ : पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ (सन २००१)**

| तालुका | क्षेत्रफळ (हेक्टरमध्ये) | टक्केवारी | तालुका | क्षेत्रफळ (हेक्टरमध्ये) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. जुन्नर | १,३८,४५२ | ९ | ८. पुणे शहर | ११,९१० | १ |
| २. आंबेगांव | १,०४,२७५ | ७ | ९. दौंड | १,२८,९८६ | ८ |
| ३. शिरूर | १,५५,७२७ | १० | १०. पुरंदर | १,१०,३५३ | ७ |
| ४. खेड | १,३७,३५४ | ९ | ११. वेल्हे | ४९,९५५ | ३ |
| ५. मावळ | १,१३,१३५ | ७ | १२. भोर | ८९,२३४ | ६ |
| ६. मुळशी | १,०३,९३१ | ७ | १३. बारामती | १,३८,२४८ | ९ |
| ७. हवेली | १,३३,६२७ | ९ | १४. इंदापूर | १,४६,७९१ | ९ |
| | | | **एकूण** | **१५,६२,०५८** | **१००** |

**आधार :** पुणे जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन, २००६-०७.

आलेख ४.१ : पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ (सन २००१)




## ४.५ पुणे जिल्ह्याची प्राकृतिक रचना :

पुणे जिल्हा सह्याद्रीच्या डोंगररांगांनी व्यापलेला असून मुख्य सह्याद्री कड्यापासून या डोंगररांगांचा विस्तार पूर्व पश्चिम असा झाला आहे. सह्याद्री पर्वतात हरिश्चंद्रगड, तसुबाई, भिमाशंकर, शिंगी इत्यादी उंच शिखरे आहेत. उत्तर सीमेवर असलेला हरिश्चंद्रगड (४६७० फूट), जीवधन (१००० फूट), राजगड, तोरणा हे किल्ले आहेत. जिल्ह्याच्या डोंगराळ भागात बोर किंवा खंडाळा, वरंध, माळशेज, नाणेघाट, ढाक, आहुपे घाट, पुण्याजवळ कात्रज व दिवे इत्यादी घाट आहेत.

पुणे जिल्ह्यातील भिमा नदीचे सर्वात मोठे खोरे आहे व त्याचा बहुतेक भाग सपाट मैदानाचा आहे. सह्याद्रीचा पूर्व भाग डोंगराळ व टेकड्यांचा आहे. या प्रदेशात नद्यांची खोरी आहेत. जिल्ह्याचा मध्य व पूर्व भाग सपाट आहे. हा प्रदेश पठार म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात भिमा व तीच्या उपनद्यांची खोरी आहेत.

भिमाशंकर येथूनच भिमा नदीचा उगम होतो. तेथून भिमा नदी खेड, शिरूर तालुक्यातून पूर्वेकडे वाहात जाते. ही नदी जिल्ह्यातील सर्वात मोठी व मुख्य नदी आहे. या व्यतिरिक्त लोणावळ्याजवळील राजमाची, नागफणी कडा, उभा कोकण कडा ही देखील जिल्ह्यातील पश्चिमेकडील प्राकृतिक वैशिष्ट्ये आहेत.

कुकडी, भिमा, इंद्रायणी, पवना, मुळा, मुठा, मिना, गुंजवणी या नद्यांच्या खोऱ्यामुळे पुणे जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगरपट्टा आणि विस्तृत लांब दऱ्यांनी व्यापलेला आहे.

जिल्ह्यातील जमीन उंच सखल असल्यामुळे घाटमाथा, मावळ व पठार असे जिल्ह्याचे स्वाभाविक भाग पडतात. जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी, वेल्हे व भोर हे तालुके घाटमाथ्यावर असून उर्वरित आठ तालुके पठारी भागात आहेत. पुणे जिल्ह्याचे पठार सपाट नाही. पठाराचा पश्चिम कडा खूपच उंच आहे. पुणे जिल्ह्यात सह्याद्री पर्वताच्या रांगा विखूरलेल्या आहेत. त्या रांगा उत्तरेकडून दक्षिणेकडे पसरल्या आहेत. हरिश्चंद्र पर्वत, जीवनधान आणि ढाक आहुपे या तीन महत्त्वाच्या डोंगररांगा आहेत[७].

पुणे जिल्ह्यात काळी, तांबडी व किरमीजी रंगाची जमीन आहे. पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतशी जमीन कसदार व सुपीक होताना दिसते. पश्चिमेकडील तालुक्यात ती तांबडी व हलकी आहे. चिंचवड जवळ मजबूत व टिकाऊ दगडाच्या खाणी आहेत. एरंडवणे, पाषाण या भागात शिरगोळे गारेचे दगड, रंगासाठी लोणारी व गेरूची लाल माती सापडते. जिल्ह्यात पूर्व भागात चुनखडी सापडते. पुणे जिल्ह्यास वैशिष्ट्यपूर्ण प्राकृतिक रचना वैभव प्राप्त करून देते.

## ४.६ नद्या व धरणे :

पुणे जिल्ह्याच्या अर्थकारणात जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांचे मोठे योगदान आहे. सह्याद्रीच्या घाटमाथा प्रदेशातून अनेक छोट्या मोठ्या नद्यांचा उगम होऊन त्या सर्व नद्या

पूर्वेकडे वाहात जाऊन भिमा नदीस मिळतात. त्यामुळे जिल्ह्यातील बहुतेक क्षेत्र भिमेच्या पाणलोट क्षेत्राने व्यापलेले आहे.

पुणे जिल्हा सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगांमध्ये वसलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पश्चिमेकडील प्रत्येक तालुक्यात किमान एक तरी नदी उगम पावते व प्रत्येक तालुक्यातून एक तरी नदी वाहताना दिसते. भिमा ही नदी जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वतातील भिमाशंकर येथे ती उगम पावते. दक्षिणपूर्व वाहत जाऊन भिमा नदी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते. भिमा नदीच्या डाव्या बाजून वेळू, घोड आणि उजव्या बाजून भामा, इंद्रायणी, मुळा व मुठा अशा उपनद्या आहेत.

पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर नीरा नदी आहे. कऱ्हा, कुकडी, पवना, मीना, गुंजवणी, पुष्पवती, शिवगंगा अशा अन्य नद्या पुणे जिल्ह्यातून वाहतात. या सर्व नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात तर उन्हाळ्यात कोरड्या पडतात. उत्तरेस वेळ, घोड, इंद्रायणी, मुळा, मुठा, दक्षिणेस निरा उपनद्या भिमा खोऱ्यात येतात. पावसाळ्यात भिमेसह सर्व उपनद्या दुथडी भरून वाहतात. उन्हाळ्यातील स्थिती याऊलट असते.

याव्यतिरिक्त कुकडी, मिना, अंध्र, कऱ्हा, शिवगंगा, पुष्पावती व पवना या उपनद्या वरील नद्यांना जाऊन मिळतात. नाणेघाटाजवळील चावडेच्या डोंगरातून कुकडी नदीचा उगम होऊन पुढे जवळजवळ ५० कि. मी. अंतर वाहात जाऊन शेवटी पारनेर तालुक्यात घोड नदीस मिळते. मिना नदीचा जुन्नरच्या पश्चिमेस उगम होतो. पावसाळ्यात मिनेच्या पुरामुळे शेतीचे मोठे नुकसान होते. नारायणगांव जवळील कुसूर येथे मिना नदीवर छोटे धरण बांधले आहे. ही नदी पुढे पारगांव जवळ घोडनदीस मिळते. लोणावळ्याच्या उत्तरेस असलेली अंध्र नदी राजमाची परिसरातून उगम पावते. त्यानंतर दक्षिण पूर्वेकडे वाहत जाऊन राजपुरीजवळ इंद्रायणीस मिळते. पुणे जिल्ह्यातील अंध्र नदीचे खोरे सर्वात सखल व सपाट मैदानी म्हणून ओळखले जाते. जिल्ह्याच्या दक्षिण पूर्व भागात असणारी कऱ्हा नदी पुरंदर किल्ल्याच्या उत्तर पश्चिम भागातून उगम पावते. कऱ्हा नदी जवळ जवळ १००

कि. मी. चा प्रवास करून शेवटी नरसिंगपूर जवळ निरेस जाऊन मिळते. पुरंदर व बारामती तालुक्याचे बरेच क्षेत्र या नदीच्या पाणलोट क्षेत्राने व्यापलेले आहे.

पुणे शहराच्या दक्षिणेस कात्रज बोगदा ओलांडल्यानंतर शिवगंगा खोरे लागते. शिवगंगेचा उगम सिंहगडाच्या दक्षिण उतारावर होतो. पुढे ती पूर्वेकडे (१० कि.मी.) व नंतर दक्षिणेस (१६ कि.मी.) नसरापूरपर्यंत वाहात जाऊन शेवटी गुंजवणी नदीस मिळते. जिल्ह्याच्या उत्तर भागात असलेली पुष्पावती नदी माळशेजच्या डोंगररांगांमधून उगम पावते. ती पुढे जुन्नर, बेल्हे भागातून वाहत जाऊन कुकडीस मिळते. या नदीवर पिंपळगांव जोगा येथे छोटे धरण बांधण्यात आले आहे. पुणे शहर मुळा, मुठा नद्यांच्या संगमावर वसलेले आहे[८].

पुणे जिल्ह्यातील जवळजवळ प्रत्येक नदीवर किमान एक तरी धरण आहे. व्यंकोजी सागर, घोड प्रकल्प, खडकवासला, पानशेत, वरसगांव, पवना, येडगांव, माणिकडोह, डिंभे, वडज, पिंपळगाव, चासकमान, पुष्पावती, नाझरे, वडीवळे, गुंजवणी इ. होत. पुणे जिल्ह्यात सन २000 पर्यंत ४ मोठे प्रकल्प, ९ मध्यम प्रकल्प व ४५ लघू प्रकल्प पूर्ण झाले होते. महाराष्ट्रातील एकूण धरणापैकी सर्वाधिक धरणे पुणे जिल्ह्यात आहेत. धरणांचा जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याला ओळखले जाते. याचे मुख्य कारण म्हणजे पुणे जिल्ह्यात पश्चिम भागात सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा विखुरलेल्या आहेत. या परिसरात प्रचंड पाऊस पडतो. पर्वत रांगांच्या तीव्र उतारामुळे नद्यांचा उगम पश्चिम भागात दिसतो. त्यामुळे पावसाचे पाणी साठविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सिंचन प्रकल्प उभारण्यात आले आहेत.

## ४.७ जिल्ह्याचे हवामान व पर्जन्यमान :

संपूर्ण पुणे जिल्ह्यास दक्षिण पश्चिम मान्सून वाऱ्यांपासून पाऊस मिळतो. हा मोसमी पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीत पडतो. जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात सरासरीपेक्षा सर्वात जास्त पाऊस पडतो. जिल्ह्याची एकूण सरासरी पर्जन्य

आकडेवारी पाहता तीन विभाग पडतात. (१) जास्त पावसाचा प्रदेश : जुन्नर, आंबेगाव, खेड, वेल्हे, मुळशी, भोर इ. (२) मध्यम पावसाचा प्रदेश: शिरूर, हवेली, सासवड, दौंड (३) मध्यम ते कमी पावसाचा प्रदेश : बारामती व इंदापूर.

खालील तक्त्यावरून सर्वाधिक म्हणजे २८०९.३ मि.मी. सरासरी पर्जन्य वेल्हे तालुक्यात असल्याचे दिसून येते तर सर्वात कमी दौंड तालुक्यात ४६४.६ मि.मी. सन २००५ मध्ये वेल्हे तालुक्यात सर्वाधिक पर्जन्य झाले होते ते ६३२०.६ मि.मी. एवढे होते[९].


यावरून जिल्ह्याच्या पश्चिम भागात सर्वाधिक पाऊस दिसतो. जिल्ह्यात पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडतो. पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी होत जातो. अगदी पूर्वेच्या टोकास ६०० ते ७०० मि.मी. पाऊस पडतो तर पश्चिमेस ११७१ मि.मी. पाऊस पडतो.

**तक्ता क्र. ४.२ : पुणे जिल्ह्यातील निवडक पर्जन्य केंद्रातील सरासरी पर्जन्य (सन २००५)**

| तहसिल | सरासरी पर्जन्य | वर्ष २००५ मधील | | सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य (मि.मी.) | |
| १. पुणे शहर | ६७३.८ | ६९ | १२३९.५ | १८४.० |
| २. खेड | ६८२.७ | ५३ | ९७३.१ | १४२.५ |
| ३. आंबेगांव | ७६९.५ | ५७ | १०२५.० | १३३.२ |
| ४. जुन्नर | ७६२.१ | ६० | १३४४.४ | १७६.४ |
| ५. शिरूर | ५०७.५ | ३४ | ४६०.० | ९०.६ |
| ६. दौंड | ४६४.६ | ३९ | ७४२.२ | १५९.८ |
| ७. इंदापूर | ५०७.६ | ३२ | ६९६.१ | १३७.१ |
| ८. बारामती | ४७४.० | ३३ | ७११.० | १५०.० |
| ९. पुरंदर | ५८१.५ | ५६ | ११५८.० | १९९.१ |
| १०. भोर | ९९७.० | ७५ | १७१४.० | १७१.९ |
| ११. वेल्हे | २८०९.३ | ९२ | ६३२०.६ | २२५.० |
| १२. मुळशी | १५४५.० | ७९ | २८७५.८ | १८६.१ |
| १३. मावळ | ११७१.५ | ७३ | २५६१.० | २१८.६ |
| १४. हवेली | ६७३.७ | ७१ | १२५०.४ | १८५.६ |

**आधार :** मुख्य सांख्यिकी, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
पुणे जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन, २००५–०६

**आलेख ४.२ : पुणे जिल्ह्यातील निवडक पर्जन्य केंद्रातील सरासरी पर्जन्य (सन २००५)**




पुणे जिल्ह्यामध्ये हवामान उष्ण असते. पूर्वेकडील इंदापूर, दौंड व बारामती या तालुक्यात हवामान उष्ण असते तर पश्चिमेकडे थंड होत जाते. लोणावळा व खंडाळा ही जिल्ह्यातील दोन थंड हवेची ठिकाणे आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण प्राकृतिक रचना, पश्चिम भागातील उंच पर्वत रांगा व पूर्वेकडील मैदानी प्रदेश यामुळे पुणे जिल्ह्याचे तापमानही भिन्न आढळते. समुद्रसपाटीपासून ६00 मी. उंचीवर वसलेला पुणे जिल्हा उबदार व अल्हाददायक हवामानासाठी प्रसिद्ध आहे. सह्याद्रीच्या पर्जन्य छाया प्रदेशात असल्यामुळे पुणे शहर व जिल्ह्यात हवेची तीव्रता सरासरीपेक्षा कमी आढळते. जून ते सप्टेंबर या पर्जन्यकाळातही जिल्ह्यातील सापेक्ष आर्द्रता ८७ टक्क्यांची मर्यादा ओलांडत नाही. मार्च व एप्रिल मधील उन्हाळ्यातही सापेक्ष आर्द्रता सरासरीच्या जवळ असते[१०].

## ४.८ वनक्षेत्र व वन उत्पादने :

पुणे जिल्ह्यात १९९१.८९ चौ. कि.मी. इतके वनक्षेत्र आहे. यापैकी १६८९.६६ चौ. कि.मी. वनविभागाच्या ताब्यात आहे तर ३०२.२३ चौ. कि.मी. महसूल विभागाकडे

आहे[११]. एकूण वनक्षेत्राच्या जवळ जवळ निम्मे जंगल व्याप्त क्षेत्र जिल्ह्याच्या पश्चिम भागातील मावळ, भोर, मुळशी, आंबेगांव व वेल्हे या तालुक्यात येते. पूर्वेकडून जसजसे पश्चिमेकडे जावे तसतसे जंगलाचे प्रमाण वाढत जाते. कारण पश्चिमेला सह्याद्रीच्या डोंगररांगा विखूरलेल्या आहेत आणि पर्जन्याचे प्रमाण अधिक आहे. सह्याद्रीच्या डोंगर उतारावर वनक्षेत्र अधिक प्रमाणात व्यापलेले आहे. भिमाशंकर येथे अभयारण्य आहे तर सुपे येथे मोरांसाठी प्रसिद्ध असलेले मयुरेश्वर अभयारण्य आहे.

पश्चिमेकडील जंगलात मध, मेण, डिंक फळे, फुले, औषधी वनस्पती, साग, खैर, अंजनी, पिसा, हिरडा, टेंभूर्णीची पाने, मोहाची फुले, शिकेकाई, झाडाची साल इत्यादी वन उत्पादने मिळतात. सामाजिक वनीकरण खात्याने डोंगर उतार व सपाट जमीनीवर वनीकरणाचा कार्यक्रम राबविला आहे. ३१ मार्च २००६ वर्ष अखेर वनखात्याने जळाऊ लाकडाच्या विक्रीपासून ३ लाख रूपये व गवत, हिरडा, शिकेकाई, चिंच व इतर गौण पीक यांच्या विक्रीपासून २.६५ लाख रूपये उत्पन्न मिळविले आहे[१२].

वनविभागाच्या वन वस्तू संकलनावरील निर्बंधामुळे तशी अनेक वन उत्पादने नष्ट होतात. तसेच वाढत्या नागरीकरणामुळे जंगलतोड प्रचंड प्रमाणात होत आहे त्यामुळे वनक्षेत्र धोक्यात आले आहे.

## ४.९ भूजल मत्स्य व्यवसाय :

पुणे जिल्ह्याला समुद्रकिनारा नाही त्यामुळे नद्या, तलाव व मोठ्या जलाशयात मत्स्य उत्पादन होते. पुणे जिल्ह्यातील नद्यांची लांबी १२५२ कि. मी. आहे. नद्या, तळी, मोठ्या जलाशयात मासेमारीचा व्यवसाय केला जातो. मार्च २००६ अखेर २७८५६ हेक्टर क्षेत्र मत्स्य उत्पादनासाठी अनुकुल होते. एकूण अनुकूल क्षेत्रापैकी २२४१३ हेक्टर क्षेत्र वापराखाली प्रत्यक्ष आणले होते. अनुकुल क्षेत्र लिलाव पद्धतीने विकले जाते. २००५-०६ या वर्षात ४५३५ मे. टन मत्स्य उत्पादन झाले. त्यापासून १३६०.५० लाख रूपये उत्पन्न

मिळाले होते. संदर्भ वर्षात १३० लाख मत्स्यबीज विविध जलाशयात सोडण्यात आले होते[१३].

पुणे जिल्ह्यात किरकीट, शिंघाला, मुरेल, शिवडा, चामर किंवा चाल्लट, पाल, खवल्या, खावल, कोळशी, झिंगा, खाराबी व मुरी इत्यादी व्यापारी दृष्टिकोनातून महत्त्वाचे माशाचे प्रकार आढळतात. हडपसर येथे मत्स्यबीज संशोधन व प्रशिक्षण केंद्र आहे. तेथे मत्स्यबीज उपलब्ध आहे.

**तक्ता क्र. ४.३ : पुणे जिल्ह्यातील भूजन मत्स्यव्यवसाय (सन २००६ अखेरपर्यंत)**

| तहसिल | नदीची लांबी | मत्स्य व्यवसाय अनुकुल क्षेत्र (हेक्टरमध्ये) | मत्य व्यवसाया खालील क्षेत्र (हेक्टर) | भूजल मत्स्य उत्पादन (मे. टन) | मिळालेल्या मत्स्य उत्पादनाची किंमत (लाखात) | मत्स्य व्यवसाय क्षेत्रासाठी वापरलेले मत्स्यबीज (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. जुन्नर | १४४ | ४९६५ | २७५० | ६३७ | १९१.१० | १५ |
| २. आंबेगांव | ८० | १५४८ | १४०० | ३२० | ९६.०० | ५ |
| ३. शिरूर | १०१ | ८१५ | ३९५ | ४०५ | १२१.५० | १० |
| ४. खेड | ११५ | २१२२ | १८६७ | ३५० | १०५.०० | ७ |
| ५. मावळ | ३८ | २३२७ | २३२७ | ४५० | १३५.०० | ५ |
| ६. मुळशी | २६ | ५८६० | ५८९० | २४० | ७२.०० | २० |
| ७. हवेली | ११२ | १३३१ | १३३१ | १५० | ४५.०० | ५ |
| ८. पुणे शहर | २६ | ०० | ०० | ३५ | १०.५० | ३ |
| ९. दौंड | १३४ | ४९८ | ३५० | २७० | ८१.०० | १० |
| १०. पुरंदर | ५८ | २३७२ | १९८३ | ३०० | ९०.०० | १० |
| ११. वेल्हे | २९ | १९६२ | ११७८ | २२० | ६६.०० | १० |
| १२. भोर | ८६ | १७४२ | १७४२ | २३० | ६९.०० | ५ |
| १३. बारामती | १०८ | १४५३ | ५०० | १५० | ४५.०० | १० |
| १४. इंदापूर | १९५ | ८४० | ७०० | ७७८ | २३३.४० | १५ |
| **एकूण जिल्हा** | **१२५२** | **२७८५६** | **२२४१३** | **४५३५** | **१३६०.५०** | **१३०** |

**आधार :** जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास विभाग, पुणे (२००५-०६)

वरील तक्त्यावरून पुणे जिल्ह्यातील २७८५६ हेक्टर क्षेत्र मासेमारीसाठी अनुकूल आहे. सन २००६ अखेर १३६०.५० लाख रूपये मत्स्य उत्पादनातून मिळाले होते. मुळशी तालुक्यात सर्वाधिक मत्स्य व्यवसायाला अनुकूल क्षेत्र आहे. त्यानंतर जुन्नर, खेड, मावळ या तालुक्यांचा क्रमांक लागतो.

पुणे जिल्ह्यात सह्याद्री पर्वत पसरला आहे. डोंगर दऱ्यांमुळे अनेक नद्या उगम पावतात तसेच त्या नद्यांवर मोठ्या प्रमाणात धरणे बांधण्यात आली आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यात गोड्या पाण्यातील मासेमारीला अनुकूल स्थिती आहे. तसेच पुणे शहर हे मोठ्या लोकसंख्येचे शहर जवळ असल्यामुळे मत्स्य उत्पादनाला मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे.

## ४.१० लोकसंख्या :


२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ७२.२४ लाख होती. त्यामध्ये ३७.६८ लाख पुरूष व ३४.५६ लाख स्त्रिया होत्या. एकूण लोकसंख्येच्या ४२ टक्के ग्रामीण लोकसंख्या तर ५८ टक्के नागरी लोकसंख्या होती. जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येपैकी जवळ जवळ ८५ टक्के लोकसंख्या पुणे व पिंपरी चिंचवड शहरात सामावलेली आहे. पुणे शहर तालुक्यात एकूण लोकसंख्येपैकी ३७ टक्के लोकसंख्या होती. कारण पुणे शहर व पिंपरी चिंचवड भागात उद्योगधंदे, शिक्षण संस्था व व्यापाराचे विकेंद्रीकरण झाले आहे. हवेली तालुक्यात १९ टक्के, बारामती, इंदापूर, जुन्नर, दौंड, खेड या तालुक्यात २५ टक्के, मावळ व शिरूर तालुक्यात ८ टक्के, आंबेगांव, पुरंदर मध्ये ६ टक्के, भोर, मुळशी ४ टक्के तर वेल्हे तालुक्यात सर्वाधिक कमी म्हणजे १ टक्का लोकसंख्या होती[१४].

**तक्ता क्र. ४.४ : पुणे जिल्ह्याची लोकसंख्या (लाखात)**

| **वर्ष** | **१९५१** | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ११.१६ | १५.२७ | १८.४८ | २१.९३ | २७.२५ | ३०.३२ |
| नागरी | ८३.४७ | ९३.९ | १३.३० | १९.७१ | २८.०७ | ४२.०१ |
| **एकूण** | ९५.०९ | २४.६७० | ३१.७८ | ४१.६४ | ५५.३३ | ७२.३३ |
| **दशवार्षिक वृध्दीदर** | ... | २६.४४ | २८.८३ | ३१.०४ | ३२.८५ | ३०.७३ |

**आधार :** भारताची जनगणना, १९६१ ते २००१

**आलेख ४.३ : पुणे जिल्ह्याची लोकसंख्या (लाखात)**




वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, १९६१ ते १९८१ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक होते आणि शहरी लोकसंख्येचे प्रमाण तुलनेने कमी होते. १९९१ नंतर वेगाने शहरीकरण होत असल्याने नागरी लोकसंख्येचे प्रमाण वाढल्याचे दिसते. औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या पुणे हे मोठे केंद्र बनत आहे. त्यामुळे देशाच्या वेगवेगळ्या कानाकोपऱ्यातून लोक पुणे शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. तसेच ग्रामीण लोकसंख्या देखील मोठ्या प्रमाणात शहरी भागांकडे स्थलांतरीत होताना दिसते आहे.

## ४.११ लोकसंख्येची घनता :

२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. मागे ४६२ व्यक्ती एवढी होती. नागरी भागात ६७५६ व्यक्ती एवढी होती. ग्रामीण भागात ती २०० व्यक्ती होती. पुणे शहर तालुक्यातील लोकसंख्येची घनता सर्वाधिक म्हणजे १४६५८ एवढी आहे. वेल्हे तालुक्यात सर्वात कमी म्हणजे १११ व्यक्ती एवढी होती. लोकसंख्या घनतेनुसार पुणे जिल्ह्याचा राज्यात दुसरा क्रमांक लागतो[१५].

## ४.१२ अनुसुचित जाती जमातीची लोकसंख्या :


पुणे जिल्ह्यामध्ये आदिवासी जमातींपैकी भिल्ल, गामीत, गोंड, कातकरी, कोकणा, कोळीढोर, कोळी महादेव, नायकडा, पारधी, पतेलिया, ठाकूर, वारली इ. जमाती वास्तव्य करताना आढळतात. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील अनुसुचित जमातीची लोकसंख्या २६१७२२ एवढी होती. तर अनुसुचित जातीची लोकसंख्या ७६१८५७ एवढी होती. एकूण लोकसंख्येशी तुलना करता अनुसुचित जातीची व जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी अनुक्रमे १०.५३ टक्के व ३.६ टक्के होती[१६].

**तक्ता ४.५ : पुणे जिल्ह्यातील अनुसुचित जाती व जमातीची तालुकानिहाय लोकसंख्या व टक्केवारी**

| नांव | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | सर्वसाधारण एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | % | लोकसंख्या | % | |
| १. जुन्नर | १५७०७ | ४.२ | ७०९६६ | १९.२ | ३६९८०६ |
| २. आंबेगांव | ७३१७ | ३.४ | ४२९०७ | २०.१ | २१३८४२ |
| ३. शिरूर | २२८१० | ७.३ | ७८५७ | २.५ | ३१०५९० |
| ४. खेड | १३३१७ | ३.९ | ३८२७२ | ११.२ | ३४३२१४ |
| ५. मावळ | १६०८२ | ५.३ | २१८०४ | ७.१ | ३०५०८३ |
| ६. मुळशी | १०७२४ | ८.४ | ५५०३ | ४.३ | १२७३८५ |
| ७. हवेली | १७८७३४ | १३.२ | २६४४७ | २.० | १३५३०५० |
| ८. पुणे शहर | ३११७९५ | ११.९ | २६१२९ | १.० | २६९५१११ |
| ९. दौंड | ४८४०४ | १४.२ | ६७७३ | २.० | ३४१३८८ |
| १०. पुरंदर | १४७५१ | ६.६ | ४३०९ | १.९ | २२३४२८ |
| ११. वेल्हे | २७७३ | ५.० | १४३९ | २.६ | ५५८७४ |
| १२. भोर | ७५७६ | ४.४ | ३३४१ | १.९ | १७१७१९ |
| १३. बारामती | ५२४९५ | १४.१ | २४७५ | ०.७ | ३७२८५२ |
| १४. इंदापूर | ५१३७२ | १४.७ | ३५०० | १.० | ३४८४१३ |
| **एकूण** | **७६१८५७** | **१०.५३** | **२६१७२२** | **३.६** | **७२३२५५५** |

**आधार :** भारताची जनगणना, २००१

**आलेख ४.४ : पुणे जिल्ह्यातील अनुसुचित जाती व जमातीची तालुकानिहाय लोकसंख्या व टक्केवारी**




वरील तक्त्यावरून पुणे जिल्ह्यात अनुसुचित जाती जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या १४.१३ टक्के असल्याचे दिसते. त्यातही अनुसुचित जमातीची लोकसंख्या जास्त म्हणजेच १०.५३ टक्के असल्याचे दिसते तर जमातीची लोकसंख्या ३.६ टक्के असल्याची दिसते. जिल्ह्यात अनुसुचित जमातीची लोकसंख्या पश्चिम भागात अधिक प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते. आंबेगांव, खेड, जुन्नर या तालुक्यात सर्वाधिक लोकसंख्या केंद्रीत झाल्याचे दिसते.

## ४.१३ कर्ती लोकसंख्या :

२००१ च्या जनगणनेनुसार कर्ती लोकसंख्या २९.५४ लाख होती. ही संख्या एकूण लोकसंख्येच्या ४०.८५ टक्के आहे. एकूण कर्त्या लोकसंख्येपैकी ७.९३ लाख शेतकरी व ३.७४ लाख शेतमजूर होते. याशिवाय ७८७४९ लाख लोक घरगुती उद्योगधंद्यात काम करीत होते. उर्वरित १७.०७ लाख लोक वाहतूक, बांधकाम, व्यापार यात काम करीत होते. एकूण काम करणाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाणे अधिक दिसते. ही संख्या जवळजवळ ८

लाखांपर्यंत असल्याची दिसते. ३.५ लाखांपर्यंत शेतमजूरांची संख्या दिसते. एकूण काम करणाऱ्या लोक संख्येचे प्रमाण ४० टक्के आहे तर काम न करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ६० टक्के आहे. यावरून पुणे जिल्ह्यात कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे व नाकर्त्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे[१७].

**तक्ता क्र. ४.६ : पुणे जिल्ह्यातील मुख्य व सीमांतीक काम करणाऱ्यांचे उद्योग गट निहाय वर्गीकरण**

**अ) मुख्य काम करणारे**

| काम करणाऱ्याचे क्षेत्र | | एकूण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी | ७०९५३७ | ६९३०१० | १६५२७ |
| २. | शेतमजूर | २७७७३२ | २६४२१८ | १३५१४ |
| ३. | वस्तूनिर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्ती इ. घरगुती उद्योगात काम करणारे | ६१०४७ | २४७०० | ३६३४७ |
| ४. | इतर काम करणारे | १५९७११३ | ३१६८२७ | १२८०२८६ |
| **एकूण मुख्य काम करणारे** | | **२६४५४२९** | **१२९८७५५** | **१३४६६७४** |

**ब) सीमांतीक काम करणारे**

| काम करणाऱ्याचे क्षेत्र | | एकूण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी | ८४०४७ | ८२२७५ | १७७२ |
| २. | शेतमजूर | ९३९७७ | ९१३४१ | ५६३६ |
| ३. | वस्तूनिर्माण प्रक्रिया, सेवा व दुरूस्ती इ. घरगुती उद्योगात काम करणारे | १७७०२ | ८७३० | ८९७२ |
| ४. | इतर काम करणारे | ११०३२७ | ३४७८४ | ७५५४३ |
| **एकूण मुख्य काम करणारे** | | **३०९०५३** | **२१७१३०** | **९१९२३** |

**क) काम करणाऱ्यांचे वर्गीकरण**

| काम करणाऱ्याचे क्षेत्र | | एकूण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|---|
| १. | एकूण काम करणारे | २९५४४८२ | १५१५८८५ | १४३८५९७ |
| २. | काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | ४०.८५ | ५०.०० | ३४.२५ |
| ३. | एकूण काम न करणारे | ४२७८०७३ | १५१५८८३ | २७६२२४० |
| ४. | काम न करणाऱ्या लोकसंख्येशी टक्केवारी | ५९.१५ | ५०.०० | ६५.७५ |
| **जिल्ह्याची एकूण लोकसंख्या** | | **७२३२५५५** | **३०३१७१८** | **४२००८३७** |

**आधार :** भारताची जनगणना, २००१.

## ४.१४ स्त्री पुरूष प्रमाण :

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या ९१९ आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण ९४६ आहे तर नागरी भागात ८९९ एवढे आहे.


यावरून ग्रामीण भागात स्त्रियांची संख्या अधिक दिसते. म्हणजेच मुलगा – मुलगी असा भेदभाव ग्रामीण भागात कमी होत आहे असा निष्कर्ष निघतो[१८].

**तक्ता ४.७ : पुणे जिल्ह्यातील स्त्री पुरूष प्रमाण**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ९९२.०४ | ९८२.७८ | ९८८.०७ | ९५४.३८ | ९४६.५७ |
| नागरी | ८७१.६७ | ८६८.४२ | ८८२.९४ | ९०४.३६ | ८९९.४० |
| **एकूण** | **९४४.४०** | **९३३.२७** | **९३६.८८** | **९३३.४६** | **९१८.८९** |

**आधार :** पुणे जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन, २००६–०७.

**आलेख ४.५ : पुणे जिल्ह्यातील स्त्री पुरूष प्रमाण**




वरील तक्त्यावरून नागरी भागातील स्त्रियांची संख्या कमी दिसते आणि ग्रामीण भागातील ती संख्या जास्त दिसते. यावरून नागरी भागात आजही स्त्री पुरूष भेदभाव केला जातो. मुलीपेक्षा मुलाला जास्त महत्त्व दिले जात असल्याचा निष्कर्ष निघतो तर ग्रामीण भागात ही स्थिती उलट दिसते. म्हणजेच साक्षरता वाढीबरोबर हा भेदभाव वाढत आहे असे दिसते. ही चिंतेची बाब आहे.

## ४.१५ लोकसंख्यचे वयोगट :

पुणे जिल्ह्यात १९९१ च्या जनगणनेनुसार विविध वयोगटात एकूण लोकसंख्या खालील प्रमाणे विभागलेली आहे. खालील वयोगटावरून असे स्पष्ट होते की १५ ते ६० वयोगटातील कर्ती लोकसंख्या ही जवळजवळ ६० टक्के आहे. तर ० ते १४ व ६० च्या पुढील वयोगटातील नाकर्ती लोकसंख्या ४० टक्के आहे. कर्ती लोकसंख्या आधिक असणे हे आर्थिक विकासाच्या दृष्टिने फायदेशीर असते[१९].

खालील तक्त्यावरून ० ते १४ वयोगटातील ३३ टक्के लोकसंख्या सामाविष्ट आहे. तर १५ ते ५९ वयोगटातील ६० टक्के लोकसंख्या होती. तसेच ६० ते ७५ च्या पुढील वयोगटातील ७ टक्के लोकसंख्या सामाविष्ट असल्याचे दिसून येते. यावरून ० ते १४ व ६० वर्ष पुढील वयोगटातील लोकसंख्या ही काम न करणारी लोकसंख्या असते ती आर्थिक विकासात अडथळा आणते. तिचे प्रमाण ४० टक्के आहे. तर काम करणारी लोकसंख्या ६० टक्के आहे. काम करणारी लोकसंख्या जास्त आहे.

**तक्ता क्र. ४.८ : वयोगटानुसार लोकसंख्येची टक्केवारी**

| अ. क्र. | वयोगट (वर्षात) | एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ० ते ९ | २३ टक्के |
| २ | १० ते १४ | १० टक्के |
| ३ | १५ ते १९ | ९ टक्के |
| ४ | २० ते २४ | १० टक्के |
| ५ | २५ ते २९ | ९ टक्के |
| ६ | ३० ते ३४ | १० टक्के |
| ७ | ३५ ते ३९ | ८ टक्के |
| ८ | ४० ते ४४ | ५ टक्के |
| ९ | ४५ ते ४९ | ५ टक्के |
| १० | ५० ते ५४ | ४ टक्के |
| ११ | ५५ ते ५९ | ३ टक्के |
| १२ | ६० ते ६४ | ३ टक्के |
| १३ | ६५ ते ६९ | १ टक्के |
| १४ | ७० ते ७४ | १ टक्के |
| १५ | ७५ पेक्षा जास्त | २ टक्के |
| | | **१०० टक्के** |

**आधार :** पुणे जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २००२-०३.

## ४.१६ साक्षरता :

२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयात ५०.८७ लाख म्हणजेच ८१ टक्के लोक साक्षर होते. साक्षरतेचे प्रमाण (० ते ६ वयोगट वगळता) नागरी व ग्रामीण अनुक्रमे ८७ टक्के व ७३ टक्के साक्षरता होती. स्त्री पुरूषानुसार साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७२ टक्के व ८९ टक्के होते. साधरणपणे जिल्हयात साक्षरतेचे प्रमाण तसेच स्त्री पुरूष साक्षरतेचे प्रमाण देखील जास्त आहे. कारण पुणे हे शिक्षणाचे माहेर घर मानले जाते. पुणे शहर पिंपरी चिंचवड व हवेली तालुक्यात शैक्षणिक संस्थांचे केंद्रीकरण झाले आहे[२०].


वरील तक्त्यावरून १९६१ ते १९८१ या काळात साक्षरता ही १० टक्क्याने वाढत गेल्याचे दिसते. तर १९८१ ते १९९१ या दशकात मात्र साक्षरता १७ टक्क्याने वाढल्याचे दिसते. तर १९९१ ते २००१ च्या दशकात मात्र १० टक्क्यानी साक्षरतेत वाढ झाल्याचे दितसे. स्त्रियांमधील साक्षरता ही पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. १९६१ च्या दशकापासून स्त्री पुरूषांमधील साक्षरता ही वाढत गेल्याची दिसते.

**तक्ता ४.९ : पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी साक्षर लोकसंख्येचे प्रमाण**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| पुरूष | ४६.२० | ५६.३० | ६५.२० | ८१.६० | ८८.३४ |
| स्त्रिया | २१.७० | ३२.१० | ४२.१० | ५९.८० | ७१.८९ |
| एकूण | ३४.३० | ४४.६० | ५४.०० | ७१.१० | ८०.४५ |

**आधार :** १. पुणे जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन २००५–०६.
२. भारताची जनगणना १९६१ ते २००१

**आलेख ४.६ : पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी साक्षर लोकसंख्येचे प्रमाण**




## ४.१७ प्रशासकीय विभाग :

पुणे जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय ठिकाण पुणे येथे आहे. हे ठिकाण राज्याच्या मुंबई या राजधानीपासून रेल्वेने १९२ कि. मी. तर रस्त्याने १६० कि.मी. अंतरावर असून मुंबई बेंगलोर या महामार्गवर आहे.

पुणे जिल्ह्यात एकूण १४ तहसिल आहेत. त्या पुढील प्रमाणे. १. जुन्नर २. आंबेगांव ३. शिरूर ४. खेड ५. मावळ ६. मुळशी ७. हवेली ८. पुणे शहर .९ दौंड १०. पुरंदर ११. वेल्हे. १२. भोर १३. बारामती १४. इंदापूर इत्यादी.

पुणे जिल्ह्यात पुणे व पिंपरी चिंचवड या दोन महानगरपालिका असून खडकी, पुणे व देहूरोड येथे कटक मंडळे आहेत. तसेच आळंदी, पुरंदर, जेजुरी, तळेगांव दाभाडे, लोणावळा, भोर, दौंड, बारामती, शिरूर, जुन्नर व इंदापूर या एकूण ११ नगरपालिका आहेत. पुणे जिल्ह्यात ३१ मार्च २००६ रोजी १४०१ ग्रामपंचायती होत्या. त्यातून निवडून आलेल्या सभासदांची संख्या ११५८० होती. महाराष्ट्र शासनाचे अनेक विभाग पुणे येथे

केंद्रीत झालेले आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्याला प्रशासकीय दृष्टिकोनातून अनन्य साधारण महत्व आहे[२१].

## ४.१८ वाहतूक व दळण वळण सुविधा :

शासन, जिल्हा परिषद, व नगरपालिका यांचे मार्फत रस्ते तयार केले जातात व त्याची निगा राखण्याचेही काम केले जाते. जिल्ह्यामध्ये मार्च २००३ अखेर शासकीय व जिल्हा परिषद यांचे अनुक्रमे ३८४५ व ९५४५ कि. मी. लांबीचे रस्ते होते. या व्यतिरिक्त नगरपालीका हद्दीतील १६० कि.मी. लांबीचे रस्ते होते. यापैकी एकूण २.४ टक्के रस्ते राष्ट्रीय राज्य महामार्ग होते. तर ३९.५३ टक्के जिल्हा रस्ते होते. पृष्ठभागाचे वर्गीकरणानुसार ४१.०६. टक्के डांबरी रस्ते होते. तसेच खडीचे पक्के रस्ते २६.२६ टक्के आहेत. जिल्ह्यातून मुंबई बेंगलोर, पुणे हैद्राबाद व पुणे नासिक हे तीन राष्ट्रीय महामार्ग जातात.

मुंबई पुणे सोलापूर हा लोहमार्ग पुणे जिल्ह्यातून जातो. पुणे मिरज लोहमार्ग, दौंड मनमाड लोहमार्ग, दौंड ते बारामती लोहमार्ग इ. लोहमार्ग आहेत. पुणे व दौंड ही जिल्ह्यातील रेल्वे जंक्शन आहेत. शिवाय पुण्याजवळ लोहगांव येथे विमानतळ आहे.

पुणे जिल्ह्यात ३१ मार्च २००३ रोजी ८०६ डाकघरे तर ८९ तारघरे कार्यरत होती. तसेच ६,६२,६८८ दूरध्वनि व ३०३ दूरध्वनि विनियम केंद्रे होते. यवत, कळस व चतुश्रृंगी या तीन ठिकाणी अतिसुक्ष्म विनियम केंद्रे आहेत. जिल्ह्यात पुणे आकाशवाणी, रेडिओ मिरची, पुणे विद्यापीठ विद्यावाहिनी इत्यादी रेडिओ केंद्रे होती. सन २००१ अखेर जिल्ह्यात ९८७ सामुहिक दूरध्वनि संच होते[२२].

## ४.१९ बँका :

पुणे जिल्ह्यात ३१ मार्च २००६ रोजी २३५ ठिकाणी बँका होत्या. १९८२ साली राष्टीयकृत व अनुसुचित अशा ३५७ बँक शाखा होत्या. ३१ मार्च २००६ अखेर ही संख्या

७५३ पर्यंत वाढत गेल्याचे दिसते. जिल्हयाच्या एकूण बँक शाखांपैकी ६९ टक्के शाखा पुणे शहर व हवेली तहसिलमध्ये होत्या. तर उर्वरित ४१ टक्के इतर १२ तहसिल मध्ये होत्या.

मार्च अखेर १९८२ च्या तुलनेत राष्ट्रीयकृत व अनुसुचित बँकेच्या २९६ नवीन शाखा उघडण्यात आल्या सहकारी बँकाच्या शाखांमध्ये २६६ शांखाची वाढ झाली. २००१ च्या लोकसंच्येनुसार जिल्हयात ६८४८ व्यक्तीमागे एक बँक शाखा असे प्रमाण होते. मार्च २००६ अखेर जिल्हयात राष्ट्रीयकृत, अनुसुचित व व्यापारी बँकांमध्ये २२४८३.६८ कोटी रूपये ठेवी होत्या[२३].

**तक्ता ४.१० : पुणे जिल्हयातील वर्गीकृत बँका (सन २००५–०६)**[२४]

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | बँकाची कार्यालये असलेली गांवे | वर्गीकृत बँक संख्या | वर्गीकृत बँकांची शाखासंख्या | वर्गीकृत बँकांच्या ठेवी (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जुन्नर | २० | ९ | ३५ | २०३४५ |
| २ | आंबेगांव | १८ | ८ | २८ | १८०४५ |
| ३ | शिरूर | २५ | ११ | ४४ | १७१३६ |
| ४ | खेड | १९ | ७ | ३४ | २२३६४ |
| ५ | मावळ | १४ | १२ | ३० | १५०२९ |
| ६ | मुळशी | १२ | ५ | १६ | ८४८३ |
| ७ | हवेली | २४ | ९ | ३६ | ७३९८५ |
| ८ | पुणे शहर | ० | २० | ३४८ | १९४२४४३ |
| ९ | दौंड | २१ | ७ | ३८ | २४३७७ |
| १० | पुरंदर | १४ | ६ | २३ | ११५२० |
| ११ | वेल्हे | ६ | ४ | १० | ३८०० |
| १२ | भोर | १३ | ८ | २० | ९२३८ |
| १३ | बारामती | २३ | १३ | ४५ | ४४८७५ |
| १४ | इंदापूर | २६ | १० | ४६ | ३६७२८ |
|  | **जिल्हा एकूण** | **२३५** | **१२९** | **७५३** | **२२४८३६८** |

**आधार :** जिल्हा अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र), पुणे. २००५–०६

## ४.२० कृषि बाजारपेठा :

सन २००६ अखेर पुणे जिल्हयात एकूण ११ नियंत्रित कृषि उत्पन्न बाजार समित्या आहेत. या नियंत्रित बाजार समित्या खेरीज खेड, वेल्हे, सासवड, तळेगांव ढमढेरे, सुपा,

निरा, व चाकण या ठिकाणी उपबाजार समित्या आहेत. अशा एकूण २७ उपसमित्या आहेत. जिल्हयातील या बाजार समित्यामध्ये ज्वारी, गहू, सर्व कडधान्य, कांदा मिरची, बटाटा, गुळ, तसेच कापूस, शेंगा यांची मोठया प्रमाणावर आवक होते. वरील वस्तूची जी एकूण आवक होते. त्यापैकी निम्याहून जास्त आवक पुणे कृषि उत्पन्न बाजार समित्यामध्ये होते. जिल्हयातील या ११ बाजार समित्यामध्ये कृषि मालाची आवक होते[२५].

पुणे जिल्हयात सिंचित क्षेत्र आधिक असल्यामुळे व्यापारी दृष्टिकोनातून पिके घेतली जातात. त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक उलाढाली देखील आधिक आहेत.

## ४.२१ पशुसंवर्धन :

सन १९९७ च्या पशु सर्वेक्षण आकडेवारी नुसार जिल्ह्यात २२९००८१ एवढे पशुधन होते. याशिवाय कुकुटवर्गीय पक्षांची संख्या ३९४१९८५ होती. या गणनेनुसार एकूण २२९००८१ पशुधनापैकी गाई बैल ३९ टक्के, म्हैस व रेडे १३ टक्के, शेळया मेंढया ४५ टक्के, इतर पशुधन ०३ टक्के होते. या गणनेत ३९४१९८५ कुकुटवर्गीय पक्षी होते. जिल्हयात कुकुट पालन व अंडी उबविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणावर होतो. पुणे येथे मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र आहे[२६].

## ४.२२ दुग्ध व्यवसाय :

जिल्हयात गाई म्हशी व संकरीत जनावरांची संख्या मोठी आहे. जिल्हयासाठी पुणे येथे १९५० साली स्वतंत्र दूध योजना मंजूर झाली. दूध सहकारी संस्थात गेल्या सात आठ वर्षात दुप्पटीहून आधिक वाढ झाली आहे. दूध संकलन करण्यासाठी जिल्हयात एकूण १६३ दूध संकलन मार्ग आहेत. १९७९ ते १९८० साली जिल्हयातील दैनंदिन सरासरी दूध संकलन ८४००० लिटर होते. ते ३१ मार्च २००६ अखेर पर्यंत ५२६ हजार लिटर पर्यंत पोहचले. सध्या पुणे कात्रज येथे दूग्धशाळा आहे. बारामती, निरा (पिंपरेख), ओतूर व

कोंढापूरी येथे शासनाची शीतकरण केंद्रे आहेत. तसेच भोर, नसरापूर अवसरी, पाईट व इंदापूर येथे पुणे जिल्हा दुग्ध उत्पादक संघाची शीतकरण केंद्रे आहेत मार्च २००६ अखेर जिल्ह्यात एकूण ८ शीतकरण केंद्रे होती. त्यांची क्षमता ८.१० लाख लिटर होती[२७].

## ४.२३ वीज :

१९६०.६१ साली जिल्ह्यातील फक्त २४ खेडयांना वीज उपलब्ध होती. गेल्या तीस वर्षात मोठी नेत्रदीपक प्रगती झाली आहे. मार्च २००६ अखेर पर्यंत १८४४ गांवाना म्हणजेच सर्व गांवांना विजेची सोय उपलब्ध झाली आहे. २००५.२००६ मध्ये जिल्ह्यात एकूण वीज वापर ६८८.६५ लाख किलोवॅट तास होता. घरगुती व औद्योगीक कारणासाठी वीजेचा वापर केला जातो. घरगुती वापराचे प्रमाण ५७.३२ टक्के असून औद्योगीक वीज वापराचे प्रमाण ५५.२८ टक्के आहे. तर व्यापारी व इतर वीज वापराचे प्रमाण अनुक्रमे ६.०८ टक्के व १६.२९ टक्के असे आहे[२८].

## ४.२४ शिक्षण :

पुणे हे शिक्षणाचे माहेर घर मानले जाते. शैक्षणिक संस्थाचे मोठे केंद्रीकरण पुणे झाले आहे. जिल्ह्यात २००२.२००३ यावर्षी ४४४० प्राथमिक, १०९९ माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शैक्षणिक संस्था होत्या. २००२.२००३ या वर्षामध्ये प्राथमिक, माध्यमिक (उच्च माध्यमिक सह) व उच्च शिक्षण संस्थेमध्ये अनुक्रमे ७.८० लाख, ६.७० लाख, व ०.९१ लाख विद्यार्थी पटावर होते. जिल्ह्यामध्ये १०२ महाविद्यालये होती. याशिवाय ४ वैद्यकीयय, ५ आयुर्वेदिक व ५ विधी महाविद्यालये होती[२९].

## ४.२५ पाणी पुरवठा :

सन २००५ अखेर घोड, खडकवासला येडगांव इत्यादी मोठया व मध्यम पाटबंधारे प्रकल्पाखाली ८९१ कि.मी. लांबीचे कालवे पुर्ण झाले आहेत. याखाली हंगामी व बारमाही

असे १००८२० हेक्टर क्षेत्र भिजत होते. पानशेत पवना धरणातून पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा केला जतो. जिल्ह्यात धरणाची संख्या जास्त व पर्जन्य चांगले असल्यामुळे पाणीपुरवठा मुबलक प्रमाणात होतो[३०].

## ४.२६ निवासी घरे व कुटूंबे :

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात १४,३३,४४० एवढी जनगणना घरे होती. त्यामध्ये १०,३७,१३० एवढी कुटूंबे राहात होती. ग्रामीण व नागरी भागात अनुक्रमे ४८७८४५ व ५४९२८५ कुटूंबे होती. तसेच एकूण १०३७१३० कुटूंबापैकी ७०२४२० इतकी कुटूंबे स्वत:च्या घरात व २९५१२५ कुटूंबे भाड्याच्या घरात व ३९५८५ इतकी कुटूंबे ही इतर ठिकाणी राहात होती. ग्रामीण भागात कुटूंब आकार ६ एवढा होता. तर नागरी भागात तो ५ एवढा होता[३१].

## ४.२७ जमीनीच्या धारण क्षेत्राची रचना :

शेती हा महत्वाचा व्यवसाय पुणे जिल्हयात केला जातो. काम करणाऱ्या लोकसंख्यपैकी ५१.१७ टक्के लोक शेती हा व्यवसाय करतात. जिल्हयात ४.९८ लाख जमीन धारक आहेत. त्यात २ हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र असलेले ६४ टक्के सीमांत व लहान शेती आहे. जिल्हयात लागवडी खालील क्षेत्र २००१.०२ साली ११५६ हेक्टर होते. एकुण पिकाखालील क्षेत्र ९८२ हेक्टर होते[३२].

**तक्ता ४.११ : पुणे जिल्ह्यातील जमीनीचे धारण क्षेत्र (सन २००२-०३)**

| अ.क्र | वर्ग हेक्टर | एकूण खाती | टक्केवी | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०.०० ते ०.९९ | १९३९७० | ३९ | ९१४५५ | ८ |
| २ | १.०० ते १.९९ | १२४३१६ | २५ | १८१०११ | १६ |
| ३ | २.०० ते ३.९९ | १०७६०९ | २२ | ३००१५४ | २७ |
| ४ | ४.०० ते ९.९९ | ६१०७९ | १२ | ३६१७९२ | ३२ |
| ५ | १०.०० ते त्यापेक्षा जास्त | ११८४८ | २ | ११३३७२ | १७ |
| | **एकूण** | **४९८८२२** | **१००** | **११२७७८४** | **१००** |

**आधार :** पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन २००२.०३

पुणे जिल्ह्यात ४.९८ लाख जमीनधारकापैकी ३.१८ लाख जमीनधारक अल्पभूधारक आहेत. त्यांचे जमीनीचे क्षेत्र २ हेक्टर पेक्षा कमी आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना आपल्या जमीनीत अवश्यक त्या सुधारणा करून शेती विकास करणे शक्य होत नाही. तर १.८ लाख जमीन धारकाकडे २ हेक्टर जास्त जमीन आहेत. त्यामुळे याच शेतकऱ्यांना शेती उत्पादनात वाढ करण्यास यश आले आहे. ४ हेक्टर जास्त जमिनी असणाऱ्याचे प्रमाण फक्त १४ टक्के होते. यावरून जमीनधारकाकडे असणाऱ्या जमीनीच्या क्षेत्राबाबत मोठया प्रमाणात विषमता आहे असे दिसून येते.

## ४.२८ पिकाचे स्वरूप :

पुणे जिल्ह्यात ज्वारी हे मुख्य पीक आहे. ज्वारी लागवडीखालील क्षेत्र देखील आधिक आहे. तसेच जुन्नर, आंबेगांव, खेड, भोर, मावळ, मुळशी व वेल्हे या तालुक्यामध्ये भाताच्या पिकाखालील क्षेत्र जास्त आहे. कारण पावसाचे प्रमाण आधिक आणि डोंगर उतार हे भात पिकाला अनुकुल असते. आंबेमोहर, कमोद, जिरेसाळ, वैगरे भाताच्या जाती प्रसिध्द आहेत. दौंड भागात कापसाचे पिक उत्तम येते. तर इंदापूर, शिरूर तालुक्यात ज्वारीचे पिक चांगले येते. आंबेगांव, खेड, भोर, शिरूर, हवेली, दौंड या भागात भूईमुगाचे पिक चांगले येते. खेड जुन्नर शिरूर आणि आंबेगांव तालुक्यात बटयाटयाचे पीक चांगले येते. शिरूर, दौंड, हवेली, बारामती, खेड या तालुक्यात कांदयाचे व मोसंबी, संत्री चांगले पिक येते. हडपसर, पुणेच्या जवळपास मोठया प्रमाणात भाजीपाला पिकतो. जुन्नर भागात केळीच्या बागा व फुलांचे मळे प्रसिध्द आहेत. बारामती व उरूळी कांचन या भागात द्राक्ष आधिक पिकतात. पुरंदर, सासवड, भागात अंजीर, डाळींब, सीताफळ इत्यादी फळाखालील क्षेत्र आधिक आहे[३३].

### ४.२१ उद्योग व व्यापार :

पुणे हे महाराष्ट्रातील महत्वाचे औद्योगिक शहर मानले जाते. शहर व उपनगरात उद्योगाचे केंद्रीकरण आधिक प्रमाणात झाले आहे. लघुउद्योग व मोठे उद्योग यांचे प्रमाण जास्त आहे. उदा. इंजिनिअरिंग, साखर, रासायनिक, ऑईल, औषधी, प्रक्रिया, काच, इत्यादी पुणे मुंबई महामार्ग व रेल्वेलाईन वर औद्योगीक क्षेत्र केंद्रीत झाले आहे. हे क्षेत्र प्रचंड वेगाने विकसीत होत आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यानी पुण्यात मोठी गुंतवणूक केली आहे. १९४८ च्या औद्योगीक कायद्यानुसार डिसेंबर १९९० पर्यंत पुणे जिल्ह्यात २६०७ उद्योगांची नोंदणी झाली होती.

जुन्नर तालुक्यात जुन्नर येथे हातकागद बनविला जातो. तसेच लोकरीपासून घोंगड्याही बनविल्या जातात. विड्या वळणे, दोरखंड तयार करणे इत्यादी उद्योगही जिल्ह्यातील विविध भागात चालतात. प्लॅस्टिकच्या वस्तू, साबण, बिस्किटे, वीजेची उपकरणे, भांडी लाकडी खेळणी इत्यादी तयार करण्याचे उद्योग जिल्ह्यात आहेत. जुन्नर, खेड, आंबेगांव तालुक्यात तेलगिरण्या आहेत. पुणे व जुन्नर येथे नॉयलॉनपासून धागे बनविण्याचे कारखाने आहेत.

पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरात अनेक मोठे उद्योग आहेत. पिंपरी येथे पेनिसिलीन व मोटारी तयार करण्याचे कारखाने आहेत. चिंचवड येथे स्कुटर व रिक्षाचा कारखाने आहेत. मावळ तालुक्यात तळेगांव येथे काचसामान व थार्मासि बनविण्याचे कारखाने आहेत. भोर तालुक्यात रेक्झीन, मच्छरदाण्या, सूत, रंग इत्यादीचे उद्योग आहेत. सारोळे येथे कागद कारखाना आहे. इंदापूर तालुक्यात वालचंदनगर येथे यंत्रनिर्मिती कारखाना आहे. शिरूर तालुक्यात शिक्रापूर जवळ यंत्राचे कारखाने आहेत. मुंढवा येथे लोखंडी सामानाचा तसेच लोणी, भोसरी व लोणावळा येथे रेडिओचे कारखाने आहेत. पुणे जिल्ह्यात एकूण ११ साखर कारखाने आहेत[३४].

तक्ता ४.१२ : पुणे जिल्ह्यातील साखर कारखाने (सन २००४–०५)

| तालुक्याचे नांव | साखर कारखाना नांव | संख्या |
|---|---|---|
| जुन्नर | जुन्नर | ०१ |
| आंबेगांव | पारगांव | ०१ |
| शिरूर | न्हावरे | ०१ |
| मुळशी | पौड | ०१ |
| हवेली | थेऊर | ०१ |
| दौंड | पाटस | ०१ |
| भोर | निगडे | ०१ |
| बारामती | माळेगांव, सोमेश्वरनगर | ०१, ०१ |
| इंदापूर | सणसर, इंदापूर | ०२ |
| **जिल्हा एकूण** | | **११** |

**आधार:** साखर आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, पुणे २००४.०५

पुणे शहरात हडपसर, गुलटेकडी, पर्वतीजवळ येथे औद्योगिक वसाहती आहेत. जिल्ह्यात पिंपरी चिंचवड भोसरी, बारामती, कुरकुंभ, जेजूरी, शिक्रापूर, चाकण, भोर, शिरूर, लोणावळा व जुन्नर इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. जिल्ह्यातील पुणे शहर मुंबईशी जवळ असल्यामुळे रेल्वे व रस्ते याचे जाळे महत्वाच्या शहरांना जोडले गेल्यामुळे व्यापाराच्या दृष्टिने ते महत्वाचे केंद्रे आहे. अन्नधान्य, भाजीपाला, फळे, बटाटा इत्यादी हवेली व पुरंदर तालुक्यातील निर्यात केली जातात. पालेभाज्या मोठया पमाणात मुंबईला पाठविल्या जातात. जुन्नर, खेड, पुरंदर, इंदापूर, बारामती, धातूचे साहित्य मुंबई, सातारा, सोलापूर व कोल्हापूर या महत्वाच्या ठिकाणी पाठविला जातो. महत्वाच्या उपभोग्य वस्तू मुंबईहून मागविल्या जातात. सुके मासे मुंबई व ठाणे येथून येतात[३५].

## ४.३० पुणे जिल्ह्यातील आदिवासी :

पुणे जिल्ह्यातील भौगोलिक व प्राकृतिक पार्श्वभूमित आदिवासी जमातीचे वास्तव्य आधिक प्रमाणात दिसते. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात आदिवासी कमी आधिक प्रमाणात आढळतात.

पुणे जिल्ह्यात भिल्ल, कातकरी, कोकणा, कोळी ढोर, कोळी महादेव, ठाकर, वारली, पारधी, नायकडा, गामित या आदिवासी जमाती आढळतात. त्यात महादेव

कोळी, कातकरी व ठाकर या जमाती बहुसंख्येने वास्तव्य करताना दिसतात. जिल्ह्यात जुन्नर, खेड, आंबेगांव, मावळ, मुळशी, हवेली, वेल्हे, भोर या तालुक्यात कातकरी सारख्या अनेक आदिवासी केंद्रीत झाली आहेत. जिल्ह्याच्या पश्चिम भागात आदिवासी मोठ्या प्रमाणात आढळतात.

## १. आदिवासी लोकसंख्या :

सन २००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयाची एकूण लोकसंख्या ७२,२४,२२४ एवढी आहे. त्यापैकी २,६१,७२२ एवढी आदिवासी लोकसंख्या होती. त्यामध्ये १,३३,८३५ एवढे पुरूष आणि १,१५,४५० एवढया स्त्रिया होत्या. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्यची टक्केवारी ३.६२ होती. आदिवासी लोकसंख्या जिल्ह्याच्या पश्चिम भागातील घाटमाथा क्षेत्रात मोठया प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते. विशेषत: भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, हवेली, खेड, आंबेगांव, जुन्नर या आठ तालुक्यात मोठया प्रमाणात आदिवासी लोकसंख्या केंद्रीत झाली आहे. डोंगर, दऱ्या, वनक्षेत्र, नद्या व धरणे ही भौगोलिक रचना आदिवासी जीवनाला अनुकुल आहे. त्यामुळे आदिवासींचे वास्तव्य या परिसरात अधिक दिसते[३६].

जुन्नर, आंबेगांव व खेड तालुक्यात आदिवासी जमातीची लोकसंख्या मोठा प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते. त्यानंतर मावळ, हवेली, पुणे शहर, या तालुक्यातील आधिक प्रमाणात आदिवासीचे वास्तव्य आढळते. एकूण लोकसंख्येशी टक्केवारी मावळ तालुक्यात आधिक दिसते. कारण एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्या आधिक आहे. त्यानंतर जुन्नर, खेड, आंबेगांव, शिरूर, वेल्हे, पुणे शहर, हवेली, या तालुक्यात क्रमांक लागातो. तसेच स्त्रीयांची संख्या पुरूषांच्या तुलनेने कमी आहे.

**तक्ता ४.१३ : पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या**[३७]

| अ.क्र. | तालुका | आदिवासी लोकसंख्या | | एकूण | एकूण लोकसंख्येशी % | एकूण सामान्य लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रीया | | | |
| १ | जुन्नर | ३६०१४ | ३४९५२ | ७०९६६ | १९.१९ | ३६९८०६ |
| २ | आंबेगांव | २१५०४ | २१४०३ | ४२९०७ | २०.०६ | २१३८४२ |
| ३ | शिरूर | ४०२७ | ३८३० | ७८५७ | २.५३ | ३१०५९० |
| ४ | खेड | १९३२८ | १८९४४ | ३८२७२ | ११.१५ | ३४३२१४ |
| ५ | मावळ | १११८८ | १०६१६ | २१८०४ | ७.१५ | ३०५०८३ |
| ६ | मुळशी | २७९९ | २७०४ | ५५०३ | ४.३२ | १२७३८५ |
| ७ | हवेली | १४०५१ | १२३९६ | २६४४७ | १.९५ | १३५३०५० |
| ८ | पुणे शहर | १३६९२ | १२४३७ | २६१२९ | ०.९७ | २६९५१११ |
| ९ | दौंड | ३५१७ | ३२५६ | ६७७३ | १.९८ | ३४१३८८ |
| १०. | पुरंदर | २२१९ | २०९० | ४३०९ | १.९३ | २२३४२८ |
| ११ | वेल्हे | ७२७ | ७१२ | १४३९ | २.५८ | ५५८७४ |
| १२ | भोर | १७०८ | १६३३ | ३३४१ | १.९५ | १७१७१९ |
| १३ | बारामती | १२७२ | १२०६ | २४७५ | ०.६६ | ३७२८८२ |
| १३ | इंदापूर | १७८९ | १७११ | ३५०० | १.०० | ३४८४१३ |
| | एकूण | १,३३,८३५ | १,१५,४५० | २,६१,७२२ | ३.६२ | ७२३२५५५ |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल २००६–०७

२००१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयात १७१५ एवढे गांवे २३ शहरे आहेत. त्यापैकी ११८४ गांवात आणि २३ शहरात आदिवासी लोकसंख्या वास्तव्य करती असल्याचे दिसते. जिल्हयात आदिवासी वस्ती असलेली सर्वाधिक म्हणजे १६९ गांवे जुन्नर तालुक्यात आहेत. त्यानंतर खेड, मावळ, आंबेगांव, तालुक्याचा क्रमांक लागतो. जिल्हयातील एकूण गांवाशी तुलना केली असता ६९ टक्के गांवात आदिवासी लोक राहातात.

आदिवासी वस्ती असलेली गांवे ही देखील जिल्हयाच्या पश्चिम भागात केंद्रीत झाल्याचे दिसते. कारण पश्चिम भागातील जुन्नर, खेड, आंबेगांव, व मावळ या तालुक्यांतील कांही गांवे आदिवासी गांवे म्हणून घोषित करण्यात आली आहेत. त्यामुळे या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या देखील मोठया प्रमाणात केंद्रीत झाल्याचे दिसते.

२.

**तक्ता ४.१४ : पुणे जिल्ह्यातील एकूण व आदिवासी वस्ती असलेली गांवे व शहरे (जनगणना २००१)** [३८]

| अ.क्र. | तालुका | आदिवासी नसलेली गांवे | आदिवासी असलेली शहरे | आदिवासी असलेली गांवे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जुन्नर** | **१२** | **०१** | **१६९** | **१८२** |
| २ | **आंबेगांव** | **१२** | **०१** | **१३१** | **१४४** |
| ३ | शिरूर | २५ | ०१ | ९२ | ११८ |
| ४ | **खेड** | **२७** | **०३** | **१६०** | **१९०** |
| ५ | **मावळ** | **२६** | **०५** | **१५५** | **१८६** |
| ६ | **मुळशी** | **२८** | **०१** | **८७** | **११६** |
| ७ | **हवेली** | **२८** | **०२** | **४५** | **७५** |
| ८ | पुणे शहर | ०० | ०२ | ०० | ०२ |
| ९ | दौंड | १६ | ०१ | ७० | ८७ |
| १० | पुरंदर | ४९ | ०३ | १० | ६२ |
| ११ | **वेल्हे** | **७६** | **००** | **५२** | **१२८** |
| १२ | **भोर** | **११२** | **०१** | **८३** | **१९६** |
| १३ | बारामती | ५३ | ०१ | ६४ | ११८ |
| १४ | इंदापूर | ६७ | ०१ | ६६ | १३४ |
| | **एकूण** | **५३१** | **२३** | **११८४** | **१७३८** |

**आधार :** *भारताची जनगणना २००१ व वार्षिक आदिवासी उपयोजना २००५-०६*

महाराष्ट्रातील अतिदुर्गम आदिवासी क्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्यातील जुन्नर, खेड, आंबेगांव ही तालुके घोषित करण्यात आली आहेत. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत देखील (आय.टी.डी.पी.) हे तालुके येतात. घोडेगांव येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे मुख्यालय आहे. तर मावळ तालुक्यातील वडेश्वर, मिनीमाडा पॉकेट घोषित केलेले आहे. त्यात एकूण १६ गांवे सामाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात ४९६२ एवढी आदिवासी लोकसंख्या आहे.

तसेच खेड तालुक्यातील नायफड माडा पॅकेज म्हणून घोषित केले आहे. त्यात २२ खेडी व १२६२९ आदिवासी लोकसंख्या सामाविष्ट आहे.

**३. तक्ता ४.१५ : पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या**[३९]

| | आदिवासी उपयोजना क्षेत्र | अतिरीक्त आदिवासी उप. क्षेत्र | माडा | मिनीमाडा | आदिवासी उपयोजने बाहेरील क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **गांवांची संख्या** | १२३ | ०५ | २२ | १६ | १०१८ | ११८४ |
| **लोकसंख्या** | ६८९४३ | ९७६ | १२६२९ | ४९६२ | १७४२१२ | २६१७२२ |

**आधार :** आदिवासी उपयोजना सन २००६–०७

पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात १२३ गांवे आणि ६८९४३ लोकसंख्या समाविष्ट करण्यात आली आहे. तर आदिवासी उपयोजना बाहेरील क्षेत्रात १०१८ एवढी सर्वाधिक गांवे व १७४२१२ एवढी आदिवासी लोकसंख्या सामाविष्ट आहे.

**४. तक्ता ४.१६ : पुणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्री पुरूष साक्षरता (२००१ नुसार)**[४०]

| | पुरूष | स्त्री | एकूण साक्षरता |
|---|---|---|---|
| सामान्य | ८८.३% | ७१.९% | ८०.५% |
| आदिवासी | ७४.६% | ४९.२% | ६२.२% |

**आधार :** आदिवासी उपयोजना सन २००६.०७

सन २००१ नुसार पुणे जिल्ह्यात आदिवासी मधील साक्षरता ६२.२% एवढी होती. तर १९८१ साली २७.८०% आणि १९९१ साली ४४.२७% एवढी आदिवासीची साक्षरता होती यावरून आदिवासींची साक्षरता वाढत गेल्याचे दिसते. २००१ नुसार आदिवासी पुरूषांची साक्षरता ७४.६% होती तर स्त्रीयांची ४९.२% होती. सामान्य लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी स्त्री पुरूषांची साक्षरता कमी आहे. तसेच पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांची साक्षरता कमी असल्याचे दिसते.

## ५. दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटूंबे[४१]

पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये १९८० च्या डी.आर.डी.ए. सर्व्हेक्षणानुसार अनुसूचीत जमातीची २६१४१ कुटूंबे होती. त्यापैकी १५२०५ एवढी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली होती व ११००० कुटूंबे दारिद्र्यरेषेच्यावर जीवन जगत होती. १९९६–९७ च्या बेंचमार्क सर्व्हेनुसार पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात घोडेगांव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत ८३.९७% आदिवासी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

## ६. आदिवासी आश्रम शाळा व वसतीगृहे[४२]

**तक्ता ४.१७ : पुणे जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळा व वसतीगृहाची संख्या**

| | आश्रम शाळा | माध्यमिक शाळा | उच्च माध्यमिक शाळा | शासकीय वसतीगृहे |
|---|---|---|---|---|
| शासकीय | ०४ | १२ | ०१ | १३ |
| अनुदानित | ०४ | ०४ | ०० | ०० |
| एकूण | ०८ | १६ | ०१ | १३ |

**आधार :** आदिवासी उपयोजना सन २००६–०७.

पुणे जिल्ह्यात आदिवासी मुला, मुलींच्या शिक्षणासाठी ४ शासकीय आश्रम शाळा, १२ शासकीय माध्यमिक शाळा व १३ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. आदिवासींच्या जीवनात शाळा व वसतीगृहे शैक्षणिक बदल घडवून आणण्यात महत्वाची भूमिका बजावत आहेत.

## ७. आरोग्य संस्था

पुणे जिल्ह्यातील टी.एस.पी. क्षेत्रात ०१ रूग्णालय, ०६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ५८ उपकेंद्र, तर ५ प्राथमिक आरोग्य पथके होती. आरोग्य संस्था आदिवासींच्या आरोग्याची दक्षता घेत आहेत.

**तक्ता ४.१८ : पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आरोग्य संस्था** [४३]

| तालुका | ग्रामिण रूग्णालय | प्रा.आरोग्य केंद्र | प्रा.आरोग्य उपकेंद्र | प्रा. आरोग्य पथके |
|---|---|---|---|---|
| जुन्नर | ०० | ०३ | २८ | ०२ |
| आंबेगांव | ०० | ०२ | १७ | ०३ |
| खेड | ०१ | ०१ | १३ | ०० |
| एकूण | ०१ | ०६ | ५८ | ०५ |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना सन २००४.०५

## ८. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रस्त्याची लांबी [४४]

जुन्नर खेड, आंबेगांव या तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रात राज्य मार्ग १११ कि.मी. लांबीचे आहेत. तर जिल्हा मार्ग १८० कि.मी. लांबीचे आहेत. ग्राम मार्ग २५१ कि. मी. लांबीच आहेत. तर इतर मार्ग १३० कि.मी. लांबीचे आहेत. राज्य मागपिक्षा जिल्हा व ग्राम मार्ग जास्त लांबीचे आहेत. या क्षेत्रातून एकही महामार्ग जात नाही. यावरून आदिवासी क्षेत्रातील दुर्गम स्थितीची कल्पना येते.

**तक्ता ४.१९ :आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रस्त्याची लांबी**

| राज्यमार्ग | प्रमुख जिल्हा मार्ग | इतर जिल्हा मार्ग | ग्राम मार्ग | एकुण |
|---|---|---|---|---|
| १११ कि.मी.१८० | १८० कि.मी. | १३० कि.मी. | २५१ कि.मी. | ६७२ कि.मी. |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना सन २००६.०७

## ९. पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शीर्ष व उपशिर्षानुसार गोषवारा [४५]

सन २००४.०५ या आर्थिक वर्षात पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात व क्षेत्रा बाहेर विविध बाबीवर शासनाच्या आदिवासी विभागाकडून खर्च करण्यात आला त्यात प्रमुख्याने कृषि व संलग्न सेवा, ग्रामिण विकास, पाटबंधारे व पुरनियंत्रण, उर्जा विकास, उद्योग व खनिजे, रस्ते विकास, सामन्य आर्थिक सेवा, सामाजिक सामुहिक सेवा इत्यावरील खर्चाचा समावेश होता.

सामाजिक व सामुहिक सेवांवर ८३३.४१ लाख रूपये खर्च करण्यात आले होते हा या सेवेवरील सर्वाधिक खर्च होता. त्यात प्रामुख्याने सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण, कला व संस्कृती, वैद्यकीय शिक्षण सर्वा. आरोग्य ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता व गृहनिर्माण, नगर विकास, माहिती प्रसिध्दी मागास वर्गीयाचे कल्याण, महिला व बाल कल्यान, कामगार कल्याण, पोषण इत्यादी बाबीवरील खर्चाचा समावेश होता.

तर ग्रामिण विकासावरील खर्च दुसऱ्या क्रमांकावर होता. त्यावर एकूण १८९.९२ लाख रूपये खर्च करण्यात आले होते. हा सर्व खर्च आदिवासी लोकांच्या विकासासाठी करण्यात आला. त्यातून आदिवासींचे जीवनमान सुधारण्यात प्रयत्न केला गेला.

**तक्ता ४.२० : पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शीर्ष व उपशिर्षानुसार गोषवारा (सन २००४–०५)**

| | कृषि व सलंग्न सेवा | ग्रामिण विकास | पाटबंधारे व पुरनियंत्रण | उर्जा विकास | उद्योग व खनिजे | रस्ते विकास | सामान्य आर्थिक सेवा | सामाजिक व सामुहिक सेवा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| TSP | २२.३४ | १८९.९२ | २८.८८ | २०.०० | ०.०८ | २०.६३ | ०० | ८३३.४१ | १११५.२६ |
| OTSP | ३.२० | ५७.३९ | ०० | ८.८८ | ०.०४ | ८.२५ | ०० | २२८.८९ | ३०६.६५ |
| एकूण | २५.५४ | २४७.३१ | २८.८८ | २८.८८ | ०.१२ | २८.८८ | ०० | १०६२.३० | १४२१.९१ |

**आधार :** वार्षिक आदिवासी उपयोजना सन २००४–०५

## १०. पुणे जिल्ह्यातील कातकरी आदिवासी

महाराष्ट्रातील अतिमागास आदिवासी जमात समुहात (पी.टी.जी) कातकरी, कोलाम व माडिया गोंड या तीन आदिम जमतीचा समावेश होतो. त्यापैकी पुणे जिल्ह्यात कातकरी ही आदिम जमात वास्तव्य करताना आढळते. २००१ नुसार पुणे जिल्ह्यात ११९३५ एवढी कातकरी जामातीची लोकसंख्या आहे. एकुण आदिवासी लोकसंख्येच्या जवळ जवळ ५% कातकरी जमातीची लोकसंख्या पुणे जिल्ह्यात आहे.

पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगांव, जुन्नर व मावळ, भोर, वेल्हे, मुळशी, हवेली, या तालुक्यात कातकरी लोकसंख्यचे वास्तव्य आढळते. यापैकी खेड, आंबेगांव, जुन्नर व मावळ या तालुक्यात कातकरी लोकसंख्यचे मोठया प्रमाणात केंद्रीकरण झाले. आहे. या

तालुक्यांमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्र आहे. त्यामुळे कातकरी लोकसंख्या जास्त दिसते.

''१९९६-९७ च्या बेंच मार्क सर्व्हे नुसार पुणे जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रात १७० कातकरी कुटूंबे आढळून आली होती. त्यांची लोकासंख्या ८६१ एवढी होती. वयोगटानुसार ६ वर्षा वरील लोकसंख्या ७०१ एवढी होती. साक्षर लोकसंख्या १७६ एवढी होती. त्यांच्या साक्षरतेची टक्केवारी २५.११ एवढी होती.

पुणे जिल्हयात कातकरी ही आदिवासी जमात दुसऱ्या क्रमांकावर आहे. १९८८ साली आदिवासी विकास प्रतिष्ठानने पुणे जिल्हयातील कातकरी कुटूंबाचे सर्वेक्षण केले होते. त्यानुसार पुणे जिल्ह्यात २५०० एवढी कातकरी कुटूंबे होती. त्यापैकी २००० कुटूंबांना रेशन कार्ड मिळाले नव्हते. तसेच आदिवासी विभागाच्या ''मासेमारी जाळी पुरवठा योजनेचा'' लाभ कातकरी कुटूंबांना मिळाला नव्हता. परंतु '' बेंजो पार्टी साहित्य'' पुरवठा योजनेचा कातकरी कुटूंबांना फायदा झाला होता. ही योजना लोकप्रिय ठरली होती.[४६]

ही जमात पुणे जिल्हयाच्या पश्चिम भागात केंद्रीत झाल्याचे दिसते. पश्चिम भागात नद्या व धरणे आणि डोंगरे उतार व दऱ्या यांचे प्रमाण आधिक आहे. तसेच भातशेती, शेतमजूरी, व मासेमारीला या भागात अनुकुलता दिसते. त्यामुळे कातकरी जमातीचे केंद्रीकरण आधिक झाल्याचे दिसते. रायगड, ठाणे या जिल्ह्याच्या सिमा ज्या तालुक्याला आहेत. त्या तालुक्यात कातकरी कुटुंबे आढळतात. दुर्गम व डोंगरी भागात मासेमारी, भात शेतीतील मजूरी ही प्रमुख उपजीवीकेची साधने आहेत. उत्पन्नाचा स्त्रोतच मागासलेला असल्याने कातकरी लोकांची आर्थिक स्थिती देखील वाईट असल्याचे दिसते. हे आदिवासी आजही आदिम जीवन जगत आहेत.

## ४.३१ सारांश :

प्रस्तुत प्रकरणात अभ्यात क्षेत्र म्हणून पुणे जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घेतला

आहे. जिल्ह्याच्या इसवीसनाच्या ७ व्या शतकापासून ते आजपर्यंतच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, प्राकृतिक रचना, नद्या, धरणे, पर्जन्य, हवामान, वनक्षेत्र याचे विवेचन करण्यात आले आहे. या भौगोलिक व प्राकृतिक रचनेच्या पाश्वभूमीवर कातकरी सारख्या आदिवासींच्या वास्तव्याला अनुकूल वातावरण आहे. नद्या व धरणामुळे मासेमारीला वाव आहे आणि पश्चिम महाराष्ट्रातील वनक्षेत्रामुळे वनवस्तू संकलनाला वाव आहे हे यावरून स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या, लोकसंख्येची घनता आणि अनुसूचीत जाती, जमातीची लोकसंख्या, कर्ती लोकसंख्या आणि स्त्री पुरूष प्रमाण याचा आढावा घेण्यात आला आहे. एकूण लोकसंख्येच्या १४.१३% अनुसूचीत जाती जमातीची लोकसंख्या जिल्ह्यात आढळते. त्यापैकी ३.६% आदिवासी लोकसंख्या वास्तव्य करताना दिसते. ही सर्व लोकसंख्या जिल्ह्याच्या पश्चिम भागात केंद्रीत झाल्याचे दिसते.

जिल्ह्यातील शिक्षण व साक्षरता याचाही आढावा घेण्यात आला आहे. जिल्ह्यात ८१% साक्षरता आढळून आली. त्यात आदिवासी साक्षरता कमी असल्याचे दिसून आले.

पुणे जिल्ह्यातील पीक रचना, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन या बाबींवरही प्रकाश टाकला आहे. पश्चिम भागातील शेती व पीक रचना कातकरी लोकांना शेतमजूर म्हणून रोजगार देणारी आहे.

आधारभूत संरचना म्हणून वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, याचाही आढावा घेतला आहे. तसेच उद्योग-व्यापार यावरही प्रकाश टाकला आहे.

प्रकरणाच्या अंतिम भागात अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्याचा आढावा घेतला आहे. सर्वसाधारणपणे जुन्नर, आंबेगांव, खेड, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर व हवेली अशा आठ तालुक्यात आदिवासी लोकसंख्येचे केंद्रीकरण झाल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील आदिवासी वस्ती असलेली गावे व शहरे याची माहिती विश्लेषित करण्यात आली आहे. जिल्ह्यात जुन्नर, खेड, आंबेगांव या तालुक्यात

आदिवासी उपयोजना क्षेत्र असल्याचे दिसून आले. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या, स्त्री–पुरूष प्रमाण, आश्रम शाळा व वसतीगृहे, दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबे, आरोग्य सुविधा, रस्ते व उपयोजनेवरील खर्चाचा गोषवारा आणि अंतिमत: जिल्ह्यातील कातकरी आदिवासी इत्यादींवर प्रकाश टाकला आहे.

---

**संदर्भ सूची**

[१] टकले, ज्ञानेश्वर गुरूजी, ''पुणे शहराचा इतिहास'', ज्ञानेश्वर टकले प्रकाशन, पुणे, ११ नोव्हेंबर २००४, पृष्ठ २९.

[२] Zimare, Alka M., "Demographic Profile of Pune District (1961 to 1991)", M. Phil Dissertation (Economics), Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune, 1995, p. 25.

[३] प्रकाशक, ''पुना डिस्ट्रिक्ट डायरी'', पुना डिरेक्टरी हाऊस, पुणे, ९वे प्रकाशन, १९७५, पृष्ठ १७–१८.

[४] Zimare, Alka M., "Demographic Profile of Pune District (1961 to 1991)", M. Phil Dissertation (Economics), Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune, 1995, p. 25.

[५] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६–०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, पृष्ठ २.

[६] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६–०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, पृष्ठ १.

[७] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६–०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, विभाग १, पृष्ठ २.

[८] Poona District Census Hand Book, 1961, p. 11.

[९] मुख्य सांख्यिकी, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, नागपूर, २००५–०६.

[१०] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००५–०६'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ ४३.

[११] मुख्य वन संरक्षक, वन विभाग, महाराष्ट्र राज्य, नागपूर, २००६.

[१२] मुख्य वन संरक्षक, प्रादेशिक कार्यालय, पुणे, २००६.

[१३] जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, पुणे, २००६.

[१४] भारताची जनगणना, २००१.

[१५] तत्रैव.

[१६] तत्रैव.

[१७] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००७–०८'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृष्ठ १२.

[१८] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६–०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, पृष्ठ IV.

[१९] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००२–०३'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००३, पृष्ठ १०.

[२०] भारताची जनगणना, २००१.

[२१] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६-०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, पृष्ठ २१.

[२२] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६-०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००७, पृष्ठ ५.

[२३] पवार विकास, ''१९९२ ते २००२ या दशकातील पुणे जिल्ह्यातील बँक सेवांच्या विस्ताराचे चिकित्सक मुल्यमापन'', विद्यावाचस्पती प्रबंध (अर्थशास्त्र), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २००६, पृष्ठ ३५.

[२४] जिल्हा अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र) अहवाल, पुणे, २००५-०६.

[२५] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००६-०७'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ ४२.

[२६] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००४-०५'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृष्ठ ६२-६८.

[२७] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००५-०६'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ ७४.

[२८] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००५-०६'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ ८९.

[२९] शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, २००२-०३.

[३०] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००४-०५'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृष्ठ २६.

[३१] भारताची जनगणना, १९९१.

[३२] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००२-०३'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००३, पृष्ठ ३१.

[३३] कृषि विकास अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, पुणे, २००७.

[३४] प्रकाशक, ''पुणे जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, २००४-०५'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृष्ठ १०.

[३५] साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, २००४-०५, पृष्ठ १०.

[३६] भारताची जनगणना, २००१.

[३७] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००६-०७, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४२१.

[३८] भारताची जनगणना, २००१. महाराष्ट्राची मालिका फायनल पॉप्युलेशन, पान ९५.

[३९] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००६-०७, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४२२.

[४०] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००६-०७, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४२४.

[४१] सर्व्हे रिपोर्ट, १९८०, डि.आर.डि.ओ., गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, पान १०.

[४२] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००६-०७, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४६८.

[४३] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ३५१.

[४४] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००६-०७, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४३६.

[४५] वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल, २००४-०५, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, पान ४६९.

[४६] आदिवासी विकास प्रतिष्ठान, ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सर्व्हेक्षण अहवाल'', पुणे, १९८८, पान १६.

**प्रकरण पाचवे**

# अभ्यास माहितीचे विश्लेषण

**अ) कातकरी आदिवासींची सामाजिक स्थिती**

५.१ अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाची वास्तव स्थिती

५.२ कुटुंब व्यवस्था

५.३ विवाह स्थिती

५.४ शैक्षणिक स्थिती

५.५ आरोग्य स्थिती

५.६ सामाजिक व प्रशासकीय दुरावा आणि कातकरी

**ब) कातकरी आदिवासींची आर्थिक स्थिती**

५.७ आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत

५.८ वार्षिक उत्पन्न पातळी

५.९ आर्थिक व्यवहार

५.१० स्थावर मालमत्ता

५.११ व्यावसायिक स्थिती

५.१२ मत्स्य उत्पादनाची बाजारपेठ

५.१३ मासेमारीची अनुकुलता आणि कातकरी वस्तीचे केंद्रीकरण

५.१४ शासकीय योजनांचे लाभ

५.१५ आदिवासी सहकारी संस्था

५.१६ श्रमाचा मोबदला

५.१७ रोजगार उपलब्धतेचा कालावधी

५.१८ कामासाठी स्थलांतर

५.१९ राहणीमान पातळी

५.२० मुलभूत सेवा सुविधांची उपलब्धता

५.२१ व्यसनाधिनतेचा आर्थिक स्थितीवरील परिणाम

५.२२ गाव कारभारातील कातकरी लोकांचा सहभाग

५.२३ अभ्यास क्षेत्रातील कातकरी जमातीच्या समस्या

५.२४ सारांश

**प्रकरण पाचवे**

# अभ्यास माहितीचे विश्लेषण

## प्रस्तावना :

पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडण्यात आले. पुणे जिल्ह्यातील पश्चिम पट्ट्यातील ०८ तालुक्यांमध्ये या जमातीचे वास्तव्य आढळून आले. ०८ तालुक्यात एकूण १९२ कातकरी वस्ती असलेली गावे होती. त्याच्या ३०% गावे नमुना म्हणून निवडण्यात आली. अभ्यास क्षेत्रातील एकूण कुटुंबांच्या १६% कुटुंबे नमुना म्हणून निवडण्यात आली. कुटुंब प्रमुखाच्या अनुसुचिद्वारे मुलाखती, निरिक्षणात्मक नोंदी, इ. द्वारे कातकरी जमातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची तथ्ये संकलीत करण्यात आली. अभ्यास क्षेत्रातील कातकरी जमातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यास माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

## अ) कातकरी समाजाची सामाजिक स्थिती :

## ५.१ अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाची वास्तव स्थिती :

### ५.१.१ कातकरी कुटुंबाचे मूळ स्थान :

**तक्ता ५.१ : कातकरी कुटुंबाचे मूळ स्थान**

| तालुका | मुळ स्थान माहित असलेल्या कुटुंबांची टक्केवारी | मुळ स्थानाचा परिसर | जिल्हा | मुळ स्थान माहित नसलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| जुन्नर | ६.८८ | मुरबाड | ठाणे | ७.२९ |
| आंबेगांव | ८.५२ | मुरबाड, कोळवण | ठाणे | ५.२४ |
| खेड | ९.७२ | कर्जत, पेण, खोपोली | रायगड | ३.२५ |
| मावळ | १०.५४ | पेण, खोपोली, पाली | रायगड | २.४२ |
| मुळशी | १२.९५ | कोलाड, रोहा, निजामपूर | रायगड | २.४३ |
| वेल्हे | १०.१२ | माणगांव, भावा, महाड | रायगड | ३.२४ |
| भोर | ९.७२ | वरंध, महाड, माणगांव, मदनगड, तळमाची | रायगड | २.८३ |
| हवेली | ४.०५ | निजामपूर, माणगांव | रायगड | ०.८ |
| **एकूण** | **७२.५०** | | | **२७.५०** |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबाचे मुळ स्थानासंबंधी तथ्य संकलीत केली असता कातकरी कुटूंबापैकी ७२.५% कुटूंबांनी रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील मुळ स्थान असल्याचे सांगीतले आहे. मुरबाड, कोळवण, कर्जत, पेण, खोपोली, पाली, कोलाड, रोहा, निजामपूर, माणगांव, भावा, महाड, वरंध, मदनगड, तळमाची इ. परिसरातील ही कुटुंबे असल्याचा निष्कर्ष काढला आहे.

पुणे जिल्ह्याला रायगड आणि ठाणे जिल्ह्याच्या सिमा आहेत. पुणे जिल्ह्याच्या जुन्नर व आंबेगांव तालुक्याला ठाणे जिल्ह्याची सिमा आहे. त्यामुळे या परिसरातील कातकरी कुटुंबे मुरबाड तालुक्यातून आले आहेत. म्हणजे मुरबाड हे त्यांचे मुळ स्थान आहे. तर खेड, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, हवेली या तालुक्यातील कातकरी लोक रायगड जिल्ह्यातील आहेत. त्याच्या सिमा पुणे जिल्ह्याला आहेत.

वरील तक्त्यावरून एकूण कातकरी कुटुंबांपैकी १५.४०% कुटुंबे ठाणे जिल्ह्यातील तर ५७.१०% कुटुंबे ही रायगड जिल्ह्यातील आहेत. तर २७.५% कुटुंबांना आपले मुळ स्थान कोणते हे माहित नाही. कारण कुटूंब प्रमुखांचा जन्म येथे झाला आहे. यावरून त्यांचा येथील वास्तव्याच्या कालावधीलक्षात येऊ शकतो. पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाचे केंद्रीकरण यावर दृष्टिक्षेप टाकला असता जिल्ह्याच्या पश्चिम भागात ही जमात आढळते व पश्चिम भागाला ठाणे व रायगड जिल्ह्यांच्या सिमा आहेत. ही जमात मुळची रायगड मधील आहे. ती कामाच्या निमित्ताने स्थलांतरीत होऊन ती पुणे जिल्ह्यात स्थायिक झाली आहे असा निष्कर्ष निघाला आहे.

पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रात मुरबाड, कोळवण, पेण, पाली, सुधागड, कर्जत, रोहा, निजामपूर, माणगांव, कोलाड, खोपोली, भावा, महाड, तळमाची, मदनगड, वरंध या रायगड व ठाणे जिल्ह्यांच्या परिसरातून कातकरी कुटुंबे अभ्यास क्षेत्रात अनेक पिढ्यांपासून स्थायिक झाली आहेत हे सिध्द होते.

### ५.१.२ अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांच्या वास्तव्याचा कालावधी :


पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबे ही पुणे जिल्ह्यातील नाहीत हे सिध्द झाले असले तरी त्यांच्या वास्तव्याचा कालावधी विचारात घ्यावा लागतो. त्याच्या मुळ स्थानाबरोबर त्यांच्या वास्तव्याचा कालावधी महत्त्वाचा आहे.

**तक्ता ५.२ : कातकरी कुटुंबांच्या वास्तव्याचा कालावधी**

| जन्मापासून | २० – ३० वर्षे | एकूण |
|---|---|---|
| ७८ % | २२% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१ : कातकरी कुटुंबांच्या वास्तव्याचा कालावधी**




अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांच्या वास्तव्याच्या कालावधीसंबंधी तथ्य संकलीत केली असता एकूण कुटुंबांपैकी ७८% कुटुंबे येथे जन्मापासून राहत असल्याचे आढळून आली. या कुटुंबातील प्रमुखांचा जन्मच अभ्यास क्षेत्रात झाला आहे. त्यामुळे त्यांच्या वास्तव्याचा कालावधी ४०-५० वर्षांपासूनचा आहे असा निष्कर्ष निघतो. तर २२% कुटुंबे २०-३० वर्षांपासून राहात आहेत. कातकरी कुटूंबांची ही चौथी पिढी येथे वास्तव्य करीत आहे. तसा वास्तव्याचा कालावधी मोठा आहे, त्यामुळे तेथे स्थानिक पातळीवरील हक्काचे रहिवासी आहेत, ते येथील नागरिक आहेत हे सिध्द होते.

### ५.१.३ ग्रामपंचायतीतील नोंदी :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या ग्रामपंचायतीतील नोंदीसंबंधी माहिती आजमावली असता २६% कुटुंबाच्या नोंदी जन्मापासून असल्याचे दिसून आले. ७०% कुटुंबांच्या नोंदी २१–४० वर्षांपासून आहेत तर ४% कुटुंबांच्या अद्यापही ग्रामपंचायतीत नोंदी नसल्याचे दिसून आले.

**तक्ता ५.३ : ग्रामपंचायतीतील रहिवासी म्हणून नोंदीचा कालावधी**

| जन्मापासून | २१–४० वर्षे | नोंदी नाहीत | एकूण |
|---|---|---|---|
| २६% | ७०% | ४% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

कातकरी कुटुंबाच्या वास्तव्याचा कालावधी आणि ग्रामपंचायतीतील नोंदी यांची पडताळणी केली तर असे दिसते की ७८% कुटुंबे जन्मापासून वास्तव्य करीत असताना केवळ २६% कुटुंबांच्या ग्रामपंचायतीतील नोंदी जन्मापासून दिसत आहेत आणि ७०% कुटुंबांच्या नोंदी २१–४० वर्षा दरम्यानच्या आहेत व ४% कुटुंबांच्या नोंदी नाहीत. यावरून स्थानिक व प्रशासकीय पातळीवर कातकरी कुटुंबांची लवकर दखल घेतली गेली नाही. मुळ स्थानाचा मुद्दा पुढे करून या नोंदी केल्या गेल्या नाहीत. एक प्रकारे त्यांच्या विकासाच्या संधी नाकारल्या आहेत. आजही ४% कुटुंबांच्या ग्रामपंचायतीत नोंदी झालेल्या नाहीत. याची प्रमुख कारणे म्हणजे स्थानिक पुढारी व प्रशासन यांनी केलेले दुर्लक्ष, नोंदी संबंधीच्या इच्छाशक्तीचा अभाव इ.

### ५.१.४ मतदार यादीतील नावांच्या नोंदी :


अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांच्या मतदार यादीतील नोंदींसंबंधी तथ्य संकलीत केली असता असे दिसून आले की ४७% कुटुंबांची नांवे ६–१० वर्षांदरम्यान नोंदली गेली आहेत. ३४% कुटूंबांची नावे ११–२० वर्षांदरम्यान, ८% कुटुंबांची नावे ५ वर्षांदरम्यान नोंदली गेल्याचे आढळून आले. तर ११% कुटुंबांची नावे अद्यापही मतदार यादीत समाविष्ट झालेली नाहीत.

**तक्ता ५.४ : मतदार यादीतील नोंदी**

| ०-५ वर्षे | ६-१० वर्षे | ११-२० वर्षे | नोंदी नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| ८% | ४७% | ३४% | ११% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर - नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२ : मतदार यादीतील नोंदी**




मतदार यादीत जवळ जवळ ८९% कुटुंबांची नावे समाविष्ट झालेली दिसतात. ११% कुटूंबांची अद्यापही मतदार यादीत नावे नोंदली गेली नाहीत असे दिसून आले. कातकरी लोकांचे सततचे स्थलांतर होणे, नाव नोंदणीसाठी कागदपत्रांची पूर्तता न करणे, त्यासंबंधी जागरूकता नसणे, त्यांच्या व्यसनी व स्थलांतरीत वृत्तीमुळे त्यांच्या या नोंदीकडे प्रशासकीय पातळीवर दुर्लक्ष होणे ही कारणे कारणीभूत ठरतात.

**५.१.५ शिधापत्रिकेतील नोंदी :**

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबांच्या शिधापत्रीकेतील नोंदींचा कालावधी यासंबंधीची तथ्य संकलीत केली असता १६% कुटुंबांना ५ वर्षांपूर्वी रेशनकार्ड मिळालेली आहेत. ३५% कुटुंबांना ५-१० वर्षां दरम्यान, १९% कुटुंबांना १०-१५ वर्षांदरम्यान शिधापत्रिका मिळालेल्या आहेत. तर ३०% कुटुंबांना अद्यापही शिधापत्रिका मिळालेल्या नाहीत.


**तक्ता ५.५ : शिधापत्रिकेच्या यादीतील नोंदीचा कालावधी**

| ०–५ वर्षे | ६–१० वर्षे | ११–१५ वर्षे | नोंदी नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| १६% | ३५% | १९% | ३०% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

७०% कातकरी कुटुंबांच्या ५–१५ वर्षा दरम्यान शिधापत्रिकेत नोंदी केलेल्या दिसत असल्या तरी त्यांच्या वास्तव्याचा आणि ग्रामपंचायतीतील नोंदीचा कालावधी विचारात घेतला असता शिधा पत्रिकेतील नोंदी या फार उशीरा झाल्या आहेत. याचे कारण म्हणजे सततचे स्थलांतर होणे, त्यामुळे प्रशासनाने दुर्लक्ष करणे, हे होय.

**आलेख ५.३ : शिधापत्रिकेच्या यादीतील नोंदीचा कालावधी**




यावरून ५–१५ वर्षादिरम्यान शिधापत्रिकेत ७०% कातकरी कुटुंबांची नावे नोंदली गेली आहेत व ३०% कुटुंबांच्या अद्यापही नोंदी झालेल्या नाहीत. कागदपत्रांची पूर्तता करणे, ग्रामपंचायतीत नोंदी नसणे, स्थानिक पातळीवर कातकरी लोकांच्या नोंदीकडे दुर्लक्ष करणे, आलेली शिधापत्रिका दुसऱ्याला देणे इत्यादी प्रकार अभ्यासक्षेत्रात दिसून आले. शिधापत्रिका ही कातकरी कुटुंबाची आर्थिक स्थिती स्पष्ट करणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी रहिवासी असल्याच्या पुराव्यासाठी शिधापत्रिका महत्त्वाची आहे.

यावरून शिधापत्रिकेतील नोंदी उशीरा झाल्या आहेत आणि ३०% कुटुंबे अद्यापही शिधापत्रिकेपासून वंचित राहिली आहेत असा निष्कर्ष निघाला आहे.

### ५.१.६ जातीचे दाखले :

जातीचा दाखला हा आदिवासी असल्याचा एकमेव कायदेशीर दस्तऐवज आहे. अभ्यास क्षेत्रात जातीच्या दाखल्यासंबंधीची स्थिती आजमावली असता ५३% कातकरी कुटुंबांना जातीचे दाखले मिळाले आहेत तर ४७% कुटुंबे अद्यापही जातीच्या दाखल्यापासून वंचीत आहेत.

**तक्ता क्र. ५.६ : जातीचे दाखले**

| दाखले मिळालेली कुटुंबे | दाखले न मिळालेली कुटुंबे | एकूण |
|---|---|---|
| ५३% | ४७% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

दाखले मिळालेली सर्वाधिक कुटुंबे आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील आहेत. कारण तेथे विविध आदिवासी विकास योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला आवश्यक असतो. त्यामुळे त्या संबंधीची जागरूकता लवकर झालेली आहे व उपयोजना क्षेत्रात दाखले दिले गेले आहेत.

४७% कुटुंबांना दाखले मिळालेले नाहीत त्यांची कारणे म्हणजे जातीचा दाखला काढताना कागदपत्रांची पूर्तता न करणे होय. त्यात आईवडीलांचा शाळा सोडल्याचा दाखला, ५० वर्षापूर्वीचा आदिवासी असल्याच्या नोंदीचा पुरावा सादर करावा लागतो, परंतू कातकरी अज्ञानी, निरक्षर असल्याने त्यांच्या ग्रामपंचायतीत व इतर शासकीय दप्तरी नोंदी केल्या गेल्या नसल्याने पुरावे सादर करणे शक्य होत नाही व त्यामुळे दाखले मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

तसेच दाखले लवकर न मिळण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे येथील कातकरी मुळचे कोकणातील आहेत. त्यांचे मुळ स्थान येथील नसल्यामुळे जातीचे दाखले दिले गेले नाहीत. परंतू नारी समता मंच आणि इंटर विडा इंडिया या सामाजिक संस्थांनी कातकऱ्यांना दाखले मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे तरी ५३% कातकरी कुटुंबांना जातीचे दाखले मिळाले आहेत.

खेड, जुन्नर, आंबेगांव या तालुक्यातील कातकऱ्यांना दाखले मिळालेले आहेत. भोर, वेल्हे, मावळ, मुळशी व हवेली या तालुक्यातील कातकरी कुटुंबांना मुळ स्थानाच्या मुद्यावरून जातीचे दाखले मिळण्यात अडथळे आले होते.

## ५.२ कुटुंब व्यवस्था :

कातकरी लोकांची कुटुंब पध्दती अस्थिर, अर्धभटक्या जीवनशैलीतून तयार झालेली आहे. त्यांच्या कुटुंब पध्दतीत स्त्री, पुरूष, नातेसंबंध सहजीवन या सर्व बाबींना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. इतर आदिवासींच्या तुलनेने कातकऱ्यांची कुटुंब पध्दती आगळी वेगळी व एक आदर्श मानली जाते. ती प्रत्यक्ष दिसत नसली तरी त्यांची कौटुंबिक संस्कृती इतरांपेक्षा वेगळी आहे.

पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंब पध्दती संबंधीची तथ्य संकलीत केली असता पुढील स्थिती दिसून आली.

### ५.२.१ वयोगटानुसार कुटुंबातील सदस्य संख्या :


अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील वयोगटानुसार सदस्य संख्येसंबंधीची तथ्य संकलीत केली असता ०–५ वयोगटातील १९% सदस्य संख्या होती. ६–१४ वयोगटातील ३३%, १५–६० वयोगटातील ४८% अशी वयोगटानुसार सदस्य संख्या दिसून आली.

**तक्ता ५.७ : वयोगटानुसार कुटुंबातील सदस्य संख्या**

| वयोगट | ० – ५ | ६ – १४ | १५ – ६० | ६१ च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १९% | ३३% | ४८% | नाही | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

### आलेख ५.४ : वयोगटानुसार कुटुंबातील सदस्य संख्या




तथ्य संकलनात १५–६0 वयोगटातील सर्वाधिक सदस्य दिसून आले. ६–१४ वयोगटातील सदस्य संख्या दुसऱ्या क्रमांकावर असल्याची दिसते. तर सर्वात कमी संख्या 0–५ वयोगटात दिसून आली. 0–५ वयोगटातील सदस्य कमी असण्याचे कारण म्हणजे या जमातीत बाल मृत्युचे प्रमाण जास्त आहे.

१५–६0 या वयोगटातील संख्या सर्वाधिक दिसते. ही सदस्य संख्या उत्पादक असते. परंतू प्रत्यक्षात 0–५ व ६–१४ या वयोगटातील सदस्य संख्या अनुत्पादक असते. उत्पादक लोकसंख्या आणि अनुत्पादक लोकसंख्या यात असंतूलन निर्माण झाल्यास त्याचा परिणाम आर्थिक मागासलेपणा वाढण्यावर होतो. ही स्थिती कातकरी कुटुंबाच्या बाबतीत अभ्यासक्षेत्रात दिसून आली.

६१ च्या पुढील वयोगटातील सदस्य आढळून आले नाहीत. अल्प वयात विवाह, निकृष्ट आहार, विविध रोगांचे साम्राज्य इत्यादींमुळे आयुर्मान कमी इत्यादी कारणे कारणीभूत असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

### ५.२.२ कुटुंबाचा आकार :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांपैकी ५ सदस्य असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ३२%, ४ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण १९%, ६ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण १५%, ७

सदस्य असलेली ११% तर ३ सदस्य असलेली १०% कुटुंबे असा कुटुंबाचा आकार आढळून आला.

**तक्ता ५.८ : कुटुंबाचा आकार**

| सदस्य संख्या | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | ११ | १३ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १% | ६% | १०% | १९% | ३२% | १५% | ११% | ३% | २% | ०.५% | ०.५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

५ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आले आणि दुसऱ्या क्रमांकावर ४ सदस्य असलेली कुटुंबे आढळून आली. साधारणपणे ३–७ दरम्यान सदस्य असलेली सर्वाधिक कुटुंबे आढळून आली.

कुटुंबाचा सरासरी आकार ५ सदस्य असल्याचा दिसून आला. त्यावरून कुटुंबाचा आकार मोठा असल्याचा निष्कर्ष निघतो. कुटुंबाचा मोठा आकार असण्याची प्रमुख कारणे म्हणजेच कुटुंब नियोजनाचा अभाव, अल्पवयीन विवाहामुळे प्रजननाचा वाढता कालावधी, कुटुंबातील वाढती सदस्य संख्या हि देवाची कृपा व अर्थार्जिनासाठी उपयोगी इत्यादी होत. तसेच कातकरी कुटुंबात लोकसंख्या शिक्षणाचा अभाव दिसतो. वाढती सदस्य संख्या कुटुंबाच्या विकासात अडथळा ठरणार आहे याची जाणीव त्यांना नाही. ते कधी भविष्याचा विचार करीत नाहीत. जेव्हा कुटुंबातील नाकर्ती सदस्य संख्या वाढते तेव्हा मिळणारे उत्पन्न ही लोकसंख्या फस्त करते त्यामुळे उत्पन्न कमी पडते आणि कुटुंबाच्या दारिद्र्यात वाढ होते आर्थिक मागासलेपण वाढत जाते. याची जाणीव मात्र उशीरा होते आणि कुटुंब दारीद्र्याच्या दुष्टचक्रात अडकते. ही वास्तविकता आढळून आली.

### ५.२.३ स्त्री–पुरूष प्रमाण :

पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात स्त्री–पुरूष प्रमाणासंबंधी तथ्य संकलीत केली असता दर हजार पुरूषांमागे १०१४ स्त्रिया असल्याचे दिसून आले.


म्हणजे ५९९ पुरूष आणि ६१७ स्त्रिया अशी संख्या आढळून आली. त्यामुळे स्त्री पुरूष प्रमाणात स्त्रीया पुरूषांपेक्षा जास्त असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

**तक्ता ५.९ : स्त्री–पुरूष प्रमाण**

| स्त्रीया | पुरूष | एकूण |
|---|---|---|
| ५१% | ४९% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.५ : स्त्री–पुरूष प्रमाण**




नमुना क्षेत्रात शेकडा स्त्री–पुरूष प्रमाण पाहिले असता ५१% स्त्रीया व ४९% पुरूष असल्याचे आढळून आले. पुरूषांपेक्षा स्त्रीयांचे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे कातकरी समाजात स्त्री–पुरूष भेदभांव असा दिसत नाही. स्त्री ही सासर किंवा नवरा यांच्या दडपणाखाली पिचलेली नसते. ही गोष्ट ग्रामीण पितृसत्ताक समाजाच्या तुलनेतच नाही तर इतर आदिवासी समाजाच्या तुलनेत फार वैशिष्ट्यपूर्ण आहे. घराबाहेरच्या जवळ जवळ प्रत्येक कामात तिचा पुरूषांबरोबर सहभाग असतो. परंपरेने कातकऱ्यात फार वरच्या दर्जाची लिंगभाव समानता आहे. यावरून कातकरी समाजात स्त्री पुरूष असा भेदभाव दिसत नाही हे स्पष्ट होते. स्त्रीमध्ये अर्थार्जन व जननक्षमता असल्यामुळे समाजातील व कुटुंबातील तिला उच्च स्थान दिल्याचे दिसते. यामुळे पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांची संख्या जास्त असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

### ५.२.४ कुटुंबाचा प्रकार :


पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबात दोन प्रकारच्या कुटुंबपद्धती आढळून आल्या. त्यात संयुक्त कुटुंबांचे प्रमाण २३% होते तर ७७% विभक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण आढळून आले. यावरून विभक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण जास्त असल्याचा निष्कर्ष निघतो.

**तक्ता ५.१० : कुटुंबाचा प्रकार**

| कुटुंबाचा प्रकार | संयुक्त | विभक्त | एकूण |
|---|---|---|---|
| **टक्केवारी** | २३% | ७७% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.६ : कुटुंबाचा प्रकार**




कातकरी समाजातील विभक्त कुटुंब पध्दती ही त्यांच्या अस्थिर, अर्धभटक्या जीवन शैलीतून निर्माण झालेली आहे. परिस्थितीला प्रतिसाद म्हणून जगात सगळीकडेच अन्नसंग्रहण व शिकार करून जीवन जगणाऱ्या भटक्या टोळ्यांमध्ये विभक्त कुटुंब व्यवस्था आढळते. भटक्या जीवनशैली मध्ये प्रत्येकाने स्वत:चे अन्न स्वत: मिळविणे जरूरीचे असते. शिकार जरी समूहाने मिळून केली तरी एकत्र येणे तेवढ्या कामापुरतेच असते.

भटकंतीच्या एका क्षेत्रामधून एकत्र कुटुंबाचे पोट भरणे शक्य नसते. मुलामुलीचे लग्न झाले की ते लगेच वेगळे होतात. त्याचे कुटुंब वेगळे थाटले जाते आणि अर्थार्जनाचा मार्ग शोधायला सुरूवात होते. या कुटुंब पध्दतीचा तोटा म्हणजे कातकऱ्यांचा मोठा समाज उभा

राहू शकला नाही. विभक्त कुटूंब पध्दतीमुळे कातकरी कुटुंबांना आपली मुले सोबत घेऊन हिंडण्याशिवाय पर्याय उरला नाही. त्याचा परिणाम म्हणजे मुलांवर संस्कार व त्यांचे शिक्षण होऊ शकले नाही. म्हणून या समाजात निरक्षरता अधिक दिसते.

नमुना अभ्यास क्षेत्रात कायम स्थिर झालेल्या कुटुंबात संयुक्त कुटुंब पध्दती आढळून आली. कारण शेतमजूरी करून उत्पन्न मिळविण्यासाठी मनुष्यबळ आवश्यक असते. तर जी कुटुंबे विटा बनविणे, कोळसा पाडणे या व्यवसायासाठी स्थलांतरीत होतात त्यांच्यामध्ये विभक्त कुटुंब पध्दती आढळून आली.

### ५.२.५ कुटुंब प्रमुख :


पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबातील प्रमुख यासंबंधी तथ्य गोळा केली असता असे दिसून आले की ९९% कटुंबात पुरूष प्रमुख होते आणि केवळ ०१% कुटुंबात स्त्री प्रमुख असल्याचे आढळून आले.

**तक्ता ५.११ : कुटुंब प्रमुख**

| कुटुंब प्रमुख | पुरूष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| **टक्केवारी** | ९९% | ०१% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.७ : कुटुंब प्रमुख**




कातकरी समाजात पितृसत्ताक कुटुंब पध्दती आहे असा निष्कष निघतो. कारण कातकरी हे हिंदू धर्मीय आहेत आणि हा समाज हिंदू धर्माच्या सानिध्यात वावरत

असल्यामुळे हिंदू धर्मातील पुरूष प्रधान संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. मुलांच्या नावापुढे वडीलांचे नाव लावणे, कुटुंब प्रमुख म्हणून स्त्री पेक्षा पुरूषाचे नाव असणे, स्थावर मालमत्ता व रेशनकार्ड, ग्रामपंचायतीतील नोंदी या सर्वावर पुरूषाचे नाव असते त्यामुळे कातकरी समाजात पुरूष हाच कुटुंब प्रमुख असतो असे सिध्द होते.

नमुना अभ्यास क्षेत्रात १% कुटुंबात स्त्री कुटुंब प्रमुख दिसून आली. याचे कारण म्हणजे त्या कुटुंबात पुरूष नाही विधवा स्त्रीया आहेत म्हणून कुटुंब प्रमुख स्त्रीया असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

## ५.३ विवाह स्थिती :

### ५.३.१ विवाह पध्दती :

विवाह पूर्व किंवा विवाहबाह्य संबंधांना कातकरी जमातीत मान्यता नसते. तसे झाल्यास त्यांना शिक्षा केली जाते. सगोत्री विवाह होत नाहीत. मात्र जमातीच्या अंतर्गतच विवाह होतात. ढोर व सोन कातकरीमध्ये विवाह होत नाहीत. सामान्यत: एक पत्नी विवाहच आढळतात. क्वचित बहुपत्नी विवाह होतात परंतू अलिकडे एक पत्नी विवाहच रूढ आहेत. या जमातीत पुरूषाला आतेबहीण, मावस बहीण व चुलत बहीण यांच्याशी विवाह करता येत नाहीत. परंतु मामे बहिणीशी विवाह करता येतो. लग्न समारंभ त्या मानाने साधा असतो. आपापल्या कुवतीप्रमाणे लग्न समारंभ आयोजित केला जातो.

अभ्यासक्षेत्रातील कातकरी हे सोन कातकरी आहेत. ते स्वत:ला मराठा कातकरी समजतात. त्यामुळे लग्न पध्दतीवर बऱ्यापैकी मराठा समाजाच्या लग्न पध्दतीची छाप पडलेली दिसते. मराठ्याप्रमाणेच सध्या मानपान दिले व घेतले जातात. विवाह विधी मात्र पारंपारिक पध्दतीने पार पाडले जातात.

लग्न मुलीच्या घरी केले जाते. घरासमोर मांडव घातला जातो. लग्नाच्या आदल्या दिवशी वधू वरास हळद लावतात. भिजवलेल्या गहू हरभऱ्याच्या मुंडावळ्या किंवा बाशिंगे बांधून खालूबाजा वाजवित वरास वधूच्या घरी नेतात. लग्न लावण्यासाठी ब्राम्हणाला

बोलवित नाहीत. या जमातीचा मुखिया 'नाईक' हा समारंभाचा म्होरक्या असतो. प्रत्येक वस्तीवर मुखिया असतो. लग्न लावण्याचे काम पाच विवाहित पुरूष करतात. तांदूळ, हळद, पान, सुपारी व पैसा यांचा कणा मांडतात. वर वधूला कमरेवर घेऊन कण्यास पाच फेऱ्या मारतो व लग्न होते. लग्नानंतर चहापान किंवा मद्यपान केले जाते. पुढे जेवण झाल्यावर सर्वांना दारूचा पाहुणचार दिला जातो. सर्वजण रात्रभर गाणी म्हणत वाद्याच्या तालावर नाचतात. अशी कातकरी जमातीत विवाह पध्दती असते.

### ५.३.२ विवाहाचे वय :


पुणे जिल्ह्यातील कातकरी मुला मुलींच्या लग्नाच्या वयासंबंधी माहिती आजमावली असता ५७% कुटुंबात वयात आल्यानंतर लग्ने केली असल्याचे दिसून आले. ४३% कुटुंबांमध्ये १३ ते १७ वयामध्ये विवाह केले असे दिसून आले. वयात येण्यासंबंधीचा कालावधी निश्चितपणे त्यांना सांगता आला नाही.

**तक्ता ५.१२ : विवाहाचे वय**

| वयात आल्यावर | १३–१७ वर्षे | एकूण |
|---|---|---|
| ५७% | ४३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.८ : विवाहाचे वय**




यौवन प्राप्त झालेल्या व्यक्तींनाच विवाह करण्याची परवानगी दिलेली आढळून येते. वयात आल्याशिवाय मुलामुलीचे विवाह केले जात नाहीत. व्यक्तीने कोणत्या वयात विवाह

करावे किंवा करू नये या संबंधीचे नियम समाजाने घालून दिलेले आहेत. आदिम व अप्रगत समाजामध्ये रितीरिवाजाच्या स्वरूपात हे नियम प्रचलीत असतात.

कातकरी मुलामुलींचे विवाह अल्पवयीन आहेत. त्यामुळे अल्पवयीन मातेचे आरोग्य धोक्यात येते. वेळप्रसंगी मातेला मृत्युला सामोरे जावे लागते. तसेच संततीत, शारिरीक व मानसिक व्यंगत्वाचे प्रमाण वाढते. प्रजनन काळ वाढून कुटुंबातील सदस्य संख्या वाढते. अल्पवयात विवाह झाल्यामुळे कुटुंब सांभाळणे मानसिक प्रगल्भतेअभावी कठीण होते. त्याचा परिणाम सामाजिक मागासलेपण वाढण्यावर होतो. जबाबदारी सांभाळताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यातून आर्थिक मागासलेपणा देखील वाढतो. ही वास्तवता अभ्यास क्षेत्रात दिसून आली.

### ५.३.३ वधूमुल्य :


आदिम समाजात काहीतरी मुल्य देऊन वधू मिळविण्याची प्रथा प्रचलित आहे. कातकरी जमातीत हुंडा पध्दती अद्यापही अस्तित्वात आहे. त्याला कातकरी जमातीत देज किंवा वधूमुल्य असे म्हणतात.

**तक्ता ५.१३ : वधूमुल्य**

| रूपये | ० – ५०० | ५०१ – १५०० | एकूण |
|---|---|---|---|
| टक्केवारी | ४९% | ५१% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.९ : वधूमुल्य**




अभ्यासक्षेत्रात वधूमुल्यासंबंधीची तथ्य आजमावली असता असे दिसून आले की, ४९% कुटुंबात ५०० रूपयांपर्यंत वधूमुल्य देण्यात आले होते तर ५१% कुटुंबात ५०१ ते १५०० पर्यंत वधूमुल्य देण्यात आल्याचे आढळून आले.

कातकरी जमातीत वधूमुल्य देण्याची प्रथा आहे. हे मुल्य कुवतीप्रमाणे दिले जाते. परंतू ते अनिवार्य असते. वधूमुल्य मुलीला दिले जाते. वधूमुल्याची रक्कम विवाहानंतरही देता येते. न दिल्यास पिता आपली मुलगी परतही नेऊ शकतो.

आदिम कुटुंबात स्त्री ही एक उपयुक्त व्यक्ती मानली जाते. कुटुंबाच्या दैनंदिन घरकामात आणि अर्थोत्पादनाच्या कार्यात स्त्री हातभार लावत असते. त्यामुळे स्त्रीच्या श्रमशक्तीचा कुटुंबाला नेहमी मोठा आधार वाटत असतो. तसेच स्त्रीजवळ जननक्षमता असल्याने तिच्या पासून होणाऱ्या मुलाबाळांचा कुटुंबात समावेश होऊन कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते. स्त्रीची श्रमशक्ती व तिची जननक्षमता या दोन कारणांमुळे ती कुटुंबाची परिसंपत्ती मानली जाते. अशी परिसंपत्ती वर पक्षाच्या घरी देताना वधू पित्यास नुकसान सोसावे लागते. नुकसान भरपाई म्हणून वर पक्षाने वधूपक्षाला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात वधूमुल्य द्यावे लागते. ही प्रथा कातकरी सारख्या अनेक आदिम समाजात प्रचलित झाली आहे.

### ५.३.४ विवाह समारंभ खर्च :


कातकरी जमात आर्थिकदृष्ट्या गरीब आहे. त्यामुळे विवाह समारंभ साध्या पध्दतीने पार पाडला जातो.

**तक्ता ५.१४ : विवाहाचा खर्च (रू.)**

| रूपये | ०–५००० | ५००१–१०००० | १०००१–१५००० | एकूण |
|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ५१% | ४१% | ८% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१० : विवाहाचा खर्च**




अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबात लग्नाचा खर्च किती केला? यासंबंधीची मते आजमावली असता असे आढळून आले की, ५१% कुटुंबात ५००० रूपये पर्यंत लग्नाचा खर्च करण्यात आला. ४१% कुटुंबात ५००१ ते १०००० रूपयांपर्यंत तर ८% कुटुंबात १०००१ ते १५००० रूपयांपर्यंत खर्च करण्यात आल्याचे दिसून आले.

लग्नाच्या खर्चावरून कातकरी जमातीची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे सिध्द होते. लग्न मुलीकडे असते त्यामुळे लग्नाचा खर्च त्यांनाच करावा लागतो. त्यांच्या दृष्टिने जबाबदारी कमी करणे महत्त्वाचे असते. आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे खर्चासाठी पैशाची जमवाजमव करणे कातकरी कुटुंबाला अशक्यप्राय होते.

**५.३.५ घटस्फोट :**

कातकरी जमातीत घटस्फोटाला मान्यता असते. स्त्री, पुरूषाला घटस्फोट घेऊन पुर्नविवाह करण्यास मान्यता असते. कातकरी जमातीत घटस्फोट घेणे सोपे असते.

**तक्ता ५.१५ : घटस्फोट**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| २०% | ८०% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

अभ्यास क्षेत्रात घटस्फोटासंबंधीची स्थिती आजमावली असता २०% कातकरी कुटुंबात घटस्फोट घेतल्याचे दिसून आले तर ८०% कुटुंबात कोणाचाही घटस्फोट झाला नसल्याचे दिसून आले. यावरून या जमातीत घटस्फोटाला मान्यता असली तरी त्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

पती किंवा पत्नी कोणीही गावच्या पंचासमोर जाऊन घटस्फोट घेऊ शकतात. पती पत्नीचा न जुळणारा स्वभाव, पतीची पत्नीला मारहाण, सासू सासऱ्यांकडून मुलीला त्रास देणे, वंध्यत्व व नपुंसकत्व, दीर्घकाळ आजारपण, कायम अपंगत्व, पती दारीद्र्यामुळे पत्नीस नीट पोसू शकत नसल्यास, आळशीपणा इ. कारणांनी स्त्री पुरूष घटस्फोट घेऊ शकतात.

पतीला घटस्फोट हवा असल्यास त्याला दिलेल्या वधुमुल्यावर पाणी सोडावे लागते. पत्नीला घटस्फोट हवा असल्यास तिला दुप्पट वधूमुल्य पतीला द्यावे लागते. तिने पुनर्विवाह केल्यास ती वधूमुल्य त्याच्याकडून वसूल करू शकते. पंचमंडळींना कोणाकडूनही निकाल लागला तरी दारू मिळते.

**५.३.६ विधवा विवाह :**

विधवा स्त्री मृत पतीच्या लहान भावाशी विवाह करू शकते. मात्र असे बंधन नाही. यात लग्न विधी साधा असतो. पत्नी मृत झाल्यास पती मेहूणीशी विवाह करू शकतो. सामान्यत: विधवा स्त्रीया विधूर पुरूषाशी विवाह करतात असे आढळून आले.

### ५.३.७ कातकरी जमातीतील पोटभेद :

आहार पद्धतीच्या आधारावर कातकरी जमातीत दोन पोटभेद आहेत. ढोर कातकरी व सोन कातकरी. ढोर कातकरी गाय, म्हैस, बैल व मेलेल्या जनावरांचे मांस खातात म्हणून त्यांना ढोर कातकरी असे म्हणतात. सोन कातकरी गोमांस वर्ज्य समजतात म्हणून सोन कातकरी ढोर कातकऱ्यांना कनिष्ठ दर्जाचे मानतात. सोन या शब्दाचा अर्थ सोने किंवा मौल्यवान असा असल्याने सोन कातकरी स्वत:ला उच्च समजतात.

या दोन्ही पोटजाती सजातीय गटांमध्ये विभागल्या असून त्यांच्यामध्ये रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. या जमातीचे पाच बेटीबंद पोटभेद आहेत. ते म्हणजे आठवर, सोन, किंवा मराठा, धेड, किंवा ढोर, वरप, आणि सिधी (सिध्दी) इ. सोन कातकरी प्रामुख्याने रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात आढळतात तर ढोर कातकरी विशेषत: ठाणे व नाशिक जिल्ह्यात आढळतात.

पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबे ही रायगड जिल्ह्यातील आहेत. तसेच गुरांचे मांस खात नाहीत. ते स्वत:ला मराठा कातकरी समजतात. त्यांचे रितीरिवाज देखील मराठ्यांप्रमाणेच असतात. त्यामुळे ते सोन कातकरी आहेत हे सिध्द होते.

### ५.३.८ कातकरी जमातीतील कुल नामे :

कातकरी जमातीची विभागणी बहिर्विवाही कुलामध्ये झाली आहे. त्यांच्यात एकूण ९३ कुळी आढळतात. एकाच कुळातील दोन व्यक्तींचा विवाह होत नाही. कुलनामाचा वापर आडनावे म्हणून करण्यात येतो. झाडे, धंदा व प्राणी यावर आधारित किंवा कुणबी, मराठा, अथवा अल्पसंख्यांकांच्या नावाप्रमाणे आडनावे असतात. आदिवासी म्हणून कातकऱ्यांची वेगळी आडनावे आढळतात.

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबात पुढील आडनावे आढळतात. अहीर, भोई, गायकवाड, कामडी, मोरे, मुकणे, शेलार, वाघमारे, हिलम, निकुले, राऊत, पाटील,

शिंदवा, भगरे, भोये, बरफ, पवार, वाघ, वळवी, बागले, गोतरणा, पेटकर, चव्हाण, वळवे, घारमारे, मिसाळ, गंढोढा, सुवर, मुरकुटे, मोरा, धारकर, वारदी, दिवा, खुटाळे, सौर, वितासे, माने, सावढ, अस्वले, भोसले, इ.

### ५.३.९ आहार :

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीत भात व माशाचा रस्सा किंवा बटाट्याची भाजी हे मुख्य अन्न आहे. वेळ प्रसंगी भाकरी, चपाती, डाळ व गोड पदार्थ घेतले जातात. मांसाहारात मासे, चिकन, मटण खातात. परंतु मासे आर्थिक दृष्टिने परवाडणारे असतात म्हणून माशावर जास्त भर दिला जातो.

सर्वसाधारणपणे कातकरी लोक फळे, कंदमुळे, जंगलातील वनस्पती, ज्वारी, नागली, मका, हरिक याच्या भाकरी इ. खातात. तसेच रानउंदिर, खार, माकड, सहाळक्ष, ससे, भेकरी, बाऊल, शेळ्या, बोकड, जवादे, ऊद, रानडुक्कर, हरिण इ. प्राण्यांचे तर मोर, रानकोंबड्या, होले, पुसावे, कवडे, लावरे, कबूतर, इ. पक्षांचे मांस खातात. त्यांच्या पोटजातीतील ढोर कातकरी बैल, गाय, म्हैस यांचेच नव्हे तर मांजर, कुत्रे, कोल्हे यांचेही मांस खातात. हे त्यांचे नित्याचे अन्न असते.

### ५.३.१० वेशभूषा व अलंकार :

कातकरी जमातीतील लोक अत्यल्प कपडे वापरतात. स्त्रिया कंबरेभोवती गुडघ्यापर्यंत आखूड लुगडे आणि चोळी घालतात. पूर्वी स्त्रीया छातीभोवती जाडेभरडे वस्त्र घेत व कमरेभोवती आखूड वस्त्र नेसत, तर पुरूष कमरेभोवती केवळ लंगूट व कोपरी वापरत असत. सध्या धोती, कमीज, कोपरी व पागोटे आणि पँट शर्ट ही वापरतात. शाळेत जाणारी मुले शर्ट चड्डी घालतात. मुली परकर व पोलके घालतात.

स्त्रिया कपाळ, गाल, हनुवटी व मनगटावर गोंदन काढतात. स्त्रिया काचेच्या बांगड्या व रंगीत मण्यांच्या माळा वापरतात. गळ्यात मंगळसूत्र, कानात बाळ्या व

नाकात नथ घालतात. पायाच्या बोटात जोडवे घालतात. दागीने पीतळेचे, काचेचे व मण्यांचे असतात. कर्णभूषणे घालण्याची फार हौस असते. कुमारिका गळ्यात रंगीत पोत घालतात पण पायात जोडवी घालत नाहीत. तर सुहासिनी गळ्यात काळी पोत व जोडवी घालतात. आर्थिक स्थिती हालाखीची असल्यामुळे सोन्या चांदीचे दागीने आढळून आले नाहीत.

### ५.३.११ घरे व वस्ती :

खेड्याच्या बाहेर किंवा जंगलात कातकऱ्यांची वस्ती असते. त्यांच्या झोपड्यांच्या भिंती मातीने लिंपलेल्या व सारवलेल्या असतात. पूर्वी घराच्या छतावर नारळीची पाने (झावळी) किंवा गवत वापरीत असत. आता मात्र पारंपारिक कौल वापरतात. झोपड्या जवळ जवळ असतात व झोपड्यांचा एक समूहच असतो. अस्वच्छता कमालीची असते. त्यांच्या वस्तीला महाराष्ट्रात 'पाडा' व कातवडी, गुजरातेत 'काथोडिवास' असे म्हणतात. कातकरी बहुतेक करून डोंगराळ व उंच पठारी प्रदेशात वसाहत करून राहतात. ही खरीखुरी आदिवासी अरण्यवासी जमात आहे. गावापासून दूर नदीकाठी किंवा कपारीत त्यांची वसाहत असते. तिला कातवडी असेही म्हणतात.

काही ठिकाणी कातकरी कुटुंबे वर्षानुवर्षे उघड्यावर राहात असल्याचे दिसून आले. प्रामुख्याने झोपडीवजा घरांचे प्रमाण अधिक आढळून आले.

### ५.३.१२ अंत्यसंस्कार :

कातकरी मृताचे दफन किंवा दहन करतात. परंतू मृताचे दहन करण्याकडे लोकांचा कल अधिक दिसतो. दफन करतेवेळी प्रेताबरोबर तीरकमठा, कोयता, चिलीम इ. वस्तू पुरतात. दात न आलेल्या व देवीच्या साथीने मृत पावलेल्या व्यक्तीचे दफन केले जाते. मृतास हळदीच्या पाण्याने स्नान घालण्यात येते. पाच सहा तासातच अंत्यविधी आवरला

जातो. मृताचे शिर उत्तरेकडे असते. सात दिवसाचे सुतक पाळले जाते. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास असल्याचेही दिसून आले.

### ५.३.१३ देवदेवता :

कातकरी हिंदू धर्मीय आहेत. त्यांच्यात खंडोबा, भवानी, भैरवनाथ, कासारी या देवदेवतांची उपासना अधिक लोकप्रिय आहे. वाघदेव त्यांचा मुख्य देव आहे. डोंगरदेव, गावदेव, मरीमाता, कनसारी देवी यांचाही समावेश होतो. हिंदूंच्या प्रभावामुळे ते हनुमान व रामाचीही पुजा करतात. डोंगरदेवाच्या पुजेमुळे धान्य उत्पादन वाढते. तसेच वाघदेवता गावाच्या वेशीवर असते व ती गावाचे संरक्षण करते अशी श्रध्दा आहे. अभ्यास क्षेत्रात मात्र स्थानिक पातळीवर जे ग्रामदैवत असते तेच त्यांचे दैवत असल्याचे आढळून आले.

### ५.३.१४ सण व उत्सव :

अनेक देवतांची पुजा कातकरी उत्साहाने करतात. त्याशिवाय होळी, दिवाळी, नवरात्र, अखरतीज हे सण साजरे करतात. नवरात्रेत मरीमातेचा उत्सव साजरा करतात. अखरतीजेला वादळाची पुजा करतात. दिवाळी आणि गणेश उत्सव हे सण देखील मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असल्याचे दिसून आले. हा समाज इतर समाजाप्रमाणे सर्वच सण साजरे करू लागला आहे.

### ५.३.१५ अंधश्रध्दा :

नमुना अभ्यास क्षेत्रातील कातकरी लोकांचा आदिमानव शक्तीवर विश्वास आहे. त्यांना चेटकीणीची भिती वाटते. ती जादूटोणा करून कोणालाही घेऊन जाते असे मानतात. भगत तिच्यापासून संरक्षण देऊ शकतो. देवतांच्या पुजेत व जादूटोण्यासाठी भगत यांना महत्त्व असते. मरीमातेच्या कोपामुळे देवी, टिटॅनस, टायफॉईड, न्यूमोनिया, यासारखे रोग होतात असे त्यांना वाटते. जडीबुटी व मसाले यांची औषधे देऊनही रोग बरे

होतात. भूत पिशाच्चावर त्यांचा विश्वास असतो. मरीमातेचा पुजारी मांत्रिक असतो. यावरून कातकरी जमातीत अंधश्रध्दा असल्याचे स्पष्ट होते.

**५.३.१६ कातकरी लोकांचे नृत्य :**

सह्याद्री पर्वताच्या उत्तरेकडील रांगांमध्ये राहणाऱ्या कातकऱ्यांना नृत्य अतिशय प्रिय आहे. जेव्हा जेव्हा त्यांना सुबता किंवा दारूचा लाभ होतो तेंव्हा तेंव्हा ते आपला आनंद नृत्यातून व्यक्त करतात. कातकऱ्यांच्या नृत्यात ढोल आणि ढोलक यांना जास्त महत्त्व असते. म्हणूनच त्याला ढोलाचा नाच असे म्हणतात. ढोलावरील ठोके वाढत जातात त्या तालावर नृत्यातील पदन्यासाची गती वाढत जाते. एकमेकाच्या खांद्यावर किंवा कमरेभोवती हात टाकून कातकरी स्त्री-पुरूष वर्तुळाकार नृत्य करतात. ढोलाच्या ठोक्यावर अतिशय द्रुतगतीने ते विविध प्रकारच्या हालचाली करून त्यांच्या गाण्यातील अविष्कार करून दाखवितात. ढोलाखेरीज नृत्याच्या वेळी तुमडी नावाचे वाद्यही वाजवले जाते. दिवाळीत हे नृत्य मोठ्या प्रमाणात करतात. आधुनिक संगीताच्या तालावर तरूण तरूणी नृत्य करताना दिसतात.

पारंपारिक नृत्य प्रकाराबरोबर ढोलावरील नृत्य कमी होऊन आधुनिक गाण्यांवर तरूण तरूणी नृत्य करीत असल्याचे दिसून आले.

**५.३.१७ जन्म सोहळा :**

प्रसुतीचे काम जमातीतील सुईण करते. नवीन बाळाचा जन्म झाल्यावर १२ दिवस अशौच पाळण्यात येते. मुलगी असल्यास तीसऱ्या दिवशी व मुलगा असल्यास पाचव्या दिवशी किंवा सहाव्या दिवशी नामकरण विधी होतो. माता किंवा पती नाव ठेवतात व पोळी व दारू वाटण्यात येते. माता मरीमातेची पूजा करते. ज्या वारी जन्म झाला असेल त्याप्रमाणे नाव ठेवतात. उदा. सोमा, शुक्रु इ. जन्म सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यात दारूला महत्त्व असते.

## ५.४ शैक्षणिक स्थिती :

अभ्यासक्षेत्रात कातकरी कुटुंबातील शैक्षणिक स्थितीची तथ्य संकलित केली असता पुढील स्थिती आढळून आली.

### ५.४.१ शैक्षणिक पातळी :


नमुना अभ्यासक्षेत्रातील कातकरी कुटुंबातील शैक्षणिक पातळी संबंधीची तथ्य संकलीत केली असता असे दिसून आले की एकुण स्त्रीयांपैकी ७६% स्त्री निरक्षर तर एकुण पुरूषांपैकी ६६% पुरूष निरक्षर दिसून आले. कातकरी कुटूंबाची अभ्यास क्षेत्रातील एकुण निरक्षरता ७३% असल्याची आढळून आली.

**तक्ता ५.१६ : कुटुंबाची शैक्षणिक पातळी**

| | पूर्व प्राथमिक | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवी | साक्षर | निरक्षर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | १०% | १८% | ३% | १% | ०.४% | २% | ६५.६% | १००% |
| स्त्री | ९% | १०% | २% | १% | – | २% | ७६% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.११ : कुटुंबाची शैक्षणिक पातळी**




पूर्वप्राथमिक शिक्षणाचे प्रमाण पुरूषांमध्ये १०% होते तर स्त्रियांमध्ये ९% होते. प्राथमिक शिक्षण घेतलेले पुरूष १८% तर स्त्रिया १०% असल्याचे आढळून आले.

माध्यमिक शिक्षण घेतलेले पुरूष ३% होते तर स्त्रीया २% होत्या आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले पुरूष १% व स्त्रीया १% असे प्रमाण आढळून आले.


एकूण साक्षरतेचा विचार करता २७% साक्षरता आढळून आली. त्यात २४% स्त्रीया साक्षर तर ३४% पुरूष साक्षर दिसून आले. वरील आकडेवारीवरून असा निष्कर्ष निघतो की कातकरी समाजात निरक्षरता जास्त असून त्यातही पुरूषांपेक्षा स्त्रियांमधील निरक्षरता जास्त आहे. साक्षरतेतही स्त्रियांची साक्षरता कमी व पुरूषांची साक्षरता जास्त असल्याचा निष्कर्ष निघतो.

**तक्ता ५.१७ : साक्षरता व निरक्षरता**

| | साक्षरता | निरक्षरता | एकूण |
|---|---|---|---|
| स्त्री | २४% | ७६% | १००% |
| पुरूष | ३४% | ६६% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१२ : साक्षरता व निरक्षरता**




यावरून असे स्पष्ट होते की अभ्यास क्षेत्रातील कातकरी समाजाची शैक्षणिक स्तिती मागासलेली आहे. कारण कातकरी कुटुंबापुढे अनेक प्रश्न उभे आहेत. त्या प्रश्नांची क्रमवारी लावताना उदरनिर्वाहाच्या प्रश्नाला प्रथम क्रमांक दिला जातो. उपाशी पोटी शिक्षण शक्य नाही. आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे शिक्षण घेणे परवडत नाही. सततचे कामासाठी स्थलांतर, अल्पवयीन विवाहामुळे कुटुंबाची जबाबदारी,

समाजातील प्रेरणादायी आदर्शांचा अभाव आणि प्रचंड व्यसनाधिनता इत्यादीमुळे शिक्षणाचे प्रमाण या समाजात कमी आहे हे सिध्द होते.

साक्षरतेच्या बाबतीत आणखी एक बाब पुढे आली आहे की एकूण २७% साक्षरतेपैकी सर्वाधिक म्हणजेच १३% साक्षरता जुन्नर, खेड, आंबेगांव या तीन तालुक्यात अधिक प्रमाणात आढळून आली. कारण या तीन तालुक्यात आदिवासी उपाययोजना क्षेत्र असल्यामुळे आदिवासी विभागाच्या अनेक शैक्षणिक योजना या भागात राबविल्या जातात. शिकल्यानंतर अदिवासींना त्याचा फायदा होतो यासंबंधीची जागृती या तालुक्यांमध्ये दिसून आली.

अभ्यास क्षेत्रातील मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, हवेली या तालुक्यातील साक्षरता अतिशय कमी म्हणजेच १४% आहे व निरक्षरता जास्त असल्याचा निष्कर्ष पुढे आला आहे. कारण हे तालुके आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहेत. या तालुक्यांमध्ये आदिवासींसाठी कोणत्याही शैक्षणिक योजना राबविल्या जात नाहीत, सततचे कामासाठी स्थलांतर होणे, शिक्षणापेक्षा उदरनिर्वाहाचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो, इत्यादी.

### ५.४.२ कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती :


अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील मुला मुलींची शाळेतील उपस्थिती यासंबंधीची माहिती आजमावली असता ५३% मुले नियमित शाळेत जात नाहीत, १६% मुले नियमित शाळेत जातात तर ३१% कुटुंबातील कोणीही शाळेत जात नाही असे आढळून आले.

**तक्ता ५.१८ : कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती**

| नियमित | अनियमित | शाळेत न जाणारी | एकूण |
|---|---|---|---|
| १६% | ५३% | ३१% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१३ : कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती**




कातकरी जमातीची ही पहिली पीढी शाळेत जाऊ लागली आहे. परंतू शाळेतील उपस्थिती कमी दिसते. मुलांना शिक्षण कंटाळवाणे वाटते. प्रत्यक्ष त्यांचे जीवन आणि शिक्षण यांची नाळ जुळत नाही. प्रदेश, पर्यावरण आणि जीवन पध्दती आणि पुस्तकातून दिले जाणारे शिक्षण यांचा संबंध लागत नाही. त्यामुळे ते शिक्षण आपलेसे वाटत नाही. कातकरी मुलांना लहानपणापासून भोवतालचे जग स्वत:च स्वत: समजून घेण्याची सवय असते.

भोवतालचा निसर्गच हा त्यांचा शिक्षक असतो. दुसऱ्यांनी शिकवलेले त्यांना समजत नाही. एरवी कातकरी मुले अगदी आनंदी व तरतरीत असतात. ती शाळेत जाऊ लागल्यावर कोमेजायला लागतात. अभ्यासात मागे असल्यामुळे कातकरी मुलांना कायमच अवहेलना आणि नामुष्की सहन करावी लागते. शिक्षक आणि इतर विद्यार्थी सतत हिन वागणूक देतात. त्यातून त्या मुलांचा आत्मसन्मानच ठेचला जातो . यातून ही मुले उदासीन होतात, शाळेत नियमित जाणे कमी होते आणि निसर्गात नदी नाल्यात हुंदडायला त्यांना आवडते आणि शाळेतील अनियमितता कमी होऊन शाळा एक दिवस बंद होते ही वास्तवता आढळून आली.

१६% मुले शाळेत नियमित जातात त्यांची प्रगती चांगली असल्याचे आढळून आले. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात, राहणीमानात बदल झालेला दिसतो. शाळेत नियमित जाणाऱ्या मुलांचे प्रमाण हे जुन्नर, खेड, आंबेगांव तालुक्यात जास्त असल्याचे आढळून आले. कारण आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा या भागात सुरू झाल्या आहेत. पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण झाली आहे. त्यामुळे मुलांना शाळेत पाठविणे त्यांना गरजेचे वाटते.

शाळेतील जी अनियमितता दिसते ती मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, हवेली तालुक्यातील कातकरी मुलांच्या बाबतीत आढळून आली. जी कुटुंबे स्थायीक झाले आहेत त्यांची मुले शाळेत जातात. ३१% कुटुंबातील मुले अद्यापही शाळेत जात नाहीत असे आढळून आले. ही बाब अतिशय गंभीर आहे. कामासाठीच्या सततच्या स्थलांतरणामुळे मुलांच्या शाळेकडे दुर्लक्ष झाले आहे. शिक्षणाची आस्था नसणे, शासकीय शिक्षण सुविधा नसणे, शिक्षणापेक्षा मुलभूत गरजा महत्त्वाच्या वाटतात म्हणून शाळेत न जाणे व अनियमितता या संबंधीची स्थिती अशी दिसते.

## ५.५ आरोग्य स्थिती :

### ५.५.१ रोगाचे प्रमाण :


अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबात विविध रोगांचे प्रमाण यासंबंधी तथ्य संकलीत केली असता ४७% कुटुंबात मलेरिया, २६% कुटुंबात उलटी–जुलाब, ८% कुटुंबात निमोनिआ, ४% कुटुंबात गोवर, ३% कुटुंबात धनूर्वात, २% कुटुंबात टी.बी., २% कुटुंबात सिकलसेल, १% कुटुंबात टॉयफॉईड व १% कुटुंबात महारोग असे विविध रोगांचे प्रमाण आढळून आले. तर केवळ ५% कुटुंबे निरोगी होती. याचा अर्थ असा ९५% कुटुंबे विविध रोगांनी पछाडलेली होती.

### तक्ता ५.१९ : कातकरी कुटुंबातील रोगाची स्थिती

| मलेरिया | डायरिया | निमोनिआ | गोवर | धनूर्वात | महारोग | टी.बी. | सिकलसेल | टॉयफॉईड | निरोगी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४७% | २६% | ८% | ४% | ३% | १% | २% | २% | २% | ५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

### आलेख ५.१४ : कातकरी कुटुंबातील रोगाची स्थिती




त्यातही मलेरीया, डायरिया आणि निमोनिया या रोगांचे प्रमाण सर्वाधिक दिसते. कातकरी समाजातील दारिद्रय, गरीबी यामुळे कूपोषण, पौष्टिक आहाराचा अभाव, आरोग्यासंबंधी अनास्था, अस्वच्छ राहणीमान, दूषित पाणी, उपचाराच्या बाबतीत निष्काळजीपणा आणि प्रचंड व्यसनाधिनता इत्यादी कारणांमुळे कातकरी कुटुंबे विविध रोगांना बळी पडली असल्याचे दिसून आले.

कातकरी वस्तीत पावसाळ्यात आजाराचे साम्राज्य असते. मलेरिया, उलटी जुलाब या रोगाचे प्रमाण सर्वाधिक असते. मिळेल ते अन्न खाऊन पोट भरण्याचा प्रयत्न केला जातो तर शुध्द पाणी नसल्यामुळे मिळेल त्या डबक्यातील, नदीतील पाणी हे लोक पितात. त्यामुळे दूषित पाण्याने सर्वाधिक लोक आजारी पडतात. पिढ्यान पिढ्या विविध रोगाचे

अस्तित्त्व कातकरी वस्तीवर असल्यामुळे कातकरी लोकांची रोगप्रतिकारक शक्तीच मुळात कमी राहिली आहे.

**५.५.२ उपचार पध्दती :**


अभ्यास क्षेत्रातील कातकरी रूग्णांच्या उपचारासंबंधीची माहिती गोळा केली असता असे दिसून आले की किरकोळ आजारात ७०% लोक घरगुती उपचार घेतात, ४% लोक मांत्रिकाकडे जातात, १०% लोक देवाला नवस बोलतात तर केवळ १६% लोक दवाखान्यात जातात. यावरून असे दिसून येते की किरकोळ आजाराच्या बाबतीत अतिशय निष्काळजीपणा दिसून येतो.

**तक्ता ५.२० : उपचार पध्दती**

| घरगुती | मांत्रिक | देवाला नवस | दवाखाना | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७०% | ४% | १०% | १६% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१५ : उपचार पध्दती**




जेव्हा एखादा मोठा आजार होतो तेव्हा ८८% लोक डॉक्टरकडे जातात. १२% लोक देवाला नवस बोलतात. यावरून मोठा आजार झाल्यास डॉक्टरकडे जाणाऱ्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. याचे कारण किरकोळ आजार अंगावर काढला जातो,

निष्काळजीपणा केला जातो. किरकोळ आजार वाढत जाऊन तो शेवटच्या टप्प्यात गेल्यामुळे नंतर हे लोक डॉक्टरांकडे जातात असे दिसून आले. आजारातील निष्काळजीपणा आणि वैद्यकीय सुविधांचा अभाव यामुळे कातकरी लोक अनेक रोगांना बळी पडतात. वेळप्रसंगी मृत्युलाही सामोरे जावे लागते. ही वास्तवता अभ्यास क्षेत्रात दिसून आली.

### ५.५.३ मृत्युचे प्रमाण :


अभ्यास क्षेत्रात मागील दोन वर्षात मृत्यु पावलेल्या कुटुंबातील सदस्यांची माहिती पुढील प्रमाणे दिसून आली.

**तक्ता ५.२१ : मृत्युचे प्रमाण**

| डायरिया | निमोनिआ | टॉयफॉईड | महारोग | टी.बी. | लिव्हर खराब | वृध्दापकाळ | दारूच्या नशेत | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२% | १४% | ७% | ४% | ६% | ५% | ५% | २४% | ३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१६ : मृत्युचे प्रमाण**




३२% लोकांचा मृत्यू उलटी–जुलाबाने, १४% निमोनिआ, ७% टॉयफॉईडने, ४% महारोगाने, ६% टी.बी.ने, ५% लिव्हर खराब होऊन, ५% वृध्दापकाळाने आणि २४%

दारूच्या नशेत पडून मृत्यु झालेले आहेत. तर इतर कारणांनी ३% मृत्यु झालेले आहेत असे दिसून आले.

यावरून उलटी–जुलाबाने झालेले मृत्यु अधिक आहेत. त्यानंतर निमोनिआने झालेले मृत्यु दुसऱ्या स्थानावर आहेत. उपाया संबंधी निष्काळजीपणा, गरीबी, दारिद्र्य यामुळे वेळेवर उपचार न घेणे, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यामुळे देवाला नवस, मांत्रिक किंवा घरगुती उपचार घेतले जातात. आजार अंगावर काढला गेल्यामुळे आजार शेवटच्या टप्प्यात गेल्यानंतर डॉक्टरांकडे जातात आणि शेवटी मृत्यु होतो, अशी स्थिती अभ्यास क्षेत्रात दिसून आली.

### ५.५.४ स्त्री बाळंतपण :


नमुना अभ्यासक्षेत्रात कातकरी कुटुंबात स्त्रियांच्या बाळंतपणासंबंधीची स्थिती पाहिली असता ७७% कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपण घरी झालेले होते तर केवळ २३% कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपण दवाखान्यात झालेले आढळून आले.

**तक्ता ५.२२ : स्त्रीयांचे बाळंतपण**

| दवाखान्यात | घरी | एकूण |
|---|---|---|
| २३% | ७७% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१७ : स्त्रीयांचे बाळंतपण**



घरी बाळंत होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक दिसते. कातकरी लोक डोंगर कपारीत, रस्त्यापासून, गावापासून लांब अंतरावर राहतात. त्यात रात्री अपरात्री दवाखान्यात नेणे अशक्य असते, तर दुसरीकडे गरीबीमुळे दवाखान्यात बाळंतपण करणे न परवडणारे असते. म्हणून दवाखान्यातील उपचार व बाळंतपण कमी दिसते. घरगुती बाळंतपणाचे प्रमाण सर्वाधिक दिसते व वस्तीतील वयस्कर स्त्रिया बाळंतपणात मदत करतात.

ज्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत व बाळंतपणात जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो तेव्हा दवाखान्याशिवाय पर्याय उरत नाही म्हणून २३% दवाखान्यातील बाळंतपण दिसून आले.

### ५.५.५ संतती नियमन शस्त्रक्रिया :

नमुना अभ्यास क्षेत्रात कुटुंब नियोजनासंबंधीच्या संतती नियमन शस्त्रक्रियेसंबंधीची तथ्ये संकलीत केली असता ६४% स्त्रीयांची शस्त्रक्रिया झालेली नव्हती. ३६% स्त्रियांनी संतती नियमन शस्त्रक्रिया केल्याचे आढळून आले. संतती नियमन शस्त्रक्रियेत फक्त स्त्रियांचाच सहभाग दिसून आला. शस्त्रक्रियेचे प्रमाण कमी दिसण्याचे कारण म्हणजे त्यासंबंधीची भिती वाटणे आणि आर्थिक स्थिती सक्षम नसणे इ. मुळे कुटुंबातील सदस्य संख्या वाढत जाऊन कुटुंबाचा आकार मोठा होण्यावर त्याचा परिणाम झाल्याचे दिसते.

**तक्ता ५.२३ : संतती नियमन शस्त्रक्रिया**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| ३६% | ६४% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

बाळंतपणात आलेल्या अडचणीमुळे ३६% शस्त्रक्रिया झालेल्या आढळून आल्या.

### ५.५.६ लसीकरण :


अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात रोगप्रतिबंधक लसीचे प्रमाण पाहिले असता. ४३% कुटुंबातील मुलांना रोगप्रतिबंधक लसी दिल्या गेल्याचे दिसून आले. तर ५७% मुलांना कोणत्याही प्रकारची लस दिली गेल्याचे आढळून आले नाही.

**तक्ता ५.२४ : रोगप्रतिबंधक लसीकरण**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| ४३% | ५७% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१८ : रोगप्रतिबंधक लसीकरण**




कातकरी कुटुंबात मुलांच्या आरोग्याकडे लक्ष दिले जात नाही, रोगप्रतिबंधक लसी वेळेवर न दिल्यामुळे रोगप्रतिकार शक्ती कमी राहते आणि लहान मुले अनेक रोगांना बळी पडतात. सततच्या स्थलांतरणामुळे लस न दिलेल्या मुलांचे प्रमाण जास्त दिसून आले. तसेच डोंगरकपारीत वसलेल्या कातकरी वस्तीवर लस सुविधा पोहचत नाही, लस देण्याची गरज कातकरी लोकांना वाटत नाही. त्यासंबंधीची माहिती असत नाही त्यामुळे लसीकरणाचे प्रमाण कमी दिसते.

### ५.५.७ व्यसनाधिनता :


कातकरी समाजाच्या आरोग्याला अपायकारक ठरणारा घटक म्हणजे व्यसनाधिनता होय.

**तक्ता ५.२५ : व्यसनाधिनता**

| व्यसनी | निर्व्यसनी | एकूण |
|---|---|---|
| ९१% | ९% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.१९ : व्यसनाधिनता**




अभ्यासक्षेत्रात ९१% कुटुंबात दारूबरोबर तंबाखूचे व्यसनही असल्याचे आढळून आले. यावरून कातकरी कुटुंबात दारू आणि तंबाखू हे दोन व्यसने प्रचंड प्रमाणात असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत कातकरी कुटुंबातील स्त्री पुरूष दोघेही दारू पितात आणि रात्रंदिवस नशेत असतात. दारू हे त्यांच्या दृष्टिने अप्रतिम पेय आहे. दहा–बारा वर्षाच्या वयात दारूचे व्यसन जडते आणि ही कुटुंबे व्यसनाच्या आहारी जातात.

दारू गुळापासून किंवा मळीपासून बनविलेली असते व नशेसाठी त्यात अनेक विषारी घटक मिसळलेले असतात. त्याचा गंभीर परिणाम आरोग्यावर होतो. शरीराची रोगप्रतिकार शक्ती कमी होते आणि व्यसनामुळे कोणत्या ना कोणत्या रोगांना ही माणसे बळी पडतात. म्हणजे व्यसनाधिनतेमुळे कातकरी लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे असा निष्कर्ष निघाला आहे.

कातकरी समाजाच्या आरोग्याचा विचार करताना त्यांच्या व्यसनाधिनतेचा आणि त्यातही दारू या समस्येचा विचार करणे अटळ आहे. दारूच्या व्यसनामुळे कातकरी समाज बदनाम झाला आहे. दारूडे आणि कातकरी हे दोन समानार्थी वापरले जातात. कातकरी समाजात पारंपारिकदृष्ट्या दारूचे प्रमाण जास्त आहे. कातकरी समाजाची आर्थिक प्रगती खुंटण्यामागे दारूचा हात मोठा आहे.

### ५.५.८ स्वच्छता व आरोग्य :

नमुना अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबातील स्वच्छता आणि आरोग्य यासंबंधीची स्थिती आजमावली असता

**तक्ता ५.२६ : स्वच्छता**

| | **स्वच्छ** | **अस्वच्छ** | **एकूण** |
|---|---|---|---|
| राहणीमान | ३९% | ६१% | १००% |
| घर | ३३% | ६७% | १००% |
| वस्ती परिसर | २८% | ७२% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

३३% कातकरी लोकांच्या घरात स्वच्छता होती तर ६७% घरात अस्वच्छता आढळूनआली. ३९% लोकांचे राहणीमान स्वच्छ होते तर ६१% लोकांचे राहणीमान अस्वच्छ होते. २८% कातकरी वस्तीचा परिसर स्वच्छ होता तर ७२% वस्तीचा परिसर अस्वच्छ होता. १५% कातकरी वस्तीवर स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध होती तर ८५% वस्त्यांवर मात्र ही सुविधा उपलब्ध नव्हती.

या सर्व बाबींवरून असा निष्कर्ष निघतो की कातकरी कुटुंबात प्रचंड अस्वच्छता दिसते. घर परिसर व वैयक्तीक स्वच्छता केली जात नाही. गलिच्छ व प्रदूषीत परिसरामुळे अनेक रोगांचे साम्राज्य या वस्तीत दिसते. आरोग्य निकृष्ट होण्याला अस्वच्छता हा घटक कारणीभूत ठरला आहे असे दिसून आले.

### ५.५.९ वैद्यकीय सुविधा :


कातकरी कुटूंबाच्या आरोग्यस्थितीचा अभ्यास करताना वैद्यकिय सुविधेला तितकेच महत्त्व आहे. कातकरी वस्ती असलेल्या गावातील वैद्यकिय सुविधांची उपलब्धता यासंबंधीची तथ्ये संकलीत केली असता

**तक्ता ५.२७ : वैद्यकिय सुविधा**

| खासगी दवाखाना | प्राथमिक आरोग्य केंद्र | कुटुंब नियोजन केंद्र | प्रसूती केंद्र | वैद्यकिय सुविधा नाहीत | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १६% | १६% | ५% | ४% | ५९% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२० : वैद्यकिय सुविधा**




कातकरी वस्ती असलेल्या १६% गावात खासगी दवाखाने होते. १६% गावात प्राथमिक आरोग्य केंद्रे होती, ५% गावात कुटुंब नियोजन केंद्रे तर ४% गावात प्रसूती केंद्रे होती. तर ५९% कातकरी वस्ती असलेल्या गावांत कोणत्याही प्रकारच्या वैद्यकीय सुविधा नव्हत्या.

**तक्ता ५.२८ : कातकरी वस्ती व वैद्यकिय सुविधांचे अंतर**

| वस्तीजवळ | १ ते ५ किमी. | ६ ते १० किमी. | १० ते २० कि.मी. | एकुण |
|---|---|---|---|---|
| ७% | ६४% | १८% | ११% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

तसेच कातकरी वस्ती आणि वैद्यकिय सेवा यांच्यातील अंतर विचारात घेतले असता ६४% गावात कातकरी वस्तीपासून या सेवा १ ते ५ कि.मी. अंतरावर होत्या. १८%

गावात ६ ते १० कि.मी. अंतरावर, ११% गावात १० ते २० कि.मी. अंतरावर वैद्यकिय सेवा होत्या. केवळ ७% गावात कातकरी वस्तीजवळ वैद्यकिय सेवा उपलब्ध होत्या.

या सर्व बाबींवरून असे स्पष्ट होते की वैद्यकीय सेवा अतिशय कमी आहेत. ६०% गावात कोणत्याही प्रकारच्या सेवा नाहीत. सर्वाधिक कातकरी वस्त्यांवरील कुटुंबांना १ ते ५ कि.मी. अंतर चालत जाऊन वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यावा लागतो. २९% कातकरी कुटुंबांना ६ ते २० कि.मी. अंतर जाऊन वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यावा लागतो.

कातकरी कुटुंबांचे आरोग्य पुरेशा आरोग्य सुविधांच्या अभावामुळे धोक्यात आले आहे ही वास्तवता आढळून आली.

## ५.६ सामाजिक , प्रशासकिय दूरावा व कातकरी :

कातकरी कुटुंबांना वाटणाऱ्या भितीचा आढावा घेतला असता असे दिसून आले की ५४% कुटुंबांना पोलीसांची भिती वाटते, १८% कुटुंबांना वन अधिकाऱ्यांची भिती वाटते तर ४% कुटुंबांना मालकाची भिती वाटते. २३% कुटुंबांना मात्र कोणाचीही भिती वाटत नाही असे आढळून आले.

यावरून पोलीसांविषयीची भिती वाटण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. याचे कारण म्हणजे ब्रिटीश काळात कातकरी जमातीचा समावेश गुन्हेगारी जमातींच्या यादीत केला होता. तेव्हा पासून आज तागायत पोलीस कातकरी समाजाकडे भुरट्या चोरी करणारी जमात या पूर्वग्रहदूषीत दृष्टिकोनातून पाहात आहे. परिसरात कोणतीही चोरी झाली की पहिला संशय कातकरी कुटुंबावर घेतला जातो आणि संशयाच्या आरोपाखाली अटक करून बेदम मारहाण केली जाते. त्यांच्या मनात कायमची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांचा स्वभाव भित्रा आणि संशयी बनला आहे.

वन अधिकाऱ्यांची भिती वाटण्याचे कारण दुसऱ्या क्रमांकावर आहे. जंगलातील वन उत्पादने गोळा करण्यावर वन कायद्याने बंधने आणल्यानंतर वनअधिकाऱ्यांनी कडक धोरणाची अंमलबजावणी केली आहे. लाकूड फाटा किंवा फळे, कंदमुळे या वस्तू

आणण्यासाठी एखादी कातकरी स्त्री किंवा पुरूष जंगलात गेली आणि वनअधिकाऱ्याने पाहिले तर तो त्यांना पोलीसांच्या ताब्यात देतो. वेळप्रसंगी गुराढोराप्रमाणे मारहाणही करतो. त्यामुळे खाकी वर्दीत कोणीही दिसला तरी कातकरी लोकांची बोबडी वळते.

मालकाची भीती वाटण्याचे प्रमाण तिसऱ्या क्रमांकावर आहे. ज्यांच्याकडे कातकरी कुटुंब कामाला जाते त्या मालकाविषयी त्यांच्या मनात भीती असते, त्याचे कारण म्हणजे तो मालक या कुटुंबांना उचल म्हणून रक्कम देतो. म्हणजे कामाला जाण्यापूर्वीच या कुटुंबाला पैसे दिलेले असतात. जेव्हा हे कुटुंब काम करीत नाही, दारू पिऊन भांडण करतात, कामाला घाबरून पळून जातात तेव्हा तो मालक स्त्री पुरूष दोघांनाही मारहाण करतो. गुलामाप्रमाणे त्यांच्याशी वर्तणूक करतो. त्यामुळे त्याच्या विषयी भीतीची मानसिकता कातकरी लोकांच्या मनात झालेली आहे. मालक कातकरी कुटुंबाविषयी नेहमीच संशयी असतात. त्यामुळे एखादे कातकरी कुटुंब काम करीत नसेल तर त्यांच्यावर चोरीचा गुन्हा लावून पोलीसांच्या ताब्यात त्यांना देतो. म्हणून ही भीती कायम आहे. असे अनेक गुन्हे खेड, जुन्नर, आंबेगांव तालुक्यातील पोलीस ठाण्यात नोंदले गेल्याचे आढळून आले.

## ब) कातकरी समाजाची आर्थिक स्थिती :

### ५.७ आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत :

उत्पन्नाच्या स्त्रोतावर समाजाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. उत्पन्नाच्या स्त्रोतावरून त्या समाजाची आर्थिक स्थिती निश्चित होते. कातकरी आदिमाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना नमुना कातकरी कुटुंबाच्या उत्पन्नाच्या स्त्रोताचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, ९९% कातकरी कुटुंबाचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत शेतमजूरी हा आहे तर १% कुटुंबाचा उत्पन्नाचा स्त्रोत इतर व्यवसाय आहे. अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेतमजूरी हा आहे व एकाही कुटुंबाकडे शेतजमीन असल्याचे आढळून आले नाही.

मासेमारी हा कातकरी कुटुंबाच्या उत्पन्नाचा दुय्यम स्त्रोत आहे. पुणे जिल्ह्यातील ६९% कातकरी कुटुंबांना मासेमारीच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. ३१% कुटुंबांना मात्र मासेमारी स्त्रोताअभावी उत्पन्न मिळत नाही.

कातकरी कुटुंबात उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून कोळसा पाडण्याचा दुय्यम व्यवसाय देखील दिसून येतो. लाकडाचा ठिसूळ कोळसा पाडण्याच्या व्यवसायापासून काही कुटुंबांना उत्पन्न मिळते. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांपैकी ७% कुटूंबांना कोळसा पाडण्याच्या व्यवसायापासून उत्पन्न मिळत असल्याचे आढळून आले.

विटा बनविणे हा देखील कातकरी कुटुंबाचा दुय्यम व्यवसाय असल्याचे आढळून आले. वर्तमान स्थितीत शेतमजूरी नंतर दुय्यम व्यवसायात विटा बनविण्यात कुटुंबे अधिक प्रमाणात कार्यरत आहेत. १२% कुटूंबांना या स्त्रोतापासून मिळत असल्याचे दिसून आले.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाला वन वस्तू संकलनातून देखील उत्पन्न मिळते. जंगल कायदे आणि वन वस्तू वापरावरील निर्बंध यामुळे हा उत्पन्नाचा स्त्रोत अतिशय तुटपुंजा आहे. ६% कुटुंबांना या व्यवसायातून उत्पन्न मिळत असल्याचे आढळून आले.

अभ्यासक्षेत्रात शेळी पालन हा जोड व्यवसाय म्हणून केला जातो. आदिवासी उपयोजना क्षेत्रात केंद्रवर्ती योजनेतून दरवर्षी ३% कुटुंबांना पशुपालनापासून उत्पन्न मिळालेलेआहे.

३% कातकरी कुटुंबांना इतर व्यवसायापासून उत्पन्न मिळते. इतर व्यवसायात बँजो पार्टी, वाळू उपसणे, ड्रायव्हिंग करणे, हात भट्टीची दारू विकणे, हमाली करणे इ. चा समावेश होतो. हे व्यवसाय हंगामी स्वरूपाचे असतात.

या सर्व उत्पन्नाच्या स्त्रोतांचा आढावा घेतला असता असे दिसते की नमुना अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबांना पुरेसे उत्पन्न मिळवून देणारा एकही स्त्रोत नाही. केवळ ते स्त्रोत उपजीविका पूर्ण करण्यापूरते मर्यादित आहेत. यावरून कातकरी कुटुंबे आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहेत हे स्पष्ट होते.

## ५.८ वार्षिक उत्पन्न पातळी :


अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांच्या सन २००७–०८ च्या वार्षिक उत्पन्ना संबंधीची तथ्य संकलीत केली असता असे दिसून आले की रू. ५०००–८००० वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २% आहे, रू. ८००१ ते ११००० उत्पन्न ३२% कुटुंबांचे होते, रू. ११००१ ते १५००० उत्पन्न पातळी असणारी ४३% कुटुंबे तर रू. १५००१ च्या पुढे उत्पन्न असणारी २३% कुटुंबे आढळून आली.

**तक्ता ५.२९ : वार्षिक उत्पन्न पातळी (रू.)**

| ५००० – ८००० | ८००१ – ११००० | ११००१ – १५००० | १५००१ च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|
| २% | ३२% | ४३% | २३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२१ : वार्षिक उत्पन्न पातळी**




रू. ११०१ ते १५००० उत्पन्न पातळी असलेल्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून आले. रू. ८००१ ते ११००० उत्पन्न पातळी असणारी कुटुंबे दुसऱ्या क्रमांकावर होती. तर रू. १५००१ च्या पुढे उत्पन्न असणारी कुटुंबे तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे आढळून आली. रू. ५०००–८००० उत्पन्न पातळी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसते.

एकूणच रू. ८००१ ते १५००० उत्पन्न पातळी असणारी कातकरी कुटुंबे ७५% आहेत व ती मावळ मुळशी हवेली भोर वेल्हे या तालुक्यातील आहेत. हा मावळ भाग असल्यामुळे हंगामी भात शेतीत वर्षभर रोजगार नसतो. रोजगारासाठी स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे. त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही. अशा कुटुंबाचे उत्पन्न रू. ८००१ ते १५००० या पातळीत समाविष्ट झाल्याचे आढळून आले.

साधारणपणे रू. १५००१ च्या पुढील उत्पन्न पातळी असणारी कुटुंबे ही आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आहेत. उपयोजना क्षेत्रात वर्षभर लोकांना रोजगार मिळतो. धरणाच्या लाभ क्षेत्राचे प्रमाण जास्त आहे. तसेच विविध शासकिय योजनांचा लाभ त्या क्षेत्रातील कातकरी कुटुंबांना मिळाले आहेत. तेथील कुटुंबात स्थलांतराचे प्रमाण कमी आहे.

यावरून कातकरी कुटुंबांची वार्षिक उत्पन्न पातळी अतिशय कमी आहे. भाववाढ आणि उत्पन्न पातळी यांचा समन्वय कोठेच बसत नाही. त्यामुळे मिळणारे उत्पन्न उपभोगासाठीही पुरेसे नसते. या कारणामुळे कातकरी लोकांची आर्थिक स्थिती मागासलेली राहिल्याचे स्पष्ट होते.

## ५.९ आर्थिक व्यवहार :

प्रत्येक समाजाची एक स्वतंत्र अर्थव्यवस्था असते आणि त्या अर्थव्यवस्थेतील आर्थिक आर्थिक व्यवहाराच्या स्वरूपावर आणि प्रमाणावर त्या त्या समाजाची आर्थिक स्थिती निश्चित होते. कातकरी आदिमांची देखील एक स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे. त्या अर्थव्यवस्थेत होणारे व्यवहार यासंबंधीची माहिती विश्लेषित करण्यात आली असता पुढील स्थिती दिसून आली.

**१. हिशोब पध्दती :** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात दैनंदिन आर्थिक व्यवहारासाठीची हिशोब पध्दती यासंबंधीची तथ्य संकलीत केली असता ३८% कुटुंबे तोंडी हिशोब ठेवतात. ७% कुटुंबात लेखी स्वरूपात तर ३०% कुटुंबाच्या व्यवहाराचा हिशोब


मालक ठेवतो असे आढळून आले. लेखी हिशोब ठेवणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अतिशय कमी आहे. तोंडी हिशोब ठेवणे, मालकाने हिशोब ठेवणे आणि २५% कुटुंबांनी आर्थिक व्यवहाराचा हिशोब न ठेवणे. या बाबी कातकरी जमातीच्या निरक्षरतेचे व अर्थव्यवस्थेच्या मागासलेपणाचे लक्षण दर्शवितात.

**तक्ता ५.३० : हिशोब पद्धती**

| तोंडी | लेखी | मालक | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ३८% | ७% | ३०% | २५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२२ : हिशोब पद्धती**




कातकरी समाजातील निरक्षरता, अज्ञान, निष्काळजीपणा, दक्षता हेतूचा अभाव इत्यादींमुळे हिशोब पध्दती मागासलेली दिसून येते. यावरुन या समाजात संपत्ती संग्रहण, भविष्याची तरतूद करण्याची वृत्ती दिसून येत नाही. त्यांचा आर्थिक व्यवहार केवळ एका दिवसापुरता मर्यादित दिसतो. ''आजचे आज आणि उद्याचे उद्या'' एवढाच हिशोब त्यांना समजतो. आर्थिक व्यवहाराचे मोजमाप त्यांना माहित नाही. म्हणजेच हातापायाच्या वीस बोटावर मोजता येणारी एवढीच त्यांची हिशोब पध्दती आहे.

प्राथमिक अवस्थेतील ही हिशोब पध्दती कातकरी अर्थव्यवस्थेचा आणि आर्थिक स्थितीचा कमकुवत पाया निश्चित करते. या कारणामुळेच कातकरी समाजाची आर्थिक स्थिती मागासलेली राहिली आहे असा निष्कर्ष निघतो.

**२. खर्चाचे नियोजन :** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या खर्चाचे नियोजन या संबंधी तथ्य संकलीत केली असता ५७% कुटुंबात खर्च करताना प्रथम व्यसनावरील खर्चाला प्राधान्य दिले जाते आणि ४३% कुटुंबात जीवनावश्यक गरजांच्या वस्तूंची खरेदी करण्याला प्राधान्य दिले जाते.

**तक्ता ५.३१ : खर्चाचे नियोजन**

| व्यसन | जीवनावश्यक गरज | एकूण |
|---|---|---|
| ५७% | ४३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरुन कातकरी कुटुंबात खर्चाचे नियोजन नाही. कोणतीही एक खर्च पद्धती दिसत नाही. खर्च करतांना व्यसनावरील खर्चाला प्रथम प्राधान्य दिले जाते. हे लोक व्यसनाधिनतेच्या आहारी केले आहेत. जीवनावश्यक गरजावरील खर्चापेक्षा व्यसनावरील खर्चाला महत्त्व दिले जाते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे उत्पन्न मिळण्याअगोदर अनामत रक्कम घेऊन खर्च सुरु होतो. त्यामुळे खर्चाचे नियोजन रहात नाही. खर्च करताना कोणत्या बाबीवरील खर्चाला प्रथम प्राधान्य द्यावे याचे ज्ञान दिसत नाही. त्यामुळे मागासलेपण अधिक असल्याचा निष्कर्ष निघतो.

**३) बचत पातळीः** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील बचत पातळीची स्थिती आजमावली असता २५% कुटुंबात बचत केली जाते आणि ७५% कुटुंबात बचत केली जात नाही असे आढळून आले. ३३% कातकरी वस्त्यावर स्वतंत्र कातकरी बचतगट स्थापन करण्यात आले होते. बचत गटाच्या माध्यमाने २५% कुटुंबे बचत करीत होती. परंतु

प्रत्यक्षात बचतगट जास्त काळ चालू शकली नाही आणि बचतही होऊ शकली नाही असे आढळून आले.

**तक्ता ५.३२ : बचत पातळी**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| २५% | ७५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

मुळात कातकरी कुटुंबात उत्पन्न आणि खर्चाचा मेळ बसत नाही. उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असतो. त्यामुळे नेहमीच त्यांच्या आर्थिक व्यवहारात तुट असते. खर्चाचे नियोजन नसणे, व्यसनावर अमाप खर्च करणे यामुळे उत्पन्न खर्चासाठी कमी पडते. त्यामुळे बचत गट बंद पडले आणि बचत होऊ शकली नाही. त्यामुळे बचत न करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.

बचतगटासारखा अंशलक्षी वित्तपुरवठा कातकरी सारख्या आदिवासी समाजाच्या विकासाचा नवीन मार्ग आहे परंतु त्याचे महत्त्व समजलेले नाही असा अर्थ निघतो.


**४) कर्ज उभारणीः** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील ६% कुटुंबांनी सावकाराकडून कर्ज घेतले होते. ८% कुटुंबांनी बँकाकडून, ३६% कुटुंबांनी मालकाकडून घेतले होते. तर ५०% कुटुंबांना कोणाकडूनही कर्ज मिळाले नसल्याचे  दिसून आले नाही. ८% कुटुंबांना बँकांकडून जी कर्जे मिळाली आहेत ती शासकीय योजनांतर्गत असल्यामुळे ती विनातारण आहेत.

**तक्ता ५.३३ : कर्ज उभारणी**

| सावकार | बँक | मालक | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६% | ८% | ३६% | ५०% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

## आलेख ५.२३ : कर्ज उभारणी




सावकार मनमानी व्याज आकारुन कातकरी लोकांची पिळवणूक करतो तर मालक अनामत रक्कम म्हणून एक प्रकारचे कर्जच देतो आणि काम करुन घेतल्या नंतर हिशोब करताना त्या दिलेल्या रक्कमेवरील व्याज म्हणून मोबदला कमी देतो असे दिसते. ८% कुटुंबांनी बँकाकडून जी कर्ज उभारणी केली आहे ती आदिवासी उपयोजना क्षेत्रात विविध शासकीय अनुदान योजनांमधून मिळालेली कर्जे आहेत. तसेच काही बचत गटानाही कर्जे मिळाली होती.

५०% कुटुंबांना कर्ज मिळू शकली नाहीत. कातकरी लोकांची बाजारातील अल्प पत, तारण मालमत्तेचा अभाव, कागदपत्रांची पुर्तता न करणे, कर्ज उभारणी संदर्भातील माहितींचा अभाव, इत्यादी कारणे कारणीभूत ठरतात.

कर्ज उभारणी हा आर्थिक विकासासाठीचा महत्वाचा मार्ग आहे. ५१% कुटुंबांनी कर्ज घेतले. कातकरी कुटुंबांनी घेतलेले कर्ज व्यसन, उपभोग्य गरजा पूर्ण करण्यासाठी वापरले गेल्यामुळे ते कर्ज त्यांच्या आर्थिक विकासात अडथळा ठरले आहे. कर्जाच्या अशा वापरामुळे नंतर कर्ज परत करणे अशक्य झाले आणि बाजारपेठेत पत कमी होऊन पुन्हा कर्ज उभारणी मध्ये अडथळे निर्माण झाले आहेत.

ज्या कुटुंबांनी कर्ज घेतले त्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली नाही. कर्ज घेणारे आणि कर्ज न घेणारे या दोघांची स्थिती सारखीच आहे. उलट ज्यांनी कर्ज घेऊन खर्च केले त्यांची स्थिती आणखी बिघडल्याचे दिसते. ते कर्ज कसे फेडायचे हा प्रश्न त्यांच्या समोर आहे. कर्ज उभारणी कातकरी जमातीच्या आर्थिक विकासाचा मार्ग नसून अडथळा ठरला आहे हे सिध्द होते.

५. **बँक व्यवहारः** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाचे बँकांशी होणारे व्यवहार यासंबंधीची तथ्य संकलीत केली असता,

**तक्ता ५.३४ : बँक व्यवहार**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| ३७% | ६३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

३७% कुटुंबाची बँकांमध्ये खाते उघडले गेल्याचे आढळून आले. ६३% कुटुंबांचे मात्र कोणत्याही बँकेत खाते किंवा इतर व्यवहार आढळून आले नाहीत.

सामाजिक संस्थांनी बचत गट स्थापन करुन बँकेत सभासदाची खाती उघडली होती. बचतगट बंद पडल्यानंतर त्या खात्यात कोणतेही व्यवहार झाले नाहीत. खाते उघडण्याची कमीत कमी रक्कम जी भरावी लागते तेवढीच खात्यावर शिल्लक दिसते. तसेच ज्या कुटुंबांनी बँकांकडून कर्ज घेतले तेंव्हा बचत खाते उघडली गेली होती. त्यातही कोणत्याही प्रकारचे व्यवहार झाल्याचे दिसत नाही. म्हणजेच ३७% कुटुंबाची बँकेत खाते असले तरी ते बँक व्यवहार आर्थिक प्रगतीचे लक्षण नाही. त्यामुळे बँक व्यवहाराचा त्यांच्या आर्थिक स्थितीत बदल होण्यास फायदा झालेला नाही हे सिध्द होते.

## ५.१० स्थावर मालमत्ता :

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटूंबाच्या नावावर असणाऱ्या स्थावर मालमत्ते संबंधीची तथ्ये संकलीत केली असता एकाही कुटुंबाकडे शेत जमीन नाही सर्व कुटुंबे

भूमिहीन असल्याचे आढळून आले. ४७% कुटुंबाकडे स्वतःचे घर होते व घरांची जागा त्यांच्या मालकीची होती. ५३% कुटुंबाकडे स्वतःचे घर नव्हते आणि घराची जागाही स्वतःच्या मालकीची नव्हती असे आढळून आले.

**तक्ता ५.३५ : स्थावर मालमत्ता**

| स्वत:चे घर व जागा | काहीही नाही | एकूण |
|---|---|---|
| ४७% | ५३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरुन कातकरी कुटुंबाची स्थावर मालमत्ता म्हणजे त्यांचे घर होय. पण घरही ५३% कुटुंबाकडे नसल्यामुळे तीही मालमत्ता त्यांच्याकडे असल्याचे दिसत नाही. म्हणजेच कातकरी कुटुंबाकडे मालमत्ता असल्याचे दिसून आले नाही.

## ५.११ व्यावसायिक स्थिती :

कातकरी जमातीचा कोणताही कायम स्वरुपी व्यवसाय आढळत नाही. पिढ्यानपिढ्या ही जमात व्यवसाय बदलत आली आहे. पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबाचे मुख्य व दुय्यम व्यवसाय असे व्यवसायाचे दोन प्रकार आढळून आले. सर्व व्यवसाय हंगामी स्वरूपाचे आहेत. कोणताही व्यवसाय उत्पन्नाचा कायम स्त्रोत नाही. ते विविध व्यवसाय पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) मुख्य व्यवसाय :** अभ्यासक्षेत्रात कातकरी कुटूंबांचे मुख्य व्यवसाय पुढीलप्रमाणे आढळून आले :–

**तक्ता ५.३६ : मुख्य व्यवसाय**

| शेतमजूरी | इतर | एकूण |
|---|---|---|
| ९९% | १% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

१. **शेतमजूरी :** अभ्यास क्षेत्रात ९९% कातकरी कुटुंबाचा शेतमजूरी हा प्रमुख व्यवसाय असल्याचे आढळून आले. पावसाळ्यातील एकमेव रोजगार उपलब्ध करुन देणारा हा मार्ग आहे.

नांगरणी, लावणी, पेरणी, कापणी, मळणी पर्यंतची सर्व कामे शेतमजूर म्हणून कातकरी कुटुबे करतात. तसेच गवत कापणे, लाकूड तोडणे चिंचा झोडपणे ही कामे देखील कातकरी लोक करीत असल्याचे आढळून आले.

अभ्यास क्षेत्रात एकाही कुटुंबाकडे शेतजमीन असल्याचे आढळून आले नाही. पावसाळ्यात कातकरी कुटुंबे आर्थिकदृष्टया हतबल झालेली असतात. त्यामुळे शेतकरी कमी मोबदल्यावर त्यांना राबवून घेतात आणि कातकरी कुटुंबे जेवण आणि दारू मिळत असल्यामुळे मिळेल तो मोबदला स्विकारतात. अभ्यास क्षेत्रातील मावळ पट्टयातील शेती हंगामी असल्यामुळे वर्षभर शेतीत रोजगार मिळत नाही. एकदा कापणी मळणीची कामे झाली की कातकरी कुटुंबाला बेकारी व उपासमारीला तोंड द्यावे लागते.

जुन्नर, खेड, आंबेगाव व धरणाखालील ओलीत क्षेत्रात कातकरी लोकांना ७–८ महिने शेतीत शेतमजूर म्हणून रोजगार उपलब्ध होतो. परंतु मावळ, मुळशी भोर, वेल्हे, हवेली या तालुक्यात दिवाळीनंतर कातकरी कुटुंबांना शेतीत रोजगार मिळत नाही असे दिसून आले. कातकरी जमातीचा सध्याचा प्रमुख व्यवसाय शेतमजूरी आहे हे यावरून स्पष्ट झाले आहे.

२. **नोकरी :** नमुना कातकरी कुटूंबांपैकी १% कुटूंबांचा मुख्य व्यवसाय नोकरी असल्याचे आढळून आले. ग्रामपंचायत कार्यालय, विकास कार्यकारी सोसायटी व खासगी क्षेत्रात कातकरी लोक नोकरी करीत असल्याचे आढळून आले. नोकरी हा मुख्य व्यवसाय असणारी कुटूंबे खेड, जुन्नर, आंबेगाव या आदिवासी उपयोजना क्षेत्रात आढळून आली आहेत. शिक्षणाबाबतची उदासिनता, रेशन कार्ड यादी व दारिद्रय रेषेखालील यादीत नाव नोंदले न जाणे, जातीचा दाखला मिळण्यातील अडचणी इ. मुळे नोकरी हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या कुटूंबांचे प्रमाण कमी असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

**ब) दुय्यम व्यवसाय :** नमुना कातकरी कुटूंबांचे दुय्यम व्यवसाय पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून आले:-

**१) मासेमारी :** पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात एकूण कुटुंबाच्या ६९% कातकरी कुटुंबे मासेमारी हा दुय्यम व्यवसाय करतात. ३१% कुटुंबे मासेमारी करीत नाहीत असे आढळून आले.

एकूण मासेमारी करणाऱ्या कुटुंबापैकी ५८% कुटुंबे नदी-नाले, ओढे, डबके, बंधारा या ठिकाणी मासेमारी करतात. ११% कुटुंबे धरण व धरण परिसरात मासेमारी करतात.

मासेमारी हा कातकरी लोकांचा दुय्यम व्यवसाय आहे. त्याला फार मोठे व्यावसायिक स्वरुप नाही व उत्पन्नाचा महत्वाचा स्रोत म्हणूनही महत्व नाही.

पावसाळ्यात खेकडे पकडले जातात आणि नोव्हेंबर ते मार्च दरम्यान मासेमारी केली जाते. मासेमारीचे स्वरुप व तंत्र अतिशय प्राथमिक व पारंपारिक आहे. साडी किंवा धोतीच्या पातळ कापडाने कातकरी कुटुंब मासे पकडतात. उथळ पाण्यात मिळेल त्या आकाराचे मासे पकडले जातात. तसेच बांबूपासून बनविलेले शंकूच्या आकाराचे टोपले मासे व खेकडे पकडण्यासाठी वापरतात. त्याला मळई असे म्हणतात.

कातकरी लोकांच्या मासेमारी उत्पादनाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो. मुऱ्या शिंगट्या, खवली, बोयट्या, शिवंड्या, दांडवण, मरबल, वांब इत्यादी प्रकारचे मासे पकडतात. त्यांचा आकार अतिशय लहान असतो. ज्याला मागणी कमी व मूल्यही कमी असते. त्यामुळे मिळणारे उत्पन्नही कमी असते. मासेमारीची बाजारपेठ स्थानिक असते आणि उत्पादनाचे प्रमाण कमी असते. उत्पादनाचा दर्जा निकृष्ट म्हणून मासेमारीला व्यावसायिक स्वरुप नाही. मासेमारी करण्यामागे उत्पन्न मिळविण्याबरोबर कुटुंबाची उपभोगाची गरजही पूर्ण करण्याचा हेतू असतो. मासेमारी हा दुय्यम व्यवसाय फारसा फायदेशीर असल्याचा दिसत नाही असा निष्कर्ष निघाला आहे.

**तक्ता ५.३७ : दुय्यम व्यवसाय**

| मासेमारी | कोळसा पाडणे | विटा बनविणे | वनवस्तू संकलन | पशुपालन | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ६९% | ७% | १२% | ६% | ३% | ३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

३. **कोळसा पाडणे :** लाकडाचा ठिसूळ कोळसा पाडण्याचा व्यवसाय कातकरी लोक करतात. हा व्यवसाय दुय्यम व्यवसाय आहे. अभ्यास क्षेत्रात ७% कुटुंबे कोळसा पाडण्याच्या कामासाठी स्थलांतरीत होतात. त्यातही मावळ मुळशी, भोर, वेल्हे या मावळ भागातील कातकरी कुटुंबे या कामासाठी स्थलांतरीत होतात. कारण शेतमजूरी हंगामी शेतीवर अवलंबून असल्यामुळे बेकारी काळात कोळसा पाडण्यासाठी जातात. खेड जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील फार कमी कुटुंबे या कामासाठी जातात. कारण ओलीताखालील क्षेत्र अधिक असून शेतीत रोजगार उपलब्ध असतो तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्र असल्यामुळे कातकरी कुटुंबांचे स्थलांतर कमी दिसते.

कोळशाच्या कामासाठी जाणाऱ्या कुटुंबाच्या अडचणीच्या काळात कोळशाचा व्यापारी उचल म्हणून पैसे देऊन जातो. हे पैसे पावसाळ्यातील उपासमार टाळण्यासाठी वापरायला मिळतात किंवा घरातील लग्न कार्यासाठी उपलब्ध होतात. यामुळे हे काम कातकरी कुटुंबे स्विकारतात.

कातकरी कुटुंबे कोळसा पाडण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात जातात. दिवाळी संपल्यानंतर मुलाबाळासह कुटुंब कोळशाच्या कामासाठी स्थलांतरीत होते. लाकडे तोडणे आणि चुलवणात व्यवस्थित रचून कोळसा पाडण्याचे कौशल्यपूर्ण काम कातकरी कुटुंब रात्रंदिवस करीत असते. प्रत्येक आठवड्याभराचे रेशन कंत्राटदार घेऊन देतो.

आठवड्याभरानंतर भट्टी निघते. कोळशाचा हिशोब पोत्यावर असतो. रु. २०० प्रति पोत्याला भाव मिळतो. भट्टीत कोळसा जेवढा निघेल त्याचेच पैसे मिळतात. त्यामुळे भट्टी पेटल्यानंतर रात्रं-दिवस डोळ्यात तेल घालून भट्टीकडे लक्ष द्यावे लागते. दिवाळी ते मे महिन्याच्या शेवटपर्यंत हे काम चालते. कंत्राटदार शेवटी हिशोब काढतो. उचल म्हणून दिलेली रक्कम आणि कामाच्या काळात रेशन व काही रोखपैसे एकूण मोबदल्यातून वजा

करतो. हिशोबात पोत्याची संख्या कमी धरतो. निघाली तर थोडी फार वरची रक्कम त्यांना देतो. बऱ्याचवेळा कातकरी कुटुंबावरच पैसे निघतात.

आर्थिक दृष्टीकोनातून हा व्यवसाय परवडणारा नाही, त्यात कंत्राटदार त्यांची पिळवणूक करतो. दारिद्रय आणि गरीबी पुन्हा कायम राहते असे आढळून येते.

४. **विटा बनविणे:** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाचा विटा बनविण्याचा हा देखील दुय्यम व्यवसाय असल्याचे दिसून आले. एकूण कुटुंबापैकी १२% कुटुंबे पाच ते सहा महिन्यासाठी विटा बनविण्याच्या कामासाठी स्थलांतरीत होत असल्याचे आढळून आले.

वीट भट्टी मालक किंवा एखादा मध्यस्थ कातकरी कुटुंबांना या कामासाठी घेऊन जातो. पावसाळ्यात किंवा दिवाळीलाच मालक उचल देतो. दिवाळीनंतर शेतीतील कामे संपताच कातकरी कुटुंबे विटा बनविण्यासाठी स्थलांतरीत होतात. हे काम देखील अंगावर असते. अगोदरच्या दिवशी चिखल कालविणे, दुसऱ्या दिवशी तो चिखल चांगला मिसळून मऊ केला जातो. त्यानंतर कातकरी कुटुंब चिखलापासून विटा छापतात. वाळल्यानंतर मुले त्या विटा उभ्या करतात. वाळलेल्या विटा रचून ठेवल्या जातात. दुपारनंतर वाळलेल्या विटा सर्व कुटुंब डोक्यावरुन वाहून भट्टीवर नेतात. यात सर्व कुटुंब रात्रंदिवस राबते. कामाचा मोबदला मात्र कमी असतो. एकाच मोबदल्यात सर्व कुटुंब काम करते. यातून मिळणारे उत्पन्न कमी असते.

५. **वनवस्तू संकलन:** अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबात वनवस्तू संकलनाचा दुय्यम व्यवसाय केला जात असल्याचे आढळून आले. एकूण कुटूंबांपैकी ६% कातकरी कुटुंबे जंगलातील उपयुक्त वस्तू गोळा करण्याचे काम करताना दिसून आली. त्यातही आंबेगाव, खेड, जुन्नर या तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात वनवस्तू संकलनासाठी परवानगी असल्यामुळे तेथील कातकरी कुटुंबे हा व्यवसाय करीत आहेत.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात वनाच्छादित भाग असल्यामुळे वन वस्तू संकलनासाठी अनुकुलता आहे. आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी लोकांनी गोळा केलेला हिरडा खरेदी केला जातो. ६% कातकरी कुटुंबे हिरडा गोळा करण्याचा व्यवसाय करतात. I, II व III अशा तीन ग्रेडचा हिरडा जुन्नर, खेड व आंबेगाव तालुक्यातील जंगलात मिळतो. ४०० ते ४५० रुपये क्विंटल महामंडळाकडून त्याला भाव मिळतो. त्याचा वापर चर्मउद्योगात केला जातो. बाळ हिरड्याला मात्र महामंडळ २०००-२५०० रुपये क्विंटल भाव देते. याचा औषधासाठी वापर केला जातो. वन विभागाकडे महामंडख वनवस्तू संकलनाचा कर भरते. जंगलातून वन वस्तू वाहून आणणे जिकरीचे असते तसेच त्या वस्तूचे त्वरीत रोख पैसे मिळत नसल्यामुळे या व्यवसायात फार कमी कुटूंबे कार्यरत असल्याचे दिसून आले.

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील इतर तालुक्यात मात्र कातकरी लोक वनवस्तू संकलनाचा व्यवसाय करीत नाहीत. कारण वनवस्तू संकलनावर निर्बंध आहेत.

६. **पशुपालनः** अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात पशुपालन हा दुय्यम व्यवसाय आढळून आला. नमुना कुटूंबांपैकी ३% कातकरी कुटुंबे पशुपालनाचा व्यवसाय करीत असल्याचे आढळले. त्यातही पशुपालनात शेळीपालन दिसून आले. तसा पशुपालन हा व्यवसाय पूर्वीचा व्यवसाय नाही. कातकरी जमातीने अलीकडील काळात स्विकारलेला आहे.

विशेषतः आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये खेड, जुन्नर व आंबेगाव तालुक्यात आदिवासी विभागाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या केंद्रवर्ती बजेट योजनेअंतर्गत कर्जरुपाने काही कातकरी कुटूंबांना शेळ्या मिळालेल्या आहेत. योग्य रितीने शेळी पालन न करता आल्यामुळे अनेकांच्या शेळ्या रोगराईने मृत्यु पावल्या आहेत.

वास्तविकता कातकरी सारख्या भटक्या व स्थलांतरीत होणाऱ्या आदिमाकडून पशुपालन होणे अशक्य आहे. कारण या जमातीकडे स्वतःची शेतजमीन नाही, स्वतःचे

निटनिटके घर नाही. प्रचंड व्यसनाधिनता यामुळे शेळीपालन या जोड व्यवसायाने त्यांच्या आर्थिक स्थितीत फारसा बदल केलेला दिसत नाही. केवळ शासनाच्या योजनेचा लाभ घेणे या उद्देशाने हा जोड व्यवसाय दिसून येतो.

७. **इतर व्यवसायः** कातकरी कुटुंबात इतर कांही व्यवसाय केले जात असल्याचे आढळून आले. जवळच्या शहरी भागात जाऊन हमाली करणे, गाड्या चालविणे, वाळू उपसणे, ट्रकवर माती, मुरुम भरणे, हातभट्टीची दारु विकणे व काढणे, लग्न सराईत बेंजो पार्टी, बांधकाम मजूर इत्यादी व्यवसाय केले जात असल्याचे आढळून आले. एकूण नमुना कुटूंबांपैकी ३% कातकरी कुटूंबे वरील इतर व्यवसाय करीत असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

कातकरी समाजाचा स्वतंत्र व कायमस्वरूपी उत्पन्न, रोजगार मिळवून देणारा एकही व्यवसाय दिसत नाही. काळाच्या ओघात ही जमात व्यवसाय बदलत आली आहे. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून व्यावसायीक गतीशीलता संयुक्तीक मानली जात असली तरी त्यांनी स्विकारलेल्या कोणत्याही व्यवसायाने कातकरी समाजाला आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनविलेले नाही. व्यावसायीक गतीशीलता ही जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी झालेली नसून केवळ जगण्यासाठीची नाईलाजाने केलेली धडपड दिसते. रोजगाराचे मार्ग शोधत हा समाज आपल्या मुळ स्थानापासून विखूरला गेला आहे. भोवतालच्या परिस्थितीत उदरनिर्वाहासाठी मिळेल तो रोजगार तो स्विकारीत असतो. भारतात कष्ट करणाऱ्यांची संख्या कमी नाही. मात्र कातकऱ्यांच्या वाट्याला अफाट शारिरीक श्रमाची कामे येतात. त्यांना त्यांच्या श्रमाचे मोल पैशात करता येत नाही, हिशोब येत नाही. जेवण आणि दारू सारखा मोबदलाही स्विकारून जगण्याचा प्रयत्न ते करतात. कातकरी समाजात व्यावसायिक दृष्टीकोन नाही. कोणत्याही धंद्यात त्यांचे शोषण अटळ आहे. सर्वत्र विखूरलेला मजूर वर्ग असल्याने त्यांचे संघटन होत नाही. सर्वच व्यवसाय हंगामी, दुय्यम व असंघटीत क्षेत्रातील असल्यामुळे कोणत्याही व्यवसायात सुरक्षितता नाही. किमान

वेतनाचे, अपघात विम्याचे, कायदेशीर हक्काचे, फंड, पेन्शन, ग्रॅच्युइटी असे कोणतेही सामाजिक सुरक्षिततेचे उपाय या समाजाला मिळालेले नाहीत. कातकरी समाज असंघटीत क्षेत्रातील शोषित समाज आहे, देशोधडीला लागलेला एक मजूर वर्ग आहे.

कातकरी जमातीतील व्यावसायिक बदलाची प्रवृत्ती आणि भटकी जीवन पद्धती उदरनिर्वाहासाठीची कंत्राटदारी, बांधिल मजूरीपोटी आलेली आहे. काळाच्या ओघात प्रत्येक व्यवसायावर आरिष्ट येत गेले आणि कातकऱ्याला नवीन व्यवसाय शोधावा लागला आहे. कोणत्याही व्यवसायाने या समाजाला आर्थिक, सामाजिक स्थैर्य दिलेले नाही. तसेच प्रत्येक समाजाची सामाजिक प्रतिष्ठा आणि बाजारपेठेतील पत या दोन्ही बाबी तो करीत असलेल्या व्यवसायावर आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणावर अवलंबून असतात. कातकऱ्याच्या व्यवसायाचा इतिहास आजमावला असता कोणत्याही व्यवसायाने कातकरी जमातीला ना सामाजिक प्रतिष्ठा दिली ना त्यांची आर्थिक पत वाढविली ही वास्तवता कातकऱ्याच्या व्यावसायीक स्थितीवरून स्पष्ट होते.

### ५.१२ मत्स्य उत्पादनाची बाजारपेठ :

अभ्यासक्षेत्रातील कातकरी कुटूंबाच्या मासेमारीच्या व्यवसायासंबंधी माहिती संकलीत करीत असताना मत्स्य उत्पादनाच्या बाजारपेठेचे वास्तव चित्र पुढे आले. मासेमारी करणारी कुटुंबे ९५% मासे स्थानिक बाजारपेठेत विकतात. तर ५% मासे कंत्राटदाराला विकत असल्याचे दिसून आले. म्हणजेच मत्स्य उत्पादनाच्या बाजारपेठेचे स्वरूप मर्यादित आहे.

उत्पादन तंत्र, व्यावसायिक कौशल्य, उत्पादनाचा दर्जा, यावर बाजारपेठेचे स्वरूप अवलंबून असते. कातकरी जमातीच्या मासेमारी व्यवसायाचे तंत्र अतिशय मागासलेले आहे. त्या उत्पादन तंत्रात व्यावसायिक दृष्टीकोन कमी आणि उदरनिर्वाहाचा दृष्टीकोन अधिक दिसतो. व्यवसाय म्हणून त्यासंबंधीच्या कौशल्याचा अभाव दिसून येतो आणि उत्पादनाचा दर्जा तपासला तर अतिशय निकृष्ट दर्जाचे मासे असतात. शिंपल्या, मुऱ्या,

खवली, बांयट्या, खरबे, दांडवण, मरबल, डाकू, मळे, लायल यासारखे माशांचे प्रकार पकडतात. ज्यांना बाजारात मागणी नसते कारण त्यांचा आकार लहान असतो. स्थानिक बाजारपेठेत मासे विकताना मुल्या निश्चितीत अडचणी येतात. मासे विकण्यासाठी त्यांच्याकडे वजनकाटा असत नाही. लहान आकाराचे मासे, प्रमाण कमी या कारणामुळे मिळेल ती किंत द्यावी लागते.

## ५.१३ मासेमारीची अनुकुलता आणि कातकरी वस्तीचे केंद्रीकरण :

मासेमारीचा स्त्रोत आणि त्याची अनुकुलता त्या त्या अनुषंगाने कातकरी वस्तीचे केंद्रीकरण विचारात घेतले असता अभ्यास क्षेत्रात असे दिसून आले की, एकूण कातकरी वस्त्यांपैकी ५८% कातकरी वस्त्या नदीच्या जवळ, तर ११% वस्त्या धरणा जवळ केंद्रीत झाल्या होत्या. म्हणजेच ६९% कातकरी वस्त्या मासेमारीचा स्रोत उपलब्ध असलेल्या ठिकाणी केंद्रीत झाल्याचे सिध्द झाले आहे.


३१% वस्त्या मात्र मासेमारीचा कोणताही जलस्त्रोत नसलेल्या ठिकाणी वसल्याचे आढळून आले.

**तक्ता ५.३८: कातकरी वस्तीचे केंद्रीकरण**

| नदी | धरण | इतर ठिकाणी | एकूण |
|---|---|---|---|
| ५८% | ११% | ३१% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

### आलेख ५.२४ : कातकरी वस्तीचे केंद्रीकरण




यावरुन मासेमारीला अनुकुलता असलेल्या ठिकाणी कातकरी वस्त्यांचे केंद्रीकरण झाल्याचे दिसते म्हणजे मासेमारीचा स्रोत त्यांच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

मासेमारी हे कातकरी समाजाचे उदरनिर्वाहाचे पारंपारिक साधन आहे. हा जरी दुय्यम व्यवसाय असला तरी उत्पन्नाबरोबर मांसाहाराची गरज पूर्ण करण्यात मासेमारीचा कातकरी जीवनात महत्त्वपूर्ण वाटा आहे. त्यामुळे मासेमारीसाठीची अनुकुलता आणि त्यांच्या वस्तीचा जवळचा संबंध आहे. ज्या ठिकाणी मासेमारीचे स्त्रोत उपलब्ध आहेत तेथेच कातरी वस्त्या केंद्रीत झाल्याचे आढळून आले.

अभ्यासक्षेत्रात पश्चिम घाटाचा परिसर असल्यामुळे संपूर्ण पश्चिम पट्ट्यात डोंगर दऱ्याचे प्रमाण अधिक आहे आणि त्यामुळे डोंगर रांगामधून अनेक नद्या उगम पावताना दिसतात. पुणे जिल्ह्यातील पश्चिमेकडील प्रत्येक तालुक्यातून किमान एक तरी नदी उगम पावते किंवा वाहत जाते. त्याचबरोबर प्रत्येक तालुक्यात किमान एक तरी धरण असल्याचे दिसते. धरण व नदी परिसर अधिक असल्यामुळे पुणे जिल्ह्यात पश्चिम भागात मासेमारीला अनुकुलता आहे. अनेक वर्षापासून कातकरी वस्त्या अभ्यास क्षेत्राच्या पश्चिम भागात केंद्रीत झाल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

## ५.१४ शासकीय योजनांचे लाभ :

पुणे जिल्ह्यातील नमुना अभ्यास क्षेत्रात आदिवासी विकासासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय पातळीवर योजना राबविल्या जातात. त्या योजनांच्या लाभाचा त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम यासंबंधीची तथ्य संकलीत केली असता त्यातून शासकीय योजनांच्या लाभाची स्थिती पुढील प्रमाणे दिसून आली.

**तक्ता ५.३९ : शासकीय योजनांचे लाभ**

| योजनेचे नाव | लाभार्थी कुटुंबांची संख्या | लाभ न मिळालेली कुटुंबे | एकूण |
|---|---|---|---|
| दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा दाखला | ५३% | ४७% | १००% |
| अंत्योदय अन्न योजना | ५३% | ४७% | १००% |
| घरगुती गॅस वाटप योजना | २१% | ७९% | १००% |
| इंदिरा आवास योजना | ४७% | ५३% | १००% |
| केंद्रवर्ती बजेट योजना | ७% | ९३% | १००% |
| खावटी कर्ज योजना | ४% | ९६% | १००% |
| एकाधिकार खरेदी योजना | ३% | ९७% | १००% |
| कोणताही लाभ न मिळालेली | – | २१% | |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

### १. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा दाखला :

अभ्यास क्षेत्रात दारिद्र्य रेषेखाली नोंदल्या गेलेल्या कातकरी कुटुंबाची माहिती गोळा केली असता त्यातून असे दिसून आले की, ५३% कातकरी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली नोंदली गेली होती.

परंतु ४७% कुटुंबे आजही दारिद्र्यात जीवन जगत असतानाही त्यांची नोंद दारिद्र्य रेषेखाली झालेली नाही. त्यामुळे त्यांना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही हे सिध्द होते.

दारिद्र्य रेषा ही कुटुंबाची आर्थिक स्थिती निश्चित करणारी शासकीय अधिकृत प्रमाण रेषा आहे. ज्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा देखील पुरेशा प्रमाणात पूर्ण होत नाहीत.

अशी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली नोंदविली जातात, अशी कुटुंबे विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरतात.

परंतु अभ्यास क्षेत्रात ४७% कुटुंबे दारिद्रय रेषेखाली नोंदली गेली नाहीत. याचे कारण म्हणजे शासकीय पातळीवर त्यांची दखल न घेणे, सर्वेक्षण काळात कातकरी कुटुंबे स्थलांतरीत होणे, स्थानिक पातळीवर खरी माहिती न नोंदणे, ग्रामपंचायतीत नोंदी नसणे इत्यादी.

कातकरी कुटुंबाची उत्पन्नाची साधने, मिळणारा मोबदला, त्यांची जीवन पध्दती, त्यांच्या नावावरील स्थावर मालमत्ता, त्यांची राहणीमान पातळी, किमान गरजांची पुर्ती या सर्व बाबींकडे चिकित्सक पध्दतीने पाहिले असता दारिद्रय रेषेच्या खाली जीवन जगणारी ही आदिवासी जमात आहे असा निष्कर्ष निघतो.

**२. अंत्योदय अन्न योजना :**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना रेशनींगवर कमी दरात अन्नधान्य उपलब्ध करुन देणारी ही योजना आहे. सुरुवातीला ही योजना आदिम जमातीसाठीच राबविण्यात येत होती.

अभ्यास क्षेत्रात ५३% कातकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला दिसून आला. तर ४७% कुटुंबे या योजनेच्या लाभापासून वंचित होती. ही कुटुंबे दारिद्रयरेषेखाली नोंदली गेली नव्हती म्हणून या कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना या योजनेअंतर्गत दरमहा ३० कि.ग्रॅ. गहू २ रुपये दराने तर १५ कि.ग्रॅ. तांदूळ ३ रुपये दराने उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राबविली जाते. हे धान्य रेशनिंगवर उपलब्ध करुन दिले जाते. धान्याचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो. नियमानुसार धान्य मिळत नाही, एकाचवेळी सर्व धान्य घ्यावे लागते. कातकरी कुटुंबाकडे एक रकमी पैसे नसतात. त्यामुळे कांही वेळा हे धान्य पैशाअभावी घेणे शक्य होत नाही ही वास्तवता आढळून आली. तसेच ४०% कुटुंबांना या योजनेचा लाभ न

मिळण्याचे कारण म्हणजे ग्रामपंचायतीत नोंद नसणे, दारिद्र्य रेषेचा दाखला नसणे, रेशनिंग कार्ड नसणे, इ. होत.

### ३. घरगुती गॅस वाटप योजना :

दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबासाठी घरगुती गॅस वाटप योजना आहे. केंद्र सरकारच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत व राज्य शासनाच्या योजनेतून स्वयंपाकाचे संपूर्ण गॅस युनिट वाटप करण्यासाठीची ही योजना राबविण्यात येत आहे.

अभ्यास क्षेत्रातील एकूण कातकरी कुटुंबापैकी २१% कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. ७९% कुटुंबांना लाभ मिळालेला नाही. याचे कारण म्हणजे ही योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी पुरतीच मर्यादित आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव, जुन्नर या तीन तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र आहे. त्यामुळे केवळ तेथील कातकरी लोकांना याचा लाभ मिळालेला आहे.

त्यातही जर आदिवासी उपयोजना क्षेत्रात कातकरी कुटुंबांना मिळालेल्या लाभाचा आढावा घेतला तर ५१% कातकरी कुटुंबानाच यो योजनेचा लाभ मिळालेला आहे. ४९% कुटुंबे आजही या योजनेच्या लाभापासून वंचीत आहेत. याचे कारण म्हणजे कागदपत्रांची पुर्तता न करणे, वेळेत प्रस्ताव दाखल न करणे, गॅस वापरासंबंधी भिती वाटणे, इ. होत.

अनुसुचित जमातीची कुटुंबे जंगलात व जंगलाच्या कडेला राहणाऱ्या व ज्यांचा स्वयंपाक लाकडावर अवलंबून आहे अशा कुटुंबांना गॅस युनिट देऊन पर्यावरण संतुलन साधावे व घरातील वातावरण धूरमुक्त करुन त्यांचे जीवनमान सुधारावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आदिम अतिमागास जमाती, विधवा, परितक्त्या कुटुंबे इत्यादीं या योजनेचे लाभार्थी राहतील असे घोषित करण्यात आले आहे.

आदिवासींनी जंगलातील लाकूड इंधनावर अवलंबून राहू नये वृक्षतोड थांबवावी आणि धुरामुळे होणारे श्वसनाचे रोग थांबविणे म्हणजेच घर धूरमुक्त करणे या उद्देशाने ही योजना राबविली जात आहे.

## ४. इंदिरा आवास योजना :

दारिद्र्य रेषेखालील मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील सर्व कुटुंबांना या योजनेतून घरकूल बांधून दिले जाते. गांवच्या लोकसंख्येच्या प्रमाणावर घरकूलाची संख्या अवलंबून असते. २000 पर्यंत लोकसंख्या असलेल्या गांवात दरवर्षी चार घरकुले मंजूर केली जातात. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील गुणक्रमानुसार लाभार्थी निश्चित होतात.

अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबापैकी ४७% कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला दिसून आला आणि ५३% कुटुंबांना आजही घरकूलाचा लाभ मिळालेला नाही. ही योजना सर्वत्र राबविली जाते ही योजना केवळ आदिवासी लोक व आदिवासी क्षेत्रापूर्ती मर्यादीत नाही. त्यामुळे तरतूद कमी आणि मागणी जास्त म्हणून लाभार्थींची संख्या कमी दिसते.

स्वत:च्या मालकीची जागा नसणे, घरकुलासाठी कातकरी कुटूंबाकडे दुर्लक्ष करणे, दारिद्र्यरेषेखाली नांव नसणे, ग्रामपंचायतीत नोंद नसणे, सतत स्थलांतरीत होणे इत्यादी कारणांमुळे ५३% कुटुंबे या लाभापासून वंचीत राहिली आहेत. यामुळे निवास या मुलभूत सुविधेपासून कातकरी कुटुंबे वंचित राहिली आहेत.

## ५. केंद्रवर्ती बजेट योजना :

आदिवासी कुटुंबांना लहान मोठा व्यवसाय करता यावा म्हणून अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणारी ही योजना आहे.

पुणे जिल्ह्यातील नमुना अभ्यास क्षेत्रात केवळ ७% कातकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. म्हणजेच ९३% कुटुंबांना याचा लाभ मिळालेला नाही असे आढळून आले. याचे कारण म्हणजे ही योजना केवळ आदिवासी उपयोजना क्षेत्रापूर्वी मर्यादित आहे. म्हणजे खेड जुन्नर आंबेगाव या फक्त तीन तालुक्यातील कातकरी कुटुंबे याचे लाभार्थी आहेत.

त्यातही या तीन तालुक्यातील कातकरी कुटुंबापैकी केवळ १८% कुटुंबानाच याचा लाभ मिळालेला दिसून आला व ८२% कुटुंबे अद्यापही या लाभापासून वंचीत आहेत. याचे

कारण म्हणजे आर्थिक तरतूद कमी, आदिवासी मधील महादेव कोळी, ठाकर या जमातीनी अधिक लाभ घेणे, बँकानी कातकरी लोकांची पत पाहून कर्ज न देणे, कागदपत्रांची पुर्तता न करणे इत्यादी. या योजनेमुळे कातकरी कुटूंबाच्या आर्थिक स्थितीत फारशी सुधारणा झाली नसल्याचे दिसून आले.

**६. खावटी कर्ज योजना :**

दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुपोषित मुलांच्या पालकांसाठी ही योजना राबविली जाते. दारिद्र्यरेषेखालील कुपोषित ग्रेड-३ व ग्रेड-४ च्या मुलांचे पालक,कोलाम, माडिया, कातकरी या आदिम जमाती तसेच परितक्त्या, निराधार, आदिवासी कुटुंबे या योजनेचे लाभार्थी होत.

अभ्यास क्षेत्रात फक्त ४% कातकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला दिसून आला. ९६% कुटुंबांना याचा लाभ मिळालेला नाही. ही योजना देखील आदिवासी उपयोजना क्षेत्रापूर्ती मर्यादित आहे. त्यामुळे लाभ कमी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे. त्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कातकरी कुटुंबांना मिळालेल्या लाभाचे प्रमाण लक्षात घेतल्यास केवळ १०% कुटुंबालाच याचा लाभ मिळाला असल्याचे आढळून आले.

**७. एकाधिकार खरेदी योजना :**

आदिवासींनी गोळा केलेली वन उत्पादने खरेदी करण्यासाठी ही एकाधिकार खरेदी योजना राबविली जाते. ही योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रापुरती मर्यादित आहे.

अभ्यास क्षेत्रात ३% कातकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. ९७% कुटुंबांना लाभ मिळाले नाहीत.

जर आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कुटुंबांचा विचार केला तर ८% कुटुंबांनाच लाभ मिळाला आहे. ९२% कुटुंबांना लाभ मिळालेला नाही.

पुणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात कातकरी कुटूंबाकडून हिरडा या वनौषधी वनस्पतीचे संकलन केले जाते. गोळा केलेला हिरडा महामंडळ खरेदी करते. परंतू या योजनेचा लाभ कातकरी कुटुंबाला कमी मिळाला असल्याचा दिसतो. महामंडळ पैसे वेळेवर देत नाही. जंगलातून डोक्यावरुन वाहून आणणे अडचणीचे ठरते. तसेच त्याला मिळणारी किंमत परवडणारी नसते. इत्यादी कारणांमुळे या योजनेचा लाभ कातकरी कुटुंबाला मिळालेला नाही असे दिसून आले.


**तक्ता ५.४० : शासकीय योजनांच्या लाभार्थी कातकरी कुटुंबाची तालुका निहायटक्केवारी**

**(आकडे टक्क्यांमध्ये)**

| योजना | जुन्नर | आंबेगांव | खेड | मावळ | मुळशी | वेल्हे | भोर | हवेली | लाभ न मिळालेली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंत्योदय अन्न योजना | १० | १० | ६ | ७ | ६ | ५ | ६ | ३ | ४७ | १०० |
| इंदिरा आवास योजना | ३ | ८ | ९ | ८ | ६ | ६ | ७ | १ | ५३ | १०० |
| गॅस वाटप योजना | ९ | ६ | ६ | ० | ० | ० | ० | ० | ७९ | १०० |
| केंद्रवर्ती बजेट योजना | ४ | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ९३ | १०० |
| खावटी कर्ज योजना | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ९६ | १०० |
| एकाधिकार खरेदी योजना | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ९७ | १०० |
| कोणताही लाभ नाही | १ | २ | १ | ४ | ५ | ५ | ३ | १ | ७९ | १०० |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२५ : शासकीय योजनांच्या लाभार्थी कातकरी कुटुंबाची तालुका निहायटक्केवारी**




अभ्यास क्षेत्रात शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या शासकीय आदिवासी विकास योजनांच्या लाभाचा तालुकानिहाय आढावा घेतला असता असे दिसते की काही तालुक्यातील कातकरी कुटुंबांना सर्वच योजनांचा लाभ कमी अधिक प्रमाणात झाला आहे तर काही तालुक्यात काही योजनांचा लाभ शून्य टक्के असल्याचे दिसते. यातून अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांच्या विकासात प्रादेशिक असंतूलन आढळून आले आहे.

अभ्यास क्षेत्रातील सर्वच तालुके पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागातील सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगांमध्ये वसलेले आहेत. त्या सर्वच तालुक्यात कातकरी वस्तीचे केंद्रीकरण दिसते. खेड, आंबेगांव व जुन्नर तालुक्यात आदिवासी विकासासाठी

आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून शासनाने घोषित केलेले आहे. त्या क्षेत्राता राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ कातकरी कुटुंबांना मिळाला आहे. भोर, वेल्हे, मावळ, मुळशी व हवेली या पाच तालुक्यातील कातकरी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ कमी मिळाला आहे. कारण त्या तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र शासनाने घोषित केलेले नाही.

गॅस वाटप योजना, केंद्रवर्ती बजेट योजना, खावटी कर्ज योजना, एकाधिकार खरेदी योजना,इ. योजनांचा लाभ खेड, आंबेगांव व जुन्नर तालुक्यातील कातकरी कुटुंबांना मिळाला आहे. कारण या योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रापुरत्या मर्यादित आहेत. या क्षेत्रातील कातकरी कुटुंबांना या योजनांच्या मिळालेल्या लाभाचा आढावा घेतला असता असे दिसून आले की गॅस वाटप योजनेचा ५१% कुटुंबांना लाभ मिळाला व ४९% कुटुंबांना लाभ मिळाला नाही. केंद्रवर्ती बजेट योजनेचा केवळ ७% कातकरी कुटुंबांना लाभ मिळाला व ९३% कुटुंबे या योजनेच्या लाभापासून वंचित राहिली आहेत. खावटी कर्ज योजनेच्या केवळ ४% कुटुंबांना लाभ मिळाला व ९६% कुटुंबांना लाभ मिळाला नाही. एकाधिकार खरेदी योजनेच्या लाभापासून ९२% कुटुंबे दुर्लक्षित राहिली आहेत याचा अर्थ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी विकास योजनांचा कातकरी कुटुंबांना कमी लाभ मिळाला आहे. कारण दारिद्र्य रेषेच्या यादीत नाव नसणे, रेशन कार्ड नसणे, जातीचा दाखला नसणे, कागदपत्राची पूर्तता न करणे आणि ठाकर आणि महादेव कोळी या जामीतींनी त्याचा जास्तीत जास्त लाभ घेणे इत्यादी कारणे कारणीभूत ठरली असल्याचे दिसते.

इंदिरा आवास योजना आणि अंत्योदय अन्न योजना या योजना अभ्यास क्षेत्रातील सर्वच तालुक्यात राबविल्या गेलेल्या दिसून आल्या. अंत्योदय अन्न योजनेचा सर्वाधिक लाभ जुन्नर व आंबेगाव प्रत्येकी १०% झाला असल्याचे दिसते. मावळ तालुक्यातील ७% कातकरी कुटुंबांना, खेड, मुळशी, भोर तालुक्यातील प्रत्येकी ६% कुटुंबांना लाभ झाला आहे तर सर्वात कमी लाभ वेल्हे व हवेली तालुक्यात अनुक्रमे ५% व ३% झाल्याचा दिसतो.

तर ४७% कुटुंबे या लाभापासून वंचित राहिली आहेत. तर इंदिरा आवास योजनेचा ४७% कुटुंबांना लाभ झाला आहे व ५३% कुटुंबे या योजनेच्या लाभापासून दुर्लक्षित राहिली आहेत. आंबेगाव, मावळ तालुक्यात प्रति ८% लाभ मिळाला आहे. खेड – १%, मुळशी – ६%, वेल्हे – ६%, जुन्नर – ३% आणि हवेली – १% असे वितरण दिसते. आदिवासी क्षेत्रात २०% कुटुंबांना लाभ झाला तर आदिवासी क्षेत्राबाहेर तालुक्यात २८% कुटुंबांना इंदिरा आवास योजनेचा लाभ झाला आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, अभ्यास क्षेत्रातील आदिवासी क्षेत्र व त्या बाहेरील क्षेत्र यात कातकरी कुटुंबांना कमी अधिक प्रमाणात लाभ झाला आहे. परंतू या लाभाचा कातकरी जमातीच्या सामाजिक–आर्थिक स्थिती सुधारण्यास फारसा उपयोग झाला नाही. आदिवासी क्षेत्राबाहेरील कातकरी कुटुंबे शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहिलीआहेत.

७९% कातकरी कुटुंबांपर्यंत शासकीय योजनेचे लाभ पोहचले आहेत. परंतू २१% कुटुंबे या लाभांपासून दूर राहिली आहेत. सततचे स्थलांतर, कागदपत्रांची पूर्तता न करणे, रेशनिंग कार्ड नसणे, दारिद्र्यरेषेखाली नाव नसणे इ. कारणे कारणीभूत ठरली आहेत.

## ५.१५ आदिवासी सहकारी संस्था :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी आदिवासी सहकारी संस्था आणि त्यांचे सभासद यासंबंधीची माहिती आजमावली असता कातकरी समाजाच्या एकूण ४ आदिवासी सहकारी संस्था दिसून आल्या. एकूण कातकरी कुटुंबापैकी ९% कुटुंबे आदिवासी सहकारी संस्थांचे सभासद असल्याचे दिसून आले. बिगर शासकीय सेवाभावी संस्थांनी कातकरी कार्यकर्त्यांच्या मदतीने आदिवासी सहकारी स्थापन करण्यास महत्वाचे योगदान दिले आहे आणि कातकरी लोकांना विकासाचा मार्ग मोकळा केला आहे. आंबेगाव तालुक्यात पिंपळगाव घोडे येथे आदिवासी सहकारी संस्था, घोडेगाव येथे कातकरी श्रमीक सहकारी संस्था, खेड तालुक्यात बीबी बुरशेवाडीत आदिवासी सहकारी

मच्छिमार संस्था, वाडा येथे शरद मच्छिमार सहकारी संस्था अशा एकूण चार आदिवासी सहकारी संस्था दिसून आल्या. या सर्व सहकारी संस्था कातकरी लोकांच्या नावावर स्थापन झाल्याच्या नोंदी आढळून आल्या.

परंतू प्रत्यक्षात कातकरी आदिवासी सहकारी संस्थावर स्थानिक बिगर आदिवासी सहकारी संस्थांचे वर्चस्व दिसून आले. केवळ नावापुरता कातकरी लोकांचा वापर केला जातो आणि त्याचा फायदा बिगर आदिवासी लोक घेत आहेत. कातकरी मच्छीमार संस्था असून देखील त्यांना मासेमारीचे कंत्राट मिळत नाही. बाहेरील बिगर आदिवासी लोकांना कंत्राट दिले जात असल्याचे आढळून आले.

आदिवासी सहकारी संस्थांच्या कातकरी समाजाच्या विकासासाठी फारसा फायदा झालेला नाही. आदिवासी सहकारी संस्थांवर बिगर आदिवासी लोकांचे वर्चस्व असल्याचे दिसते, कातकरी लोकांच्या नावावर बिगर आदिवासी या संस्थांचा फायदा घेत आहेत.

कातकरी लोकांमधील शोषित वृत्ती, त्यांच्यातील असंघटन, अज्ञान आणि निरक्षरता, न्यूनगंड आणि आपण समाजाचे आश्रित आहेत, इत्यादी कारणांमुळे आदिवासी सहकारी संस्थांचा लाभ कातकरी लोकांना घेता आला नाही व त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली नाही असा निष्कर्ष निघतो.

## ५.१६ श्रमाचा मोबदला :

कातकरी आदिमांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करीत असताना त्यांना मिळणाऱ्या श्रमाच्या मोबदल्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे. मोबदल्याचे स्वरुप, मोबदल्याचे प्रमाण आणि मोबदला निश्चिती या बाबींना महत्व असते. त्याशिवाय त्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास पूर्ण होत नाही.

१. **मोबदल्याचे स्वरुप :**

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या मोबदल्याचे स्वरूप यासंबंधीची आकडेवारी गोळा केली असता असे दिसून आले की, रोख पैसे, धान्य, जेवण आणि दारु या चार स्वरुपात मोबदला मिळतो. १००% कुटुंबाना मोबदला रोख स्वरुपात मिळतो. त्याबरोबर १०% कुटुंबांना धान्याच्या स्वरुपात, ४५% कुटुंबांना जेवणाच्या स्वरुपात, ४५% कुटुंबांना दारु देखील मिळते.

**तक्ता ५.४१ : श्रमाच्या मोबदल्याचे स्वरूप**

| धान्य | जेवण | दारू | एकूण |
|---|---|---|---|
| १०% | ४५% | ४५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, रोख पैशाबरोबर जेव्हा जेवण आणि दारु दिली जाते, तेव्हा निश्चित पैशातील मोबदला कमी केला जातो. दोन वेळचे जेवण देण्यामागे त्या कुटुंबांनी जास्त वेळ काम करावे हा उद्देश असतो. म्हणजे सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत राबवून घेण्यासाठी जेवणाचा मोबदला दिला जातो. भातलावणीच्या वेळी चिखलात धो–धो पावसात कातकरी कुटुंबाने न थकता जास्त काम करावे म्हणून स्त्री–पुरुष दोघांनाही दारु दिली जाते. यामुळे रोख मोबदला कमी देऊन आर्थिक पिळवणूक होते.हातभट्टी, खोपडी किंवा फ्रेंच पॉलीश सारखी विषारी द्रव्य मिसळलेल्या दारुमुळे कातकरी लोकांचे आरोग्य धोक्यात येते. म्हणजेच शारीरिक व आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा निष्कर्ष निघतो.

दारू म्हणजे सर्व काही. दारूच्या व्यसनाधिनतेमुळे मिळेल तो मोबदला कातकरी लोक स्विकारतात. हे मोबदले म्हणजे कातकरी कुटुंबाच्या हतबलतेचा, कमकुवतपणाचा, असहाय्यतेचा घेतलेला गैरफायदा आहे. दारू व जेवणामुळे कातकरी कुटुंब खूष होते आणि जास्त काम करणे. म्हणून मोबदल्याची ही पद्धती निर्माण झाली आहे. जो शेतकरी जेवण व दारू देत नाही त्याच्याकडे कोणीही कामाला जात नाही. म्हणजे ही मोबदल्याची पद्धती रूढ करण्याला हा समाज कारणीभूत आहे.

२. **मोबदला निश्चिती :**

अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबांना मिळणाऱ्या मोबदल्याचा दर निश्चिती या संबंधीची माहिती विश्लेषित केली असता असे आढळून आले की,


एकूण कुटुंबांपैकी ८०% कुटुंबाच्या कामाचा मोबदला मालक निश्चित करतो. १५% कुटुंबे मजूरीचा दर ठरवून घेतात तर ५% कुटुंबाच्या श्रमाचा मोबदला चालू दरानुसार दिला व घेतला जातो.

**तक्ता ५.४२ : मोबदला निश्चिती**

| **मालक** | **मजूर** | **चालू दरानुसार** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ८०% | १५% | ५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२६ : मोबदला निश्चिती**




यावरुन २०% कुटुंबांना कामाचा मोबदला निश्चितीत कातकरी कुटुंबाचा सहभाग दिसतो. ८०% कुटुंबांना कामाचा मोबदला मात्र कमी दिला जातो आणि मोबदला निश्चितीत कुटुंबांना सहभागी करुन घेतले जात नाही. कातकरी कुटुंबे मिळेल तेवढा मोबदला स्विकारतात. मालक कमी मोबदला देतो आणि जास्त काम करुन घेतो म्हणजेच त्यांची आर्थिक पिळवणूक करतो.

याचे कारण म्हणजे निरक्षरता, अज्ञान, हतबलता, व्यसनाधिनता होय. यामध्ये कमी मोबदला देऊन त्यांचे शोषण केले जाते. या लोकांचा रोजगार हंगामी असल्यामुळे बेकारी काळात मालक लोक कमी मोबदल्यावर त्यांच्याकडून काम करून घेतात. तसेच अडचणीच्या काळात उचल म्हणून काही पैसे देतात त्यामुळे कातकरी लोकांना मोबदला ठरविणे शक्य नाही, ही वास्तवता पुढे आली आहे.

### ३. मजूरीचे दर :

अभ्यास क्षेत्रात कातकरी स्त्री–पुरूषाला मिळणाऱ्या मजूरी दरासंबंधी माहिती आजमावली असता असे आढळून आले की, स्त्री पुरुषाला मिळणाऱ्या मजूरी दरात फरक आहे. त्यात स्त्रीला कमी मजूरी दिली जाते व पुरुषाला जास्त मजूरी दिली जाते. तसेच मजूरीचे दर पावसाळ्यात वेगळे आणि हिवाळा उन्हाळा या हंगामात वेगळे दर दिले जात असल्याचे आढळून आले.

पावसाळ्यात शेतीत शेतमजूर म्हणून काम करताना स्त्रीला ३०–४० रुपये दरम्यान मजूरी दिली जाते तर पुरूषाला ५०–६० रूपये दिले जातात. हिवाळा आणि उन्हाळा या हंगामात स्त्रीला ४०–५० रूपये मजूरी असते. तर पुरूषाला ६०–७० रूपये मजूरी मिळते.

**तक्ता ५.४३ : शेतमजूरीचे दर (रू)**

| पावसाळा | | हिवाळा व उन्हाळा | |
|---|---|---|---|
| पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| ५०–६० | ३०–४० | ६०–७० | ४०–५० |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरून असे दिसते की पुरुषाला जास्त मजूरी व स्त्रीला कमी मजूरी असा फरक केला जातो याचा अर्थ स्त्रीचे श्रम कमी मूल्याचे आणि पुरुषाचे श्रम जास्त मूल्याचे असे मानले जात असल्याचे दिसते.

तसेच मजूरी दरात पावसाळ्यात व हिवाळ्यात उन्हाळ्यात तफावत दिसते पावसाळ्यात कातकरी कुटुंबे आर्थिक अडचणीत असतात. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न असतो. त्यांच्यापुढे कोणताही पर्याय नसतो. मिळेल ते काम ते स्विकारतात. म्हणून पावसाळ्यात कमी मोबदला दिसतो. दुसरे कारण म्हणजे भातशेतीत शेतमजूरी करीत असताना कातकरी कुटुंबाला दोन वेळचे जेवण आणि दारू दिली जाते. त्यामुळेही पैशातील मजूरी कमी दिली जात असल्याचे दिसते.

हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात मजूरीचे दर जास्त दिसण्योच कारण म्हणजे कातकरी कुटुंबाना या काळात रोजगाराचे अनेक पर्याय उपलब्ध असतात. म्हणजे ते स्थानिक पातळीवर काम करू शकतात किंवा कोळसा पाडणे व विटा बनविणे या कामासाठी स्थलांतरीत होऊ शकतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर शेतमजूर कमी असतात. तेंव्हा शेतकरी जास्त मजूरी देऊन त्यांना कामावर बोलवतात.

तसेच विटा बनविण्यासाठीचा मजूरीदराची माहिती पाहिली असता जसजसे दुर्गम भागात जावे तसतसा विटा बनविण्याचा दर कमी कमी होत गेल्याचे आढळून आले आहे. १२५ ते रु. २५० रुपये दरहजारी विटा बनविण्याचे दर आढळून आले त्यात डोंगरी व दुर्गम भागात १२५–१५० रुपये दर आढळून आला. तर रस्त्यालगत असणाऱ्या विट भट्टयावर २०० ते २५० रुपये दरम्यान दर होता.

**तक्ता ५.४४ : विटा बनविण्याचे दर (दर हजारी)**

| दुर्गम भाग | रस्त्यालगत |
|---|---|
| १२५–१५० रू. | २००–२५० रू. |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरुन एक हजार विटा बनविण्यासाठी दिली जाणारी मजूरी मुळात कमी आहे. त्यातही जसजसे दुर्गम भागात जावे तसतसा हा दर कमी होत गेला आहे यामध्ये त्यांच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांची पिळवणूक केल्याचे दिसते.

कांही ठिकाणी तर किती दराने मालकाने शेवटी हिशोब काढला तो दर ही माहित नसतो या व्यवसायातही कातकरी कुटुंबाचे आर्थिक पोषण होते. असा निष्कर्ष निघतो.

कोळसा पाडण्याचा व्यवसायात दर पोत्याला २०० रुपये असा दर दिला जातो. १०–१५ दिवस लाकडे तोडल्यानंतर लाकडाची भट्टी लावली जाते. आठवडाभर देखरेख ठेवून कोळसा तयार केला जातो. यात कातकरी कुटुंब रात्रंदिवस जंगलात राबते जर कोळसा पडला नाही. तर मजूरी दिली जात नाही. लाकूड तोडण्यापासून ते भट्टी लावण्यापर्यंतचे १०–१५ दिवसांचे श्रम वाया जाते. त्यातही कोळशाच्या मापात फसवणूक केली जाते.

कातकरी कुटुंबांना जो मजूरी दर कमी दिला जातो. त्यात त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचे स्पष्ट होते.

## ५.१७ रोजगार उपलब्धततेचा कालखंड :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात वर्षभरातील रोजगार उपलब्धता यासंबंधी तथ्य संकलीत केली असता असे आढळून आले की,

**तक्ता ५.४५ : वर्षभरातील रोजगार उपलब्धतेचा कालावधी**

| ६–७ महिने | ८–९ महिने | १०–१२ महिने | एकूण |
|---|---|---|---|
| २४% | ५३% | २३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

वर्षभरातील ६–७ महिने रोजगार मिळणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २४% आहे. ८–९ महिने रोजगार मिळणारी ५३% कुटुंबे, १० ते १२ महिने रोजगार मिळणारी २३% कुटुंबे आहेत. यावरून ८ ते ९ महिने रोजगार मिळणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कारण ही कुटुंबे कामासाठी ५–६ महिने स्थलांतरीत होतात आणि पावसाळ्यात एक ते दोन महिने गावात काम करतात.

६–७ महिने रोजगार मिळणारी कुटुंबे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. ही कुटुंबे स्थलांतरीत न होणारी आहेत. डोंगरी व दुर्गम भागात राहणाऱ्या या कुटुंबांना ६–७ महिने स्थानिक पातळीवर जो रोजगार मिळतो तो ते करतात. त्यांच्यापुढे दुसरा कोणताही पर्याय नसतो. या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट असते. रोजगार मिळतो तो पर्यंत

गरजा भागतात. रोजगार संपतो तेव्हा उपासमार व हालाखीचे जीवन जगावे लागते ही वास्तवता आढळून आली. ८ ते ९ व ६ ते ७ महिने रोजगार मिळणारी कुटूंबे वेल्हे, भोर, हवेली, मावळ, मुळशी या तालुक्यातील आहेत.

१० महिने ते वर्षभर रोजगार मिळणारे कुटुंबे तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बागायती क्षेत्र असणाऱ्या भागात राहणाऱ्या कातकरी कुटुंबाचा यात समावेश होतो. ही कुटुंबे स्थलांतरीत होत नाहीत. साधारणपणे खेड, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यात कांही प्रमाणात ओलीताखाली क्षेत्र अधिक आहे. त्यामुळे वर्षभर शेती लागवडी खाली रहाते. या कुटुंबाची आर्थिक स्थिती इतरांच्या तुलनेने चांगली असल्याचे आढळून आले.

८-९ व ६-७ महिने रोजगार मिळणाऱ्या कुटुंबाची आर्थिक स्थिती कमकुवत दिसून आली. मिळणारा रोजगार आणि उपभोग खर्च पाहता उत्पन्न कमी पडते आणि हालाखीचे जीवन जगावे लागते.

वर्षभर ज्या कुटुंबांना रोजगार मिळतो ती कुटुंबाच्या किमान जीवनाश्यक गरजा पूर्ण होतात. परंतु प्रचंड व्यसनाधिनता आणि खर्चाच्या नियोजना अभावी मिळणारे उत्पन्न कमी पडून आर्थिक परिस्थिती खालावण्यावर परिणाम झाल्याचे दिसते.

## ५.१८ कामासाठी स्थलांतर :

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबाची रोजगारासाठी स्थलांतरीत होण्याची स्थिती विचारात घेतली असता असे दिसून आले की एकूण कुटुंबापैकी ५५% कुटुंबे स्थलांतरीत होतात आणि ४५% कुटुंबे स्थलांतरीत होत नाहीत.

**तक्ता ५.४६ : रोजगारासाठी स्थलांतर**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| ५५% | ४५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर - नोव्हेंबर, २००९.

यावरुन स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधित आहे. विटा बनविणे, कोळसा पाडणे, वाळू उपसणे इत्यादी कामासाठी ही कुटुंबे स्थलांतरीत होतात. स्थलांतरीत

होणाऱ्या एकूण कुटुंबापैकी ५१% कुटुंबे आपआपल्या तालुक्यातच स्थलांतरीत होतात. १६% कुटुंबे इतर तालुक्यात तर ३३% कुटुंबे जिल्हयाबाहेर स्थलांतरीत होतात. स्वतःच्या तालुक्यात आणि इतर तालुक्यात स्थलांतरित होणारी कुटुंबे विटा बनविण्याच्या कामासाठी स्थलांतरीत होतात तर कोळसा पाडण्याच्या कामासाठी ही कुटुंबे जिल्ह्याबाहेर स्थलांतरीत होतात.

**तक्ता ५.४७ : स्थलांतराचे ठिकाण**

| तालुक्यात | जिल्ह्यात | जिल्ह्याबाहेर | एकूण |
|---|---|---|---|
| ५१% | १६% | ३३% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.


पावसाळ्यात फार कमी कुटुंबे स्थलांतरीत होता. तीसुध्दा केवळ शेतीकामासाठीच स्थलांतरीत होतात. हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे. स्थलांतरीत होणाऱ्यापैकी हिवाळ्यात २ महिन्यांसाठी २३% कुटुंबे तर ३ महिन्यासाठी ७७% कुटुंबे स्थलांतरीत होतात. यावरुन ३ महिन्यासाठी जाणारी सर्वाधिक कुटुंबे आहेत. कारण लावणी, कापणी, मळणी नंतर शेतीत रोजगार उपलब्ध नसतो. तेंव्हा हिवाळ्यातील तीन महिन्यासाठी जाणारी कुटूंब संख्या त्यामुळे जास्त असल्याचा निष्कर्ष निघतो.

**तक्ता ५.४८ : कुटुंबाच्या स्थलांतराचा कालखंड**

| महिने | हिवाळा | उन्हाळा |
|---|---|---|
| २ | २३% | १६% |
| ३ | ७७% | ८४% |
| **एकूण** | १००% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२७ : कुटुंबाच्या स्थलांतराचा कालखंड**




उन्हाळ्यात २ महिन्यासाठी स्थलांतरीत होणारी १६% कुटुंबे आढळून आली. तर ३ महिन्यांसाठी स्थलांतरीत होणारी ८४% कुटूंबे दिसून आली.

यावरुन उन्हाळ्यातील ३ महिन्याचे स्थलांतर प्रमाण अधिक दिसते. कारण स्थानिक पातळीवर भातलावणी किंवा नांगरणी पेरणी पर्यंत शेतीत कामे नसतात. त्यामुळे ते प्रमाण अधिक असल्याचा निष्कर्ष निघतो. रोजगारासाठी भटकंती ही अवस्था कातकरी जीवन अस्थिर बनविणारी आहे.

स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध्स नसणे, बेकारी काळातील आर्थिक अडचणी दूर करणेआणि उपासमार टाळणे ''काम तेथे गाव'' ही मानसिकता तयार होणे, स्थानिक पातळीवर कोणतीही स्थावर मालमत्ता नसणे त्या गावाविषयीची आत्मियता न वाटणे, स्थानिक पातळीवर अडचणीचेवेळी कोणीही आधार न देणे, गरीब, दरिद्री म्हणून हिणविणे तसेच स्थलांतरामुळे रोजगार मिळणे, गरजेच्या व अडचणीच्यावेळी एकरकमी पैसा मिळणे, या कारणामुळे स्थलांतर होण्याचे प्रमाण आढळून येते.

साधारण दिवाळीनंतर ही कुटुंबे स्थलांतरीत होतात. आणि मे महिन्याच्या शेवटी आपल्या गांवी परत येतात.

स्थलांतरामुळे कातकरी कुटुंबांना रोजगार मिळत असला तरी त्यांच्या आर्थिक स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसत नाही कारण ठेकेदाराने उचल म्हणून दिलेली रक्कम कामाला जाण्याअगोदर खर्चून गेलेली असते. परत येताना थोडीफार रक्कम

मिळते. त्यामुळे स्थलांतराचा काळ तेवढा चांगला असतो. त्यानंतर पुन्हा हलाखीचे जीवन जगावे लागते ही वास्तवता आढळून आली.

## ५.१९ राहणीमान पातळी :

व्यक्तीची राहणीमान पातळीवरून व्यक्तीचा सामाजिक आर्थिक विकास स्पष्ट होतो. राहणीमान पातळी घरातील विविध वस्तूवरूनही निश्चित होते. म्हणून नमूना अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या घरातील विविध वस्तू या संबंधीची तथ्य संकलीत केली असता असे आढळून आले की,


६% कुटुंबाकडे दूरसंचार सेट, ४% घरात रेडिओ, २०% घरात गॅस युनिट, २% कुटुंबाकडे टेपरेकॉर्डर, ३% कुटुंबाकडे फोन अशा विविध वस्तू आढळून आल्या. तर ६५% कुटुंबाकडे कोणत्याही वस्तू असल्याचे दिसून आले नाही.

**तक्ता ५.४९ : घरातील वस्तू**

| टिव्ही | रेडिओ | गॅस शेगडी | टेपरेकॉर्डर | फोन | काही नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ६% | ४% | २०% | २% | ३% | ६७% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.२८ : घरातील वस्तू**



यावरुन ३३% कुटुंबाकडे मनोरंजन व सुखवस्तू असल्याचे दिसून आले. तर सर्वाधिक म्हणजे ६७% कुटुंबाकडे कोणत्याही वस्तू असल्याचे दिसत नाही कारण ज्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होऊ शकत नाही. त्यांच्याकडून मनोरंजन आणि सुखवस्तू खरेदी होणे शक्य नाही. अतिशय प्राथमिक अवस्थेत जीवन जगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

मनोरंजन व सुखवस्तू असणारी कुटुंबे ही आदिवासी उपयोजना क्षेत्रातील असल्याचे आढळले. खेड, जुन्नर, आंबेगाव या तीन तालुक्यातील कुटुंबाची आर्थिक स्थिती तुलनेने चांगली असल्यामुळे राहणीमान पातळी चांगली दिसून आली.

परंतू मावळ मुळशी भोर, वेल्हे, हवेली या तालुक्यातील कातकरी कुटुंबाकडे जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या मुलभूत वस्तू देखील नाहीत. त्यामुळे एकूण राहणीमान पातळी निकृष्ट असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे हे सिध्द होते.

## ५.२० मुलभूत सेवा सुविधांची उपलब्धता :

### १. निवास व्यवस्था :

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजांपैकी निवारा ही गरज महत्वाची मानली जाते. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या निवाऱ्याची मुलभूत अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या निवाऱ्याची मूलभूत सुविधा यासंबंधीची माहिती विश्लेषित केली असता असे दिसून आले की,

**तक्ता ५.५० : निवास व्यवस्था**

| लोखंडी पत्र्याचे घर | मंगलोरी कौलाचे पक्के घर | झोपडी | उघड्यावर | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४०% | ७% | ४५% | ८% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

४०% कुटुंबाकडे लोखंडी पत्र्याचे पक्के घर होते. ७% कुटुंबाकडे मंगलोरी कौलाचे पक्के घर, ४५% कुटुंबाचे झोपड्याचे घर, तर ८% कुटुंबांना स्वतःचे कोणतेही घर नव्हते म्हणजे ते उघड्यावर रहात होते असे आढळून आले.

यावरुन पक्के घर असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४७% असल्याचे दिसून आले. ही घरे इंदिरा आवास योजनेतून मिळालेली आहेत. ५३% कुटुंबाकडे व्यवस्थित घर नाही असे चित्र आढळले. वेल्हे तालुक्यातील पानशेत येथे १० कुटुंबे, मुळशीमधील पौड गावात १० कुटुंबे, लव्हार्डे गावात २० कुटुंबे तर भोर तालुक्यातील भोर शहरात १० कुटुंबे उघड्यावर रहात होती.

निम्यापेक्षा जास्त कुटुंबांची निवारा ही मूलभूत गरज पूर्ण झालेली नाही. हे चित्र पुढे येते.

घरकुले मिळालेल्या कुटुंबाचे प्रमाण जुन्नर, खेड, आंबेगाव तालुक्यात अधिक आहेत कारण तेथील कातकरी कुटुंबाच्या रितसर नोंदी आहेत. त्यामुळे त्यांना घरकुले मिळाली आहेत. मावळ, हवेली, भोर व वेल्हे तालुक्यात घरकुले कमी प्रमाणात मिळाली असल्याचे आढळून आले. काण या तालुक्यातील कातकरी कुटुंबांच्या रितसर नोंदींच्या कागदपत्रांची पूर्तता होत नाही. रेशनकार्ड, ग्रामपंचायतीतील नोंदी, जातीचे दाखले या बाबतीत प्रशासन आणि स्थानिक पुढारी दुर्लक्ष करतात. तसेच या तालुक्यातील कातकरी कुटुंबांचे स्थलांतर अधिक असते. या कारणांमुळे मावळ, मुळशी, वेल्हे, भोर व हवेली तालुक्यातील कातकरी कुटुंबांना घरकुले मिळाली नाहीत. म्हणून निवारा ही मुलभूत सुविधा कमी आहे.

**२. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत :**

अभ्यास क्षेत्रातील कातकरी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या निरीक्षणात्मक नोंदीवरुन असे दिसून आले की, ३९% वस्त्यावर नदी व बंधारा, झरा या स्त्रोतांचे पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. ३७% वस्तीवर हातपंपाचे, ९% वस्तीवर खासगी व सार्वजनिक विहीरीचे तर केवळ १५% वस्त्यावर सार्वजनिक नळाचे पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याचे दिसून आले.

### तक्ता ५.५१ : पिण्याच्या पाण्याची सुविधा

| नदी व बंधारा / झरा | हातपंप | खासगी / सार्व. विहीर | सार्वजनिक नळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ३९% | ३७% | ९% | १५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.


४५% वस्त्यावर पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य मार्च ते जून या काळात असते, २३% वस्त्यावर एप्रिल ते जून काळात, १६% वस्त्यावर डिसेंबर ते जून या काळात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याचे आढळून आले. तर केवळ १६% वस्त्यावर पाण्याचे दुर्भिक्ष्य नव्हते.

### तक्ता ५.५२ : पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य

| डिसेंबर ते जून | मार्च ते जून | एप्रिल ते जून | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४५% | २३% | १६% | १६% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

### आलेख ५.२९ : पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य




यावरून पिण्याचे पाणी ही मूलभूत सुविधा आहे. परंतू ८५% वस्त्यावर नैसर्गिक स्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते. शुध्द स्वच्छ पाणी आजही कातकरी वस्तीवर दिसत नाही. डोंगर कपारीत राहणाऱ्या कातकरी वस्तीतील लोकांना मार्च महिन्यानंतर नैसर्गिक जलस्त्रोताचेही पाणी मिळत नाही. तेव्हा नाईलाजाने पाण्यासाठी त्यांना

स्थलांतरीत व्हावे लागते. पिण्याच्या पाण्याच्या नैसर्गिक जल स्त्रोताचे प्रमाण मोठे आहे. यावरून कातकरी जमात आजही प्राथमिक जीवन जगते आहे हे सिध्द होते. दुषित पाण्यामुळे अनेक रोगाचे साम्राज्य वस्तीत दिसते. गावापासून दूर डोंगर कपारीत ही वस्ती असते त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. त्यामुळे पिण्याची पाण्यासुविधा उपलब्ध करुन दिली जात नाही. त्याचा परिणाम कातकरी आरोग्यावर झाल्याचा दिसतो.

### ३) वीज सुविधा :

अभ्यास क्षेत्रात कातकरी घरात वीज जोड या संबंधीची माहिती मिळविली असता २५% कातकरी घरात वीज कनेक्शन घेण्यात आलेले दिसले, ७५% घरात आजही वीज नाही असे आढळून आले.

**तक्ता ५.५३ : वीज सुविधा**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| २५% | ७५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

कातकरी वस्तीवरील वीज प्रकाश सुविधा विचारात घेतली तर २१% वस्तीवर ही सुविधा उपलब्ध होती तर ७९% वस्तीवर ही सुविधा उपलब्ध नव्हती.

सर्वसाधारणपणे कातकरी वस्त्या गावकुसाबाहेर असतात. डोंगर कपारीत नदीकडेला ही वस्ती असते त्यामुळे स्वतंत्र वीजसुविधा विकसित करण्याची गरज स्थानिक लोकांना व प्रशासनाला वाटत नाही. याची खंत कातकरी लोकांना नसते, त्यांचे स्वत:चे घर नसते, बऱ्याच वेळा ते स्थलांतर करतात, त्यांची आर्थिक परिस्थिती नसते इ. कारणांमुळे देखील वीज सुविधा कमी असल्याचे दिसते.

### ४) रस्त्याची सुविधा व गावापासून कातकरी वस्तींचे अंतर :

अभ्यास क्षेत्रात मुख्य रस्त्यापासूनचे आणि गावापासूनचे कातकरी वस्तीचे अंतर विचारात घेतले असता निरिक्षणात्मक नोंदीतून असे दिसून आले की,

५७% कातकरी वस्त्या मुख्य रस्त्यापासून ५०० मीटर अंतरावर आहेत. ३३% वस्त्या ०१ कि.मी. अंतरावर आहेत. तर १०% वस्त्या २ कि.मी. अंतरावर आढळून आल्या.

**तक्ता ५.५४ : मुख्य रस्त्यापासून कातकरी वस्तीचे अंतर (कि.मी. मध्ये)**

| अंतर | ०.५ | ०१ | ०२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ५७% | ३३% | १०% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**तक्ता ५.५५ : गावापासून कातकरी वस्तीचे अंतर (कि.मी. मध्ये)**

| अंतर | ०.५ | ०१ | ०२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ३९% | ४१% | १९% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरून ९०% वस्त्या मुख्य रस्त्यापासून अर्धा ते एक कि.मी. अंतरावर आहेत असा निष्कर्ष निघाला आहे.

३९% कातकरी वस्त्या गांवापासून अर्धा कि.मी. अंतरावर आहेत. ४१% वस्त्या १ कि.मी. अंतरावर आहेत तर १९% वस्त्या २ ते ३ कि.मी. अंतरावर आढळून आल्या. म्हणजेच गांवापासून ८०% कातकरी वस्त्या अर्धा ते एक कि.मी. अंतरावर आढळून आल्या आहेत.

कातकरी वस्तीचे मुख्य रस्ता व गावापासूनचे अंतर विचार घेतले असता असा निष्कर्ष निघतो की या वस्त्या गावापासून व मुख्य रस्त्यापासून लांब अंतरावर वसलेल्या आहेत. याचे कारण म्हणजे हा समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत नाही व समाजानेही त्यांना सामावून घेतले नाही. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबे स्थलांतरित होऊन येथे स्थायिक झाली असल्यामुळे जेथे जागा मिळेत तेथे ती वसली आहेत. व्यसनाधिनता, अस्वच्छ राहणीमान, वेगळी बोलीभाषा यामुळे समाजाने त्यांना जवळ केले नाही. त्यामुळे त्यांची वस्ती गावकुसाबाहेर आहे. रस्त्याची सुविधा कातकरी कुटुंबांनी कधी मागितली नाही व त्याची गरज त्यांना वाटली नाही यामुळे ही स्थिती दिसते.

## ५. स्वच्छता गृहाची सुविधा :

अभ्यास क्षेत्रात कातकरी वस्ती वरील स्वच्छता गृहाच्या निरिक्षणात्मक नोंदीवरुन असे दिसून आले की, केवळ १५% कातकरी वस्तीवर स्वच्छतागृहाची सुविधा दिसून आली तर ८५% वस्त्यावर मात्र ही सुविधा नसल्याचे आढळले.

**तक्ता ५.५६ : स्वच्छता गृहाची सुविधा**

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| १५% | ८५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

यावरुन स्वच्छतागृहाची ही सुविधा मूलभूत आहे आणि हागणदारी मुक्तीची योजना राबविल्या जात असताना स्वच्छतागृहासाठी या योजनेच्या अनुदानाचा लाभ कातकरी लोकांना मिळालेला नाही हे सिध्द होते.

स्वच्छता गृहामध्ये शौचास जाण्यास लाज वाटणे, म्हणून त्याची गरज न वाटजे, कुटूंबाचे सततचे स्थलांतर, योजनेच्या माहितीचा अभाव, कागदपत्रांच्या पूर्तीचा अभाव आणि प्रशासन आणि स्थानिक समाजव्यवस्थेने याकडे जाणीवपूर्वक केलेले दूर्लक्ष इ. कारणे या योजनेचा लाभ कमी मिळण्याला कारणीभूत ठरतात.

## ६. स्मशानभूमि :

अभ्यास क्षेत्रात कातकरी समाजाची स्वतंत्र स्मशान भूमि यासंबंधीच्या निरिक्षणात्मक नोंदीवरून असे दिसून आले की, १००% गांवात कातकरी समाजाची स्मशानभूमी नव्हती.

सर्वसाधारणपणे ग्रामीण भागात प्रत्येक समाजाची स्वतंत्र स्मशानभूमी असते आणि ग्रामीण भागात दुसऱ्या समाजाच्या स्मशानभूमित अंत्यविधी करणे वर्ज्य मानले जाते. एखाद्या कातकरी व्यक्तीचा मृत्यु झाला तर त्याचा अंत्यविधी कोठे करावा हा यक्षप्रश्न त्या लोकांसमोर उभा रहातो. गावच्या सार्वजनिक स्मशानभूमित कातकरी

व्यक्तीला मान्यता नाही. शेवटी नदी, ओढा, नाला यांच्याकडेला हा विधी उरकावा लागतो ही वास्तवता दिसून आली.

जीवंत असताना कातकरी व्यक्तीला माणूसपण नाही आणि मृत्यूनंतरही त्याला माणूसपण नाही. मृतदेहाचा माणूस म्हणूनही विचार केला जात नाही. एखाद्या पशुप्रमाणे समाजात कातकऱ्याला स्थान आहे. यासारख्या घटनांमधून हा समाज आगतिक बनत गेला आहे हे सिध्द होते.

## ५.२१ व्यसनाधिनतेचा आर्थिक स्थितीवरील परिणाम :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील व्यसनाधिनतेसंबंधी तथ्य संकलीत केली असता ९१% कातकरी कुटुंबांना दारु पिण्याचे व तंबाखूचे व्यसन आहे. फक्त ९% कुटुंबे निर्व्यसनी असल्याचे आढळून आले.


प्रतिदिनी व्यसनावरील खर्च विचारात घेतला असता ६९% कुटुंबे १५–२० रुपये प्रतिदिनी व्यसनावर खर्च करतात. १९% कुटुंबे २१–३० रुपये, १०% कुटुंबे ३१ ते ४० रुपये, तर २% कुटुंबे ४१–५० रुपये प्रतिदिनी व्यसनावर खर्च करतात.

**तक्ता ५.५७ : प्रतिदिनी व्यसनावरील खर्च (खर्च रूपयात)**

| खर्च | १५–२० | २१–३० | ३१–४० | ४१–५० | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कुटुंबे | ६९% | १९% | १०% | २% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.३० : प्रतिदिनी व्यसनावरील खर्च**




तसेच कातकरी कुटुंबात व्यसनावर खर्च देखील जास्त केला जातो. जवळ जवळ ३०–५०% उत्पन्नाचा भाग व्यसनावर खर्च होत असल्याचे दिसून आले.

आपल्या गरीबीचा, दुबळेपणाचा, आर्थिक सामाजिक आगतिकतेचा, नैराश्येचा, सामना करण्यासाठी कातकऱ्यांनी दारुचा आश्रय घेतला असल्याचे स्पष्ट झाले. ''दारुमुळे आर्थिक अडचण व आर्थिक अडचणींमुळे दारु'' या दुष्ट चक्रात ही जमात अडकली आहे.

कातकऱ्यांमधील दारुचे व्यसन यासंबंधी अभ्यास केला तरी त्यांच्या सामाजिक आर्थिक जीवनाचा अभ्यास केल्या सारखे होईल. त्यांच्यातील दारुचे व्यसन हे त्यांच्या दारिद्र्याचे त्यांना सोसाव्या लागणाऱ्या शोषणाचे सामाजिक अगतिकतेचे आणि नैराश्याचे प्रतिक आहे. या समाजाची सामाजिक आर्थिक प्रगती खुंटण्यामागे दारूचे व्यसन कारणीभुत आहे.

कातकरी समाजातील व्यसनाधिनतेची मुळे खोलवर पोचली आहेत आणि व्यसनाधिनमुळे ही जमात दारिद्र्याच्या दुष्ट चक्रात अडकली आहे. व्यसनाधिनतेमुळे दारिद्र्याचे दुष्टचक्र तयार होतात.

जेव्हा व्यसनाधिनता वाढते तेंव्हा उत्पन्नाचा मोठा भाग व्यसनावर खर्च होतो. म्हणून बचत होत नाही त्यामुळे आर्थिक स्थिती मागासलेली रहाते. व्यसनाधिनतेवरील खर्च वाढल्यामुळे उत्पन्नाचा कमी हिस्सा उपभोगासाठी शिल्लक राहतो. त्यामुळे उपभोग घटतो. म्हणून काम करण्याची कार्यक्षमता घटते. त्याचा परिणाम श्रमाची उत्पादकता घटण्यावर होतो. म्हणून मोबदला कमी मिळतो. आणि  उत्पन्न पातळी घटून आर्थिक मागासलेपण येते म्हणून पुन्हा व्यसनाधीनता असे चक्र चालू राहते. जेंव्हा व्यसनाधिनता वाढते तेंव्हा निकृष्ट दर्जाच्या दारुमुळे आरोग्य धोक्यात येते. एकीकडे वैद्यकीय खर्च वाढतो आणि आर्थिक स्थिती ढासळते. दुसरीकडे आरोग्य खालावल्यामुळे तेव्हा काम करण्याची क्षमता घटते. शारिरीक तक्रारी वाढतात. ते विसरण्यासाठी पुन्हा दारु घ्यावी लागते त्यातून व्यसनाधिनता वाढून आर्थिक स्थिती कोसळते. व्यसनाधिनता वाढते तेंव्हा कुटूंबे दारुच्या आहारी जातात. ती कुटुंबे केवळ दारुसाठी जगतात. दारुसाठी मिळेल तो मोबदला पडेल ते काम करतात. त्यातून आर्थिक उत्पन्न कमी होऊन मागासलेपण वाढत जाते. आर्थिक अडचणीचा ताणतणाव घालविण्यासाठी पुन्हा दारु असे दारिद्रयाचे दुष्टचक्र तयार होते आणि मागासलेपण कायम रहाते. ही वास्तवता अभ्यास क्षेत्रात आढळून आली आहे.

## ५.२२ गांव कारभारातील कातकरी लोकांचा सहभाग :

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाचा गांवच्या कारभारात सहभाग यासंबंधीची तथ्य संकलीत केली असता गांव कारभारात मात्र केवळ ७% कुटुंबांना सहभागी करुन घेतले गेले होते. ८% कुटुंबांना निवडणूकीत उमेदवारी दिली असल्याचे दिसून आले.

अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबाच्या गांवकारभारात एक सरपंच, एक उपसरपंच तर एक ग्रामपंचायत सदस्य आढळून आला. या पलिकडे कातकरी लोकांना गावकारभारात कोणतेही स्थान नाही. जे सरपंच व उपसरपंच होते त्यांना कोणतेही


अधिकार दिलेले नव्हते बिगर आदिवासी सर्व कारभार पहात होते. केवळ नावापुरते त्याचे पद होते असे आढळून आले.

**तक्ता ५.५८ : गाव कारभारातील लोकांचा सहभाग**

| गाव कारभारातील सहभाग | निवडणुकीत उमेदवारी | सहभाग नसलेले | एकूण |
|---|---|---|---|
| ७% | ८% | ८५% | १००% |

**आधार :** क्षेत्रीय पाहणी ऑक्टोबर – नोव्हेंबर, २००९.

**आलेख ५.३१ : गाव कारभारातील लोकांचा सहभाग**




यावरुन कातकरी लोकांना स्थानिक पातळीवर गांव कारभारात कोणतेही स्थान दिले जात नाही. ज्या ठिकाणी सहभागी करुन घेतले ते केवळ नावापुरते होते असा निष्कर्ष निघतो.

स्थानिक पातळीवर कातकरी लोकांकडे पाहण्याचा एक पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन आहे. गरीब, दरिद्री, अस्वच्छ, मागासलेली, हतबल, व्यसनाधिनतेत बुडालेली जमात या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे गांव कारभारात या लोकांकडे दुर्लक्ष होते. आपल्या गांवचा एक ग्रामस्थ, एक नागरिक म्हणून त्याकडे पाहिले जात नाही. जेंव्हा निवडणुकीत राखीव जागा असते तेंव्हा नाईलाजाने त्यांना उमेदवारी दिली जाते. निवडून आल्यानंतर त्यांचे अधिकार बिगर आदिवासी लोक वापरतात. निवडून आलेले आदिवासी नावापुरतेच रहात असल्याचे चित्र आढळून आले.

## ५.२३ पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या समस्या :

या संशोधनाच्या अंतिम निष्कर्षावरुन पुणे जिल्ह्यातील कातकरी जमात ही रायगडमधून स्थलांतरीत झालेली आहे. ती अनेक पिढ्यापासून येते रहाते हे ही सिध्द झाले आहे. स्थलांतरीत जमात म्हणून कातकरी कुटूंबाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. हे प्रश्न त्यांच्या सामाजिक आर्थिक विकासात अडथळे ठरत आहेत. म्हणून त्या प्रश्नाची उकल करणे व त्यांची मांडणी करणे आवश्यक आहे.

### १. घराच्या जागेची समस्या :

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबाच्या घराच्या जागेची समस्या उद्‌भवली आहे. या समस्येचा सर्व बाजूने आढावा घेतला असता असे दिसून आले की, ४७% कुटुंबाचे स्वतःचे मालकीचे घर आहे परंतु ५३% कुटुंबाची राहत्या घराची जागा स्वतःच्या मालकीची नाही.

कातकरी कुटुंबे अनेक पिढ्यांपासून राहत्या घराच्या जागेवर रहात आहेत. त्या जागांचा मालकी हक्क बिगर आदिवासी लोक, पाटबंधारे विभाग, वनविभाग यांच्याकडे आहेत. शासकिय दप्तरात त्या जागा कातकरी कुटुंबाच्या नांवावर नाहीत. मात्र त्या जागांवर राहणाऱ्या कुटुंबाच्या रहिवाशी म्हणून नोंदी आहेत. त्यांना रेशनकार्डस् आहेत. मतदार यादीत नाव आहे. अनेक पिढ्यांपासून ते तेथे राहात आहेत. आता पर्यंत राहत्या घराच्या जागेचा प्रश्न कोणीही उपस्थित केला नव्हता. परंतु त्या जागांवर इंदिरा आवास योजनेतून घरकुल बांधण्यासाठी जेंव्हा अनुदान मंजूर झाले तेंव्हा बिगर आदिवासींनी हा प्रश्न निर्माण केला आहे. याचा अर्थ असा की, घरकुल अनुदानात त्यांना वाटा मिळावा किंवा शासनाने त्यांना त्या जागेचे पैसे द्यावे हा मूळ मुद्दा दिसून येतो.

वास्तविक पाहता ही कुटुंबे जेंव्हा अनेक पिढ्यांपासून तेथे रहातात तेंव्हा प्रशासनाने कुळकायद्यांतर्गत त्या जागांच्या नोंदी करुन घेणे आवश्यक होते. याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे.

आज या प्रश्नामुळे मंजूर झालेली घरकुले बांधण्यात अडथळा निर्माण झाला आहे. जर ५३% कुटुंबाच्या घराच्या जागा काढून घेतल्या तर अगोदरच भटकी असणारी कातकरी आदिवासी कुटुंबे उघड्यावर पडतील आणि त्यांचे स्थलांतर वाढेल त्यांचे सामाजिक आर्थिक जीवन अस्थिर बनवण्यावर परिणाम होईल. म्हणून हा प्रश्न त्यांच्या सामाजिक आर्थिक विकासातील अडथळा आहे हे सिध्द झाले आहे.

**२. मासेमारीची समस्या :**

मासेमारी हा कातकरी जमातीचा पिढ्यान पिढ्या चालत आलेला दुय्यम व्यवसाय व उपजीवीकेचे साधन ओळखले जाते. नमुना अभ्यास क्षेत्रात ६९% कातकरी कुटुंबे मासेमारी करीत असल्याचे आढळून आले. त्यापैकी ५८% कुटुंबे नदीनाले ओढा, बंधारे, डबले यात मासेमारी करीत होते. ११% कुटुंबे धरण, परिसरात मासेमारी करीत होते. मासेमारी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केली जात असल्याचे दिसते त्यात व्यापारी दृष्टीकोन कमी दिसतो.

पुणे जिल्हा महाराष्ट्रातील सर्वाधिक नद्यांचा व धरणांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात नद्या व धरणे केंद्रीत झाल्याने ही जमात अनेक पिढ्यांपासून येथे वास्तव्य करताना दिसते मासेमारीतील नैसर्गिक अनुकुलता यामुळे ही जमात येथे स्थिर झाली आहे.

बिगर आदिवासींना धरणातील मासेमारीचे कंत्राट लिलाव पध्दतीने दिले जाते. कातकऱ्यांना लिलावात कंत्राट दिले गेले नाही. त्यामुळे कातकऱ्यांच्या मासेमारीवर निर्बंध आले आहेत. मासेमारीचा हा प्रश्न कातकरी समाजाच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. कंत्राटदार धरणात नदीत, बंधारे येथे मासेमारी करु देत नाहीत.

कांही धरणात कातकऱ्याकडून मासेमारी करुन घेतली जाते आणि मासे कंत्राटदारालाच विकण्याची सक्ती केली जाते. त्याचे पैसे वेळेवर दिले जात नाहीत.

मासेमारी हा कातकरी जमातीचा पिढ्यान् पिढ्या केला जाणारा व्यवसाय आहे. मासेमारीवर निर्बंध आणून त्यांचा नैसर्गिक हक्क व अधिकार नाकारला जातोय. शासनही याकडे दुर्लक्ष करीत आहे. हा प्रश्न कातकरी कुटूंबाच्या जगण्याच्या मार्गातील अडथळा आहे.

**३. रेशन कार्डची समस्या :**

शिधा पत्रिका ग्रामपंचायत हद्दीतील रहिवासी व नागरिकत्वाचा पुरावा असलेला दस्तऐवज आहे. तो शासनाने दिला असल्यामुळे अधिकृत आहे. त्याच्यावरुन आर्थिक उत्पन्नाचा स्तर लक्षात येतो.

पुणे जिल्ह्यातील नमुना अभ्यास क्षेत्रात ७८% कातकरी कुटुंबे जन्मापासून येथे राहतात. ७०% कुटुंबाच्या २१ ते ४०% वर्षे कालखंडातील ग्रामपंचायतीत नोंदी आहेत.

५०% कुटुंबांना ५–१० वर्षाच्या कालखंडात रेशनकार्ड दिले गेले आहेत. २०% कुटुंबाना १०–१५ वर्षापूर्वी कार्ड दिले आहेत. ३०% कुटुंबांना अद्यापही रेशनकार्ड मिळालेले नाही असे दिसून आले आहे.

अनेक पिढ्यांपासून ही जमात येथे कायमचे वास्तव्य करीत असताना रेशनकार्ड उशीरा दिल्या गेल्याचे चित्र पुढे आले आहे. तसेच ३०% कुटुंबांना अद्यापही कार्ड दिले गेल्याचे दिसत नाही. यावरुन शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष, स्थानिक पातळीवर जाणीवपूर्वक नावाच्या नोंदी न करणे, कातकऱ्याचे आलेले कार्ड दुसऱ्यांना देणे, रेशनकार्डसाठीच्या कागदपत्राची पूर्तता न होणे यासारख्या अनेक कारणानी रेशन कार्डचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रेशन कार्डवर अंत्योदय अन्न योजने अंतर्गत गहू, तांदूळ दिले जातात. कातकरी जीवनाला दिलेला हा एक आधार आहे. परंतु रेशन कार्ड अद्यापही कांही कुटुंबांना मिळालेले नसल्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. सामाजिक संस्था कातकऱ्यांच्या

मदतीसाठी धावल्या आहेत. पण अद्यापही संपूर्ण कुटुंबाला कार्ड मिळालेली नाहीत. हा प्रश्न कातकरी कुटुंबाच्या आर्थिक सामाजिक प्रश्नांशी निगडीत आहे.

**४. वन उत्पादने संकलनाची समस्या :**

कातकरी ही आदिम जमात आहे. या जमातीची मुळची अर्थव्यवस्था ही जंगलावर आधारलेली होती. कात बनविण्यापासून ते कोळसा पाडण्यापर्यंत आणि वन उत्पादने गोळा करण्यापर्यंत या जमातीचा संबंध वनाशी होता. काळाच्या ओघात वन कायद्याने वन वस्तू वापरावर निर्बंध घातले आणि कातकरी जमातीची वनावर आधारीत अर्थव्यवस्था कोलमडली आहे.

पुणे जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रात कातकरी जमात ही वनाच्छादित डोंगर–दऱ्या असलेल्या पश्चिम पट्ट्यात केंद्रीत झालेली आहे. रोजगाराची अपूरी साधने असल्यामुळे या जमातीला बेकारी स्विकारावी लागते तेंव्हा कातकरी स्त्री–पुरुष जवळच्या जंगलात लाकडाची मोळी किंवा इतर वन उत्पादने आणण्यासाठी जातात तेंव्हा वनरक्षक कातकरी लोकांवर कारवाई करतो. वेळप्रसंगी मारहाण करतो.

अभ्यास क्षेत्रात १६% कातकरी कुटुंबे वनउत्पादन संकलन करीत असली तरी ती आदिवासी उपयोजना क्षेत्रात वनउत्पादने संकलनाला परवानगी आहे परंतु इतर तालुक्यात मात्र परवानगी नाही. फळे, कंदमुळे, जळाऊ लाकूड या वनवस्तू कातकरी जीवनाला दिलासा देणारी नैसर्गिक बाब आहे. परंतु त्यावर निर्बंध घातल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**५. शासकीय योजनांच्या लाभाची समस्या :**

आदिवासी जमातीच्या विकासासाठी शासन अनेक पातळ्यावर प्रयत्न करीत आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना स्वस्तात रेशनिंगवर धान्य उपलब्ध्स करुन देणारी

अंत्योदय अन्न योजना, इंदिरा आवास योजना, केंद्रवर्ती बजेट योजना, एकाधिकार खरेदी योजना इत्यादी योजना अभ्यास क्षेत्रात राबविल्या जात असल्याचे आढळून आले.

या शासकीय योजनांच्या लाभाची स्थिती आजमावली असता ४७% कातकरी कुटुंबाचे दारिद्र्य रेषेखाली नांव नोंदले गेलेले नाही. ४७% कुटुंबांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळालेला नाही. ७९% कुटुंबांना घरगुती गॅस वाटप योजनेचा, ९३% कुटुंबांना केंद्रवर्ती बजेट योजनेचा, ९७% कुटुंबांना खावटी कर्ज योजनेचे लाभ मिळालेले नाहीत. ४७% कुटुंबांनाअद्यापही जातीचे दाखले मिळालेले नाहीत.

यावरुन असे लक्षात येते की, या योजना जर आदिवासी विकासासाठी असतील तर कातकरी सारख्या शेवटच्या पायरीवर असलेल्या आदिम जमाती पर्यंत या योजनांचे लाभ मिळाले नाहीत याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे.

याचे कारण म्हणजे योजनांच्या लाभाचा वाटा प्रत्येक जमातीला समान मिळत नाही. अभ्यास क्षेत्रात महादेव कोळी, ठाकर या जमातींनी योजनाचे जास्त लाभ घेतलेले आहेत. तुलनेने कातकरी जमातीला मात्र कमी लाभ मिळालेले आहेत.

अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने लाभाच्या वाटपात समन्वय साधन्याकडे दुर्लक्ष केले आहे. प्रत्येक जमातीतील योजनांच्या लाभात समान न्याय व वाटा न मिळाल्यामुळे हा लाभाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीवर झाल्याचा निष्कर्ष निघतो.

### ६. जातीच्या दाखल्याची समस्या :

जातीचा दाखला आणि कातकरी समाजाच्या आर्थिक विकासाचा जवळचा संबंध आहे. जातीचा दाखला म्हणजे आदिवासी असल्याचा कागदोपत्री पुरावा होय. कोणत्याही योजनेचालाभ घेण्यासाठी जातीचा दाखला आवश्यक असतो.

अभ्यास क्षेत्रात ५३% कुटुंबांना जातीचे दाखले मिळालेले आढळून आले. ४७% कुटुंबांना अद्यापही दाखले मिळालेले नाहीत.

आदिवासी क्षेत्रातील आदिवासींना लवकर दाखले मिळतात. परंतु आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासींना दाखले मिळण्यात अनेक अडचणी निर्माण होतात. वेळ पैसा मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. तेवढे करुनही दाखला मिळत नाही. आई–वडिलांचा शाळेचा दाखला पुरावा म्हणून जोडावा लागतो. तसेच ५० वर्षापूर्वीच्या जातीचा नोंद असलेला कागदोपत्री पुरावा लागतो. या अटी पूर्ण करता आल्या नाहीत तर दाखला मिळत नाही.

कातकरी ही पिढ्यानपिढ्या आदिमानवाप्रमाणे जीवन जगणारी आदिम जमात आहे. यांच्याकडे वरील कोणताही पुरावा असणे शक्य नाही. त्यांची पहिली पिढी कुठेतरी शाळेत जाऊ लागली आहे. त्यांचे आई–वडिल कधीही शाळेत गेले नाहीत. त्यामुळे शाळेचा दाखला मिळणे शक्य नाही. तसेच ही जमात अभ्यास क्षेत्रात अनेक पिढ्यांपासून रहात असतानाही त्यांच्या रहिवासी म्हणून नोंदी शासकीय पातळीवर ठेवल्या गेल्या नाहीत. त्यामुळे ५० वर्षापूर्वीचा पुरावा मिळणे अशक्य आहे. त्यामुळे नमुना अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबापुढे जातीच्या दाखल्याचा प्रश्न उभा राहिला आहे. दाखल्याअभावी योजनांचा लाभ मिळत नाही.

**७. कातकरी कुटुंबाचे शोषण :**

कातकरी आदिमांकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर समाजातील ही जमात एक शोषित घटक आहे. सतत या जमातीचे पिढ्यानपिढ्या शोषण होत आले आहे.

१९ व्या शतकातील कात बनवून घेणाऱ्या बोहरा कंत्राटदारापासून ते ब्रिटीशांपर्यंत आणि कोळसा बनविणाऱ्या ठेकेदारापासून ते वीटभट्टी मालकापर्यंत व शेतकऱ्यांपर्यंत या सर्वांनी कातकरी जमातीचे प्रचंड शोषण केल्याची वास्तवा पुढे आली आहे.

अभ्यास क्षेत्रात ८०% कातकरी कुटुंबाच्या कामाचा मोबदला मालक ठरवितो. पावसाळ्यात शेतकरी कातकरी कुटुंबाला कमी मजूरी देतो, वीटभट्टी मालक उचल रक्कम

दिल्यामुळे विटा बनविण्याचा दर कमी देतो, कोळसा बनविणारा ठेकेदार कोळशाच्या वजनात कातकऱ्यांना फसवितो, शेतकरी भातलवणीच्या काळात कातकरी कुटुंबाने जास्त वेळ काम करावे म्हणून दोन वेळचे जेवण तसेच भरपूर काम करावे म्हणून हातभट्टीची दारू देतो.

या सर्व बाबींवरुन कातकरी समाजाची पिळवणूक होत आली आहे. प्रत्येक ठिकाणी कातकरी समाजाचे शोषण झाल्यामुळे कोणावरही ते लवकर विश्वास ठेवीत नाहीत. त्यांच्या अगतिकतेचा फायदा शोषणकर्त्यांनी घेतला आहे. त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक सामाजिक मागासलेपणावर झाला आहे.

त्यांच्या शोषणाचे कारण म्हणजे त्यांच्यातील असंघटीतपणा, अपुऱ्या रोजगार संधी, सौदाशक्ती कमी, असहाय्यतेचा, गरीबी, दारिद्र्य व अज्ञानाचा फायदा घेऊन बिगर आदिवासी लोक शोषण करतात असा निष्कर्ष निघाला आहे.

## ५.२४ सारांश :

अभ्यास माहितीचे विश्लेषण या प्रकरणात संशोधन विषयाच्या मुख्य भागाचे विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीच्या तथ्याचे विवेचन करण्यात आले आहे.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबे ही मुळची रायगड व ठाणे जिल्ह्यातील आहेत. ती ४० ते ५० वर्षांपूर्वी कामाच्या निमित्ताने अभ्यास क्षेत्रात स्थलांतरीत होऊन स्थायिक झालेली आहेत. ७८% कुटुंबे जन्मापासून, २२% कुटुंबे २०-३० वर्षांपासून येथे वास्तव्य करीत असल्याचे दिसून आले. कातकरी कुटुंबाच्या ग्रामपंचायतीतील नोंदींचा आढावा घेतला असता, २६% कुटुंबांच्या नोंदी जन्मापासून, ७०% कुटुंबांच्या नोंदी २१-४० वर्षांपासून तर ४% कुटुंबांच्या अद्यापही नोंदी नाहीत असे दिसून आले. तसेच ५५% कुटुंबांची १० वर्षांपूर्वी, तर ३४% कुटुंबांची २० वर्षांपूर्वी मतदार यादीत नावे नोंदली गेल्याचे आढळून आले आहे. तसेच १६% कुटुंबांना ५ वर्षांपूर्वी, ३५% कुटुंबांना ५-१० वर्षांपूर्वी,

१९% कुटुंबांना १०–१५ वर्षांपूर्वी शिधापत्रिका मिळाल्या आहेत. ३०% कुटुंबांना अद्यापही शिधापत्रिका मिळालेल्या नाहीत. ५३% कुटुंबांना जातीचे दाखले मिळाले आहेत तर ४७% कुटुंबे अद्यापही जातीच्या दाखल्यापासून वंचित राहिले आहेत अशी वास्तव स्थिती दिसून आली.

कातकरी समाजाच्या कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, ०–५ वयोगटात १९% सदस्य, ६–१४ वयोगटात ३३% सदस्य, १५–६० वयोगटात ४८% सदस्य तर ६१ च्या पुढील वयोगटात एकही सदस्य आढळून आला नाही. कुटुंबाचा आकार विचारात घेतला असता ५ सदस्य असलेली सर्वाधिक ३२% कुटुंबे आढळून आली. ४ सदस्य असलेली १९%, ६ सदस्य असलेली १५%, ७ सदस्य असलेली ११% तर ३ सदस्य असलेली १०% कुटुंबे असे प्रमाण दिसून आले. स्त्री–पुरूष प्रमाणाचा आढावा घेतला असता ५१% स्त्रीया होत्या तर ४९% पुरूष होते. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या १०१४ एवढी असल्याचे दिसून आले. ७७% कुटुंबात विभक्त कुटुंब पद्धती तर २३% कुटुंबात संयुक्तिक कुटुंब पध्दती आढळून आली. ९९% कुटुंबात कुटुंब प्रमुख पुरूष आहे तर केवळ १% कुटुंबात स्त्रीया प्रमुख असल्याचे आढळून आले. ही वास्तवता कातकरी समाजाच्या कुटुंबव्यवस्थेतून पुढे आली आहे.

कातकरी जमातीच्या विवाह संस्थेचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना या समाजात मान्यता नसते. जमातीच्या अंतर्गतच विवाह होतात. एक पत्नी विवाहच रूढ झालेले आहेत. लग्न मुलीच्या घरी केले जाते. अतिशय साध्या पद्धतीने विवाह समारंभ पार पाडला जातो. विवाहप्रसंगी सामाजिक सांस्कृतिक रूढी परंपरांना महत्त्व मोठ्या प्रमाणात दिले जाते. ५७% कुटुंबात मुले–मुली वयात आल्यानंतर तर ४३% कुटुंबात १३–१७ वयामध्ये आल्यानंतर मुलामुलीचे विवाह केल्याचे आढळून आले. स्त्रीकडे श्रमशक्ती आणि जननक्षमता असतात. त्या कुटुंबासाठी महत्त्वाच्या असतात म्हणून वधुमुल्याची प्रथा आढळून आली. ५०० रू. पर्यंत वधुमूल्य देणारी ४९% कुटुंबे आहेत. ५०१ ते १५०० रूपये पर्यंत ५१% कुटुंबे आढळून आली. ५०००

रू. पर्यंत विवाहखर्च करणारी ५१%, ५००१ ते १०००० रू. खर्च करणारी ४१% कुटुंबे तर १०००१ ते १५००० रूपयांपर्यंत खर्च करणारी ८% कुटुंबे आढळून आली. २०% कुटुंबात घटस्फोट घेतल्याचे तर ८०% कुटुंबात घटस्फोट न घेतल्याचे प्रमाण दिसून आले. तसेच सोन कातकरी आणि ढोर कातकरी असे दोन पोटप्रकार आढळून आले. या दोन पोटजातीत विवाह होत नाहीत अशीही माहिती पुढे आली आहे.

कातकरी समाजाची विभागणी बहीर्विवाही कुलात झाली आहे. त्यांच्यात ९३ कुळी आढळतात. एकाची कुळातील दोन व्यक्तींचा विवाह होत नाही. कुलनामाचे वापर आडनाव म्हणून केला जातो. ही जमात मांसाहार करणारी आहे. आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे नकली दागदागिने स्त्रीया वापरतात. तसेच नाक, गाल, कपाळ, हात या ठिकाणी गोंदण काढले जाते. कातकरी वस्तीला कातवडी असे म्हणतात. या समाजात कातकरी मृताचे दफन किंवा दहन केले जाते. वाघदेव हा त्यांचा मुख्य देव आहे. डोंगर देव, गांवदेव, मरीमाता, कन्सारी देवी इ. देवदेवतांचे ते पुजन करतात. या समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा आढळून आली. विविध समारंभ प्रसंगी कातकरी स्त्री पुरूष ढोलाच्या तालावर नृत्य करून आनंद व्यक्त करतात. जन्म सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

एकूण कातकरी कुटूंबांपैकी ७६% स्त्रीया व ६६% पुरूष निरक्षर असल्याचे दिसून आले. एकूण २७% साक्षरता आहे त्यात २४% स्त्रीया तर ३४% पुरूष साक्षर असल्याचे आढळले. ५३% कुटुंबातील कातकरी मुले शाळेत नियमीत जात नाहीत. फक्त १६% कुटुंबातील मुले नियमीत जातात तर ३१% कुटुंबातील मुले अद्यापही शाळेत दाखल झाली नसल्याचे दिसून आले. यावरून कातकरी समाज शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आहे हे सिध्द होते.

कातकरी कुटुंबातील आरोग्य स्थितीचा आढावा घेतला असता मलेरिया, डायरीया, निमोनिआ, गोवर, धनुर्वात, क्षय, सिकलसेल, टाईफॉईड व महारोग असे विविध रोग आढळून आले. त्यात मलेरिया ४७% व डायरीया २६% असल्याचे दिसून

आले. आजारी पडल्यावर ७०% लोक घरगुती उपचार घेतात. ४% लोक मांत्रिकाकडे जातात, १०% लोक देवाला नवस बोलतात व १६% लोक दवाखान्यात जातात असे दिसून आले. ३२% लोक डायरीयाने, १४% लोक निमोनिआने, ७% लोक टाईफॉईडने, ६% लोक क्षयाने तर २४% लोक दारूच्या नशेत अशा विविध कारणांनी मृत्युमुखी पडल्याचे दिसून आले. ७७% स्त्रियांचे बाळंतपण घरी झाले, तर २३% स्त्रीयांचे बाळंतपण दवाखान्यात झाल्याचे दिसून आले. ६४% स्त्रियांनी संतती नियमन शस्त्रक्रिया केली नव्हती तर ३६% स्त्रियांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. ४३% कुटुंबातील मुलांना रोगप्रतिबंधक लस दिल्या गेल्या तर ५७% कुटुंबातील मुलांना कोणतीही लस दिली नव्हती. तसेच ९१% कुटुंबात दारूचे व्यसन व तंबाखुचे व्यसन असल्याचे आढळून आले. ३९% कुटुंबांचे राहणीमान स्वच्छ तर ६१% कुटुंबांचे राहणीमान अस्वच्छ होते. ३३% घरात अस्वच्छता तर ६७% घरात अस्वच्छता, २८% वस्तीचा परिसर अस्वच्छ तर ७२% वस्तीचा परीसर अस्वच्छ असल्याचे दिसून आले. १६% कातकरी वस्तीवर खासगी दवाखाना, १६% प्राथमिक आरोग्य केंद्र, ५% कुटुंब नियोजन केंद्र, ४% प्रसुती केंद्र अशी वैद्यकीय सुविधा दिसून आल्या. ५९% वस्तीवर कोणत्याही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नव्हत्या अशी आरोग्यासंबंधी स्थिती आढळून आली.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी जमातीची आर्थिक स्थिती अभ्यासली असता असे दिसून आले की, ९९% कातकरी कुटुंबांचा शेतमजूरी हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत दिसून आला. ६९% कुटुंबांना मासेमारी या दुय्यम साधनापासून, ७% कुटुंबांना कोळसा पाडणे, ६% वनवस्तू संकलन, १२% कुटुंबांना विटा बनविणे, ३% कुटुंबांना पशुपालन, ३% कुटुंबांना इतर व्यवसायापासून उत्पन्न मिळत असल्याचे आढळून आले. सन २००७–०८ या आर्थिक वर्षात २% कुटुंबांचे ५०००–८००० रू., ३२% कुटुंबांचे ८००१–११००० रू., ४३% कुटुंबांचे ११००१–१५००० रू. तर २३% कुटुंबांचे १५००१ च्या पुढे अशी उत्पन्न पातळी आढळून आली. ३८% कुटुंबे तोंडी हिशोब ठेवतात, ७% कुटुंबे लेखी, ३०% कुटुंबांचा हिशोब मालक ठेवतो तर २५% कुटुंबात आर्थिक व्यवहाराचा हिशोब ठेवला जात

नसल्याचे दिसून आले. कातरकी कुटुंबात खर्चाचे नियोजन नसल्याचे दिसले. २५% कुटुंबात बचत केली जात असल्याचे व ७५% कुटुंबात बचत केली जात नसल्याचे दिसून आले. ३३% कातकरी वस्तीवर बचतगट होते, ६% कातकरी कुटुंबांनी सावकाराकडून, ८% कुटुंबांनी बँकांकडून, ३६% कुटुंबांना मालकाकडून कर्ज घेतले होते तर ५०% कुटुंबांना कोणाकडूनही कर्ज मिळाले नव्हते असे दिसून आले. ३७% कुटुंबाचे बँकेत खाते होते, ६३% कुटुंबाचे बँकेत खाते उघडलेले नव्हते असे आढळून आले.

पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबाच्या स्थावर मालमत्तेचा आढावा घेतला असता एकाही कुटुंबाकडे शेत जमीन नव्हती. ४७% कुटुंबाकडे स्वत:चे घर आहे, ५३% कुटुंबाकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता असल्याचे दिसून आले नाही. कातकरी कुटुंबाची व्यावसायिक स्थिती अभ्यासली असता ९९% कुटुंबाचा शेतमजूरी हा मुख्य व्यवसाय, ८१% कुटुंबांचा मासेमारी हा दुय्यम व्यवसाय, ८% कुटुंबांचा कोळसा पाडणे, १५% कुटुंबांचा विटा बनविणे, १६% कुटुंबांचा वनवस्तू संकलन, ४% कुटुंबाचा पशुपालन, १०% कुटुंबांचा इतर दुय्यम व्यवसाय असल्याचे दिसून आले. १००% मासेमारी उत्पादनाची बाजारपेठ स्थानिक आहे. ८४% कातकरी वस्त्या मासेमारीला अनुकुलता असलेल्या ठिकाणी केंद्रीत झालेल्या आहेत तर १६% वस्त्या मासेमारीला अनुकुलता नसलेल्या ठिकाणी वसलेल्या असल्याचे दिसून आले.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबांना शासकीय योजनांपासून मिळालेल्या लाभाचा आढावा घेतला असता असे दिसून आली की, ५३% कातकरी कुटुंबांना दारिद्रयरेषेखालील दाखले मिळाले आहेत, ५३% कुटुंबांना अंत्योदन अन्न योजनेचा, २१% कुटुंबांना घरगुती गॅस वाटप योजनेचा, ४७% कुटुंबांना इंदिरा आवास योजनेचा, ७% कुटुंबांना केंद्रवर्ती बजेट योजनेचा, ४% कुटुंबांना खावटी कर्ज योजनेचा, ३% कुटुंबांना एकाधिकार खरेदी योजना इ. योजनांचे लाभ मिळाले असल्याचे आढळून आले. ९% कातकरी कुटुंबे आदिवासी सहकारी संस्थांचे सभासद असल्याचे दिसून आले.

कातकरी कुटुंबांच्या श्रमाच्या मोबदल्याचा आढावा घेतला असता १०० कुटुंबांना रोख पैशाबरोबर जेवण, धान्य, दारू या स्वरूपातही मोबदला मिळत असल्याचे आढळून आले. श्रमाचा मोबदला ठरविण्यात २०% कुटुंबांना सहभागी करून घेतल्याचे तर ८०% कुटुंबांच्या श्रमाचा मोबदला मालक ठरवित असल्याचे दिसून आले. तसेच स्त्री पुरूषाला दिल्या जाणाऱ्या मजूरी दरात तफावत, तसेच पावसाळ्यात आणि हिवाळा उन्हाळ्यात दिल्या जाणाऱ्या मजूरी दरात तफावत असल्याचे आढळून आले. पावसाळ्यात कमी आणि उन्हाळ्यात व हिवाळ्यात जास्त मजूरी असल्याची माहिती पुढे आली आहे. तसेच दुर्गम व डोंगरी भागात मजूरी दर कमी असल्याचे दिसून आले आहे.

वर्षभरात ६–७ महिने रोजगार मिळणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २४% आहे. ८–९ महिने रोजगार मिळणारी ५३% कुटुंबे तर १०–१२ महिने रोजगार मिळणारी २३% कुटुंबे आढळून आली. १०–१२ महिने रोजगार मिळणारी कुटुंबे खेड, आंबेगांव व जुन्नर तालुक्यात आढळून आली. ५५% कुटुंबे कामासाठी स्थलांतरीत होत असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यापैकी ५१% कुटुंबे तालुक्यात, १६% जिल्ह्यात, ३३% जिल्ह्याबाहेर स्थलांतरीत होतात. २ महिन्यांसाठी हिवाळ्यात २३% कुटुंबे, उन्हाळ्यात १६% कुटुंबे स्थलांतरीत होतात. ३ महिन्यांसाठी हिवाळ्यात ७७% कुटुंबे तर उन्हाळ्यात ८४% कुटुंबे स्थलांतरीत होतात असे दिसून आले.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबातील लोकांची राहणीमान पातळी विचारात घेतली असता ६% कुटुंबांकडे टीव्ही, ४% कुटुंबांकडे रेडिओ, २०% कुटुंबांकडे गॅस युनीट, २% कुटुंबांकडे टेपरेकॉर्डर, ३% कुटुंबांकडे फोन अशी सुखवस्तू व मनोरंजनाची साधने असल्याचे दिसून आले. ४०% कुटुंबांकडे लोखंडी पत्र्याचे पक्के घर, ७% कुटुंबांकडे मंगलोरी कौलांचे पक्के घर, ४५% कुटुंबांकष झोपडी तर ८% कुटुंबे उघड्यावर निवास करतात. ८५% कातकरी वस्त्यांवर नैसर्गीक जल स्त्रोताचे तर १५% वस्त्यांवर सार्वजनिक नळाचे पाणी पिण्यासाठी उपलब्ध होते. २५% घरात वीज प्रकाश आहे तर ७५% घरात वीज प्रकाश नव्हता, तसेच ९०% वस्त्या मुख्य रस्त्यापासून अर्धा ते एक कि.मी. अंतरावर

आहेत तर ८०% वस्त्या गावापासून अर्धा ते एक कि.मी. अंतरावर वसल्याचे दिसून आले आहे. १५% वस्त्यांवर स्वच्छता गृहाची सुविधा होती, १००% कातकरी वस्ती असलेल्या गावात या समाजाची स्वतंत्र स्मशानभूमी असल्याचे आढळून आले नाही.

अभ्यास क्षेत्रात ६९% कुटुंबे १५–२० रू., १९% कुटुंबे २१–३० रू., १०% कुटुंबे ३१–४० रू. तर २% कुटुंबे ४१–५० रू. प्रतिदिनी दारूच्या व्यसनावर खर्च करीत असल्याचे दिसून आले. तसेच ७% कुटुंबांना गाव कारभारात सहभागी करून घेतले होते तर ८% कुटुंबांना निवडणुकीत उमेद्वारी दिली असल्याचे आढळून आले.

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या लोकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे असे दिसून आले. ५३% कुटुंबांच्या घराच्या जागेचा प्रश्न वादातीत आहे. धरणात मासेमारी करू दिली जात नाही, ३०% कुटुंबांना अद्यापही रेशनकार्ड दिले गेलेले नाही. आदिवासी क्षेत्राबाहेरील ८४% कुटुंबांना वनवस्तू संकलन करू दिले जात नाही, २१% कुटुंबांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही आणि अभ्यास क्षेत्रात कातकरी कुटुंबांची वेगवेगळ्या पद्धतीने शोषण केले जाते अशी स्थिती दिसून आली.

# प्रकरण ६ वे

# निष्कर्ष व शिफारशी

**६.१ निष्कर्ष**

सामाजिक

आर्थिक

**६.२ गृहितकाची पडताळणी**

**६.३ शिफारशी**

सामाजिक

आर्थिक

**६.४ सारांश**

प्रकरण ६ वे

# निष्कर्ष व शिफारशी

## प्रस्तावना

भारतातील आदिम जमात समूहापैकी कातकरी ही एक आदिम जमात आहे. या जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासण्यासाठी पुणे जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील जुन्नर, खेड, आंबेगांव, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर व हवेली तालुक्यातील कातकरी कुटुंबाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्यात आला. त्या अभ्यासातून विविध निष्कर्ष निघाले आहेत. त्याच्या आधारे कातकरी जमातीच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी विविध शिफारशी केल्या आहेत.

## ६.१ निष्कर्ष

### अ) कातकरी जमातीच्या सामाजिक स्थितीचे निष्कर्ष

कोणत्याही शास्त्रीय अभ्यासाचे निष्कर्ष हा संशोधनाचा गाभा असतो. पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक स्थितीच्या अभ्यासावरून पुढील निष्कर्ष निघाले आहेत.

१. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबापैकी १००% कुटुंबे कोकणातील रायगड जिल्हयातील आहेत असा निष्कर्ष निघाला आहे. कारण त्यांचे मुळ ठिकाण शोधण्याचा प्रयत्न केला असता ते कोकणातील कर्जत, खोपोली, पेण, कोळवण, कोलाड, रोहा, निजामपूर, महाड, वरंध, माणगांव, मदनगड या परिसरातील आहेत. हे सर्व ठिकाणे रायगड जिल्हयातील आहेत. कोकणातील कातकरी कामाच्या निमित्ताने अभ्यास क्षेत्रात स्थलांतरीत होऊन स्थायिक

झाली आहेत आणि ती सर्व कातकरी कुटूंबे रायगड जिल्ह्यातील असल्यामुळे ते सोनकातकरी या पोटजातीची आहेत असा निष्कर्ष निघाला आहे.

२. पुणे जिल्ह्यातील एकूण कातकरी कुटुंबापैकी ७८% कुटुंबे जन्मापासून येथे वास्तव्य करतात. २२% कुटुंबे २०–५० वर्षापासून राहतात. आज जे कुटुंब प्रमुख आहेत त्यांचे वडील बालपणात येथे आले होते. येथील कातकरी कुटुंबाचे वास्तव्याचा कालावधी वरील प्रमाणे असल्याचा निष्कर्ष निघतो.

तसेच कातकरी कुटुंबापैकी २६% कुटुंबाच्या ग्रामपंचायतीतील जन्मापासून नोंदी आहेत. ७०% कुटुंबाच्या २१–४० वर्षापासून नोंदी आहेत तर ४% कुटुंबाच्या अद्यापही नोंदी नाहीत. ७८% कुटुंबाचे वास्तव्य जन्मापासून आहे याचा अर्थ सर्व कुटुंबाच्या नोंदी वेळीच केल्या नाहीत. रहिवाशी म्हणून ग्रामपंचायतीत उशीरा नोंदी झाल्याची स्थिती पुढे आली आहे.

३. कातकरी कुटुंबामध्ये ०–५ वयोगटातील सदस्य संख्या १९% होती. ६–१४ वयोगटातील सदस्य संख्या ३३% होती. तर १५–६० वयोगटात ४८% सदस्य संख्या होती. ५१% सदस्य संख्या ०–१४ वयोगटात असल्याचे आढळून आले. काम न करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्या अधिक असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

तसेच कातकरी कुटुंबाचा आकार विचारात घेतला असता ५ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ३२% होते. ४ सदस्य असलेली १९% कुटुंबे, ६ सदस्य असलेली १५% कुटुंबे होती. ७ सदस्य असलेली ११% कुटुंबे होती. तर ३ सदस्य असलेली १०% कुटुंबे होती. ५ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते. कुटुंबाची सरासरी सदस्य संख्या ५ एवढी

असल्याचे आढळून आले. यामुळे कातकरी कुटुंबाचा सरासरी आकार मोठा आहे.

कुटुंब नियोजनाचा अभाव, दैवी वृत्ती, लोकसंख्या शिक्षणाचा अभाव, इत्यादीमुळे कुटुंबाचा आकार मोठा असल्याचे सिध्द होते.

४. एकूण कातकरी कुटुंबात १०५५ स्त्रीया तर १०१३ पुरुष आढळून आले. दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या १०४१ स्त्रिया एवढे होते. याचा अर्थ स्त्रीयांची संख्या पुरुषापेक्षा जास्त असल्याचा निष्कर्ष निघतो.

कातकरी जमातीत मुलगी मुलगा असा फारसा भेदभाव दिसत नाही. जगण्याचा प्रश्न मोठा असतो. प्रचंड व्यसनाधिनतेत हा समाज गुरफटलेला आहे. स्त्री देखील पुरुषाबरोबर दारु पिते. पुरुषांइतकीच स्त्री देखील काम करते. त्यामुळेच स्त्रीयांची संख्या जास्त दिसत असल्याची माहिती पुढे आली आहे.

५. नमुना कातकरी कुटुंबात २९% साक्षरता आढळून आली तर ७१% निरक्षरता असल्याचे दिसून आले.

स्त्री पुरुषातील निरक्षरता विचारात घेतली असता ७६% स्त्रीया निरक्षर तर ६६% पुरुष निरक्षर असल्याचे आढळून आले.

एकूण स्त्रियांपैकी २% साक्षर, १०% पूर्वप्राथमिक, १०% प्राथमिक, २% माध्यमिक, १% उच्च माध्यमिक अशी स्त्रियांची शैक्षणिक स्थिती दिसून आली.

एकूण पुरुषांमध्ये २% साक्षर, १०% पूर्वमाध्यमिक, १८% प्राथमिक, ३% माध्यमिक, १% उच्च माध्यमिक आणि अर्धा टक्का पदवी अशी शैक्षणिक स्थिती दिसून आली.

साक्षरता कमी आणि निरक्षरता अधिक असल्याचा निष्कर्ष पुढे आला आहे. स्त्रीयांमधील निरक्षरता देखील पुरुषापेक्षा जास्त असल्याचे दिसते.

एकूणच कातकरी जमात शैक्षणिकदृष्टया मागासलेली दिसते. कारण शिक्षणाबाबत उदासिनता, अल्पवयात विवाह होऊन कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर पडते आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. कामासाठी सततचे स्थलांतर, रुढी परंपरेचा पगडा, शिक्षण सुविधांचा अभाव, आर्थिक स्थिती कमकुवत इत्यादी कारणांमुळे शिक्षणाचे प्रमाण कमी राहिल्याचा निष्कर्ष पुढे आला आहे.

६. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबात ४७% मलेरिया, २६% डायरिया, ८% निमोनिआ, ४% गोवर, ३% धनुर्वात, १% महारोग, २% टी.बी., २% सिकलसेल, १% टॉयफॉईड असे विविध रोगाचे प्रमाण आढळून आले. मलेरिया, डायरिया, निमोनिआ या रोगाचे प्रमाण सर्वाधिक आहे. अवेळी व निकृष्ट आहार, अस्वच्छ राहणी, प्रदूषित पाणी, व्यसनाधिनता यामुळे विविध रोगाचे प्रमाण सर्वाधिक असल्याची स्थिती दिसते.

७. एकूण कातकरी कुटुंबापैकी मागील ५ वर्षात विविध रोगांमुळे मृत्यू पावलेल्या सदस्यांची माहिती घेतली असता–

३२% लोक डायरीया, १४% निमोनियाने, ७% टॉयफॉईडने, ४% महारोगाने ६% टी.बी. ने, ५% लिव्हर खराब होऊन, ५% वृध्दापकाळाने, आणि २४% दारुच्या नशेत, ३% इतर कारणांनी असे मृत्यूचे प्रमाण आढळून

आले. सर्वाधिक लोक डायरियाने आणि दारूच्या नशेने मृत्यु झाल्याचे दिसून आले.

तसेच एकूण कुटुंबापैकी ७७% कुटुंबातील स्त्रीयांचे बाळंतपण घरी झाले होते. केवळ २३% कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपण दवाखान्यात झाल्याचे आढळून आले. घरी बाळंतपण होणाऱ्या कुटुंबातील स्त्रीयांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कारण आर्थिक स्थिती भक्कम नसते, आरोग्य सेवा जवळ उपलब्ध नसते, दवाखान्यात बाळंतपणासाठी जाण्याची लाज वाटणे, भिती वाटणे, इत्यादी कारणांमुळे घरी बाळंत होण्याचे प्रमाण अधिक असल्याचा निष्कर्ष निघतो.

८. कातकरी कुटुंबापैकी ३६% कुटुंबात स्त्रीयांची संतती नियमन शस्त्रक्रिया झाली होती. ६४% कुटुंबातील स्त्रियांनी शस्त्रक्रिया केली नव्हती. दैवी वृत्ती, रुढी, परंपरा याचे वर्चस्व, आरोग्य सुविधांचा अभाव, शस्त्रक्रियेविषयी भिती वगैरे समजुती इत्यादींमुळे संतती नियमन शस्त्र क्रियेचे प्रमाण कमी असल्याचा निष्कर्ष निघतो.

तसेच अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबापैकी ४३% कुटुंबात मुलांना विविध रोगप्रतिबंध लसी दिल्या गेल्या होत्या. तर ५७% कुटुंबातील मुलांना कोणत्याही लसी दिल्या गेल्या नव्हत्या.

लसीकरण न झालेल्या मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे याचे कारणे म्हणजे मनात भिती, कामासाठी सतत स्थलांतरण, लसीकरणाची सेवा उपलबध नसणे इत्यादी कारणे होत. लसीकरण न झाल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी राहते आणि विविध रोगांना निमंत्रण मिळते असा अंतिम निष्कर्ष निघतो.

९. अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबापैकी ९१% कुटुंबात दारू बरोबर तंबाखूचे व्यसन असल्याचे आढळून आले. कुटुंबातील स्त्री-पुरुष मुलांसह दारु पितात. आर्थिक अडचणी, ताणतणाव, शारिरीक तक्रारी, सामाजिक चालीरीती इत्यादी मुळे व्यसनाधिनता अधिक आहे असे आढळून आले. केवळ ९% कुटूंबे निर्व्यसनी असल्याचे दिसून आले आहे.

१०. कातकरी वस्तीवरील निरिक्षणात्मक नोंदीनुसार ३३% कातकरी घरात स्वच्छता होती, ६७% घरात अस्वच्छता होती.

३९% लोकांचे राहणीमान स्वच्छ, ६१% लोकांचे राहणीमान अस्वच्छ असल्याचे आढळून आले. २८% वस्तीवरील परिसर स्वच्छ होता तर ७२% वस्तीवरील परिसर अस्वच्छ होता. केवळ १५% वस्तीवर स्वच्छता गृहाची सुविधा उपलब्ध होती. कातकरी लोकांचे राहणीमान अस्वच्छ, गलीच्छ, त्यांच्या घरादारातील स्थिती देखील अस्वच्छ असल्याचा निष्कर्ष निघतो.

त्याचबरोबर १६% कातकरी वस्ती असलेल्या गांवात खाजगी दवाखाने होते. १६% गावात प्राथमिक आरोग्य केंद्र होते. ५% गावात कुटुंब नियोजन केंद्र होते. ४% गावात प्रसुती केंद्र होते. तर ५९% गावात कोणत्याही वैद्येकीय सुविधा उपलब्ध नव्हत्या.

तसेच ६४% कातकरी वस्तीपासून वैद्यकीय सेवा १-५ कि.मी. अंतरावर होत्या. १८% गावांत ६-१० कि.मी. अंतरावर, ११% गावांत १० ते २० कि.मी. अंतरावर वैद्यकीय सेवा नव्हत्या. पुरेशा वैद्यकीय सेवा नसल्यामुळे कातकरी लोकांचे आरोग्य धोक्यात येते असा अंतिम निष्कर्ष निघतो.

११. कातकरी कुटुंबापैकी ५१% कुटुंबात लग्नाचा खर्च ५००० रुपयापर्यंत झाल्याचे दिसून आले. ४१% कुटुंबात ५००० ते १०००० रुपयापर्यंत, ८% कुटुंबात १०००० ते १५००० रुपयापर्यंत लग्नाचा खर्च झालयाचे दिसून आले.

कातकरी जमातीत विवाह खर्चाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचा निष्कर्ष निघतो. लग्न समारंभ अतिशय साधा असल्याचे दिसते, प्रत्येक कुटुंब आपल्या आर्थिक कुवतीनुसार खर्च करतात आणि लग्नाचा विधी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

कातकरी जमातीत वधुमूल्य पध्दत असल्याचे दिसते. अभ्यास क्षेत्रात ४९% कातकरी कुटुंबात ५०० रुपयांपर्यंत वधुमूल्य दिले होते. तर ५१% कुटुंबात ५०१ ते १५०० रुपये वधुमूल्य देण्यात आले होते. वधुमूल्य म्हणजे हुंडा असतो तो मुलीला दिला जातो. औपचारिकता म्हणून कमी वधूमुल्य दिले जाते. ते देखील कुवतीनुसार दिले व घेतले जाते असे आढळून आले.

## ब. पुणे जिल्हयातील कातकरी जमातीच्या आर्थिक स्थितीचे निष्कर्ष

पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यासावरून पुढील निष्कर्ष निघाले आहेत.

१. एकूण कातकरी कुटुंबापैकी ९९% कुटुंबे शेतमजूरी करतात व १% कुटुंबे इतर व्यवसाय करतात. सर्वाधिक कातकरी कुटुंबे शेतमजूरही हा व्यवसाय करतात. हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. कारण ज्या ठिकाणी ते स्थायीक आहेत त्या ठिकाणचा शेती हा स्थानिक व्यवसाय आहे. म्हणून शेतमजूरी हा ९९% कातकरी कुटुंबाचा व्यवसाय असल्याचा निष्कर्ष निघतो.

२. कातकरी कुटुंबापैकी ६९% कुटुंबे मासेमारी करतात. मासेमारी हा त्यांचा दुय्यम व्यवसाय असल्याचा निष्कर्ष निघतो कारण जेंव्हा रोजगार उपलब्ध नसतो. तेंव्हा कातकरी कुटुंब नदी, नाले, डबके, बंधारा या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने मासेमारी करतात. मांसाहाराची गरज आणि उत्पन्न या दोन हेतूने मासेमारी केली जाते. त्यात मांसाहाराची गरज महत्वाची असते.

तसेच कातकरी कुटुंबापैकी ७% कुटुंबे कोळसा पाडण्याचा दुय्यम व्यवसाय करीत असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. जेंव्हा स्थानिक पातळीवर शेतीत रोजगार उपलब्ध नसतो तेंव्हा कातकरी कुटुंबे कोळसा पाडण्याच्या व्यवसायासाठी स्थलांतरीत होतात. या व्यवसायासाठी ते जिल्हयाबाहेर स्थलांतरीत होत असल्याचे दिसून आले.

३. कातकरी कुटुंबापैकी १२% कुटुंबे विटा बनविण्याचा दुय्यम व्यवसाय करीत असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. ही कुटुंबे दिवाळीपर्यंत शेतमजुरी करतात त्यानंतर ते विटा बनविण्यासाठी स्थलांतरीत होतात. विटा बनविण्यासाठी दर हजारी याप्रमाणे मोबदला मिळतो. मोबदला कमी असतो. हा व्यवसाय बेकारी काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविण्या इतकाच फायद्याचा असतो असे दिसून आले आहे.

त्याचबरोबर अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटुंबापैकी ३% कुटुंबे इतर व्यवसाय करीत असल्याचा निष्कर्ष निघतो. इतर व्यवसायात बेंजोपार्टी, ड्रायव्हिंग, वाळू उपसणे, ट्रकवर माती भरणे, हातभट्टीची दारु विकणे, हमाली करणे इत्यादींचा समावेश होतो.

४. कातकरी कुटुंबे मासेमारी एक दुय्यम व्यवसाय म्हणून करतात. मासेमारीचा स्त्रोत विचारात घेतला तर ५८% मासेमारी नदीत, तर ११% मासेमारी धरण परिसरात केली जाते. नद्या बारमाही वाहणाऱ्या नसल्याने मासेमारी हंगामी स्वरुपाची असते व ती उत्पन्नाच्या दृष्टीने किरकोळ असल्याचे सिध्द होते. कारण यात व्यावसायिक दृष्टिकोन दिसत नाही.

कातकरी कुटुंबांच्या मस्त्य उत्पादनाची ९५% स्थानिक बाजारपेठ आहे. ५% उत्पादन मात्र कंत्राटदाराला विकले जाते. कातकऱ्यांच्या मासेमारी व्यवसायाची बाजारपेठ मर्यादित आहे व ती प्राथमिक अवस्थेत असल्याचा निष्कर्ष निघतो. निकृष्ट दर्जा उत्पादन कमी व पारंपारिक तंत्र इत्यादी कारणे कारणीभूत ठरतात.

५. एकूण नमुना कातकरी कुटुंबापैकी ५३% कुटुंबांना दारिद्र्य रेषेखाली नांवे नोंदवून दाखले मिळाल्याचे दिसून आले. तर ४७% कुटुंबाची अद्यापही दारिद्र्यरेषेखाली नांवे नोंदली गेली नाहीत. कारण दारिद्र्य रेषेखालील नोंदणी सर्वेक्षणाच्या वेळी जाणीवपूर्वक कातकऱ्याकडे दुर्लक्ष केले जाते स्थानिक प्रशासनालाही त्याची गरज वाटत नाही. त्यामुळे अशी स्थिती दिसते.

तसेच ५९% कुटुंबाला जातीचे दाखले मिळाले आहेत. तर ४७% कुटुंबियांना अद्यापही दाखले मिळाले नाहीत. जातीच्या दाखल्यासाठीच्या प्रक्रियेतील गुंतागुंत, जाचक अटी, कागदपत्राची पुर्तता करणे अशक्य, पुराव्याचा अभाव इ. मुळे ही स्थिती दिसून आली.

६. एकूण कातकरी कुटुंबापैकी ५३% कुटुंबांना रेशनिंगवर अन्नधान्य कमी किंमतीत उपलब्ध करुन देणाऱ्याअंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळाल्याचे

दिसून आले. तर ४७% कुटुंबे अद्यापही या योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचा निष्कर्ष निघतो. दारिद्र्य रेषेखाली नाव नसणे, ग्रामपंचायतीत नोंद नसणे, रेशनिंग कार्ड नसणे इत्यादीमुळे ४७% लोकांना या योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिसते.

तसेच दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना घरकूल बांधण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणारी इंदिरा आवास योजना राबविली जाते. कातकरी कुटुंबापैकी केवळ ४७% कुटुंबानाच त्याचा लाभ मिळाला आहे. ५३% कुटुंबे या लाभापासून वंचित राहिले असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. स्वतःच्या मालकीच्या जागेचा प्रश्न,दारिद्र्यरेषेखाली नाव नसणे, प्राधान्य क्रमाने कातकरी न गणला जाणे ही प्रमुख कारणे आहेत.

७. आदिवासी कुटुबांना लहान मोठा व्यवसाय करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणारी खावटी कर्ज योजना राबविली जाते. एकूण कातकरी कुटुंबापैकी ०७% कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाल्याचे दिसून आले आहे. परंतु ९३% कुटुबांना या योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचे दिसून आले. लाभार्थी खेड, जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील कातकरी कुटुंबे आहेत. ही योजना उपयोजना क्षेत्रापूर्ती मर्यादित असल्यामुळे लाभार्थी कमी असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

तर एकूण कातकरी कुटुंबापैकी २% कुटुंबांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचा निष्कर्ष पुढे आला आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे जातीचा दाखला नसणे, दारिद्र्य रेषेखाली नांव नसणे, कामासाठी स्थलांतरीत होणे, योजना प्रकरणासाठीच्या अटींची पूर्तता करणे शक्य न होणे इत्यादी होत.

८. ३३% कातकरी वस्त्यावर स्वतंत्र कातकरी बचतगट स्थापन झाले होते. २३% कातकरी कुटुंबे बचतगटात सहभागी झाली होती. परंतु प्रत्यक्षात कामासाठी स्थलांतर, प्रचंड व्यसनाधिनता, आर्थिक स्थिती कमकूवत इत्यादी मुळे हे बचतगट बंद पडले आहेत. त्यामुळे बचत गटाच्या लाभ या समाजाला मिळाला नसल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

९. एकूण कातकरी कुटुंबापैकी ३८% कुटुंबात आर्थिक व्यवहाराचा हिशोब तोंडी ठेवला जातो. ३०% कुटुंबे ज्यांच्याकडे कामाला असतात त्यांच्याकडेच हिशोब ठेवतात.७% कुटुबे लेखी हिशोब ठेवत असल्याचे दिसून आले. तर २५% कुटुंबे हिशोब ठेवत नाहीत असेही दिसून आले. कातकरी जामतीची हिशोब पध्दती प्राथमिक अवस्थेत असल्याचा निष्कर्ष निघतो. ही प्राथमिक अवस्थेतील हिशोब पध्दती कातकरी जमातीची कमकुवत अर्थव्यवस्था सिध्द करते.

तर ५७% कुटुंबे खर्च करताना व्यसनावरील खर्चाला पहिले प्राधान्य देतात तर ४३% कुटूंबे जीवनावश्यक वस्तूच्या खर्चाला प्राधान्य देतात. ही कुटुंबे मालकाकडून अनामत घेऊन खर्चाला सुरुवात करतात. कातकरी कुटुंबात खर्चाचे नियोजन असल्याचे दिसत नाही असा निष्कर्ष निघतो.

१०. एकूण कातकरी कुटुंबापैकी ६% कुटुंबांनी सावकाराकडून कर्ज घेतले होते. ८% कुटुंबांनी बँकाकडून, ३६% कुटुंबांनी मालकाकडून कर्ज घेतल्याचे दिसून आले. तर ५०% कुटुंबांना कोणाकडूनही कर्ज मिळाले नसल्याचे दिसून आले.

तारण मालमत्तेचा अभाव, बाजारपेठेतील पत कमी, परतफेडीचा हमी कमी इत्यादी कारणाने कर्जपूरवठा कमी दिसतो.

११. नमुना कुटुंबीयांपैकी ५५% कातकरी कुटुंबे कामासाठी स्थलांतरीत होतात. स्थलांतरीत होणाऱ्यांपैकी ५१% तालूक्यात, १६% कुटुंबे जिल्हयात, तर ३३% कुटुंबे जिल्हयाबाहेर स्थलांतरीत होत असल्याचे दिसून आले.

स्थानिक पातळीवर शेती हंगामी असल्यामुळे शेतमजुरी देखील अल्पकाळ असते. त्यांनतर बेकारी सुरु होते म्हणून कातकरी कुटुंबे विटा बनविणे, कोळसा पाडणे या कामासाठी स्थलांतरीत होतात.

तसेच एकूण कातकरी कुटुंबांपैकी ५३% कुटुंबांना वर्षातून ६–७ महिने रोजगार मिळतो. २४% कुटुंबांना ८–९ महिने, २३% कुटुंबाना वर्षभर रोजगार मिळतो असे दिसून आले आहे. रोजगाराची हंगामी व कमी साधने असल्याने बेकारी अधिक दिसते.

१२. एकूण कातकरी कुटुंबापैकी ४७% कुटुंबाकडे स्वतःचे घर आणि घराची जागा स्वतःच्या मालकीची होती हीच त्यांची स्थावर मालमत्ता होय. कारण ही जमात भूमिहीन आहे. त्यामुळे शेती नाही आणि आर्थिकदृष्ट्या परिस्थिती कमकुवत असल्यामुळे इतर कोणत्याही स्वरुपातील स्थावर मालमत्ता नसल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

१३. एकूण कातकरी कुटुंबापैकी १००% कुटुंबांना कामाचा मोबदला रोख पैशाच्या स्वरुपात मिळत असल्याचे दिसून आले. १०% कुटुंबांना रोख पैशाबरोबर धान्याच्या स्वरुपात मोबदला मिळाला होता. तर ४५% कुटुंबांना

जेवण व ४५% कुटूंबांना जेवणाबरोबर दारु या स्वरुपात मोबदला मिळाला असल्याचे दिसते. म्हणजेच कातकरी कुटुंबांना कामाचा मोबदला कमी देऊन त्याचे शारीरिक व आर्थिक शोषण केले जात असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

१४. कातकरी कुटुंबापैकी ९१% कुटुंबांना दारु पिण्याचे व तंबाखूचे व्यसन दिसून आले. त्यात स्त्री-पुरुष व मुलांचाही समावेश होतो. ६९% कुंटुंबे प्रतिदिनी १५-२० रुपये, १९% कुटुंबे २१-३० रुपये, १०% कुटुंबे ३१-४० रुपये खर्च, तर २% कुटुंबे ४१-५० रुपये व्यसनावर खर्च करीत होते असे आढळून आले. यावरुन कातकरी कुटुंबात प्रचंड व्यसनाधिता असल्याचे दिसून सिध्द होते.

१५. एकूण कातकरी लोकसंख्येपैकी १५-६० वयोगटातील ४८% लोकसंख्या दिसून आली. तर ०-१४ वयोगटातील ५२% लोकसंख्या आढळून आली.

सर्वाधिक लोकसंख्या १४ वर्षापर्यंतच्या वयोगटातील आहे व ती नाकर्ती मानली जाते. १५-६० वयोगटातील लोकसंख्या कर्ती मानली जाते. नाकर्ती लोकसंख्या जास्त असल्याने त्यांचा अनिष्ट परिणाम कातकरी कुटुंबांच्या मागासलेपणा वाढण्यावर झाला आहे.

१६. एकूण कातकरी वस्तीवरील पाण्याच्या स्रोताचे निरिक्षण नोंदविले असता असे दिसून आले की ३९% वस्त्यावर नदी, झरा, बंधारा या जलस्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. ३७% वस्तीवर हातपंपाचे व ९% वस्तीवर

विहीरीचे पाणी, १५% वस्तीवर सार्वजनिक नळाचे पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. यावरुन ८५% वस्त्यावर नैसर्गिक जल स्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते. कातकरी वस्त्या गावापासून लांब डोंगर कपारीत नदी नाल्याच्या कडेवर वसलेल्या असतात. स्थानिक प्रशासनाला त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची गरज वाटत नाही.

तसेच ५७% कातकरी वस्त्या मुख्य रस्त्यापासून अर्धा कि.मी. अंतरावर वसलेल्या आहेत. ३३% वस्त्या एक कि.मी. अंतरावर, १०% वस्त्या २ कि.मी. अंतरावर वसलेल्या आहेत. म्हणजेच मुख्य रस्त्यापासून अर्धा ते एक कि.मी. अंतरावर ९०% वस्त्या वसलेल्या होत्या.

तसेच कातकरी वस्तीचे गावापासून अंतर विचारात घेतले असता ३९% वस्त्या गावापासून अर्धा कि.मी. अंतरावर ४१% वस्त्या एक कि.मी. अंतरावर, १९% वस्त्या २ ते ३ कि.मी. अंतरावर वसलेल्या आढळून आल्या. यावरुन ८०% वस्त्या अर्धा ते एक कि.मी. अंतरावर वसलेल्या होत्या असा निष्कर्ष निघतो.

१७. १५% कातकरी वस्तीवर कातकरी मुलांसाठी स्वतंत्र शाळा होत्या. कातकरी वस्ती असलेल्या गावातील शिक्षण सुविधा विचारात घेतली असता १००% गांवात बालवाडी, ६०% गावात प्राथमिक शाळा, तर २३% गावात उच्च माध्यमिक शाळा, तर १०% गावात कोणतीही शिक्षण सुविधा उपलब्ध नव्हती अशी स्थिती आढळून आली.

कातकरी वस्तीवरील आरोग्य सुविधांच्या निरिक्षणात्मक नोंदी घेतल्या असता १६% गावात प्राथमिक आरोग्य केंद्र, १६% गांवात खासगी दवाखाने,

५% गांवात कुटुंब नियोजन केंद्र आणि ५% गांवात प्रसूती केंद्र होत आणि ५९% गांवात कोणत्याही आरोग्य सुविधा नव्हत्या असे दिसून आले आहे.

तसेच ६४% कातकरी वस्तीपासून आरोग्य सेवा १ ते ५ कि.मी. अंतरावर, १८% वस्तीपासून ६–१० कि.मी. अंतरावर, ११% वस्तीपासून १०.२० कि.मी. अंतरावर आरोग्य सुविधा होत्या. कातकरी वस्त्यावर पुरेशा वैद्यकिय सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याची स्थिती आढळते.

१८. ४७% कुटुंबाच्या घराच्या जागा स्वतःच्या मालकीच्या दिसून आल्या. परंतु ५३% कुटुंबाच्या घराच्या जागा वादातिक असल्याचे दिसून आले. यावरुन ५३% कुटुंबांचे स्वतःचे घर नाही ते कधीही बेघर होऊ शकतात. अभ्यास क्षेत्रात निम्म्या कुटुंबाकडे निवास ही मुलभूत उपलब्ध नाही असा निष्कर्ष निघतो.

नमुना क्षेत्रात ६९% मासेमारी पारंपारिक पध्दतीने केली जाते. धरणांत त्यांना मासेमारीवर निर्बंध घातले आहेत. लिलाव पध्दतीने बिगर आदिवासीना मासेमारीची कंत्राटे दिली जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे कातकरी जमातीच्या उदरनिर्वाहाचे मासेमारी हे साधन धोक्यात आल्याचा निष्कर्ष निघतो.

एकूण कुटुंबापैकी ७०% कुटुंबांना शिधा पत्रिका मिळाल्या आहेत. परंतु ३०% कुटुंबांना अद्यापही शिधा पत्रिका मिळालेल्या नाहीत असा निष्कर्ष निघाला आहे. कातकरी कुटुंबाच्या नोंदी ग्रामपंचायतीत नसणे, जाणीवपूर्वक रेशन कार्ड न देणे ही प्रमुख कारणे दिसून आली.

१९. कातकरी कुटुबापैकी ८०% कुटुंबाच्या कामाच्या मोबदल्याचा दर मालक निश्चित करतो म्हणजेच मनाला वाटेल तो मोबदला देतो. केवळ १५% लोक मोबदला स्वतः ठरवितात. ५% कुटुंबाला मोबदला चालू दरानुसार मिळतो. त्यांच्या श्रमाचे मूल्य त्यांना ठरविता आले नाही व त्यातून त्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे स्पष्ट होते.

२०. नमूना कुटुंबापैकी ३२% कुटुंबाचे उत्पन्न ८०००–११००० रुपये उत्पन्न पातळीमध्ये होते. ११०१ ते १५००० रुपये पातळी असणारी ४३% कुटुंबे होती. तर रूपये १५००१ ते पुढील उत्पन्न पातळी असणारी कुटुंबे २३% होती. तर ५००० ते ८००० रूपये उत्पन्नपातळी असणारी २% कुटुंबे होती. उत्पन्न पातळी कमी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे. उत्पन्नाची अपूरी व अनियमित स्वरुपाची साधने, त्यात कातकरी कुटुंबांचे सततचे स्थलांतर होणे इत्यादी कारणांमुळे उत्पन्न पातळी कमी असल्याचा निष्कर्ष निघतो.

## ६.२ गृहितकाची पडताळणी :

''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास'' या संशोधन विषयाची दिशा ठरविण्यासाठी काही गृहितकृत्य निश्चित करण्यात आली होती. संशोधन कर्ता कशाचा शोध घेतो हे गृहितकृत्य सिध्द करतात. गृहितकृत्य हे अध्यापन विषयाची उद्दिष्ट्ये निश्चित करणारी मापदंड असतात.

गृहितकृत्याची निर्मिती केल्यानंतर त्याचे परिक्षण करणे आवश्यक असते. शास्त्रीय पद्धतीचे संशोधन विषयासंबंधी संकलीत केलेल्या तथ्याच्या आधारावर गृहितकृत्य तपासली जातात. त्यातून संशोधनाचे सत्य असत्य सिध्द होतात. प्रस्तूत संशोधन विषयाचे शास्त्रीय पध्दतीने तथ्य संकलीत करण्यासाठी ८ तालुके, ६४ गावे,

आणि ३८४ कुटुंबे नमुना म्हणून अभ्यासली. त्याचे वर्गीकरण व सांकेतिकिकरण करून निर्वचन केले आणि त्यातून निष्कर्षे काढले. संशोधन विषयाचे निष्कर्षाच्या माध्यमातून सत्य कि असत्य सिध्द झाले हे पाहण्यासाठी गृहितकाची पडताळणी करण्यात आली ती पडताळणी पुढीलप्रमाणे

**१. ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची सामाजिक-आर्थिक विकास प्रक्रिया दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकली आहे.''**

संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार म्हणून ''दारिद्र्याचे दुष्टचक्र'' ही संकल्पना विचारात घेतली आहे. त्याला अनुसरून गृहितकृत्य तपासले असता पुढील स्थिती दिसून आली.

कातकरी जमातीचा सामाजिक-आर्थिक विकास हा दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकला आहे. सामाजिक घटक आर्थिक घटकावर परिणाम करतात आणि आर्थिक घटक सामाजिक घटकावर परिणाम करतात. म्हरजे प्रत्येक घटक कारण व परिणाम ठरतात.

अभ्यास क्षेत्रात कातकरी लोक सण समारंभात दारूला सामाजिक दृष्टीकोनातून अधिक महत्त्व देतात. या घटकातून आज ९१% कुटुंबात व्यसनाधिनता जडली आहे. व्यसनाधिनता कातकरी समाजातील सामाजिक घटक आहे. या घटकाचा आर्थिक स्थितीवर परिणाम होतो.

व्यसनाधिनतेमुळे ३०-५०% उत्पन्न व्यसनावर खर्च होते. त्यामुळे एकूण उपभोग कमी होऊन कार्यक्षमता घटण्यावर त्याचा परिणाम होतो. कार्यक्षमता कमी म्हणून उत्पन्न कमी त्यामुळे आर्थिक ताणतणाव निर्माण होतात. ताणतणाव कमी करण्यासाठी ही कुटुंबे व्यसनाचा आधार घेतात आणि कातकरी कुटुंब दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकते.

कातकरी समाजात स्त्री–पुरूषांपासून मुलांपर्यंत सर्व कुटुंब निकृष्ट दारूच्या आहारी जाते. त्याचा परिणाम त्यांचे आरोग्य धोक्यात येते. शारीरिक तक्रारी वाढतात. त्या तक्रारी कमी करण्यासाठी पुन्हा दारूचा आधार घेतला जातो. त्यातून व्यसनाधिनता वाढते.

कुटुंबाचा आकार मोठा असल्यामुळे कातकरी कुटुंबे दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकली आहेत. अभ्यास क्षेत्रात ३–७ सदस्य संख्या असलेली ८३% कुटुंबे आढळून आली. सरासरी ५ सदस्य असलेली सर्वाधिक म्हणजे ३२% कुटुंबे आढळून आली. ०–१४ वयोगटातील नाकर्ती लोकसंख्या ५२% असल्याचे आढळून आले. याचा भार कुटुंबावर पडतो. मिळणारे उत्पन्न उपभोगासाठी कमी पडते. उपभोग घटून उपासमार होते. त्याचा परिणाम लोकसंख्या वाढण्यावर होऊन कुटुंबाचा आकार पुन्हा वाढण्यावर होऊन कातकरी कुटुंबे दारिद्रयाच्या दुष्टचक्रात सापडली आहेत.

यावरून असा निष्कर्ष निघतो की पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची सामाजिक–आर्थिक विकास प्रक्रिया दारिद्रयाच्या दुष्टचक्रात सापडली आहे. हे गृहितक सत्य ठरले आहे. सामाजिक–आर्थिक विकास प्रक्रिया दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकल्याची वास्तवता या गृहितकाच्या पडताळणीच्या पुढे आली आहे.

**२. ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची शैक्षणिक व आरोग्य स्थिती मागासलेली आहे.''**

अभ्यास क्षेत्रात शास्त्रीय पध्दतीने तथ्य संकलीत केली असता एकूण साक्षरता २७% दिसून आली. त्यापैकी २४% स्त्रीया साक्षर तर ३४% पुरूष साक्षर असल्याचे आढळून आले. एकूण ७३% कुटूंबांमध्ये निरक्षरताआढळून आली. एकूण स्त्रीयांपैकी ७६% स्त्रीया निरक्षर तर एकूण पुरूषांपैकी ६६% पुरूष निरक्षर असल्याचे दिसून आले.

शाळेतील कातकरी मुलामुलींच्या शाळेतील उपस्थितीचा आढावा घेतला असता केवळ १६% मुल–मुली शाळेत नियमित उपस्थित असतात तर ५३% अनियमित उपस्थित असतात तर ३१% मुलामुलींची अद्यापही शाळेत नोंद झालेली नाही.

या सर्व निष्कर्षाविरून कातकरी जमातीची शैक्षणिक स्थिती मागासलेली आहे हे सिध्द झाले आहे.

नमुना क्षेत्रातील कातकरी कुटुंबाची आरोग्य स्थिती अभ्यासली असता ४७% कुटुंबात मलेरिया, २६% कुटुंबात डायरिया, ८% कुटुंबात निमोनिआ व २७% कुटुंबात इतर रोगाचे प्रमाण आढळून आले आहे. आजारी काळात ७०% कुटुंबात घरगुती उपचार घेतला जातो, ४% कुटुंबे मांत्रिकाकडे जातात, १०% कुटुंबे देवाला नवस बोलतात आणि केवळ १६% कुटुंबातील लोक दवाखान्यात जातात. तसेच विविध रोगाने मृत्यू पावलेल्यांपैकी ३२% डायरियाने, १४% निमोनिआने, २४% दारूच्या नशेत, ७% टॉयफॉईडने, ६% टीबी ने, ५% लिव्हर खराब होऊ अशी मृत्यूच्या बाबतीत स्थिती दिसून आली. ७७% कुटुंबातील स्त्रियांचे बाळंतपण घरी तर २३% कुटुंबातील स्त्रीयांचे बाळंतपण दवाखान्यात झाल्याची माहिती पुढे आली आहे.

६४% स्त्रीयांची संतती नियमन शस्त्रक्रिया झालेली नाही. केवळ ३६% स्त्रीयांनी ही शस्त्रक्रिया झाल्याचे आढळून आली. ५७% कुटुंबातील मुलांचे रोगप्रतिबंधक लसीकरण झालेले नव्हते. ९१% कुटुंबात दारूचे व्यसन असल्याचे दिसून आले. ६१% कुटुंबात अस्वच्छ राहणीमान, ६७% घरात अस्वच्छता, ७२% कातकरी वस्ती परिसर अस्वच्छ अशक्ष स्थिती आढळून आली. ५९% कातकरी वस्तीवर कोणत्याही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नव्हत्या.

यावरून पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची आरोग्य स्थिती मागासलेली आहे असा निष्कर्ष निघाला आहे.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी जमातीची शैक्षणिक व आरेग्य स्थिती मागासलेली आहे हे गृहितकृत्य सत्य ठरले आहे.

संशोधन विषयाची गृहितकृत्य सत्य ठरल्यामुळे या विषयाची सामाजिक उपयोगिता वाढण्यास मदत होणार आहे.

## ६.३ शिफारशी

कातकरी जमातीच्या सामाजिक-आर्थिक स्थितीच्या अभ्यासातून जे निष्कर्ष पुढे आले त्यातून या जमातीचे सामाजिक-आर्थिक मागासलेपण सिध्द झाले आहे. त्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी खालील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

### अ. सामाजिक शिफारशी :

१. कातकरी समाजात अधिक निरक्षरता असून शैक्षणिकदृष्टया मागासलेली जमात आहे असा निष्कर्ष निघाला आहे. त्यांची शैक्षणिक पातळी वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे. अंगणवाडी, बालवाडी, खेळघर कातकरी वस्तीवर सुरु करावेत. प्रौढ व निरंतर शिक्षणाचे वर्ग राबवावेत. शासनाने कातकरी मुलांसाठी १० वी पर्यंत स्वतंत्र शाळा सुरु कराव्यात. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करुन कातकरी युवकात कौशल्य निर्माण करावीत म्हणजे त्यांना रोजगाराचे साधन मिळेल. आश्रमशाळा वसतिगृहे सुरु करावीत तसेच विविध शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक साहित्य वाटप योजना यासारख्या शैक्षणिक योजना राबवाव्यात. यामध्ये स्वयंसेची संस्था यांची भूमिका महत्वाची ठरेल.

२. व्यसनाधिनता हा कातकरी जमातीच्या आर्थिक, सामाजिक विकासातील मोठा अडथळा ठरला आहे. त्यामुळे त्यांच्यातील व्यसनाधितनता कमी करणे महत्वाचे आहे. त्यासाठी सेवाभावी आरोग्य संस्थांनी कातकरी वस्त्यांवर व्यसनमुक्ती केंद्रे स्थापन करावीत. व्यसने आरोग्याच्या दृष्टीने घातक आहेत तसेच आर्थिक विकासात अडथळा निर्माण करतात. समाजातील पत कशी कमी होते, यामुळे अनेक पिढ्या बरबाद झाल्या आहेत यासंबंधी समोपदेशन करावे. एक एक कातकरी वस्ती दत्तक घ्यावी.

तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सेवाभावी संस्था व बचतगटाच्या सहाय्याने पोस्टर्स, स्लाईड शो फिल्म या माध्यमाने मद्यपानाचे दुष्परिणाम संबंधी प्रबोधन करावे.

गांवातील सरपंचाने व्यसनमुक्ती समिती गठीत करावी. त्या समितीने व्यसन मुक्तीसंबंधी जागृती करावी. हातभट्टी व्यवसाय बंद करोवत. महिला मंडळांनी व्यसन मुक्तीसाठी सहकार्य करावेत.

आदिवासी भागात करमणुकीची साधने व पारंपारिक कलांना उत्तेजन द्यावे जेणे करुन व्यसनाकडे दुर्लक्ष होईल.

३. कातकरी जमातीत अल्पवयीन विवाहाची प्रथा दिसून आली आहे. त्याचा परिणाम आरोग्य व कुटुंब व्यवस्था कमकुवत राहण्यावर होतो. तसेच प्रजोत्पादन काळ वाढून कुटुंबाचा आकार वाढतो आणि अल्पवयीन वृध्दत्व येते.

आरोग्य विभागाने अल्पवयीन विवाह किती अयोग्य आहेत यांसंबंधी समोपदेशन करावे. तसेच सामाजिक, संस्थांनी सामुदायिक विवाह समारंभ

आयोजित करावे आणि त्यात कायद्याने घालून दिलेल्या लग्नाच्या वयाची अट अनिवार्य करावी. त्यामुळे अल्पवयीन विवाह थांबतील.

कातकरी जमातीत रुढी परंपरा अंधश्रध्दा जादूटोना या गोष्टींचे अस्तित्व दिसते व त्याचा परिणाम त्यांच्या सामाजिक विकासावर झाला आहे.

त्यासाठी अंधश्रध्दा निर्मूजन समितीने कातकरी वाड्या वस्त्यावर समित्या स्थापन कराव्यात आणि अंधश्रध्दा निर्मूलनाचे सतत वेगवेगळे प्रयोग करुन दाखवावेत. त्यामुळे या समाजात नवे तेज निर्माण होऊन वैज्ञानिक दृष्टी येऊन अंधश्रध्दा कमी होण्यास मदत होईल.

४. कातकरी जमातीत कुटुंबाचा आकार मोठा दिसतो. तसेच नाकर्त्या लोकसंख्येचे प्रमाणही अधिक दिसते. त्यामुळे कुटुंबाच्या सामाजिक आर्थिक विकासावर त्याचा परिणाम दिसून आला आहे. त्यासाठी कातकरी कुटुंबांना लोकसंख्या शिक्षणाचे महत्व आरोग्य संस्थांनी पटवून द्यावे, लोकसंख्या निमंत्रणासाठी महाविद्यालयीन युवकांनी पथनाट्य, एकांकीका कातकरी वस्तीवर सादर कराव्यात तसचे गर्भनिरोधक साधनाचा वापर व प्रसार करण्यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घ्यावा. तसेच संतती नियमन शस्त्रक्रियेसंबंधीचे गैरसमज आणि भिती यासंबंधी जागृती घडवून आणावी.

५. कातकरी मुलांनी शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी सामाजिक संस्थांनी कातकरी शाळेत वस्तीवर खेळ घर सारखे उपक्रम मुलांची शाळेतील गोडी वाढविण्यासाठी सुरु करावीत.

कातकरी मुलांसाठी स्वतंत्र शाळा हा उपक्रम अतिशय संयुक्तिक आहे. या शाळांची संख्या वाढविण्यासाठी जिल्हा परिषद, सामाजिक संस्था, शासन

यांनी पुढाकार घ्यावा. १० वी पर्यंत या शाळा असाव्यात त्यामुळे साक्षरता वाढून समाजाच्या मुख्य प्रवाहात ही मुले सहभागी होतील.

६. आरोग्य विभागाने कातकरी वस्तीवर फिरता दवाखाना सुरु करावा, आरोग्य पथके स्थापन करावीत, सामाजिक संस्थांनी आरोग्यासंबंधी जनजागृती करण्यासाठी दृकश्राव्य फिल्म दाखवाव्यात. आरोग्यासंबंधी समोपदेशन करावे जेणे करुन आरोग्य जाणीवा जागृत होऊन रोगाचे प्रमाण कमी होईल.

उपचाराच्या बाबतीत कातकरी जमातीत निष्काळजीपणा, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यांचे प्रमाण अधिक दिसते.

सामाजिक संस्थांनी उपचारासंबंधी जनजागृती घडवून आणण्यासाठी कलापथके स्थापन करावीत. वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उपचाराकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे काय परिणाम होतात यासंबंधीची प्रात्यक्षिके करून दाखवावीत व दृकश्राव्य साधनाच्या सहाय्याने परिणामांची जाणीव करून द्यावी.

७. कातकरी कुटुबापैकी ७७% स्त्रियाचें बाळंतपण घरी झाले आणि २३% स्त्रियांचे बाळंतपण दवाखान्यात झाल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

यावरुन घरी बाळंतपण होणाऱ्या स्त्रीयाचें प्रमाण सर्वाधिक आहे. यामुळे बाळंतपणादरम्यान अनेक अपघात होतात. बाळ किंवा आई यांना धोका निर्माण होतो.

ते टाळण्यासाठी आरोग्य विभागाने संबंधित क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहाय्याने गरोदर स्त्रीयांचे सर्वेक्षण करावे. त्यांना बाळंतपण

दवाखान्यात करण्यासाठी समोपदेशन करावे. तसेच फिरत्या दवाखान्याची व्यवस्था यासाठी उपयोगी ठरले. तसेच कातकरी वस्तीवरील वयस्कर स्त्रिया ज्या बाळंतपण करतात त्यांना दायीचे प्रशिक्षण व त्यासाठीचे साहित्य किट उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन घरातील बाळंतपणातील धोके टळतील.

कातकरी जमातीतील शस्त्रक्रिया न झालेल्या स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. तसेच पुरुष नसबंदीचे प्रमाण दिसत नाही. कुटुंबनियोजनाचे प्रमाण कमी आहे त्यामुळे कुटुंबाचा आकार मोठा आहे असे दिसते.

शस्त्रक्रिया आणि नसबंदी यासंबंधी पथनाट्याच्या रुपाने कातकरी जमातीतील कुटूंबाची जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. तसेच कुटुंब नियोजन करण्यासाठी लोकसंख्या शिक्षण या कुटुंबापर्यंत पोचविणे आवश्यक आहे. जेणे करुन वाढत्या लोकसंख्येचे परिणाम लक्षात येतील आणि शस्त्रक्रिया आणि नसबंदीचे प्रमाण वाढेल. यामध्ये आरोग्यावर काम करणाऱ्या संस्थांनी पुढाकार घ्यावा.

८. कातकरी वस्तीवर प्रचंड प्रमाणात अस्वच्छता असल्याचे दिसते. महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजनांची हिवाळी निवासी शिबीरे कातकरी वस्तीत आयोजित करावीत. वस्तीवर स्वच्छता करावी. तसेच स्वच्छतेच्या बाबतीत पथनाट्याच्या माध्यमाने जनजागृती घडवून आणावी. अशा वस्त्या दत्तक घ्याव्यात.

जिल्हा परिषदेने हागणदारी मुक्त योजनेंतर्गत कातकरी वस्तीवर स्वच्छतागृहाची सुविधा बांधण्यासाठी जाणीवपूर्वक लक्ष घालावे. तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

९. कातकरी स्त्री ही पुरुषा इतकीच कर्तबगार असते. संसार खरा तिच्यावर टिकून असतो. तिची आकलन शक्ती, जिज्ञासा श्रेष्ठ असते, परंतु त्यांचा बाह्य जगातील घडामोडींशी किंवा ज्ञानाशी संपर्क नसतो. तिला साक्षर व जागृत करणे आवश्यक आहे. त्यासाठी मुली व प्रौढ स्त्रियांच्या बाबतीत विविध प्रबोधनपर जाणीव जागृतीचे प्रकल्प राबविण्यात यावे. त्यात प्रामुख्याने महिलांसाठी प्रौढ शिक्षण केंद्र, अनौपचारिक शिक्षण केंद्रे, स्वच्छता आरोग्य यावर माहिती देणारे कार्यक्रम माता व बालकांसाठी सकस आहार व त्याचे महत्व, बालकांची निगा, रोगराई प्रतिबंधक उपाययोजना व इतर अनेक बाबतीत कातकरी महिलांचे प्रबोधन करण्यात यावे.

## ब. आर्थिक शिफारशी

१. कातकरी कुटूंबे भूमिहीन असल्याचे दिसून आले. भूमिहीन शेतमजूरासाठी शेतजमीन वाटपाची ''स्वाभिमान'' ही योजना शासनाने जाहिर केली होती. त्या योजनेची अंमलबजावणी करावी. त्यात विशेषत्वाने कातकरी कुटुंबांना प्राधान्य द्यावे. जेणे करुन कातकरी कुटुंबांना उत्पन्नाचा भक्कम मार्ग उपलबध होईल आणि त्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा होईल आणि कामासाठी होणारे स्थलांतर थांबेल.

२. कातकरी कुटुंबे मासेमारीचा दुय्यम व्यवसाय पारंपारिक पध्दतीने करतात. त्याचे प्रमाण कमी कमी होत आहे. कातकरी लोकांना विना अट व अनिर्बंध मासेमारी करण्यास परवानगी द्यावी, धरणातील मासेमारीचे लिलाव कंत्राट कातकरी लोकांनाच द्यावेत. तसेच मासेमारीसाठीची ''जाळी पुरवठा''

योजना पुन्हा सुरु करावी. जेणे करून मासेमारी व्यवसायात चांगले उत्पन्न मिळवून देणारा स्त्रोत बनेल.

३. उपयोजना क्षेत्र वगळता इतर तालुक्यातील कातकरी कुटुंबांना वनवस्तू संकलन करता येत नाही. त्यामुळे जंगलावरील त्यांची अर्थव्यवस्था नष्ट होत असल्याचे आढळून आले.

कातकरी वस्ती असलेल्या गांवातील वनव्यवस्थापन समिती व पाणलोट विकास समिती यांनी वनाची व पाणलोट क्षेत्र विकासाची कामे प्राधान्याने कातकरी कुटुंबांना द्यावीत. वनविभागाने तशी विशेष तरतूद करावी. जेणे करुन कातकरी कुटुंबांना रोजगार उपलबध होईल आणि त्यांच्या आर्थिक अडचणी कमी होऊन जीवन स्थिर होण्यास मदत होईल. तसेच वन विभागाने कातकरी ही आदिम जमात समूहातील एक जमात असल्याने त्यांना वनक्षेत्रातील वनवस्तू संकलनासाठी पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. तसेच खुल्या बाजारात वनवस्तू विक्रीसाठी परवानगी द्यावी.

४. कातकरी कुटुंबे विटा बनविण्यासाठी स्थलांतरीत होतात. तेथे त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा व सुरक्षितता नसतात. तसेच मिळणारा मोबदला कमी असतो. त्यातही मालक त्यांचे शोषण करतो.

त्यासाठी सामाजिक संस्था, कातकरी समाज विकास संघटना यांनी वीट मजूराचे संघटन करावे. त्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी संघर्ष करावा. शासनाने या मजूरासाठी आरोग्य विमा योजना सुरु करावी. वीटभट्टी मालकांनी सामाजिक सुरक्षिततेच्या निवास, शुध्दपाणी, वीज, वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध करुन द्याव्यात. त्यांना मारहाण करु

नये, तसेच त्यांचे आर्थिक शोषण करु नये. माथाडी कामगार संघटनांनी वीटभट्टी मजूरांना पाठिंबा द्यावा. जेणेकरुन वीट मजूरातील कातकरी कुटुंबाचे शोषण थांबेल आणि योग्य मोबदला मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

शासनाने कातकरी कुटुंबाकडील विटा बनविण्याच्या तंत्राचा विचार करुन त्यांना विटभट्टी सुरु करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व त्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

५. कातकरी कुटुंबे पशुपालन हा व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले.त्यात प्रामुख्याने शेळीपालन दिसून आले. परंतू प्रत्यक्षात शेळी पालनाचे तंत्र, व्यवस्थापन, आरोग्याची दक्षता या बाबींचा अभाव असल्याचे दिसून आले. त्यासाठी शेळीपालन प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमाने कातकरी कुटुंबांना शेळी पालनाचे प्रशिक्षण द्यावे व शेळी पालनाचा प्रकल्प विकसित करण्यासाठी त्या संस्थांनी मदत करावी तसेच बँकांनी अशा प्रकल्पांसाठी विशेष अर्थ सहाय्य उपलब्ध करुन द्यावे जेणे करुन कातकरी कुटुंबांना रोजगाराचा व उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध होईल.

६. काही कातकरी कुटुंबांचे आजही दारिद्र्य रेषेखालील नांव नोंदणी झाल्याचे दिसून आले नाही. प्रत्यक्षात कातकरी जमात केंद्र शासनाने घोषित केलेल्या आदिम जमात समूहापैकी एक आहे. तसेच आदिवासी जमातीतील सर्वात मागासलेली जमात म्हणून ओळखली जाते. म्हणून शासनाने विशेष मोहिम राबवून दारिद्र्य रेषेखालील कातकरी कुटुंबांना वर आणण्यासाठी

''विशेष कल्याण'' योजना राबवाव्यात. त्यात त्यांना कायम स्वरूपी रोजगार देणाऱ्या अर्थसहाय्य व प्रशिक्षण योजना सामाविष्ट कराव्यात.

कातकरी कुटुंबापैकी काही कुटुंबांना जातीची दाखले अद्यापही मिळालेले नाहीत. त्यामुळे कातकरी कुटुंबांना शासकीय योजनाच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे दिसून आले. जातीच्या दाखल्यासाठीचे दस्तऐवजे व पुरावे सादर करणे शक्य नसल्यामुळे दाखल्याचा हा प्रश्न निर्माण झाला आहे.

म्हणून सरकारने विना अट जातीचे दाखले द्यावेत. तसेच ते पडताळणी करुन द्यावेत. जेणे करुन कातकरी जमातीला शासकीय विकास योजनांचा लाभ मिळेल आणि विकास पातळी उंचावण्यास मदत होईल.

७. कमी किंमतीत अन्नधान्य उपलबध करुन देणाऱ्या अंत्योदय अन्न योजनेपासून अनेक कातकरी कुटुंबे वंचित राहिली आहेत. त्यासाठी शासनाने या योजनेची व्याप्ती वाढवावी. अन्नधान्याचा कोटा वाढवावा. तसेच गहू, तांदूळ या बरोबर खाद्यतेल व डाळी देखील रेशनिंगवर या योजने अंतर्गत उपलब्ध करुन द्याव्यात. आदिम जमात म्हणून त्यांना निकषात थोडी शिथिलता द्यावी. जेणेकरुन त्यांना पोषक आहार मिळेल आणि आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल.

कातकरी कुटुंबापैकी ४७% कुटुंबांना इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळाला होता. कातकरी लोकांच्या घराच्या जागेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे अनेक कुटुंबे इंदिरा आवास योजनेच्या लाभापासून वंचित राहिली आहेत. म्हणून महाराष्ट्र शासनाने ''राहिल त्याचे घर'' या २९ मे २००८ रोजीच्या जाहिरनाम्यानुसार कातकरी लोकांना घराची मालकी द्यावी. जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घेऊन हा जाहिरनामा व कुळकायदा याच्या आधारे जागेचा

प्रश्न सोडवावा. तसेच इंदिरा आवास योजनेत कातकरी कुटुंबांना प्रथम प्राधान्य द्यावे.

८. कातकरी वस्तीवर बचत गट स्थापन झाले होते. परंतु फार काळ हे बचतगट चालू शकली नाहीत असे दिसून आले. म्हणून कातकरी कुटुंबांना बचतीच्या सवयी लावण्यासाठी बचतगटाची चळवळ जोमाने राबवावी. स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन प्रत्येक कातकरी वस्तीवर बचतगट स्थापन करावेत. या संस्थांनी बचतगटाचे महत्व कातकरी कुटुंबात रुजवावेत. तसेच शासनाने व विशेषतः सहकार विभागाने बचतगट स्थापन करण्यासाठी स्वयंसेवी संस्था प्रोत्साहन द्यावे.

तसेच राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांनी बचत गटाला सवलतीत कमी व्याजदराने कर्जपुरवठा करावा जेणे करुन कातकरी कुटुंबाची बचत पातळी वाढून आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

कातकरी कुटुंबाच्या आर्थिक मागासलेपणामुळे त्यांना पुरेसा कर्ज पुरवठा उपलब्ध होत नाही असे दिसून आले. म्हणून त्यांना छोटे मोठे व्यवसाय करण्यासाठी शासनाने विशेष अर्थसहाय्य कर्ज योजना राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमाने राबवावी. सवलतीत आणि कमी व्याजदराने कातकरी लोकांना कर्जपुरवठा करावा. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील संस्थांकडून होणारी पिळवणूक थांबेल. कर्जाचा उत्पादक कार्यासाठी वापर होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

९. कातकरी कुटुंबे कामासाठी स्थलांतरीत होणे हा बेकारी काळातील उदरनिर्वाह मार्ग आहे असे दिसून आले. म्हणून शासनाने कातकरी कुटुंबाचे

स्थलांतर रोखण्यासाठी त्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करुन द्यावा. कर्जाच्या रुपाने व्यवसाय संधी द्याव्यात. रोजगार हमी योजनेत त्यांना काम द्यावे. गांवातील वनसमितीने कातकरी कुटुंबांना वनक्षेत्रातील कामे द्यावेत. गांवाविषयी आत्मियता निर्माण करण्यासाठी गांवात त्यांना स्वतःचे घर द्यावेत. त्यांना गांव कारभारात सहभागी करुन घ्यावे. आपल्या गावाविषयीची आत्मियता वाढून स्थलांतरण थांबण्यास मदत होईल.

१०. कातकरी शेतमजूरांना रोख पैशाबरोबर दारू व जेवण या स्वरूपात मोबदला दिला जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांची आर्थिक, शारिरीक पिळवणूक होत असल्याचे आढळून आले. म्हणून कातकरी संघटनांनी व सामाजिक संस्थांनी मोबदला रोख स्वरुपात घ्यावा यासंबंधी कातकरी कुटुंबाचे प्रबोधन करावे. त्यात होणाऱ्या शोषणाची त्यांना जाणीव करून द्यावी.

तर शासनाने कातकरी कुटुंबांना कामाचा मोबदला म्हणून दिल्या जाणाऱ्या दारुवर बंदी घालावी. कामाचा मोबदला म्हणून दारु देणाऱ्यावर फौजदारी खटले भरावेत. जेणे करुन कातकरी जमातीची शारिरीक व आर्थिक पिळवणूक थांबेल.

११. कातकरी कुटुंबात प्रचंड प्रमाणात व्यसनाधिनता वाढून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम त्यांची आर्थिक स्थिती खालावण्यावर होत असल्याचे दिसून आले. म्हणून यासाठी जिल्हा ग्रामीण यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सेवाभावी संस्थांनी आरोग्य विभागाच्या सहाय्याने

पोस्टर्स, स्लाईड शो, लघुपटच्या माध्यमाने मद्यपानाचे दुष्परिणाम या संबंधी प्रबोधन करावे.

गांवातील प्रशासकीय यंत्रणेने व वनसमितीने स्थानिक पातळीवर कातकरी कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन त्यांचे आर्थिक ताणतणाव कमी होऊन व्यसनाधिनता कमी होण्यास मदत होईल.

महिला मंडळे व महिला बचत गटाद्वारे कातकरी महिलांनी दारुच्या दुष्परिणामांसंबंधी जागृती करावी. त्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीची गोळा बेरीज करुन याकडे त्यांचे लक्ष वेधावे.

आदिवासी भागात करमणुकीचे साधने व पारंपारिक कलांना उत्तेजन द्यावे जेणेकरुन ते व्यसन करणार नाहीत. त्यांचे लक्ष दुसरीकडे वेधले जाईल.

१२. कातकरी कुटुंबांना निवासाच्या पुरेशा सुविधा नसल्यामुळे अनेक कुटुंबे उघड्यावर रहात असल्याचे दिसून आले. म्हणून सामाजिक संस्थांनी श्रीमंत देणगीदारांच्या आधाराने एक एक कातकरी वस्ती दत्तक घ्यावी. इंदिरा आवास योजनेंतर्गत विशेष तरतूद करून कातकरी कुटुंबांना प्रधान्य द्यावे जेणेकरुन निवास व्यवस्था भक्कम होईल.

कातकरी कुटुंबापैकी २५% कुटुंबांच्या घरात विद्युतप्रकाश होता. म्हणजेच ७५% घरात वीज कनेक्शन नव्हते असा निष्कर्ष निघतो. कातकरी घरे आणि वस्त्या आजही वीज सेवेपासून वंचित राहिल्याचे द्विसन आले. म्हणून सौर दिव्याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी आपल्या उत्पादनाच्या जाहिरातीचा एक भाग म्हणून आणि दुसरीकडे सामाजिक कार्य म्हणून कातकरी वस्तीवर व कातकरी घरात सौरउर्जेची दिवे विनामूल्य लावावेत

त्यामुळे वस्तीवर प्रकाश येईल आणि पिढ्यानूपिढ्या अंधारात राहणारी कातकरी वस्ती प्रकाशमय होईल.

१३. अभ्यास क्षेत्रातील कातकरी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याचा स्रोत विचारात घेतला असता नदी, नाले, झारा, बंधारा, या स्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरले जात आहे. कातकरी वस्ती वरील पिण्याच्या पाण्याची सुविधा समाधानकारक नाही. दुषित पाण्यामुळे वस्तीत अनेक रोगाचे अस्तित्व आढळून आले.

म्हणून जिल्हा प्रशासन, तालुका प्रकाशन व स्थानिक प्रशासनाने कातकरी वस्तीवर शुध्द पाणी सुविधा उपलब्ध करुन द्यावी. सार्वजनिक नळाची व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने पावसाळ्यात पाणी शुध्द करणारी औषधे उपलब्ध करुन द्यावी. जेणे करुन दुषित पाण्यामुळे होणारे रोग थांबतील.

कातकरी वस्तीवर जाण्यासाठी रस्त्याची सुविधा नाहीत असे दिसून आले. म्हणून बांधकाम विभागाने व गावच्या सरपंचांनी कातकरी वस्तीवर जाणाऱ्या रस्त्याचे प्राधान्यक्रमाने काम करावे यासाठी नाबार्डकडून ग्रामीण विकास योजनेचे अर्थसहाय्य घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी. जेणेकरुन कातकरी वस्तीवर रस्ते तयार होऊन त्यांची होणारी गैरसोय टाळण्यास मदत होईल.

१४. काही कातकरी कुटुंबांना अद्यापही शिधा पत्रिका मिळालेल्या नाहीत. यामुळे रेशनिंगवर धान्य मिळत नाही. तसेच कोणत्याही शासकीय योजनांचा फायदा घेता आला नाही. म्हणून कातकरी कुटुंबांना विशेष मोहिम राबवून

शिधा पत्रिका द्याव्यात. सार्वजनिक धान्य वितरण विभागाकडून कातकरी वस्तीवर जाऊन शिधा पत्रिका वितरीत कराव्या.तसेच शिधापत्रिकेसाठी लागणारी कागदपत्रे यात शिथिलता द्यावी. जेणे करुन कातकरी लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळेल.

१५. अभ्यास क्षेत्रातील खेड, आंबेगाव, जुन्नर, मावळ या तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र आहे. परंतु इतर तालुके उपयोजना क्षेत्राबाहेर आहेत. त्यामुळे उपयोजना क्षेत्राबाहेरील कातकरी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ फार कमी प्रमाणात मिळाला असल्याचे दिसून आले. म्हणून पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटुंबे वास्तव्य करीत असलेल्या सर्वच तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र जाहिर करावेत. जेणे करुन अभ्यास क्षेत्रातील सर्वच कातकरी लोकांना समान लाभ मिळण्यास मदत होईल.

१६. कातकरी जमात ही केंद्र शासनाने घोषित केलेल्या आदिम जमात समूहापैकी एक आहे. परंतु सामाजिक, आर्थिक स्थिती मात्र मागासलेली आहे. म्हणून राज्यशासनाने कातकरी जमातीचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा, त्यासाठी भक्कम आर्थिक तरतूद करावी. तसेच विकास योजनांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी. जेणेकरुन त्याची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.

## ६.४ सारांश

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या विश्लेषणातून निघालेल्या निष्कर्षाचा व त्याच्या आधारावर सुचविण्यात आलेल्या शिफारशींचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरणाच्या पहिल्या भागात अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबे ही मुळची रायगड जिल्ह्यातील आहेत म्हणून ते सोन कातकरी या पोटजातीतील आहेत. ते जन्मापासून येथे वास्तव्यास आहेत. २०–४० वर्षांपासून त्यांच्या ग्रामपंचायतीत नोंदी आहेत. ०–१४ वयोगटातील सदस्य संख्या ५१% असून १५–६० वयोगटातील ४९% सदस्य संख्या त्यांच्या कुटूंबात दिसून आली. ५ सदस्य असलेल्या कुटूंबांचे सर्वाधिक प्रमाण दिसून आले. स्त्रीपुरूष प्रमाणात दर हजार पुरूषांमागे १०४१ स्त्रीया असे आढळून आले. या समाजात विभक्त कुटूंब पध्दती अधिक प्रमाणात प्रचलित आहे.

अभ्यास क्षेत्रात ७१% निरक्षरता व २९% साक्षरता या समाजात आढळून आली. मलेरिया, डायरिया, निमोनिआ, गोवर, धनुर्वात या रोगांचे प्रमाण अधिक असून याच रोगांनी अनेक लोक मृत्यू पावल्याचा निष्कर्ष निघाला आहे. आरोग्याच्या बाबतीत या समाजात मोठ्या प्रमाणात अज्ञान व निष्काळजीपणा दिसून येतो. रूढी, परंपरा, दैवी वृत्ती, जादू टोणा यांचे समाजावर वर्चस्व असल्याचे दिसते. व्यसनाधिनतेने या समाजाला ग्रासलेले आहे. दारू व तंबाखू ही दोन प्रकारची व्यसने लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत जडल्याचे आढळून आले. लहान वयातच विवाह केले जातात. सामाजिक दृष्टीकोनातून हा समाज आजही मागासलेल्या अवस्थेत आहे असा अंतिम निष्कर्ष निघाला आहे.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबांचा मुख्य व्यवसाय शेतमजूरी आहे. मासेमारी, कोळसा पाडणे, विटा बनविणे, वनवस्तू संकलन, पशुपालन हे दुय्यम व्यवसाय असल्याचे दिसून आले. ५३% कुटूंबे दारिद्र्यरेषेखाली नोंदली गेली आहेत. ४७% कुटूंबांना अद्यापही दाखले मिळालेले नाहीत. तसेच ५३% कुटूंबे इंदिरा आवास

योजनेच्या लाभापासून वंचीत राहिली आहेत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कातकरी कुटूंबांना खावटी कर्ज एकाधिकार खरेदी योजना, घरगुती गॅस वाटप योजना, या योजनांचे लाभ कमी प्रमाणात मिळाले आहेत. कातकरी वाड्या वस्त्यांवर बचत गट स्थापन झाले परंतू ते लवकर बंद पडले. मालक व सावकाराकडून कर्जपुरवठा अधिक प्रमाणात झाला आहे. कातकरी वस्तीवर पुरेशा मुलभूत सेवा सुविधांचा अभाव दिसून आला. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, विजेचा प्रश्न, रस्त्यांचा प्रश्न, घराच्या जागेचा प्रश्न, जातीच्या दाखल्याचा प्रश्न, इ. मुळे हा समाज आजही प्राथमिक अवस्थेत जीवन जगत आहे.

कातकरी कुटूंबाची आर्थिक, शारिरीक, मानसिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात शोषण होत असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. ८000-१५000 रूपयांपर्यंत उत्पन्न पातळी असणारी ७५% कुटूंबे आढळून आली. या समाजाचा स्वतंत्र व कायम स्वरूपी उत्पन्न देणारा एकही मार्ग नाही. काळाच्या ओघात ही जमात आपला व्यवसाय बदलत आली आहे. एकूण दारिद्र्य, गरिबी, व्यसनाधिनता, शोषण या दुष्टचक्रात ही जमात अडकली आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागासलेपण अधिक असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.

प्रकरणाच्या दुसऱ्या भागात गृहितकाची पडताळणी करण्यात आली आहे. ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीची सामाजिक-आर्थिक विकास प्रक्रिया दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकली आहे.'' हे गृहितक पडताळणी करताना वास्तव स्थितीचा आढावा घेतला असता, कातकरी समाजातील प्रचंड व्यसनाधिनता, कुटूंबांचा मोठा आकार, नाकर्त्या वयोगटातील सदस्य संख्येचे अधिक प्रमाण इ.मुळे ही कुटूंबे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकली आहेत हे सिध्द होते. तसेच ''पुणे जिल्ह्यातील कातकरी कुटूंबात २७% साक्षरता तर ७३% निरक्षरता दिसून आली. एकूण पुरूषांपैकी ३४% पुरूष साक्षर तर एकूण स्त्रीयांपैकी २४% स्त्रीया साक्षर होत्या. तसेच

कातकरी मुलांची शाळेतील उपस्थिती केवळ १६% होती. ५३% अनुपस्थितीत ३१% मुले कधीच शाळेत न गेलेली आढळून आली. यावरून शैक्षणिक स्थिती मागासलेली आहे हे सिध्द होते.

तसेच कातकरी कुटूंबांची आरोग्य स्थिती पडताळली असता मलेरिया, डायरिया, निमोनिआ या रोगांचे प्रमाण अधिक, तांत्रिक, मांत्रिक, बुवाबाजी, देवाला नवस बोलणे, जादूटोणा यावर या समाजाचा जास्त विश्वास आणि अस्वच्छता यामुळे आरोग्यस्थिती मागासलेली असल्याचे आढळून आले. म्हणून हे गृहितक देखील सकारात्मक असल्याचे सिध्द झाले आहे.

प्रकरणाच्या तिसऱ्या भागात निष्कर्षांच्या आधारावर कातकरी समाजात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

अभ्यास क्षेत्रातील कातकरी कुटूंबातील शैक्षणिक मागासलेपणा कमी करण्यासाठी शिक्षणाविषयीच्या जाणीवा निर्माण करणे, स्वयंसेवी संस्थांनी अंगणवाडी, खेळघर, बालवाडी सुरू कराव्यात, शासनाने कातकरी मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरू कराव्यात, शाळांमध्ये रोजगार निर्माण करणाऱ्या व्यावसायिक, तांत्रिक शिक्षण पध्दतीचा अवलंब करावा अशा शिफारशी केल्या आहेत.

व्यसनाधिनता कमी करण्यासाठी आरोग्य संस्थांनी कातकरी वस्तीवर व्यसनमुक्ती केंद्रे सुरू करावीत. अंधश्रध्दा कमी करण्यासाठी कातकरी वस्त्यांवर अधश्रध्दा निर्मुलन समितीने शाखा स्थापन कराव्यात. कातकरी वस्त्यांवर आरोग्य विभागाने फिरता दवाखाना सुरू करावा. आरोग्य जाणीव जागृती घडवून आणावी. महिला सबलीकरणासाठीचे विविध उपक्रम राबविले पाहिजेत.

भूमिहीन शेतमजूर कातकरी कुटूंबांना शासनाने 'स्वाभिमान' योजनेतून शेतजमीनी द्याव्यात. धरणातील मासेमारीचे कंत्राट त्या त्या परिसरातील कातकरी लोकांना द्यावे. जंगलातील वस्तू संकलनावरील निर्बंध काढावेत. विट कामगारांची

स्वयंसेवी संस्थांनी संघटना करावा व त्यांची पिळवणूक थांबवावी. अतिमागास कातकरी लोकांना जिल्हाधिकारी यांनी विनाअट जातीचे दाखले द्यावेत. बचतगट चळवळ वस्त्या वस्त्यांमध्ये रूजवावी. स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा. कातकरी वस्त्या दत्तक घेऊन स्वयंसेवी संस्थांनी तेथे मुलभूत सेवासुविधा विकसित कराव्यात. विशेष मोहिमेअंतर्गत कातकरी कुटूंबांना शिधापत्रिका वाटप कराव्यात. कातकरी वस्त्या असलेल्या सर्वच तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र शासनाने घोषित करावे.

या सर्व शिफारशींचा सकारात्मक दृष्टीने विचार करून त्याची अंमलबजावणी केली तर कातकरी समाजाच्या विकासाला वाव मिळेल.

# सामान्य संदर्भ सूची


- आत्रे त्रिं. ना., ''गुन्हेगारी जमाती'', वरदा बुक्स, पुणे, १९९०.
- आगलावे प्रदीप, ''संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'', विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.
- कुलकर्णी शौनक श्रीनिवास, ''आदिम'', सन पब्लिकेशन, पुणे, २००२.
- कुमरे सुनिल, ''तिरकामठा'', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, १९९९.
- केदार अभिमन्यू, ''अकोले तालुक्यातील महादेव कोळी समाजाचा विकास'', विद्यानिष्णात प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८६.
- कन्नाके गोविंद, ''वनवा एकलव्याची'', हाकारा, वर्ष १३ वे, अंक १ व २, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जानेवारी - जून १९९२.
- कुळमेथे मारूती, ''देवकी पोटवडली'', हाकारा, वर्ष १२ वे, अंक ३, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जानेवारी - जुलै, सप्टेंबर १९९१.
- कोठावदे सुधीर, ''मावची : बोली समाज आणि संस्कृती'', आशापुरी प्रकाशन, औरंगाबाद, २०००.
- गारे गोविंद, ''अनुभूती'', आदिम प्रकाशन, पुणे, १९९४.
- गारे गोविंद व जोशी सुधीर (संपादक), ''आदिवासी लोकगीते'', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९८५.
- गारे गोविंद, ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.
- गारे गोविंद, ''सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी'', सहाध्याय प्रकाशन, मुंबई, १९७४.
- गारे गोविंद, ''महाराष्ट्राती अनुसुचित जाती आणि अनुसुचित आदिवासी जमाती'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.
- गारे गोविंद, ''भारतीय आदिवासी : समाज आणि संस्कृती'', आदिम प्रकाशन, पुणे, १९७६.
- गारे गोविंद, ''आदिवासी प्रश्न'', आदिम प्रकाशन, पुणे, १९९६.
- गारे गोविंद, ''आदिवासी समस्या व बदलते संदर्भ : कातकरी विकासाच्या दशा - २'', सुगावा प्रकाशन, पुणे, २०००.
- गारे गोविंद, ''आदिवासी विकासातील दीपस्तंभ'', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००१.

📖 गारे गोविंद, ''पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील अंध आदिवासी'', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००१.

📖 गारे गोविंद, ''ठक्कर बाप्पा'', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७.

📖 गारे गोविंद, ''सातपुड्यातील भिल्ल'', अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९७.

📖 गांगल पं. गो. व गांगल योगिनी, ''कथा वनवासीच्या, व्यथा सर्वांच्या'', गंधर्ववेद प्रकाशन, पुणे १९८९.

📖 घारपुरे विठ्ठल, ''मानवी भूगोल'', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०००.

📖 घोटाळे रा. ना., ''समाजशास्त्रीय संशोधन : तत्त्वे व पध्दती'', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, २०००.

📖 जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, ''मराठी विश्वकोश'', खंड-२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, १९९३.

📖 जाधव सुदाम, ''सातपुड्यातील आदिवासी'', सुलभा प्रकाशन, औरंगाबाद, १९८४.

📖 जाधव छाया, ''एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०-९५ कालखंडातील अभ्यास व मुल्यमापन (विशेष संदर्भ : आंबेगांव तालुका, जि. पुणे'', विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, मार्च २००५.

📖 देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिवासी विश्व'', आनंद प्रकाशन, नागपूर, २००१.

📖 देवगांवकर शैलजा व देवगांवकर श. गो., ''आदिमांच्या धर्म संकल्पना आणि देवदेवता'', आनंद प्रकाशन, नागपूर, २००१.

📖 देवगांवकर शैलजा, ''वैदर्भिय आदिवासी : जीवन आणि संस्कृती'', मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८९.

📖 दांडेकर गो. नि., ''भिल्लवीर कलिंग'', मृण्मयी प्रकाशन, पुणे, २००३.

📖 देशमुख भाऊसाहेब यशवंतराव, ''आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासी शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणाम : एक चिकित्सक अभ्यास'', विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, २००३.

- नारगोलकर कुसुम व नारगोलकर वसंत, ''जंगलचे राजे'', श्री मौनी विद्यापीठ प्रकाशन, गारगोटी, १९५५.
- नाडगोंडे गुरूनाथ, ''भारतातील आदिवासी'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.
- परूळेकर गोदावरी, ''माणूस जेव्हा जागा होतो'', मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९९२.
- पिंगळे भिमराव, ''वनवासी व उपेक्षित जग'', अभिनव जीवन प्रकाशन, बीड, १९९०.
- पाटील वसंत, ''हुतात्मा नाग्या कातकरी'', वनवासी कल्याण आश्रम प्रकाशन, ठाणे, १९९९.
- पाटील शरद, ''पश्चिम भारतातील स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका'', सत्यशोधक मार्क्सवादी मुद्रण प्रकाशन भवन, धुळे, १९८९.
- बडवे म. रा., ''इंद्रावतीच्या परिसरातील माडिया जमात'', चंद्रपूर प्रकाशन, चंद्रपूर, १९९०.
- बोकील मिलींद, ''कातकरी विकास की विस्थापन?'' मौज प्रकाशन गृह, पुणे, २००६.
- भावे ह. अ., ''शिकार ते शिकारी'', वरदा बुक्स, पुणे, १९९७.
- भागवत मोहन, ''बिरसा मुंडा'', भारत भारती प्रकाशन, नागपूर, २०००.
- भामरे राजेंद्र पोपटराव, ''नासिक जिल्ह्यातील आदिवासी जीवन व विकास (१९०० ते १९८०)'', विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, सप्टेंबर २००२.
- भामरे प्रशांत भिमसेन, ''ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांमध्ये लोकसंख्या शिक्षणाची जाणीव जागृती झालेली आहे की नाही याचा चिकित्सक अभ्यास करणे'', विद्यावाचस्पती प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, नोव्हेंबर २००३.
- मांडवकर भाऊ, ''कोलाम'', सेवा प्रकाशन समिती, अमरावती, १९६६.
- मांडवकर भाऊ, ''आदिम'', सेवा प्रकाशन समिती, अमरावती, १९६६.
- मांडे प्रभाकर, ''भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या'', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २००३.
- ''महाराष्ट्र राज्यातील वन विषयक सवलती व योजना'', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९७९-८०.
- ''महाराष्ट्रातील आदिवासींची आर्थिक पाहणी'', गांधी स्मारक निधी, महाराष्ट्र शाखा, नासिक, १९५७.

- राजवाडे वि. का., ''कारस्कार'', भारत इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला, (शके १८३४), खंड ४, पुणे, १९९३.
- लिमये अनुसया, ''आदिवासींची संस्कृती आणि शिक्षण'', आदिवासी संशोधन पत्रिका, भाग ३, क्र. २, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, सप्टेंबर १९८१.
- लाड विठ्ठल, ''सह्याद्रीच्या कुशीतील घुसमटलेल्या कातकऱ्याची कथा आणि व्यथा'', जाग संस्था प्रकाशन, मालाड, मुंबई, २००३.
- विनायक तुकाराम, ''आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समिक्षा'', विजय प्रकाशन, नागपूर, १९८४.
- वैद्य नरेश कुमार, ''जन जातीय विकास मिथक एवं यथार्थ'', रावत पब्लिकेशन्स, जयपूर व नवी दिल्ली, २००३.
- श्रीवास्तव जी. पी., ''सामाजिक अनुसंधान सर्व्हेक्षण एवं सांख्यिकी'', युनिव्हर्सिटी प्रकाशन, दिल्ली, १९९६.
- संगवे विलास, ''आदिवासींचे सामाजिक जीवन'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२.
- संगवे विलास, ''सामाजिक मानवशास्त्र : एक सैध्दांतिक अभ्यास'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६९.
- संपादक, ''आदिवासी संशोधन पत्रिका'' (आदिवासी विकास योजना विशेषांक), खंड २०, अंक १, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च १९९८.
- सवदी एस. बी. व कोळेकर पी. एस., ''मानवी लोकसंख्या भूगोल'', निराली प्रकाशन, पुणे, २००६.
- हुसेन माज्रिद, मराठी अनुवाद, ए. व्ही. भागवत, डॉ. प्रविण सप्तर्षि, संजीव नलावडे, सौ. इरावती नलावडे, मुकुंद नातू, ''मानवी भूगोल'', के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००२.
- फडके सुधीर, ''महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न'', जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३.
- Aggarwal, P.K., "Tribal Development Planning in India", Mahaveer & Sons Publishers and Distributors, New Delhi, 2007.
- Ahuja, Ram, "Religion of the Bhills-A Sociological Analysis", Sociology Bulletin, 14(1), 1965.

- Anand, M.R., "The Hindu View of Art.", Asia Publishing House, Bombay, 1957.
- Appadurai Arjun, "Right and Left Hand Casts in South India", Indian Economic and Social History Review-2, 1974.
- Atal Yogesh. "Adivasi Bharat", Edited by S. C. Dube, Rajkamal Prakashan, Delhi, 1965.
- Banerjee B.G., "On Development & Tribal Development Tribal Bulletin, Vol. II, No.1, Tribal Research and Training Institute Pune, Sept. 1984.
- Bhargav B.S., "The Criminal Tribes", Lakhnow Publications, Lakhnow, 1949.
- Bose Nirmal Kumar, "Tribal life in India", National Book Trust India, New Delhi, 1971.
- Bose, Nirmal Kumar, "Tribal Life in India", National Book Trust India, New Delhi, 1971.
- Chattopadhayaya K. P., "Munda Festival in Bihar" Part II B, Journal of the Royal Authropological Society in Bengal, 1972.
- Chaudhari B. (Ed.), "Tribal Development in India Problems and Prospects", Inter-India Publications, New Delhi, 1982.
- Danda A.K., ' Tribes in India' , Man in India , 68(4) , 1988.
- Deogaokar S.G., "The Madia of Bhamaragarh", Sterling Publications (P) Ltd., New Delhi, 1982.
- Dutta Majumdar, "The Santhal: A Study in Cultural Change", Manager of Publication, Govt. of Indian Press, 1956.
- Enthoven R. E., "Tribes and Casts in Bombay", Vol. III, Govt. Central Press, Bombay, 1922.
- Gadgil Madhav "Forest with a Social Purpose" in Fernandes Walter and Kulkarni Sharad (Eds.) Toards a New Forest Policy, Indian Social Institute, New Delhi, 1986.
- Gare Govind M., "Tribals in an urban setting: A Socio-economic study of Mahadev Koli" Ph.D. Thesis, University of Pune, 1972.

- Ghurye G.S., "Caste and Race in India" Popular Publication Mumbai, 1979.
- Ghurye G.S., "The Aborigins-So called and their future". Gokhle Institute of Politics and Economics Poona, 1943.
- Ghurye G.S., "The Mahadev Kolis" Popular Prakashan Bombay, 1958.
- Govt. of India (Ministry of Home Affairs), "The Report of Committee on Forest and Tribals in India", New Delhi, 1982.
- Govt. of India, Report of the Scheduled Area and Scheduled Tribes Commission, Vol. I, 1960-61.
- Govt. of Maharashtra (T.R. & T.I. Pune) "Evaluation Study of Govt. Backward Class Hostels in Maharashtra State", 1983-84.
- Govt. of Maharashtra, "Brief note on the primitive tribal group in Maharashtra", Tribal Research and Training Institute, Pune, 1999.
- Govt. of Maharashtra, "Dieing children", Vol.2, Tribal Research and Training Institute, Pune, 17 September 2002.
- Govt. of Maharashtra, "Ethnographic notes on the scheduled Tribes of Mharashtra", Vol. 5B, Director, Census options, Bombay, 1972.
- Govt. of Maharashtra, "Health and Nutrition problems of primitive Tribes in Mharashtra", Tribal Research and Training Institute, Pune, 1977.
- Govt. of Maharashtra, "Monographic Survey of the Katkaries", Tribal Research and Training Institute, Pune , 1979.
- Gurav V.N., "The Socio-Economic Upliftment of the scheduled Tribe in Maharashtra with reference to Katkari, Warli And Kokna" Ph.D. Thesis, University of Bombay, 1971.
- Hanumantha Rayappa P., Grover Deepak, "Employment Planning for the Rural Poor: The Case of Scheduled Casts & Scheduled Tribes" Sterling Publications Pvt. Ltd. New Delhi, 1980.
- Indira Munshi, "Adivasi Life Context Constraints, Choises", Rawat Publications, New Delhi, 2007.

- Kamble B.N., "Effectiveness of Developmental Programmes for scheduled casts and scheduled Tribes in Maharashtra" Ph.D. Thesis, University of Pune, 1995.
- Karve Irawati, "The Tribals of Maharashtra", Indian Institute in Social Authropology, Simla, 1969.
- Kulkarni S.D. "Descriptive Analysis of Katkari Dialect", Ph.D. Thesis, University of Pune, 1982.
- Kulkarni Sharad , 'Towards a social forest policy', Economic and Political weekly, XVIII, No. 36, 5 Feb. 1983.
- Masavi, Mastali and Gauri Pandya, "The kathodies of Gujarat:-The Socio-Economic survey of development plan", The Institute of Tribal Research and Training, Ahmedabad, 1987.
- Mehta B.H., "A summary of the Survey of the Economic Life of an Aboriginal Tribe of Gujarat", Journal of University of Bombay Vol.2, 1934.
- Negi R.S. and John Gaikwad (Edited) "Socio-Cultural Dynamic of development", The Institute of Tribal Research and Training, Pune, 1997.
- Pasayat Chitrasen, "Tribe Caste and Folk Culture", Rawat Publications New Delhi, 2000.
- Patnaik Renuka, "Tribe Ecology and Development", Rajat Publication, New Delhi, 2000.
- Patnaik Renuka, "Pattern of occupational and Resource Utilization in Contrasting Ecological Setting: A Comparative study of Katkari Kolam and Madia Gond of Maharashtra", Ph.D. Thesis, University of Pune, 1996.
- Pol A.V., "Economic change among Tribals Thane Dist." Ph.D. Thesis, University of Bombay, 1985.
- Prasad Sushma Sahay, "Tribal Wome labourers: Aspects of Economic and Physical Exploitation" Gain Publishing house, Delhi, 1988.

- Rudolf C., Heridia, Rahul Shrivastava, "Tribal identity and Minority Status: The Katkari Nomads in Transition" Concept Publishing House, New Delhi, 1994.
- Samal Jagbandhu, "Some aspects of Tribal Economy: A case study of Koraput Dist.", Ph.D. Thesis, University of Pune, 1992.
- Sharma B.D. "Planning for tribal Development" Prachi Publishing New Delhi" 1984.
- Sharma S.P. and Sharma J.B., "Culture of Indian Tribes: Concept and Identity" Vol. -1, Radha Publications New Delhi, 1998.
- Vyas N.N. and Man R.S. (Edited), "The Kathodies : A Tribe in Transition in India" Rawat Publications , Jaipur , 1980.
- Watt Gorge, "The Dictionary of Economic Products of India" Government central press, Bombay, 1894.

# ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास''

## कुटूंब सर्वेक्षण प्रश्नावली अनुसूची

१. कुटूंब प्रमुखाचे नाव: गावाचे नांव :

२. तुमची पोट जात कोणती?

३. तुमचे मुळ गाव कोणते?

४. किती वर्षांपासून येथे राहता?

५. कुटूंबातील एकूण सदस्य संख्या :

| वयोगट | ० ते ५ | ६ ते १४ | १५ ते ६० | ६० च्या पुढे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६. कुटूंबाची शैक्षणिक स्थिती :

| | निरक्षर | साक्षर | पूर्व प्राथ. | प्राथमिक | माध्य. | उच्च माध्य. | १२ वी | पदवी | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | | | | | | | | | |
| पुरूष | | | | | | | | | |

७. तुमचे कुटूंब कोणत्या प्रकारचे आहे? १) संयुक्त २) विभक्त ३) मुक्त

८. तुमच्या कुटूंबात प्रमुख कोण आहे?

९. तुम्ही मुलांना नियमित शाळेत पाठविता का? १) होय २) नाही

१०. तुमच्या कुटूंबातील शाळा सोडलेले सदस्य किती? त्याचे कारण :

११. तुम्ही कोणता धर्म मानता?

१२. तुमचे कुलदैवत कोणते?

१३. तुमचे ग्रामदैवत कोणते?

१४. तुमच्या घरातील देवघरात कोणता देव आहे?

१५. तुमच्या पारंपारिक नृत्याचे नाव काय व ते नृत्य केव्हा करता?

१५. वर्षभरात कोणकोणते सण साजरे करता?

१६. कोणकोणत्या उत्सवात दारूला अधिक महत्त्व दिले जाते?

१७. विवाह पध्दती कशी असते?

१८. विवाहातील रितीरिवाज कसे असतात?

१९. लग्न समारंभात बळी प्रथा आहे का? कोणता प्राणी बळी देता?

२०. तुमच्या मुला, मुलीचे लग्न केव्हा केले किंवा करणार?

२१. तुमच्या कुटूंबात कोणाचा घटस्फोट झाला आहे? कोणाचा?

२२. तुमचा भूत, जादूटोणा यावर किती प्रमाणात विश्वास आहे व त्याचे परिणाम दिसतात का?

२३. तुम्ही कोणकोणते दागिने घालता?

२४. महिलांना गोंदन आवडते का? कोठे व कसे गोंदतात?

१) कपाळ २) हनुवटी ३) हात ४) नाक ५) इतर

२५. तुमची पत्नी नात्यातील की नात्याबाहेरील आहे?

२६. मागील वर्षभरात घरात कोणी आजारी पडले होते का? आजाराचा प्रकार :

२७. आजारी पडल्यावर काय करता?

२८. एखादा मोठा आजार झाल्यास कोठे जाता?

२९. तुमच्या घरातील स्त्रीचे बाळंतपण कोठे व कोणाकडून केले? १) घरी २) दवाखान्यात

३०. घरातील मुलांना लस दिली का? १) होय २) नाही

३१. घरातील कोणाची संतती नियमन शस्त्रक्रिया झाली आहे? नसल्यास का?

३२. तुम्हाला एकूण किती मुले झाली? त्यातील जिवंत किती? १) एकूण २) जीवंत ३) मृत्यूचे कारण

३३. मागील दोन वर्षात घरातील कोणाचा मृत्यू झाला का? मृत्यूचे कारण :

३४. तुमचा मुळचा पारंपारिक व्यवसाय कोणता व तो व्यवसाय सोडण्याचे कारण?

१) काथ बनविणे २) कोळसा पाडणे ३) विटा बनविणे ४) शेतमजूर ५) मासेमारी

३५. कामाचा मोबदला कोणत्या स्वरूपात मिळतो?

१) पैसे २) धान्य ३) दोन वेळचे जेवण ४) दारू

३६. मोबदला कोण ठरवितो व तो योग्य वाटतो का?

३७. तुमच्या कुटूंबातील कमावणारी सदस्य संख्या किती?

३८. मासेमारी कशासाठी करता? १) विक्री २) उपजीविकेसाठी

३९. मासे कोणत्या बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन जाता?

४०. तुम्ही कोणाकडून कर्ज घेतले आहे का व कोणत्या कारणासाठी घेतले?

१) सावकार २) बँक ३) पतपेढी ४) मालक ५) इतर

४१. तुमच्याकडे कोणकोणते पाळीव प्राणी आहेत? १) गाय २) म्हैस ३) बैल

४) शेळी ५) मेंढी ६) कुत्री

४२. तुम्हाला विर्षातून किती दिवस काम मिळते?

४३. तुम्ही बेकारीच्या काळात काय करता?

४४. कुटूंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न किती? मासिक किती?

| २००० | २००१–५००० | ५००१–८००० | ८०००१–११००० | ११००१–१५००० | १५००१ पुढे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

४५. तुम्हाला कोणकोणत्या शासकीय योजना माहिती आहेत? कोणत्या योजनेचा लाभ घेतला आहे का?

४६. तुम्ही कोणकोणत्या प्रकारे बचत करता?

४७. तुम्ही बचत गटात सहभागी आहात का?

४८. तुमच्य घरात कोणत्या वस्तू आहेत? १) टीव्ही २) रेडिओ ३) टेप

४) दुचाकी ५) शिवणयंत्र ६) गॅस ७) फोन ८) इतर

४९. तुम्ही कामासाठी स्थलांतरीत होता का? १) होय २) नाही

५०. कामासाठी कोठे स्थलांतरीत होता?

१) तालुक्यात  २) जिल्ह्यात  ३) जिल्ह्याबाहेर  ४) राज्याबाहेर

५१. कामासाठी किती काळ स्थलांतरीत होता?

१) पावसाळा ... महिने  २) हिवाळा ... महिने  ३) उन्हाळा ... महिने

५२. घराची जागा तुमच्या मालकीची आहे का?

५३. तुम्हाला घर कोणी बांधून दिले?

५४. तुमच्या घराचे एकूण क्षेत्रफळ किती?

५५. तुमचे घर कोणत्या प्रकारचे आहे? १) झोपडी  २) मंगलोरी कौल झोपडी

५६. घरात लाईट कनेक्शन केव्हा घेतले?

५७. वर्षभरात कोणत्या काळात कोणता व्यवसाय केला जातो?

१) पावसाळा :  २) हिवाळा :  ३) उन्हाळा :

५८. तुम्ही खर्च व उत्पन्नाचा तसेच येणी व देणी याचा हिशोब कसा ठेवता?

५९. मिळालेले उत्पन्न कशाप्रकारे खर्च केले जाते?

६०. वनवस्तू गोळा करता का? त्या कोठे विकता?

६१. एखादा जोडव्यवसाय करता का? कोणता?

६२. मागील दहा वर्षात कोणाकडून कोणत्या स्वरूपात मदत मिळाली का?

१) शासन  २) बिगर शासकीय संस्था  ३) खासगी ट्रस्ट (पैसा, वस्तू, इतर)

६३. तुमच्या घरात कोणी नोकरीला आहे का?

१) शासकीय  २) निमशासकीय  ३) खासगी  ४) इतर

६४. आदिवासी सहकारी संस्था आहे का? त्याचे सदस्य आहात का?

६५. घरात व बाहेर स्त्री जास्त काम करते की पुरूष?

## ''पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास''

### निरिक्षणात्मक अनुसूची

१. गावाचे नांव :

२. गावापासून कातकरी वस्तीचे अंतर :

३. मुख्य रस्त्यापासून कातकरी वस्तीचे अंतर :

४. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता :

१) सार्व. विहीर २) खासगी विहीर ३) हातपंत ४) सार्व. नळ ५) नदी ६) झरा

७) बंधारा

५. पाण्याचे दुर्भिक्ष्य असणारा कालावधी :

६. वैद्यकीय सुविधांची उपलब्धता :

१) खासगी दवाखाना २) प्राथमिक आरोग्य केंद्र ३) गावातील वैद्य ४) प्रसुती केंद्र

५) कुटूंब नियोजन केंद्र

७. शैक्षणिक सुविधांची उपलब्धता : १) बालवाडी २) प्राथमिक ३) माध्यमिक

४) उच्च माध्यमिक

८. कातकरी मुलांसाठी स्वतंत्र शाळा आहे का? कातकरी वस्तीपासूनचे अंतर किती?

९. कातकरी समाजाची स्वतंत्र स्मशानभूमी आहे का?

१०. कातकरी वस्तीवरील वीज पुरवठा : होय नाही

११. कातकरी वस्तीवरील स्वच्छता :

१२. कातकरी घराची स्वच्छता :

१३. स्वच्छता गृहाची व्यवस्था :

१४. कातकरी लोकांचे राहणीमान :

१५. कातकरी लोकांचा गाव कारभारात सहभाग :

१६. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत कातकरी लोकांना उमेदवारी दिली जाते का?

१७. कातकरी बचत गट आहे का?

१८. कातकरी वस्तीपासून आरोग्य सुविधा किती अंतरावर आहेत?

१९. घराची रचना :

२०. मासेमारीसाठी नैसर्गिक अनुकुलता :